

न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे.

न्यायमूर्ति

# महादेव गोविंद रानडे

यांचें चरित्र.

लेखक व प्रकाशक.

नरहर रघुनाथ फाटक बी. ए.,

[ सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. ]

प्रथमावृत्ति.

किंमत ३ रुपये.

मुद्रक

अनंत आत्माराम मोरमकर,

श्रीलक्ष्मीनारायण प्रेस, ३६४ ठाकुरद्वार मुंबई.

प्रकाशक

नरहर रघुनाथ फाटक,

३६४ ठाकुरद्वार मुंबई.

समर्पण

श्री पितृचरणों

# प्रस्तावना.

निराश झालेल्या मनुष्याला, केवळ ईशकृपेमुळें, बहुतवर्षें इच्छिलेली गोष्ट मिळाल्यानें जसा अनुपमेय आनंद होतो, तसा मला हें चरित्र पाहून होत आहे. ऑ. गोपाळराव गोखले यांची भक्ती व आदर शिष्याला व सत्पुत्राला शोभेसा होता. त्याप्रमाणेंच स्वतःचेंही त्यांच्यावर प्रेम व विश्वास होता. यामुळें विस्तृत व परिपूर्ण चरित्र त्यांनींच लिहावयास हवें होतें. परंतु त्यांच्या हातून ही गोष्ट व्हावयाची नव्हती! मी त्यांना याबद्दल दोष देत नाहीं, कारण अनेकविध कामामुळें त्यांच्या हातून ही गोष्ट लांबणीवर पडत गेली, याबद्दल त्यांना वाईट वाटत असे; आणि त्यांच्या हातून चरित्र लिहिलें गेलें नाहीं, हें त्यांच्या मनाला लागून राहिलें होतें. सन १९१५ मध्यें ते स्वर्गवासी झाले आणि नंतर कांहीं महिन्यांनींच हें काम करण्यास योग्य असे दुसरे गृहस्थ—आमचे आप्त रा. बापूराव विद्वांस हेही गेले! आणि मग माझी चरित्राबद्दल निराशा झाली. कांहीं ना कांहीं कारणामुळें २२–२३ वर्षें लांबणीवर पडलेलें हें पुण्यकृत्य आज रा. नरहर रघुनाथ फाटक यांनीं भक्तियुक्त अंतःकरणानें, आस्थापूर्वक आणि पुष्कळ परिश्रम घेऊन, तडीस नेलें आहे. रा. फाटक हे १९०१ सालीं कदाचित् सहा-सात वर्षांचे असतील, म्हणजे त्यांना चांगलें स्मरण रहाण्याइतकें दर्शनही घडलें नसेल—अशा या [ त्यावेळच्या ] मुलानें शिक्षण व ज्ञान संपादित करून, निरनिराळ्या ठिकाणांहून

माहिती मिळवून व परिश्रम घेऊन समतोल दृष्टीनें हें चरित्र लिहिलें याबद्दल त्यांचे आभार मानावयाचे नाहींत—तरी कौतुक केल्याशिवाय राहवत नाहीं.

आजपर्यंत इंग्रजी व मराठी भाषेंत जीं त्रोटक चरित्रें प. लो. वा. वामन बाळकृष्ण रानडे, गणपत अमृत मानकर, हरि नारायण आपटे, रा. वैद्य वगैरे गृहस्थांनीं लिहिलीं आहेत, त्यापेक्षां हें नवें पुस्तक विस्तृत व पुष्कळच मोठें आहे. पुस्तक विशेष दिवशीं प्रसिद्ध व्हावें हा हेतु मनांत असल्यामुळें [ कांहीं अडचणीमुळें हें साध्य झालें नाहीं ] शेवटचा भाग कांहींसा संक्षिप्त झाला आहे. दुसरी आवृत्ती यापेक्षां मोठी व पूर्ण निघेल.

चरित्र लिहिण्याचें कार्य सोपें नाहीं. ज्या व्यक्तीचें चरित्र लिहावयाचें तिनें आपल्या हयातींत जी कामगिरी केली असेल, त्या कामगिरीच्या पाठीशीं जे हेतु असतील, त्या व्यक्तीनें जे भलेबुरे प्रसंग अनुभवले असतील, त्या प्रसंगीं तिचें जे विशिष्टत्व दिसलें असेल, त्या सर्वांची माहिती चरित्रांत यथातथ्य यावयास पाहिजे, तशी माहिती या पुस्तकांत आलेली आहे. ही माहिती सांगत असतांना ती कोठेंही कंटाळवाणी न होऊं देण्याची खबरदारी चरित्रकाराला घ्यावी लागते. या पुस्तकांत रा. फाटक यांनीं तशी खबरदारी घेतल्यामुळें मनोरंजकपणांत कोठेंही खळ पडल्याचें आढळून येत नाहीं. पुष्कळदां चटकदारपणा आणण्याच्या भरांत चरित्रलेखक आपल्या पुस्तकांतील माहिती विश्वसनीय आणि साधार असायला पाहिजे, ही महत्वाची गोष्ट विसरतात. ही गोष्ट

रा. फाटक यांनीं डोळ्याआड केलेली नसल्यानें त्यांच्या या पुस्तकांत विश्वसनीयता व चटकदारपणा या दोन्ही गुणाचें योग्य प्रमाणांत मिश्रण झालें आहे. तथापि मुळांतच कांही गोष्टी अशा घडलेल्या आहेत कीं, त्यांचा बोध आजच्या पिढीला योग्य रीतीनें होणें शक्य नाहीं. चरित्राच्या शेवटच्या भागांतील बत्तीस घासांची गोष्ट अशापैकींच एक आहे. कोणाला वाटेल कीं, बत्तीस घास म्हणजे काय थोडा आहार झाला. पण जुन्या ग्रंथांतून यमनियमाच्या विवेचनांतला बत्तीस घासांचा खुलासा ज्यांच्या वाचनांत किंवा ऐकण्यांत आला असेल त्यांनाच या गोष्टीचा यथार्थ बोध होईल. रा फाटकांच्या लिहिण्यांत तसें स्पष्टीकरण झालेलें नाहीं.

ह्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्यास दुसरें कोणी योग्य माणूस मिळालें असतें, परंतु रा. फाटक यांचा फार आग्रह पडल्यामुळें वरील चार शब्द प्रस्तावनेसाठीं लिहिले आहेत.

सेवासदन
ता. २५ फेब्रुवारी १९२४ } रमाबाई रानडे.

# लेखकाचें निवेदन.

सुमारें तीन वर्षांपूर्वी ( १९२१ च्या सप्टेंबर-आक्टोबरांत ) पुण्यास रा. रा. वासुदेव गोविंद आपटे व मी महाराष्ट्रांत होऊन गेलेल्या कांहीं थोर पुरुषांच्या चरित्राविषयीं बोलत बसलों असतां ' कै. न्या. मू. महादेव गोविंद रानडे यांचें चरित्र मी लिहावें ' अशी रा. आपट्यांकडून मला सूचना मिळाली. परंतु ही सूचना करूनच रा. आपटे थांबले नाहींत. त्यांनीं श्री. मा. रमाबाईसाहेब रानडे यांचे बंधु रा. बाबासाहेब कुर्लेकर यांना एक ओळखीचें पत्र दिलें. माझ्यापूर्वी अनेक व्यक्तींनीं हें काम अंगावर घेऊन सोडून दिल्यामुळें वरील ओळखीच्या पत्राचा उपयोग करावा कीं न करावा, याबद्दल माझें मन साशंक होतें, म्हणून मी कांहीं दिवस स्वस्थ बसलों, व नंतर रा. बाबासाहेबांकडे गेलों. रा. बाबासाहेबांनीं माझा श्री. मा. रमाबाईंना परिचय करून दिला व प्रास्ताविक बोलणें झाल्यावर या जवळ जवळ वीस वर्षे पडून राहिलेल्या कार्याचा यत्न आपण करून पहावा, असें माझ्या मनानें घेतलें.

या गोष्टीला दोन वर्षें लोटलीं. मधल्या काळांत मिळेल तसतशी माहिती जमविण्याचें काम मी करीत होतों. १९२३ च्या आगस्ट अखेरीस मी कांहीं कारणानें पुण्यास गेलों असतां नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणें श्री. मा. रमाबाईंच्या भेटीस गेलों. त्यांची प्रकृति तेव्हां नीट नव्हती. क्षेमकुशलाचीं प्रश्नोत्तरें संपल्यावर त्यांनीं ' संकल्पिलेलें चरित्र माझ्या डोळ्यांदेखत प्रसिद्ध होईल ना ' अशा अर्थाचा प्रश्न केला. या प्रश्नाच्या टोंचणीमुळेंच हें पुस्तक इतक्या जलदीनें लिहिलें गेलें. वरील प्रश्नोत्तरानंतर मी दीड पावणे दोन महिने पुण्यास चरित्राची सामग्री गोळा करण्यांत घालविले. आक्टोबर १९२३ च्या शेवटीं मुंबईस परत आल्यानंतर आणखी एक महिना याच पूर्वतयारीच्या कामांत खर्ची घातला आणि डिसेंबरच्या सुरुवातीस लेखनाला

प्रारंभ केला. इसवी सनाप्रमाणें ता. १६ जानेवारी हा कै. न्या. मू. रानडे यांच्या पुण्यतिथीचा दिवस असल्यानें त्या दिवशीं पुस्तक प्रसिद्ध करावें, असा मूळ विचार होता व त्यासाठीं त्वरा चालविली होती. त्या दिवशीं पुस्तक निघण्याची आशा खुंटल्यावर देशी कालगणनेस अनुसरून ता. ३१ जानेवारी (१९२४) या दिवशीं पुण्यतीथ पडत असल्यामुळें तो दिवस पुस्तकाच्या प्रसिद्धीनें साजरा करण्याच्या मार्गास मी लागलों. पण ही दुसरी संधीदेखील वाया गेली. वरील तारखा चुकण्याचीं कारणें अनेक व बिनतोड आहेत, पण त्यांचा पाढा येथें सादर करून वाचकांना कंटाळा आणण्याची माझी इच्छा नाही.

कै. न्या. मू. रानडे यांची लहानमोठीं चरित्रें अनेक आहेत. मराठींत बरींच असून हिंदी, गुजराथी, उर्दू, इंग्रजी, वगैरे दुसऱ्या भाषांतूनही कांहीं मोठालीं चरित्रें प्रसिद्ध आहेत. हिंदींत दोन चरित्रें असून गुजराथींत एक आहे व या तिन्ही चरित्रांचा खप चांगला होतो, असें त्यांच्या निघालेल्या तीन तीन चार चार आवृत्त्यावरून निर्विवाद म्हणावें लागतें. सगळीं हिंदी चरित्रें श्री. देवाश्रयी यांच्या गुजराथी चरित्रावरून लिहिलेलीं आहेत आणि श्री. देवाश्रयी यांच्या चरित्राचा मुख्य आधार म्हणजे कै. मानकर यांनीं दोन भागांत प्रसिद्ध केलेलें इंग्रजी चरित्र, हाच होय. मानकरांचें चरित्र दोन भागांत असलें तरी त्रोटक आहे, म्हणून मला स्वतंत्र रीतीनें अनेक वृत्त-पत्रांच्या फाइलींतून माहिती गोळा करावी लागली. ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश नेटिव्ह ओपिनियन, सुधारक, सुबोधपत्रिका, केसरी, टाइम्स ऑफ इंडिया, बॅांबे गॅझेट, इंदुप्रकाश, इंडियन सोशल रिफार्मर, या वृत्तपत्रांच्या मिळाल्या तेवढ्या फायली वाचून त्यांतून गोळा केलेल्या माहितीचा संग्रह या नव्या चरित्र-पुस्तकांत दिला आहे, हें वाचकांच्या लक्षांत येईलच. अध्ययन, अध्यापन, वाङ्मयखात्यांतली नोकरी, हीं प्रकरणें लिहितांना त्यावेळच्या डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनच्या अहवालांचा आणि बॅांबे एज्युकेशन रेकॉर्ड नामक मासिकाचा प्रामुख्यानें उपयोग केला आहे. या शिवाय सोशल-कॉन्फरंसचे रिपोर्ट, सार्वजनिक सभेचे अंक, विविधज्ञानविस्ताराचे अंक,

कै. न्या. रानडे यांच्याशीं संबंध आलेल्या इतर व्यक्तींचीं चरित्रें, इत्यादि सामग्रीचा उपयोग करावा लागला तो निराळाच.

माहिती मिळविण्याचें काम मला एकटयालाच करावें लागलें. पण हें काम करीत असतां मला जर अनेक मित्रांच्या प्रोत्साहनाचा लाभ झाला नसता तर तें शेवटास नेण्याची आस्था माझ्यांत राहिली नसती. प्रोत्साहनाच्या बाबतींत श्री. मा. रमाबाईनाच अग्रस्थान देणें प्राप्त आहे. त्यांनीं आपल्या जवळचें सर्व दप्तरी साहित्य माझ्या हवालीं केलें. इतकेंच नव्हें तर माझ्या विनंतीला मान देऊन बहुमोल प्रस्तावना लिहून माझें पुस्तक मंडित केलें. पुण्यास ज्ञानप्रकाशच्या संपादकवर्गांतले श्री. काकासाहेब लिमये, श्री. बापूराव अंबेकर, श्री. अबासाहेब अंबेकर, सर्व्हंट ऑफ इंडिया पत्राचे संपादक श्री. वझे, श्री. गोपाळ कृष्ण देवधर यांची प्रोत्साहनपर मदत झाली. विद्याखात्याच्या कचेरींतील माझे मित्र रा. वासुदेवराव बेंद्रे यांच्या मदतीची मला माझ्या स्वतःच्या प्रयत्नापेक्षांही जास्त योग्यता वाटते. या शिवाय श्रीमंत सरदार गंगाधर नारायण उर्फ आबासाहेब मुजुमदार, एम्. एल्. सी., प्रो. दत्तो वामन पोतदार, भारतइतिहाससंशोधन मंडळाचें माजी क्युरेटर रा. पां. मा. चांदोरकर यांनींही शक्य तें साह्य केलें. मुंबईस श्री. द्वारकानाथ गोविंद वैद्य, श्री. आनंदराव तेलंग यांचें फार साह्य झालें. श्री वसंत नारायण नाईक व पन्नालाल हायस्कूलचे हेडमास्तर श्री. दत्तोपंत तेलंग यांच्या साह्याचें महत्व कोणत्या शब्दांनीं वर्णावें हेंच मला समजत नाहीं. वरील सर्व मदतगार मित्रांचा मी अत्यंत ऋणी आहे. श्री लक्ष्मी–नारायण छापखान्याचे मालक श्री अनंतराव मोरमकर व विविधज्ञानविस्ताराचे नवीन तरुण संपादक रा. रामचंद्र काशिनाथ तटनीस यांनीं छापण्याचीं इतर कामें बंद ठेवून केवळ याच कामाकडे सारखें लक्ष पुरविलें, याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील. इंदुप्रकाश कारखान्याचे सोल लेसी व मॅनेजर श्री. अनंत गणेश शेकदार यांचेही आभार मानणें अवश्य आहे. इंदुप्रकाश पत्राच्या सपांदकत्वाच्या दैनिक कामांत मधून

मधून चरित्रलेखनांत गुरफटल्यामुळें माझ्या हातून जो खंड पडत होता, त्याकडे रा.शेकदार यांनीं उदार मनानें दुर्लक्ष केलें नसतें तर इतक्या लवकर हें काम समाप्तीस जाण्याचा संभव नव्हता. आणखी एका मित्राचा या ठिकाणीं नामोल्लेख करावयास पाहिजे होता, परंतु त्याची तसें करण्यास परवानगी नसल्यामुळें नाइलाज आहे.

अंगीं योग्यता नसतां एकादें कार्य स्वीकारल्यामुळें त्यांत जे दोष उत्पन्न होतात, ते या पुस्तकांत आहेतच, पण घाईमुळें त्यांत आणखी इतर पुष्कळच दोष आलेले आहेत. दुसऱ्या आवृत्तीचा योग आल्यास हे दोष काढून टाकून सुधारलेलें परिपूर्ण पुस्तक वाचकांच्या हातीं देतां येईल असा भरंवसा आहे.

ता. १ मार्च १९२४ — न. र. फाटक.

## चुकीची दुरुस्ती.

१५१ पानाच्या आठव्या ओळीच्या शेवटीं 'विधि' शब्द आहे. तेथें तो 'विरुद्ध' समजावा.

# अनुक्रमणिका.


| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण पहिलें | बाल्य व प्राथमिक शिक्षण | .... | १ |
| ,, दुसरें | अध्ययन .... .... | .... | ११ |
| ,, तिसरें | अध्यापन .... .... | .... | ५१ |
| ,, चवथें | वाङ्मयखात्यांतील नोकरी | .... | ६५ |
| ,, पांचवें | समाजसेवेचा प्रारंभ काळ | .... | ८९ |
| ,, सहावें | विधवा-विवाह .... | .... | १३१ |
| ,, सातवें | प्रार्थनासमाज .... | .... | १५७ |
| ,, आठवें | पुण्यांतलीं पहिलीं वर्षें .... | .... | १८१ |
| ,, नववें | स्वभाव-परिचय .... | .... | २५७ |
| ,, दहावें | सरकारी इतराजीचा फेरा.... | .... | २९२ |
| ,, अकरावें | नव्या कार्याचा आरंभ .... | .... | ३३३ |
| ,, बारावें | संमतिवयाचा कायदा .... | .... | ३६३ |
| ,, तेरावें | प्रायश्चित आणि बढती .... | .... | ४४५ |
| ,, चौदावें | न्यायमूर्तीच्या आसनावर .... | .... | ५१५ |
| अखेर | .... .... | .... | ५८९ |

"He (Mr. Ranade) was one of those men who appear, from time to time, in different countries and on different occasions, to serve as a light to guide the footsteps of our weak and erring humanity."

"We can only humbly trust that He who gave Mr. Ranade to this nation, may give another like him in the fullness of time. Meanwhile it is our duty to cherish his name, treasure up his example and be true to his teachings in the faith that a nation that has produced a Ranade need not dispair of its future."

*Gopal Krishna Gokhale.*

" महाराष्ट्रदेश म्हणजे त्यावेळीं एक थंड गोळा होऊन पडला होता. या थंडया गोळयास कोणत्या तऱ्हेनें ऊब दिली असतां तो पुन्हा सजीव होईल, व हातपाय हालवूं लागेल, याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनीं, अनेक उपायांनीं, अनेक रीतींनीं त्यास पुनः जीवंत करण्याचें दुर्धर काम अंगावर घेऊन त्यांकरितां जिवापाड जर कोणी मेहनत केली असेल तर ती प्रथमतः माधवरावांनींच केली, असें म्हटलें पाहिजे; व आमच्या मतें हेंच त्यांच्या थोरवीचें किंवा असामान्य मोठेपणाचें मुख्य चिन्ह होय.........

सरकारचा ताबेदारपणा, योग्य माणसांची कमतरता, समाजामध्यें रूढ असलेल्या समजुती इ. अनेक कारणांनीं माधवरावजीस आपल्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी करतां आल्या नाहींत, तथापि...या सर्व अडचणी सोसून बिनतक्रार देशोन्नतीच्या कार्याकरितां उत्साहानें भगवा झेंडा हातीं घेऊन सदैव पुढें रहाणें, हें कांहीं लहानसान मुत्सद्दीपणाचें काम नव्हे.........राष्ट्रामध्यें लिहिणारे व बोलणारे पुढारी जरी पुष्कळ असले तरी अशा रीतीनें लोकसमाजामध्यें जागृति उत्पन्न करण्याचें गुरुत्व ज्यांकडे देतां येईल, असे लोक फारच विरळा आहेत. माधवरावजी हे अशा विभूतीपैकींच एक होते."

टिळक–केसरींतील मृत्युलेख ता. २२–१–१९०१

# प्रकरण पहिलें.

## बाल्य व प्राथमिक शिक्षण.

हिंदुस्थानच्या अर्वाचीन राजकीय इतिहासाला आपल्या अद्वितीय ज्ञानानें, धोरणानें व कर्तबगारीनें नवें वळण लावणारे कै. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, यांचा जन्म नाशिक जिल्हांतील 'निफाड' गांवीं सन १८४२ सालीं जानेवारीच्या अठराव्या तारखेस सूर्यास्तसमयीं झाला. कित्येक इतिहासप्रसिद्ध पुरुषांना जसें जन्मतःच महत्वाचें स्थान प्राप्त झालेलें पहावयास सांपडतें तसें स्थान आमच्या चरित्रनायकाला लाभलें नाहीं. त्यांचे पूर्वज पेशवाईच्या अखेरीस कोंकणांतील मोभार पाचेरी ( रत्नागिरी जिल्हा ) गांवाहून, तत्कालीन इतर कोकणस्थांच्या रिवाजाप्रमाणें देशावर आले; परंतु त्यांच्या रानडे कुळांत, माधवरावां-पर्यंत लोकांचें चित्त वेधून घेणारा एकही पुरुष झाला नव्हता. आमच्या चरित्रनायकाचे निपणजे भगवंतराव हे प्रथम कोंकणाला रामराम ठोकून पंढरपूरानजीक कसबे करकंब येथें रहाण्यास आले. यांना फलज्योतिशाचें ज्ञान फार उत्तम होतें. भगवंतरावांचा एकच मुलगा होता. याचें नांव भास्करअप्पा. भास्करअप्पांच्या मातुश्रीनें मुलें जगेनात म्हणून सतत बारा वर्षें अति कडकडीत व्रताचरण केलें.

पिंपळाला व गाईला प्रदक्षिणा घालण्याचा क्रम चालू ठेवून दूध अगर पाण्याऐवजीं गोमूत्रानें सिद्ध केलेल्या दशम्या खाण्याची तपश्चर्या तिनें आरंभली होती. अभ्यागताच्या आदरातिथ्याला तर ती सदैव तत्पर असे. अखेरीस तिच्या व्रताचें सार्थक होऊन भास्करअप्पा हा एक मुलगा तिला लाभला. भास्करअप्पांनीं सांगलीकरांच्या तैनातींत राहून नांव काढलें. ज्योतिष्याचा धंदा टाकून त्यांनीं शिपाईगिरीचा पेशा उचलला. संधी मिळतांच मोंगलांचा एक किल्ला सर करून पराक्रम गाजविला. पण इंग्रजी राज्याचा जम सर्वत्र याच सुमारास बसून हळू-हळू मराठ्याच्या लष्करी मर्दुमकीचे दिवस संपले तेव्हां भास्करअप्पांनीं मुत्सद्देगिरीच्या कामांत प्रवेश केला. ते सांगलीकरांच्या वतीनें अनेक वर्षें इंग्रज सरकाराकडे वकील होते. त्यांनीं मरणापूर्वीचा काळ सर्वस्वीं ईश्वरचिंतनांत घालवून देहत्याग केला. त्यांचे वडील चिरंजीव अमृतराव तात्या यांनीं इंग्रज सरकारची नोकरी पत्करली. यांना चौवे पुत्र झाले, त्यांतले दुसरे पुत्र गोविंदराव हे माधवरावांचे तीर्थरूप होत. माधवराव जन्मास आले तेव्हां त्याचे तीर्थरूप अहमदनगर जिल्ह्यांतील दुय्यम कलेक्टराच्या हाताखालीं सामान्य कारकून होते, त्यांना अवघा पसतीस रुपये पगार मिळत होता. मात्र माधवरावांचे तीर्थरूप गोविंदराव हे कारकून असले, तरी अगदीं दरिद्री नव्हते. त्या काळांतल्या सुवत्तेकडे लक्ष दिल्यास श्रीमंती नव्हे आणि दरिद्रीही नव्हे अशा मध्यम सुखवस्तूपणाच्या स्थितींत माधवरावांचा जन्म झाला असें म्हणावें लागते. माधवरावांचे आजोबा अमृतराव यांनीं इंग्रजांच्या आमदानींत मामलतीपर्यंत मजल मारली असल्यामुळें त्यांचीही सांपत्तिक स्थिति बऱ्यापैकीं गणावयास हरकत नाहीं. निस्सीम दारिद्र्याच्या घोरांत हें कुटुंब नव्हतें.

माधवरावांसारखा हिंदी मातृभूमीचें मुख पराधीनतेच्या अवनत काळांत उज्वल करून, हिंदी जनतेला सर्व प्रकारें हीन दीन समजणाऱ्या अहंमन्य इंग्रज समाजाला व राज्यकर्त्यांना आपल्या गुणाच्या प्रभावानें विस्मित करून सोडणारा पुत्र ज्याला लाभला, त्याचा प्रस्तुत पुत्रप्राप्तीनंतर भाग्योदय व्हावा यांत आश्चर्य कसलें? माधवरावांच्या जन्मानंतर अडीच वर्षांनीं गोविंदरावांना त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानें शिफारस करून कोल्हापुरास तेथील कारभाऱ्याच्या पदरीं जबाबनिशीच्या हुद्दयावर पाठविलें. इंग्रजी नोकरीचा राजीनामा देऊन कोल्हापुरास गोविंदराव प्रथम गेले तेव्हां बायकोस व मुलांस मागें निफाडास ठेवून ते एकटेच सडे गेले. माधवरावांच्या मातुःश्री गोपिकाबाई त्यासमयीं गरोदर होत्या. प्रसूतीनंतर चारपांच महिने लोटल्यावर तान्ही मुलगी दुर्गाबाई, (हीच पुढें माधवरावांच्या कुटुंबांत दुर्गा अक्का या प्रौढ व प्रतिष्ठित नांवानें ओळखली जात असे) व तीन वर्षांचे माधवराव यांना बरोबर घेऊन गोपिकाबाई कोल्हापुरास जाण्याकरितां निघाल्या व याच प्रवासांत माधवरावाचें एक विलक्षण प्राणसंकट टळलें.

त्या काळांत आगगाडया झालेल्या नव्हत्या, इतकेंच नव्हे तर हल्लींप्रमाणें मोठमोठाल्या उत्तम पक्क्या सडकाही पडलेल्या नव्हत्या. सगळा प्रवास आणि वाहतुक बैलगाडयांच्याच साह्यानें होत असे. त्याप्रमाणें गोपिकाबाई आपल्या मुलांसह बैलगाडीनेंच प्रवासास निघाल्या. मार्गांत एक मोठा घाट होता. दिवसा विश्रांति घेऊन रात्रभर मार्ग आक्रमण करण्याची गाडीवाल्यांची रीत असल्यामुळें त्यांनीं नित्याच्या वहिवाटीस अनुसरून शिळोप्याच्या वेळीं गाडया जुंपल्या व रस्ता धरला. या थंड वेळेला डोंगराळ प्रदेशांतल्या हवेची झुळूक लागतांच

गाडीवान, रखवालदार शिपाई, गोपिकाबाई, लहानगे माधवराव व तान्ही दुर्गाताई या सर्वांना झोंपा लागल्या, आणि उतरण आल्यामुळें बैलांनीं झपाट्यानें धांवण्यास प्रारंभ केला. बैलांनीं कितीही चपळाई दाखविली तरी ते खड्ड्यांत गाडी नेत नाहींत, नीट रस्त्यानेंच बिनधोक गाडी घेऊन जातात, हा अनुभव बैलगाडीचा प्रवास करणारांना सांगावयास नको. बैल जुंपून गाड्या चालू झाल्यावर प्रथम बैलांना आळविणारीं गाणीं खड्या सुरांत म्हणावयाचीं, मधून मधून बैलांचें नांव घेऊन त्यास इशारत द्यावयाची, आणि नंतर निद्रावश व्हावयाचें अशी प्राय: गाडीवाल्यांची संवय असते. तसाच प्रकार याप्रसंगीं झाला असावा. गाडीवाला निजला, शिपायानें त्याचें अनुकरण केलें, गोपिकाबाईचींही जागरूकता गेली व गाडी वेगानें उतरणीला लागली. डोंगरांतून पक्क्या-खडीच्या सडका असल्या तरी बैलगाडीमधील प्रवाशांना हिसके, धक्के बसत असतात, मग नुसत्याच चकारी असल्यावर खडखडाटाची कथा विचारायलाच नको ! कोणी जागृत नाहीं असा योग जमल्यावर यदृच्छेनें आपला डाव साधला आणि पांघरुणांत गुरफटलेलें माधवरावजी एखाद्या गाठोड्याप्रमाणें अलद रस्त्यावर पडले.

माधवराव पडले हें कोणाच्याच लक्षांत बराच वेळ आलें नाहीं. रात्रीची वेळ, जंगली प्रदेश अशा स्थितींत रानांतल्या श्वापदांना माधवरावांची चाहूल लागली असती, तर या चरित्राचा ग्रंथ येथेंच आटोपला असता व प्रचंड कर्तृत्वाचा पुरुष दरिद्र्यांच्या मनोरथानुसार उत्पन्न होतांच कालवश झाला हें जगाला कळलेंही नसतें. पण परमेश्वराच्या मनांत संकटाची नुसती चुणुक दाखवूनच माधवरावांची त्या भयंकर परिस्थितींतून मुक्तता करावयाची होती. गाडी पुढें निघून गेल्यावर त्या भयाण

निर्जन स्थळीं माधवराव स्तब्ध पडले होते. जणूं काय या परिस्थितींतून बाहेर पडण्याची आशा सपशेल सुटलेली नाहीं असाच त्यांचा आपल्या मनाशीं विचार चालला होता. कारण मागून घोडयावरून जेव्हां त्यांचे चुलते विठूकाका आले तेव्हां माधवरावांनीं त्यास शांतपणें हाक मारली व आपण येथें पडलों आहों ही हकीकत निवेदन केली. मुलाच्या रडण्याचा आवाज ऐकून तें मूल कोणाचें व येथें कां पडलें याची चौकशी विठूकाकांना बालमाधवाच्या हाकेमुळें करावी लागली नाहीं.माधवरावांची हाक ऐकतांच चटकन् विठूकाका घोडयाखालीं उतरले.' मोठी खैर झाली' असा ईश्वराला धन्यवाद देत त्यांनीं आपल्या लाडक्या माधवाला घोडयावर बसविलें. त्या वेळीं माधवरावांचें सर्वांग थंडीनें काल्यासारखें गारठलें होतें; म्हणून त्याला पोटाशीं धरून पांघरुणांत गुरगुटून घेतलें व घोडयाला टांच देऊन जलदीनें गाडी गांठण्याचा विचार त्यांनीं अंमलांत आणला. गाडीजवळ आल्यावर त्यांनीं भावजयीस हाक मारून जागें केलें व मुलें नीट जागच्या जागीं आहेत ना असा प्रश्न केला. प्रथम हा नुसता सावधगिरी राखण्याबद्दलचा प्रश्न असेल असें समजून झोंपेच्या तारेंत थोडीशी हातानें इकडे तिकडे तांत्रिक चांचपणी करून 'मुलें सुरक्षित आहेत' असा गोपिकाबाईनीं विठूकाकांना जबाब दिला. परंतु पुनः विठूकाकांनीं 'नीट पहा' असें सांगितल्यावर गोपिकाबाई पाहूं लागल्या तों माधवाचा गाडींत पत्ता नाहीं. मग मात्र त्यांच्या तोंडचें पाणी पळालें. मुलगा नाहींसा झाला या कल्पनेनें मातेचें काळीज चरकून कसें थिजत असेल हें शब्दांनीं वर्णन करणें अशक्य आहे. गोपिकाबाईची अशीच दुर्धर अवस्था झाली. परंतु विठूकाकांनीं त्या अवस्थेंत त्यास फार वेळ राहूं दिलें नाहीं. त्यांनीं मुलाला पांघरु-

णांतून बाहेर काढून गोपिकाबाईच्या स्वाधीन केलें. हा हृदयंगम प्रसंग वर्णन करतांना विठूकाकांच्या डोळ्यांत गहिंवराचीं आंसवे शेवटपर्यंत उभीं रहात, असें त्यांच्या तोंडून सदर गोष्ट ऐकणारांनी लिहून ठेवलें आहे.

माधवराव कोल्हापुरास आपल्या वडिलाजवळ रहावयास गेले त्यापूर्वी ते देखील एका जिवावरच्या प्रसंगांतून पार पडले होते त्यावेळीं कोल्हापुरच्या राज्याची व्यवस्था पोलिटिकल एजंट पहात होता. गादीनशीन राजा कोणीच नव्हता. इंग्रज अंमलदारांनी आपल्या विश्वासाचीं माणसें कोल्हापुराच्या राज्यकारभारावर नेमलीं होतीं. राज्यांतल्या मूळच्या पिढिजाद वतनी सरदारांना, मानकऱ्यांना तेथें बिलकूल मान दिला जात नसे. या योगानें ते सर्व चिडले होते त्यांचा संताप अनावर होऊन त्याला मार्ग काढून देण्याकरिता त्यांचीं आपापसांत गुप्त कारस्थानें चाललीं होतीं. अखेरीस या गुप्त खलबतांचें पर्यवसान बंडांत झालें. राज्यांतल्या कित्येक सरदारांनी लष्कर फितूर केलें व त्याच्या जोरावर बंडाचें निशाण उभारलें त्यानंतर कांहीं काळ इंग्रजी राज्यव्यवस्थेचा डोलारा जमीनदोस्त होतो की काय, अशी भीति उत्पन्न झाली. इंग्रजांनीं नेमलेल्या अंमलदारांवर बंडखोरांचा डोळा होता. त्यांचा कांटा काढावा अशी त्यांची महत्वाकांक्षा होती; त्यामुळें बंडवाल्यांनीं या अंमलदारांना पकडण्याचे यत्न केले कोल्हापुरचे कारभारी दाजी कृष्ण पंडित यांना त्यांनीं कैद करून नेले पुढें कांहीं किल्लेदार बंडखोरांना सामील झाल्यामुळें दुसऱ्या ठिकाणच्या फौजा बोलावून बंडाचा मोड करण्याची पाळी इंग्रज अंमलदारांना आली. या धामधुमींत गोविंदरावांनाही नुकसान सोसावें लागले

इंग्रजी फौजा येऊन त्यांनीं बंडेखोरांचा तडफीनें धुव्वा उडविला नसता, तर कदाचित् गोविंदरावांनाही नुकसानीचा जास्त जबर तडाखा बसला असता. इंग्रजांनीं कोल्हापुरास पाठविलेला एक गृहस्थ, या दृष्टीनें गोविंदरावावर बंडखोरांचा राग स्वाभाविकच होता. कारभारी पंडित यांच्या मुसक्या बांधून जशी त्यांची कांहीं दिवस दैना उडविल्याचें सुख बंडवाल्यांना भोगायला सांपडलें, तसें सुख, गोविंदरावांच्या बाबतींत त्यांनीं भोगलें असतें; पण तसा प्रसंग ओढवला नाहीं. इंग्रजांनीं दहशत बसेल अशा रीतीनें बंडखोरांचा मोड केला आणि थोडक्याच अवकाशांत ही आपत्ति नामशेष होऊन शांततेची व्यवस्थित घडी बसली.

यानंतर कोल्हापुरास अनेक प्रकारच्या सुधारणा झाल्या. पोलिटिकल एजंटाच्या ऑफिसांत मुंबईचे नाना मोरोजी या नांवाचे एक प्रख्यात गृहस्थ मुख्य कारकून होते. यांनीं बरीच खटपट करून कोल्हापुरास इंग्रजी राज्यांतल्या सुधारणा अमलांत आणल्या. १८४८ मध्यें मराठी शाळा जन्मास आली. आणि १८५३त इंग्रजी शाळेची मुहूर्तमेढ रोवली गेली. राजाराम हायस्कूल या नांवानें लोकांस हीच शाळा सांप्रत परिचित झालेली आहे. नाना मोरोजी नुसत्या शाळा काढूनच स्वस्थ बसले नाहींत, त्यांनीं एक 'वर्तमानसंग्रह' नांवाचें वृत्तपत्रही याच सुमारास चालू केलें, व ज्ञान संग्रह नांवाचें एक मासिक, प्रोत्साहन देऊन काढविलें. वृत्तपत्राचें संपादन नाना मोरोजी स्वतःच करीत असत. इंग्रजी शाळेचे हेडमास्तर कृष्णाजी चाफाजी यांनीं मासिकाचीं जबाबदारी घेतली होती. १८५४ मध्यें कोल्हापुरास तार ऑफिस निघालें व इंग्रजी राज्यांतल्याप्रमाणें संस्थानभर पक्क्या सडका बांधण्याला आणि दळणवळणाचीं दुसरीं साधनें वाढविण्याला याच सुमारास सुरुवात

झाली. पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव पाहून त्यावेळीं कोल्हापुरसारख्या संस्थानी मुलखांतली प्रजा दिपली असल्यास नवल नाहीं.

माधवरावांचें मराठी शिक्षण वरील मराठी शाळेंत झाल्यावर १८५१ सालीं त्यांनीं इंग्रजी विद्येचा आस्वाद घेण्याला प्रारंभ केला. व १८५६ च्या अखेरीपर्यंत हा क्रम अव्याहत चालला होता. लहानपणीं माधवरावांच्या बुद्धीची कुशाग्रता त्यांच्या गुरुजनांच्या नजरेस पडली नव्हती, उलट मुलाच्या बुद्धिमत्तेविषयीं मातापितरांना नाउमेद होण्याला जेवढीं लक्षणें पुरतात, तेवढीं सर्व लक्षणें माधवरावांच्या ठिकाणीं दिसून येत होतीं. माधवराव स्वरूपानें देखणे नव्हते. अंगापिंडानें मात्र लहानपणापासूनच चांगले बळकट व धष्टपुष्ट होते. शरीराचा धिप्पाडपणा ही या रानडे घराण्याला पिढीजाद ईश्वरी देणगी मिळालेली होती. बरेच मोठे होईपर्यंत ते बोबडे बोलत असत. कवर्गाच्या ठिकाणीं ते हटकून टवर्गाचा उपयोग करीत.त्यामुळें त्यांच्या आईला मोठी काळजी वाटे. वाणीचा प्रस्तुत दोष घालविण्याकरितां तिनें व्रतोपवासादिकांच्या द्वारें देवतांना संकट घातलें आणि या माउलीच्या उपासतापासांना फळ आलें. एके दिवशीं संध्या करीत असतां विठूकाकांनीं माधवरावांना कवर्गाचा उच्चार करायला सांगितलें व चमत्कार असा कीं, माधवरावांनीं त्यावेळीं बिनचूक उच्चार करून आपल्या चिंताकुल मातेच्या मनावरला एक भार कायमचा काढून टाकला. माधवरावजींच्या स्वभावांत जो धिम्मेपणा होता, तो त्यांच्या अंगीं उपजतच होता. बोलकेपणा हें लहानपणीं मुलाच्या हुशारीचें लक्षण समजलें जातें. बोलकीं मुलें सर्वांना आवडतात. माधवराव लहानपणीं कमालीचे मुखदुर्बळ होते. परिक्षेंतल्या यशासारखी आनंदाची बातमी देखील घरांत सांगण्याचें काम त्यांना करवत नसे. ही बातमी इतर

मुलांच्या तोंडून घरांतल्या माणसांना कळली, म्हणजे त्यांनीं माधवाला विचारावें आणि मग या मुलानें होकारार्थी उत्तर द्यावें असे प्रसंग नेहमीं हटकून घडत. माधवाकडून अशा प्रसंगीं मिळणाऱ्या उत्तरांत मात्र असामान्यत्व दिसून येतें. सामान्य मुलांना जें उत्तर सहसा सुचावयाचें नाहीं, असें उत्तर माधवराव सहज देत. 'परीक्षा पास झाली यांत मुद्दाम सांगण्यासारखें काय आहे! आम्ही अभ्यास करतों, पास होतों.' हें माधवरावांचें ठरावीक उत्तर होतें.

माधवरावांना बाळपणीं जे संवगडी मिळाले, त्यांच्या स्वभाव गुणामुळें यांच्या अंगचे स्वभावदोष जास्त स्पष्टपणें नजरेस येत असतील असा तर्क करण्याला जागा आहे. १८४४ सालांतली बंडाळी संपल्यावर दाजी कृष्ण पंडित यांनीं कारभाऱ्याचा अधिकार सोडला, व जनार्दन हरी कीर्तने हे त्या अधिकारावर आरूढ झाले. कीर्तने हे आपल्याच पराक्रमावर उदयास आलेले एक कर्तबगार गृहस्थ होते. कोल्हापुरचा कारभार पाहूं लागल्यावर त्यांचें व गोविंदराव रानडे यांचें वास्तव्य एकाच वाड्यांत होतें. अर्थात् कीर्तन्यांचे मुलगे व माधवराव यांची मैत्री जमली. जनार्दन हरी यांचे थोरले चिरंजीव विनायकराव हे 'थोरले माधवराव' 'जयपाळ' इत्यादि नाटकांचे कर्ते व इंदूर बडोद्याचे दिवाण, नायब दिवाण या नात्यानें महाराष्ट्राच्या चांगल्या ओळखीचे आहेत. माधवरावांचा स्वभाव अतिशय थंड, तर विनायकरावांचा स्वभाव पराकाष्ठेचा तापट. माधवरावांच्या अंगीं चळवळ बिलकूल नव्हती, तर विनायकरावांना स्वास्थ्य कसें तें ठाऊक नव्हतें. माधवरावांना मौनाची आवड तर विनायकरावांना वादविवादाची चटक, अशी या दोघांत स्वभावाची उत्तर दक्षिण ध्रुवाइतकी भिन्नता होती.

परंतु विनायकरावांचा स्वभाव सर्वांच्या मनांत चटकन् भरणारा होता. अर्थात् विनायकरावांच्या सान्निध्यांत अहोरात्र वावरणाऱ्या माधवरावांच्या दोषांना खुलावट यावी, आणि त्यांच्या मातापितरांना—विशेषतः मातेला आपल्या मुलाच्या भवितव्याबद्दल काळजी वाटावी, हें स्वाभाविक आहे. बहिणीच्या व त्यांच्या स्वभावांत असाच फरक असल्यानें माधवरावांच्या दोषांना अतिशय उठाव मिळाला असेल असें म्हटल्यास चुकीचें होणार नाहीं. दुर्गाअक्कालादेखील फार बोलण्याची संवय होती. प्रत्येकावर आपली छाप ठेवण्याचा तिला हव्यास. त्यायोगानें ही बहिणभावंडाची जोडी एकत्र असल्यास दुर्गाअक्काकडे माणसाचें लक्ष जाण्याला वेळ लागत नसे. यामुळें 'माझ्या माधवाला दहा रुपयांची कमाई करतां येऊन तो आपल्या बायकोचें पोट भरण्यास समर्थ होईल कीं नाहीं' अशी शंका गोपिकाबाई नित्य बोलून दाखवीत.

माधवरावांच्या अंगीं वरच्या दोषाबरोबरच आणखीही कांहीं दोष लहानपणीं होते व पुढें तारुण्यांत आणि उतारवयांत त्याच दोषांना गुणांचें स्वरूप येऊन त्यांची त्याबद्दल प्रशंसा होऊं लागली. यांतला एक दोष म्हणजे एकमार्गीपणा हा होय. एकदां जी परिपाठी पडली ती सोडावयाची नाहीं, असा माधवरावांचा निग्रह दिसून येत असे व तत्संबंधीं बऱ्याच गोष्टी प्रसिद्ध आहेत. मराठी शाळेंत शिकत असतां शाळेंतून परत आल्यावर माधवरावांना त्यांची आई दशमी खाण्याला देत असे. दशमीबरोबर ठराविक तामलींतले पातळ तूप वाढण्याचा तिचा नियम होता. एकदां या नियमांत चूक झाल्याबरोबर माधवराव दशमी खाईनात. आईनें समजूत घालण्याकरितां जंगजंग पछाडले पण माधवरावांची समजूत पडेना. शेवटीं आईनें वैतागून तामलींत पाणी

घातलें व तेंच पातळ तूप म्हणून मुलाच्या दशमीवर ओतलें, त्यासरशीं माधवरावांनीं दशमी खाल्ली, आणि ते आपल्या पुढच्या उद्योगास लागले. आईनें माधवरावांची फसवणूक केली व माधवराव फसले म्हणून त्यांच्या धाकट्या बहिणीनें चेष्टा आरंभली, पण माधवरावांच्या वृत्तींत लवमात्र भंग झाला नाहीं. बहिणीची चेष्टा मनावर न घेतां नेहेमींच्या गंभीरपणानें ते आपल्या इतर व्यवसायांत निमग्न झाले. कोजागिरीच्या रात्रीला जागरण करावयाचें अशी दुसरी एक वहिवाट रानडे व कीर्तने हीं दोन्हीं कुटुंबें पाळीत असत. एका कोजागिरीला कीर्तन्यांची मंडळी जेजुरीकडे गेली होती. त्यायोगानें घरांत रात्रीं जागून माधवरावां-बरोबर खेळण्याला त्याच्या बहिणीशिवाय कोणी सोबती राहिला नाहीं. बहीण लहानच, तिच्या ध्यानांत कोजागिरीचें माहात्म्य राहिलें नाहीं व रोजच्या सवयींप्रमाणें ती लवकर झोपीं गेली. त्या रात्रीला सोंगट्यांचा डाव खेळण्याकरितां माधवरावांना कोणीच सोबती मिळाला नाहीं, तेव्हां एका खांबासमोर बसून त्यांनीं डाव सुरू केला. खांबालाच त्यांनीं प्रतिपक्षी मानून उजव्या हातानें त्याचें व डाव्या हातानें आपलें दान टाकीत डाव संपविला. कर्मधर्मसंयोग असा कीं, खांबाचें दान सरस पडून डाव बिनतोड माधवरावाच्या अंगावर आला. हा प्रकार पहात त्यांची चुलती शेजारीं उभी होती. तिनें निर्जीव खांबाला विजय मिळाला हें पहातांच माधवरावांला चिडविलें; पण चीड ह्या भावनेला त्यांच्या स्वभावरचनेंत थाराच नव्हता असें म्हटल्यास चालेल. माधवराव शांतपणें चुलतीस म्हणाले कीं, खांबाच्या हाताला दान पडलें, डाव त्यानें जिंकला, त्यांत बिघडलें काय? सदर गोष्टीनें प्रत्ययास आलेली माधवरावांची न्याय-वृत्ति त्यांच्या वर्तनांत अन्य रीतीनें प्रकट होत असे. एकदां गोपिका-

बाईनीं आपल्या मुलांसाठीं मोठा, व मोलकरणीच्या मुलासाठीं लहान, असे दोन बर्फाचे तुकडे माधवरावाच्या दोन हातावर ठेवले, पण कोणत्या हातांतला तुकडा त्यांचा व कोणत्या हातांतला मोलकरणीच्या मुलाचा हें सांगण्यांत आईची चूक झाली. माधवरावांनीं मोठा तुकडा मोलकरणीच्या मुलाला देऊन टाकला. मग झालेली चूक आईच्या ध्यानांत आली.

वरील दोषाविष्करणावरून माधवराव म्हणजे मूर्तिमंत दोषांचा पुतळा असा निष्कर्ष काढण्याचें साहस वाचकांच्या हातून घडणार नाहीं, कारण या दोषाच्या पोटीं कित्येक अलौकिक गुणांचें बीज पहावयास सांपडतें. कांहीं गुणांनांच कालपरत्वें दोष मानतात. दोषांची मीमांसा करून त्यांतील प्रच्छन्न गुणांचा उहापोह करण्याचें सोडलें व शुद्ध स्वरूपाचे गुण माधवरावांच्या बालपणींच्या चरित्रांत पाहूं लागलें, तर निराशा होत नाहीं. निस्सीम सत्यवादित्व हा एक गुण ठळकपणानें दृष्टीस पडतो. लहानपणीं खोटें बोलणें माधवरावांना स्वप्नांत देखील माहीत नव्हतें. डामडौलाचा तिरस्कार हा एक माधवरावांच्या अंगचा दुसरा मोठा गुण सांगतां येतो. सणाच्या दिवशीं माधवरावांच्या अंगावर दागिने चढविले कीं, ते लोकांच्या दृष्टिआड कसे करतां येतील याची माधवरावांना विवंचना लागे. मग त्यांनीं सलकडया बाहींत लपवाव्या, गळ्यांतला गोफ लोकांना न दिसण्यासाठीं त्या सभोवती उपरणें गुंडाळावें, अशी एक अत्यंत बोधप्रद व मनोरंजक आख्यायिका प्रसिद्ध आहे. कोणी याबद्दल जबाब विचारलाच तर परिक्षेचा निकाल न सांगण्याचें जसें असामान्य कोटींतलें मासलेवाइक उत्तर त्यांच्या तोंडून कानावर पडें तसेंच स्पष्टीकरण दागिन्यांच्या गोप्यगोपनाबद्दल त्यांच्या आईला किंवा इतर आप्तेष्टांना ऐकावें लागे.

'आपल्या घरीं येणाऱ्या मधुकऱ्यावारकऱ्यांच्या अंगावर दागिने कुठें असतात' असा प्रतिप्रश्न ते दागिने झांकल्याबद्दल खुलासा विचारणाऱ्या नातलगांपुढें टाकीत. या उत्तरांत माधवरावांच्या अंतर्मुख आणि विवेकशील बुद्धिमत्तेची चमक भरलेली नाहीं, असें कोण म्हणेल? शाळेंतल्या गुरुवर्गाला त्यांच्या आणखी एका गुणाची ओळख झाली होती. विनायकराव कीर्तन्यांची बुद्धि शीघ्रग्राही होती. त्यांना पाठांतर करण्याला मुळींच वेळ लागत नसे. माधवरावांची स्थिति थोडी निराळी होती. एकदां या दोघा विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीविषयीं बोलणें चाललें असतां, त्यांच्या गुरुजींनीं असा निकाल दिला कीं, विनायकाच्या ध्यानांत चटकन् रहातें, पण तितक्याच लवकर तो विसरतो. त्याच्यांत धारणाशक्ति नाहीं. माधवाच्या ध्यानांत एकादी गोष्ट शिरायला उशीर लागतो, पण एकदां ती गोष्ट ध्यानांत आल्यावर ती त्याच्या डोक्यांत वज्रलेपासमान कायम रहाते. असा दोघांच्या स्मरणशक्तींतला फरक आहे.

माधवरावांच्या शाळेंतल्या सहाध्यायांची माहिती देण्यापूर्वीं त्यांनीं इंग्रजी शिक्षणाला प्रारंभ केला त्यावेळची एक आख्यायिका देणें अवश्य आहे. इंग्रजी विद्येच्या संस्कारानें मुलें बिघडतात असा त्यावेळीं एक समज प्रचलित होता. यासाठीं इंग्रजी शाळा काढतांना नाना मोरोजी यांनीं 'आह्मी आपल्या मुलांना शाळेंत घालूं' अशी सर्व लहान मोठ्या संस्थानी अधिकाऱ्यांकडून कबूली घेतली होती. सर्वांबरोबर गोविंदरावांनीं कबूली दिली व त्याप्रमाणें मुलाचें नांव शाळेंत दाखल केलें. मुलगा इंग्रजी शिकतो असे गोपिकाबाईंना कळल्यावर त्यांनीं त्याला शाळेंत जाण्याला मनाई केली. आईच्या सांगण्यावरून मुलगा घरीं राहिला. दोन तीन दिवस वाट पाहून मास्तरानें गोविंदरावांच्या कानावर मुलाच्या

गैरहजिरीची गोष्ट घातली. त्यांनीं घरांत चौकशी केली तेव्हां मुलगा शाळेंत कां जात नाहीं याचें इत्थंभूत कारण त्यांस समजलें. त्यांनीं मुलाला शाळेंत जाण्याला गोपिकाबाईच्या इच्छेविरुद्ध आज्ञा केली. मुलगा शाळेंत जाऊं लागला. गोपिकाबाईंना आपला मुलगा कुमार्गांत पडला अशा कल्पनेनें पराकाष्ठेचा खेद व उद्वेग वाटला आणि त्या भरांत त्यांनीं अन्नपाणी वर्ज्य केलें. तीन दिवसपर्यंत अखंड चाललेलें आपल्या पत्नीचें संतापजन्य उपोषण पाहूनही गोविंदरावांचा निश्चय ढळला नाहीं, परंतु त्यांनीं गोपिकाबाईच्या मनाचें समजुतीच्या गोष्टी सांगून समाधान केलें आणि पुढें माधवरावांच्या शिक्षणक्रमांत कोणत्याही प्रकारचें विघ्न आलें नाहीं. कोल्हापुरास संपूर्ण इंग्रजी शिक्षणाची सोय नसल्यामुळें जेव्हां कीर्तन्यांच्या मुलांबरोबर माधवरावांना दुसऱ्या ठिकाणीं पाठविण्याचा गोविंदराव विचार करूं लागले तेव्हां मात्र गोपिकाबाईंनीं 'माझा मुलगा माझ्यापासून दूर कोठेंही पाठवावयाचा नाहीं' असा हट्ट धरला. या हट्टाचें कारण तसेंच सबळ असल्यानें गोविंदरावांची मात्रा त्यापुढें चालली नाहीं. गोपिकाबाईंना मुलें झालीं पुष्कळ पण त्यांतून जगलीं दोनच. तीं कोणतीं हें वाचकांना निराळें सांगायला नको. आमच्या धार्मिक समजुतीमध्यें पुत्राची महती विशेष गणली आहे. गोपिकाबाईंना त्यामुळें साहजीकच आपल्या अनेक अपत्यांतून वांचलेला एकुलताएक मुलगा विद्याभ्यासानिमित्त अल्प वयांत दूर पाठविण्याची योजना असह्य वाटली व मुलाला आपल्या दृष्टीआड न होऊं देण्याचा आग्रह शेवटास नेला, परंतु हा आग्रह फार दिवस टिकावयाचा नव्हता. ईश्वरी योजना निराळी होती. माधवरावांच्या वयाला अकरा वर्षें पुरीं झालीं असतील नसतील तोंच गोपिकाबाईंनीं स्वतःच कायमचे डोळे मिटले आणि माधव-

रावांला, दुर्गाताईला इहलोकीं दृष्टीआड लोटून त्या लोकांतरास गेल्या. गोविंदरावांनीं पत्नीच्या वियोगाची हानि गोपिकाबाईच्या मरणानंतर अवघ्या सोळा दिवसांनींच दुसऱ्या लग्नानें भरून काढली. हिंदूसमाजांतील कित्येक अनिष्ट चालींपैकीं एका चालीचा माधवरावांना याप्रमाणें घरांतच अनुभव आला. पुढें थोडयाच दिवसांनीं माधवरावांचा विवाह झाला. वाईच्या दांडेकर घराण्यांतल्या मुलीशीं माधवरावांचें बाराव्या वर्षीच लग्न झालें. त्यांची बहीण दुर्गाताई हिचाही याच सुमारास विवाह झाला याप्रमाणें बालविवाहाच्या दुसऱ्या अनिष्ट रीतीचा स्वतःच्या व बहिणीच्या बाबतींत माधवरावांना परिचय घडला.

१८५६ सालांत कोल्हापुरांतलें शिक्षण पुरें झाल्यावर माधवरावांच्या मनांत मुंबईला जाण्याचा विचार येऊं लागला. सख्खी आई जिवंत होती तोंवर तिच्या ममतेचा पाश त्यांच्याभोंवता होता. तिच्यामागें बहीणीचा लळा असायचा, पण ती सासरमाहेरच्या येरझारा करूं झाल्यामुळें तिच्याही अखंड सहवाससुखाला ते मुकले. आईच्या पश्चात् त्यांचें संगोपन चुलतीनें चालविलें होतें. तथापि घरांत सावत्रपणा घुसल्यावर पूर्वींच्या एकजिनसी गृहसौख्याला ओहटी न लागली तरच आश्चर्य! घरच्या परिस्थितींत उत्पन्न झालेल्या सापत्नभावाच्या उपसर्गामुळें दुसरीकडे विद्यार्जनार्थ जाण्याच्या माधवरावांच्या विचाराला जोराची गति मिळाली असण्याचा संभव आहे. पण हा विचार अमलांत यावा कसा? आपला विचार वडिलांच्या कानावर स्वतः जाऊन सांगण्याची माधवरावांना संवय नव्हती. दिवसाच्या चोवीस तासांपैकीं फक्त जेवणाच्यावेळींच काय ती त्यांची व गोविंदरावांची गांठ पडत असे. पण

त्या वेळीं एकमेकापाशीं मोकळ्या मनानें बोलण्याचा या बापलेकांत प्रघात नव्हता. मग वडिलांच्या कानावर माधवरावांचा विचार कसा पडणार ? समक्ष बोलण्याची अडचण दूर करण्याला माधवरावांनीं निराळीच युक्ति काढली. जनार्दन हरी कीर्तन्यांशीं बोलण्याला माधवरावांना तितकीशी भीड वाटत नसे. त्यांच्याशीं ते बोलत, ही गोष्ट त्यांनीं आपल्या पथ्यावर पाडली. मुंबईस जाण्याचा विचार पक्का झाल्यावर माधवराव कीर्तन्यांच्या दारांशीं धरणें घेऊन रोज बसूं लागले. कीर्तन्यांचें काम ओटोपलें कीं, आम्हाला मुंबईस केव्हां धाडतां असा माधवराव प्रश्न विचारीत. अखेरीस कीर्तने व गोविंदराव रानडे यांनीं मुलांना मुंबईस शिक्षणाकरितां पाठविण्याचें ठरविलें. परंतु मुंबईस कोणत्या शाळेंत धाडावयाचें हा प्रश्न त्यांना सोडावावयाचा होता. जनार्दनपंत कीर्तन्यांनीं पोलिटिकल एजंट क. रीव्हज यांना पत्र लिहून आपला मनोदय कळविला. रीव्हज साहेबांनीं सदर मनोदयाबद्दल आनंद व्यक्त करून उलट पत्र लिहिलें कीं, ब्राह्मणांचा धर्म लुच्चेगिरीचा व खोटेपणा शिकविणारा असल्यामुळें, उत्कृष्ट धर्मतत्वें मुलांच्या हृदयपटलावर पक्की ठसण्याकरितां तुम्ही त्यांना डा. विल्सन यांच्या शाळेंत पाठवा. एल्फिन्स्टन स्कुलांत पाठवूं नका; कारण तेथें मुलांना धर्मशिक्षण, नीतिशिक्षण दिलें जात नाहीं. या उपदेशाचा उपयोग झाला नाहीं, कारण कीर्तने व रानडे यांनीं मुलांना एल्फिन्स्टन स्कुलांतच भरती केलें. कर्नल रीव्हूज यांच्या पत्रांवर ता. १८ नोव्हेंबर १८५६ ही तारीख आहे. यानंतर प्रयानाची तीथ ठरे पर्यंत डिसेंबर महिना सहज आला असेल. मुंबईस पोचतां पोचतां नाताळ उजाडण्याचा संभव होता. म्हणजे १८५७ च्या जानेवारीपासून माधवरावांच्या शिक्षणाला

व्यवस्थित प्रारंभ झाला असें मानणें उचित आहे. माधवरावांचे तीर्थरूप हे एक दिलदार गृहस्थ होते. अडचणींत सांपडलेल्या नातेवाईकांना व इष्टमित्रांना आपल्या ऐपतीबाहेर सढळ हातानें—इतक्या सढळ हातानें कीं डोक्यावर कर्जाचा बोजा पडला तरी हरकत नाहीं—साह्य करण्यास ते मागें पुढें पहात नसत. असा उदार पिता मातृविहीन एकुलत्या एक मुलाला मुंबईसारख्या दूरच्या शहरीं ठेवतांना खर्चाकडे पाहील हें शक्यच नाहीं. मुलाची घरच्याप्रमाणें व्यवस्था रहावी म्हणून गोविंदरावांनीं माधवरावाबरोबर एक गडी व ब्राह्मण दिला होता. एकंदर खर्चांत जनार्दन हरी हे दुसरे वाटेकरी होतेच. त्यांनीं आपले मुलगे मुंबईस पाठविले. या व्यवस्थेमुळें माधवरावांचा एक फायदा झाला. माधवरावांना गृहप्रपंचाकडे लक्ष न देतां निर्वेध अभ्यास करण्याची यथेच्छ सवड मिळाली. त्यांच्याबरोबर शिकणाऱ्या पुष्कळ समवयस्क सहाध्यायी मित्रांना घरच्या हलाखीमुळें दुसरे व्यवसाय करून अभ्यास संभाळावा लागत होता. निर्वाहाची व अभ्यासाची दुहेरी काळजी वाहून ज्ञानार्जनाच्या मजला झपाट्यानें व यशस्वितेनें मारणारे विद्यार्थी नसतात असें नाहीं, पण निर्वाहाची चिंता प्रगतीच्या वेगाला खंड पाडते. सुदैवानें माधवरावांनजीक हें विघ्न कधींही आलें नाहीं. मुंबईस ज्ञानार्जन व ज्ञानदान हाच काय तो एक व्यवसाय त्यांना करावा लागला.

उच्च शिक्षणाला प्रारंभ झाल्यापासून शिक्षणक्रम संपेपर्यंत ते केवळ पुस्तकांतला किडा बनले होते. नवे नवे ग्रंथ वाचायचे, जुन्यांचीं पारायणें करावयाचीं, सारांश वाचनाच्या जोरावर ज्ञानाचे जेवढे प्रदेश काबीज करतां येतील तेवढे करावयाचे, तसें करतांना विश्रांति, चुकारपणा किंवा अर्धवटपणा या विघ्नांचा जोर चालू द्यावयाचा नाहीं

असा त्यांच्या मुंबईतल्या रहाणीचा मथितार्थ सांगतां येतो. मुंबईस आल्यावर त्यांनीं नव्या संवयी लावून घेतल्या नाहींत. ते धुळाक्षरें शिकले त्या दिवशींच त्यांना विद्येची गोडी लागली. धुळाक्षरांनीं त्यांस विद्यादेवीच्या राज्यांतली रमणीयता अतिशय दुरून व अस्पष्ट रीतीनें दाखवून दिली होती. वर्णमाला, बाराखडया, पाढे वगैरे साधनें हस्तगत व मुखोद्गत करीत असतांना त्यांना असें समजून चुकलें कीं, या साधनांचा दृढाभ्यासच आपल्याला विद्यादेवीच्या गूढ हद्दतापर्यंत नेऊन पोंचवील. म्हणून त्यांनीं लहानपणीं सदासर्वदा धुळाक्षरांचा पिच्छा पुरविल्याची एक आख्यायिका पूर्वींच्या चरित्रग्रंथांतून पहावयास सांपडते. घरांत असतांना भिंतीवर व सोवत्यांशीं खेळतांना रस्त्यांतल्या धुळींत फुरसत सांपडली कीं ते अक्षरें आकडे काढूं लागत. ही लहानपणीं उपहासास्पद ठरलेली वृत्ति मुंबईस आल्यावर वयाच्या वाढीबरोबर लोकादराच्या वृद्धीस कारणीभूत झाली.

# प्रकरण दुसरें.

## अध्ययन.

मुंबईस आल्यावर माधवरावांनीं आपल्या इतर सोबत्यासह आपलें नांव एल्फिन्स्टन हायस्कूलमध्यें दाखल करून शिकण्यास सुरवात केली. मुंबई इलाख्यांत शिक्षणाला प्रारंभ झाल्यानंतर सरकारनें या शाळेचा गौरव लोकांमध्यें वाढेल अशी काळजी घेऊन त्याची व्यवस्था चालविली होती. माधवरावांनीं या शाळेंत शिकण्याला सुरुवात केली तेव्हां एक पार्शी गृहस्थ मुख्य अध्यापक* होते. कोल्हापुरच्या शाळेंत माधवरावांचे बुद्धिगुण व्यक्तावस्तेंत आले नव्हते. परंतु मुंबईस आल्यावर थोडयाच दिवसांत त्यांच्या बुद्धीची कळी उमलून तिच्या परिमलानें वरील पारशी मुख्याध्यापकाचें या विद्यार्थ्याकडे लक्ष वेधलें. माधवरावांनीं मुंबईस येतांना आपले स्वभावधर्म कोल्हापुरास सोडले असा वरील विधानाचा अर्थ नाहीं. त्यांचे मूळचे स्वभावधर्म तसेच कायम होते. सहाध्यायी विद्यार्थ्यांच्या ओळखी करणें, त्यांच्यांत जा ये सुरू ठेवणें वगैरे गोष्टी त्यांच्या हातून मुंबईस देखील घडल्या नाहींत. पण बुद्धीच्या कुशाग्रतेनें अभ्यासक्रमांतल्या विषयाचें रहस्य व मर्म ग्रहण करणें, त्या मर्मांचा आपल्या निबंधादिकांतून प्रतिभेच्या जोरावर अगदीं नवीन भासण्या-

---

* यांचें नांव रा. ब. कैखुस्रू होर्मसजी अल्पावाला असें होतें.

सारखा उपयोग दाखविणें वगैरे गुणांच्या योगानें 'हा मुलगा असामान्य कोटींतला असून भविष्यकाळीं मोठा किर्तिमान् पुरुष होणार' असें भाकित या मुख्य गुरूच्या हृदयांत स्फुरूं लागलें व पुष्कळदां त्यानें तें बोलूनही दाखविलें. यावेळीं त्यांच्या सहाध्यायी मंडळीला माधवराव कसे दिसत होते याचें शब्दचित्र त्यांच्या मृत्यूनंतर सर डॉ. भांडारकर यांनीं प्रार्थनासमाजाच्या उपासनाप्रसंगीं रेखाटलें आहे तें असें:—

माधवरावजी १८५६·चे सुमारास कोल्हापुराहून मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेजांत आले. तेव्हांच माझी व त्यांची प्रथम ओळख झाली. फणसवाडींतल्या चाळींत आमच्याबरोबरच ते रहावयास आले. सोबत्याबरोबर गप्पागोष्टी करण्यांत ते आपला वेळ कधींच घालवीत नसत. त्यांची कोणाशीं विशेष ओळख नव्हती व त्यांनीं करूनही घेतली नाहीं. दिवसारात्रीं ते सारखे वाचनांत निमग्न दिसत. त्यावेळीं आतांप्रमाणें नेमक्या परीक्षा नव्हत्या—त्या नेमक्या परिक्षांनीं आतां अगदीं घाण केली आहे! परीक्षेच्या अभ्यासाबाहेरचे गिबनच्या इतिहासासारखे मोठमोठे ग्रंथ वाचण्यांत रात्रीं दोन दोन वाजेपर्यंत गुंग झालेले माधवरावजी आपले खोलींत दिसत.

एका वर्षांत माधवरावांनीं हायस्कूलचा अभ्यास संपविला आणि १८५८ सालीं ते एल्फिन्स्टन कालेजांत प्रविष्ट झाले. कालेज म्हणजे उच्च विचारांचें दान व ग्रहण करण्याचें स्थान, अर्थात त्याची एकंदर रचना व भोवतालची परिस्थिति उदात्त, गंभीर विचारांना पोषक अशीच असणें योग्य आहे. विद्यादेवीच्या विद्यालयरूप मंदिरांतला प्रवेश आणि निवास अत्यंत परिणामकारक असतो. त्यामुळें मनावर होणारे शुभ परिणाम आणि संस्कार साऱ्या आयुष्यांत जसेच्या तसे शाबूत रहातात, किंबहुना विद्यार्थीदशेपुढच्या प्रापंचिक जीवनक्रमांत माणसांवर ओढवणाऱ्या बऱ्या वाईट प्रसंगांतून पार पाडण्यास ते बऱ्याच अंशीं कारण होतात वगैरे वर्णनें विख्यात युरोपियनांपैकीं अनेकांच्या

चरित्रांत हिंदी सुशिक्षितांना वाचावयास सांपडतात. या वर्णनांत आढळणाऱ्या परिस्थितीसारखीच परिस्थिति माधवरावांच्या विद्यार्थीदशेंत एल्फिन्स्टन महाविद्यालयाची असेल अशी कोणी कल्पना केल्यास ती सर्वथैव चुकीची ठरल्याशिवाय रहाणार नाहीं. १८५७ सालीं मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली होती, परंतु ती केवळ नाममात्र होती. तिचें प्रत्यक्ष स्वरूप लोकांच्या दृष्टीस पडण्याला अवधी होता. एल्फिन्स्टन महाविद्यालय जुनें खरें, पण त्याची इमारत या दिवसांत चांगली नव्हती. त्या इमारतींत भरपूर उजेड देखील नव्हता. माधवराव या कालेजांत प्रविष्ट झाल्यानंतर कांहीं वर्षांनीं सर अलेक्झांडर ग्रँट यांच्या खटपटीनें त्याला दुसरी चांगली इमारत लाभली. विद्यापीठाची घडी यावेळीं नीट बसली नसल्यानें शाळेच्या परिक्षेवरच विद्यार्थ्यांना कालेजांत दाखल होतां येत असे व याच नियमास अनुसरून माधवराव एल्फिन्स्टन काले-जांतील उच्च शिक्षणाचा लाभ घेण्यास समर्थ झाले.

इमारतीच्या बाजूनें एल्फिन्स्टन कॉलेजाची हीन स्थिति असली तरी शिक्षणाची बाजू हीन नव्हती. उलट असें ठासून म्हणतां येईल कीं, ती बाजू हल्लींपेक्षां फारच चांगली होती. विद्यार्थ्यांची संख्या थोडी, पण त्यांत बरेच विद्यार्थी बुद्धिमान व होतकरू होते. अध्यापक वर्गालाही प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीवर नजर ठेवून त्यांच्यांतील गुणांना प्रगल्भ-दशा यावी ही अतिशय जबर हौस, अशा दुर्लभ योगामुळें तत्कालीन विद्यार्थी मंडळीला विद्यादेवीच्या प्रदेशाचे प्रत्यहीं अधिकाधिक आक्रमण करण्याला मुळींच अडचण वाटत नसे. माधवरावांच्या बुद्धीचा विकास आणि व्याप वाढण्याला ही एक अमूल्य संधि मिळाली आणि त्यांनीं या संधीचा यथेच्छ फायदा घेतला. माधवरावांनीं याच दिवसांत इंग्रजी

भाषा पूर्णपणें आपलीशी करून टाकली. संस्कृत भाषेचा व त्यांचा परिचय होण्याला अजून अवकाश होता. पुढें त्यांनीं स्वयंस्फूर्तीनें आणि स्वावलंबनपूर्वक हा परिचय करून घेतला. रसायनशास्त्राचा अंतर्भाव त्यांच्या नेमलेल्या विषयांत होता. सदर विषयाच्या अभ्यासांत आस्था दाखविणारे फारसे विद्यार्थी आढळत नाहींत, अशी त्या विषयाच्या अध्यापकाची तक्रार सालोसाल वरिष्ठाकडे लेखी अहवालाच्या द्वारें जात असे, पण जे विद्यार्थी आस्था दाखवून नियमित हजर रहात म्हणून सदर अध्यापकानें आपल्या अहवालांत कांहींसा कौतुकाचा उल्लेख केलेला पहावयास सांपडतो, त्यांत माधवरावांचें नांव आहे. इंग्रजी भाषेचें यथार्थ आणि शास्त्रशुद्ध ज्ञान होण्याकरितां लॅटीन भाषेचा एक वर्ग उघडण्यांत आला होता. त्याचा लाभ घेण्याविषयीं विद्यार्थीजनांवर सक्ती नव्हती; ज्याच्या इच्छेला येईल त्यानें या वर्गांत नांव दाखल करावें अशी सवलत होती. या वर्गाला साहजिकच भरपूर विद्यार्थी मिळाले नाहींत, जे सुरवातीस हजर होते त्यांची संख्या खालावत जाऊन अखेरीस चौघांचीं नांवें पटावर उरलीं, पण ज्यांनीं कधींही या वर्गाची टाळाटाळ केली नाहीं, त्या विद्यार्थ्यांत माधवरावांचें नांव आहे. या लॅटीन भाषेच्या वर्गासंबंधीं जो अहवाल १८५९ सालीं प्रिन्सिपालकडे गेला त्यांत माधवरावांच्या नियमितपणाबद्दल निर्देश आहे. हा वर्ग एक वर्षभर सतत चालला होता आणि माधवरावांनीं त्या अवधींत लॅटीन भाषेंतील सीझरच्या व होरेसच्या पुस्तकांचा मुळांतून आपाततः रसास्वाद घेतला. अशास्थितींत १८५९ सालच्या विद्यापीठाची पहिली मॅट्रिक्युलेशनची परिक्षा झाली व माधवराव या परिक्षेला बसले. माधवरावांच्या भाग्यफलकांत अपयश हा शब्द विधात्यानें लिहिलेला नव्हता, मग त्यांना या वेळींच अपयश

कसें येणार? ते इतर सहा विद्यार्थ्यांसह उत्तमप्रकारें पास झाले. या परिक्षेंत त्यांच्या हातून एक ल्हानशी गोष्ट घडली आणि ती येथें नमूद करण्यासारखी आहे. 'मनूच्या काळापासून आजपर्यंत हिंदू समाजांत घडलेलीं स्थित्यन्तरें' या विषयावर मराठी निबंध लिहिणें हें एक या परिक्षेंतलेंच कलम होतें. माधवरावांनीं निबंध लिहिला, परंतु त्यांत इंग्रजी राज्याबद्दल कांहीं कडक मजकूर घातला होता. या मजकुरामुळें त्यांची परिक्षकांनीं सडकून हजेरी घेतली आणि पुढें आठवण रहावी व असला मूर्खपणा पुनः त्यांचे हातून घडूं नये म्हणून त्यांना जे जादा गुण रास्त रीतीनें मिळावयास पाहिजे होते, ते गुण त्यांस मिळाले नाहींत. त्यांच्या मार्कांच्या अपहाराचें शासन त्यांस पुरेसें आहे, असें त्यावेळीं त्यांच्या गुरूंना वाटलें. पण गुरूंचा हा कयास चुकला असें दर्शविणारी एक आख्यायिका सुप्रसिद्धच आहे. सर आलेक्झांडर ग्रँट प्रिन्सिपाल झाल्यानंतर माधवरावांच्या हातून पुनश्च एकदां इंग्रजी राज्यपद्धतीवर कोरडे ओढण्याचा प्रमाद घडला. शिवाजीची राज्यपद्धति व इंग्रजी राज्यपद्धति यांची तुलना करण्याच्या भरांत स्वराज्याभिमानाला बळी पडून माधवरावांनीं इंग्रजी राज्यपद्धतीला नांवें ठेविलीं. हा अपराध त्यांच्या हातून घडतांच ग्रँट साहेबांनीं त्यांची कानउघाडणी केलीच. शिवाय सहा महिनेपर्यंत छात्रवृत्ति जत करून त्यांस सदैव ध्यानांत रहाण्याजोगें आर्थिक प्रायश्चित्त भोगावयास भाग पडिलें. माधवरावांनीं त्या प्रकरणापासून आत्मसंयमनाचा चिरस्थायी बोध हृत्पट्टिकेवर कोरून टाकला.

मराठ्यांच्या इतिहासाविषयीं माधवरावांना किती उत्कट आदर होता हें या प्रकरणानें जगाच्या निदर्शनास आणलें असलें तरी

पाश्चात्य गुरुजींच्या हाताखालीं शिकत असतां मराठ्यांविषयीं चमत्कारिक कल्पना त्यांच्या अंतःकरणांत बिंबल्या होत्या, यांत संशय नाहीं. मॅट्रिकच्या परिक्षेसाठीं त्यांना मराठीप्रमाणेंच एक इंग्रजी निबंध लिहावयाचा होता. या निबंधाकरितां अनेक विषय दिलेले होते.* त्यांपैकींच एक मराठेशाहीचा उदय आणि उत्कर्ष ( Rise and Progress of Maratha Power ) हा एक विषय होता. या निबंधाच्या प्रारंभीं पडत्या काळांत स्वेतिहासावर लिहिण्याचा प्रसंग उपस्थित झाल्यामुळें अंतरंगांत कोणत्या भावनांची खळबळ माजते, याचें मनोरम वर्णन दिलें आहे. त्यामध्यें माधवरावांनीं शिवाजीवरील लुटारूपणाच्या आरोपाचें निरसन केलें आहे. पण पेशव्यांवर त्यांनीं हाच आरोप लादला असून सबंध मराठेशाहीचा समारोप करतांना हा लुटारूपणाचा कलंक खरा मानला आहे. त्या निबंधाचे आवश्यक तेवढे उतारे पुढें सादर केले आहेत, त्यांवरून वरील विधानाची सत्यासत्यता वाचकांना पारखतां येईल:—

To write the history of one's own country is always a pleasing task. The Felicity and the pleasure ( though a little alloyed with pain, when our former power and glory have departed from our nation, when the land knows not its sons for its masters ) are yet still great when one sits to write the rise and progress of his own nation. Misanthropy may like to brood over the

---

* ते विषय असे:—( अ ) अकबरबादशहाचा इतिहास, ( क ) पेंढाऱ्यांच्या व ब्रह्मदेशांतील लढाया, ( ड ) पावसाळी वारें व त्यांचीं स्थित्यंतरें, ( ई ) दंभ ( फ ) अभिमान आणि पोकळ डौल यांतील फरक.

mishaps, which hastened the ruin, the pussillanimity and dissentions, which precipitated the downfall of one's own country. Amidst the sickness so deadly, and distruction so complete as now prevails though the land a warm and a patriotic bosom may prefer to breathe for a time a purer air of more distant ages, when wealth, honour, liberty were the possession of his nation. With a mind filled with such thoughts, a heart throbbing with such pleasure ( though it must be owned, not unmixed with pain ), it is that I sit to write the essay.

* * *

Thus originated the rise of the maratha nation–a band of robbers–( if robbery be the proper name for what Shivaji did ) led by a successful chief, laid the foundation of an immense empire. Shivaji was forced to rob for no other plan promised the slightest success under the eagle-like sight and tyranny of Aurangzeb.

* * *

Thus was this empire, founded by robbers and strengthened by robbery too.

या निबंधासंबंधीं एवढें विवरण करण्याचें कारण चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत आल्याशिवाय रहाणार नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाबद्दलचें त्यांचें प्रेम या निबंधांत तर व्यक्त होतेंच पण मराठेशाहीवर मुसलमान इतिहासकारांना 'वाट पुसत' राजकीय हेतु मनांत धरून हिंदी प्रजेच्या तेजोभंगार्थ इंग्रज ग्रंथकारांनीं जे कुत्सित व खोडसाळ आरोप केले, त्या आरोपांचा खरेपणा माधवरावांना नकळत पटला होता, असें या निबंधावरून स्पष्ट होतें. या निबंधाची प्रशंसा डायरेक्टर ऑफ पब्लिक

इन्स्ट्रक्शनच्या तत्कालीन रिपोर्टांत आहे. मॅट्रिकच्या विद्यार्थ्यानें लिहिलेला हा निबंध, या दृष्टीनें पाहूं लागल्यास यांत प्रशंसनीय भाग पुष्कळच आहे; पण इंग्रजी राज्यकारभाराची निंदा केल्याबद्दल जे अध्यापक रागावले त्याच अध्यापकांनीं वरील निबंधाची प्रशंसा गाइली, यामध्यें खचित अर्थ आहे. माधवरावांसारख्या तीव्र जिज्ञासेच्या, समतोल बुद्धीच्या प्रचंड वाचनाच्या आणि स्वतंत्र विचाराच्या विद्यार्थ्याला मराठ्यांची कर्तबगारी सदोष वाटली हें पाहून या निबंधाला रिपोर्टांत स्थान दिलें गेलें असावें, असा तर्क केल्यास तो अगदींच अप्रस्तुत ठरणार नाहीं. पण मराठ्यांविषयींची वरील निबंधांत दृग्गोचर होणारी भावना माधवरावांचे ठिकाणीं उत्तर आयुष्यांत मुळींच उरली नाहीं. उलट आदराची भावना बलवत्तर होत जाऊन मराठ्यांच्या राजकीय कर्तबगारीचें या निबंधाच्या नांवाशीं बरेंच सादृश्य असलेला समाधानकारक व प्रमाणशुद्ध मंडन करणारा चिरंजीव ग्रंथ माधवरावांच्या हातून आयुष्याच्या अखेरीस रचला जाऊन एक प्रकारें अप्रौढ वयांतील गैरसमजुतींच्या चुकीचें पूर्ण व अपेक्षातीत परिमार्जन झालें.

१८५९ मध्यें मॅट्रिकची परीक्षा झाली तेव्हां माधवरावांना ज्यूनियर स्कॉलरशिप मिळत होती. १८६१ सालीं सीनियर स्कॉलरशिपची परीक्षा झाली. माधवराव या परिक्षेंत उत्तीर्ण होऊन त्यांना सीनियर स्कॉलरशिप मिळूं लागली. या परिक्षेंत ह्यांच्या विशाल व्यासंगाची चमक अध्यापकांच्या दृष्टीस पडली व एका प्रश्नपत्रिकेचे माधवरावांनीं दिलेले जबाब शाळाखात्याच्या वरिष्ठाधिकाऱ्यांनीं आपल्या रिपोर्टांत मुद्दाम जसेच्यातसे नमूद केले आहेत. या प्रश्नपत्रिकेंत पहिल्या प्रश्नांत सदर परिक्षेपर्यंत किती पुस्तकें वाचलीं हें विचारलें होतें. या प्रश्नाला माधवरावांनीं जें

उत्तर दिलें त्यावरून १८५८ पासून १८६१ पर्यंत तीन वर्षांत त्यांनीं कोणतीं व किती पुस्तकें वाचलीं हें समजण्याला अनायासें एक साधन झालें आहे. उत्तरांत माधवराव लिहितातः—

I entered the college 10th June 1858. An account of what I have studied privately within these three years, it is impossible to give at this moment. Firstly because I did not expect such a question now; and secondly because I am not much in the habit of keeping a memorandum of my studies, still I will state here the names of all the books I can at this moment remember to have read within these three years.

*Macaulay*—History of England vols. I and II

„ Essays vols I, II, III.

*Gibbon*—Decline and Fall complete.

*Buckle*—Introduction to the History of Civilization of English vol I.

*Scott's Novels*—Waverley, Antiquary, Guy Mannering, Rob Roy, Old Mortality.

*Bulwar Lytton*—Harold and Rienzi.

*Plato's Dialogues*—Phædo, Georgius, Sophist.

*Milon*—Paradise Lost.

*Scott*—Marmion, the Lay of the Last Minstrel.

*Byron*—Giour, Corsair, Bride of Abydos.

*Horntook*—Diversions Vol. I.

*Washington Irving*—Tales of a Traveller, Conquest of Granada.

*Adam Smith*—Wealth of Nations Vol I, II.

*Barbauld*-Selections from the Spectator Vol. I.

*Madam D'Arblay*—Cecilia.

*Compbell*—Poems.

नेमलेल्या अभ्यासाला जोड म्हणून माधवरावांनीं वाचलेल्या पुस्तकांची ही यादी आश्चर्यजनक आहे, असेंच प्रत्येकास कबूल करावें लागेल. वरील यादींत इतिहास, काव्य, निबंध, प्रवास, कादंबऱ्या वगैरे अनेक विषयांचे ग्रंथ आहेत. तींत शेक्सपीयरच्या नाटकांचा उल्लेख नाहीं. परंतु अभ्यासक्रमान्वयें त्यांनीं पांचवा व आठवा हेन्री आणि मर्चंट ऑफ व्हेनिस अशीं शेक्सपीयरचीं तीन नाटकें वाचलीं असें त्यांनीं या उत्तराच्या दुसऱ्या भागांत लिहिलें आहे. बेकनचा एक ग्रंथ 'नोव्हम ऑर्ग्यानम' त्यांना अशाच रीतीनें अभ्यासावा लागला.

या परिक्षेसाठीं त्यांना बटलरचा 'ॲनालॉजी' नामक धार्मिक तत्त्वज्ञानाचा ग्रंथ वाचावा लागला. वर सांगितलेल्या लॅटीनच्या वर्गाप्रमाणेंच बटलरचीं पुस्तकें शिकविण्यासाठीं बिनसक्तीचा एक वर्ग एल्फिन्स्टन कालेजांत चालविला जात असे. माणसाला धर्माची अवश्यकता आहे. धर्म हा संस्कृतीचा पोषक असून त्याच्या अभावीं मनुष्याची अध्यात्मिक उन्नति होणार नाहीं असे विचार माधवरावांच्या मनांत पक्के बिंबण्याला बटलरचे ग्रंथ पुष्कळ अंशीं कारण आहेत. मुळांत धर्माविषयीं श्रद्धा असल्याखेरीज बटलरच्या ग्रंथाचा उपयोग होणें शक्य नाहीं. तशी श्रद्धा माधवरावांमध्यें होती. ती बटलरच्या अध्ययनानें विकास पावली व निर्मळ झाली. माधवरावांनीं या वर्गांत नांव दाखल केलें आणि अभ्यास चालविला. वर्गाध्यापकानें चांचणीखातर परीक्षा घेतली तेव्हां माधवरावांची या विषयांतली प्रगति विशेष दिसून आली आणि संतोषाच्या

भरांत त्यांच्या गुरूनें त्यास नेमलेल्या मार्कांहून जास्त मार्क दिल्याची नोंद एका रिपोर्टांत आहे. माधवरावांच्या मनावर बटलरच्या पुस्तकांचा किती परिणाम झाला होता, याचें आणखी एक प्रत्यंतर उपलब्ध आहे. डेक्कन कालेजचे माजी प्रिन्सिपाल डॉ. सेल्बी यांनीं विस्तृत प्रस्तावनेसह बटलरचा 'नीतिमार्ग' (Methods of Ethics) हा ग्रंथ १८८१ सालीं प्रसिद्ध केला. त्याचें परीक्षण* सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत १८८२ च्या जानेवारीच्या अंकांत माधवरावांनीं केलेलें आहे. त्यांत बटलरच्या पुस्तकांमुळें माधवरावांमध्यें उत्पन्न झालेल्या धर्मादराचा उमाळा उत्कृष्टपणें दिसून येतो.

हिंदू धर्मग्रंथांबद्दल १८६१ च्या सुमारास माधवरावांच्या मनांत कोणते विचार घोळत होते अगर यांचें तत्संबंधीं ज्ञान किती होतें, याची किंचित माहिती करून देणारें एक उत्तर त्यांनीं या परिक्षेंतच लिहिलें. बेकनची विचारसरणी व ब्राह्मणी धर्मग्रंथांत आढळणारी विचारसरणी यांत फरक अगर सादृश्य काय आहे, या प्रश्नाला उत्तर देतांना माधवराव लिहितात:—

I know very little of Brahmanical Schools—either their method or their scope. Still I know this much they are dimetrically opposed to Bacon's method and are full of the restless agitation and the dogmatic tendency which Bacon has censured. They dispise that knowledge of nature which they derive from observation as being low and sordid. They have recourse to mental abstraction and

---

* हा परीक्षण लेख श्री. रमाबाईसाहेब रानडे यांनीं प्रसिद्ध केलेल्या "Miscellaneous writtings" नामक पुस्तकांत आहे.

contemplation and spun a web out of their own brains which astounds us all and is intelligible to none.

माधवरावांच्या धार्मिक विचारांत स्थित्यंतर झालें कीं काय हें ताडून पहाण्याला या उताऱ्याचा उपयोग होणारा असल्यानें येथें तो सादर केला आहे.

१८६१ सालीं माधवरावांच्या परीक्षा आटोपल्यावर ताबडतोब त्यांच्या गळ्यांत अध्यापनकर्माची जबाबदारी पडली व त्यांच्या दैनिक व्यवसायांत आणखी भर टाकण्यांत आली. १८६२ सालीं एप्रिलांत ते बी. ए. च्या परिक्षेस बसले आणि बहुमानपुरस्सर पहिल्या वर्गांत पास झाले. तेव्हां आनर्सची परीक्षा निराळी घेण्याचा विद्यापीठाचा प्रघात होता. माधवरावांनीं या परिक्षेला बसण्याची महत्त्वाकांक्षा धरली आणि इतिहास व अर्थशास्त्र हे विषय घेऊन ते परिक्षेला बसले. या परिक्षेला फक्त विषय नेमलेला होता. त्यासंबंधीं किती पुस्तकें वाचावयाचीं याला मर्यादा घातलेली नव्हती. माधवरावांनीं विषयानुरोधानें जितकीं पुस्तकें वाचतां येतील तितकीं पुस्तकें वाचलीं, पण ऑनर्सच्या परिक्षेंत त्यांना उत्तम यश लाभलें नाहीं. ते दुसऱ्या वर्गांत पास झाले. तरी त्यांच्या विद्वत्तेची जाणीव परीक्षकांना झाल्याशिवाय राहिली नाहीं. परीक्षकांनीं स्वतंत्रपणें वर्गणी जमवून एक सोन्याचें पदक व दोनशें रुपयांचीं पुस्तकें पारितोषिकादाखल त्यांस अर्पण करून आपली उदार गुणग्राहकता जगाच्या नजरेस आणून दिली. आपल्या शिष्यानें संपादन केलेल्या उज्वल यशानें प्रसन्न होऊन विश्रांति घेण्यासाठीं ग्रँट साहेबांनीं त्यास आठ दिवसांची रजा दिली. या रजेचा उल्लेख त्यांनीं आपल्या १८६२–६३ सालच्या कामाबद्दलच्या अहवालांत केला आहे. स्वतःच्या परिक्षेचा अभ्यास व अध्यापन हीं दोन्हीं

कर्तव्यें पार पाडीत असतां कोणत्याही कारणास्तव आपण एक दिवस देखील गैरहजर राहिलें नाहीं, असें वरिष्ठांच्या निदर्शनास आणून त्यांची शाबासकी मिळविण्याचा माधवरावांचा निश्चय होता. पण दैवानें त्यांच्या निश्चयाला खो देण्याचा संकेत केल्यामुळें त्यांचा इलाज चालला नाहीं. १८६२ च्या मे महिन्यांत त्यांच्या बहिणीचा नवरा वारल्यामुळें मुंबईस जाण्याला आठ दिवसांच्या उशीराचा अपशकून सुरवातीसच झाला. वर्षाअखेरीस म्हणजे १८६३ च्या उन्हाळ्याच्या सुट्टीपूर्वी त्यांचे डोळे बिघडले. अभ्यासाच्या अतिरेकानें त्यांच्या डोळ्यास विकार झाला नसता तरच आश्चर्य! डोळे इतक बिघडले कीं, प्रकाश असह्य होऊन चार दिवस माधवरावांना डॉक्टराच्या सल्ल्यानें अंधार कोठडींत पडून रहावें लागलें. आपल्या गैरहजेरीच्या कारणांचा निर्देश त्यांनीं आपल्या अहवालांत अगदीं मोकळ्या मनानें केला आहे. डोळे बिघडण्यापूर्वी त्यांनीं आनर्सच्या परिक्षेनिमित्त अभ्यासाचा कसा कहर उडवून दिला होता, हें यांच्याच शब्दांत भाषांतररूपानें नमूद करणें उचित आहे. ते म्हणतात:—

आनर्सच्या परिक्षेसाठीं मी ठोकळ अंदाजानें माफक आकाराचीं २५००० पानें वाचलीं आणि अवघड पुस्तकांचा सारांश लिहून व एकाच विषयावरील निरनिराळ्या पुस्तकांतील तुलनात्मक टिपणें करून १०० कागद लिहिले.ऑक्टोबरच्या सुट्टींत अर्थशास्त्रावरील पुस्तकें वाचण्यांत सकाळचा वेळ खर्चीं घालीत होतों. दिवसाचा बाकीचा भाग इतिहासाकडे खर्चीं पडत असे. रात्रीच्या पूर्व भागांत किंवा उत्तर भागांत मी लिहिण्याचें व घोकंपट्टीचें काम करीत होतों. एकूण चौदा तास प्रमाणें अभ्यास चालला होता.

बी. ए. च्या दोन्ही परीक्षा उतरल्यानंतर माधवरावांनीं कायद्याच्या अभ्यासास प्रारंभ केला. यांच्या मनांतून १८६४ मध्येंच पहिल्या

एल्‌एल्‌. बी. च्या परिक्षेस बसावयाचें होतें. हेतूप्रमाणें नेटाच्या अभ्यासास त्यांनीं प्रारंभ केला. १८६३ सालच्या पहिल्या टर्ममध्यें ते दर आठवडयास दोनदां कायद्याच्या वर्गास हजर रहात होते. पण अभ्यास आवरेल असा रंग दिसेना तेव्हां कायद्याच्या शाळेचे मुख्य अध्यापक डॉ. रीड यांना भेटून त्यांच्या सल्ल्यानें दर आठवडयास चारवेळ हजर रहाण्याचा क्रम त्यांनीं सुरू केला. कायद्याचा अभ्यास करतांना डोळ्यांनीं माधवरावांना अगदीं हैराण करून सोडलें. तरी माधवराव चार तासाचा वेळ कायद्याच्या वाचनांत घालवीत होते. याहून जास्त अभ्यास केला तर डोळे कायमचे नष्ट होतील असा धाक त्यांच्या मनावर असल्यानें चार तासांच्या वाचनावरच त्यांस समाधान मानून घ्यावें लागलें. कोणताही विषय घेतला कीं त्याचें आमूल अध्ययन करावयाचें, हा जो माधवरावांच्या स्वभावांतला विशेष तो कायद्याच्या अभ्यासाचे वेळींही प्रत्ययास आला. कायद्याचीं जीं पुस्तकें परिक्षेसाठीं नेमलीं होतीं त्याशिवाय त्यांनीं इतर मोठमोठाले ग्रंथ वाचले.*

बी. ए. ची पदवी संपादन केल्यानंतर त्यांच्या कामांत वृद्धि झाली. पूर्वी अध्ययन अध्यापन, आणि खाजगी वाचन एढवाच त्यांच्यामागें व्याप होता. या वर्षीं त्यांना विश्वविद्यापीठानें परीक्षक नेमल्यानें तें कर्तव्य चोख बजावलें जाण्याकरितां माधवरावांनीं बरींच पुस्तकें वाचलीं तीं निराळींच. परीक्षक या नात्यानें एक जबाबदारी वाढली म्हणून माधवरावांनीं मागल्या त्रिविध कर्तव्यापैकीं एकासही फांटा दिला नाहीं. विद्यार्थी, खाजगी विद्यार्थी, शिक्षक आणि परीक्षक या चारी नात्यांनीं ज्ञानार्जनाचा तडाखा

* Blackstone's Commentaries 3 volumes; Broom's Commentaries about 500 pages; Smith's Contracts; Strange's Hindoo law.

चालविला होता. डोळ्यांनीं दगा दिला नसता तर त्यांनीं अधिक ज्ञानार्जन केलें असतें यांत संशय नाहीं, पण त्यांची १८६३--६४ सालच्या अहवालांत सादर केलेली पुस्तकांची यादी पाहिल्यास डोळे, दुखण्याच्या रूपानें वारंवार नकोनको म्हणत असतांही त्यांनीं जमविलेल्या ज्ञानभांडाराचें आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाहीं. तरी ते खेदानें अहवालाच्या शेवटीं म्हणतातः—

सप्टेंबर महिन्यांत किंवा त्या सुमारास ( १८६३ ) माझ्या डोळ्यांचा विकार अतिशय तीव्र स्वरूपांत प्रकट झाला व म्हणून मला आठ दिवसांची सक्तीची रजा घेण्याची पाळी आली. या रजेखेरीज बाकी सर्व काळ मी कॉलेजांत व कायद्याच्या वर्गांत हजर होतों. कायद्याच्या अवांतर ज्ञानांत खूप भर टाकावी असें माझ्या मनांत होतें, पण माझी फार निराशा झाली. या ठिकाणीं आणखी एकवर्ष राहून येथील हक्कांचा उपभोग घ्यावा एवढीच माझी इच्छा आहे. सदर मुदतींत मी एल्‌एल्. बी.च्या परिक्षेला पात्र ठरेन. जर ही इच्छा सिद्धीस गेली नाहीं, तर या स्थळीं रहाण्याला अयोग्य आहे असें समजून मी त्याचा आश्रय सोडीन.

वरील उताऱ्यांत माधवरावांनीं जें भय व्यक्त केलें आहे, तें १८६५ सालीं निर्मूळ ठरलें. त्यांना मुख्य शंका आपली टर्म भरेल कीं नाहीं याबद्दल होती व म्हणून त्यांनीं आठवड्यांतून दोन वेळांऐवजीं चारवेळां हजर राहून मुदतीचा अडथळा टाळण्याची तोड काढली होती. 'बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेतः' या सुभाषितानुसार आत्मविश्वासाचा अभाव हें या शंकेचें एक निमित्त समजण्याला हरकत नाहीं. १८६५ सालीं त्यांनीं कायद्याची परीक्षा दिली. या परिक्षेला फक्त दोनच पदवीधर होते. एक माधवराव आणि दुसरे बाळ मंगेश वागळे. दोघांनीं पहिला वर्ग पटकावला. त्यानंतर अवध्या

तीन आठवडयांनीं ऑनर्सची परिक्षा आली. तिला ते दोघे बसले. दोघे पास झाले, पण माधवरावांनीं पहिला वर्ग व नंबर हस्तगत केला आणि वागळे दुसऱ्या वर्गांत उतरले. शिक्षकाचें कांम संभाळून या परिक्षेची तयारी करावयाची असल्यानें माधवरावांवर अभ्यासाचा ताण किती पडला असेल याची कल्पना सहज करतां येईल. त्यांनीं वाचलेल्या कायद्याच्या पुस्तकांची यादी* पुष्कळ ठिकाणीं प्रसिद्ध झालेली आहे. मोठमोठया धुरंधर कायदेपंडितांना आजसुद्धां ती विस्मयानें तोंडांत बोटें घालावयास लावते. फेलो या नात्यानें १८६५–६६ सालीं प्रिन्सिपालकडे पाठविलेल्या अहवालांत त्यांनीं या वेळच्या अभ्यासाबद्दल थोडी माहिती दिली आहे. आपण ही माहिती दिल्यानें कोणी आपल्यावर घमेंडीचा तर आरोप करणार नाहींना, अशी शंका त्यांच्या मनांत डोकावून गेली म्हणून त्यांनीं माहितीचा संक्षेप केला आहे. ते लिहितात:—

मे व आक्टोबर महिन्याची सर्व सुट्टी कायद्याच्या अभ्यासांत संपविली. दरम्यानच्या काळांतही तोच क्रम ठेवला होता. सामान्य परीक्षा आटोपल्यावर ऑनर्सच्या परिक्षेला बसण्याचा मला सल्ला मिळाला. त्या परिक्षेला फक्त तीनच आठवडयांचा अवधी उरला होता. त्यामुळें मला नाताळच्या सुटीपर्यंत अभ्यासाव्यतिरिक्त कांहीं करणें शक्य नव्हतें. परिक्षेंतील यशानें माझ्या या सगळ्या परिश्रमाचा भरपूर मोबदला मिळाला असें मी समजतों. मी व वागळे असे दोघेच विद्यार्थी असल्यानें आह्मी वहुतेक अभ्यास एकत्र केला. वाचलेल्या पुस्तकांची यादी बढाईखातर दिलेली नाहीं. ज्या कोणाचा आमच्यावर विश्वास आहे, त्यांचा विश्वास अपात्रीं ठरला नाहीं, हें दाखविण्याच्या हेतूनें ही यादी जोडलेली आहे. आमच्या हेतूचा गैरसमज कोणी करून घेणार नाहीं, अशी आह्मांस उमेद आहे.

---

* कायद्यांच्या व इतर पुस्तकांची यादी शेवटीं परिशिष्टांत दिली आहे.

१८६६ सालीं माधवरावांची विद्यार्थीदशा संपली. १८५९ सालापासून यावेळेपर्यंत अव्याहत सुरू असलेला ज्ञानयज्ञ यावर्षी समाप्त झाला. माधवरावांनीं या काळांत जें अपूर्व बुद्धिवैभव दाखविलें, त्याचें कौतुक करणारे राज्याधिकारी तेव्हां असल्यामुळें, दरसाल त्यांचा गौरव वाढत होता. मुंबई विश्वविद्यापीठाचा पहिला पदवीदान समारंभ सर बार्टल फ्रीयर या गव्हर्नराच्या हस्तें १८६२ सालच्या एप्रिलांत २८ व्या तारखेला झाला. तो समारंभ जितका गंभीर दिसेल तितका दाखविण्याची व्यवस्था केलेली होती. बी. ए.च्या परिक्षेंत माधवरावांनींच अग्रस्थान पटकावलें असल्यामुळें त्यांच्या नांवाचा उल्लेख गव्हर्नरसाहेबांनीं आपल्या भाषणांत केला आणि त्यांच्या भावी उत्कर्षाबद्दल आशा दर्शविली. मॅट्रिकपासून पांच वर्षांचा अवधि लोटल्याशिवाय एम्. ए.ची परीक्षा देतां येणार नाहीं असा विद्यापीठाचा नियम असल्यामुळें माधवरावांनीं १८६२ मध्यें बी. ए.ची सीमा ओलांडली तरी १८६३ पर्यंत त्यांस एम्. ए. च्या परिक्षेसाठीं वाट पहाणें भाग होतें. या पांच वर्षांच्या नियमाचा सर बार्टल फ्रीयर यांनीं मुद्दाम निर्देश केला होता. पण १८६४ सालीं माधवरावांनीं एम्. ए. ची परीक्षा दिली. १८६५ सालीं एम्. ए.ची पदवी बहाल करतांना आपली आशा सफळ झाल्याचें पाहून फ्रीयरसाहेबांना अतिशय धन्यता वाटली व पुन: त्यांनीं नामोच्चारपूर्वक माधवरावांचा गौरव बोलून दाखविला. यावेळीं माधवराव कायद्याच्या अभ्यासांत निमग्न होते, ही गोष्ट ओळखून फ्रीयरसाहेबांनीं हिंदी कायदेपंडितांच्या भवितव्याविषयीं आपल्या पदवीदान समारंभाच्या भाषणांत बरीच चर्चा केली आहे. १८६६ त कायद्याची पदवी अर्पण करण्याचा योग आला तेव्हां माधवरावांच्या

योग्यतेचें विद्यापीठानें वेगळ्याप्रकारें चीज केलें होतें. विद्यापीठाच्या फेलोमध्यें या तरुण पदवीधराचा समावेश करून विद्यापीठाच्या सूत्रधारांनीं व सरकारानें त्यांचा सन्मान केला होता. फ्रीयरसाहेबांनीं माधवरावांना फेलोमंडळींच्या मालिकेंत गोवतांना विशेष गौरवाच्या भाषेंत त्यांचें स्वागत केलें. फ्रायरसाहेबांच्या पदवीदान समारंभाच्या भाषणांतून विद्वत्ता चमकलेली आढळत नाहीं. हिंदी सुशिक्षितांच्या भवितव्याबद्दलचा कळवळा मात्र त्यांत प्रामुख्यानें दिसून येतो. विद्यापीठांतून बाहेर पडणाऱ्या तरुणांचीं कर्तव्यें आणि जबाबदारी कोणती यांचा फ्रीयरसाहेबांनीं पुष्कळ ऊहापोह केला आहे. इंग्रजी शिक्षणाबद्दल प्रारंभापासूनच हिंदी समाजांत नानाविध गैरसमजुती उत्पन्न झाल्या होत्या. इंग्रजी शिक्षणाचा प्रसार हें एक १८५७ च्या बंडाचें कारण गणलें जातें. प्रस्तुत बंडाळी ऐन भरांत असतांना इंग्रजी राज्यकर्त्यांनीं विद्यापीठांची स्थापना केली. विद्यापीठांच्या स्थापनेची वाटाघाट कलकत्त्यास सार्वभौम सरकारांत चालली होती तेव्हां फ्रीयरसाहेब एक्झीक्यूटिव्ह कौन्सिलर या नात्यानें कलकत्त्यास होते. बंडाचा वणवा विझल्यावर त्यांची नेमणूक मुंबई इलाख्याच्या गव्हर्नराच्या जागीं झाली. मुंबई इलाख्याशीं त्यांचा संबंध पूर्वीं आला होता. यामुळें गव्हर्नर या नात्यानें त्या इलाख्याच्या विद्यापीठाचा पहिला पदवीदानसमारंभ साजरा करतांना त्यांस धन्यता वाटावी यांत अस्वाभाविक काय आहे ? बंडाच्या दारुण प्रसंगाला कारणीभूत असणाऱ्या शिक्षणाचीं मुळें विद्यापीठांच्या द्वारें खोल व विस्तृत रुजत चाललेलीं पाहिल्यावर हें शिक्षण सार्थकीं लावण्याचें श्रेय तरुण पदवीधरांनीं संपादावें व इंग्रजी विद्येविषयींच्या लोकांत रूढ झालेल्या दुष्ट ग्रहांचा निःपात करावा हा एकच विचार

फ्रीयरसाहेबांच्या मनांत उत्कटत्वानें उद्भवणें शक्य व साहजिक होतें.

या विचाराचा उपदेश त्यांनीं आपल्या कारकीर्दींत दरसाल केला. त्याचें सार असें:—

तुमच्यावर केवळ विद्यापीठाचीच कीर्ति अवलंबून नाहीं. समाजाची नीति तुमच्यावर अवलंबून आहे. तुम्ही विश्वविद्यापीठाचे पदवीधर आहांत. तुमच्या वर्तनांत सगळ्या सुशिक्षित जगाचे गुण दिसावयास पाहिजेत. विशिष्ट सरकारचे, समाजाचे अथवा देशाचे गुण तुमच्या वर्तनांत दिसल्यानें इतिकर्तव्यता होणार नाहीं. तुम्हांस जें शिक्षण मिळालें आहे, त्या शिक्षणानें सामाजिक नीतिमत्ता ल्यास जाते, तुम्ही वडील मंडळीची अवज्ञा करूं लागता, गर्विष्ठ आणि स्वयंमन्य बनता, असा या शिक्षणावर एक आरोप आहे; तो तुम्ही दूर केला पाहिजे. विद्या आणि नीतिमत्ता यांचा परस्परसंबंध आहे, हें नित्य लक्षांत असूं द्या. तुम्हाला जर विद्वान आणि शहाणे व्हावयाचें असेल तर विद्यापरायणतेला उच्च प्रतीच्या निर्मळ बुद्धिमत्तेप्रमाणेंच अंतःकरणाची पवित्र शुद्धता आवश्यक आहे, हें कधींही विसरूं नका.

या व अशा प्रकारच्या दरसाल घडणाऱ्या उपदेशाचा परिणाम माधवरावांच्या मनावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. माधवरावांना हा उपदेश ऐकतांना काय वाटत होतें, हें त्यांनीं पुढें १८७० सालीं फ्रीयरसाहेबांच्या व्याख्यानसंग्रहाला प्रस्तावना लिहून व्यक्त केलें आहे.

शिकलेल्या हिंदी लोकांत विद्याभिरुचि आणि सुसंस्कृतता वाढण्याकरितां उत्तेजन देऊन त्यांनीं आमच्या देशाला ऋणबद्ध करून ठेवलें आहे. त्यांचीं युनिव्हर्सिटींतलीं भाषणें म्हणजे सरकारी खलितेच होत. या भाषणांतून त्यांनीं भविष्यद्रष्ट्या आचार्याप्रमाणें गत आणि भविष्य या दोन्ही काळांमध्यें नजर फेकून त्यांच्या बऱ्यावाईट विशेषांची, अस्पष्ट दिसणाऱ्या आशामय वर्तमान काळाशीं, तुलना केलेली पहावयास सांपडते. ज्या भाषणांत त्यांनीं विद्यापीठांच्या

स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे, तें भाषण म्हणजे या देशांत क्वचित् अनुभवास येणाऱ्या दुर्लभ वक्तृत्वाचा एक मासला, असें समजावयास हरकत नाहीं. हीं वार्षिक भाषणें म्हणजे एक प्रकारें अमोलिक विचारविनिमय होत व त्यांचा नैतिक परिणाम श्रोत्यांच्या हृदयांतून कधींच नष्ट होणार नाहीं.

वरच्या उताऱ्यांतील शेवटचे शब्द माधवरावांनीं निरर्थक लिहिलेले नाहींत, हें त्यांच्या चरित्रावरून निदर्शनास येणारच आहे. कायद्याच्या विश्वविद्यापीठानें नेमलेल्या परीक्षा आटोपल्यावर ते अॅडव्होकेटच्या परिक्षेची सिद्धता करूं लागले. त्यासाठीं त्यांनीं स्मॉलकॉज कोर्टांत व हायकोर्टांत हजर रहाण्याची परवानगी घेतली. दर बुधवारीं हायकोर्टांत शुक्रवारीं स्मालकॉज कोर्टांत माधवराव जात होते. १८६६ त उन्हाळ्याच्या सुट्टीपर्यंत हायकोर्टाच्या व अपीलेट ओरिजिनल अशा दोन्ही भागांत त्यांनीं आपली हजेरी ठेवली होती, पण मुंबई इलाख्याचे पहिले अॅडव्होकेट माधवरावांनीं व्हावें, असा दैवयोग नसल्यानें आणखी पांच वर्षें सदर हेतु असिद्धच राहिला. हीं पांच वर्षें,विद्यार्जनाची आणखी एक कायदेशीर मजल गांठण्याच्या दृष्टीनें निष्फळ दिसलीं, तरी एकंदर कार्याच्या दृष्टीनें फार महत्वाचीं आहेत. याच पांच वर्षांत माधवरावांनीं सार्वजनिक कर्तबगारीचा पाया घातला.

माधवरावांनीं आपल्या प्रिन्सिपालकडे पाठविलेल्या कामाच्या अहवालांतून, विचार करण्याजोगा एक भाग आढळतो. विद्यार्थी या नात्यानें अभ्यासाचीं व त्याशिवाय तदानुषंगिक दुसरीं पुस्तकें त्यांस वाचावीं लागत होतीं. विद्यार्थीदशेंतच अध्यापकाची कामगिरी त्यांवर पडल्यामुळें तिचा उपयोग त्यांनीं आपलें ज्ञान वाढविण्यांत करून घेतला. परीक्षक या नात्यानें त्यांस त्या त्या विषयाचा व्यासंग करणें प्राप्तच होतें, पण याशिवाय त्यांनीं खाजगी रीतीनें वाचन केल्याची माहिती

त्यांच्या अहवालांतून आहे. विचार करण्याजोगा भाग म्हणून वर म्हटलें तो हाच होय. त्यावरून त्यांची अलौकिक ज्ञानलालसा तर दिसून येतेच पण तिजबरोबर कामाचा विलक्षण उरक दिसून येतो. १९१५ सालीं माधवरावांचा एक संकीर्ण लेखसंग्रह श्री. रमाबाई रानडे यांनीं प्रसिद्ध केला असून त्याला सर दीनशा वाच्छा यांनीं ल्हानशीच पण सुंदर मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्तावनेंत सर दिनशा यांनीं म्हटलें आहे कीं, परिक्षेचा अभ्यास म्हणजे माधवरावांच्या हातचा केवळ मळ होता. या विधानाची यथार्थता माधवरावांनीं एम्. ए. च्या परीक्षेच्या वेळीं पटवून दिली. बी. ए. च्या परीक्षेकरितां केलेल्या अभ्यासाची व वाचलेल्या पुस्तकांची हकीकत माधवरावांनीं तपशीलवार दिली आहे. पण एम्. ए. च्या परिक्षेचा त्यांच्या अहवालांत मागमूस देखील लागत नाहीं. ज्या वर्षी त्यांनीं एम्. ए. ची परीक्षा दिली त्या वर्षीच्या अहवालांत त्यांनीं कायद्याच्या अभ्यासाचा पाढा वाचला आहे. खाजगी वाचनाचीही त्यांत नोंद आहे. हा अहवाल लिहितांना आपण एम्. ए. ची परीक्षा दिली हें जणूं काय त्यांच्या ध्यानांतच नव्हतें. असा विसर त्यांस पडण्याचें कारण एकच दिसतें व तें हेंच कीं, त्यांना एम्. ए. च्या परिक्षेसाठीं वेगळे परिश्रम करावे लागले नाहींत. बी. ए. च्या वेळीं त्यांनीं जे प्रचंड परिश्रम केले, त्यांच्या जोरावर त्यांनीं एम्. ए. ची पदवी मानासह ( ऑनर्ससुद्धां ) सहजलीलेनें हस्तगत केली. परंतु एक गोष्ट लोकांच्या कानावर फारशी नाहीं. लोक असें समजतात कीं, माधवरावांना संस्कृत भाषेचें ज्ञान बिलकूल नव्हतें. त्यांनीं संस्कृत भाषा हा विषय परिक्षेला घेतला नव्हता. या एकाच आधारावर लोक प्रस्तुत समजुतीला थारा देत आहेत. १८८७ सालीं मलबारींच्या सुधारणाप्रक-

रणांत दादाजी वि. रखमा या खटल्याची भर पडल्यानंतर खळबळ उडाली तेव्हां माधवरावांना, एका संस्कृत भाषेच्या पंडितानें भरसभेंत समक्ष वर्दळीवर येऊन 'तुह्माला संस्कृत भाषेचें ज्ञान नसतांना उगीच त्या भाषेंतील शास्त्रवचनांचा काथ्याकूट कशाला करता' असा टोमणा मारण्याचें धाडस केलें. लोकप्रवादाचा एक मासला म्हणून हा प्रसंग येथें निवेदन केला आहे. माधवरावांना या प्रसंगीं आत्मश्लाघा करून उत्तर देतां आलें असतें, पण त्यांच्या स्वभावरचनेंत या दुर्गुणाला स्थळ नव्हतें, मग तो याचवेळीं प्रकट व्हावा कसा? माधवरावांनीं संस्कृताच्या अभ्यासाला कॉलेजचा शास्त्री मदतीस घेऊन १८६३ सालीं जानेवारीच्या अखेरीस सुरुवात केली. हितोपदेशाचीं शंभर पानें व विल्यम्सच्या संस्कृत व्याकरणाचा कांहीं भाग एवढयाबरच हा अभ्यास त्यावर्षी थांबला. १८६४ सालीं आक्टोबरच्या सुट्टींत त्यांनीं विक्रमोर्वशीय, शाकुंतल आणि हनुमन्नाटक अशीं तीन पुस्तकें शास्त्र्याच्या साह्यानें वाचल्याची नोंद त्यांच्या १८६५ सालच्या रिपोर्टांत आहे.

माधवरावांचा विद्यार्थीदशेचा इतिहास पूर्ण होण्याकरितां आणखी कांहीं गोष्टी यथें निवेदन करणें अवश्य आहे. त्यांच्यावेळीं हार्कनेस, हावर्ड, ह्यूलिंग्ज, सर अलेक्झांडर ग्रँट वगैरे विद्वान व कळकळीचे इंग्रज, एल्फिन्स्टन कॉलेजचे अध्यापक होते. प्रत्येक विद्यार्थ्याच्या अभ्यासपद्धतीवर त्यांचें लक्ष असे. विद्यार्थ्यांनीं शाळेच्या अभ्यासाबरोबर आवडीच्या विषयाचा खाजगी व्यासंग ठेवावा अशी त्यांची इच्छा असल्यानें त्यांजकडून विद्यार्थीवर्गाला सदैव उपयुक्त सूचना व प्रोत्साहन दिलें जात असे. पण सर्वांत जास्त लाभ जर माधवरावांना कोणा गुरूकडून झाला असेल तर तो सर अलेक्झांडर ग्रँट यांजपासून, हें

प्रसिद्धच आहे. ग्रँटसाहेब १८६० सालीं आक्टोबरच्या ६ व्या तारखेस प्रोफेसरीच्या कामावर रुजू झाले. इंग्लंडांत त्यांनीं आपल्या विद्वत्तेच्या जोरावर मोठी ख्याति मिळविली होती. हा नामांकित अध्यापक आपल्याला लाभणार असें समजतांच विद्यार्थ्यांच्या हृदयांत नानाप्रकारच्या आकांक्षा उत्पन्न झाल्या व पुढें अनुभवान्तीं त्या खऱ्या ठरल्या. ग्रँटसाहेब एल्फिन्स्टन कॉलेजांत आल्यावर त्यांनीं अनेक सुधारणा घडवून आणल्या. ते मोकळ्या मनाचे व विद्यार्थ्यांची अहर्निश चिंता वहाणारे असल्यामुळें विद्यार्थीवर्गाची त्यांजबद्दल भक्ति वाढली. पण त्यांतल्या त्यांत जर कोणत्या विद्यार्थ्यानें त्यांचें चित्त आकर्षण करून घेतलें असेल तर तें माधवरावांनीं. आपल्या या शिष्याविषयीं त्यांनीं बहुधा दरसाल स्वतःच्या अहवालांत गौरवाचे शब्द घातले आहेत. १८६२–६३ सालचा विस्तृत अहवाल माधवरावांनीं तयार केला, तेव्हां ग्रँटसाहेब प्रिन्सिपाल होते. त्यांनीं डायरेक्टरकडे खालील शब्दांत या अहवालाची शिफारस केली:—

I would bring to your notice the remarkable report submitted by Mr. Mahadeo Govind of his work during the past year. This report represents the efforts and achievements of a Hindoo student of superior calibre.

एरवीं ग्रँटसाहेब कितीही सदय अंतःकरणाचे व विद्यार्थ्यांच्या हिताविषयीं कळकळ वाळगणारे असले, तरी शिकविण्याच्या कामांत फार कडक होते. मुलांच्या मनावर आईबापांचा व पालकांचा वचक रहावा म्हणून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसंबंधीं, व कॉलेजांतील चालचलणुकीसंबंधीं नोंद तयार करून, ती पालकांकडे पाठवून देण्याची रीत त्यांनीं अमलांत आणली. विद्यार्थ्यांच्या प्रकृतीकडे त्यांची नजर असे व

येथील हवापाणी, चालीरीती यांच्यामुळें विद्यार्थ्यांच्या शारीरिक प्रकृती-वर होणाऱ्या परिणामांत कॉलेजांतला अभ्यास भर टाकतो कीं काय, याचा छडा लावण्यापर्यंत त्यांच्या बारीक नजरेची धाव जात असे. त्यांच्या अध्यापनपद्धतीबद्दल विद्यार्थीवर्गानें केलेलें वर्णन येथें देतों:—

विद्यार्थ्याला प्रत्येक विषयाचें पद्धतशीर व परिपूर्ण ज्ञान व्हावें, गतकाळाचें ऐतिहासिक ज्ञान बिनचूक मिळवून त्यांसंबंधीं विद्यार्थ्यानें स्वत:ची बुद्धि स्वतंत्रपणें चालवावी, विद्यार्थी गतानुगतिक किंवा परप्रत्ययनेय बुद्धीचा न व्हावा, म्हणून आपण आपल्या वर्तनानें व शिस्तीच्या कडकपणानें प्रयत्न करीत होता. महत्त्वाच्या विषयावर एखादा विद्यार्थी धिमेपणानें व संमजसपणानें सर्व बाजूंची पूर्ण माहिती न मिळवितां जर घाईनें मनाच्या गैरवाजवी खात्रीवर विश्वसून निश्चित अभिप्राय देण्यास प्रवृत्त झाला, तर त्याचा निरुत्साह करून आपण अध्यापकच्या अभ्यासाबद्दल त्याच्या मनांत तिटकारा उत्पन्न होईल, अशी खबरदारी घेत होता.

सर अलेक्झांडर ग्रँट यांचा माधवरावांवर कसा लोभ होता, याविषयीं अनेक आख्यायिका लोकांस विदित आहेत. त्या सर्वांची पुनरुक्ति येथें करण्याची जरूरी नाहीं. ग्रँटसाहेब १८६८ सालीं विलायतेला जाण्याकरितां निघाले, तेव्हां माधवरावांनीं पुढाकार घेऊन त्यांस मानपत्र देण्याचा समारंभ तत्कालीन मुख्य न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालीं केला. वरील उतारा त्या मानपत्रांतलाच आहे. तो वाचीत असतां माधवरावांची छात्रवृत्ति कोणत्या कारणास्तव सहा महीने बंद झाली असेल हें ध्यानांत आल्याशिवाय रहात नाहीं. मानपत्राचा मसुदा माधवरावांनीं तयार केला होता. उत्तर देतांना ग्रँट साहेबांनीं त्यांच्या भाषेची वाखाणणी केली असून जाहीर रीतीनें आपल्या आवडत्या शिष्याच्या विशाल व्यासंगाची आणि प्रबळ मनोरचनेची ( extensive reading and powerful

mind ) प्रशंसा गाइली आहे. कातडीच्या काळेगोरेपणावर माणसाची योग्यता ठरविण्याचा राज्यकर्त्यांचा रिवाज ग्रँटसाहेबांना तिरस्करणीय वाटे. 'काला आदमी' लायक आहे अशी खात्री झाली कीं, त्याची अनुरूप अधिकारावर नेमणूक करण्यास ग्रँटसाहेब सदैव तयार असत. इंग्रजी भाषेच्या प्रोफेसराची जागा ग्रँटसाहेबांमुळेंच माधवरावांना मिळाली. ग्रँटसाहेब ऑक्सफर्ड विश्वविद्यापीठांत गाजलेलें एक जाडें प्रस्थ होतें. विद्वत्तेच्या ख्यातीमुळें त्यांचें सरकारांत दांडगें वजन होतें. या वजनाचा योग्य दिशेनें उपयोग करण्याची त्यांना हौस होती. सुदैवानें त्यांच्या शब्दाला मान देणारा व त्याची अंमलबजावणी करणारा फ्रियरसारखा गव्हर्नर इलाख्याचा राज्यकारभार पहात होता. यामुळें ग्रँटसाहेबांच्या शिष्यांचे गुण उजेडांत येऊन त्यांचें उत्तम चीज झालें.

प्रो. ह्यूलिंग्ज यांचा स्वभाव ग्रँटसाहेबांहून भिन्न होता. विद्यार्थ्यांत आपण होऊन मिसळण्याची त्यांना संवय नव्हती. शिवाय त्यांना मौनाची आवड जास्त, त्यामुळें विद्यार्थीवर्गाला वरवरच्या अनुभवावरून ते मनाचे कुरठे व आंतल्या गांठीचे गृहस्थ असावेत, असें वाटून प्रायः विद्यार्थी त्यांच्याशीं सलगी करण्याच्या भरीस पडत नसत. परंतु ज्या कोणाला त्यांच्या स्वभावांतली खुबी कळे, त्यांचा व प्रो. ह्यूलिंग्ज यांचा आपसांत लोभ वाढायला उशीर लागत नसे. माधवराव हे एक सदर अध्यापकाच्या मेहेरनजरेंतले शिष्य होते. माधवराव कालेजांत शिकायला लागले त्यावेळीं हावर्डसाहेब डायरेक्टर होते. त्याजकडे जाणाऱ्या प्रोफेसरांच्या अहवालावरून, माधवरावांच्या गुणांची माहिती त्यांस मिळाली. माधवरावांच्या कामगिरीचे खर्डे शेवटीं डायरेक्टराच्या टेबलावर जाऊन पडत असल्यानें, या उदयक्षितिजावर प्रतिवर्षी अधिकाधिक

तेजस्वितेनें चमकणाऱ्या अढळ ताऱ्यानें हावर्डसाहेबांसारख्या गुणज्ञ डायरेक्टराचें अंतःकरण भारून टाकलें. १८६१ सालीं सीनियर स्कालरशिपच्या परिक्षेंत माधवरावांच्या विद्याव्यासंगाचा आणि स्वयंप्रज्ञेचा प्रत्यय परिक्षकांना येऊन, त्यांचा एक पेपर सगळाच्या सगळा डायरेक्टराच्या रिपोर्टांत दाखल करण्यांत आला. हा पेपर कोणता हें वाचकांना माहीत आहे. नेमलेल्या पुस्तकांखेरीज इतर पुस्तकें वाचून विद्यार्थ्यानें किती ज्ञान संपादन केलें हें पहाण्याकरितां स्वतंत्र प्रश्नांचा एक पेपर त्यास दिला जात असे. त्या पेपराच्या कसोटीला माधवराव बावन्नकशी उतरलेले पाहून, हावर्डसाहेब चकित झाले व त्यांनीं माधवरावांचे जबाब शाळाखात्याच्या रिपोर्टांत घातले. १८६२ सालीं बी.ए.च्या परिक्षेंत त्यांनीं गुरुजनांच्या सर्व अपेक्षा सिद्धीस नेणारा विजय संपादन केला. ग्रँटसाहेबांप्रमाणें हावर्डसाहेबांना आनंद होऊन त्यांनीं रिपोर्टांत—

दक्षिणा फेलो व एल्फिन्स्टन कालेजांतला एक शिक्षक या नात्यानें काम करीत असलेला एक मराठा ब्राह्मण विद्यार्थी महादेव गोविंद बी. ए. यानें १८६२ च्या नोव्हेंबरमध्यें इतिहास व अर्थशास्त्र या विषयांमध्यें ( ऑनर्सची ) परीक्षा दिली. परीक्षा घेण्याचें काम मि. वेस्ट व मि. वर्डस्वर्थ, प्रिन्सिपाल पूना कॉलेज, यांनीं केलें. प्रस्तुत विद्यार्थी भूषणावह रीतीनें पास झाला.

ही माधवरावांच्या गुणाची हकीकत दिली आहे. कै. गणपतराव मानकरांनीं लिहिलेल्या माधवरावांच्या चरित्रांत, हावर्ड साहेबांनीं माधवरावांचे परिक्षेचे कागद विलायतेस पाठविले व तिकडे त्याच्या प्रतिभायुक्त विद्वत्तेची ख्याति पोंचविली, अशी एक आख्यायिका घातली आहे.

माधवरावांच्या सर्व गुरूंनीं ते अद्वितीय पुरुष आहेत अशी खूणगांठ मनांत बांधून ठेवली होती. त्यांचा अद्वितीयत्वाची साक्ष सहाध्यायी वर्गालाही पटली होती. वाचनाच्या शर्यतींत माधवरावापुढें अघाडी

मारणारा कोणी सहाध्यायी नव्हता. त्यांचे सहाध्यायी सामान्य नव्हते. भांडारकर, वागळे, फेरोजशहा मेथा, वामन आबाजी मोडक, आबाजी विष्णु काथवटे, कुंटे, शंकर पांडुरंग पंडित, वगैरे मंडळी थोड्याशा अंतरानें बरोबर किंवा मागें होती. त्यांचेही फेलोशिपच्या कामगिरीचे रिपोर्ट आहेत, पण माधवरावांची बरोबरी त्यापैकीं एकालाही करतां आली नाहीं. वर निर्देशिलेल्या प्रस्तावनेंत सर दिनशा वाच्छा यांनीं माधवरावांच्या विद्यार्थीदशेचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे:—

आमच्यापैकीं कोणालाच रानड्यांची चिकाटी, धिमेपणा आणि वाचनलालसा या गुणांमध्यें बरोबरी करतां येत नव्हती. धिमेपणा व चिकाटी हे मराठ्यांच्या स्वभावाचे गुणधर्मच आहेत,...पण रानडे विद्यार्थी असतांना हा चिकाटीचा जन्मसिद्ध गुण पराकाष्टेस पोंचलेला आढळून येत असे. आमच्यांतले कांहींजण त्यांस विनोदानें 'बालमतंगज' (The Infant Elephant) म्हणत असत. त्यांच्या शरीराचा बांधा धिप्पाड आणि ओबडधोबड असल्यानें हत्तीची उपमा सहज सुचे. रानडे भावी आयुष्यांत अप्रतिम विद्वान् म्हणून गाजणार याविषयीं आमच्यामध्यें कोणाचेंच द्विधा मत नव्हतें. पुढें त्यांच्या सार्वजनिक आयुष्यामध्यें जे गुण प्रकट झाले ते, अविश्रांत श्रम करणारे एक विद्यार्थी या नात्यानें या काळांतही लक्षांत येत असत. शहरच्या चालचलणुकीचा किंवा शिष्टाचाराचा गंध त्यांच्या अंगीं जडला नसल्यानें आपण कांहीं विचित्र आचरण करीत आहों, हें ध्यानांत न येतां ते एखाद्या बाकावर बसत व समोरच्या टेबलावर पाय ठेवून डोक्यावर पगडी आहे कीं, आपण बोडकेच आहोंत याची फिकीर न बाळगतां वाचण्याला प्रारंभ करीत आणि दुपारपासून तिन्हीसांजापर्यंत एकाग्र चित्तानें क्षणाचीही विश्रांति न घेतां वाचन चालवीत. एकदां स्वारी वाचनांत गर्क झाली कीं, मग त्यांना सभोंवती काय चाललें आहे याचें मुळींच भान उरत नसें.

दुसरे एक अनुगामी सहाध्यायी कै. प्रो. आबाजी विष्णु काथवटे यांनीं माधवरावांची विद्योपासना थोड्याशा निराळ्या शब्दांत वर्णिली आहे.

मी माधवरावांची विद्यार्थीदशा पाहिलेली आहे आणि तेव्हांपासूनच माझ्या चित्तांत त्यांजबद्दल आदर उत्पन्न झाला. विशेषत: अभ्यासावरील त्यांची अव्यभिचारिणी भक्ति पाहून फारच आदर वाटत असे.टाऊन हालांत परीक्षा चालू असतां एक पेपर आटोपला म्हणजे दुसरा पेपर सुरू होण्यापूर्वीच्या वेळांत ते पुस्तक घेऊन वाचूं लागत आणि कोणीतरी दुसरा पेपर लिहिण्यास जाण्याची वेळ झाली, असें जेव्हां सांगावें, तेव्हां ते पुस्तक ठेवून देत; इतकें त्यांना वाचनाचें वेड होतें. ते अभ्यासाचा एक मूर्तिमंत अवतारच होत असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

परिक्षेच्या अभ्यासासाठीं माधवरावांनीं जें वाचन केलें, त्याचा तपशील सामान्य माणसांची छाती दडपून टाकणारा आहे. तेवढयावर माधवरावांचें समाधान झालें नाहीं. त्यांनीं प्रतिवर्षी अभ्यासाव्यतिरिक्त खाजगी वाचन करण्याचा परिपाठ ठेवला होता. एम्. ए. ची परीक्षा दिली त्या वर्षाच्या अहवालांत अभ्यासाच्या पुस्तकांचें नांव नाहीं. अध्यापनासाठीं वाचलेल्या पुस्तकांची नामावळी आहे. खाजगी वाचनाचेंही कलम त्या अहवालांत सुटलेलें नाहीं. बी. ए. च्या वर्षी त्यांना वर्गांत चालणाऱ्या अभ्यासांमध्यें मन गुंतविण्याला फुरसत नव्हती. तथापि त्यांनीं वर्गांतली हजेरी न चुकूं देण्याची खटपट केली. ‘ आपल्यास वर्गांतल्या हजेरीपासून कायमचा म्हणण्यासारखा कांहीं लाभ झाला नाहीं,’ असें त्यांनीं दिलगिरीनें अहवालांत म्हटलें आहे. हें दिलगिरीचें विधान माधवरावांचें आहे, हा मुद्दा लक्षांत ठेवला म्हणजे हजेरी अगदींच वाया गेली असें समजण्याचें धाडस कोणीही करणार नाहीं. अन्यत्र लक्ष देण्याची, जरूर आहे, म्हणून वर्गांत चालणाऱ्या विषयांशीं माधवरावांचें तादात्म्य न होणें शक्य नव्हतें. कारण ते स्वत:च वरील खेददर्शक वाक्य लिहिल्यानंतर

म्हणतात कीं, 'वॅारबर्टन व कोलरिज यांनीं प्रतिपादिलेल्या राज्यसत्ता व धर्म यासंबंधींच्या तत्त्वमीमांसेचें कामापुरतें ज्ञान प्रोफेसरांच्या वर्गांतल्या व्याख्यानांनीं मला करून दिलें; प्रिन्सिपालसाहेबांनीं मिलचें तर्कशास्त्र शिकवितांना केलेल्या टीकेमुळें त्या ग्रंथकाराच्या तर्कनिरूपणाविषयींच्या माझ्या शंका निरसन पावल्या.' याशिवाय वेळ नसल्याची तक्रार करीत असतांनाच, माधवराव निबंधलेखनाकडे किती तास खर्चीं घालीत होते, हें मुद्दाम कथन करण्यासारखें आहे. वर्गाबरोबर त्यांनीं पुष्कळ निबंध लिहिले. निबंध लिहिण्यापूर्वी आपण दोन तास विषयांसंबंधीं माहिती गोळा करण्यांत, ती व्यवस्थित जुळविण्यांत व विचार करण्यांत घालवीत होतों, आणि प्रत्यक्ष निबंध लिहिण्यामध्यें तीन तासांचा व्यय होत असे, ही गोष्ट त्यांनीं नमूद केली आहे. परिक्षेच्या तयारीकरितां सर्वांना दिपविणारें अफाट वाचन करून पुनः खाजगी रीतीच्या ज्ञानसंपादनाची रग त्यांच्यांत प्रत्यहीं शिल्लक रहात असल्याचें पहावयास सांपडत असल्यानें, त्यांच्या बरोबरीच्या व मागच्या विद्यार्थ्यांनीं आश्चर्यद्योतक आठवणी लिहिल्या आहेत. बी. ए. चें वर्ष म्हणजे माधवरावांच्या बाबतींत पराकाष्टेच्या अभ्यासाचें वर्ष होतें. तथापि ते अभ्यासाला पुरून उरले व खाजगी रीतीनें त्यांनीं पुढील पुस्तकें वाचलीं—

1 *Macaulay*—Speeches, 2 Gil Blas, 3 *Tocqueville*—Revolution, 4 *Curran*—Speeches, 5 The Last of the Barons, 6 Devereux, 7 *Pecoke*—India in Greece, 8 *Smollet*—Peregrin Pickle and 9 Sir Lancelot Greaves, 10 *Wilson*—Hindoo Sects, 11 *Newman*—University and Education, 12 *Byron*—Don Juan, Childe Harold and Sardanapalus.

खालील पुस्तकांचें वाचन त्यांनीं १८६३-६४ सालीं केलें—

1 *Buckle*—History Vol. II; *Macaulay*—History 5 Vols.; 3 *Coleridge*—Poetical works—Piccelomni, Wallenstein; 4 *Thier*—French Revolution 200 pages; 5 *Shelley*—Poetical works—Queen Mab, Prometheus, Cenci; Revolt of Islam; 6 *Petrarch*—Sonnets; 7 *Voltaire*—Henriad; 8 *Alfieri*—Agamemnon; 9 *Foster*—Essays, 10 Eugene Aram; 11 *Sir G. Lewis*—Influence of Authority in matters of opinion Vol. I and II; 12 History of Inductive Science Philosophy.

१८६४-६५ या वर्षांत त्यांनीं आणखी कांहीं ग्रंथकारांच्या वाङ्मयाचें अवलोकन करून आपल्या ज्ञानांत भर टाकली—

1 *Maine*-Ancient Law; 2 *Mill*-Representative Government; 3 *Sir G. Lewis*—Dialogue on Government, Political terms, Method of observations in Politics Vol. I; 4 *Macaulay*—Continuation of History of England; 5 *Mansel*—Bampton Lectures; 6 *Merivale*—Vol. I to VII; 7 *Milman*—Christianity Vol. I and II; 8 *Cohrille*—Empire of the Romans; 9 *Carlyle*—French Revolution 10 Portions of Wordsworth.

विद्यार्थ्यांची विवेचनशक्ती, प्रतिभा किंवा व्यासंग यांची ओळख त्यांनीं लिहिलेल्या निबंधांतून घडण्याचा जितका संभव असतो तितका अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या भागांत नसतो. माधवरावांनीं निबंधलेखनानेंच आपल्या बुद्धिमत्तेची प्रभा गुरुजनांच्या निदर्शनास आणून दिली. पुढें सार्वजनिक कार्यांत पडल्यावर त्यांनीं निबंधांच्या साह्यानें आपले विचार हिंदी जनतेला शिकविले, या गोष्टीकडे लक्ष दिल्यास त्यांच्या

निबंधाबद्दलची माहिती विद्यार्थी दशेच्या वृत्तान्तांत गोवणें योग्य ठरते. दुर्दैवानें त्यांनीं कालेजांत शिकत असतांना लिहिलेल्या निबंधांच्या सर्व वह्या उपलब्ध नाहींत. १८५९ सालची एकच वही त्यांच्या दप्तरांत मिळाली. निबंधलेखनाकडे माधवराव किती वेळ घालवीत असत याची माहिती वर आलेली आहे. प्रोफेसरानें नेमून दिलेल्या विषयावर निबंध लिहितांना सामान्यतः विद्यार्थी आपल्या मनोविकारांचें प्रतिबिंब त्यामध्यें पडूं देत नाहींत. माधवरावांच्या स्वभावाची ठेवण निराळी असल्यानें त्यांच्या निबंधांत जागजागीं विवेचनाच्या अनुरोधानें उचंबळलेल्या मनोविकारांची छाया पहावयास सांपडते. 'शेतकी' या विषयावरील निबंधांत त्यांनीं एका ठिकाणीं 'मी ब्राह्मणजातींत जन्मास आल्यामुळें मला शेतकीचें प्रत्यक्ष ज्ञान कांहीं नाहीं,' असें स्वच्छ सांगून टाकलें आहे. या निबंधाखालीं 'फार उत्तम' (Very good) असा शेरा प्रोफेसरानें दिला आहे. त्यांचे निबंध मोठाले आहेत. 'व्यवहारांत सौंदर्याला किती प्रमाणांत फांटा मिळावा' अशा अर्थाच्या एका निबंधाची लांबण पाहून प्रोफेसरानें त्याखालीं 'Too long an exercise in composition' अशी सूचना लिहिली आहे. दरमहा एकदोन निबंध लिहावयाचे असले म्हणजे त्यांत विविधता ठेवणें भागच आहे. या वहींत नाना विषयांवर निबंध आहेत. कांहीं तात्विक विवेचनाचे असून कांहीं केवळ वृत्तांतपर आहेत. एका निबंधांत दुष्यंत-शकुंतलेच्या विवाहाचा इत्थंभूत इतिहास असून त्याचा शेवट भरताच्या जन्माची हकीकत देऊन केला आहे 'दुष्यंतामागून त्याचा पुत्र भरत गादीवर आला व त्याच्या नांवावरून माझ्या देशाला भरतखंड हें नांव प्राप्त झालें' अशी देशाभिमानाची किंचित् छटा

दाखविणारें वाक्य आहे. गोल्ड स्मिथच्या 'व्हिकार ऑफ वेकफील्ड' या कादंबरीला सदर वहींत नाटकाचा पोषाख चढवून सजविलें आहे. 'बंदुकीची दारू व मुद्रणकला यांची तुलना' अशा नांवाचा एक निबंध आहे. त्याखालीं लांबच लांब वाक्यें व दांडगाईचीं विधानें असा शेरा पहावयास सांपडतो. या वहींत एकंदर दहा निबंध आहेत.

या लांबलेल्या प्रकरणाची परिसमाप्ति माधवरावांच्याच शब्दांनीं केल्यास उचित होईल. बार्शीचे एक वकील रा. गोविंद कृष्ण टिळक यांनीं १८९३ सालीं माधवरावांस एक पत्र पाठविलें व त्यांच्या विद्यार्जनासंबंधीं अनेक प्रकारची माहिती विचारली. माधवरावांनीं त्यास समक्ष बोलावून पुढील माहिती सांगितली:-

शास्त्र, तत्वज्ञान, इतिहास, काव्य वगैरे अनेक विषयांवरील ग्रंथ मी वाचीत असतों. परंतु त्यांत विशेषेंकरून इतिहास व अर्थशास्त्र या विषयांकडे माझा ओढा असल्यामुळें त्या संबंधाचे बहुतेक ग्रंथ माझ्या पहाण्यांत आले आहेत. x x x शेक्सपीयरचीं नाटकें व वालटर स्काटच्या कादंबऱ्या मी वाचल्या आहेत. x x x कोणताही ग्रंथ वाचला, म्हणजे त्याचा सारांश, तो ग्रंथ बाजूस ठेवून मी लिहून काढतो व ह्याप्रमाणें मला सारांश लिहितां आला म्हणजे त्या ग्रंथाचें हृद्गत मला कळलें असें मी समजतों. माझ्या ज्ञानाबद्दल लोकांस नवल वाटण्याचें कारण नाहीं. कारण ज्ञान संपादन करण्यास मला जितकी अनुकूल स्थिति होती तितकी दुसऱ्यास क्वचितच असेल. सर आलेक्झांडर ग्रँट माझे गुरु होते व विद्यार्जनांत मला त्यांची फारच मदत झाली. विद्यार्थी, फेलो व प्रोफेसर म्हणून एकंदर दहा बारा वर्षें मला कालेजांत घालविण्यास सांपडलीं व त्याच काळांत मला कालेजांतील लायब्ररीचा बराच उपयोग करून घेतां आला. माझ्यावेळचे विद्यार्थी कालेजांत मिळणाऱ्या सुटीचा काळ फुकट घालवीत नसत. सुट्टींत कांहींतरी विषय नेमून घेऊन त्यावर आम्ही परिश्रम करीत असूं.

# प्रकरण तिसरें.

## अध्यापन.

साधारण मानानें असें सांगतां येतें कीं, माधवराव १८६१ साला-पासून फेलो म्हणून विद्यार्जनाच्या जोडीनें विद्यादान करूं लागले. १८६१सालीं त्यांची फेलो या नात्यानें कॉलेजांत नेमणूक झाली. परंतु त्या वर्षीच्या कामाचा अहवाल हातीं न आल्यामुळें त्याविषयीं कांहींच तपशील देतां येत नाहीं. १८६२ सालापासून त्यांचे पुढील अहवाल उपलब्ध आहेत. त्यावरून त्यांनीं खालच्या वर्गांना इतिहास भूगोल, गणित, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, निबंधलेखन, इंग्रजी कविता, वगैरे विषय शिकविल्याचें दिसून येतें. गणित, इंग्रजी कविता इत्यादि विषयांत त्यांना आपलें ज्ञान व्यक्त करण्याला सवड नव्हती. मॅट्रिक-सारख्या अगदीं कनिष्ठ प्रतीच्या वर्गांना निबंधलेखन शिकवावयाचें काम त्यांच्याकडे असल्यानें त्यांत विशेष चमत्कार वाटण्याजोगी करामत निदर्शनास येत नाहीं. चुकीचीं वाक्यें दुरुस्त करावयाला सांगणें, किंवा गद्य उताऱ्यांचें छंदोबद्ध रूपांतर करावयास लावणें, असा त्यांचा या विषयांतला क्रम होता. तर्कशास्त्र शिकवितांना त्यांनीं व्हेटलेच्या पुस्तकाचा उपयोग केला पण जे भाग त्या पुस्तकावरून समजण्यासारखे

नव्हतें त्या भागांचें रहस्य गळीं उतरण्याकरितां ते मिल, टाम्सन वगैरे मोठमोठ्या पंडितांनीं रचलेल्या पुस्तकांतले उतारे वाचून दाखवीत असत. एक वर्षी हावर्डसाहेबांनीं माधवरावांकडे भूगोलांत विद्यार्थ्यांची प्रगति होण्याकरितां विशेष प्रकारची कामगिरी सोंपविली होती. नकाशे काढतां आल्याखेरीज नद्या, शहरें, डोंगर यांची नामावळी तोंडपाठ करूनही भूगोलाचें महत्व आणि मर्म विद्यार्थ्यांना समजत नाहीं, असें जाणून हावर्डसाहेबांनीं नकाशांच्या रूपरेषांचे तक्ते तयार करण्याची कल्पना काढली. सदर रूपरेषांच्या पोटांत शहरें, नद्या, डोंगर वगैरे भौगोलिक परिस्थिति कशी दाखवावयाची याबद्दलच्या सूचना लिहिण्याचें काम हावर्ड साहेबांनीं माधवरावांना सांगितलें. माधवरावांना हें काम नवीनच होतें. परंतु काम नवीन आहे अगर कठीण आहे म्हणून त्याला सादर न होण्याची वृत्ति माधवरावांत नव्हती. त्यांनीं तें काम पत्करलें. सुट्टींत त्यासंबंधानें तयारी करावयाची असा त्यांनीं विचार केला होता व त्याच सुमारास हावर्डसाहेबांचें विलायतेस प्रयाण झालें नसतें, तर तें काम माधवरावांच्या हातून शेवटास गेल्याचें पहाण्याचा योग आला असता. हावर्डसाहेबांनीं हिंदुस्थान सोडल्यामुळें तें काम झालें नाहीं, तथापि माधवरावांनीं भूगोल शिकवितांना पुढें एकदां जी पद्धत स्वीकारली ती आजदेखील शिक्षणविषयांत लक्ष घालणारांना ग्राह्य वाटेल. प्रथम त्यांनीं सर्व भूगोलाचें सामान्य ज्ञान विद्यार्थ्यांना करून दिलें. नंतर ऐतिहासिक पूर्वापर अनुक्रमानें वेगवेगळाले देश घेऊन त्याविषयीं भौगोलिक माहिती विद्यार्थ्यांच्या कानावर घातली. भूगोलाचा व इतिहासाचा अतिनिकट संबंध आहे. मानवी पराक्रमानें भूपृष्ठाच्या मूळ स्वरूपांत सारखे बदल होत असतात. सृष्टीच्या बाह्य

रचनेंत मनुष्यसमाज आपल्या सोयीगैरसोयींच्या अनुरोधानें सतत फेरफार करीत असतो. सृष्टीच्या पोटांतली खनिज संपत्ति शोधून तिच्या जोरावर तो हजारो वर्षें ओसाड व माणसाच्या वस्तीला नालायक समजल्या जाणाऱ्या प्रदेशांतून गजबजलेलीं शहरें वसवितो. समुद्राच्या नैसर्गिक मर्यादा बदलणें, नद्यांचे ओघ शेतीसाठीं अडविणें, दुर्गम मानल्या जाणाऱ्या पर्वतांतून वाटा पाडणें, वगैरे कामें मनुष्याच्या हातून नित्य घडत असल्यानें मानवसमाजाच्या इतिहासानुसार भूगोलाचीं बाह्य दृश्यें निरंतर पालटत आहेत. एखादें राष्ट्र उदयास आलें किंवा अस्तास गेलें कीं, त्याचा भूगोल वेगळें स्वरूप धारण करतो. माधवरावांनीं ही गोष्ट लक्षांत घेऊन इतिहासाच्या साह्यानें भूगोलाची विद्या आपल्या छात्रांस पढविली. पण त्यांतही त्यांनीं आणखी एका युक्तीचा अवलंब केला होता. इतिहासाची मनोरंजकता व बोधप्रदता राष्ट्रांतल्या पराक्रमी व्यक्तींच्या चरित्रांत साठविलेली असते, हें तत्त्व माधवरावांच्या हृदयांत पूर्णपणें ठसलेलें होतें. एखादा कर्तृत्वशाली पुरुष राष्ट्रांत निपजतो व सगळ्या समाजाच्या व्यवहाराला नवें वळण लावतो, हा सिद्धांत ध्यानांत आणून माधवरावांनीं अशा युगप्रवर्तक पुरुषांचीं चरित्रें सांगून त्या त्या राष्ट्रांच्या भूगोलाचा विषय रंगविला. यामुळें विद्यार्थीवर्गाचा दुहेरी फायदा झाला, हें निराळें सांगण्याची गरज नाहीं. माधवरावांना ज्यांनीं पाहिलें नाहीं, अशांनीं माधवरावांची ही भूगोल शिकविण्याची पद्धति कल्पनेच्या बळावर अंतश्चक्षूंसमोर उभी केल्यास आजदेखील ती मनोरम भासल्याशिवाय रहाणार नाहीं.

इतिहास आणि अर्थशास्त्र हे माधवरावांचे अत्यंत आवडते विषय. त्या विषयांचें सांगोपांग आकलन होण्याकरितां त्यांनीं अपार

परिश्रम केलेले, अर्थात् ते विषय शिकवितांना त्यांची बुद्धिमत्ता व विद्वत्ता पूर्णपणें विकसित होत असे आणि तिच्या वैभवानें विद्यार्थ्यांच्या वृत्ति स्तिमित होऊन जात, अशाबद्दल अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. त्या आख्यायिकांच्या खरेपणाबद्दल त्यांच्या रिपोर्टांतून पुष्कळ पुरावा आढळतो. विद्यार्थ्यांना या विषयांची गोडी लागावी म्हणून त्यांनीं योजलेले उपाय देखील त्यांच्या प्रतिभेचें द्योतक आहेत. त्यांच्या काळांत विद्यार्थ्यांना ग्रीस, रोम, इंग्लंड व हिंदुस्थान या चार देशाचे इतिहास शिकावे लागत होते. ग्रीस व रोमचा इतिहास इराण व इजित या देशांच्या इतिहासाशीं क्रियाप्रतिक्रियेच्या रूपानें संबद्ध आहे. इराणच्या इतिहासामागें जवळच बाबिलोनियाचा इतिहास आढळतो. माधवरावांनीं या देशांच्या इतिहासाचें अध्ययन विद्यार्थ्यांकडून करविलें. रोम, इंग्लंड, हिंदुस्थान यांच्या इतिहासाबद्दल त्यांनीं स्वतंत्र परिश्रम केले. त्यांच्या खाजगी वाचनक्रमांत हिंदुस्थानासंबंधीं ऐतिहासिक ग्रंथांचा समावेश नव्हता. अध्यापनाच्या तयारीकरितां त्यांनीं मिल, एल्फिन्स्टन, फेरिस्ताचें भाषांतर, इत्यादि ग्रंथ समग्र वाचून टाकले. एकदांच वाचून टाकले असें नव्हे, तर पुनः पुनः त्यांचीं पारायणें केलीं. ब्रिटिशांच्या आमदानीचा इतिहास समजण्यासाठीं प्रथम मरे, टेलर यांचीं संक्षिप्त पुस्तकें व नंतर मॅक्फार्लेन, थार्नटन यांनीं लिहिलेलीं पुस्तकें नजरेखालीं घातलीं. स्वतःच्या वाचनाचीं टिपणें वर्गांत आणावयाचीं आणि त्यांवरून विषयाचें सविस्तर विवेचन करावयाचें असा त्यांचा प्रघात होता. पण एवढयावर त्यांनीं आपलें समाधान करून घेतलें नाहीं व विद्यार्थीजनाचें समाधान होऊं दिलें नाहीं. दर आठवडयाला ते एखादा ऐति-

हासिक घटनेवर विद्यार्थ्यांना निबंध लिहावयास सांगत. मुसलमानी आमदानीपासून झालेलें नफानुकसान, एखादी गुंतागुतीची मोहीम, एखाद्या ऐतिहासिक पुरुषाचें चरित्र, हिंदुस्थानांत आढळणाऱ्या शेतसाऱ्याच्या विविध पद्धति, इत्यादि विषय निबंधासाठीं नेमून त्याबद्दल आपल्या ज्ञानाचें सगळें भांडार माधवराव व्याख्यानाच्या रूपानें विद्यार्थीवर्गाच्या स्वाधीन करीत. कधीं कधीं विद्यार्थ्यांना ऐतिहासिक घडामोडींच्या स्थळाचा नकाशा काढून आणायला सांगत. म्हैसूरची मोहीम, मराठ्यांचीं युद्धें, कार्नवालिसनें अंमलांत आणलेला कायम धाऱ्याचा बंदोबस्त, वेल्स्लीचा राज्यकारभार वगैरे प्रकरणांच्या बाबतींत विद्यार्थ्यांना प्रत्येक बारीकसारीक मुद्दा समजावा म्हणून माधवरावांनीं वर निर्देशिलेल्या पुस्तकांशिवाय विल्कीसचा म्हैसूरचा इतिहास, माल्कमचा माळव्याचा इतिहास, इत्यादि दुसऱ्या ग्रंथाचें परिशीलन केलें होतें, असा दाखला त्यांच्या अहवालांत आहे.

ग्रीसरोमचा इतिहास शिकवितांना माधवरावांनीं कॉलेजच्या वाचनालयांत सांपडले तेवढे ग्रंथ वाचले. मुलांना प्रश्न विचारतां यावेत म्हणून वर्गांत अर्नाल्ड, लिडल, स्मिथ यांच्या संक्षिप्त पुस्तकांचा उपयोग केला जात असे. परिक्षेच्या तयारीला या लहान लहान पुस्तकांचें वाचन पुरेसें होतें, पण परिक्षेची तयारी म्हणजे विषयांचें आकलन नव्हे, हा हिंदुस्थानांतला सर्वांचा सार्वत्रिक अनुभव आहे. माधवरावांनीं आपला अभ्यास ज्ञानसंग्रहबुद्धीनें केला होता. परिक्षेंतील यश हें त्यांचें ध्येय नव्हतें. गुरूचा बाणा असा असल्यावर विद्यार्थीवर्गाची दृष्टि संकुचित रहाणें शक्य नाहीं. माधवरावांची अध्यापनसरणी त्यांस सर्वदां रुचतच होती असें म्हणतां येत नाहीं, परंतु आपल्या

कर्तव्यांत व्यंग राहूं नये, ही त्यांची वृत्ति असल्यानें आपल्या ज्ञानाचा संचय, विद्यार्थ्यांसमोर मांडण्यांत त्यांनीं कधींच कुचराई होऊं दिली नाहीं. यासाठीं त्यांनीं अर्नोल्ड, मेरिव्हेल, डा. गूथीनीं केलेलें टॅसिटसचें भाषांतर, निभूर, कीटले, गिबन, मिल्मन (ख्रिस्ती धर्माची प्रारंभावस्था) वगैरे इतिहासग्रंथांचें अवगाहन केलें. हिंदुस्थानासंबंधीं ऐतिहासिक निबंधलेखनाचा जो वृत्तांत वर निवेदन केला आहे, तोच या बाबतींतही अक्षरशः लागू आहे.

१८६४ ते ६६ या तीन वर्षांत त्यांच्याकडे फ्रेंच राज्यक्रांतीचा इतिहास शिकविण्याचें काम आलें होतें. तें त्यांनीं उत्तम रीतीनें बजावलें अशी त्यांच्या एका शिष्यानें, विविधज्ञानविस्तारांत* कांहीं आठवणी देऊन, साक्ष पटविली आहे. कोणत्याही एका पुस्तकावर भिस्त ठेवून त्यांतलें विवेचन वेदवाक्यासमान मानणें हा माधवरावांचा स्वभावच नव्हता. प्रत्येक विषयाची सर्व बाजू पाहून, त्या परस्पराशीं ताडून पारखून नंतर आपलें मत बनवावयाचें अशी त्यांनीं आपल्या मनाला संवय लावली होती. थोडया वाचनाच्या अल्पसंतोषाला त्यांच्या प्रखर जिज्ञासेनें हद्दपार केलें होतें आणि शिष्यगणाच्या हृदयांतून जिज्ञासा प्रज्वलित करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. म्हणून त्यांनीं बकल, टाकेव्हील, कार्लाइल, ॲलीसन, थिअर, ला मार्टिन, मिन्येट वगैरे इतिहासकारांच्या ग्रंथांबरोबरच बर्क, स्मिथ मॅकिन्टॉश या लेखकांच्या पुस्तकांचें स्वतः अध्ययन केलें आणि त्यांचे विचार, विद्यार्थी श्रोत्यांना समजावून सांगितलें. या ग्रंथांपैकीं कांहीं ग्रंथ केवळ वृत्तांतमय असून कित्येकांत फ्रेंच राज्यक्रांतीसंबंधीं साधक बाधक तत्त्वविवेचन आहे. इतिहासाचें

* वर्ष ४५ मार्च १९१४ अंक ६ पृष्ठ ९५.

सगळें रहस्य, त्यापासून निघणाऱ्या व मार्गदर्शक होणाऱ्या सिद्धांतमय तत्त्वज्ञानांत आहे, हें ज्ञात्यांना सांगावयास नको. माधवरावांना इतिहासविषयाची निरुपम भक्ति व आसक्ति यामुळेंच जडली होती.

गिबनच्या इतिहासाचें ४४ वें प्रकरण शिकविण्याची जोखीम एक वर्षीं माधवरावांवर टाकण्यांत आली, तेव्हां हें काम त्यांनीं मोठ्या हौसेनें पत्करलें. आपण या कामाला बहुतांशीं लायक आहोंत अशी त्यांच्या मनाची खात्री होती. विद्यार्थ्यानें या प्रकरणांतला मजकूर प्रथम वाचावयाचा, तो वाचून झाल्यावर माधवरावांनीं त्यांतले ऐतिहासिक निर्देश व उपरोधात्मक वाक्यें समजून सांगावयाची, नंतर मुलांनीं घरीं वह्यांतून वर्गांत शिकलेल्या भागाचीं टांचणें स्वच्छ लिहावयाचीं अशी माधवरावांनीं रीत घालून दिली होती. विद्यार्थ्यांना माधवरावांची गिबन-संबंधी शिक्षणपद्धति इतकी आवडली कीं, त्यांनीं परिक्षेपूर्वीं पुनः उज-ळणी होण्याकरितां माधवरावाकडे विनंतीचा शब्द टाकला आणि माधव-रावांनीं तो वाया जाऊं दिला नाहीं. त्यांनीं जितके तास कॉलेजांत काम करावें म्हणून निर्बंध केला होता, त्याच्या बाहेर त्यांनीं आठवड्यां-तून बरेच वेळा या विषयाकडे खर्ची घालून विद्यार्थीवर्गाचा संतोष संपादन केला. गिबनच्या इतिहासांतील ४४ व्या प्रकरणांत रोमन राज्यांतील कायद्यांची वाढ कसकशी होत गेली याचा वृत्तांत आलेला आहे. कायद्याच्या विकासाची गति समजण्याला 'ज्यूरिस्प्रूडन्स' या विषयाचें ज्ञान आवश्यक असतें. माधवरावांकडे हें प्रकरण शिकविण्याची जबाबदारी येण्यापूर्वीं एक वर्षभर त्यांनीं ज्यूरिस्प्रूडन्सचा अभ्यास त्या विषयाच्या वर्गांत हजर राहून केला होता व म्हणूनच त्यांनीं आपण सदर प्रकरण शिकविण्याला लायक आहोत अशी स्वतःच्या मनाशीं

खूणगाठ बांधून तिचा उच्चार अहवालांत केला आहे. कायद्यांतल्या फेरफाराप्रमाणें लोकांच्या चालीरीतींत व पर्यायानें समाजविषयक समजुतींत फरक पडत जातो. रोमन समाजाच्या सामुदायिक जीवनक्रमांत वेळोवेळीं अंमलांत आलेल्या कायद्यांनीं इतकी क्रांति करून सोडली कीं, रोमन राष्ट्र उदयास आलें त्यावेळच्या व पुढच्या सामाजिक व्यवहाराचा एकमेकाशीं मुळींच मेळ राहिला नाहीं. हिंदुस्थानांतही इंग्रजांनीं केलेल्या कित्येक कायद्यांमुळें असेच फरक झालेले होते. त्यांतले कांहीं फरक तर माधवराव उपगुरूची कामगिरी बजावीत असतांना लोकांच्या ताज्या आठवणींत होते. हे मुद्दे ध्यानांत ठेवल्यास रोमन कायद्यांचा वृत्तांत मुलांना मनोरंजक कां वाटला याची निराळी चर्चा करण्याची गरज नाहीं.

माधवरावांच्या शिक्षणाबद्दल त्यांचे शिष्य त्यांच्या पश्चात् वाखाणणी करणारे निघाले, पण माधवरावांनीं जे अनुभव आपल्या अहवालांत नमूद केले आहेत, त्यावरून त्यांची पुष्कळदां विद्यार्थ्यांनीं केवळ परीक्षाभिमुख व ज्ञानालालसाशून्य प्रवृत्ति दाखवून निराशा केली, असेंच म्हणावें लागतें. एकदां तर त्यांना विद्यार्थीवर्गानें चांगलेंच तोंडघशीं पाडलें. इतिहासांत बरेच विद्यार्थी नापास झाले व त्यांना आपल्या अहवालांत त्याबद्दल कारणें सांगण्याचा प्रसंग आला. विद्यार्थीवर्गाचा हलगर्जीपणा व त्यांना अवगत नसलेल्या विषयावर विचारलेले प्रश्न अशीं नापास होण्याबद्दल दोन कारणें त्यांनीं दिलीं आहेत. माधवरावांनीं विषय खुलवून रंगविण्याकरितां खूप तयारी करावी, विद्यार्थी आपल्या तोंडून बाहेर पडणाऱ्या ज्ञानाच्या प्रवाहाचें स्वागत करण्याकरितां उत्सुक आहेत असें समजून वर्गांत विवेचन आरंभावें आणि

विद्यार्थ्यांनीं उदासीन असावें, असे प्रसंग त्यांच्या अनुभवास पुष्कळदां आले. ज्ञानापेक्षां परिक्षेची महती विद्यार्थ्यांनां अधिक वाटण्याचें मन्वंतर आजकाल नवें सुरू झालेलें नाहीं. माधवरावांच्या वेळींच या प्रवृत्तीचा प्रादुर्भाव झाल्याचें त्यांच्या रिपोर्टावरून स्पष्ट नजरेस येतें. प्रत्येक विद्यार्थ्याची सारी भिस्त लहान लहान पुस्तकांवर. परीक्षा कशी उतरेल हीच त्यांची काळजी. आपल्या ज्ञानाचा विस्तार व्हावा याची त्यांना मुळींच फिकीर नसे. माधवरावांचा सगळाच प्रकार वेगळा. परिक्षेच्या वेळेपर्यंत त्यांच्या हातांत युनिव्हर्सिटीनें नेमलेलीं पुस्तकें सहसा दिसायचीं नाहींत. इतिहास, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र यावरील मोठमोठाले ग्रंथ अगोदर वाचावयाचे, त्यांतला प्राह्यांश पचवून टाकायचा आणि शेवटीं नेमलेल्या पुस्तकांवरून नजर फिरवावयाची अशा तऱ्हेचा त्यांचा अभ्यास होता. आपली ही पद्धत उत्तम अशी त्यांची स्वानुभवपूर्वक खात्री होती, पण या पद्धतीचा अंगीकार त्यांच्या विद्यार्थ्यांपैकीं फारच थोडया विद्यार्थ्यांनीं, व तोही यथाशक्ति केला असेल. एकंदरींत त्यांना आपली तयारी व शिकवण यांचा विद्यार्थ्यांच्या चित्तावर, पालथ्या घागरीवर ओतल्या जाणाऱ्या पाण्याप्रमाणें, निष्फळ परिणाम होत आहे, असाच अनुभव आला. हिंदी इतिहास शिकवितांना एक वर्षी त्यांची विद्यार्थ्यांनीं निराशा केली. आयत्यावेळीं आपल्याला तयारी करतां येईल अशा भरंवशानें विद्यार्थी आपलीं पुस्तकें न वाचतां रोज वर्गांत येत; अशा स्थितींत त्यांना प्रश्न विचारण्याची सोयच नाहीं. प्रश्न विचारलाच तर विद्यार्थ्यांच्या मानेचें नकारसूचक आंदोलन गुरूनें खेदपूर्वक पहावयाचें, याखेरीज या प्रश्नांचा दुसरा उपयोग काय होणार ! माधवरावांना

असा अनुभव दोनदां विशेष आला. त्यांची आवृत्ति दरसाल होत होती. शेवटीं १८६५-६६ सालच्या अहवालांत त्यांनीं आपल्या मनांतले विचार ओकून टाकले:—

I was sorry to find the majority of the class were content with the manuals. I have ever found it to be true from my experience as a teacher and student that in the long run there is less waste of time and energy, more of permanent benefit and present enjoyment, in reading the largest standard authority upon a particular period of History than in reading half a dozen times the smaller manuals, invariably so dry and only for revision purposes.

इतिहासाचीं सर्व अंगें उपांगें विद्यार्थ्यांच्या हृदयांत ठसविण्याचा प्रयत्न माधवराव जितक्या आस्थेनें करीत, तितक्याच आस्थेनें अर्थशास्त्राचीं तत्वें समजून देण्याचा प्रयत्न करीत असत. १८६४-६५ या वर्षांत त्यांनीं अर्थशास्त्र शिकविण्याला प्रारंभ केला. तेव्हां मिल्नें लिहिलेल्या अर्थशास्त्राचें लोकांत अतिशय प्रस्थ होतें. मिल्नें प्रतिपादिलेल्या अर्थशास्त्राच्या तत्वांनीं चांगल्या चांगल्या विद्वान व चिकित्सक बुद्धीच्या गृहस्थांना भारून टाकलें होतें. माधवरावांचें मिल्च्या प्रतिपादनाविषयीं फारसें अनुकूल मत नव्हतें व याला कारण त्यांचें अर्थशास्त्रासंबंधीं अफाट वाचन हेंच होय. अर्थशास्त्राचीं तत्वें कसकशीं उत्पन्न झालीं, तीं कोणत्या देशांत उत्पन्न झालीं, त्यावेळीं त्या देशांत कोणत्या सांपत्तिक उलाढाली चालू होत्या वगैरे गोष्टींचा इतिहास त्यांनीं वाचला असल्यानें, मिलसारख्या एखाद्या शास्त्रज्ञानें—तो कितीही

जाडा आणि जगन्मान्य पंडित असला तरी–जगापुढें मांडलेले सिद्धांत सर्वांशीं आणि सर्वत्र ग्राह्य ठरणें शक्य अगर अवश्य नाहीं, आणि इष्टही नाहीं, असा त्यांचा ठाम समज झाला होता. १८७१–७२ सालीं पुण्यास व्यापारावर व्याख्यानें देऊन त्यांनी हा समज प्रत्यक्ष व्यवहारांत खरा करून दाखविण्याचा उद्योग आरंभला. अर्थशास्त्र शिकवितांना विद्यार्थ्यांच्या मनांत मिलचे सिद्धांत कायमचे रुजून त्यांच्या राष्ट्रीय संपत्तिविषयक विचारांना भलतेंच वळण लागूं नये, एतदर्थ त्यांनीं खटाटोप चालविला होता. त्यांनीं अर्थशास्त्र शिकविण्याला सुरवात केली तेव्हां मिलचें पुस्तक विद्यार्थ्यांनीं वाचलें होतें. माधवरावांनीं तावडतोब दुसरीं पुस्तकें शिकविण्यास घेतलीं. सीनियर, मॅकुलॉक, रॅमसे, माल्थस, बॅस्टिॲट या ग्रंथकारांचे विचार निवेदन केल्यावर शेवटीं तुलनात्मक पद्धतीनें परिक्षेच्यापूर्वी मिलचें पुस्तक वर्गांत वाचलें व विद्यार्थीवर्गाचा नियोजित अभ्यास पुरा करून दिला.

माधवरावांच्या अध्यापनाचा ज्या मुदतींतला वृत्तांत वर दिला आहे, त्याच काळांत त्यांची योजना परीक्षकाच्या अधिकारावर विश्वविद्यापीठानें केली. प्रथम १८६२ सालीं बी. ए. ची परीक्षा उतरल्यावर मॅट्रिकच्या मराठी विषयाचें त्यास परीक्षक नेमण्यांत आलें. पुढें ते अनेक वर्षें परीक्षकाचें काम करीत होते. मराठी भाषा हाच त्यांचा विषय होता. ज्या वर्षी ते प्रथमच परीक्षकाच्या पदावर आरूढ झाले त्या वर्षीच्या अहवालांत त्यांनीं आपल्या कामाचा वृत्तांत सांगून टाकला आहे. जें काम पत्करलें अगर अंगावर पडलें त्यांत कसून मन घालावयाचें ही जी त्यांची वृत्ति ती या कामांतही उत्तम प्रकारें दिसून येते. ते म्हणतात:—

परीक्षक या नात्यानें स्वीकारलेली जबाबदारी सिद्धीस नेण्याकरितां मी ज्ञानेश्वरीचे सहा अध्याय वाचले, नवनीताच्या कित्येक भागांचीं पारायणें केलीं आणि मोरोपंताच्या पुष्कळशा कवितांचें परिशीलन केलें. प्रश्न काढण्याचें काम मी करावें असें ठरल्यामुळें नेमलेल्या अभ्यासक्रमाची खडान्‌खडा माहिती करून घेण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. या कामांत फेब्रुवारी व मार्च (१८६४) या दोन महिन्यांतला फुरसतीचा बहुतेक वेळ खर्च झाला.

माधवरावांनीं स्वतःच्या परिक्षेंत मराठी हीच भाषा संस्कृताऐवजीं घेतली होती. दुसऱ्यांची परीक्षा करतांना तोच विषय त्यांजकडे आला आणि कर्मधर्मसंयोगानें कॉलेजांतून पूर्ण पदवीधर होऊन बाहेर पडण्याच्या सुमारास त्यांची ओरिएंटल ट्रान्स्लेटरच्या जागीं नेमणूक झाल्यानें मराठी भाषेचा त्यांचा व्यासंग दृढतर झाला. ओरिएंटल ट्रान्स्लेटर म्हणून त्यांनीं अल्पकाळ बजावलेली कामगिरी पुढें निवेदन होणारच आहे. माधवरावांना मराठी भाषेची कितपत माहिती आहे, असा एक अपवाद केवळ चुरचुरीत व महन्निंदाप्रचुर लेखनाच्या जोरावर महाराष्ट्रास झुलविणाऱ्या एका लेखकानें कालांतरानें (माधवरावांच्या हयातींतच) उत्पन्न केला व त्या अपवादाचा ध्वनि अजूनही कोठेंकोठें मधून मधून निघत असतो. सदर लेखकानें माधवरावांच्या बाबतींत दाखविलेली लघुमनस्कता पुढें या वृत्तांतांत येणार असल्यानें तिच्यासाठीं येथें व्यर्थ कालक्षेप करण्याची आवश्यकता नाहीं. या स्थळीं एवढेंच सांगणें अवश्य व पुरें आहे कीं, माधवरावांनीं परीक्षकाचा अधिकार संभाळण्याकरितां मोरोपंत, वामन, मुक्तेश्वर, महिपती इत्यादि मराठी कवींच्या ग्रंथांचा उत्तम अभ्यास केला होता.

येथवर माधवरावांच्या अध्यापनाचा इतिहास झाला. हा इतिहास फक्त पांच वर्षांचा आहे. १८६६ सालाच्या उत्तरार्धांत त्यांनीं ओरिएं-

टल ट्रान्स्लेटरचें काम पाहण्यास प्रारंभ केला. हें काम करीत असतानांच त्यांना मुंबई सोडून अक्कलकोट व कोल्हापूर येथें अनुक्रमें कारभारी व न्यायाधीश या अधिकारावर जावें लागलें, १८६८ मध्यें त्यांची प्रोफेसरच्या जागीं पक्की व कायमची नेमणूक झाली. त्या जागेवर रुजू होण्याकरितां ते कोल्हापुराहून मुंबईस आले तेव्हां शिष्यांनीं सहाध्यायी मित्रांनीं व सहकारी प्रोफेसरांनीं वर्गणी गोळा करून सोन्याच्या घड्याळाच्या देणगीनिशं त्यांचें मोठ्या थाटानें स्वागत केलें. पण या जागेवर सतत राहून अखंड विद्यादान माधवरावांनीं पुण्यास जाईपर्यंत केव्हांही केलें नाहीं. पुढील दोन अडीच वर्षें, कधीं स्मॉलकॉज कोर्टाचे जज्ज, कधीं पोलिस मॅजिस्ट्रेट तर कधीं हायकोर्टाचे डेप्युटी अगर असिस्टंट रजिस्ट्रार याप्रमाणें न्यायखात्यांत गेली. या नेमणुका हंगामी होत्या. न्यायखात्यांतल्या नेमणुकीची मुदत संपली कीं, पुढें तशीच नेमणूक होईपर्यंत ते आपल्या प्रोफेसरीच्या जागेवर स्थिर असत. अखेरीस १८७१ सालीं ॲडव्होकेटची परीक्षा उतरल्यावर पुण्यास न्यायखात्यामध्यें त्यांची कायमची नेमणूक होऊन त्यांच्या चरित्रांतल्या महत्वाच्या प्रकरणाला प्रारंभ झाला. विद्यादान कीं न्यायदान हा प्रश्न ते पुण्याला गेल्यावर सुटला. न्यायदेवतेनें त्यांना अखेरीस आपल्या गोटांत ओढून नेलें. न्यायासन हें विद्यामंदिरांतल्या आचार्यपीठापेक्षां लोकव्यवहारांत उंच समजलें जात असल्यामुळें माधवरावांनीं त्या उन्नत शुभासनावरून सगळ्या भारतवर्षाला उद्धाराचा मार्ग आक्रमण करण्याची विद्या शिकविण्याचें कठिण कार्य शिरावर घेतलें.

विद्यार्थीदशेंत माणसाला गुरुजनांच्या आज्ञेंत रहावें लागतें, त्यामुळें त्या दशेंत त्याच्या अंगीं दिसून येणारी आज्ञाधारकता, नम्रता मुळां

तलीच असल असा भरंवसा धरतां येत नाहीं. ती दशा संपून मनुष्य अधिकारारूढ झाला कीं, त्याचा खरा स्वभाव प्रकट होतो. विद्वत्तेची ख्याति व अधिकाराची प्राप्ति असे सामान्य माणसांमध्यें अहंकाराचा उग्र दर्प उत्पन्न करणारे परिस्थितीचे दोन घटक माधवरावांच्या सेवेस सादर झाल्यावरही त्यांच्या विनयप्रधान स्वभावांत लवमात्र अंतर पडलें नाहीं. अधिकाराच्या कोंदणांत त्यांची शालीनता जास्तच खुलून दिसूं लागली व विद्यार्थी वर्गांमध्यें त्यांच्याविषयीं आदर आणि विश्वास उत्पन्न झाला. याबद्दल त्यांच्या एका शिष्यानें भक्तिपूर्वक आपला अनुभव सांगितला आहे:—

मी कॉलेजांत असतांना रानडे, वागळे, माडगांवकर व पंडित असे आमचे फेलो होते. शनिवारीं आमचें रेसिटेशन ( करिता पाठ म्हणून घेणें ) चौघांकडे असे. कांहीं चुकी झाल्यास अगर पाठ न झाल्यास, रानडे पुनः करून घेत; वारंवार असें घडल्यास, हंसून 'अरे बघ, अशानें तूं आपलें नुकसान करून घेतोस', असें म्हणावयाचें. सगळ्यांत मोठी शिक्षा ही. हे गुण तत्कालीन उपगुरूंच्या फेलोजच्या अंगीं....कमी प्रमाणानें वागत असत. साहजीकच रानड्यांकडे जाण्याची प्रवृत्ति सर्वांचें मनांत बलवत्तर असे.

सयानी नांवाच्या दुसऱ्या एका मुसलमान शिष्यानें पुढील शब्दांत आपल्या गुरूची स्तुति गाइली आहे:—

मी ज्यावर्षीं मॅट्रिकची परीक्षा दिली, त्याचवर्षीं रानडे एम्. ए. च्या परिक्षेंत उत्तीर्ण झाले व मला त्यांच्या हाताखालीं शिकण्याची संधी मिळाली. कॉलेजमध्यें सुखाचे दिवस घालवीत असतांनाच रानडे आपल्या समकालीन पिढींत सर्वांहून श्रेष्ठ आहेत व समाजाला प्रगतीच्या मार्गावर नेऊन सोडण्याकरितां परमेश्वर वेळोवेळीं ज्या महापुरुषांची योजना करतो, त्या महापुरुषांत पुढें रानड्यांची गणना होईल असा आमच्या बालबुद्धीप्रमाणें आम्हांस विश्वास, व भरंवसा वाटत असे.

# प्रकरण चवथं.

## वाङ्मयखात्यांतली नोकरी.

माधवराव विद्यासंपन्नतेच्या अत्युच्च शिखरावर आरूढ झाल्यानंतर त्यांचा लोकांत बोलबाला होऊं लागला. लोकांत त्यांचें नांव गाजण्याला दुसरीं कारणें घडलीं. परंतु सर्वांचे नेत्र दिपवून सोडणारें त्यांचें विशाल बुद्धिवैभव हें एक त्यांतलें बलवत्तर कारण आहे. अशा बुद्धिसामर्थ्याच्या व्यक्तीची सरकारलाही त्या कालांत जरूर होती. पाश्चात्य शिक्षणाचें बीजारोपण, माधवरावांसारखीं माणसें निपजण्यांत, सफल झाल्याचें पाहून त्या माणसांचा गौरव करणें सरकारचें एक प्रकारें कर्तव्य होतें. निदान त्या काळांत हें कर्तव्य ओळखणारे अंमलदार सरकारांत होते, यांत संशय नाहीं. माधवरावांपुढें वकिलीचा यशस्वी धंदा होता. त्या धंद्यांत सरसावून लोकादरास पात्र झालेली माणसें त्यांच्यासमोर मुंबई शहरांत वावरत होतीं. त्यांपैकीं कित्येकांशी त्यांचा चांगला दाट परिचय होता. महत्वाकांक्षी पदवीधर तरुणांना वकिलीच्या धंद्याचा मार्ग खुला असावा, त्यांच्या हातून या धंद्याच्या द्वारें लोकोपकाराची मोठी कामगिरी व्हावी, म्हणून हायकोर्टानें कायद्याचे पहिले पदवीधर तयार होण्याच्या सुमारास तसा बंदोबस्त केला. इंग्लडांत

कायदेपंडितांनीं स्वदेशांतील अनियंत्रित राज्यकारभाराची हकालपट्टी करून, प्रजेच्या मताचें राजकारणांत वजन व मान वाढविण्याला अतिशय साह्य केलें, ही गोष्ट माधवरावांना अवगत नसेल असेंही नाहीं, पण माधवरावांनीं कायद्याच्या लौकिक व्यवहाराकडे लक्ष दिलें नाहीं, हें मात्र खरें. १८६६ च्या उन्हाळ्यांत कँडीसाहेब रजेवर विलायतेस रवाना होतांच त्यांचा मराठी ट्रॅन्स्लेटराचा हुद्दा सरकारानें माधवरावांना दिला. माधवरावांची नेमणूक या कामावर १८६६ च्या मे महिन्याच्या तेवीस तारखेस होऊन ते ६ जून १८६६ रोजीं त्या जागेवर रुजू झाले व आपलें काम पाहूं लागले. याचवेळीं दक्षिणा प्राइझ कमेटीवर सभासद या नात्यानें त्यांची नेमणूक करण्यांत आली. ते मराठी भाषेचे परीक्षक होते, ही गोष्ट पूर्वीं आलेली आहे. अशा रीतीनें एकाच वेळीं तीन प्रकारें मराठी भाषेशीं त्यांचा संबंध जडला. जुलई महिन्याच्या ७ व्या तारखेस त्यांनीं आपला सीनियर दक्षिणा फेलोशिपचा राजीनामा पाठवून दिला.

मराठी भाषेंत जें नवें वाङ्मय प्रसिद्ध होईल त्यावर सरकारास त्याच्या स्वरूपाविष्करणासह अभिप्राय कळविणें, हें मराठी ट्रॅन्स्लेटराचें काम होतें. माधवरावांच्या पूर्वीं महाराष्ट्रांतील नाणावलेल्या विद्वानांची योजना त्या कामाकडे सरकारनें केली होती. पण आज, पूर्वींचे मराठी ट्रान्स्लेटर आणि माधवराव, यांच्या कामाची तारतम्यपूर्वक तुलना करण्याचीं साधनें उपलब्ध नाहींत. फक्त हें काम माधवरावांनीं कसें बजावलें हें विस्तारपूर्वक सांगणें शक्य आहे. माधवराव या कामावर फार वर्षें नव्हते. १८६६ जूनपासून १८६८ च्या एप्रिलपर्यंत म्हणजे अवघा पावणे दोन वर्षांचा काळ या कामीं त्यांच्या

वाटणीस आला होता व तेवढया मुदतींतदेखील अक्कलकोटास कारभाऱ्याचा व कोल्हापुरास न्यायाधीशाचा अधिकार त्यांस संभाळावा लागला होता. सरकाराकडे आलेलीं पुस्तकें, चोपडीं अगर हस्तलिखितें अक्कलकोटास व कोल्हापुरास त्यांच्याकडे पाठविलीं जात, व तेथें त्यांचें परीक्षण करून आपले विस्तृत अगर संक्षिप्त अभिप्रायलेख माधवराव विद्याखात्याच्या डायरेक्टराकडे धाडून देत. या अभिप्राय-लेखांचा एकटया सरकारालाच उपयोग व्हावा, असा मूळ हेतु खरा, पण माधवरावांनीं लिहिलेले कांहीं लेख चिरंतन महत्वाचे असल्यामुळें त्यांची योग्यता जाणून शाळाखात्यामार्फत प्रसिद्ध होणाऱ्या 'बँबे एजुकेशनल रेकार्ड' नांवाच्या मासिकांत ते प्रकाशित झाले आहेत. कित्येकदां अतिशय कटकटीचीं वाटण्याजोगीं कामें साहजीकच मराठी ट्रॅन्स्लेटराला करावीं लागत. ग्रीनसाहेबांच्या Idiomatic Sentences या पुस्तकाचें एका गृहस्थानें केलेलें भाषांतर माधवरावांकडे तपासण्या-करितां आलें. तें तपासतांना प्रत्येक चौथ्या वाक्याची माधवरावांना दुरुस्ती करावी लागली, असें एका अहवालांत त्यांनीं म्हटलें आहे. त्यांच्या हाताखालीं कृष्णशास्त्री राजवाडे, परशुरामतात्या गोडबोले यांच्यासारखीं तीन चार विद्वान माणसें दिलेलीं होतीं. त्यांच्यामागें कांहीं वेगळीं कामें होतीं. त्यांच्यावर देखरेख ठेवण्याचा बोजा मराठी ट्रॅन्स्लेटरावरच होता. पण अक्कलकोट व कोल्हापूर या आडबाजूच्या दूर गांवांत राहून माधवरावांनीं आपलें सर्व कर्तव्य चोख तडीस नेलें.

माधवरावांकडे आलेल्या सैरंध्री, रत्नप्रभा, हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास, सातारकर भोसल्यांचा इतिहास, केकादर्श वगैरे पुस्तकांवर त्यांनीं विस्तृत अभिप्राय दिले आहेत. लायसेन्स टॅक्स नांवाचा

व्यापाराला पायबंद घालणारा एक कर सरकारानें बसविला होता. त्याविरुद्ध लोकांत फारच खळबळ उडाली होती. एका गृहस्थानें या विषयावर मराठींत पुस्तक लिहिलें. त्याचा परामर्ष घेतांना माधवरावांनीं सरकारास कळविलें कीं, असल्या पुस्तकांबद्दल सरकारनें उदासीनता धारण करावी. हिंदुस्थानच्या संक्षिप्त इतिहासाबद्दल लिहितांना इतिहासलेखनासंबंधीं त्यांचे मननीय विचार प्रकट झाले आहेत. ते म्हणतात:—

ज्या ग्रंथकारानें इतिहासविषयावरील अधिकारी लेखकांचीं मोठमोठालीं पुस्तकें वाचलेलीं नाहींत, त्याची तद्विषयक संक्षिप्त पुस्तकें कधींच लोकप्रिय होणार नाहींत. इतिहासलेखकांसमोर गतकाळाचें स्पष्ट चित्र उभें राहिल्याशिवाय, कार्यकारणाच्या नियमान्वयें उत्पन्न झालेल्या घडामोडी कोणत्या व केवळ सहजासहजीं उत्पन्न होऊन कालपटावर आपलें स्मृतिचिन्ह न ठेवणाऱ्या क्षुद्र गोष्टी कोणत्या, याचा निवाडा त्यास करतां येणार नाहीं.

साक्रेटिसाच्या अंगचा तार्किक चौकसपणा माधवरावांच्या स्वभावांत ओतप्रोत भरला होता, असें त्यांस ओळखणाऱ्या अनेक व्यक्तींनीं लिहून किंवा बोलून ठेवलें आहे. एखाद्या गोष्टीची लोकांत निंदा अगर स्तुति होऊं लागली म्हणजे साक्रेटीस भेटणारांना निंदास्तुतीचीं कारणें उलट पक्ष स्वीकारून विचारीत सुटे. त्याच्या प्रश्नाचा मारा सुरू झाला कीं, समोरच्या माणसांची अगदीं गाळण उडत असे. माधवरावदेखील अमक्या तमक्या बड्या धेंडाचें अमूक मत आहे, म्हणून त्याचा स्वीकार कधीं करीत नसत. आपल्या विवेकाच्या कसोटीवर तें मत घासून पहावयाचें आणि योग्य प्रमाणांत कसाला लागल्यास त्याचा अंगीकार करावयाचा असें माधवरावांचें व्रत होतें. त्यांचें हें व्रत सातारकर भोसल्यांच्या इतिहासावरील अभिप्रायांत दिसून येतें. शिवाजीबद्दल माधवरावांना किती अभिमान लहानपणापासून होता, हें सांगण्याची आवश्यकता

नाहीं शिवाजीचे कित्येक प्रच्छन्न गुण प्रमाणांसह उजेडांत आणून जर त्याची कीर्ति जास्त उज्वल करून सोडण्याचें श्रेय कोणाला द्यावयाचें असेल तर ते उभ्या हिंदुस्थानांत माधवरावांशिवाय दुसऱ्याला देतां येणार नाहीं. पण सातारकर भोसल्यांच्या इतिहासांत मूळच्या लेखकानें शिवाजीविषयीं नमूद केलेले स्तुतिपर अनुकूल मत पाहून माधवरावांनीं तटस्थपणाचीं पुढील वाक्यें लिहिलीं आहेत:—

After all, it is not just to judge of men of the past times in the abstract. One must look upon men and things, in the light of contemporary history, and bearing in mind the peculiar circumstances of people who live amidst troublous times. Judged by this charitable ( or either just ) standard Shivaji was a favourable specimen of the race to which he belonged.

सैरंध्री नाटकांत नवेपणाचा अभाव होता. जुन्या संस्कृत नाटकांच्या धर्तीवर या नाटकाची रचना नाटककारानें केली होती. द्रौपदीला प्राप्त झालेली सैरंध्रीची परदास्यावस्था व त्या अवस्थेचा फायदा घेऊं पहाणाऱ्या उन्मत्त कीचकाच्या कामांधतेचें मरणांत झालेलें पर्यवसान या दोन्ही गोष्टी शोकपर्यवसायी नाटकाला पोषक आहेत. परंतु शोकपर्यवसायी नाटकाला गांभीर्याची आवश्यकता असते. सैरन्ध्रीच्या लेखकानें प्राचीन संस्कृत वळणाचें विदूषकाचें पात्र सदर नाटकांत घालून त्याच्या तोंडच्या ग्राम्य विनोदानें संविधानकाची घाण केली, असें माधवरावांनीं आपल्या अभिप्रायांत म्हटलें आहे. माधवरावांचे बालस्नेही विनायक जनार्दन कीर्तने यांनीं 'जयपाळ' व 'थोरले माधवराव' हीं नाटकें याच सुमारास लिहून मराठी नाट्यवाङ्मयाला नवीन दिशा लावण्याचा उद्योग केला

होता. माधवरावांना या नाटकांचा अतिशय अभिमान वाटत असे. एकदां इंदुप्रकाशांतून त्यांनीं नाटकांची तरदाफरी जोरानें केली होती. दुसऱ्यावेळीं मराठीच्या परीक्षापत्रांत 'जयपाळांत'ले उतारे टाकून आपला अभिमान व्यक्त केला होता. अशा नवीन पद्धतीच्या नाटकांचा जन्म झाला असतां, जुन्या वळणाचें नाटक व त्यांतला विदूषकाचा आचरट धांगडधिंगा माधवरावांना कसा रुचणार ? त्यांचे या अभिप्रायांतले विचार ऐतिहासिक दृष्टीनें महत्वाचे असल्यानें ते येथें सादर करणें प्राप्त आहे:-

The modern performers on the stage sanction this absurd practice ( of introducing Vidushak every now and then ) because the vulgar portion of the audience is much disposed to expect from them the excitement of the show or *Tamasha* and think they have a right to be frequently moved to laughter, it may be at the expense of the more serious pleasure of the tragedy.

रत्नप्रभा या कादंबरीवरील अभिप्राय फारच विस्तृत असून त्यांत मराठी कादंबरी-वाङ्मयाचा दूरवर विचार केल्याचें पहावयाला सांपडतें. या सुमारास नुकत्याच कोठें कादंबऱ्या जन्मास येऊं लागल्या होत्या. या विवक्षित कादंबरीचें कथानक विधवाविवाहाला पाठिंबा देणारें होतें. या विषयानें महाराष्ट्रांत १८६२ नंतर मोठी चळवळ उडविली होती. विधवाविवाहाच्या अनुरोधानें त्यांत युरोपियन समाजांतल्या तरुण स्त्रीपुरुषांमधील प्रेमलीलासारख्या प्रेमलीला गोंवल्या होत्या. विधवा-विवाहाचा पुरस्कार आणि स्वतंत्रपणें स्त्रीपुरुषांचें एकमेकावर जडणारें प्रेम, या दोन गोष्टीं खेरीज या कादंबरींत नवीन असें कांहीं नव्हतें. यांतल्या पहिल्या गोष्टीबद्दल माधवरावांनीं ओझरता उल्लेख

केला आहे; पण दुसऱ्या गोष्टीबद्दल त्यांनीं प्रदर्शित केलेले सविस्तर विचार आज देखील ग्राह्य ठरतील अशी खात्री आहे.

तरुण स्त्रीपुरुषांनीं परस्परांवर प्रेम करण्याला आमच्या समाजांत अवसर नाहीं. आईबापांनीं लग्न करून दिल्यानंतर त्या स्त्रीपुरुषांनीं आमरण एकमेकांच्या सहवासांत दिवस काढावयाचे, असा आमच्या समाजांतला रिवाज आहे. प्राचीन काळीं स्वयंवराचा प्रघात होता. पण त्या प्रघातानें उपवर वधूंच्या स्वतंत्र प्रेमाची जोपासना होत असे, असा निष्कर्ष काढतां येत नाहीं.कारण स्वयंवर समारंभासाठीं मुलीच्या पालकानें अगर पित्यानें लावलेला पण, आपल्या बळानें अथवा कौशल्यानें, जो कोणी जिंकील त्याच्या गळ्यांत मुलीनें, त्यांजवर प्रेम असो अगर नसो, माळ घालावयाची, असा स्वयंवरप्रसंगांतला नियम होता. संस्कृत नाटकांतून नायक राजे प्रेमानें वेडावून गेल्याचीं चित्रें कवींनीं रेखाटलीं आहेत, परंतु त्यांचीं नव्या प्रेमापूर्वीं बरींच लग्नें झालेलीं असत व बहुपत्नीकत्वांतच त्यांच्या प्रेमाचा शेवट केला जातो, हा मुद्दा लक्षांत ठेवला, तर त्यांच्या प्रेमाची मातब्बरी वाटत नाहीं.दुष्यंत, पुरूरवा, रत्नावली नाटकांतला राजा या सर्वांना बहुपत्नीकत्वाच्या हक्काच्या जोरावर आपल्या प्रेमाची परिसमाप्ति करणें भाग पडलें. कधीं कधीं प्रस्तुत नायकांच्या प्रेमाच्या शुद्ध प्रवाहांत त्यांच्या पूर्वीच्या नायकांचा मत्सर उपस्थित होऊन त्या प्रेमाची शुद्धता लयास गेल्याचें दृष्टीस पडतें. मग त्या नायकांच्या फजीतीला प्रारंभ होतो. पुष्कळदां त्यांना असत्याच्या आश्रयानें अब्रूचा बचाव करावा लागतो. मृच्छकटिकांत एका वारयोषितेच्या एकान्तिक प्रेमाचें चित्र रेखाटलें. आहे .कृष्णानें गोपकुमारीशीं केलेल्या चेष्टाही हिंदुस्थानांतल्या प्रेमविषयक लोकप्रिय ध्येयाची कल्पना आणून देतात. ब्राह्म, पैशाच, असुर वगैरे विवाहप्रकारांत गांधर्व विवाहाचा एक प्रकार आढळतो, युरोपांतल्या प्रेमविवाहालाच हिंदुस्थानांत एका काळीं गांधर्व विवाह हें नांव दिलें जात असें व त्यावरून एकदां केव्हांतरी प्रीतिविवाह हिंदु समाजांत होत असले,पाहिजेत एवढें म्हणतां येतें. पण तारुण्याच्या प्रथमावस्थेच्या उमेदींत स्त्रीपुरुषांच्या हृदयांत एकमेकांविषयीं निर्मळ आणि पवित्र अनुराग उत्पन्न होऊन, अखेरीस विवाहसंस्कारानें त्यावर कळस चढायचा,ही रीत हिंदुसमाजांत

केव्हांही प्रबळ आणि सर्वव्यापी मूर्तावस्थेस पोंचली नव्हती. अशा स्थितींत असल्या प्रेमाचा विषय रंगविणें, हिंदी लेखकांना सुकर नाहीं. तरुण स्त्रीपुरुषांची एकमेकांचा पूर्वी परिचय नसतां, प्रथमच एखाद्या चमत्कारिक प्रसंगानें विलक्षण परिस्थितींत गांठ पडलेली दाखवून, युरोपियन स्त्रीपुरुषांप्रमाणें त्यांच्या तोंडी उत्कट प्रेमाचीं भाषणें, घातल्यास आमच्या सामाजिक रीतीभातीशीं तीं विसंगत असल्यानें वाचकांना रुचणार नाहींत. युरोपियन समाजांत व आमच्या समाजांत विवाहासंबंधीं असा भेद असल्यानें युरोपियन लेखकांनीं लिहिलेल्या कादंबऱ्यांतील स्त्रीपुरुषांच्या प्रेमाचीं वर्णनें हिंदी मनावर परिणाम करीत नाहींत. यामुळें कादंबऱ्यांतून हा विषय, अतिशय सावधपणानें उपयोगांत आणला पाहिजे. नाहींतर नीतिमत्तेला धोका बसून घोटाळे माजतील.

युरोपियन कादंबऱ्यांत निसर्गाचें आणि नैसर्गिक अवस्थांचें हुबेहुब विश्वसनीय वर्णन आढळतें. मनुष्याच्या मनोरचनेंतलीं अंगोपांगें चितारण्यांतही युरोपियन कादंबरीकारांचा हातखंडा आहे. एखाद्या व्यक्तीचें स्वभावचित्र रेखाटून ते तसल्या स्वभावाच्या लोकांचा सगळा वर्ग वाचकांसमोर ठेवतात. त्यांच्या वर्णनांत अतिशयोक्ति मुळींच असत नाहीं, असें नाहीं, पण सत्याला उठाव मिळण्यापुरतेंच व चटकदारपणा येण्यापुरतेंच त्यांजकडून अतिशयोक्तीचें साह्य घेतलें जातें. आमच्याकडे या गुणाला थाराच नाहीं. अरबी भाषेंतल्या सुरस व चमत्कारिक गोष्टी किंवा तसल्या धाटणीच्या संस्कृत गोष्टी, हेंच कायतें आमचें कथात्मक वाङ्मय. त्यांची गोडी आम्हांस वंशपरंपरेनें लागलेली. राजा, राणी, प्रधान, यांच्या विषयींच्या पाणचट, पाल्हाळिक किंवा विनोदी कथांनीं आमची आजपर्यंतची कथाभिरुचि सिद्ध झालेली आहे. असल्या कथांत मन रमतें याचें कारण त्यांतले विस्मयजनक व अत्युक्तिमय चमत्कार हेंच होय. निरनिराळ्या परिस्थितींत व प्रसंगांत मानव समाजाची कोणत्या प्रकारें हालचाल सुरू असते, याचें विश्वसनीय आणि अस्सलबरहुकूम बेमालूम चित्र पहावयास सांपडावें, अशी आमच्या कथात्मक वाङ्मयाची रचना नसल्यानें या वाङ्मयाचा आस्वाद घेतांना तसल्या चित्राची अपेक्षा कोणीच धरीत नाहीं. आमच्या कथांतल्या निसर्गाच्या व मानवांच्या वर्णनांत वैचित्र्य

असत नाहीं. बागेचें किंवा व्यक्तीचें वर्णन करतांना तेच तेच दृष्टान्त व शब्द पुनःपुनः वापरण्यांत येतात. अनुराग हा एक मनुष्य हृदयांतला मधुर विकार आहे, निष्कपट वृत्तीच्या आणि आरोग्याच्या पहिल्या मंगल बहारींत परस्पराकर्षक तरुण स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं हा विकार उभयपक्षीं सारख्या प्रमाणांत उदयास येऊन व बळावत जाऊन शेवटीं पवित्रतम विवाहबंधनाच्या रूपानें त्याची परिणति झाल्याचा इतिहास ज्या वाङ्मयांत दाखविला गेला, तेंच वाङ्मय चिरंजीव झालें आहे. कारण निसर्गसिद्ध प्रकृतिधर्माचे सर्व बंधारे फोडून माणसाला उदात्त स्वरूपाचा स्वार्थत्याग करावयास लागणारा जर कोणता मनोविकार असेल तर तो हाच होय. हें कार्य पितापुत्रांतल्या विषम आणि नियंत्रित प्रीतीला देखील साधत नाहीं, पण दुर्दैवानें या विकाराच्या उत्पत्तिविकासाला हिंदू समाजांत अणुमात्र स्थळ ठेवलेलें नाहीं.*

हा माधवरावांच्या लेखाचा गोषवारा आहे. मूळच्या लेखांतल्या विचारांचा अनुक्रम यांत नाहीं पण भावार्थ मात्र यथामति दिलेला आहे. याप्रमाणें शुद्ध प्रेमाची व युरोपियनांतल्या स्त्रीपुरुषांच्या प्रेमाची महती गाऊन आमच्या इकडील कथात्मक वाङ्मयावर आणि सामाजिक रीतीभातीवर माधवरावांनीं टीकास्त्र सोडलें असलें, तरी एका ठिकाणीं त्यांनीं आमच्या समाजांतल्या गुणांचा योग्य उल्लेख केला आहे. लग्न होण्यापूर्वीं युरोपियन युवयुवतीमध्यें जें प्रेम आढळतें त्याचा आम-

---

* Pure unadulterated love between man and woman in the first pure blossoming of innocence and health, love which culminates in the still holier bond of marriage, is the exhaustless source of the charm of every literary work of enduring success, because of all the passions of human nature; love alone raises him above himself in noble sacrifices. This equal love between man and woman in their first prime has a stronger energy to influence human nature than the regulated and unequal between parent and child or any of the other family relations.

च्या समाजांत लोप आहे, तथापि हिंदुस्थानांतल्या प्रेमाचे कांहीं प्रकार तितकेसे युरोपियन समाजांत दिसत नाहींत. अविभक्त कुटुंबपद्धतीमुळें पितापुत्र, किंवा मातापुत्र, बहीणभाऊ, नातलग, मित्र, यांचे आपसांत फार प्रेम असतें. लग्न झालें कीं वेगळा संसार उभारणाऱ्या युरोपियन दंपत्याच्या कुटुंबविस्तारांत हे प्रेमाचें प्रकार उत्पन्न होऊं शकत नाहींत, असें माधवरावांनीं स्पष्ट म्हटलें आहे. माधवरावांनीं या लेखांत आपल्या सर्वांगीण विवेचनाची साक्ष पटविली आहे. शाकुंतल, विक्रमोर्वशीय, मृच्छकटिक वगैरे संस्कृत नाटकांत नायकनायिकांच्या प्रेमाचीं उदाहरणें घेऊन त्यांनीं आपल्या विचारांचें मंडन केलें आहे. शेवटीं समारोप करतांना मराठी कादंबरीकारांना त्यांनीं दिलेली इशारत प्रत्येक वाङ्मयभक्ताला त्यांच्या दूरदृष्टीचें कौतुक करावयास लावील, यांत शंका नाहीं. त्याच्या इशारतीचें सार पुढीलप्रमाणें आहे:—

हिंदी समाजांतील विशिष्ट चालीरीतीकडे सर्वथैव डोळेझांक करून युरोपियन समाजाची नक्कल वठविणाऱ्या कादंबऱ्या अगर नाटकें चिरकाल लोकप्रिय होण्याची आशा धरणें व्यर्थ आहे. अजून या विषयाची अभिरुचि उत्पन्न व्हावयाची आहे, आणि जोंवर ही अभिरुचि योग्य दिशेनें उत्पन्न झालेली नाहीं तोंवर हा प्रेमाचा अनिष्ट विषय टाळणेंच उचित ठरतें. नाहींतर प्रेमाच्या नांवाखालीं भलत्याच भयंकर व अभद्र विकाराचें लोकांत प्राबल्य माजेल. यामुळें विषयाची निवड करतांना लेखकांला संकुचित मर्यादेची अडचण भासेल हें खरें, पण सृष्टिक्रम आणि मानवी जीवित यांचा लवमात्र विपर्यास न होऊं देतां जोंपर्यंत कौशल्यपूर्ण वाङ्मयकृति हेंच लेखकांचें ध्येय असेल, तोंपर्यंत त्यानें कल्पनामय नवीन जग उत्पन्न करण्याचा मोह आवरणेंच श्रेयस्कर आहे. प्राप्त परिस्थितीचाच त्यानें उपयोग करून घेतला पाहिजे. *

* Under circumstances so peculiar, popular novels and dramas, which are so closely-fashioned after European types as to ignore he essential features of Native Society can never hope for per-

हिंदूसमाजांतील प्रत्येक जुनी चाल श्रेष्ठ व निर्दोष आहे अशी प्रतिष्ठा गाऊन लोकप्रियता संपादन करणाराला माधवरावांचा हा लेख, मनसोक्त ताशेरा झाडून त्यांजवर कुत्सित आरोप लादण्याला उत्तम प्रकारें कारणीभूत होऊं शकला असता, परंतु या लेखाकडे माधवरावांच्या निंदकांपैकीं कोणाची नजर गेल्याचा दाखला सांपडत नाहीं. सैरंध्रीवरील लेखामध्यें माधवरावांनीं विदूषकाच्या पात्रानें नाटकाच्या गंभीर आनंदाची होणारी रसहानि थोड्या कडक शब्दांनीं दाखविली आहे. एखाद्या तमासगीर लेखकाला याबद्दलदेखील विदूषकाच्या वर्तनें माधवरावांच्या विचारसरणीचे वाभाडे काढतां आले असते, पण त्या बाबतींत त्यांची कोणी हजेरी घेतल्याचें आढळत नाहीं. त्यांच्या एका लेखाला मात्र खंदा टीकाकार भेटला व त्या टीकाकारानें माधवरावांवर निकराचा हल्ला चढवून आपल्या कीर्तिमंदिरासाठीं या टीकालेखाचा आधारस्तंभ निर्माण करून ठेवला. मराठी ट्रान्स्लेटराच्या हाताखालचे एक कामगार परशुरामतात्या गोडबोले यांनीं 'केकादर्श' नांवाचें

manent success among the people. The taste which can relish them has yet to be formed, and till it is formed native authors will do well to avoid this dangerous topic, in which they never can hope to be really understood without indulging popular taste with some corrupt perversion of love's misnomer. The choice of subjects is certainly so far restricted, but in literary works of art when you mean to be true to life and nature, you cannot fashion a world of your own but must accept the present as it is and do what you can make of it; I hope I have sufficiently explained myself; so long as native society remains what it is, love-stories fashioned upon European examples are not safe water for ordinary native literary ambition.

एक पुस्तक छापलें. रीतीप्रमाणें तें माधवरावांकडे अभिप्रायार्थ आलें. माधवरावांनीं आपल्या वृत्तीस अनुसरून केकादर्शाच्या परीक्षणासाठीं तत्संबंधीं जेवढें वाङ्मय मिळालें, तेवढें वाचलें. केकादर्शांत परशुरामतात्यांनीं केकावलीचा अर्थ विशद करून सांगितला आहे. त्यापूर्वी दादोबा पांडुरंगांनीं 'यशोदापांडुरंगी' नामक व्याख्या लिहून तिच्यासह केकावलीचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें होतें. त्यांच्यामागून जर तेंच पुस्तक छापावयाचें, तर त्यांत कांहींतरी अपूर्वता असणें आवश्यक आहे, असा ग्रह मनांत आणून, माधवरावांनीं त्याचें परीक्षण केलें व त्यांस असें आढळून आलें कीं, केकादर्शांत नवीन असें कांहीं नाहीं. माधवरावांनीं या प्रसंगीं वर्तमानपत्रें व मासिकें यांतून मोरोपंताच्या काव्याविषयीं झालेली चर्चादेखील परीक्षण करतांना वाचून टाकली, आणि जितक्या जबाबदार रीतीनें आपला परीक्षणलेख लिहितां येईल, तितक्या जबाबदार रीतीनें लेख लिहिला. मराठी ट्रान्स्लेटरानें पुढें आलेल्या पुस्तकावर अभिप्राय देणें एवढेंच त्याचें काम नव्हतें. त्या पुस्तकांतल्या विषयाचें स्वरूप काय याचेंही स्पष्टीकरण करण्याची जबाबदारी त्यावर होती. हें स्पष्टीकरण करतांना माधवरावांनीं मोरोपंताच्या केकावली काव्याचें कला या दृष्टीनें स्वतःस वाटलेले गुणावगुण व त्या काव्याचे द्वारा प्रकट झालेल्या भक्तीचें स्वरूप सांगितलें आहे. प्रार्थनासमाजाचीं धर्मतत्त्वें त्यांस मान्य असल्यामुळें केकावलींत प्रकट झालेल्या भक्तीची पद्धति त्यांना गौण वाटली व तसें त्यांनीं आपलें स्पष्ट मत कागदांवर टांचून तें वरिष्ठाकडे पाठवून दिलें. पुढें त्यांचें सदर परीक्षण बांबे एज्युकेशनल रेकार्डांत दोन महिन्यांनीं (नोव्हेंबर १८६७) प्रसिद्ध झालें. हा लेख लोकांच्या वाचण्यांत आला

तेव्हां लोकांमध्यें कितपत खळबळ उडाली, हें अजमावण्याला साधन नाहीं. प्रसिद्धीनंतर कित्येक वर्षें या लेखाकडे कोणाचें लक्ष गेलें नव्हतें. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं मोरोपंताच्या कवितांचें मंडन करतांना हा लेख लोकांच्या कर्णपथावर आणून सोडला.

विष्णुशास्त्री चिपळुणकरांविषयीं येथें विशेष ऊहापोह करून जागा अडविण्याचें कारण नाहीं. महाराष्ट्रांतल्या एका राजकीय पक्षानें त्यांची आपल्या संप्रदायाच्या आदिपीठावर स्थापना केली आहे. दरसाल त्यांच्या पुण्यतिथीचा दिवस साजरा केला जाऊन, त्यांच्या कर्तबगारीच्या स्मृतीला तजेला आणण्याची खटपट होत असते. विष्णुशास्त्र्यांनीं मराठी भाषेला नवें जोरदार वळण लावून लोकांत विशिष्ट दिशेनें स्वाभिमान जागृत करण्याची कामगिरी अंशतः बजावली, याबद्दल दुमत होण्याचा संभव नाहीं. तथापि भाषेला जोरदार बनवितांना त्यांनीं लोकांच्या अभिरुचीला इष्ट व निर्दोष वळण लावलें कीं काय, याविषयीं विद्वानांत एकमत नाहीं. जोरकस भाषेचा प्रयोग करण्यासाठीं त्यांनीं प्रायः असेच विषय निवडले कीं, ज्यामध्यें प्रतिकूल टीकेशिवाय दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या विवेचनाला अवसर सापडूं नये. त्यांच्या विद्वत्तेबद्दल, व्यासंगा-बद्दल, चौकसपणाबद्दल व सत्यप्रियतेबद्दल लोकांत त्यांच्या शिष्यत्वाचा अभिमान मिरवणारांनीं पुष्कळच भ्रामक समज पिकवून ठेवले आहेत. माधवरावांच्या मताची, स्वतःच्या समजुतीप्रमाणें, रेवडी उडविण्याकरितां धाकट्या चिपळुणकरांनीं लिहिलेल्या लेखांत, विद्वत्ता, व्यासंग, चौकस-पणा अथवा सत्यप्रियता यापैकीं कोणत्याच गुणाची प्रतीति येत नाहीं. As a work of art, there is not another equal to it in the language असें माधवरावांच्या अभिप्रायांत एक वाक्य आहे. त्यासंबंधीं विष्णुशास्त्री लिहितात:—

या अभिप्रायावरून पहातां असें म्हणणें भाग येतें कीं, आमच्या नेटीव ट्रान्स्लेटरांनीं 'बृहद्दशम' व 'अष्टोत्तरशत रामायणें' यांची वार्ताही ऐकली नसावी. फार तर काय, पण नवनीतांतलें एखादें आख्यान जरी त्यांनीं उलटलें असतें, तरी वरील वाक्य एवढें 'धडाकून' लिहितांना त्यास पंचाइत पडती!

यांत मोरोपंताचे बृहद्दशम किंवा रामायण हीं काव्यें तर राहोतच, पण नवनीताचें एखादें आख्यानही माधवरावांच्या नजरेखालून गेलें नव्हतें असें शास्त्रीमजकुरांनीं ध्वनित केलें आहे. शिवाय त्यांनीं work of art या शब्दांचें 'चित्रकाव्य' असें विपर्यासमूलक भाषांतर दिलें आहे. Work of art या शब्दांचा विपर्यास केला नसतां तर बृहद्दशम व अष्टोत्तरशत रामायणें यांची आठवण देऊन माधवरावांवर टीका लिहिण्याची आवश्यकताच उरली नसती. Art म्हणजे कृत्रिमता अशी समजूत करून घेतल्यामुळेंच त्यास टीकेचा पसारा मांडतां आला. ही एकच समजूत त्यांच्या साहित्यशास्त्रविषयक ज्ञानाच्या भ्रमाचा भोपळा फोडून याच निस्सीम पोकळपणा दाखविण्यास पुरेशी आहे. या चरित्राच्या वाचकांना माधवरावांनीं नवनीत वाचलें होतें कीं नव्हतें, याचें ज्ञान झालेलें आहे. ज्या ठिकाणीं नवनीत वाचल्याचा उल्लेख आहे, तेथेंच मोरोपंतांचीं बरीचशीं काव्यें माधवरावांनीं कोणत्या निमित्तानें वाचलीं, याविषयीं मजकूर आहे. ज्या अहवालावरून ही माहिती प्रस्तुत चरित्रकाराला देतां आली, ते अहवाल कालदृष्ट्या विष्णुशास्त्र्यांना जवळचे होते, ते त्यांना सहज मिळवितां आले असते, पण सन्मान्यांच्या मताचा विध्वंस करण्याची महत्वाकांक्षा ज्याच्या हृदयांत भडकली होती, त्यानें, माधवरावांनीं मोरोपंताचें काव्य किंवा नवनीतांतलें एखादें आख्यान पाहिलें होतें कीं, नाहीं, हा प्रश्न सोडविण्याच्या भरीस कां पडावें? मग त्याला

माधवरावांवर निष्कारण आरोपिलेला 'घडाकून' लिहिण्याचा प्रयोग उलट कसा करतां आला असता? माधवरावांच्या वाचण्यांत अष्टोत्तरशत रामायणें आलीं नाहींत, ही सूचना कागदावर टाकावेगळी होतांच विष्णुशास्त्र्यांना त्यांच्या दुसऱ्या एका लेखाची आठवण झाली व मूळचें वाक्य तसेंच कायम ठेवून खालीं टिपेंत अष्टोत्तरशत रामायणावरील माधवरावांचा अभिप्राय त्यांनीं आपल्या टीकेसह नमूद केला. पण त्यांची सत्यप्रियता अशी दांडगी कीं, बाधक विधान टिपेंत घालूनही त्यांनीं मूळच्या बाष्कळ विधानाला रजा दिली नाहीं व अखेरपर्यंत या विधानाच्या भुसभुशीत पायावरच आपल्या टीकेची इमारत रचीत नेली आहे. १८६७ सालींच माधवरावांना मराठी भाषेच्या कॅटलागाला उपोद्घात रूपानें एक लेख लिहावा लागला होता.* त्यांतलें अष्टोत्तरशत रामायणासंबंधीचें वाक्य पूर्वोक्त टिपेंत शास्त्रीबोवांनीं रुजू केलें, आणि आपला प्रचंड चौकसपणा सार्थकी लावला. या लेखांत माधवरावांनीं केकावलीची एका वाक्यांत उत्तम प्रशंसा केली आहे. परंतु शास्त्रीबोवांना मोरोपंताच्या मंडनांत माधवरावांच्या प्रार्थनासमाजाची झणझणीत हजेरी घेण्याचें कार्य जास्त प्रमाणांत साधावयाचें होतें. तें त्यांनीं साधलें व डॉ. विल्सनसाहेबांच्या मतावर लिहितांना मिशनऱ्यांची खरड काढली. ज्यांना माधवरावांची समाजसुधारणा मान्य नव्हती, अशा बहुजनसमाजाला त्यांच्यावर सणसणीत फटके लगावणारा एक प्रतिस्पर्धी उदयास आलेला पाहून आनंद झाला. अशा समाजानेंच शास्त्रीबोवांना डोक्यावर चढविलें. आजदेखील कांहीं अंशीं तीच स्थिति आहे, व पुढें कांहीं काळपर्यंत असाच प्रकार राहील, यांत संशय नाहीं.

* सदर लेख श्री. रमाबाईंनीं प्रसिद्ध केलेल्या संकीर्ण लेखसंग्रहांत आहे.

परंतु दिवसानुदिवस विद्वानांचें मताधिक्य या बाबतींत माधवरावांच्या बाजूस झुकत असल्याचें सिद्ध होत चाललें आहे.

जातां जातां विष्णुशास्त्रांच्या विद्वत्तेविषयीं थोडी जास्त चर्चा करण्यास हरकत नाहीं. माधवरावांना कोणतेंही काम अर्धवट करण्याची संवय नव्हती, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें अविचार किंवा अपूर्ण विचार, त्यांच्या मनास कोणत्याही कामांत कधीं शिवला नाहीं. कित्येकांनीं त्यांना व्यापक व दीर्घ विचाराबद्दल दोष दिला आहे, पण हा दोष अविचाराइतका खचित निंद्य नाहीं. जी गोष्ट समोर येईल तिचा पिच्छा पुरवायचा, तिच्याविषयीं बित्तं माहिती मिळवायची आणि नंतर मननपूर्वक स्वतंत्र विचार करून समतोल निष्कर्ष काढावयाचा अशी त्यांच्या कामाची ख्याति होती. अशा परिश्रमशील पुरुषानें मराठी कॅटलागाची प्रस्तावना लिहितांना, जुनें मराठी काव्यवाङ्मय वाचल्यावांचून आपलीं मतें बनविलीं असतील, हें संभवत नाहीं. परंतु विष्णुशास्त्र्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून माधवरावांनीं मोरोपंत वाचला नव्हता हा समज खरा मानला व खुद्द विष्णुशास्त्र्यांचें ज्ञान पाहूं लागलें तर निराशा झाल्याखेरीज रहात नाहीं. विष्णुशास्त्र्यांचें मोरोपंताचें वाचन भरीव होतें, ही कल्पना फारशी खरी नसतांही क्षणभर खरी आहे असें धरून इतर मराठी कवि त्यांनीं कितीसे वाचले होते याचा कयास काढूं लागलें तर कटु अनुभव येतो. इंग्रजीसारख्या परभाषेच्या इतिहासावर निबंध लिहिणाऱ्या निस्सीम स्वाभिमानी गृहस्थाची स्वभाषेंतल्या ग्रंथांविषयीं अनास्था असेल व स्वभाषेच्या उत्कर्षासाठीं चंग बांधल्यानंतर कित्येक वर्षेंपर्यंत त्याचें ज्ञानेश्वरीसारख्या आद्य मराठी ग्रंथाचें वाचन, नवनीतांतल्या कांहीं अध्यायांपलीकडे गेलें नव्हतें, ही गोष्ट कोणालाच खरी

वाटणार नाहीं. त्याचप्रमाणें शेक्सपीयरच्या एका नाटकाचें भाषांतर अभिप्रायास आलें असतां, टीकाकारामध्यें मूळ ग्रंथाचें ज्ञान, सत्यप्रीति शांत स्वभाव, सहृदयता इत्यादि गुण अवश्य पाहिजेत, असा उपदेश करणाऱ्या गृहस्थानें मूळचें इंग्रजी नाटक न वाचतांच आपलें मत वाचकांना सादर केलें, असें कोणीं सांगूं लागल्यास तें आरंभीं खोडसाळपणाचें भासेल. माधवराव आणि त्यांचा एक टीकाकार यांतलें तारतम्य वाचकांना समजण्याकरितां विष्णुशास्त्र्यांच्या अगाध विद्वत्तेचा व टीकाकारास जरूर असलेल्या सूक्ष्म चौकसपणाचा असे, दोन मासले येथें दिल्यास अप्रस्तुत होणार नाहीं. 'ज्ञानेश्वरीपरिभाषा' या पुस्तकाची आपल्या वाचकांना ओळख करून देतांना विष्णुशास्त्री म्हणतात:—

आम्हांस पूर्वी नवनीताच्या पहिल्या व दुसऱ्या भागावरूनच कायती प्रस्तुत कवीची माहिती होती; पण सदरील परिभाषेच्या परीक्षार्थ मूळ ग्रंथाची कोठें कोठें जी आम्ही उगीच चांचणी पाहिली, तिजवरून त्याच्या वाणीच्या लावण्याच्या छटा आमच्या डोळ्यांत भरल्या व समग्र ग्रंथाच्या वाचनाविषयीं उत्कृष्ट इच्छा उद्भवली.

शेक्सपीयरच्या 'टेंपेस्ट' नाटकाचें भाषांतर नीळकंठ जनार्दन कीर्तने यांनीं प्रसिद्ध केलें. त्यावरील अभिप्रायांत—

प्रस्तुत नाटक मूळ इंग्रजींतून आम्ही अद्याप समग्र वाचलें नाहीं. अलीकडील प्रख्यात ग्रंथकार जो चार्लस लँब यानें शेक्सपीयरच्या ऐतिहासिक खेरीज करून बाकीच्या बहुतेक नाटकांचीं संविधानकें कथारूपानें जीं रचलीं आहेत, त्यावरून वरील नाटकाचें कथासूत्र मात्र आम्हांस माहीत होतें. तेव्हां टीकाविषयक ग्रंथ जो आम्ही प्रथम वाचला तो केवळ वरील कथासूत्राच्या अनुसंधानानें.

असा कबूलीजबाब दिला आहे. यास कोणी प्रामाणिकपणाची स्पष्टोक्ति म्हणतील, कोणी दर्पोक्ति म्हणतील, कोणी कदाचित् बेपर्वाईचें,

चिन्ह समजतील, परंतु त्याचें समर्थन कसल्याही शब्दांत केलें, तरी शास्त्रीबोवा व माधवराव यांच्यातला फरक लक्षांत आल्याशिवाय रहात नाहीं. ज्या लेखामुळें शास्त्रीबोवांनीं माधवरावांवर आग पाखडली त्या लेखांत 'मूळ ग्रंथाची मला माहिती नाहीं, किंवा त्रोटक माहिती होती, व जेवढी होती तेवढयावरच रेटून नेलें' अशा प्रकारची कर्तव्यनिष्ठेस काळोखी फासणारी लटपट माधवरावांनीं केलेली नाहीं. उलट मूल-ग्रंथाचा, शक्य तीं साधनें हस्तगत करून, सांगोपांग विचार केला, असें त्यांनीं म्हटलें आहे. व्यासगांत आणि परिपक्व समतोल विचारांत कोण कोणाहून श्रेष्ठ, हें आतां निराळें सांगण्याची गरज नाहीं.

निबंधमालेंतील टीकेची माहिती देतांना, त्यांच्या एका लेखाचा उल्लेख वर येऊन गेलेला आहे. हा लेख लिहितेवेळीं माधवरावांच्या नजरेखालून १८६४ सालापर्यंतचें सगळें मराठी वाङ्मय गेलें आणि मराठी भाषेच्या ग्रंथसंपत्तीची शोचनीय अवस्था पाहून, त्यांचें अंतःकरण विव्हल झालें. मराठी भाषेचा ज्ञानेश्वरापासून आरंभ धरला तर तिचें वयोमान इंग्रजी आमदानीच्या सुरूवातीस साडेपांचशें वर्षांच्या आंत-बाहेर भरतें. त्या नंतर इंग्रजी राजवटीची जवळजवळ पन्नास वर्षें लोटलीं तेव्हां मराठी भाषेच्या समग्र वाङ्मयाची सरकारी नोंदणी झाली. पण उण्यापुऱ्या सहाशें वर्षांच्या दीर्घ अवधींतला ग्रंथसंचय पाहूं लागल्यास, दर वर्षाला सरासरी एक पुस्तक, असा हिशोब निवतो. यांतच इंग्रजी कारकिर्दीतील मुद्रणकलेनें केलेल्या नव्या ग्रंथप्रसाराची संख्या जमेस धरावी लागते. जुनें नवें मिळून सारे ६६१ ग्रंथ, हा देखावा उद्वेग-जनक होता. माधवरावांसारख्या, देशाच्या सर्वांगीण प्रगतीचें अहर्निश चिंतन करणाऱ्या, पुरुषाला स्वभाषेचें भिकार दृश्य पाहून खेद वाटावा

यांत आश्चर्य कसलें? तथापि माधवराव मोठे आशावादी होते. घोर निराशेच्या अंधारांतून वाट काढण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंतर्दृष्टीला होतें. १८१८ पासून १८२७ पर्यंत तीन पुस्तकें प्रसिद्ध झालीं, १८२७ पासून १८३७ पर्यंत दहा पुस्तकें बाहेर पडलीं, त्यानंतरच्या दहा वर्षांत ही संख्या तिपटीवर गेली, १८४७ ते १८५७ च्या काळांत पुस्तक संख्येनें एका शेंकड्याची शींव ओलांडली आणि त्यापुढल्या आठ वर्षांत ग्रंथप्रकाशनाच्या कार्यानें साडेपांचशेंच्या घरांत उडी मारली. याप्रमाणें संख्येची अभिवृद्धि झाली. तिच्यांत भावी उत्कर्षाचे गुण आहेत, असें माधवरावांनीं ताडलें. उत्तम प्रतिभाशाली ग्रंथ निपजण्याचीं लक्षणें, वरील ग्रंथसमृद्धींत त्यांस आढळून आलीं. भविष्यकाळ महाराष्ट्र सरस्वतीचें मुख उज्वल करील असा त्यांचा पक्का ग्रह झाला, तथापि माधवरावांचा आशावाद उतावळा किंवा क्रियाशून्यतेला बळकटीं आणणारा नव्हता. यशस्विता प्रयत्नाधीन व कर्माधीन आहे, अशी त्यांची तात्त्विक विचारांच्या अवगाहनानें खात्री झाली होती. मात्र कर्म म्हणजे माणसाला दीन दास बनवून आपल्या तालावर नाचविणारें दैव असा कर्माचा अर्थ ते समजत नसत. कर्म म्हणजे स्वपराक्रम व त्यावर भावी प्रगतीची मदार आहे, अशी त्यांची समजूत असल्यानें मराठींतल्या मुद्रित ग्रंथांच्या संग्रहावरून सुचणारे विचार सादर करतांना त्यांनीं पुढील उद्गार काढले आहेत:—

अगदीं तिऱ्हाइताच्या दृष्टीनें पाहिल्यास आमचें वाङ्मय भ्रमपुष्ट व पोरकट भासल्याशिवाय रहात नाहीं. ही दशा नाहींशी करण्यासाठीं कळकळीच्या प्रयत्नामध्यें कित्येक शतकें घालवावीं लागतील. सध्यांच्या काळाकडे नजर टाकल्यास तो आशेनें ओथंबलेला दिसतो, आणि थोड्याच अवधींत प्रगल्भावस्थेस

पोंचलेल्या देशी भाषांमध्यें ही भाषा अग्रगण्यत्वाचा मान पटकावील असा निश्चित संभव आहे. *

माधवरावांनीं हें भविष्य वर्तविलें तेव्हां विष्णुशास्त्री हायस्कुलांतल्या क्रमिक पुस्तकांचा अभ्यास करीत होते. टिळक, आगरकर, महाजनी अगाशे, पंडित, गुंजीकर, खरे शास्त्री केशवसुत, इत्यादि लेखकांची कौमार्यावस्था उलटलेली नव्हती. आपटे, कोल्हटकर, खाडिलकर, राजवाडे, पांगारकर, सरदेसाई, केळकर, वगैरे लेखकांपैकी कित्येकांचा तर जन्म व्हावयाचा होता. मग गडकरी, रेंदाळकर वगैरे कवींबद्दल बोलायलाच नको. त्यांच्यासमोर कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णु परशरामशास्त्री पंडित, विश्वनाथ नारायण मंडलिक, गोविंद नारायण माडगांवकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी वगैरे मराठी लेखकांची पहिली पिढी होती. दुसऱ्या पिढींतले कांहीं लेखक त्यांच्या सहवासांत वावरत होते, पण एकट्या विनायकराव कीर्तन्यांशिवाय नांव घेण्याजोगी वाङ्मयकृति कोणीच निर्माण केली नव्हती. तथापि माधवरावांच्या भविष्यदृष्टीला मराठी भाषेच्या वैभवाचा काळ जवळच दिसला आणि खरोखरीच त्यांचा आयुर्दाय संपण्यापूर्वी त्यांचें भाकित यथार्थ होत चालल्याचें सर्वांना पहावयास सांपडलें.

मराठी ट्रॅन्स्लेटराचें काम माधवरावांना अक्कलकोट व कोल्हापूर या स्थळीं दुसरे हंगामी अधिकार वहिवाटीत असतां करावें लागलें यांची

* I hope I shall not be accused of unduly depreciating the progress that has been achieved, but there can be no mistake that to any one who looks at it from a stranger's standpoint our existing literature will appear for the most part either superstitious or childish. Many centuries of earnest effort are needed before this reproach can be washed away. The present however, is full of promise, and there is every likelihood that before long the Marathi language will be in a position to take first rank among the cultivated languages of modern India.

वाच्यता मागें झालेलीच आहे. अक्कलकोटास ते कारभारी होते. तेथल्या कारभाराचीं सूत्रें त्यांनीं १८६७च्या सप्टेंबर अखेरीस खालीं ठेविलीं व कोल्हापुरास न्यायाधीश या नात्यानें प्रयाण केलें. कोल्हापुरच्या शाळेंत शिकत असतां ज्या मुलाच्या आईला आपला मुलगा १० रुपये तरी कमावील कीं नाहीं असें त्याच्या भोळसर व एककल्ली वर्तनावरून व मट्ठ चेहेरेपट्टीवरून वाटत होतें, तोच मुलगा कोल्हापूर सोडल्यानंतर अकरा वर्षांनीं विद्यापिठाच्या सर्व टप्प्याचें आक्रमण करून विद्वत्तेच्या मानमरातबामध्यें न्यायाधीशाच्या पदाचा उपभोग घेण्याकरितां आलेला पाहून गोविंदरावांच्या सुखाला पारावार उरला नसेल; कदाचित् या सुखाच्या सागरांत पोहत असतानांच या भाग्यशाली पुत्राची जन्मदात्री माता त्याचें वैभव पहायला हयात नाहीं, हा विचार मनांत येऊन त्यांच्या डोळ्यांतून दुःखाश्रु गळले असतील; माधवरावांना व त्यांच्या सहोदर भगिनीला मातेचें स्मरण यावेळीं उत्कटतेनें झालें असेल. त्यांच्या कुटुंबांतील माणसें लक्षांत आणल्यास फक्त एकाच व्यक्तीला माधवरावांच्या ऐश्वर्यानें निर्मळ आनंदाचा उपभोग घ्यावयाला सांपडला असेल, अशी कल्पना करवते. ती व्यक्ति म्हणजे जिच्या पाणिग्रहणानंतर माधवरावांनीं कोल्हापुराहून विद्यासंपादनार्थ मुंबईचा रस्ता धरला, ती माधवरावांची प्रथम पत्नी हीच होय. जनार्दन हरि कीर्तने तेथें असते तर आपल्या दाराशीं बसून 'आह्माला इंग्रजी शिकण्याकरितां मुंबईला केव्हां धाडता' असा अदबीनें प्रश्न विचारणारा लहानगा 'महादेव' अशा प्रकारें तरुणपणींच मोठा नामांकित हुद्देदार झाल्याचें पाहिल्यावर त्यांच्या नेत्रांचें पारणें फिटलें असतें.

माधवराव कोल्हापुरास न्यायाधीश झाल्यावर त्यांच्या वडिलांना त्यांच्या न्यायवृत्तीची तीक्ष्णता अनुभवण्यास सांपडली. कोजागिरीच्या

रात्रीस त्यांबाबरोबर सोंगट्याचा डाव खेळून न्यायी स्वभावानुसार स्वतः-कडे निर्विकार चित्तानें बिनतोड घेणारा महादेव मोठेपणींसुद्धां वृत्तीनें जसाच्या तसा कायम होता. जगाच्या व्यावहारिक रहाटींत मुरून तरबेज होण्याची कला त्यानें साध्य करून घेतली नव्हती. आपल्या लेकाला इन्साफाच्या कामांत कोणाची खाजगी भीडमुर्वत खपत नाहीं, कोणी भीड घालण्याचा यत्न केल्यास त्याचें पित्त उसळतें, हें गोविंदरावांना ठाऊक नव्हतें असें नाहीं. पण बापाची भीड आणि न्यायाधिकार यांत विरोध होण्याचा कधीं काळीं प्रसंग आलाच तर आपला माधव न्यायदानाच्या कर्तव्यापुढें प्रत्यक्ष पित्याची पर्वा ठेवणार नाहीं, अशी गोविंदरावांची अटकळ झालेली नव्हती. गोविंदराव सहसा मुलाच्या वाटेस जात नसत, पुष्कळदां माधवरावांकडे घरगुती वशिल्यानें दाद लावून घेण्याकरितां आलेल्या इसमांची परभारें गोविंदरावांनीं हकालपट्टी केली होती. परंतु एकदां त्यांना दूरच्या आप्तापैकीं असें खमंग प्रतिष्ठित कुळ भेटलें कीं त्यांच्या समोर त्यांचा कांहीं केल्या इलाज चालेना. गळीं पडून या कुळानें गोविंदरावांसह माधवरावांची बसण्याची खोली गांठली. माधव-रावांनीं उत्थापनपूर्वक मोठ्या नम्रतेनें त्यांचें स्वागत केलें. गोविंदरावांनीं थोडक्यांत त्या गृहस्थाच्या कामाचा उच्चार केला व माधवरावांनीं जास्त चौकशीऐवजी मौन स्वीकारल्याचें पाहून आलेल्या कुळानें आपलें आख्यान आरंभलें. 'आतां कागदपत्र जवळ नाहींत, फुरसत असल्यास आणवतों' इतकी प्रस्तावना झाल्यावर माधवरावांनीं फुरसतीच्या सब-बीचा फायदा घेतला व त्यास मार्गस्थ केलें. नंतर गोविंदराव उठून जाऊं लागले, तेव्हां माधवरावांनीं तीर्थरूपापाशीं पुढीलप्रमाणें विनंती केली:—

सर्व कोल्हापूर आपलें आहे व जो तो येऊन आपल्या कामाबद्दल भीड घालील. असा प्रकार न झाला तर बरें. नाहीं तर आपल्यास त्रास होईल म्हणून

मला येथून दुसरीकडे बदली करून घ्यावी लागेल. कोणत्याही पक्षकाराचें काम घरीं पहावयाचें नाहीं किंवा त्याचें बोलणें खाजगी रीतीनें ऐकावयाचें नाहीं असा माझा नियम आहे, तो आपण चालवावा.*

या विनंतीचा अनादर गोविंदरावांनीं केला नाहीं. पुढें तीन चार महिने माधवराव कोल्हापुरास होते, पण वरच्या सारखा प्रसंग पुनः घडला नाहीं. १८६८ च्या मार्च महिन्यांत इंग्रजी भाषा व इतिहास या दोन विषयांचे प्रोफेसर म्हणून माधवरावांची एल्फिन्स्टन कॉलेजांत नेमणूक झाली. एप्रिलांत ते मुंबईस जाऊन आपलें काम पाहूं लागले.

माधवराव मुंबईस विद्यार्थी म्हणून प्रथम आले, तेव्हां एकटेच होते. १८६२ नंतर त्यांची निर्भेळ विद्यार्थीदशा संपली आणि फेलो या नात्यानें त्यांच्या पदरांत दरमहा १२० रुपये पडूं लागले. विद्यार्थीदशेची अखेर, मिळकतीचा प्रारंभ आणि पंचविशीच्या घरांतले वयोमान, असा योग जुळल्यावर त्यांनीं मुंबईला संसार थाटला. या अवकाशांत कोल्हापुराहून त्यांच्या जोडीनें अभ्यास करण्यासाठीं आलेल्या इतर विद्यार्थ्यांची स्थिति पालटली होती. कोणी मागें राहिले, कोणी विद्यार्जनाला फांटा देऊन निर्वाहाच्या स्वतंत्र धंद्यांत प्रवेश केला; त्यामुळें एकत्र रहाण्याचें कारण उरलें नाहीं. सारांश माधवरावांनीं संसाराचें जूं मानेवर घ्यावें अशी परिस्थिति येतांच ते त्या जबाबदारीस सादर झाले. संसाराची सुरुवात झाल्यावर माधवरावांना कोणता अनुभव आला असेल याची अस्पष्ट व अप्रत्यक्ष कल्पना त्यांच्या 'रत्नप्रभा' कादंबरीवरील अभिप्रायलेखावरून करण्यास हरकत नाहीं. माधवरावांचे

* आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी, पान १८.

वडील स्त्रीशिक्षणाचे चहाते होते. त्यांनीं द्वितीय संबंधानंतर पत्नी, सून व मुलगी या तिघांना कामापुरतें शिक्षण दिलें होतें. माधवरावांचें एक कार्य यामुळें अनायासें पार पडलें होतें. तथापि पाश्चात्य ग्रंथकारांच्या वाङ्मयांतली दंपत्यप्रेमाची व समान कर्तव्यांचीं चित्रें पाहून त्यांच्या अंतरंगांत स्वतःच्या संसारासंबंधीं जें मनोराज्य उत्पन्न झालें असेल तें प्रत्यक्षावस्थेंत अनुभवणें त्यांस शक्य नव्हतें. त्यांनीं स्वतंत्र संसार मांडला असला तरी स्वतःच्या मिळकतीनें चालणारा संसार यापेक्षां त्यांत जास्त अर्थ किंवा स्वातंत्र्याचा अंश असण्याचा संभव नव्हता. कदाचित् या परिस्थितीमुळेंच 'रत्नप्रभे'वरील अभिप्रायांत स्त्रीपुरुषांतील समानशील प्रेमाचें वर्णन त्यांच्या लेखणींतून उत्कटत्वानें आणि सविस्तर उतरलें असावें. मागें निबंधाच्या वहीचा उल्लेख आला आहे. तिच्यांतल्या एका निबंधामध्यें त्यांनीं 'हिंदू गृहस्थ वृद्ध मातेच्या चरणावर भक्तीनें लोटांगण घालतो, पण मातेचे चरण सोडून तो बाहेर आला कीं, बायकोला चोपण्यास किंवा चापण्यास प्रवृत्त होतो. या चमत्काराचें कारण काय? तर लहानपणापासून मनावर घडलेले संस्कार. Still they must not be thought of as slaves, as drudges, as the playthings of the divine and kingly man. No, let them have their rights-for remember it is their Company that makes life cheerful and even sufferable.' असा गृहणीशीं वागण्याबद्दल कळकळीच्या उमाळ्याचा मजकूर घातला आहे. संसारांतल्या सहचारिणीच्या सहवासांत माधवरावांची वागणूक, सगळ्या अडचणी विचारांत घेतल्या तरी कशी असेल, हें यावरून ध्यानांत येण्यास हरकत नाहीं.

# प्रकरण पांचवें.

## समाजसेवेचा प्रारंभ काळ.

विद्यार्थी दशेंतून पार पडल्यानंतर माधवरावांचें नांव सर्वामुखीं होण्याचें मुख्य कारण म्हणजे त्यांनीं सामाजिक सुधारणेच्या चळवळींत घेतलेला पुढाकार हें होय. मुंबईस विधवाविवाहांना उत्तेजन देणारी मंडळी स्थापन झाली, तेव्हां त्या मंडळीच्या आधारस्तंभापैकीं प्रमुख व खंबीर आधारस्तंभ माधवराव होते. पण सार्वजनिक कार्याच्या आखाडयांत प्रथम ते विधवाविवाहोत्तेजनाच्या निमित्तानेंच उतरले, असें म्हणतां येत नाहीं. सार्वजनिक कार्यांत ते १८५९ सालीं पडले. त्यांच्या विद्यालयांत आणि विद्यालयाबाहेरच्या परिस्थितींत जिकडे तिकडे लोकोद्धाराच्या चळवळींचें जाळें पसरलें होतें. आपल्या लोकांची अत्यंत निकृष्टावस्था आहे, तिच्यांतून सुटका करून घेण्याचे मार्ग न शोधल्यास हा पुरातन व अनेक भयंकर परचक्रांच्या आपत्तींतून वांचलेला देश पूर्णपणें रसातळास जाईल व मिसर बाबिलोनिया इराण वगैरे प्राचीन देशांचा धुव्वा उडून जसे ते नामशेष झाले, तशीच या देशाची स्थिति होईल,या चिंतेच्या विचारांनीं, माधवराव मुंबईस आले. त्याकाळीं, सारें वातावरण भरून गेलें होतें. प्रत्येक श्वासनिःश्वासाला या

विचारांचेच अणुरेणु सहृदय हिंदी माणसांच्या अंतरंगाला धक्के देत होते, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. देशाच्या उन्नतीसाठीं आमरण झटणारीं त्या काळांत जीं माणसें झालीं, त्यांची संख्या या विधानाची सत्यता पटवून देणारी आहे. तेव्हांच्या सर्व माणसांचीं चरित्रें उपलब्ध नाहींत, पण जुन्या वृत्तपत्रांच्या फायली चाळल्यास त्यांमध्यें अनेक व्यक्तींच्या देशोद्धारमूलक खटपटीचीं प्रमाणें आढळतात. १८१८ मध्यें पेशवाईचा सर्वनाश होऊन इंग्रजी राज्याचा अंमल सर्वत्र बसल्यावर थोडयाच अवकाशांत नव्या दिशेनें आपली अधोगतींतून मुक्तता करून घेण्यासाठीं चळवळ करणारे पुरूष उदयास आले व त्यांनीं जागजागीं आपल्या देशबांधवास परिस्थितीचें ज्ञान करून देण्याचा उद्योग चालविला.

इंग्रजी अंमलांत पेशव्यांच्या राजधानीचें महत्व जाऊन मुंबईशहराला या इलाख्याच्या राजधानीपदाचा मान साहजीकच मिळाला. राज्यसत्ता ज्या स्थळीं वास करते, त्या स्थळीं मानवी कर्तबगारीचे दुसरे घटक आपोआपच निर्माण होतात, असा सनातन अबाधित नियम आहे. मोगलांच्या दिल्लींत व पेशव्यांच्या पुणें शहरांत शास्त्री, पंडित, वैदिक, वैद्य, हकीम, व्यापारी, सराफ, कारागीर, मुत्सद्दी, योद्धे, या सर्वांचें एकत्र वास्तव्य होतें; या स्थितीच्या कारणांची मीमांसा केल्यास एकच मुख्य कारण सांगतां येईल व तें हेंच कीं, सदर शहरांतून राज्यसत्ता नांदत होती. देशी अधिराज्यें धुळीस मिळाल्यानंतर प्रजेच्या व्यवहारांतील उत्तमोत्तम प्रकारांचें केंद्रस्थान मुंबई शहर बनलें. तथापि पूर्वींचीं राज्यें आणि इंग्रजांचा राज्यकारभार यांतला फरक नेहमीं लक्षांत ठेवणें अवश्य आहे. मुसलमानी राज्याच्या पुष्कळ उलथापालथी झाल्या तरी

मुसलमानांत व त्यांच्या हिंदू प्रजेंत एका धर्माखेरीज बाकीच्या सर्व बाबतींत अगदीं खालपासून वरपर्यंत सादृश्य होतें. अरबी, इराणी किंवा अफगाणी मुसलमानांनीं बाटविलेली प्रजा मुळांत हिंदूच असल्यानें, हिंदू व मुसल्मान आचारविचारांमध्यें एकरूपच होते. शिवाय मुसल्मानांची संस्कृति हिंदू संस्कृतीहून बऱ्याच अंशीं हीन असल्यानें, हिंदूंच्या रीतरिवाजावर मुसल्मानांच्या राजकीय वरचढपणाचा विशेष परिणाम घडला नाहीं. इंग्रजांच्या अंमलाखालीं मूळच्या रीतीभाति जशाच्या तशाच रहाण्याजोगी परिस्थिति उरली नाहीं. परदेशाचे धाडसी व शूर मुसल्मान सरदार हिंदुस्थानांत राज्यासन स्थापण्याच्या भरीस पडले, तेव्हां त्यांना हिंदू राजे, जहागीरदार, इनामदार वगैरे हिंदू लोकाग्रणींचा बहुमान ठेवण्याखेरीज गत्यंतरच नव्हतें. इंग्रजांनीं अशा लोकाग्रणींचें माहात्म्य बुडवून टाकलें. इंग्रजांच्या दरबारांत जर त्यांची किंमत उरली नाहीं तर सामान्य लोक त्यांची किंमत कशी बाळगणार ! वंशपरंपरेचें बंड यामुळें नाहींसें झालें. जे जुने राजे, जहागीरदार शिल्लक उरले, त्यांच्या हातीं सत्ता राहिली नाहीं. पूर्वी ज्या अधिकारांचा त्यांनीं अनियंत्रित उपभोग घेतला, त्या अधिकारांचा इंग्रजांनीं संक्षेप करून अवशिष्ट अधिकाराभोंवती आपल्या कायद्यांचीं—इकडे तिकडे लवमात्र फाजील चलनवलन न होऊं देणारीं—कांटेरी कुंपणें उभीं केलीं. खरा राज्याधिकार इंग्रजांनीं नेमलेल्या अंमलदारांच्या मुठींत गेला. साध्या मामलेदारांच्या यःकश्चित् कारकुनांची लोकांना जी कदर वाटूं लागली तिचा सहस्रांशदेखील जहागिरदारांबद्दलच्या भावनेंत उरला नाहीं.

इंग्रजी राज्यानें हिंदी समाजाचीं पाळेंमुळें खिळखिळीं करून टाकणारा जो आघात केला, तो विद्येच्या बाबतींत. इंग्रजांनीं चोहोंकडे

शाळा स्थापन करून विद्येचा ओघ समाजाच्या अगदीं कनिष्टांतल्या कनिष्ठ थरापर्यंत पोंचविण्याची व्यवस्था केली. ब्राह्मणवर्गाच्या जातिविशिष्ट मुखांत वावरणाऱ्या प्राचीन षट्शास्त्रादि कर्णगोचर विद्येऐवजी लिहिण्यावाचण्याचें संसारोपयोगी दृष्टिगोचर ज्ञान प्रत्येकास मिळण्याची सोय झाल्यानें धर्माच्या रूढ कल्पनांविषयीं लोकांचा विश्वास उडत चालला. इंग्रजी शाळेंत ज्ञान संपादन करीत असतां इंग्रज गुरूंच्या सहवासानें विद्यार्थ्यांची दृष्टि निराळीच होत चालली. आपली सामाजिक स्थिति प्रशंसनीय नाहीं, तिच्यांत दोषांचा खातेरा हजारों वर्षांपासून सांचत आला असून यापुढें जर उजळ माथ्यानें जगावयाचें असेल व इतर राष्ट्रांच्या स्पर्धेत टिकावयाचें असेल तर समाजव्यवस्थेंतले दोष काढून टाकले पाहिजेत, अशी शिक्षितांची खात्री झाली, आणि मुंबई इलाख्यांच्या इतर जिल्ह्यांतून सामाजिक सुधारणेला सुरुवात होण्यापूर्वी मुंबईशहरांत या चळवळीला दृश्य रूप आलें. इंग्रजी शाळेंत शिकून विद्यासंपन्न झालेल्या तरुणांनीं मुंबईस मुलींची शाळा अस्तित्वांत आणून देशोन्नतीच्या कार्याचा उपक्रम केला. १८२८ त एल्फिन्स्टन गव्हर्नराचें स्मारक म्हणून निघालेल्या शाळेंतले विद्यार्थी सामाजिक विषयांवर फार चौकशीनें व कळकळीनें निबंध लिहीत असत, असें त्यांच्या इंग्रज अध्यापकांच्या ध्यानांत आलें होतें. सदर विद्यार्थ्यांनींच पुढें निबंधांत प्रदर्शित केलेल्या सुधारणेच्या विचारांना मुलींची शाळा स्थापून मूर्तावस्था आणली. माधवरावांच्या विद्यार्जनकाळीं सुधारणेच्या विचाराची प्रवृत्ति लोपलेली नव्हती. उलट फोंफावून ती नव्या नव्या कार्यक्षेत्राचें आक्रमण करीत होती. त्यांच्या प्रोफेसरांनीं आपल्या वार्षिक अहवालांतून सामाजिक विषयांवरील निबंधांत विद्यार्थी-

जनांची प्रवीणता विशेष दिसून येते, असें लिहिल्याचें चौकसांना पहावयास सांपडेल. माधवरावांना सार्वजनिक कार्यांत ओढून आणणाऱ्या संस्थांतली एक संस्था १८४८ च्या सप्टेंबरांत उत्पन्न झाली होती. त्या महिन्यांत एक दिवशीं शाळा सुटल्यावर एल्फिन्स्टन कॉलेजांतले व मराठी शाळेंतले गुरू, उपगुरू व विद्यार्थी एकत्र जमले. शाळेतल्या ज्ञानार्जनाचें उपांग आणि शाळेबाहेरच्या ज्ञानप्रसाराचें साधन, अशा दुहेरी स्वरूपांत उपयोगी पडणारी संस्था निर्माण करणें जरूरीचें आहे कीं नाहीं, हा प्रश्न या सभेंत निघाला. त्याबद्दल पुष्कळ भवती न भवती आणि वादविवाद होऊन शेवटीं असें ठरलें कीं, अशा संस्था काढावी. पुढें थोड्या दिवसांनीं संस्था निघाली. तिचे पाहिले अध्यक्ष सुप्रसिद्ध मराठी व्याकरणकार दादोबा पांडुरंग हे होते. त्यांनीं स्थापनेच्या समारंभांत भाषण केलें, त्यावेळीं लोकांची गर्दी, विद्यार्थ्यांची हौस व आस्था यांचा तुडुंब संगम पाहून संस्थेच्या शिकंदर नशिबाबद्दल हजर असलेल्या प्रत्येकाला हेवा वाटला. पण आरंभशूरत्वाचा पूर ओसरून प्रस्तुत संस्था मरणपंथास लागण्याला अवघीं दोनच वर्षें पुरलीं. दोन वर्षांत संस्थेच्या सभासदांची संख्या रोडावली व कामगिरीचा ठणठणाट दृष्टीस पडूं लागला. या स्थितींत कांहीं चांगल्या व्यक्तींनीं या संस्थेला हातीं धरलें नसतें तर तिनें पहिल्या दोन वर्षांतच राम म्हटलें असतें. मुंबईतले तत्कालीन प्रख्यात पुढारी डॉ. भाऊ दाजी लाड, रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक, गोविंद नारायण माडगांवकर वगैरे गृहस्थांनीं या संस्थेला नांवारूपास आणलें आणि माधवराव कालेजांत शिकूं लागले, तेव्हांतर ही संस्था उत्तम कार्य बजावीत होती. माधवरावांचे सहाध्यायी कीर्तने, गाडगीळ, परमा-

नंद, वागळे, कुंटे, पाठक, मोडक, इत्यादि तरुण मंडळींनीं या संस्थेच्या कारभारांत शिरकाव करून घेतला. कित्येक दिवस परमानंद या संस्थेचे चिटणीस होते. एखाद्या ज्ञानवर्धक व लोकोपयोगी विषयावर निबंध लिहून तो सभासदानें वाचावयाचा असा या संस्थेचा नियम होता. सभेचें नांवच जर उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा हें होतें, तर तिचा दुसरा उद्देश असणें शक्य नाहीं. सभेचें एक मासिक कित्येक वर्षे चाललें होतें. वाचलेल्या निबंधांची त्यांतून प्रसिद्धि केली जात असे. ज्ञानप्रसाराची संस्था, माधवराव स्वतः ज्ञानप्रिय आणि संस्थेच्या कारभारांत त्यांचे स्नेही, असा योग जमल्यावर माधवरावांना स्वस्थ कसें बसवणार? त्यांनीं १८५९ सालीं एक निबंध वाचला. 'तरुण शिकलेल्या लोकांचीं कर्तव्यें' हें त्या निबंधाचें नांव आहे. हा निबंध उपलब्ध नाहीं. माधवरावांच्या चरित्रांचीं बीजें या निबंधांतील विचारांत पाहून पुढच्या कर्तबगारींत त्यांचा विकास कसा झाला हें दाखविण्याची एक संधी यामुळें नष्ट झाली. ज्ञानप्रसारकाच्या अंकांतून या निबंधाला स्थळ मिळालें नाहीं. कदाचित् तो तुकड्या तुकड्यांनीं निरनिराळ्या नांवाखालीं प्रसिद्ध झालेला असण्याचा संभव आहे, पण हा संभव खरा किंवा खोटा हें नक्की सांगणारा मार्गदर्शक कोणी नाहीं.

१८६० सालीं या सभेपुढें माधवरावांनीं दुसरा निबंध वाचला. 'मराठी राजेरजवाडे' या विषयाचें निरूपण सदर निबंधांत आहे. हा निबंध मूळच्या नांवानें ज्ञानप्रसारकांत छापलेला नाहीं. कोणी एखाद्या बाबतींत हिंदी समाजावर टीका अगर त्यास हितावह सूचना केली तर तिच्या योग्यायोग्यतेप्रमाणें साधक किंवा बाधक समाचार घ्यावयाचा अशी माधवरावांची एक रीत होती. या रीतीचीं प्रत्यंतरें त्यांच्या पुढच्या

लेखनांत अनेक आहेत. हॉड्सन प्रॅट नांवाच्या एका इंग्रजानें हिंदुस्थानांतल्या श्रीमंत लोकांनीं शिक्षण घ्यावें, त्याकरितां त्यांनीं विलायतेस जावें, अशा अर्थाचा निबंध लिहून तो पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला. माधवरावांनीं हाच विषय घेऊन महाराष्ट्रांतल्या वतनदार श्रीमंतांची आपल्या निबंधांत कानउघाडणी केली आहे. बंगालचे जमीनदार साहेबांशीं बरोबरीनें वागतात, उत्तम शिक्षण घेतात, विद्यादानाकडे व परोपकाराकडे आपली संपत्ति वेंचतात, स्वतंत्र बाण्यानें सगळा व्यवहार करतात, त्यांच्यापैकीं कित्येकांनीं विलायतची यात्रा केली आहे; अयोध्या प्रांतांतले जमीनदारही बंगाली बांधवांचा कित्ता गिरविण्याच्या तयारींत आहेत, पंजाबांतल्या जमीनदारांना सरकार अधिक हक्क देण्याच्या नादांत आहे. महाराष्ट्रांतले वतनदार श्रीमंत मात्र आळसांत, चैनींत द्रव्याचा अपव्यय करून आयुष्याचा काळ दवडीत आहेत. ते मनानें कमकुवत बनले आहेत. इंग्रज अधिकाऱ्यांच्या कवडी मोल नोकरानें दम भरला तर त्यांची गाळण उडते व साहेबाला खूष राखण्याकरितां ते वाटेल तसा मूर्खपणा करतात. मराठ्यांतल्या बडे लोकांची वरच्यासारखी दुःस्थिति वर्णून माधवरावांनीं 'कधीं कधीं हे बडे लोक समूळ नष्ट झाल्यासहि गैर होणार नाहीं' अशी संतापोक्ति लिहून टाकली आहे. हे श्रीमंत दत्तक देतात व वंश चालवितात, पण आयत्या जिंदगीवर जाऊन बसणारे कलमी वंशचालक आपल्या नवीन कुळाचा किंवा दत्तविधानास संमति देऊन उपकार करणाऱ्या सरकारचा लौकिक वाढवीत नाहींत. सरकारनें शिक्षणाकरितां शिक्षक नेमले आहेत, परंतु उपयोग होत नाहीं. याकरितां त्यांना त्यांच्या घरून काढून मुंबईसारख्या शाळेंत शिकण्यास आणावें म्हणजे त्याचा

अभ्यास तर उत्तम होईलच, पण जगाच्या प्रगतीचा ओघ कसा चालला आहे याचें ज्ञान मिळून आपल्या कर्तव्याचें स्फुरण त्यांच्या हृदयांत उद्भवेल, असा माधवरावांनीं उपाय सुचविला आहे.

ज्ञानप्रसारक सभेच्या मासिकाचे अंक चाळल्यास माधवरावांनीं एकूण चार निबंध वाचल्याचा पत्ता लागतो. १८६१ सालांत त्यांनीं निबंध वाचल्याची नोंद नाहीं. त्या पुढच्या म्हणजे बी. ए. च्या परिक्षेच्या वर्षी अभ्यासाच्या रगाड्यापायीं त्यांना ज्ञानप्रसारक सभेंत निबंध तयार करून वाचण्याची फुरसत मिळलेली नसावी, कारण त्या वर्षाच्या अहवालांत त्यांच्या निबंधाचें नांव नाहीं. १८६३ सालीं फेब्रुवारी महिन्याच्या २७ व्या तारखेस त्यांनीं 'मराठी व बंगाली लोकांच्या भावी उत्कर्षाचीं चिन्हें व त्यांची तुलना' या नांवाचा निबंध वाचला. हा निबंध उत्तम असल्याचा शेरा सभेच्या अहवालांत आहे. प्रस्तुत निबंध 'मराठी बडेलोक' अथवा 'आमचे राजेरजवाडे' या निबंधाच्या प्रस्ताविक भागांत केलेल्या विवेचनावरून सुचला असावा. या विवेचनांत कलकत्त्यास ब्रिटिश इंडियन असोसिएशन व मुंबईस बाँबे असोसिएशन अशा दोन संस्था आहेत, पण त्यांच्या कार्यक्षमतेंत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. कलकत्त्याचा संस्था जास्त काम करते, त्याच-प्रमाणें बंगालच्या बडया लोकांत स्वजनसेवेची इच्छा प्रबळ आहे, महाराष्ट्रांतल्या बडया लोकांना व्यसनप्रचुर विलासांशिवाय दुसरा व्यवसाय करायला फावत नाहीं, अशा अर्थाचा मजकूर आहे. त्या मजकुरांतले परस्परतुलनेचे विचारच त्यांनीं वरील निबंधांत अधिक विस्तारानें मांडले असावेत असा साधारण तर्क वाचकांस निवेदन करून या निबंधाबद्दलची माहिती संपविणें भाग आहे. कारण या

निबंधाला 'ज्ञानप्रसारक' मासिकांत स्थान मिळालें नाहीं. पहिल्या निबंधाची जी गति झाली तीच त्याचीही झाली.

१८६४ सालीं त्यांनीं प्रजावृद्धीचे दुष्परिणाम या नांवाचा एक निबंध वाचला. दारिद्य आणि प्रजा यांची हिंदुस्थानांत सारखी अव्याहत वाढ होत असल्यानें अखेरीस कोणत्या उत्पाताला या देशास बळी पडावें लागेल, यासंबंधीं माधवरावांनीं कांहीं सिद्धांत या निबंधांमध्यें प्रतिपादन केले आहेत. त्यांना अतिशयोक्तीचा, नाटकी आवेशाचा कंटाळा होता. सत्यापलाप न होऊं देतां वस्तुस्थितीचें चित्र जितकें रंगवितां येईल तितकें रंगविण्याची कला त्यांस साध्य झालेली होती. नटव्या भाषेचें बेगडी वैभव लोकांसमोर मांडण्याची प्रवृत्ति त्यांना आवडत नसे. भाषेच्या नखऱ्याचा त्यांना तिरस्कार होता. ही त्यांच्या स्वभावाचीं गमकें न विसरतां त्यांच्या सदर निबंधाचें अवलोकन केल्यास स्वदेशोन्नतीच्या काळजीनें त्यावेळीं माधवरावांचें अंतःकरण अत्यंत व्यग्र झालें होतें, असें म्हणावयास हरकत नाहीं. सुरवातीलाच त्यांनीं चिंतेचे उद्गार काढले आहेत ते म्हणतातः—

मित्रहो, अलीकडील काळांत जे विषय तुम्हा आम्हां सर्वांचा मनांत घोळत आहेत, रात्रंदिवस जांचा निजध्यास लागल्यानें चैन पडत नाहीं, जे ध्यानीं मनीं स्वप्नीं आपणास अदृश्य रूपानें सदोदित भासतात, आणि जीवाचा ठायीं स्वस्थपणा आनंदास नांदूं देत नाहींत, अशा विषयांमध्यें अग्रसर आज रात्रींचा विषय मी योजला आहे.*

---

* या उताऱ्यांत चुकीचे भासणारे भाग, मुद्दाम त्यावेळचा माधवरावांच्या मराठी भाषेचा नमुना वाचकांना यथास्थित कळावा म्हणून, जसेच्या तसे ठेवले आहेत. पुढच्या मजकुरांत असे भाग सुधारून घेतले आहेत.

अशी प्रस्तावना केल्यावर त्यांनीं जगाचा प्रात व्यवहार, त्याचें नियमन व त्याविषयीं समाधान करणाऱ्या विचारांचा ऊहापोह केला आहे. जगांत सुखापेक्षां दुःख अधिक कां हा प्रश्न मनुष्यप्राणी संचित पाप, ईश्वरीकोप किंवा सृष्टिक्रम अशासारख्या मनःकल्पित निराधार कारणांकडे बोट दाखवून सोडवीत असतो. हिंदू समाजांत संचित पापाची, दुसऱ्या शब्दांनीं सांगावयाचें झाल्यास प्रारब्धाची, कल्पना बलवत्तर आहे. प्रारब्धामुळें प्रत्येक दुःख ओढवतें, त्यापुढें इलाज नाहीं, या भावनेमुळें साहसपराक्रमादि गुणांचा येथें बीमोड झाला आहे. परंतु प्रारब्धाची मीमांसा करूं लागल्यास त्याचें व्यर्थ स्तोम माजवून हिंदुस्थानांतल्या लोकांनीं आपले हातपाय निष्कारण जखडून टाकले आहेत, असें तात्पर्य स्वीकारावें लागतें. मनुष्य प्राण्यानें इहलोकांत दुःखाचा नरकवास भोगावा अशी ईश्वराची इच्छा आहे, या मुद्याच्या जोरावर दुखांचें समर्थन केलें तर निखालस अज्ञान पदरीं येतें. 'ब्रह्मगोळा'पासून तो अत्यंत क्षुद्र कृमिकीटकापर्यंत दिसणाऱ्या सृष्टीचा कारभार पाहिल्यास ज्याला त्याला सुख मिळण्याची तजवीज परमेश्वरानें निसर्गतएव लावल्याचा देखावा दृष्टीस पडतो आणि जगांतलें दुःख म्हणजे ईश्वरी कोपाचा खेळ ही कल्पना भ्रामक ठरते. सृष्टिक्रमांत दुःखाला प्राधान्य आहे असें म्हणायला जावें, तर तो मुद्दा फक्त उडवाउडवीकरितां नेमका पुढें सारला जातो, असा अनुभव येण्याला थोडेसें अवलोकन पुरें आहे, असें सांगून भिकाऱ्याच्या संततीला समाज बेधडक नावें ठेवितो, शिव्या घालतो, या गोष्टीचा दाखला माधवरावांनीं दिला आहे. एखादा भिकारी मुलाबाळांच्या नांवावर भिक्षा मागायला आला तर त्याचीं मुलें ही एक सृष्टिक्रमांतलीच बाब आहे, याचें स्मरण लोकांना

रहात नाहीं, ते चटकन् त्याचा धिक्कार करतात. या उदाहरणावरून सृष्टिक्रमाच्या मुद्द्यांतली लटपट ध्यानांत येते. याप्रमाणें प्रारब्ध, ईश्वरी कोप आणि सृष्टिक्रम याची वासलात लावून माधवरावांनीं स्वजनांच्या दुःस्थितीचा दोष आपल्या संचित मूर्खपणाच्या पदरीं बांधला आहे. पूर्वजांच्या मूर्खपणाचीं फळें वंशजांना भोगावीं लागतात, हें माधवरावांचें विधान सकृद्दर्शनीं चमत्कारिक भासतें, पण त्यांनीं दिलेल्या समर्पक उदाहरणानें तें खरें असल्याबद्दल खात्री पटते. बापाच्या बदफैलीपणाचे दुष्परिणाम मुलांना नाहक भोगण्याची पाळी येते. व्यवहारांत, बापाच्या उधळेपणानें किंवा व्यसनाधीनतेनें झालेलें कर्ज फेडण्याची जबाबदारी मुलांच्या डोक्यावर येऊन पडते, त्याचप्रमाणें सामाजिक बाबतींत पूर्वजांनीं स्वीकारलेलीं बंधनें मूर्खपणाचीं असलीं तरी मुलांच्या कर्तृत्वाला खच्ची करतात, असें तात्पर्य माधवरावांनीं सुचविलें आहे. माधवरावांची कर्माबद्दलची व्याख्या मागें एकदां आलेली आहे व पुढें एकदां तिचा खल होणार आहे. त्यांच्या धर्मविचारांचें ज्ञान होण्यास प्रस्तुत निबंधांतला उतारा विस्तृत वाटला तरी अनवश्यक खास नाहीं.

मनुष्यजातीस या पृथ्वीवरील स्थावर जंगम सर्व वस्तूंचें आधिपत्य दिलें असतां, त्याच्या पदरीं सुखाच्या शेरापेक्षां दुःखाचीं मापें जास्त कां भरतात? या गोष्टीचा उलगडा आज महान् विचारवान् पुरुष हजारो वर्षें करीत आले. कोणी पूर्वजन्मींचें संचित पापपुण्य, कोणी ईश्वरीकोप, कोणी सृष्टिक्रम, कोणी मनुष्यमात्रांचा मूर्खपणा, वगैरे अनेक कल्पना काढून जीवाचें समाधान करूं पहातात; परंतु अशा रीतीनें जीवाचें समाधान न होतां उलटें मोहांत पडून त्यास उपाय योजण्याचें सामर्थ्य रहात नाहीं. मागील जन्मींच्या संचित पापपुण्याचा अनुसंधानानें या जन्मीं सुखदुःखाची उत्पत्ति होते म्हणावें, तर अशी शंका उद्भवते कीं, एक वेळ हें कबूल केलें तथापि पूर्वजन्मीचें संचित जें

पापपुण्य, त्याचे जे भिन्न भिन्न माणसास पृथक् पृथक् वाटे प्राप्त जाहले, ते वाटतांना प्रमाण कोणच्या तऱ्हेचें घेतलें असावें? अर्थातच, जितकें या जन्मींच्या गोष्टीस मागील प्रारब्ध अवश्य आहे असें वाटतें, तितकेंच मागील जन्मांतील पापपुण्य होण्यास त्या पूर्वी एक जन्म आणखी लागतो म्हणजे जसें बी आधीं कीं झाड आधीं? या प्रश्नाचें उत्तर बी म्हणूनही होत नाहीं व झाड म्हणूनही होत नाहीं; कारण परस्पर कार्यकारणभाव किंवा जन्यजनक भाव संबध या दोहोंत वागतो. अशी या जन्मींच्या फळास मागील संचिताच्या पापपुण्यरूप वृक्षाची गरज लागत्ये, त्याप्रमाणेंच त्या पापपुण्यरूप वृक्षाच्या उत्पत्तीस असेंच आणखी 'एक जन्मरूपीं बीज लागतें, सारांश ही कडींत कडी अडकविलेली कधीं संपत नाहीं. केव्हांना केव्हां तरी ईश्वराच्या आसनास भिडावें लागतेच, तेव्हां हाच जन्म स्वत:सिद्ध सर्व समजून यांतील सुख-दु:खाची वाटणी ईश्वरी विचारें झाली आहे हें × × × किती बरें सयुक्तिक?

मी या प्रारब्धाच्या समजुतीविषयीं इतकें येथें बोललो याचें कारण, ही समजूत आपल्या लोकांच्या हाडास खिळलेली आहे व झाडास जसे रोग डसतात व नंतर त्या झाडाची कंबर मोडत्ये, त्याची पालवी व मोहोर गळून पडतो, व शेवटीं बुंधही त्याच दशेप्रत पावतें, त्याप्रमाणें ही समजूत, आपल्या लोकांच्या अंगीं जें साहस व पराक्रम आहे, त्यांस ग्रासणारी कीड आहे. इतर लोकांत म्हाताऱ्या बायका जीं रडगाणीं गात बसत नाहींत, तीं रडगाणीं आमच्या येथें महान् महान् पंडित, जनांच्या सभेंत हौसेनें गातांना आपण ऐकतो.

विषयाच्या स्पष्टीकरणार्थ एक बेट कल्पून त्यावर एकच मनुष्य-प्राण्याचें जोडपें आहे, त्यास मुलगा मुलगी अशी एकामागून एक दोन वर्षांच्या अंतरानें अपत्यें झालीं. तीं वयांत आल्यावर मुलांमुलींच्या जोडप्यापासून आणखी प्रजा वाढली, अखेरीस तें बेट माणसांनीं गज-बजून गेलें, पण जसजशी माणसांची संख्या वाढली तसतशी धान्यो-त्पत्ति करणारी जमीन कमी होत जाऊन अखेरीस खाण्याची पंचाइत पडूं लागली, मग संपत्तीची विषम वाटणी होऊन गरीब व श्रीमंत असे दोन वर्ग निर्माण झाले, या दृष्टान्तानें माधवरावांनीं प्रजावृद्धीच्या

दुष्परिणामांची उपपत्ति लावली आहे. हिंदुस्थानांत प्रजोत्पादन हें एक संसारांतलें अवश्य कर्तव्य समजलें जातें, दीर्घायुष्यामुळें एकाद्याला जर नातवाच्या मुलाचा जन्म झाल्याचें पहावयास सांपडलें तर सहस्र काशी-यात्रांच्या पुण्याईचा तो इसम मालक बनतो, अशी आमच्या समाजांतली समजूत आहे, तिचा निर्देश करून माधवरावांनीं पोटभर अन्न मिळ-ण्याची मारमार असलेल्या देशांतलें प्रजोत्पादन रोगांच्या साथी, दुष्काळ इत्यादि संकटांना कसें उपयोगी पडतें, याची माहिती दिली आहे. युद्धें, रोग आणि दुष्काळ या संकटाचें त्रिकूट मानवी जीवांचा संहार उडवून पृथ्वीवरील माणसांच्या वस्तीला पातळी आणतात, नाहींतर यापूर्वीच सगळी पृथ्वी माणसांनीं व्यापून टाकली असती. स्वदेशांत पोट भरे-नासें झाल्यामुळें स्वतंत्र राष्ट्रांतले साहसी पुरूष देशांतरास जाऊन वसाहती स्थापन करतात, हिंदुस्थानाला वसाहतींचा लाभ घेणें शक्य नाहीं, याकरितां विभक्त कुटुंबपद्धति व बालविवाह वगैरे अनिष्ट चालींचें उन्मूलन, अशा समाजसुधारणेच्या उपायांची कांस धरण्याकडे माधव-रावांच्या विवेचनाचा ओघ प्रस्तुत निबंधांत धावला आहे.

ज्ञानप्रसारक सभेची स्थापना हा इंग्रजी राज्यानें सुरू केलेल्या नव्या मन्वंतराचा एकच परिणाम झालेला नव्हता. त्या राज्यामुळें हिंदी समाजाला घुसळून टाकणारीं अनेक सामर्थ्यें उद्भवलीं होतीं व त्यांचा बराच सविस्तर इतिहास सांगितल्याशिवाय माधवराव प्रथम समाजसुधारक या नात्यानेंच लोकांच्या डोळ्यावर कां आले, याचा बोध वाचकांस होणार नाहीं. त्यांच्या सभोंवती ज्या सामाजिक घडामोडी चालल्या होत्या, त्यांनींच माधवरावांस समाज-सुधारणेचा मार्ग दाखविला. इंग्रजी शिक्षण हें समाजसुधारणेचें मुख्य

कारण गणलें जातें. त्याच्या जोडीनें दुसऱ्या कांहीं शक्ति समाजसुधारणेचा गाडा जोरानें पुढें ढकलीत होत्या. कायदा ही एक त्यांतली शक्ति असून न्यायमंदिरांतून सुटणारीं फर्मानें ही दुसरी प्रबळ शक्ति हिंदुस्थानच्या सामाजिक सुधारणेच्या कार्याला इंग्रजी राज्यांत चालना देत होती. १७९१ सालापासून हिंदू व मुसलमान या दोन्ही धर्मांना मान्य असलेलीं पण माणुसकीला काळोखी फांसणारीं तत्त्वें संपुष्टांत आणण्याचा प्रघात इंग्रज राज्यकर्त्यांनीं सुरू केला. त्यानंतर इंग्रजी राज्यकर्तृत्वाचा प्रसार सर्वत्र होऊन जेव्हां त्याचा प्रभाव हिंदी राष्ट्राच्या कोन्याकोपऱ्यांपर्यंत पोंचविणारे दिवस आले, तेव्हां तर हिंदू समाजाच्या चालीरीतींत क्रांति करून सोडणारे अनेक कायदे इंग्रज राज्यकर्त्यांनीं अमलांत आणले. माधवराव जन्मास आले त्या सुमारास हिंदूंचीं पुष्कळ धर्मसंमत घोरकृत्यें स्मृतिशेष होऊन बसलीं होतीं. १८२९ मध्यें सतीची चाल बंद करण्यांत आली. १८३२त धर्मांतर करणारांना पूर्वधर्मांतल्या आप्तस्वकीयांच्या इस्टेटीचा हिस्सा मिळण्याचा कायदा झाला. जगन्नाथपुरीच्या यात्रेच्या वेळीं यात्रेकरूंवर तीर्थोपाध्याय अनन्वित जुलूम करीत असतात, शिवाय जगन्नाथाच्या संस्थानाची अतिशय अव्यवस्था आहे, असें अनुभवास आल्यामुळें हा जुलूम व अव्यवस्थितपणा पिटाळून लावणारा एक कायदा १८४० सालीं अंमलांत आला. माधवराव जन्मास आल्यानंतर एकाच वर्षानीं हिंदुस्थानांतून गुलामांचा व्यापार आणि व्यवहार इंग्रजांनीं नामशेष करून टाकला. १८४० पासून १८६० पर्यंतच्या वीस वर्षांत तर हिंदू समाजरचनेंमध्यें हजारों वर्षांच्या परंपरेनें दृढत्व पावलेलीं व समाजाच्या नैतिक आरोग्याचा फन्ना उडविणारीं कितीतरी बांडगुळें इंग्रज राज्यकर्त्यांनीं छाटून

काढलीं. १८५० मध्यें धर्मांतर करणारांना वडिलार्जित इस्टेटीचे भागीदार बनविणारा कायदा साऱ्या हिंदुस्थानांत जारी झाला. १८३२ मध्यें त्याच्या अंमलबजावणीखालचा प्रदेश फक्त बंगाल प्रांत एवढाच होता याच सुमारास कन्यावधाचा रजपूत व तत्समान कांहीं जातींतला भयंकर रिवाज कायद्याच्या जोरावर उपटून टाकण्याचें श्रेय इंग्रजांच्या कंपनी सरकारानें संपादन केलें. १८३६ च्या एका कायद्यानें ठगांच्या धंद्याचा पक्का बंदोबस्त करून पुनः हा राक्षसी धंदा कधींही डोकें वर काढणार नाहीं, अशी निर्भय स्थिति देशांत निर्माण केली. बिहार-ओरिसा प्रांताच्या जंगली भागांतले लोक आपल्या उपास्य दैवताची कृपा संपादन करण्यासाठीं जातीबाहेरच्या माणसांना पकडून त्यांचा बळी देत होते. इंग्रजांच्या हातांत त्या प्रांताचीं राज्यसूत्रें जाण्यापूर्वी या नरमेधाच्या चालीला आळा घालण्याचा यत्न झाला नव्हता. नर-मेध हा एक तेथील रानटी समाजाचा धार्मिक हक्कच समजला जात असे. पण या हक्काचा इंग्रजांनीं आपल्या न्यायबुद्धीपुढें बळी देऊन नरमेधाची शेंकडो वर्षांपासून निर्बाध चालत आलेली रीत कायमची बंद केली. मध्यप्रांताच्या डोंगरावरील कित्येक देवस्थानानजीक असलेल्या कड्यावरून उडी टाकून देहावसान साधल्यास मोक्ष मिळतो, अशा प्रकारें देहान्त करून घेतांच थेट देवलोकास निर्विघ्न जाण्याचा रस्ता खुला होतो, असा कांहीं भागांत लोकांचा समज असल्यानें पुष्कळ यात्रेकरू दरसाल आपखुषीच्या कडेलोटानें कपाळमोक्ष करून घेत होते. या कडेलोटाला इंग्रजांनीं बंदी केली. गंगातटाकावर मरण आल्यानें सहज मुक्तीचा लाभ घडतो, या कल्पनेस वश होऊन हजारों माणसें गंगा-तटाकावर अत्यवस्थ मरणोन्मुख स्थितींत जाऊन पडत. त्यांना इंग्रजी

राज्यापूर्वी कोणी प्रतिबंध केला नव्हता. इंग्रजांनीं ही गंगाकिनारीं मरण्याची चाल मोडली. धर्माच्या नांवाखालीं चालणाऱ्या आणखी बऱ्याच अत्याचारांना इंग्रजांनीं मूठमाती दिली.

जे प्रचार धडधडीत अमानुष व आततायीपणाचे होते त्यांस इंग्रजांचे कायदे आडवे येऊं लागल्यामुळें त्यांची हिंदू समाजांतून कायमची फारखत झाली. कायद्यांची बजावणी करणारे न्यायाधीशही न्याय देतांना हिंदू व मुसलमान समाजाचीं धर्मशास्त्रें धाब्यावर बसवीत होते. कायद्याच्या पुढें एक पाऊल जाऊन ते आपला निर्णय देण्यास भीत नसत. हिंदूशास्त्रांना अमूक एक रिवाज मान्य आहे म्हणून तो इंग्रज न्यायाधीशांसमोर मान्य ठरेलच असा भरंवसा नव्हता. न्यायाधीशांचे निकाल कायद्याइतकेच प्रभावशाली असतात, हें तज्ज्ञांना सांगायला नको. दिवाणी व फौजदारी कायद्यांचे मसूदे तयार करतांना कंपनी सरकारचे मंत्री शक्य तोंवर हिंदू मुसलमानांच्या धर्मानुशासनांचा अतिक्रम होऊं देत नसत, पण एखादें धर्ममान्य रूढ कृत्य त्यांच्या नजरेला अत्याचाराप्रमाणें भासलें कीं, ताबडतोब त्याच्या पाठीशीं असलेले रूढीचें व शास्त्रसंमतीचें बळ झुगारून देऊन ते आपल्या सदसद्विवेकबुद्धीला योग्य वाटणारें कलम तयार करण्याला कचरत नसत. हिंदू मुसलमानाच्या रूढींची किंवा शास्त्रवचनांची पायमल्ली करणारीं अनेक कलमें इंडियन पीनल कोडांत दाखवितां येतील. माधवराव मुंबईस शिकत असतां १८६० सालीं पीनल कोडाला पक्क्या कायद्याचें स्वरूप देण्यांत आलें. न्यायाधीशांची धाव कायद्याच्या मर्यादेपलीकडे जाऊन हिंदू समाजांतल्या रूढींचे, प्रघातांच, समजुतींचे किल्लेकोट धडाधड जमीनदोस्त व्हायला लागले होते, हें वर निवेदन केलेंच आहे.

कायदा, न्याय आणि पाश्चात्य विद्येचा प्रसार या तीन शक्तींप्रमाणेंच हिंदी समाजाच्या व्यवस्थेवर हल्ला करणाऱ्या आणखी एका शक्तीचा निर्देश करणें अवश्य आहे. ती शक्ति म्हणजे ख्रिस्ती धर्माची उपदेशक मंडळी हीच होय. ख्रिस्ती उपदेशकांनीं १८४०-१८६० चे दरम्यान साऱ्या देशभर आपलीं वसतिस्थानें उभीं करून हिंदूमुसलमानांच्या धर्मांवर आपल्या व्याख्यानलेखनादि तोफांचा अतिशय निकरानें मारा चालविला होता. वार्षिक जत्रा असो, आठवडयाचा बाजार असो, लोकांची हिंडण्याफिरण्याची जागा असो, जेथें माणसांचा जमाव दिसेल तेथें जाऊन आपल्या उपदेशाचा पट्टा चालवायचा, असें मिशनऱ्यांचें व्रत होतें व आहे. त्यास अनुसरून त्यांनीं हिंदू समाजाच्या धार्मिक रीतरिवाजांचा चुराडा उडविण्याकरितां संधी सांपडेल तेथें नालस्तीच्या घणाचे घाव मारण्याचा क्रम ठेवला होता. सामान्य इंग्रजी विद्येबरोबरच हिंदी बालकांत आपल्या धर्मविचारांचें बालकडू पाजण्याकरितां त्यांनीं जागजागीं शाळा स्थापन केल्या होत्या, वर्तमानपत्रें काढलीं होतीं आणि धर्मासंबंधीं निर्भेळ तात्विक व वादविवादात्मक अशीं द्विविध पुस्तकें छापून तीं स्वस्त किंमतींत मोफत वाटण्याचा धडाका लावला होता. महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, नांव घेण्याजोगें मराठी भाषेंतलें वर्तमानपत्र प्रथम मिशनऱ्यांनींच काढलें. धर्माबद्दल लोकांत विचार चालण्याकरितां 'हिंदूंचें सण, मूर्तिपूजा' वगैरे विषयांवर निबंध लिहिणारांपुढें मिशनरी मंडळाकडून बक्षिसांचें आमिष टाकलें गेलें व त्याचा लाभ घेण्याला अनेक तरुण लेखक सरसावले. लोकांत धर्माचा विचार चालण्याला या साधनाचा बराच उपयोग झाला. मिशनऱ्यांच्या गोटांत पुष्कळसे ब्राह्मण शिरल्या-

-मुळें आपला धर्म डूबघाईस आला, असा ग्रह होऊन लोकांमध्यें खळबळ माजली.

इंग्रजी विद्या, कायदा, न्याय आणि मिशनरी अशा चतुरंग दळाच्या वेढयांत सांपडलेला हिंदू धर्म आपल्यावर चाल करून येणाऱ्या सामर्थ्यांच्या प्रतिकारासाठीं सज्ज होता. ज्यांच्या स्वधर्माभिमानांत निस्सीम कडवेपणा होता, त्यांनीं क्वचित् बंडें केलीं व रक्तपाताच्या मार्गानें आपला विरोध दाखविला. १८५७ च्या बंडाला धार्मिक क्षोभ अंशतः कारण झाला हें इतिहासज्ञांस अवगत आहेच. मिशनऱ्यांच्या प्रयत्नांत हिंदूंची धर्मभावना विरून जाऊं नये म्हणून कित्येक शास्त्रीपंडितांनीं ख्रिस्तीधर्माच्या खंडनाचा उद्योग आरंभला. मुंबईस १८५० नंतर कृष्णशास्त्री साठे नांवाच्या एका शास्त्रीबुवांनीं स्वपरधर्माच्या मंडनखंडनासंबंधीं बरींच भाषणें केलीं. या वादांत 'विष्णुबुवा ब्रह्मचारी' यांचें नांव १८५६ सालीं पुष्कळ गाजलें. गाढया विद्वत्तेपेक्षां यांच्यांत हजरजबाबी चतुरस्रपणा जास्त असल्यानें ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कोटीवर प्रतिकोटी लढवून प्रतिपक्षाच्या विवेचनाची राळ उडविण्याला त्यांस बिल्कूल आयास पडत नसत. त्यांच्या हजरजबाबीपणांत अश्लीलतेचाही भाग असे. कोटीबाजपणामुळें ते मुंबईस मोठे लोकप्रिय झाले होते. शिवाय त्यांनीं आपणास सप्तशृंगीच्या पर्वतांत ईश्वरी साक्षात्कार झाला असल्या लोकांस झुलविणाऱ्या वार्तांचीं आयुधें आपल्या झोळींत ठेवलीं होतीं. माधवराव कोल्हापुरास प्राथमिक शिक्षण घेत होते, त्यावेळीं त्यांना एकदां ब्रह्मचारीबुवाची मूर्ति पहाण्याला सांपडली होती. विष्णुबुवा किंवा कृष्णशास्त्री यांजप्रमाणें दुसरे शास्त्री हिंदूधर्मरक्षणासाठीं खूप झटत होते. परंतु पुराणमतानुयायी धर्मरक्षक हिंदूंची झुंज अखेरीस फोल

ठरली असें म्हणावें लागतें; कारण सगळ्या जुन्या धर्मसिद्धांतांचा पुरस्कार करण्याचे दिवस निघून गेले होते. इंग्रजी विद्येचा पगडा मनावर बसलेली नवी पिढी धर्माचरणांतील अनेक गोष्टींची उघड उघड अवहेलना करूं लागली होती. ज्यांना इंग्रज अधिकाऱ्यांचा सहवास घडला, किंवा जे इंग्रजांच्या मेहरबानीनें नव्या राज्यकारभारांतले ल्हान मोठे अधिकार वहिवाटींत होते, त्या सर्वांचा कल इंग्रजांच्या पाश्चात्य संस्कृतींतील बरेच गुण आपल्या वर्तनांत उतरून घेण्याकडे वळला होता. इंग्रजांच्या राज्याला या दृष्टीनें हिंदुस्थानच्या इतिहासांतलें नवें मन्वंतर समजावयास हरकत नाहीं. या मन्वंतराचें स्वागत करून जयजयकारपूर्वक त्याच्या प्रभावाखालीं देशाचा उद्धार घडवून आणावा, ही महत्वाकांक्षा प्रथम राजाराममोहन राय यांच्या उद्योगांत आढळते. त्यांच्या उद्योगाचा वृक्ष बंगाल प्रांतांत चांगलाच फोंफावला होता. ब्राह्मसमाजानें हिंदू धर्माच्या तटबंदीला बाहेरच्या शत्रूऐवजी आंतून पोखरून भगदाड पाडणारा नवा पंथ उत्पन्न केल्याचें सर्वांच्या ध्यानांत आलें. माधवराव सार्वजनिक कार्यांत पडण्याचा विचार करूं लागले असतील नसतील त्या सुमारास दुसरा एक हिंदू संन्यासी उत्तर हिंदुस्थानांत मूर्तिपूजेच्या प्रघातावर भीषण प्रहार करीत होता.

महाराष्ट्रांतील जनता या जागृतीच्या लाटेंत सांपडून कशी वहात चालली होती याचा आणखी थोडासा इतिहास दिल्याखेरीज माधवराव आयुष्याच्या प्रारंभींच सामाजिक सुधारणेच्या झेंडयाखालीं कां जाऊन उभे राहिले, याचा नीट उलगडा पडणार नाहीं. इंग्रजी राज्याच्या प्रभावानें, इंग्रजी विद्येच्या शिक्षणानें आणि मिशनऱ्यांच्या उपदेशानें हिंदूंची

सामाजिक प्रकृति निकोप नाहीं, अशी प्रत्येकाला जाणीव झाली होती. या जाणिवेनें सर्वांचे मन:स्वास्थ्य नाहींसें केलें होतें. हिंदुस्थानाच्या सामाजिक प्रकृतीमध्यें कोणत्या रोगांनीं कायमची वस्ती केली आहे, याचा बोध विचारी व कर्तृत्वशाली पुरुषांना झाला होता. पहिला भयंकर व बलाढ्य रोग म्हणजे लोकांत वावरणारें कमालीचें अज्ञान हा होय. पुरुष वर्गांत शेंकडा ९९ माणसें अज्ञानी होतीं, पण गालबोटाप्रमाणें सदर शेंकडेवारींत एखाद्या सज्ञान पुरुषाचा अपवाद दाखविण्याला अवकाश होता. स्त्रियांच्या बाबतींत तसाही अपवाद चुकूनमाकून सांपडण्याला समाजानें सवड ठेवलेली नव्हती. यामुळें देशांतल्या बालिकांना शिक्षण देणाऱ्या शाळा समाजांतल्या कर्त्या पुरुषांनीं काढल्या. स्त्रियांची निरक्षरता धर्माला असंमत नव्हती. पतिसेवा हाच कायतो स्त्रियांचा ईश्वरनिर्मित धर्म, तो त्यांनीं आचरावा, साक्षरतेच्या व्यवहाराची उठाठेव करण्याची त्यांना आवश्यकता नाहीं, असा हिंदूजनतेचा शेंकडो वर्षांचा ग्रह होता. स्त्रियांना शिक्षण देणाऱ्या शाळा निघाल्या, तेव्हां साहजीकच लोकांनीं नाकें मुरडलीं. धर्मनाशाचीं बीजें समाजांत पेरलीं गेलीं, कलीच्या दुष्ट कारवाईचा विजय झाला, असा लोकांनीं आपला समज करून घेतला. स्त्रीशिक्षणाच्या पुरस्कर्त्यांना दगड मारण्यापर्यंत समाजाची मजल गेली. १८४५ मध्यें मुंबईच्या पहिल्या सुशिक्षित तरुणांच्या पिढीनें मुलींची शाळा घातली; तिला मुंबईचे प्रख्यात महाराष्ट्रीय नगरशेट 'नानाशंकर' यांचा पाठिंबा होता. स्त्रियांना शिक्षण देण्याचा उपक्रम झाल्यावर मागोमाग अस्पृश्य व मागसलेल्या वर्गांना शिक्षण देण्याची योजना अंमलांत आली. मग किती हाहाकार उडाला असेल, याची कल्पनाच करणें चांगलें ! विटाळ

तर दूरच, पण ज्यांची नुसती सावली अंगावर पडली तर तीसुद्धां नरकप्रद मानली जात असे, त्या शूद्रातिशूद्रांतलीं मुलें ज्ञानार्जन करूं लागलीं, हा देखावा अव्वल इंग्रजींतल्या वृद्ध पिढीला धर्मप्रलयाचा सूचक भासला असल्यास नवल नाहीं. १८४९ मध्यें 'ज्ञानप्रकाश' हें वृत्तपत्र निघालें. त्यानें लोकांतील जुन्या समजुतींचा कैवार घेण्याऐवजीं उलट त्यांवर जोराचे आघात सुरू केले. पुढें 'प्रभाकर' पत्रानें लोकहितवादींना आश्रय देऊन ब्राह्मण समाजाचें वर्चस्व धुळीस मिळविण्याचा विडा उचलला. याच वेळीं तिसरें एक 'धुमकेतु' नांवाचें पत्र प्रसिद्ध होत असे. त्यानें धर्ममतांची विटंबनाच चालविली होती. अगोदरच इंग्रजांनीं आपल्या राज्यकारभारांतून जातिमाहात्म्याला हद्दपार केलें होतें. जो कोणी योग्य असेल त्याला त्याच्या जातीकडे न पहातां त्याची योग्य स्थानीं नेमणूक करावयाची व त्यास मान द्यावयाचा अशी नवी रीत इंग्रजांनीं घातली होती. जातीच्या श्रेष्ठत्वाची यामुळं गळचेपी होत चाललीच होती, पण लोकहितवादीसारखे ब्राम्हण स्वजातीवर उलटल्यामुळें गळचेपीची तांत जास्तच आवळली गेली आणि जातिभेदांतला श्रेष्ठकनिष्ठभाव राम म्हणण्याच्या पंथास लागला. जातिमाहात्म्याच्या ठिकऱ्या उडविण्याकरितां जशी मुद्रणकला वृतपत्रांच्या रूपानें सिद्ध झाली होती, तशीच आणखी एक कला, सामाजिक प्रकृतींत घुसून हजारों वर्षें पुष्ट होत असलेल्या, या रोगाचा विनाश नकळत घडवून आणीत होती. १८५०च्या सुमारास मुंबईत आगगाडीचा रस्ता बांधण्याचा विचार अमलांत येऊं लागला. त्यासाठीं भायखळ्याच्या बाजूस रेल्वे कंपनीनें मोठी जागा अडवून कारखाना चालू केला. कारखान्याच्या आवारांतून मालाची नेआण करणारीं इंजनें पाहून मुंबईच्या

आबालवृद्ध नागरिकांना मोठा चमत्कार वाटत असे. दररोज संध्याकाळीं पोटाच्या रोजगारांतून सुटका झाली कीं, पुढच्या शिंगांतून धुराचे लोटच्यालोट हवेंत उधळणाऱ्या व केवळ चाकांच्या साह्यानें वाहनात्रांचून सजीव प्राण्याप्रमाणें भरधाव चालणाऱ्या 'चाक्या म्हसोबाचें*' सकुतूहल दर्शन घेण्याकरितां हजारों माणसें आगगाड्याच्या आवाराभोंवती जमा होत असत. १८५३ च्या एप्रिलांत आगगाडी सुरू झाली. पुण्यापासून खंडाळ्यापर्यंत १८५९ मध्यें आगगाड्यांची रहादारी होऊं लागली. १८६२ मध्यें खंडाळ्याच्या घाटांतला रस्ता आगगाड्याच्या व्यवहाराकरितां बांधून पूर्णपणें तयार झाला. आगगाड्यांनीं जातीश्रेष्ठतेला हळूहळू चिरडण्यास प्रारंभ केला. स्टेशनावरून सोडा वाटर विकणारे लोक हे खरे सुधारक व जातिभेदाचे शत्रु होत, असें एक इंग्रज वृत्तपत्रकार यामुळेंच विनोदानें पुढें लिहित असे.

समाजाच्या हाडींमासीं खिळलेल्या रोगांची लोकांस झालेली जाणीव वेगळ्या रीतीनें मूर्तावस्था धारण करीत होती. महाराष्ट्रांत व अन्यत्र कर्तबगार विचारी पुरुष उपायचिंतनांत गढले होते. इंग्रजांनीं राज्याचीं सूत्रें सर्वस्वीं हिरावून घेतल्यामुळें राजकीय विचारांत मन घालण्याची सोय नव्हती. समाजरचना सुदृढ व निर्दोष असल्याखेरीज राजकारणांतल्या उद्योगांना यश येत नाहीं व आल्यास ते फार दिवस टिकत नाहीं, असें सर्व उद्धारचिंतकांना वाटत होतें. युनिव्हर्सिटीच्या पहिल्या पदवीधरांचें आणि त्या पूर्वींच्या शिक्षितांचें लक्ष सामाजिक सुधारणेकडे यासाठींच गेलें व त्याचा

* इंजनाला तत्कालीन वृत्तपत्रामध्यें एका लेखकानें 'चाक्या म्हसोबा' अशी कांहींशीं विनोदपर संज्ञा दिली आहे.

परिणाम कोणता झाला हें वाचकांना समजण्याकरितां आणखी कांहीं गोष्टी नमूद करणें जरूर आहे. १९ व्या शतकाच्या प्रथम चरणाच्या काळांत जर नजर टाकली तर काय दिसतें? सनातन वहिवाटीस अनुसरून भरतखंडाच्या चतुःसीमेंत लोक आपापल्या समजुतीप्रमाणें धर्माचरण करीत असल्याचें आढळून येईल. पण हिंदू समाजाचा धर्म एकसूत्री नव्हता. कोठें हवेंतल्या सूक्ष्म जंतूंची हिंसा घडूं नये म्हणून नाकातोंडाला फडकीं बांधणाऱ्या स्त्रीपुरुषांचे तांडे दिसले तर दुसऱ्या जागीं उपास्य दैवताला प्रसन्न राखण्याकरितां रेड्यांबकऱ्यांबरोबर माणसांच्या राजरोस कत्तली उडत होत्या. कांहीं जातींत मुलगी उपजतांच तिला तिचे नातेवाईक धर्मप्रीत्यर्थ कंठस्नान घालीत होते, तर कांहीं जाती मुलींना देवास अर्पून व्यभिचाराच्या मार्गांत बेधडक ढकलून देत होत्या. कित्येक जातींत बापांच्या मिळकतीच्या वारसा मुलाकडे जात असला तर कांहीं जातींत हा वारसा मुलीकडे जाण्यांतच मुक्तिप्रद धर्माचरण घडतें असा समज होता. स्त्रियांच्या बाबतींत पाळल्या जाणाऱ्या धर्मविधीला कोठेंच खळ नव्हता. चिताग्नींत किंवा थडग्याच्या खाड्यांत, जशी चाल असेल त्याप्रमाणें, पतिलोकीं जाण्याकरितां स्त्रिया बेलाशक उड्या टाकून प्राणत्याग करीत होत्या. ब्राह्मणांच्या स्त्रियांना आणखी एक देहान्ताचा मार्ग मोकळा होता. ब्राह्मणांची जात सर्व श्रेष्ठ, त्यांतल्या त्यांत काशी-क्षेत्रांतले ब्राह्मण अतिपवित्र, त्यांनीं अपराध केल्यास त्यांच्या वाटेला जाण्याची कंपनीसरकारच्या हिंदी शिपाईप्यायांची छाती नव्हती. अशा काशीक्षेत्रवासी ब्राह्मणांना न्यायासनासमोर खेंचून नेण्याचा कायदा जेव्हां निःपक्षपात जारी झाला, तेव्हां त्यांनीं एक उपाय शोधून

सरकारचा प्रतिकार चालविला. कोणी पकडायला आला कीं, अंगावर वस्तऱ्यानें किंवा सुरीनें घाव मारून घ्यावयाचे, एवढ्यानें न भागल्यास विष खाण्याचा धाक घालायचा, कव्हां कव्हां विष खायचें, इतक्या उपर जर सरकारी शिपाई ऐकेनासे झाले, तर जमिनींत खड्डा खणून त्यांत एखादी बाई बसवावयाची व खड्ड्याभोंवती [illegible]णाचा ढीग घालून धरपकड झाल्यास त्या बाईच्या बलिदानाची दटावणी दाखवावयाची. या प्रकारानें पुष्कळदां सरकारी कायद्याची अमलबजावणी फेटाळून त्यांना ब्राह्मण्याच्या छत्राखालीं सुरक्षितपणानें गैरकायदा हक्कांवर पुष्ट होतां येत असे. कंपनीच्या अंमलाखालीं कित्येक वर्षें ब्राह्मणाला खुनाबद्दल शिक्षा देण्याचा प्रघात नव्हता. माळव्यांमध्यें विंध्यसातपुड्याच्या जंगलांत रहाणारे ठग आपल्या दैवतांची मर्जी राखण्याकरितां एकट्या दुकट्या वाटसरांना ठार मारून त्यांजवळच्या सर्वस्वाची लूट करीत होते. अशा रीतीनें सर्वप्रकारचें देवताराधन शेंकडो वर्षें बिनहरकत चाललें असतां, हिंदू समाजानें १९ व्या शतकांत जोडलें काय तर अमर्याद अधःपतन! ऐहिक अभ्युदय व पारलौकिक कल्याण हे धर्माचरणाचे दोन उद्देश आहेत, त्यांपैकीं ऐहिक अभ्युदयाचा मार्ग इंग्रजी राज्यांत खुंटला व पारलौकिक कल्याणाबद्दल खात्री कोणाला देतां येणार? तीर्थस्थानें म्हणजे धर्माचीं माहेरघरें, पण तेथें पहायला जावें तर अन्य स्थानापेक्षांही जास्त गलिच्छपणा भरलेला. कोल्हापूर हें माधवरावांचें लहानपणचें निवासस्थान, यासाठीं तेथली थोडी हकीकत देणें योग्य आहे. कोल्हापूर हें एक धर्मक्षेत्र आहे. काशीइतकाच त्याचा मान आहे. परंतु माधवराव लहान असतांना, दाजी कृष्ण पंडितांच्या कारकीर्दीत एका प्रवासी

गृहस्थानें तेथील पवित्र स्थळें 'विष्ठामूत्र उच्छिष्ट' यांनीं बुजबुजलीं आहेत, तीर्थकुंडांतून पाप उघडकीस न येण्याकरितां जन्म होतांच ठार मारलेल्या कोवळ्या जारज अर्भकांचे मुडदे सांपडतात, असें वर्णन लिहून ठेविलें आहे. माधवराव आठनऊ वर्षांचे असतांना हिंदी राज्यांतली जातिविशिष्ट वैमनस्यें उघडकीस आणणारा एक प्रसंग घडला व त्याची चर्चा तेव्हांच्या वर्तमानपत्रांतून झाली. इंग्रजी राज्य होण्यापूर्वी जैनांना आपल्या देवाची मिरवणूक कोल्हापूर शहरांतून काढण्याची कडक मनाई होती. नाना मोरोजी तेथें पोलिटिकल एजंटाच्या कचेरींत असतांना जैन पुढाऱ्यांनीं मिरवणुकीची परवानगी काढली. ही गोष्ट इतर हिंदूंना रुचणार नाहीं, हें ठाऊक असल्यानें नाना मोरोजी व पोलिटिकल एजंट जातीनें शहरांतल्या प्रमुख गृहस्थांकडे गेले आणि मिरवणूक निघाल्यानंतर जैनेतर लोकांनीं काहीं वेळ घराचे दरवाजे लावून बसावें, असें त्यांनीं सर्वांकडून कबूल करून घेतलें. इतकी व्यवस्था झाल्यावर बखेड्यावांचून मिरवणूक पार पडेल अशी अधिकाऱ्यांच्या मनाची समजूत होणें स्वाभाविक होतें; पण मिरवणुकीची वाताहत उडविण्याच्या इरादानें सुप्रसिद्ध अंबाबाईच्या देवळांत ब्राम्हण गोळा झाले. मिरवणूक माऱ्याच्या टप्प्यांत येतांच त्यांनीं दगडांचा वर्षाव सुरू केला. अखेरीस पोलीसांना मध्यें पडून दंगेखोरांना पकडणें भाग पडलें. उभयपक्षीं बऱ्याच जणांना इजा झाली. हा प्रसंग अभूतपूर्व होता. हिंदुसमाजरचनेवर प्रकाश टाकणारा होता. असे प्रसंग व धर्माचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या क्षेत्रांतले प्रत्यहीं आढळणारे दुराचार पाहून माधवरावांच्या मनावर खचित परिणाम झालेला असेल.

इंग्रजी राज्याच्या अभावीं कोल्हापुरांत आपला देव मिरविण्याचें धैर्य जैनांना करवलें नसतें व केलेंच असतें तर ब्राह्मणांचा दंगा गुन्हेगारींत मोडण्याचा संभव नव्हता; उलट ज्या ब्राह्मणांनीं मिरवणुकीचा फडशा उडविण्याकरितां चंग बाधला होता, त्यांचे धर्मरक्षक म्हणून देव्हारे माजले असते, पण इंग्रजांनीं जातीजातींतला श्रेष्ठकनिष्ठभाव रसातळास नेल्यामुळें ब्राह्मणांचें वर्चस्व उरलें नाहीं. ब्राह्मणांना इतरांप्रमाणें अपराधांबद्दल शासन मिळूं लागलें. १८५९ पर्यंत पुणें शहरांत जैनाचें देऊळ नव्हतें. ब्राह्मणांच्या राजधानींत या देवळांची उभारणी होऊं देणें म्हणजे ब्राह्मण्याला बुडविणें असा ब्राह्मण बादशाहीमध्यें समज होता. ही गोष्ट वरील मिरवणुकीच्या वृत्तान्ताइतकीच महत्त्वाची आहे.

सुधारणा करण्याचें ठरल्यावर तिचा प्रारंभ कोणत्या बाबीपासून करावा याचा निर्णय लावण्यास फक्त थोडाच विचार पुरतो. राष्ट्रघटनेच्या परंपरेंत कुटुंब किंवा स्त्रीपुरुषाचें दंपत्य व त्याचा परिवार हा घटक मुख्य गणला पाहिजे, असें सर्व समाजशास्त्रज्ञांचें मत आहे. हिंदूधर्मशास्त्रें या मताहून भिन्न तत्त्वें प्रतिपादन करीत नाहींत. स्त्री व पुरुष हीं राष्ट्राचीं दोन अंगें. त्यांतलें दुसरें अंग इंग्रजी राज्याखालीं प्रगतीच्या मार्गाला लागलें. धार्मिक कार्य, सण, त्यांमधून पाळले जाणारे व्रात वगैरे शास्त्रमान्य व रूढिमान्य सामाजिक व्यवहाराची पुरूषवर्गानें कसून छाननी चालविली होती. शिमग्याचा सणांत घडणाऱ्या बीभत्स प्रकारांना आळा घालण्याकरितां मुंबईशहराच्या सुमारें ६० गृहस्थांनीं १८५२ सालीं एक अर्ज पाठविला होता. 'प्रभाकर' 'ज्ञानप्रकाश' 'धूमकेतु' वगैरे वृत्तपत्रांनीं या सणांतल्या घाणेरड्या प्रचारांवर सालोसाल कोरडे मारण्याचा आणि त्यायोगानें लोकमत जागृत व उन्नत करण्याचा धडाका

लावला होता. १८५६ सालीं विधवाविवाहाचा जो कायदा झाला त्यास पाठिंबा देऊन पुरुषवर्गानें आपली सामाजिक प्रगतीची एक मजल गांठली. सामाजिक सुधारणेच्या प्रतिकारासाठीं जुन्या मताच्या लोकांनीं शास्त्री, जहागीरदार वगैरे लोकांच्या साह्यानें संस्था निर्माण केल्या होत्या. हा विचारकलह, सुधारणेच्या इमारतीचा पाया मजबूत भरला गेला याची, जणूंकाय साऱ्या हिंदुस्थानांत द्वाही फिरवीत होता. पुरुषांपुरती सुधारणा झाली, स्त्रियांची वाट काय, हा प्रश्न १८४० ते १८६० या वीस वर्षांतले समाजधुरीण विसरले नव्हते. हें मागें दिलेल्या माहितीवरून वाचकांना समजलेंच आहे. स्त्रीशिक्षणाच्या शाळा स्थापण्यानें हा प्रश्न अंशतः सुटला, पण जोंवर समाजांतल्या विवाहासंबंधीं चालीरीती बदलल्या नाहींत, तोंवर शिक्षणानें होणारी स्त्रियांची उन्नति वायाच जाणार, हें उघड होतें व म्हणूनच इंग्रजी आमदानींतल्या पहिल्या समाजसुधारकांनीं आपल्या कर्तृत्वाचा मोर्चा विवाहसंस्काराकडे वळविला. लहानपणींच मुलांमुलींचीं लग्नें उजविणें ही रीत लोकांच्या हाडींमांसीं खिळली होती, म्हणून तिच्यावर सुधारकांनीं चढाई केली. बालविवाहांत अनेक अनर्थांचीं बीजें आहेत, त्यामुळें स्त्रियांवर लहानपणीं वैधव्य दुःखांत पडण्याचा प्रसंग ओढवतो, अशा प्रकारचें वैधव्य स्त्रियांना प्रच्छन्न दुराचारास प्रवृत्त करतें, बालविवाहामुळें संतति दुबळी निपजते; नवी पिढी सुदृढ असल्याखेरीज जीवनसंग्रामांत तिचा टिकाव लागणार नाहीं; देशांत धडधाकट प्रजा उत्पन्न करण्याजोग्या अनेक तरुणींना वैधव्याच्या दलदलींत सोडून जरठांनीं कोवळ्या बालिकांशीं लग्नें करण्याचें कारण विधवाविवाहनिषेध आणि बालविवाह हेंच होय, वगैरे पुष्कळ गोष्टींचा उलगडा समाजाच्या हिताचें

चिंतन करणारांना आपोआप पडत चालला व त्यांनीं बालविवाहाची हकालपट्टी करून विधवाविवाहाला समाजांत मान मिळवून देण्यासाठीं वक्तृत्व, लेखन, संस्थांची स्थापना, या साधनांच्या द्वारा सुधारणेची तपश्चर्या आरंभली. तपश्चर्या हा शब्दप्रयोग कदाचित् वाचकांना कसा-साच वाटेल. परंतु सुधारणेपायीं सुधारकांनीं सुखाचा जीव दुःखांत घातला, नानाविध क्लेशांना आव्हान दिलें, अंगावर आलेले क्लेश धैर्यानें सहन केले, या गोष्टी ध्यानांत ठेवल्यास तपश्चर्या हा शब्द यथार्थ आहे असेंच सर्वांना कबूल करावें लागेल. देवाच्या सेवेंत आई-बापांची, बायकामुलांची अडचण होते असें दिसल्यास विघ्न समजून त्यांचा त्याग करावा असा महाराष्ट्रांतल्या साधुसंतांचा उपदेश आहे. समाजाच्या परोपकारमय सेवेमुळें जर वडिलांची, आप्तेष्टांची, सम-कालीन जनतेची इतराजी झाली तर तिचा परिणाम स्वीकृत कार्यावर होऊं द्यावयाचा नाहीं, त्याकरितां होतील ते हाल निमूटपणें सोसा-वयाचे असें धोरण सुधारणाभक्तांनीं ठेवलें होतें. विधवाविवाहाला कायद्याची परवानगी मिळून जेव्हां तन्निमित्त संघटित प्रयत्नाचें निशाण महाराष्ट्रांत उभारलें गेलें, तेव्हां त्या निशाणाला खालीं ओढून त्याच्या चिंधड्या उडविण्याकरितां प्रतिकूल समाजाची बुद्धि नानाविध रूपांनीं पुढें आली. प्रतिकारबुद्धीच्या मागें हजारो वर्षांच्या परंपरेचें बळ होतें तें बळ व त्याच्या आश्रयानें आघात करणारी बहुजनसमाजाची प्रतिकारबुद्धि या दोन्ही शक्तींचा पराभव सुधारकांना करावयाचा होता. म्हणूनच त्यांनीं बालविवाहनिषेध आणि विधवाविवाह पुरस्कार हीं दोन कामें नेटानें हातीं घेतलीं.

महाराष्ट्रांत विधवाविवाहासंबंधीं विचारजागृतीचा उगम शोधूं लाग-ल्यास तो १८४० सालांत सांपडतो. विधवाविवाहाला शास्त्राधार

आहेत, असा निर्णय या सालच्या एका पुस्तकांत प्रसिद्ध झाला. बालविवाहाच्या चालीमुळें बालविधवा घरोघरीं होत्या, असें म्हटल्यास अत्युक्तीचा दोष पदरीं येऊं नये. नैसर्गिक विकारांना त्यांपैकी पुष्कळशा बळी पडत, यांत त्यांना नांवें ठेवतां येण्याजोगें काय आहे ? विधवांनीं केलेल्या गर्भपाताचीं व बालहत्येचीं उदाहरणें वृत्तपत्रांतून उजेडामध्यें येत होतीं. शिवाय अन्यरीतीनें होणारे विधवांचे हालही विचारवंताच्या डोळ्यापुढें होते. विधवेचें वपन हें एक मोठें पुण्यकर्म आहे, अशी समाजाची समजूत असल्यानें वपनाचा जुलूम त्यांना सोसावा लागे. वपनावांचून राहिलेल्या विधवेचा छळ मरणानंतर सुद्धां चुकत नसे. १८५९ सालीं सोलापुराजवळच्या माढें गावांत एक गृहस्थाचें घर अतिवृष्टीमुळें पडलें. त्याखालीं त्या गृहस्थाची एक विधवा बहीण सांपडली आणि प्राणास मुकली. तिचें वपन झालें नव्हतें अर्थात् तिच्या प्रेताला स्पर्श केल्यास ब्राह्मणांना जातिभ्रष्ट व्हावें लागलें असतें. प्रेताच्या वपनाला न्हावी तयार होईनात. अखेरीस शूद्रांच्या हस्तें तिला अग्निसंस्कार मिळाला. १८५४ सालांत शंकराचार्यांची स्वारी नगरास गेली होती. तेथें त्यांच्यासमोर व्यभिचाराबद्दल स्त्रियांविरुद्ध फिर्यादी गुदरण्यांत आल्या. एका व्यभिचारिणी बालविधवेच्या पित्याचा शंकराचार्यांनीं गोमूत्रगोमयासह स्वपादोदक तीर्थ पाजून व १९ रुपये दंड उपटून उद्धार केला. पण त्यानें आपल्या मुलीला शुद्धता प्राप्त व्हावी, अशी इच्छा प्रदर्शित केली. जगद्गुरूंनीं फर्माविलेलें प्रायश्चित मोठें मासलेवाईक आहे. त्यांनीं सांगितलें कीं, आंब्याच्या झाडाचा बुंधा कोरून एक ढोली तयार करावी. तिच्यांत या मुलीला बसवावें, बाहेरून गवत पाचोळा पेटवावा आणि बरीच धग लागल्यावर तिला बाहेर काढावें,

नंतर तिचें वपन करावें आणि शेवटीं सहस्त्रब्राह्मणांना जेवण घालावें म्हणजे मुलगी शुद्ध होईल. या मुलीच्या पातकाचा पत्ता सरकारास लागला, तेव्हां शहरच्या पोलीस अंमलदारांनीं अब्रूसाठीं पोर मारून गुन्हा न करण्याचा तिला सल्ला दिला होता. तिनें सल्ला ऐकल्यामुळें हें प्रकरण सरकारपुरतें मिटलें, परंतु शंकराचार्यांनीं समंजसपणा दाखविला नाहीं. ही मुलगी व हिचा बाप सालस असल्यानें शंकराचार्यांना इंग्रजीं राज्यांत बायाबापड्यांच्या अंगीं संचरलेल्या स्वतंत्रतेच्या बाण्याचा अनुभव आला नाहीं. तो अनुभव दुसऱ्या बायकांनीं आणून दिला. या बायकाही विधवा होत्या. त्यांच्यावर ब्रह्मवृंदानें व्यभिराचाराचा आरोप ठेवला होता. शंकराचार्यांनीं त्यांस वपनाची आज्ञा दिली. आपण ही आज्ञा जुमानीत नाहीं, असा खडखडीत जबाब आचार्यांच्या तोंडावर त्यांनीं दिला. शंकराचार्यच ते. त्यांच्या परिवारांत न्हाव्यांची तूट नव्हती, त्यांतल्या कांहींजणांना बोलावून आवेशानें 'या बायांच्या मुसक्या बांधून त्यांचा केशभार उतरून टाका,' अशी पुनः आज्ञा केली. बाया गांगरल्या नाहींत. त्यांनीं जबाब दिला कीं, 'ही मोगलाई नाहीं, जुलूमजबरदस्ती कराल तर आतांच्या आतां फौजदाराकडे अर्ज देऊन आपणास धडपणें नगरांतून जातां येणार नाहीं अशी व्यवस्था होईल' हा अनपेक्षित व सडेसोट जबाब ऐकतांच शंकराचार्य जागच्याजागीं थिजले आणि फिर्यादी ब्रम्हवृन्दाच्या तोंडाला खीळ बसली. शेवटी धर्मरक्षणाच्या गादीचा मान रहाण्याकरितां या बायकांशीं कोणीही अन्नपानादि व्यवहार ठेवूं नये, असा हुकूम सोडून शंकराचार्यांनीं आपला बोज कसाबसा राखला. कोल्हापुरास १८६० सालीं विधवेनें बालहत्या केल्याबद्दल तिच्यावर खटला होऊन मोठी चळवळ उडाली होती.

या गोष्टी माधवरावांच्या चौकस कानावर येऊन किंवा डोळ्यासमोर घडून त्यांची दृष्टि सामाजिक सुधारणेकडे न वळती तरच आश्चर्य झालें असतें !

धर्माच्या व्यवहारांत शंकराचार्यांची हुकूमत ऐकायला त्यावेळचा समाज तयार असला तरी पुष्कळदां ब्राह्मणांनींच त्यांची अवज्ञा केली व जगद्गुरूंची गादी म्हणजे सत्ताशून्य संस्था, असें निदर्शनास आणलें. नगरनजीकच्या भिंगार गावांत एका ब्राह्मणावर अगम्यगमन केल्याचा आरोप होता. सदर अपराध उघडकीस आल्याबरोबर त्यानें बराच पैसा खर्चून गांवांत आपली मानमान्यता कायम ठेवली. कांहीं ब्राह्मण त्याच्या विरुद्ध होते, त्यांनीं या ब्राह्मणावरला बहिष्कार बंद पडूं दिला नाहीं. अखेरीस शंकराचार्यांना पाचारून त्यांच्याकडे न्याय मागितला. शंकराचार्यांची स्थिति विचित्र झाली. न्याय द्यावा तर जितके ब्राह्मण बहिष्कृताला पावन समजणारे होते, त्यांना वाळींत टाकावें लागणार; न्याय न द्यावा तर पापाचाराला पुष्टि मिळणार, असा पेंच त्यांच्या पुढें येऊन पडला. अखेरीस 'मला या भानगडींत लक्ष घालतां येत नाहीं, गांवकऱ्यांनींच आपापसांत तडजोड काढावी' असें सांगून शंकराचार्यांनीं आपली सुटका करून घेतली. ज्यांना न्याय मिळाला नाहीं, त्यांची साहजीकच जगद्गुरूंवर इतराजी झाली. ब्राह्मणांच्या मर्जीवर धर्मव्यवस्था अवलंबून होती. ब्राह्मण म्हणतील ती पूर्वदिशा, असा जरी कांहींसा प्रकार असला, तरी त्यांच्यावर ग्रामण्याचें शस्त्र चालविण्याची बुद्धि कांहीं जातींत उत्पन्न झाली होती. पुण्यास जोतिबा फुले नांवाच्या एका ब्राह्मणेतर गृहस्थानें आपल्या जातीच्या उद्धारासाठीं ब्राह्मणावर आग पाखडण्यास सुरुवात केली होती. १८६० च्या सुमारास पुण्याचे न्हावी

फुल्यांच्या पुढें गेले. एका न्हाव्यानें टुमदार लहानसें घर बांधलें. वास्तुशांतीला ब्राह्मण बोलावले. हें मंगल कार्य कांहीं ब्राह्मणांनीं केलें, पण इतरांचा त्यांवर रोष होऊन त्यांनीं न्हाव्याची वास्तुशांति करणारांमागें ग्रामण्याचा ससेमिरा लावला. न्हाव्यांना याबद्दल अतिशय राग आला व त्यांनीं ग्रामण्यास्त्रावर उलट 'न्हावण्यास्त्राचा' प्रयोग केला. ग्रामण्य माजविणाऱ्या ब्राह्मणांच्या हजामती करावयाच्या नाहींत, असा त्यांनीं ठराव केला. या ठरावाच्या अंमलबजावणीला ग्रामण्याच्या तोडीस तोड म्हणून 'न्हावण्य' असें नांव तत्कालीन वृत्तपत्रांनीं दिलें आहे. सारांश भिंगारच्या कांहीं ब्राह्मणांनीं शंकराचार्यांची जशी स्थिति केली तशीच, पुण्याच्या नापितांनीं तेथील ब्राह्मणांची केली.

पण या सुमारास निरनिराळ्या धर्मसंप्रदायाच्या अधिपतींच्या दिनचर्येकडे सुशिक्षितांची फार बारीक नजर होती, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. स्वामी नारायण, गोवर्धन, वगैरे आचार्यांच्या वर्तनांतलें दोष सौम्य शब्दांनीं दाखविण्याला ज्ञानप्रकाशादि पत्रांनीं प्रारंभ केला होता. वास्तविक अशा आचार्यांनीं आपल्या संप्रदायांतील आचारशुद्धतेचें रक्षण करावयाचें, पण त्यांच्याच वर्तनक्रमांत उच्च आणि पवित्र अधिकाराची राखरांगोळी करून सोडणारा भ्रष्टाकार दिसला, तर त्याबद्दल पाणीदार जाणत्यांनीं आपल्या डोळ्यावर कातडें ओढून मुग्धता कां स्वीकारावी ? मुग्धता सोडून अवाच्य गोष्टींचा परिस्फोट केल्यास बदनामीच्या कायद्याची भीति होती. परंतु गुजराथी समाजांतल्या एका संप्रदायाच्या आचार्यांना, टीकेच्या भडिमारानें 'त्राहि भगवन्' म्हणावयास लागणारा एक साहसी पुरुष त्या समाजांत निपजला. कर्सनदास मूळजी यांचें नांव ऐकून ठाऊक नाहीं असा सुशिक्षित

विरळाच असेल. गुजराथी समाजांत सुधारणा करण्याचें ब्रीद यांनीं स्वीकारलें होतें. या समाजाच्या एका विभागांत धर्मगुरूच दुराचार करीत असत व त्या दुराचाराला निमूटपणें संतोषपूर्वक संमति देण्यांत पारलौकिक कल्याण आहे, अशी त्या विभागांतल्या लोकांची अढळ समजूत होती. कर्सनदास मूळजींनीं या दुराचारावर टीकेचें हत्यार चालविलें. टीकेच्या माऱ्यांतून खुद्द धर्मगुरु वांचणें शक्यच नव्हतें, यामुळें मारा असह्य झाल्यावर त्यांनीं मुंबईच्या हायकोर्टांत अब्रू उजळून घेण्यासाठीं फिर्याद मांडली. आंतून कर्सनदास मुळजींना समाजांतल्या गुंडांनीं मारहाणीची दहशत घातली. प्राणावर बेतली तरी कर्सनदासांनीं धर्मगुरूचा पिच्छा सोडला नाहीं. अखेरीस कोर्टाच्या साक्षीपुराव्यांत धर्मगुरूंचीं सगळीं कर्में उघडकीस येऊन कर्सनदासांचा विजय झाला. ही धामधूम १८६१ सालांत घडली. सारा हिंदुसमाज या खटल्यानें थरारून सोडला होता. धर्मसिंहासनावर अधिष्ठित होणाऱ्या व्यक्ति नीतिमत्तेचा धडधडीत खून करतात, असें या खटल्यानें जगाच्या प्रत्ययास आणलें. समाजाची सुधारणा होणें किती अवश्य आहे, याविषयीं मुंबईच्या सुशिक्षितांत मुळींच शंका राहिली नाहीं. या खटल्यांत कर्सनदास मूळजींचा कैवार घेणारांमध्यें डा. भाऊ दाजी, रा. सा. मंडलिक व डा. विल्सन यांचीं नांवें गाजलीं.

माधवराव सार्वजनिक चळवळींत पडण्याचा कित्ता ज्ञानप्रसारक सभेच्या द्वारें गिरविण्यास प्रवृत्त झाले, तेव्हां मुंबई शहरांत त्यांच्या सामाजिक व धार्मिक विचारांना प्रोत्साहन देणारे प्रसंग कोणत्या व्यक्ति घडवीत होत्या, हें सांगणें या स्थळीं उचित आहे. मुंबईच्या तरुण पिढीसमोर राष्ट्रीय कर्तव्यांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बोध करून देणाऱ्या

अनेक व्यक्तींच्या उलाढाली त्यावेळीं चालल्या होत्या. सर मंगळदास नथूभाई, सर कावसजी जहांगीररेडिमनी, भगवानदास पुरुषोत्तमदास, प्रेमचंद रायचंद, सर जमशेटजी जीजीभाई, नानाशंकरशेट, डा. भाऊ दाजी, विश्वनाथ नारायण मंडलिक, गोविंद नारायण, दादोबा पांडुरंग वगैरे मंडळींनीं तरुणाच्या जीविताला वळण लावण्याचें काम उत्कृष्ट चालविलें होतें. डा. भाऊ दाजी यांचा व माधवरावांचा नेत्रविकृतीमुळें निकट संबंध जडला होता. डा. भाऊ दाजी हे महान् परोपकारी व विद्याव्यासंगी गृहस्थ होते. यांचा जन्म १८२२ सालीं गोमांतकाच्या सरहद्दीवरील मांजरें गांवीं झाला. त्यांचे वडील १८३० च्या सुमारास मुंबईस आले. भाऊ दाजींनीं शिक्षणाला प्रारंभ केला, पण लक्ष्मीच्या वडील बहीणीचा त्यांच्यामागें ससेमिरा असल्यानें लवकरच त्यांना उदरनिर्वाहासाठीं नोकरी धरणें भाग पडलें. १८४५ पर्यंत त्यांनीं शिक्षकाची नोकरी चोख बजावून त्यासालीं अस्तित्वांत आलेल्या ग्रँटमेडिकल कॉलेजांत प्रवेश केला. १८५१ सालीं त्यांनीं वैद्यकींतल्या नैपुण्याची पदवी संपादून स्वतंत्र धंदा उभारला. वैद्यकींत त्यांनीं कीर्ति आणि संपत्ति मिळविली, पण सरस्वतीवर त्यांची निरुपम भक्ति असल्यानें प्राचीन इतिहासाच्या शिलाताम्रलेखादि साधनांच्या संशोधनांत त्यांच्या हृदयाला जो आल्हाद होत असे, त्याची सर कीर्तिसंपत्तीपासून उपभोगावयास सांपडणाऱ्या आनंदाला येणार नाहीं. रावसाहेब मंडलिकांनीं प्रथम सरकारी सेवेंत बरेंच आयुष्य खर्ची घातल्यावर वकिलीचा धंदा पत्करला. त्यांचा जन्म १८३३ सालांत झाला. १८६२ मध्यें यांनीं नोकरीचा राजीनामा दिला. व्यक्ति तितक्या प्रकृति या न्यायानें भाऊ दाजीपेक्षां याचा स्वभाव बराच भिन्न होता.

यांच्या अंगीं तापटपणा विशेष असून वक्तृत्वशीरपणांत यांचा हात धरणारा त्या काळांत कोणीच नव्हता म्हटल्यास चालेल. विद्याव्यासंगाची दिशा मात्र या दोघांची सारखीच होती. दोघांनाही लुप्तप्राय झालेल्या प्राचीन इतिहासाला उजेडांत आणण्याची मोठी हौस. मंडलिकांना पूर्वजांसंबंधीं व पूर्वस्थितीसंबंधीं तीव्र पण कांहींसा एकदेशी अभिमान होता. समाजसुधारणेची त्यांना आवड नव्हती. पण स्त्रियांचें शिक्षण या एका सुधारणेचा त्यांनीं अतिशय जोमानें सक्रिय पुरस्कार केला. या दोघा गृहस्थांपासून माधवरावांना व त्यांच्या समकालीन पिढीला ज्ञानप्रसारक सभेमध्यें फायदा झाला. मंडलिकांनीं 'आमची अभ्यंतरीय स्थिति' या नांवाचा एक इतिहासात्मक निबंध सदर सभेपुढें वाचल्याची हकीकत सभेच्या अहवालांत आहे. हा निबंध सभेच्या मासिकांतही समग्र दिलेला आहे. प्राचीन काळीं आपलें ऐश्वर्य कसें होतें व आतां आपण कसे अधःपतित झालों आहों, याचा पाढा त्यांनीं वाचला आहे. पूर्वजांची कीर्ति गाऊन स्वाभिमान वाढविण्याची पद्धति त्यांनीं त्यांत स्वीकारलेली दिसते.

दादोबा पांडुरंग हे मंडलीक व भाऊदाजी या दोघांपेक्षां वयानें वडील होते. त्यांचा जन्म १८१४ मध्यें झाला. त्यांनीं समाजसुधारणेची इच्छा अगदी अतिरेक भासण्याइतक्या थराला नेऊन सोडली. ज्ञानप्रसारक सभेचे हे पहिले अध्यक्ष म्हणून यांचा निर्देश मागें आला आहे. यांनीं व यांचे नामांकित सहाध्यायी बाळशास्त्री जांभेकर यांनीं समाजसुधारणेचा उपक्रम केला. जांभेकरांनीं 'दर्पण' व 'दिग्दर्शन' अशीं दोन नियतकालिकें काढून ज्ञानाच्या प्रसाराला आणि विचारजागृतीला मदत केली. एका बाटलेल्या हिंदू गृहस्थाला पुनः स्वधर्मांत

घेण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनीं केल्यामुळें आजच्या शुद्धिकार्याच्या अगर पतितपरावर्तनाच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक जर कोणाला म्हणावयाचें असेल तर त्या पदाचा मान महाराष्ट्रांत किंबहुना हिंदुस्थानांत जांभेकरांनाच दिला पाहिजे. या कामांत त्यांचा व जुन्या धर्मशास्त्राच्या ज्ञानाचा गर्व वहाणाऱ्या शास्त्रीपंडितांचा खटका उडाला. नाना शंकरशेट या उदारमनस्क पुरुषाचा जांभेकरांना सदर झगडयांत फार उपयोग झाला. जांभेकर अल्पायुषी नसते तर त्यांनीं अधिक चळवळी केल्या असत्या, यांत संशय नाहीं. पण त्यांचें निशाण दादोबा पांडुरंगांनीं खालीं पडूं दिलें नाहीं. दादोबांनीं १८४० मध्यें मुंबईस एक परमहंस नांवाची सभा काढली. ही सभा गुप्त होती. जातिभेदाचा विध्वंस हा या सभेचा मुख्य उद्देश होता. सभेच्या शाखा सगळ्या प्रांतांत पसरल्या. शाळांतल्या विद्यार्थ्यांनीं सभेच्या पटावर आपलीं नांवें नोंदलीं. मूर्तिपूजेच्या प्रघाताचा उच्छेद हा एक गौण हेतु प्रस्तुत सभासदांना साधावयाचा होता. एकदां त्यांनीं तो उद्देश सिद्धीस नेला. समाजांत दुराचाराची अभिवृद्धि करण्याकरितां ही सभा जन्मास आलेली नव्हती. जातिभेदाचें बंधन आपण पाळीत नाहीं, हें सिद्ध करण्यासाठीं ख्रिस्ती भटारखान्यांत तयार झालेला पावाचा तुकडा खाऊन वर परजातींतल्या माणसाच्या हातचे घोटभर पाणी पिण्याचा निर्बंध दर आठवडयास एकत्र जमून सभासदांना अंमलांत आणावा लागे. ईश्वराची प्रार्थना हा सभेचा दुसरा कार्यक्रम होता. ज्या काळांत ही सभा स्थापन झाली, त्या काळांत जातीजातींतल्या भेदभावांचें प्राबल्य अतिशय असल्यानें सभेच्या जनकांना व चालकांना आपलें इंगित चव्हाट्यावर येऊं नये, अशी इच्छा असणें स्वाभाविक

होते. भाऊ दाजी व दादोबा पांडुरंग यांचा सभेशीं संबंध होता, पण वागणूक कशी तुटकपणाची होती हें पुढें दिलेल्या उताऱ्यावरून वाचकांना समजेल. पुष्कळ वर्षें सभेचें गुपित फुटलें नाहीं, पण कित्येक सभासदांच्या उच्छृंखळपणानें संस्थेविषयीं लोकांत शंका उद्भवून अखेरीस तिच्या उद्देशांचा बोभाटा झाला. कोणा घरभेद्यानें सभासदांच्या नांवाची वही नापत्ता केली व ती अदृश्य झाल्याचें समजतांच सभेचें आपोआप विसर्जन झालें. सभेच्या हेतूंचा गवगवा होतांच पुष्कळ पालकांनीं आपलीं मुलें मिशनऱ्यांच्या शाळेंतून काढलीं. पुष्कळांनीं आपल्या मुलांना परगांवीं पाठवून दिलें. सगळा समाज हादरून गेला. अनेक सभासद आपापल्या घरीं, जणूंकाय आपण त्या गांवचेंच नव्हत, असें जगाला भासविण्याकरितां स्वस्थ बसले. सभेच्या विचारपुशीची उठाठेव करून मुद्दाम बहिष्कारादि संकटाला पाचारण कोण देणार ? जो तो मुग्ध राहिला आणि या मुग्धपणांतच सभेचा अंत झाला. ही गोष्ट माधवराव मुंबईला आल्यानंतर तीन चार वर्षांत घडली, तथापि पुढें पुष्कळ वर्षेंपर्यंत तो एक लोकांच्या गप्पाष्टकांचा विषय होता. समाज सुधारावा, जातिभेदाची धोंड उन्नतीच्या मार्गांतून उठवावी, या उच्च हेतूनें प्रेरित होऊन दादोबांनीं सभेला जन्मास घातलें. परंतु धर्मसंशोधनाच्या झटापटींत पुष्कळदां उदात्त हेतूंच्या पुरस्कर्त्यांना नानाविध नीच आरोपांचे धनी व्हावें लागतें आणि खऱ्या नीच पुरुषांना धर्मरक्षकाच्या सिंहासनावर अधिष्ठित होण्याची संधी सांपडते. परमहंस सभेच्या बाबतींत अशीच एक गोष्ट घडली. नायकिणींच्या परिवारापैकीं एका ब्रह्मकुलोत्पन्न साजिंद्यानें परमहंस सभेच्या उद्देशाचा छडा लावून नालस्तीचीं कवनें

रचलीं व कांहीं दिवस धर्मरक्षकांच्या पवित्र मालिकेंत जाऊन बसण्याचा अट्टाहास पुरवून घेतला. हीं पद्यें सांप्रत गणेशोत्सवामध्यें मेळ्यांमार्फत गाइल्या जाणाऱ्या कवनांच्याच मासल्याचीं होतीं. परमहंस सभेच्या अस्थींतून पुढें प्रार्थनासमाजाच्या चळवळीचा उद्भव झाला असें म्हणावयास हरकत नाहीं.

रेव्हरंड बाबा पदमजी हे परमहंस सभेचे एक सभासद होतें. त्यांनीं संस्थेच्या अंतःस्थ कारभाराची बरीच माहिती आपल्या 'अरुणोदय' नामक आत्मचरित्रामध्यें दिलेली आहे. पदमजींनीं लिहिलें आहे कीं, सभासदांची संख्या एक हजार झाली कीं, संस्थेच्या गुप्तपणाचा बुरखा फेकून तिचें अस्तित्व आणि उद्देश जाहीर करावयाचे असा तिच्या चालकांचा मानस होता, पण तो सिद्धीस गेला नाहीं. सभेचें गुपित फुटल्यावर कित्येक दिवसपर्यंत कांहीं सभासद जास्त सावधगिरीनें आपल्या बैठकी भरवीत होते, पण तिच्यांत जोम राहिला नाहीं व लवकरच तिचा अस्त झाला, असेंही पदमजींच्या हकीकतीवरून दिसते. अंतर्व्यवस्थेबद्दल पदमजी म्हणतातः—

ह्या मंडळीचीं मुख्य मतें अशीं होतीं कीं, जातिभेद मानूं नये, विधवांच्या पुनर्विवाहाविषयीं संमति असावी, व मूर्तिपूजा करूं नये. बाकीचे धर्मसंबंधीं विचार कसेही असोत, त्याविषयीं कांहीं निर्णय केला नव्हता. आणि मंडळीची संख्या मोठी वाढेपर्यंत हीं मतें गुप्त ठेवावीं, म्हणजे मंडळीची परिस्फुटता करूं नये, परंतु मंडळी वाढविण्याकरितां प्रयत्न करावे, ही एक मंडळींत येण्याची अट होती. हिच्या सभा गुप्त रीतीनें भरत. मंडळींत प्रवेश करणारास तिचे नियम वाचून दाखविल्यावर व त्यानें त्यांस आपली संमति दर्शविल्यावर तो ओंजळींत पाणी घेऊन खालीं सोडी. नंतर एक दुधाचा पेला आणून प्रथम अध्यक्षानें व दुसऱ्या कित्येकांनीं तोंडास लाविल्यावर त्याला प्यायास देत आणि

रोटीचा ( पांवाचा ) तुकडा खायास देत......सभेच्या आरंभीं व शेवटीं मराठींत प्रार्थना वाचीत, त्या रा. ब. दादोबा पांडुरंग यांनीं रचलेल्या होत्या. सभेचे अध्यक्ष त्यावेळीं कष्टमखात्याचे रा. ब. रामचंद्र बाळकृष्णजी ( राम बाळकृष्ण ) होते. रा. ब. दादोबा पांडुरंग व रा. रा. भाऊ महाजन हे जरी मंडळीच्या मताचे व मंडळीचे पुरस्कर्ते होते, तरी कधीं सभेस येत नसत. आलेच तर दुसऱ्या खोलींत बसत, व सभा विसर्जन झाल्यावर अध्यक्षाची व कांहीं निवडक मंडळीची भेट घेत. रा. ब. दादोबांचे बंधु रा. रा. दाक्तर आत्माराम पांडुरंग हे या मंडळीचें सभासद होते, पण यांची वर्तणूक अशा प्रकारची नव्हती. ते सभेस येत, इतकेंच नाहीं तर आपल्या घरीं सभा भरवीत.

नाना शंकरशेट यांचा जन्म १८०३ सालीं झाला असल्यानें उपरिनिर्दिष्ट सर्व व्यक्तींपेक्षां हे वयानें, मानानें व कर्तबगारीनें वडील होते, हें सांगावयास नको. पेशवाईच्या समाप्तीची धामधूम संपल्यानंतर मुंबई इलाख्यांत स्वजनांच्या सुधारणेसाठीं सरकारास हितावह सल्लामसलत व पदरचा पैसा देऊन नानाशंकरशेट यांनीं चिरस्मरणीय कामगीरी बजावली. त्यांच्यासारखा लोकप्रिय पुढारी मदतीला सिद्ध असल्यानें सरकारच्या उपयुक्त कार्यांना लोकांत गैरसमाजामुळें उत्पन्न होणाऱ्या प्रतिकारबुद्धीची बाधा झाली नाहीं. नानांनीं सतीच्या चालीचें निर्मूलन करतेवेळीं सरकारास अनूकूल मत कळवून साह्य केलें. १८५२ सालीं मुंबईकरांतर्फें शिमग्याच्या सणांतील अश्लील व अनीतिजनक प्रकार बंद करण्याबद्दल जो अर्ज सरकारांत गेला त्यावर नानाशंकरशेट यांची सही आहे. १८२२ सालीं इंग्रजी शिक्षणाची शाळा निघाली, १८४५ मध्यें मुलींच्या शाळेची स्थापना झाली, दरम्यान 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' नांवाची सरकारी शाळाखात्याचें नियंत्रण करणारी संस्था उत्पन्न झाली. शिक्षण प्रसाराच्या या सर्व कामांत नानांचा सर्वमान्य

-सल्लागार या नात्यानें समावेश झाला होता. शिक्षणाप्रमाणें आरो-ग्याच्या बाबतींतही नानांनीं पुष्कळ परिश्रम केले. मुंबई शहराचा विस्तार करण्याच्या कल्पनेचा प्रादुर्भाव झाला, तेव्हां नानांनीं त्या कल्पनेला मूर्तावस्थेस पोंचविण्याचा उद्योग केला. सारांश उत्तम नागरिक म्हणून त्यांचा कित्ता मुंबईच्या तरुण पिढींसमोर होता.

१८६१ सालीं मुंबईच्या चळवळ्या व्यक्तींत आणखी एका थोर व्यक्तीची भर पडून बहुजनसमाजाच्या धर्माभिमानाला मोठी भरती चढली. ही व्यक्ति दुसरी तिसरी कोणतीही नसून सुप्रसिद्ध लोकहित-वादी गोपाळ हरी देशमुख हीच होय. यांच्या टोपण नांवाचा निर्देश मागें झालेला आहेच. महाराष्ट्रांत यांनीं जितकी धामधूम उडविली तितकी त्यांच्या पूर्वी कोणीही उडविली नव्हती. १८४९ मध्यें ज्ञानप्रकाश पत्र यांच्या खटपटीनें सुरू झालें. या पत्राच्या साह्यानें लोकहितवादी हें यथार्थ नांव धारण करून यांनीं हितवादाचा असा भीषण व कर्कशनाद उठवून दिला कीं, त्या योगानें तत्कालीन समाज खचित गांगरून गेला असेल. आळस झाडून स्वोद्धाराच्या कामाचा लोकांस चेव चढण्याकरितां समाजांतल्या दोषांचें स्पष्ट कडक शब्दांनीं आविष्करण करण्यांत यांचा हात धरणारा त्याकाळीं दुसरा कोणी नव्हता.१८६१ सालीं लोकहितवादीची स्वारी मुंबईस आली. सरकारी कामानिमित्त गोपाळ हरी जेथें जेथें गेले, तेथें तेथें त्यांनीं विचारजागृतीला चालना देणारीं कामें उपस्थित केलीं. मुंबईस आल्यावर त्यांनीं वृत्तपत्र काढण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या खटपटीला मूर्तस्वरूप देणारा एक खंदा समाजसुधारक तेव्हां मुंबईस होता. माधवराव, जनार्दन सखाराम गाडगीळ हीं दुसरीं तरुण माणसें त्यांच्या

साह्यास तयार होतींच. मग लोकहितवादींच्या इच्छेचें साफल्य कालावधीवर कां पडावें? १८६२ मध्यें 'इंदुप्रकाश' हें वृत्तपत्र निघालें आणि समाजसुधारणेच्या आयुधागारांत एका नव्या शस्त्राची भर पडली.

विष्णुशास्त्री पंडित हेच मागें निर्देशिलेले सुधारक होत. यांना महाराष्ट्रांतले 'ईश्वरचंद्र विद्यासागर' अशी सार्थ उपमा देतात. सातान्यास यांचा जन्म व विद्याभ्यास झाला. यांनीं प्रथम जुन्या शास्त्रविद्येंत पारंगति मिळविली आणि नंतर इंग्रजी भाषेचें अध्ययन करून सरकारी नोकरींत कांहीं वर्षें घालविलीं. पण सरकारी नोकरींत झिजून मरण्याकरितां त्यांचा जन्म झालेला नव्हता. विधवाविवाहाच्या कार्यासाठीं त्यांची ईश्वरानें योजना केली असल्यानें थोड्याच काळांत नोकरीचा कंटाळा येऊन ते आपल्या आयुष्याचें इतिकर्तव्य बजावण्यास मोकळे झाले. विद्यासागरांनीं बंगालमध्यें जें काम चालविलें होतें, तेंच विधवाविवाहोत्तेजनाचें काम यांनीं महाराष्ट्रांत आरंभलें. विधवाविवाहासंबंधींचा विद्यासागरांच्या पुस्तकाचें मराठींत भाषांतर करून विधवाविवाहाला हिंदु धर्मशास्त्रांची अनुकूलता आहे, हें योग्य रीतीनें समजून घेतांना जिज्ञासूंस भासणाऱ्या पुस्तकाच्या अभावाची एक अडचण पंडितांनीं काढून टाकिली. या पुस्तकामुळें त्यांजवर महाराष्ट्रांतल्या शास्त्री वैदिकांचा रोष झाला. विष्णुशास्त्री असल्या रोषाला भीक घालणारे भित्रे गृहस्थ नव्हते. भीक घालण्याऐवजीं त्यांनीं स्वमतप्रतिपादनाचा धडाका चालू ठेवून या रोषाच्या आगींत तेल ओतलें. 'इंदुप्रकाश' निघाल्यावर त्यांनीं प्रत्येक आठवड्याला विधवाविवाहाचें मंडन करून जुन्या मताला चिकटून असणाऱ्या लोकांवर हल्ले चढविले. इंग्रजी भागांतून माधवराव समाज सुधारणेवर लेख लिहून त्यांस मदत करीत होते.

विष्णुशास्त्री पंडित विधवाविवाहास होणारा धर्माचा अडथळा दूर करून, कोणतें देशहित साधणार होते, हें त्यांनींच पुढीलप्रमाणें सांगितलें आहे:—

बाळपणीं वैधव्य प्राप्त झाल्यापासून होणारीं जीं असह्य दुःखें, त्यांची कल्पना, ज्यांच्या मुलींचे, बहिणींचे, सुनांचे अथवा दुसऱ्या जवळच्या संबंधीं स्त्रियांचे नवरे बाळपणीं वारले आहेत, त्यांच्या मात्र मनांत बरोबर येईल. ब्रह्मचर्याच्या धर्माचें आचरण हातून न झाल्यामुळें शेंकडो विधवा जारिणी झाल्या आहेत, व त्यांनीं गर्भनाश करून आपल्या पित्याच्या, मातेच्या, व पतींच्या कुलास कलंक लाविले आहेत. विधवाविवाह चालू केला असतां वैधव्यापासून आमरणान्त होणाऱ्या यातनांचें निवारण होईल; जारकर्माचे व गर्भनाशाचे गुन्हे कमी होतील; आणि त्यापासून अनेक कुलांची अप्रतिष्ठा होऊन त्यास कलंक लागतो, तो लागणार नाहीं. आणि जेथपर्यंत या हितावह चालीचा लोक अंगीकार करणार नाहींत तोंवर कसबिणींचा व्यापार, व्यभिचार, अगम्यगमन व भ्रूणहत्या (गर्भनाश) या गोष्टींचे गुन्हे उत्तरोत्तर वाढत जातील, कुलांचे कलंक वाढत जातील आणि विधवांचा दुःखाग्नि अधिकाधिक पेटेल.

अखेरीस समारोप करतांना ते (पृ. १४९) अत्यंत कळवळ्यानें म्हणतात—

हे अबले, हे अनाथ स्त्रिये! बाई, हिंदुस्थानांत तुझ्या दुःखास पारावरच नाहीं!!!

---

* पंडितकृत विधवाविवाह आवृत्ति दुसरी. पृ. १८.

# प्रकरण सहावें.

## विधवा-विवाह.

माधवराव सार्वजनिक कार्यांत पडले, त्यावेळीं एकंदर देशस्थितीचें स्वरूप कसें होतें, याचा बोध मागील प्रकरणावरून वाचकांना झालेलाच आहे. हिंदूंच्या षट्शास्त्रांची विद्या राजाश्रयाचे अभावीं लोकांतला मान गमावून बसली होती. वेदान्ताचें तत्त्वज्ञान हरिदास पुराणिकांच्या कीर्तनप्रवचनाबाहेर कोठेंही ऐकूं येण्याचा संभव उरला नव्हता. स्त्रीपुरुष बालादिकांचें हत्याकांड प्रत्यक्ष व्यवहारांत लोपून त्याला इतिहासाच्या पोटांत ठाव मिळाला होता. पापपुण्याच्या व्याख्या बदलत चालल्या होत्या; तीर्थक्षेत्रांच्या पुण्यप्रदतेवर लोकांचा विश्वास राहिला नव्हता; जिकडे तिकडे धर्मासंबंधीं नास्तिक्य माजलें होतें. नव्या विचारांना शोभणारी आस्तिक्याची घडी बसण्याला नुकताच कोठें पुसट पुसट प्रारंभ झाला होता; परंतु ती घडी नीट बसवून नव्या मनूस अनुसरून लोकांच्या आचारविचारांस स्थिर करून सोडण्याची कामगिरी माधवरावांच्या पिढीपूर्वी कोणाच्या हातून घडली नव्हती. ज्यांनीं पूर्वीच्या आचारांचा विध्वंस केला, त्यांनीं नव्या आचारांच्या प्रवर्तनास हात घातला, पण म्हातारपणीं रक्तांतल्या आनुवंशिक संस्काराचें

१८६२ सालीं इंदुप्रकाश पत्राचा जन्म झाल्याबद्दल पूर्वी निर्देश केला आहे. 'ज्ञानप्रकाश,' 'धूमकेतु,' 'प्रभाकर' या पत्रांचाही उल्लेख मागल्या विवेचनांत आला आहे. १८६२ पर्यंत यांतलें एकच 'ज्ञानप्रकाश' हें पत्र नांव घेण्याजोग्या स्थितींत पुण्यास चाललें होतें. त्यावेळीं कृष्णशास्त्री चिपळूणकर त्याची संपादणी करीत होते. परंतु नव्या दमाच्या सुधारणाभक्तांना त्याचा व्हावा तितका उपयोग होण्याचा संभव नव्हता. मुंबईसारख्या इलाख्याच्या राजधानींत मराठी वृत्तपत्र नसावें हें तत्कालीन कर्तबगार माणसांना लांछन वाटत असल्यास नवल नाहीं. इंदुप्रकाशानें हें लांछन नाहींसें केलें. सामाजिक सुधारणेच्या मतांचा प्रसार करणें हा जरी या पत्राचा मुख्य उद्देश असला, तरी राजकारणांत त्यानें मार्गदर्शक व्हावें अशी त्याच्या संस्थापकांची इच्छा असणें स्वाभाविक आहे. १८५७ च्या बंडानंतर इंग्रजी राज्यकारभारांत क्रांति झाली होती. कंपनीची अनियंत्रित राज्यपद्धति जाऊन महाराणी सरकारानें राज्यसूत्रें आपल्या ताब्यांत घेतलीं होतीं. हिंदी लोकमताची मुग्धता जाऊन त्याला मर्यादित वाचा फुटण्याकरितां कायदेकौन्सिलांची नवी घटना १८६१ मध्यें अस्तित्वांत आली होती. लोकांच्या सांपत्तिक स्थितीवर अनिष्ट आघात करणारे कित्येक कायदे बंडानंतर पास झाले होते; आगगाड्यांमुळें उद्योगधंद्याचे अंकूर फुटण्याचा रंग दिसत होता; इतक्या सर्व गोष्टी बाजूस सारून एकट्या समाजसुधारणेचाच टेंभा पाजळणें इंदुप्रकाशाच्या चालकांना शक्य नव्हतें. परंतु चौफेर दृष्टि फेकून एकंदर घडामोडींचें बिनचूक परीक्षण करण्याला तसाच चौकस बुद्धीचा, गहन विद्वत्तेचा आणि संयमनशील वृत्तीचा गृहस्थ संपादकाच्या खुर्चीवर असल्याखेरीज पत्राचा बोज वाढणार नाहीं, त्यांतील

मतांना लोकांत व सरकारांत मान दिला जाणार नाहीं हें इंदुप्रकाशाच्या उत्पादकांना माहीत होतें. वृत्तपत्र काढण्याच्या मसलती मुंबईस चालू झाल्या, तेव्हां माधवरावांचा त्यांत संबंध कितपत होता याविषयीं निश्चित अनुमान काढणें सोपें नाहीं. इतकें मात्र खरें कीं, वृत्तपत्र काढण्याचें ठरल्यावर माधवरावांकडे सर्वांची नजर वळली व सर्वांनीं त्याच्या इंग्रजी विभागाच्या संपादनाची जोखीम त्यांच्या अंगावर टाकली. १८६२–६३ सालीं फेलो या नात्यानें लिहिलेल्या अहवालाच्या अखेरीस माधवरावांनीं एका कामाचा नांव न देतां उल्लेख केला आहे, तो जर इंदुप्रकाशाच्या संपादकत्वाचा असेल तर असें म्हणतां येतें कीं, त्यांचा इंदुप्रकाशाशीं जबाबदार संपादक या नात्यानें फक्त चार महिनेच संबंध होता. १८६२ च्या नोव्हेंबरांत त्यांनीं हें काम पत्करलें व १८६३ च्या मार्चमध्यें सोडलें. परंतु तेवढ्या मुदतींत सगळ्या मित्रांना त्यांनीं आपल्या कामगिरीनें संतुष्ट केलें.*

इंदुप्रकाशांतून माधवरावांनीं सर्वांगीण सुधारणेचा उपदेश केल्याचें वर्णन बऱ्याच ठिकाणीं आढळतें. परंतु त्यांच्या एका लेखाचें नांव वारंवार निघत असतें. पानपतच्या लढाईला १८६१ मध्यें एक शतक संपूर्ण झालें. त्यास अनुलक्षून माधवरावांनीं एक लेख लिहिला.

---

* From Nov. 23rd 1862 to March 23rd 1863, a period of four months, the serious part of my daily working hours were employed in the discharge of private and public duty, which I need not name here. It was my first attempt of the kind and I have the proud pleasure of having done it to the entire satisfaction of my friends. It took nearly four hours of my day. About the close of march, I ceased to have any responsible connexion with the work.

त्या लेखानें वाचकांचीं अंतःकरणें हालवून सोडलीं. सरकारचेंही लक्ष त्यानें वेधून घेतलें.(वृत्तपत्राच्या क्षेत्रांत एक स्वयंप्रकाश तेजोनारायण उदयास आल्याबद्दल सर्वांची खात्री झाली.)या लेखांखेरीज दुसऱ्या लेखांचीं नांवें प्रसिद्ध नाहींत. इंदुप्रकाशच्या त्यावेळच्या फायली सांप्रत अलभ्य झाल्या आहेत, परंतु माधवरावांच्या संपादकत्वासंबंधीं कित्येकांनीं ज्या आठवणी त्यांच्या मृत्यूनंतर दिल्या आहेत, त्यावरून असें सांगतां येतें कीं, माधवरावांनीं रेल्वेखात्यांतल्या अरेरावीवर लेखणीचा मोर्चा वळवून लोकांचीं गाऱ्हाणीं दूर करण्यासाठीं जोराचा प्रयत्न केला. बोरघाटांतून आगगाड्यांच्या येरझाऱ्या सुरू झाल्यानंतर थोड्या महिन्यांनीं एक मोठा अपघात होऊन पुष्कळ माणसें प्राणास मुकलीं. रेल्वेच्या अधिकाऱ्यांनीं प्रसिद्ध केलेली माणसांच्या हानीची संख्या खरी नसावी असा संशय आल्यावरून माधवरावांनीं तसें लिहिलें. यामुळें रेल्वेकडील अंमलदारांचें पित्त खवळून कागदोपत्रीं उभयपक्षीं झटापटी उडाल्या. अखेरीस अपघाताची चौकशी करणाऱ्या कमिशनाच्या तपासणींत माधवरावांचा संशय खरा ठरून रेल्वेच्या अधिकाऱ्यांचा पराभव झाला. माधवरावांच्या विचारांत उच्छृं-खलपणा आढळण्याचा तेव्हांही संभव नव्हता, परंतु त्यांच्या भाषेंत बराच तिखटपणा असावा असें मानण्याला जागा आहे. अहंमदनगराचा एक इंग्रज अधिकारी हाताखालच्या कामदारांशीं फाजील गुर्मीनें वागून त्यांस निष्कारण त्रास देतो, अशाविषयीं इंदुप्रकाशामध्यें माधवरावांच्या संपादकीय कारकिर्दींत चर्चा चालली असतां 'इंग्रजी लेखांतून तीक्ष्ण भाषेचा उपयोग केला जातो' असा दुसऱ्या सरकारी अंमलदारांनीं शेरा ठोकल्याचें पहावयास सांपडतें. या वादांत अखेरीस नगरच्या

अधिकाऱ्यांवर सरकारांतून कानउघाडणीचा प्रयोग होऊन माधवरा-वांनीं घेतलेला पक्ष विजयी झाला. माधवरावांना इंदुप्रकाशचा संपाद-कीय संबंध लवकरच सोडावा लागला असला तरी ते पुढें पुष्कळ वर्षेपर्यंत त्या पत्रांतून लेख लिहीत होते. त्यांचे १८७७ मध्यें 'रेव्हिन्यू मॅन्युअल' नांवाचें जें पुस्तक प्रसिद्ध झालें, त्यांतील प्रकरणें प्रथम इंदुप्रकाशांतून, लोकांच्या वाचनांत आलीं होतीं.

इंदुप्रकाशांच्या द्वारें माधवरावांनीं केलेल्या कामगिरीचें अग-दीं त्रोटक स्वरूप वर दिलें आहे. या पत्राशीं संबंध जडल्यानें त्यांना ज्या कार्यांत पुढाकार घ्यावा लागला, ती कामगिरी निराळीच आहे. विष्णुशास्त्री पंडितांनीं विधवाविवाहाच्या मंडनासाठीं इंदुप्रकाशांतून अतिशय जोरदार लेख लिहिले. १८६२ सालीं म्हणजे प्रस्तुत पत्राचा जन्म झाला त्यावर्षीं एक विधवाविवाह झाला. हा गुप्त राहिल्यामुळें त्यावरील जनप्रक्षोभाच्या झंझावातांत सांपडण्याचा प्रसंग टळला. इंदुप्रकाश निघाल्यावर तीन वर्षांनीं विधवाविवाहाला समाजांत सदैव वृद्धिंगत होतां यावें म्हणून विधवाविवाहोत्तेजक मंडळ नांवाची संस्था स्थापन झाली. या संस्थेच्या पदरांत महाराष्ट्रांतल्या दोघा बड्या गृहस्थांची अनुकूलता सुरवातीलाच पडली. जमखिंडीचे अधिपति व माधवराव विंचूर-कर हेच ते दोन बडे गृहस्थ होत. जमखिंडीकरांनीं अध्यक्षाची जबाबदारी स्वीकारली. विंचूरकर उपाध्यक्ष झाले. चिटणिसाचें काम करण्याची हमी विष्णुशास्त्री पंडितांनीं घेतली. सभासदांत माधवरावांनीं आपलें नांव घातलें. विधवाविवाहाच्या चळवळीला संघटित स्वरूप आलें. संघी-करणावांचून कोणत्याही चळवळीला बहुजनसमाजाच्या प्रतिकूलतेमधून प्रगतीची वाट पाडतां येत नाहीं. जोंवर एखादी चळवळ व्यक्तीला

चिकटून असते तोंवर तिच्यांत चिरस्थायित्वाचा संभव नांदत नाहीं. पण तीच संस्थेच्या रूपानें संघटित झाली कीं तिचें सामर्थ्य कार्यक्षम होऊं लागतें. १८६५ मध्यें विधवाविवाहाच्या कल्पनेला व्यवस्थित संस्थेची मूर्तावस्था विष्णुशास्त्री व त्यांचे सहकारी मित्र यांनीं प्राप्त करून दिली. त्यावर्षीं शंकराचार्यांचा मुक्काम रत्नागिरीस होता. तेथें विधवा-विवाहाचे अभिमानी होते, त्यांनीं हा विवाह सशास्त्र कीं अशास्त्र या वादाच्या निर्णयाचें कोडें शंकराचार्यांपुढें ठेवलें. शंकराचार्यांनीं प्रस्तुत वादाचा निर्णय लावण्याचें कर्तव्य रोकठोक बजावण्याऐवजीं रत्नागिरीकरांना बुचकळ्यांत टाकून आपला मुक्काम तेथून हालविला.

शंकराचार्यांनीं विधवाविवाहाच्या प्रश्नाला उत्तर न देतां स्थलांतर केलें, पण हिंदूधर्माच्या अभिमानाचें ओझें वहाणाऱ्या शास्त्रीपंडितांनीं मुंबईला विधवाविवाहाची संस्था निघाल्याबरोबर 'हिंदूधर्म व्यवस्थापक सभा' नांवाची संस्था काढून विधवाविवाहाच्या पुरस्कर्त्यांना द्वंद्वयुद्धाचें आव्हान दिलें. विष्णुशास्त्री पंडितांनीं त्या आव्हानाचा स्वीकार करून ज्या योगानें प्रतिपक्षांला एका क्षणाचीदेखील फुरसत मिळणार नाहीं, असें तुंबळ वाग्युद्ध आरंभलें. या दिवसांत स्वपक्षाला विजय प्राप्त होण्या-साठीं पंडितांनीं स्वतःच्या जिवाकडे न पहातां अतिशय परिश्रम केल्या-बद्दल पुष्कळ आख्यायिका प्रसिद्ध आहेत. पण हे परिश्रम करण्याचें सामर्थ्य त्यांना कोठून आलें? आपला पक्ष खरा आहे, प्राचीन शास्त्र-ग्रंथ त्याला अनुकूल आहेत 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी' या न्यायानें लोकांच्या समजुतींत घुसून शेकडों वर्षांपासून त्यांच्या हृदयावर निष्कं-टक स्वामित्व गाजविणारी रूढि आपल्या पक्षाला डोकें वर काढूं देत नाहीं; म्हणून स्वानुकूल शास्त्रवचनांच्या माऱ्याखालीं ओढून या प्रबळ

रूढीच्या अज्ञानमग्न असंख्य भक्तांची दाणादाण उडविली पाहिजे, ही विष्णुशास्त्री पंडितांची खात्री त्यांस लढण्याची प्रेरणा देत होती, यांत संदेह नाहीं. पण बलाढ्य प्रतिपक्षाशीं झुंजतांना त्यांच्या पाठीशीं माधवराव आणि त्यांच्यासारखे अनेक वजनदार तरुण साह्यार्थ उभे होते हें विसरतां कामा नये. अवाडीवर जाऊन लगटीचा सामना देणाऱ्या या वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध वीराची पीच्छेहाट न व्हावी एतदर्थ त्यांनीं आटोकाट प्रयत्न चालविला होता. विष्णुशास्त्री पंडित एकट्या मुंबईंतच वादसंग्राम करीत नव्हते. महाराष्ट्रांतल्या पुष्कळ शहरांत जाऊन त्यांनीं नवीन रणक्षेत्रें उत्पन्न केलीं. विधवाविवाहाच्या या वादाकडे पाहिल्यास विषम युद्धाचा देखावा दिसूं लागतो. रावणाच्या राजधानीवर चाल करून गेलेल्या रामाची जशी स्थिती होती तशीच विधवाविवाह प्रतिबंधाच्या रूढीवर मोहीम काढणाऱ्या विष्णुशास्त्री पंडितांची स्थिति होती. रूढीच्या छावणींत माणसांची तूट नव्हती; किंबहुना प्रत्येक मनुष्य तिच्या बाजूस होता. परंपरेचे व शास्त्राचे भक्कम बुरूज रूढीच्या बचावाला सिद्ध होते. विधवाविवाहमंडनाचा पक्ष मनुष्य बळांत जसा हीन तसाच शास्त्राधाराच्या बाबतींत हीन होता; फक्त कांहीं शास्त्रवचनें या पक्षाला धीर देत होतीं; लोकांतील निस्सीम अज्ञानाच्या तटबंदींत रूढीच्या फौजा सुरक्षित होत्या; विवेकबुद्धीची सेना उघड्या मैदानावर होती; त्यांची मूठभर संख्या विरोधी पक्षाला स्पष्ट दिसत होती; परंतु सलामीच्या पहिल्या चकमकी झाल्यावरोबर रूढीचा पक्ष भेदरून गेला, यांत संशय नाहीं आणि जेव्हां विष्णुशास्त्री पंडितांनीं इंदुप्रकाश पत्रांतून विवाहास तयार असलेल्या विधवेची जाहीरात फडकावली, तेव्हां गाळण उडून रूढीच्या पुरस्क-

त्यांनीं सर्वत्र शंकराचार्यांचा धावा सुरू केला. एखादी उच्छृंखळ विधवा लग्नाला तयार झाली तरी तिचें पाणिग्रहण करण्याला कोणी पुढें येणार नाहीं, असा निषेधपक्षाचा प्रथम समज होता. पण तो अल्पावकाशांत खोटा ठरून त्या पक्षाचें धाबें दणाणलें.

माधवरावांचा मुक्काम यावेळीं मुंबईसच होता. निषेधपक्षाला कासावीस करून सोडणारा जोराचा आघात करण्यासाठीं विधिपक्षानें गोपाळ हरि देशमुख, जनार्दन सखाराम गाडगीळ, विष्णु परशुराम रानडे, विष्णुशास्त्री पंडित, श्रीकृष्णशास्त्री तळेकर, महादेव गोविंद रानडे, विष्णु मोरेश्वर भिडे, अशा सातजणांच्या सह्यांची एक निमंत्रण पत्रिका प्रसिद्ध केली. मग हिंदुधर्म व्यवस्थापक सभेच्या चालकांची धांदल झाली. आपलें सगळें सामर्थ्य एकवटून प्रतिपक्षाला चिरडावें असा त्या सभेच्या चालकांचा डाव होता, पण तो सिद्धीस जावा कसा ? पुनर्विवाहाला शास्त्राधार आहे, अशाविषयीं आमची खात्री अगोदर पटवा आणि नंतर योजलेला विवाह पार पाडा अशा अर्थाचे निरोप पंडितांकडे येऊं लागले. पंडितांच्या साह्यकर्त्यांना कोठेंही तोंड चुकविण्याची सोय नव्हती. निषेध पक्षाचें आव्हान मान्य करून त्यानें भरविलेल्या सभेंत जर पंडितांचे सहकारी हजर राहिले नाहींत, तर 'जितं जितं' म्हणून आरोळ्या ठोकून प्रतिपक्षाचा पराभव केल्याची फुकट शेखी मिरवायला त्या पक्षाला सवड सांपडली असती. अशी सवड देणें म्हणजे आपल्या पक्षाची निर्बळता आपल्या तोंडानें कबूल करण्यासारखें आहे, हें जाणून एका सभेला माधवराव, वागळे, विष्णु परशुराम रानडे वगैरे मंडळी गेली. योजलेल्या विवाहाची तिथी बदलण्याविषयीं रूढीच्या पुरस्कर्त्यांनीं आग्रह धरला. विवाहाची सर्व तयारी झाल्यामुळें

हा आग्रह व्यर्थ होता. उभयपक्षीं याबद्दल प्रथम जें सामोपचाराचें बोलणें चाललें होतें, ते थोडया वेळांत बंद पडून त्याला बाचाबाचीचें स्वरूप आलें; नंतर धक्काबुक्कीला प्रारंभ होऊन सभा मोडली. सभेंतल्या बखेडयाचा फायदा घेऊन रूढीच्या भक्तांनीं रानडे, वागळे, वगैरे मंडळीला, मारामारी केल्याचा आरोप लादून फौजदारी अदालतींत खेंचले. त्यामध्यें त्रास देण्याचा एक हेतु होताच, पण जमल्यास कालापहरण करून विवाहास प्रवृत्त झालेल्या लोकांची पांगापांग घडवून आणावी, असा दुसरा हेतु होता. पण तो यशस्वी झाला नाहीं; कारण फौजदारींत गेलेली फिर्याद पुराव्याच्या अभावीं काढून टाकण्यांत आली. फिर्यादीचा अखेर करतांना मॅजिस्ट्रेटानें ‘ कोणीही आपला विजय झाला असें समजूं नये आणि हें प्रकरण येथें मिटवावें ’ असा समजुतीचा सल्ला देऊन वादीप्रतिवादींची बोळवण केली. हा खटला निकालांत निघण्यापूर्वी विष्णुशास्त्री पंडितांचा वेगळ्या रीतीनें उत्साहभंग करण्याची खटपट चालली होती. नियोजित विधवाविवाह सिद्धीस नेण्याचा हट्ट न सोडल्यास ‘ तुमची धडगत नाहीं ’ अशी त्यांना कांहीं धर्माभिमानी माथेफिरूंनीं धमकी दिली. करसनदास मूळजींना अशा प्रकारच्या धमकीमुळें पोलिसांच्या पहाऱ्यांत रहाण्याचा प्रसंग पूर्वी आला होता. विष्णुशास्त्री पंडितांना जर एका अकारण मित्रानें ऐनवेळीं मदत केली नसती, तर कदाचित् तोच मार्ग त्यांसही पत्करावा लागला असता. स्वतःसाठीं पोलीसांचा आश्रय मागण्याची नामोषी पंडितांच्या बाबतींत टळली. तरी त्यांना पोलिसांकड जाण्याचें थोडें सव्यापसव्य करावें लागलेंच. ज्यांनीं उघड तोंडावर धमकी दिली, त्यांना पंडितांनीं पोलिसांच्या स्वाधीन करून त्यांचे

जातमुचलके घ्यायला लावले. पंडितांची बाजू न्यायाची आहे, त्यांचा छळ हिंदूसमाज विनाकारण करीत आहे,- ही गोष्ट एका आखाडयाच्या वस्तादाला पटली होती. ' इंदुप्रकाश छापखान्याला आग लावूं, पुनर्विवाहासाठीं उभारलेल्या मंडपाला जाळून टाकूं. इतक्यानें न भागल्यास तुम्हांला ठार मारूं, अशा विष्णुशास्त्री पंडितांना दटावण्या मिळूं लागल्या, तेव्हां आपली मैत्री व सहानुभूति कारणीं लावण्याची वेळ आली असें ओळखून या तालीमबाज वस्तादानें उलट निरोप पाठवून पंडितांना भय घालणाऱ्या माथेफिरूंना बरोबर स्वस्थ बसावयास भाग पाडलें व अशा रीतीनें त्यांच्या वटवटीला कुलूप ठोकलें. बदमाश गांवगुंडांचा बंदोबस्त झाल्यानंतर विष्णुशास्त्र्यांचा मार्ग आपोआपच निर्विघ्न झाला व त्यांनीं महत्प्रयासानें जुळवून आणलेला विवाह ता. १५ जून १८६९ जेष्ठ शुद्ध ६ मंगळवार शके १७९१ रोजीं मोरोबा कान्होबा * यांनीं मुद्दाम श्रृंगारलेल्या वाडयांत झाला. या समारंभाला सर्व जातीची शेंकडो मंडळी आली होती. वधूवरावर झालेल्या अहेराच्या वृष्टीची मोजदाद केली, तेव्हां एकंदर आंकडा तीन हजार भरला. ही रक्कम वधूच्या नांवानें बँकेंत ठेवण्यांत आली. जो विवाह होऊं नये, म्हणून निषेधपक्षानें निकराचा प्रयत्न चालविला होता, तो विवाह शेवटीं सर्वांच्या डोळयादेखत मोठया थाटानें पार पडल्याचें पाहून धर्माभिमानी मंडळींचीं अंतःकरणें करपून गेलीं. धर्माला मंजूर नसलेलें विवाहकर्म तडीस नेणारांना कोणत्या साधनाच्या जोरावर शिक्षा द्यावी, हें त्यास कांहीं

---

* हे गृहस्थ विधवाविवाहाचे दांडगे पुरस्कर्ते होते. यांनीं स्वतः पुनर्विवाह करून स्वज्ञातींत या विवाहाचा प्रचार पडण्याकरितां प्रयत्न चालविला होता. यांच्या स्वभावांत कांहींसा विक्षिप्तपणाचा किंवा वृत्तिचांचल्याचा भाग असला तरी विधवांच्या उद्धारांच्या बाबतीतले त्यांचे विचार अखेरपर्यंत स्थिर होते.

काळ समजेना. बहिष्कार हा एकच उपाय हिंदुधर्म व्यवस्थापकास दिसत होता, पण त्याला हात घालावा तर बेअब्रू केल्याच्या आरोपावरून बहिष्कृत मंडळी आपल्याला इंग्रजी कायद्याच्या कोर्टांत ओढण्यास कचरणार नाहीं व मग 'भीक नको पण कुत्रा आवर' असें म्हणत बहिष्कृतांपुढें नाकधुऱ्या काढून क्षमेची याचना करण्याचा प्रसंग येईल अशी शंका हिंदुधर्म व्यवस्थापकांना सदर उपायाची निष्फलता सुचवीत होती. पण या अडचणींतून हायकोर्टाचे जज्ज झालेले मुंबईचे एक सुप्रसिद्ध वकील नानाभाई हरिदास यांनीं सुटका केली. जातिबहिष्काराला इंग्रजी कायद्याची आडकाठी नाहीं असा त्यांजकडून सल्ला मिळतांच हिंदूधर्मव्यवस्थापकांना देव पावण्याइतका अत्यंत आल्हाद झाला व त्यांनीं सभा भरवून बहिष्काराच्या फर्मानाला लोकांची अनुमति मिळविली. शंकराचार्यांकडून पसंतीचा शिक्का आणविला आणि गांवोगांवीं निमंत्रणपत्रिकेवर सह्या करणारे सातजण, विधवावधूचे दोघे बंधु, तिचे पाणिग्रहण करणारा गृहस्थ व सदर वधू अशा अकराजणांना बहिष्कार घालण्याविषयीं आज्ञापत्रें रवाना केलीं. विधवाविवाहाच्या पुरस्कर्त्यांनीं पूर्वोक्त विवाहानंतर जंगी भोजनसमारंभ केला होता व त्यांत पुष्कळांनीं भाग घेतला होता. अर्थात या अकरा जणांना वाळींत ढकलून भागणार नव्हतें, म्हणून आज्ञापत्रांत 'तत्संसर्गी' लोकांशीं अन्नोदक व्यवहार न करण्याविषयींचें कलम होतें. पुण्यास तुळशीबागेंत धर्माभिमानी लोकांची सभा होऊन तेथें मुंबईच्या पुनर्विवाहाचा समग्र पाढा वाचण्यांत आला. पांच सहा हजार श्रोते जमले होते. मुंबईच्या 'व्यवस्थापक' सभेनें पाठविलेल्या बहिष्कारपत्राचा मसूदा सर्वानुमतें पास झाला. अन्यत्र अशा सभा भरल्या. वादाच्या वावटळीनें

सारें महाराष्ट्र व्यापलें. इतरांबरोबर माधवरावांचे हाल सुरू झाले. पण त्या हालांचें वर्णन करण्यापूर्वी माधवराव आणि त्यांचे सहकारी यांच्या कोणकोणत्या हालचाली सुरू होत्या, याची माहिती देणें योग्य आहे. बहिष्काराचे जाहीरनामे निघाल्यावर, हा 'बहिष्कार निरर्थक आहे विधवाविवाह शास्त्रसंमत असल्यानें धर्मविरुद्ध आचरणाच्या प्रतिकारासाठीं शास्त्रांनीं प्रतिपादिलेलें बहिष्काराचें शस्त्र विधवाविवाहाच्या पुरस्कर्त्यांवर चालविणें अयोग्य किंवा सारासारविचारास सोडून आहे. अशा आशयाचे जाहीरनामे गांवोगांव विष्णुशास्त्री पंडितांनीं वाटले व भिंतीवरून चिकटविले. त्यांत आणखी असा मजकूर होता कीं, ज्या कोणाला विधवाविवाहाची सशास्त्रता पटत नसेल त्यांच्याशीं वाद करण्याला विष्णुशास्त्री पंडित तयार आहेत. इतर ठिकाणांप्रमाणें एक जाहीरनामा कऱ्हाडक्षेत्रांत लावण्यांत आला. तो पाहून तेथल्या एका विद्वान् गृहस्थाला पंडितांशीं झुंज खेळण्याची इच्छा उत्पन्न झाली.

धर्मसंस्थापकाच्या गादीवर बसून दिवसा मशाली पाजळीत गांवोगांव पादपूजा घेणारे शंकराचार्य हा वेळपावेतों स्वस्थ मूग गिळून बसले होते. विधवाविवाहपुरस्काराच्या रूपानें धर्माच्या मुळावर उठलेलें संकट दिवसानुदिवस वाढत चालल्यामुळें भीतिग्रस्त झालेल्या धर्मभक्तांचा आर्तस्वर त्यांच्या कानावर जात होता, पण शंकराचार्यांनीं कानांत दडे भरून त्या स्वराचा मनावर परिणाम न घडूं देण्याची जणूं काय खबरदारी घेतली होती. अखेरीस धर्मभक्तांनीं फारच कटकट चालविली, तेव्हां स्वतः पुढाकार घेण्याऐवजीं त्यांनीं कऱ्हाडक्षेत्रांतल्या पूर्वोक्त गृहस्थाला विधवाविवाहखंडनाच्या स्वारीवर पाठवून दिलें. हे गृहस्थ विठोबा अण्णा दप्तरदार या नांवानें महाराष्ट्राच्या परिच-

याचे आहेत. हे मोठे धर्मनिष्ठ आणि ईश्वरभक्त होते. त्यांच्या अंगीं रसिकतेचा मोठा गुण होता. त्यांची वक्तृत्वशक्ति उच्च प्रतीची होती. शंकराचार्यांनीं सोपविलेली कामगिरी शेवटास नेण्याकरितां जे श्रम करावयास पाहिजेत, ते श्रम करण्याची आस्था व दगदग सोसण्याचा कंटकपणा त्यांजपाशीं भरपूर असल्यानें ते शंकराचार्यांची अनुज्ञा मिळतांच पुण्याकडे येण्यास निघाले. मार्गांत त्यांचा सर्वांनीं आशीर्वादात्मक जयजयकार केला. वाईस त्यांनीं व्याख्यानें दिलीं. पुण्यास पोंचल्यावर विष्णुशास्त्र्यांकडे वाद कोणत्या अटीवर करावयाचा, याविषयीं त्यांचें बोलणें सुरू झालें. परंतु त्या बोलण्याचा निकाल लागण्यापूर्वीच लोकांच्या प्रोत्साहनास बळी पडून विठोबा अण्णांनीं पुनर्विवाहाविरुद्ध व्याख्यानें देण्याला सुरवात केली, युद्धारंभाचीं चिन्हें कोठेंही नसतां एकाएकीं हा व्याख्यानांचा गोळीबार होऊं लागतांच पंडितांना आपल्या व्याख्यानांची उलट सरबत्ती करण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. पुण्याच्या एका वाड्यांत विठोबा अण्णांनीं वक्तृत्वाचा बाजार उघडला व दुसऱ्या एका वाड्यांत पंडितांनीं आपल्या हृदयग्राही रसवंतीचा लाभ पुणेकरांना मिळण्याची व्यवस्था केली. दोघेही वक्तृत्वगुणांत तुल्यबळ होते. दोघांचीं भाषणें लोकांची सारखीच खात्री पटवीत होतीं, पण दोघांचे समोरासमोर कधींच दोन हात झाले नाहींत. पुण्यास असा प्रकार कांहीं दिवस चालून दोघे प्रतिस्पर्धी मुंबईस आले. विठोबा अण्णांनीं तेथें वरींच व्याख्यानें दिलीं. मुंबईपुण्यास वादाला असा रंग चढूं लागला, तेव्हां शंकराचार्यांची स्वारी दरमजल दरकूच करीत वादनिर्णयार्थ पुण्यास येण्याकरितां निघाली. १८७० सालच्या मार्च महिन्यांत श्रींची स्वारी पुण्यास येऊन दाखल झाली. तेथें महाराष्ट्रांतल्या अनेक

संस्थानिकांनीं त्यांचा सन्मानसत्कार केला. ड्यूक आफ एडिंबरोचें हिंदुस्थानांतील आगमन साजरें करण्यासाठीं पुण्याला दक्षिणचे सरदार, संस्थानिक, जहागिरदार गोळा झाले होते. जगद्गुरूंच्या स्वागतकर्मोची पुण्याई त्यांना यामुळें सहजच ' वहात्या गंगेंत हात बुडवून पापक्षालन करण्याप्रमाणें ' गांठीस मारण्याची संधी सांपडली. पुण्यास पोंचण्यापूर्वी शंकराचार्यांनीं पुष्कळ संस्थानिकांकडे पत्रें पाठविलीं होतीं. त्यामुळें इंदूर, ग्वालेर, बडोदें वगैरे संस्थानी राजधान्यांतील राजाश्रित शास्त्री वादानिमित्त पुण्यास आले. काशी, नाशिक, वाई वगैरे क्षेत्रांतून येऊन कांहीं शास्त्रीमंडळीनें पुण्याला श्रींच्या दरबाराची शोभा वाढविण्यास मदत केली.

पुनर्विवाहाच्या वादांतील या शेवटच्या प्रकरणाची हकीकत सांगण्यापूर्वी माधवराव १८६९ सालाच्या उत्तरार्धांत काय करीत होते, याचें ज्ञान करून देणें आवश्यक आहे. पुनर्विवाहाच्या धुमश्चक्रींत सर्वत्र विष्णुशास्त्री पंडितांची मूर्ति झळकत होती. ज्याच्या त्याच्या तोंडीं त्यांचेंच नांव बसलें होतें. पंडितांच्या कामगिरींत स्वयंस्फूर्तीचा अंश अतिशय होता, याबद्दल कोणासही शंका बाळगण्याचें कारण नाहीं. तथापि त्यांच्या कर्तबगारीचा प्रवाह दरवर्षास वाढत चालला होता, याचा खुलासा पाहिल्यास त्यांच्या स्वयंस्फूर्तीला माधवराव आणि दुसरी मंडळी यांच्या कर्तबगारीची जोड मिळाली म्हणून तो प्रवाह फुगला व विस्तीर्ण झाला असें दिसून येतें. विष्णुशास्त्री महाराष्ट्रांतल्या प्रतिकूलतेशीं एकाग्रचित्तानें झगडत असतांना माधवराव साऱ्या हिंदुस्थानांत पुनर्विवाहाला अनुकूलता प्राप्त करून देण्याकरितां खटपट करीत होते. ज्या ज्या ठिकाणीं इंग्रजी विद्येच्या प्रभावास अनुसरून नव्या पद्धतीनें

राष्ट्रहिताचा विचार करणारी मंडळी दिसेल, त्या त्या ठिकाणीं वजनदार गृहस्थांकडे माधवरावांचीं पत्रें जात होतीं. सामाजिक सुधारणेचा, विशेषतः पुनर्विवाहाचा, प्रश्न लोकांनीं हातीं घ्यावा, पुनर्विवाहाला ज्यांची अनुकूलता असेल त्यांनीं मुंबईच्या विधवाविवाहोत्तेजक मंडळीसारख्या संस्था काढाव्या, संस्थांच्या भूमिकेवर दृढासन ठोकून प्रतिकूळ समाजाचें मन वळवावें, त्यासाठीं ठिकठिकाणच्या तज्ज्ञांचीं मतें मागवावीं, वादविवादाच्या जोरावर विरोध जिंकावा, अशा अर्थाचीं पत्रें माधवरावांकडून उत्तर हिंदुस्थानांत गेल्यावर त्यांची जाहीर रीतीनें चर्चा होऊं लागली. माधवरावांचें पत्र एखाद्या ठिकाणीं जाऊन तेथें कांहीं चळवळ झाल्यास तिचा परामर्ष घेणें स्थानिक वृत्तपत्रांचें कर्तव्य होतें; तसा परामर्ष घेतला गेला म्हणजे त्या बोभाट्यानें जास्त खळबळ माजे; मग दोन पक्ष उत्पन्न होऊन विचारजागृतीची लाट पसरण्याचें कार्य मार्गाला लागल्याशिवाय रहात नसे. माधवरावांनीं पत्रांच्या टोंचणीनें अनेक ठिकाणच्या लोकांना कार्यप्रवृत्त केल्याचे दाखले वृत्तपत्रांतून आढळतात. परंतु या पत्रांचा विशेष चिरस्थायी उपयोग झाला असें म्हणता येत नाहीं. एखाद्या गांवांतल्या वाचनालयाच्या चिटणिसाला माधवरावांचें पत्र पोंचलें म्हणजे त्यानें चारचौघांचा सल्ला घेऊन सभा भरवावी, सभेंत पुनर्विवाहादि विषयांचा ऊहापोह व्हावा आणि सभेच्या विसर्जनाबरोबर या विषयांनां अशा चिटणिसांसह त्या गांवच्या सर्व लोकांनीं रजा द्यावी, यापलीकडे माधवरावांच्या पत्रांचा परिणाम कधीं गेला नसावा, असा निष्कर्ष निघतो. माधवरावांची काम करण्याची पद्धत कशी होती हें समजण्याला मात्र या पत्रलेखनाचा वरील वृत्तांत उपयोगी आहे.

शहरोशहरीं हिंडून तेथील जनतेच्या कानावर आपले विचार घालण्याचें कर्तव्य माधवरावांनीं या वर्षी बजावल्याची नोंद विधवा-विवाहविषयक हकीकतींतून सांपडते. गोपाळ हरी देशमुख, माधवराव वगैरे कांहीं निवडक मंडळी त्यासाठीं बडोद्यास गेली होती. बडोद्यास त्यावेळीं खंडेराव महाराज गायकवाड हे राज्यकारभार चालवीत होते. वरील मंडळीचें आगमन म्हणजे धर्मावरलें परचक्रच, असा बडोद्याच्या शास्त्रीपंडितांचा ग्रह होणें स्वाभाविक होतें. खंडेराव महाराजांना ही गोष्ट कळली, तेव्हां त्यांनीं पुनर्विवाह सशास्त्र कीं अशास्त्र याचा निर्णय लावण्याकरितां आपल्या शास्त्रीवर्गाला आज्ञा केली. पण वादाच्या कांहीं अटी चमत्कारिक होत्या. जो पक्ष हरेल त्यानें शिक्षा भोगावी असें अटींतलें एक कलम माधवरावांदि मंडळीला मान्य करणें शक्य नव्हतें. यामुळें त्यांस मुंबईला परत यावें लागलें. खंडेराव महाराजांच्या धैर्याबद्दल त्यांना त्यांच्या प्रजेनें धन्यवाद दिला. तेथल्या शास्त्रीवर्गाचा जीव, आपलें शास्त्रज्ञान कसास लागण्याचा प्रसंग टळल्याचें पाहून, खालीं पडला. बडोद्याला पुनर्विवाहप्रवर्तकांनीं फेरी मारली, तसाच प्रकार न जाणो पुढें मागें आपल्या राजधानींत होईल, अशा भीतीनें ग्वालेरला जयाजीराव महाराजांनीं 'जो कोणी पुनर्विवाहास अनुकूलता दाखवील त्यास हद्दपारीची शिक्षा भोगावी लागेल' अशी तंबी दिली. ग्वालेरचे शास्त्री शंकराचार्यांच्या निमंत्रणावरून पुण्याला जाण्यास सिद्ध झाले, तेव्हां शिंदे महाराजांनीं त्यांस पुनर्विवाहाला विरोध करण्याविषयीं निक्षून सांगितलें. या हालचाली सुरू असतां पुण्याला शंकराचार्यांसमोर होऊं घातलेल्या वादाची सिद्धता पूर्णत्वास पोंचल्यानें विष्णुशास्त्री पंडित, माधवराव, भांडारकर वगैरे मंडळी तिकडे गेली.

शंकराचार्यांसमोर पुण्याला झालेला वाद हा महाराष्ट्राच्या इतिहासांतला एक संस्मरणीय प्रसंग आहे. १८७० सालच्या मार्च महिन्यांत हा वाद नऊ दिवस चालला होता. दोन्हीं बाजूस नामांकित शास्त्र्यांची पंच या नात्यानें नेमणूक झाली होती. पुनर्विवाहाच्या बाजूस कृष्णशास्त्री चिपळुणकरांची पंचाच्या जागीं नेमणूक करतांना त्यांनीं मागें एकदां युरोपियनाबरोबर फळफळावळें खाल्ल्याचें पाप आडवें आलें. पांचशे रुपयांचा भूदंड ब्राह्मणांच्या गळ्यांत ओतून सक्षौर सर्वदेहप्रायश्चित्त त्यांनीं घेतलें, तेव्हां त्यांना पंचाच्या आसनावर बसण्याला आवश्यक असणारी पवित्रता लाभली. तोंडी व लेखी असा हा दुहेरी वाद चालला होता. एखादा मुद्दा निघून त्याचा खल झाला कीं, तो कागदावर उतरावयाचा दुसऱ्या दिवशीं त्याला लेखी उत्तर द्यावयाचें, किंवा नवा मुद्दा मांडावयाचा, अशी वादाची पद्धत होती. वाद ऐकण्यास व पाहण्यास काशी, कऱ्हाड, वाई, नाशिक, सातारा, नगर, नागपूर, इंदूर, ग्वालेर, मुंबई, माहुली, सांगली वगैरे ठिकाणाहून सुमारें दोनशें मंडळी आली होती. त्याशिवाय पुण्याची मंडळी होतीच. मंडनपक्षातर्फे विष्णुशास्त्री पंडित काम चालवीत होते. खंडनाची तरफदारी नारायणाचार्य गजेंद्रगडकर करीत होते. पंडित व गजेंद्रगडकर हे दोघे गुरुबंधु या वेळीं परस्परांचे विरोधी झाले. पंडितांना शास्त्राधार व मुद्दे सांगण्याची कामगिरी माधवराव, जनार्दन सखाराम गाडगीळ, रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्याकडे आली होती. भांडारकरांना पंचांत दाखल करावें, अशी मंडनपक्षाची इच्छा होती, पण अभक्ष्यभक्षणाचा दोष जसा कृष्णशास्त्री चिपळूणकरांना नडला, तसाच सारस्वत जातींत जन्मास आल्याचा दोष भांडारकरांना या प्रसंगीं जाचला. फरक इतकाच कीं,

चिपळूणकरांना प्रायश्चित्ताच्या तोडग्यानें पावन होतां आलें व भांडारकरांचा दोष जन्मसिद्ध असल्यामुळें त्यावर उपाय नव्हता म्हणून पंचांऐवजी मदतनिसांच्या मालिकेंत बसण्याची त्यांजवर पाळी आली. खंडनपक्षाच्या वतीनें गजेंद्रगडकरांना विठोबा अण्णासकट सहा असामी वादाचें साहित्य पुरवीत होते. फाल्गुन वद्य एकादशीस वादाला प्रारंभ झाला आणि तो चैत्र शुद्ध तृतीयेस संपला, शेवटीं पंचांनीं मतें जाहीर केलीं. जर दोन्ही बाजूंच्या पंचांची संख्या सारखी झाली तर सरपंच सांगतील तो निर्णय मान्य करण्यांत यावा, असें वादाच्या अटींत एक कलम होतें. ग्वालेरचे गोपाळाचार्य कऱ्हाडकर सरपंच होते. पण त्याजवर निर्णयाची जबाबदारी येऊन पडली नाहीं. मंडनपक्षाकडील एका पंचानें विरुद्धमत देऊन विधवाविवाहाच्या निषेधाचें पारडें मताधिक्यानें जड करून सोडलें, त्यायोगानें विजयश्रीची माळ निषेधपक्षाच्या गळ्यांत पडली आणि विष्णुशास्त्री पंडित, माधवराव, यांचा पराजय झाला. शंकराचार्यांनीं मुंबईस पुनर्विवाह घडवून आणणारांना प्रायश्चित्ताचें शासन फर्मावलें. वाद आटोपतांच माधवराव मुंबईला निघून गेले आणि पंडित मागें राहिले. आपली बाजू सबळ असतां पराजय झाल्याचें पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें, परंतु यांतलें गूढ उघडकीस येण्याला विलंब लागला नाहीं. विधिपक्षांतला एक पंच जरासा कच्चा होता. त्याला निषेधपक्षांतल्या लोकांनीं गांठलें व आंतून दम भरला. वादाच्या अखेरीस आपल्यावर कांहीं तोहमत येऊं नये म्हणून त्यानें विधिपक्षाला दगा देण्याचा विचार केला व त्याप्रमाणें मत दिलें. या शास्त्रीबोवांनीं वाद चालू असतां एक अतिशय महत्वाचा मुद्दा पंडितांना सुचविला होता. परंतु वादाची समाप्ति

झाल्यावर विष्णुशास्त्री पंडितांनीं त्याची गांठ घेतली, तेव्हां त्यानें आपल्या विचारांत अंतर कसें पडलें, त्याविषयीं सगळी हकीकत मोकळ्या मनानें सांगून टाकली. पंडितांबरोबरच्या एका माणसानें या हकीकतीचा ज्ञानप्रकाशांतून डांगोरा पिटला. विचार बदलणाऱ्या या माणसाची पुनः त्रेधा उडाली, त्याच्या सल्लागारांनीं ज्ञानप्रकाशाकडे धांवत जाणाराचा खरपूस समाचार घेण्याबद्दल त्याचे कान फुंकले. ही मसलत त्याला आवडली आणि त्यानें ज्ञानप्रकाशांतल्या मूळच्या लेखकाची बदनामी करणारा जाहिरनामा प्रसिद्ध केला. विधिपक्षाची कुटिलता आतां उघडकीस येऊं लागली. शंकराचार्यांचा निकाल जाहीर करण्याचें काम ज्या शास्त्रीबोवांकडे आलें, त्यांच्या अंगांत इतका विजयोन्माद चढला होता कीं, नुसता निकाल वाचण्याचें आपलें काम आहे याचें भान त्यांस उरलें नाहीं त्यांनीं ज्ञानप्रकाशांतल्या लेखाच्या व जाहीरनाम्याच्या भानगडींत तोंड घालून जिभेचा पट्टा चालविला आणि बेअब्रूची घोरपड आपल्या मानगुटीवर बसवून घेतली. वादाच्या निकालाचा ध्वनि शांत होतो न होतो तोंच सदर बदनामीच्या लेखावरून पुण्याच्या फौजदारी कोर्टांत बेअब्रूच्या फिर्यादीस सुरवात झाली. या खटल्यांत आणखी एक खोट्या साक्षीचा पोटखटला उपस्थित होऊन तोंडाळ शास्त्रीबोवांस तुरुंगांत जाण्याची पाळी आली. मंडनपक्षांतून फुटून फितूर झालेल्या भोळ्या शास्त्रीबोवांसही नंतर कांहीं दिवसांनीं कैदखान्याचा रस्ता धरावा लागला असता, पण त्यांच्या वार्धक्यानें त्यांचा बचाव केला. मॅजिस्ट्रेटानें त्यांस त्यांच्या म्हातारपणाकडे पाहून सोडून दिलें. पुनर्विवाहाच्या वादांत विधिपक्षाला हार खावी लागल्यामुळें त्याच्या बाजूस असलेल्या केरूनाना छत्रे

प्रभृति सुमारें पावणेदोनशें मंडळींनीं श्रीला शरण जाऊन स्वतःला पंक्तिपावन करून घेतलें. शेवटीं पराभवामुळें जास्त भैरव स्वरूपांत गांजणाऱ्या बहिष्काराला तोंड देण्याकरितां विधिपक्षाच्या तळावर पुनर्विवाहाच्या निमंत्रणपत्रिकेखालीं सह्या करणारे अवघे सातजण शिल्लक राहिले.

येथून पुढें माधवरावांच्या सामाजिक क्लेशास प्रारंभ झाला. समाजाच्या बहिष्कारावर, त्याला धैर्यानें टक्कर देत रहाण्याशिवाय, दुसरें रामबाण औषध नाहीं. पुनर्विवाहाला पाठबळ दिल्यामुळें माधवरावांच्या सभोवतीं घिरट्या घालणाऱ्या बहिष्काराच्या पिशाचानें त्यांच्या कौटुंबिक सुख-स्वास्थ्यांत माती कालविली. सडेसोट फटिंगापुढें बहिष्काराची मात्रा चालत नाहीं; पण ज्याच्या आप्तस्वकीयांचा परिवार समाजांत पसरलेला आहे, त्याचा बोजवारा उडविण्याचें काम बहिष्काराच्या साह्यानें थोड्या अवधींत करतां येतें. स्त्रीपुत्रकन्या इत्यादि संबंधामुळें माणसाच्या हृदयांत नांदणारे नैसर्गिक ममतेचे कोमल पाश कुरतडून समाजाच्या रूढाचारांना तत्त्वाखातर धाब्यावर भिरकावणाऱ्या माणसाला बहिष्काराचें सुदर्शन जेरीस आणूं शकतें. वादानंतर तीन महिन्याच्या आंत म्हणजे १८७० च्या मे महिन्यांत सुधारणापक्षांतल्या एका कट्ट्या पुरस्कर्त्याचा बहिष्कारानें बळी घेतला. गोपाळराव देशमुखांच्या विहिणीनें त्यांस प्रायश्चित्त घेण्याला भाग पाडलें. 'तुम्ही प्रायश्चित्त घेऊन पावन होणार नसाल, तर तुमच्या लेकीचा त्याग करून मी आपल्या लेकाचें दुसरें लग्न केल्याशिवाय रहाणार नाहीं.' असा विहिणीचा रोकडा निरोप देशमुखांच्या कानावर जाऊन, त्या निरोपाप्रमाणें आपल्या मुलीच्या सौभाग्याचा घात होइल असा निश्चित संभव दिसतांच, त्यांनीं

केवळ मुलीच्या संसारसुखाकडे नजर देऊन प्रायश्चित्त घेतलें. समाज कित्येकदां स्वत:ची कशी फसवणूक करून घेतो, याचें हें एक उदाहरण आहे. पुनर्विवाहाचा पक्ष घेतल्याबद्दल गोपाळरावांना खराखरा पश्चात्ताप झालेला नव्हता. आपल्या मताबद्दलचा सूड मुलीवर तिच्या सासूकरवी काढण्याची समाजानें हिकमत केली आहे, हें गोपाळरावांना समजलें होतें; ही हिकमत सिद्धीस न जाऊं देण्यासाठीं एकच मार्ग होता; म्हणून अंत:करणांतील विचारांचा पालट झाला नसतांही त्यांनीं विहिणीच्या समजुतीसाठीं केवळ वरकरणी प्रायश्चित्ताचा प्रयोग स्वत:वर करून घेतला. विहिणीला तेवढेंच पाहिजे होतें. गोपाळरावांच्या प्रायश्चित्तविधीनें तिचें समाधान झालें. मुलीच्या सुखाचा अपहार करूं पहाणारें विघ्न देशमुखांच्या बाबतींत अंतर्धान पावलें. गोपाळरावांचें प्रायश्चित्त म्हणजे बहिष्काराचा विजय असा बहुजनसमाजाचा साहजिक ग्रह होऊन त्यापैकीं कित्येकांनीं तशी कोल्हेकुई आरंभली. 'ही कोल्हेकुई व्यर्थ आहे; मी प्रायश्चित्त घेतलें तरी पुनर्विवाहाचा पुरस्कर्ता आहे, पुनर्विवाहाला माझें पूर्वीप्रमाणेंच साह्य होत जाईल' अशा आशयाचें स्वदस्तूरचें पत्र त्यांनीं इंदुप्रकाशांत प्रसिद्ध केलें; तथापि बहिष्कारापुढें गोपाळरावांनीं मान वाकविल्यानें पुनर्विवाहपक्षाची नैतिक दृष्ट्या, अत्यल्प कां होईना, पीच्छेहाट झाली. गोपाळरावांच्या मागून आणखी मंडळींनें बहिष्कारासमोर कच खाऊन माघार घेतली व शेवटीं विष्णु परशुराम रानडे, विष्णुशास्त्री पंडित व माधवराव असे तीनच गृहस्थ बहिष्काराशीं झगडण्याला उरले.

या तिघांनींमात्र समाजाच्या बहिष्काराच्या रूपानें प्रकट झालेल्या रोषास जुमानलें नाहीं. यांतले विष्णु परशुराम रानडे पुढें लवकरच

दिवंगत झाले; विष्णुशास्त्री पंडितांनीं १८७४ सालीं स्वतः विधवेचें पाणिग्रहण करून तत्त्वाचें माहात्म्य संभाळण्याची, आपली जबाबदारी पार पाडली व 'बोले तैसा चाले' अशा वंद्य कोटींतल्या व्यक्तींत आपलें नांव अढळ गोंवून टाकलें. १८७३ सालीं माधवरावांनीं वेगळ्या रीतीनें बहिष्कारावर विजय मिळविला. समाजानें त्यांचा कसा छळ चालविला होता याची माहिती त्यांनीं १८८६ सालच्या आगष्ट १ रोजीं सर विल्यम हंटर या इंग्रज गृहस्थास पाठविलेल्या पत्रांत पुढील प्रमाणें निवेदन केली आहे:—

'माझी धाकटी बहिण माझ्याजवळ मुंबईस रहात असे, तिला तिच्या सासरच्या मंडळीनें बोलावून नेले व पुष्कळ महिनेपर्यंत त्यांनीं तिची व माझी भेट पडूं दिली नाहीं. ती कधीं कधीं चोरून मला भेटण्याकरितां येत असे. माझ्या ब्राह्मण नोकरांनीं मला सोडलें. नवा नोकर ठेवला कीं, तो थोड्याच दिवसांत (बहिष्काराच्या धाकानें) नोकरीवर पाणी सोडून निघून जाई. सणासमारंभांत आम्हांला बोलावण्याचा क्रम सर्वथैव बंद पडला. जर आमच्या घरांतल्या बायका कोठें गेल्या तर तेथें त्यांचा अपमान होऊं लागला. त्यांचा संपर्क टाळण्याची प्रवृत्ति दिसूं लागली. कुटुंबांतले कोणी मनुष्य वारल्यास त्याच्या प्रेतसंस्कारासाठीं आम्हांला माणसें मिळण्याची पंचाइत पडे, अशा वेळीं आमच्या घराकडे कोणी ढुंकून पाहील तर शपथ! प्रायः प्रेतसंस्कारांसंबंधीं सर्व कामें आमचीं आम्हांसच उरकावीं लागत. बहिष्काराचें सत्र सुरू झाल्यावर पूर्वी ठरलेलीं लग्नें मोडलीं. प्रत्येक शहरांत बहिष्कृतांचा वर्ग होता. पण आम्ही आपला मार्ग सोडला नाहीं. आणखी पुनर्विवाह घडवून आणले.

१८७१ सालीं मी पुण्यास सरकारी कामानिमित्त गेल्यावर माझे वृद्ध वडील माझ्याजवळ रहाण्याकरितां आले. त्यांच्यावर माझ्या संसर्गामुळें छळाची घोर-पड येऊं नये म्हणून जेवतेवेळीं त्यांच्या पंक्तीला मी बसत नव्हतों. दूर पान घेऊन मला जेवावें लागे.

एखाद्या व्यक्तीवर समाज रागावला म्हणजे तो किती प्रकारानें तिचा छळ करूं शकतो, याचा कांहीं तपशील वरील हकीकतीवरून समजेल. माधवरावांनीं तत्त्वाकडे नजर देऊन हा सर्व त्रास निमूटपणें सहन केला. कालान्तरानें लोकांना बहिष्काराचा विसर पडत जाऊन समाजांतल्या दळणवळणाची घडी नीट बसली. दरम्यान सुधारणा पक्षांत पुनः माणसांचें बळ वाढूं लागलें. शंकराचार्यांसमोर झालेल्या वादांत व त्यानंतर, सुधारणेला विरोध करणारांनीं चालू ठेवलेलीं कृष्णकारस्थानें उजेडांत येऊन अनेक सारासारज्ञ लोकांचा पुनर्विवाहाविषयीं अनुकूल ग्रह झाला व त्यांनीं विधवाविवाह पक्षाबद्दल आपल्याला सहानुभूति वाटते, अशा अर्थाचीं पत्रें इंदुप्रकाशांतून छापण्यास प्रारंभ केला. त्यांची संख्या वाढतां वाढतां दोनशेंपर्यंत जाऊन पोंचली व त्या मानानें विरोधी पक्ष क्षीण होत चालला. या वादाचा समग्र इतिहास लोकांच्या संग्रहीं रहावा म्हणून इंदुप्रकाशांतून पुरवणीच्या रूपानें बरेंच वाङ्मय बाहेर आलें. सांप्रत तें दुर्मिळ झालें आहे. पुण्यांतील बेअब्रूच्या फिर्यादीचा निकाल लागल्यावर माधवरावांनीं पुनर्विवाहाविषयीं सगळे शास्त्राधार विचारांत घेऊन एक विद्वत्ताप्रचुर निबंध लिहिला. तो आज उपलब्ध आहे. या लेखांत पुढें त्यांनीं कांहीं दुरुस्त्या केल्या आहेत. वादाच्या निमित्तानें माधवरावांना सगळे जुने धर्मग्रंथ पहावे लागले. प्रस्तुत निबंधांत फक्त पुनर्विवाहाचाच विचार केला आहे. तथापि धर्मग्रंथांचें आलोडन करतांना प्राचीन हिंदू समाजाच्या रचनेची व त्यांत कालानुसार होत गेलेल्या फेरफारांची योग्य कल्पना त्यांस झाली, याबद्दल संशय बाळगतां येत नाहीं. माधवरावांनीं वेद, स्मृति, पुराणें आणि इतिहास हीं

चारीं साधनें हातांत घेऊन पुनर्विवाहाचा प्रश्न अनुकूल दिशेनें सोडविला आहे. वादामध्यें प्रतिपक्षानें काढलेल्या आक्षेपांचें व कोटिक्रमाचें यांत भरपूर खंडन व निराकरण पहावयास सांपडतें. शास्त्रवचनांचा अर्थ लावण्याच्या पद्धतीचा यांत खल आहे. माधवरावांचा या विषयासंबंधीं व्यासंग पुढेंही चालू होता, याची साक्ष या निबंधावरून पटते. या निबंधातील एक दोन वैदिक वचनाच्या अर्थाविषयीं डॉ. कीलहॉर्न यांनीं वृत्तपत्रांत लेख लिहून विरोध दर्शविला, पण यापेक्षां प्रतिकूल टीकेची मजल जास्त गेली नाहीं.

# प्रकरण सातवें.

## प्रार्थना समाज.

युनिव्हर्सिटीच्या पहिल्या परिक्षेला एल्फिन्स्टन स्कुलांतून जे विद्यार्थी पास झाले, त्या सर्वांच्या हृदयांत एक प्रकारची कर्तव्यबुद्धि जागृत होती. सर डॉ. भांडारकर यांनीं १९१४ सालीं 'मनोरंजन' मासिकाच्या संपादकांना मुलाखत देऊन स्वतःसंबंधीं सांगितलेल्या गोष्टींत 'आपल्यावेळचे विद्यार्थी उत्तम ध्येय समोर ठेवून वागत होते,' असे आपल्यावेळच्या सहाध्यायी मंडळींबद्दल वस्तुस्थितिदर्शक उद्गार काढले आहेत. रानडे, भांडारकर, वागळे, मोडक, परमानंद वगैरे थोर पुरुषांच्या चरित्राकडे पाहिल्यास वरील वाक्य अगदीं सार्थ असल्याची खात्री पटते. इंग्रजी शिक्षणानें आपल्या हृदयांत जो बोध प्रकट झाला तो लोकांना उपदेशावा, आपल्या शीलाची घडी त्या बोधाच्या अनुरोधानें बसवून लोकांस कित्ता घालून द्यावा, अशी तीव्र जाणीव वरील मंडळीच्या अंतःकरणांत बसत होती. परंपरागत धर्माचरणांतल्या दोषांचा त्यांना तिरस्कार वाटत असला तरी धर्मभावनांचा संपूर्ण:लोप व्हावा, धर्मावर तिलांजलि सोडून मोकळें व्हावें ही कल्पना त्यांच्या मनाला शिवून सुद्धां गेली नाहीं. धार्मिक व्यवहारांत

शिरल्यामुळें ज्यांना पवित्रता प्राप्त झाली आहे, पण जे मुळांत अशुद्ध आहेत, अशा आचारविचारांची हकालपट्टी करण्याचें काम विध्वंसक स्वरूपाचें होतें व तें सारखें सुरूच होतें. त्यालाच हातभार लावण्यांत समाधान मानणारी ही मंडळी नव्हती. असत्क्रिया त्यागावी, हें तत्त्व जितकें त्यांस पटलें होतें, तितकेंच सत्क्रिया आचरावी, हें तत्त्व त्यांच्या अंतरंगांत बिंबलें होतें. धर्माच्या नांवाखालीं लोकांत सन्मानानें खपणाऱ्या अनिष्ट कल्पना खणून काढल्यानंतर त्यांची जागा ओसाड न पडूं देतां तेथें नव्या कल्पनांचें बी पेरावें, हा विचार त्यांच्या डोक्यांत सारखा घोळत होता. या हेतूस अनुसरून त्यांनीं धर्मग्रंथांचें परिशीलन चालविलें होतें. धर्मवाङ्मयांत यथेच्छ संचार करतांना त्यांस असें समजून चुकलें कीं, हिंदू धर्म आज ज्या अवस्थेंत दिसत आहे ती त्याची मूळची अवस्था नाहीं. त्याचें मूळचें स्वरूप उज्ज्वल असून त्यांतलीं दिव्य तत्वें लुप्तप्राय झालीं आहेत. लोकांना त्याची ओळख उरलेली नाहीं. दिव्य तत्त्वांचा विसर पडण्याची क्रिया वाढतां वाढतां भलते आचारविचार उद्भवले, बोकाळले आणि त्यांचेंच धर्माच्या कारभारांत साम्राज्य माजलें. खरा राजवंश बुडवून त्याचें स्थान बळकावणाऱ्या उपटसुंभ बलिष्टापुढें लोक जसे कारभार ओतण्यास तयार होतात व त्यालाच राजा मानतात, त्याप्रमाणें शुद्ध धर्मतत्त्वांनां दडपून गाडून त्यांचें नांवनिशाणदेखील लोकांच्या दृष्टीस न पडूं देणारे भ्रष्टाकार लोकांनां अस्सल धर्मासमान प्रिय व पूज्य होऊन बसले, त्यांनीं लोकांच्या बुद्धीचा व चित्ताचा ताबा घेतला आहे, अशी युनिव्हर्सिटीच्या पहिल्या स्नातकांची खात्री पटली होती. शुद्ध धर्मतत्वें उजेडांत आणून त्यांची ओळख व आवड उत्पन्न केल्याशिवाय नीतीचा जीर्णोद्धार

होणार नाहीं, अशी कर्तव्याची स्फूर्ति प्रस्तुत स्नातकांच्या हृदयांत सळसळत होती. अनिष्टाचा विध्वंस आणि इष्ट धर्माची संस्थापना असें द्विविध कर्तव्य पार पाडण्याची जबाबदारी त्यांनीं स्वयमेव अंगीकारली होती. रामदासांनीं म्हटल्याप्रमाणें बुडालेल्या 'भलेपणाचा जीर्णोद्धार' त्यांना करावयाचा होता. 'उदंड प्रगटतां विचार, धर्मस्थापना तदनंतर' असें समर्थांचेंच एक मोठें मार्मिक वचन आहे. त्याप्रमाणें या तरुण मंडळीमध्यें 'उदंड विचार' प्रकट होऊन तो त्यांस कार्याला प्रवृत्त करीत होता. 'भलेपणाचा जीर्णोद्धार' सुखासुखीं होणार नाहीं. समर्थांनींदेखील 'तो बळेंच करावा' अशी सूचना दिली आहे. धर्माच्या जीर्णोद्धाराचा आवेश रानडे, भांडारकरादिकांच्या अंतरंगांत संचरला. हें कार्य मूर्तावस्थेस कसें न्यावें, याची त्यांना अखंड तळमळ लागली होती. पण मुमुक्षु जसा गुरूची प्रतीक्षा करीत असतो, तसेंच हें मंडळ मार्गदर्शकाची प्रतीक्षा करीत होतें. तळमळ दिखाऊ होती का भरीव होती याचें एक प्रमाण दाखविण्याला हरकत नाहीं. १८६३-६४ सालीं भांडारकर व मोडक हे दोघे पुण्यास होते. एके दिवशीं ही जोडी तुळशीबागेवरून फिरत फिरत जात असतां तिला देवळांतल्या हौदावर स्नानसंध्या करण्यांत गर्क झालेले ब्राह्मण दिसले. 'प्रातःसमयीं' जलाशयाच्या कांठीं बसून संध्योपासना श्रद्धापूर्वक करणारे ब्राह्मण दिसणें, ही गोष्ट विशेष चटका लावणारी नाहीं. परंतु स्वतःच्या धर्मकर्तव्याची जाणीव मनांत अहर्निश वागविणाऱ्या या जोडीला तुळशीबागेंतल्या संध्या करणाऱ्या ब्राह्मणांनीं गंभीर धर्मपर विचारांच्या लहरींत लोटून दिलें. पूर्वीचीं धार्मिक कर्तव्यें सुटलीं व नवीं धर्मकर्तव्यें अद्यापि अस्तित्वांत आलेलीं नाहींत, अशा

स्थितींत सुकाणू नसलेल्या नांवेप्रमाणें आमची धर्मभावना भडकून कोणच्या खडकावर केव्हां आदळेल व फुटेल याचा नेम नाहीं, ही शंका सदर जोडीच्या चित्ताला झोंबली व पुढें या मानसिक खळबळीचें पर्यवसान प्रार्थनासमाजाच्या स्थापनेंत झालें.

धर्माचें पुनरुज्जीवन कोणत्या धोरणानें करावयाचें हें समजण्यासाठीं या तरुण मंडळीला मार्गदर्शकाची आवश्यकता होती, याचा उल्लेख मागें आलाच आहे. बंगालचा ब्राम्हसमाज हा एक आदर्श त्यांच्या समोर होता. पुष्कळांचा असा समज आहे कीं, राजा राममोहनराय यांनीं निर्माण केलेल्या संप्रदायाचें मूळ खिस्ती धर्मांत आहे. खिस्ती धर्माच्या घर्षणानें राजा राममोहन रायांची धर्मबुद्धि जागृत केली, तिच्यांत प्रखरतेचा अंश आणला, इतकें श्रेय फार तर खिस्तीधर्माच्या पदरीं बांधतां येईल; पण ब्राह्म समाज ही खिस्तीधर्माची हुबेहूब नक्कल अशी समजूत चुकीची आहे. खिस्ती धर्माच्या प्रसारकांनीं आपल्या उपदेशाची भुरळ घालून असा भास उत्पन्न केला होता कीं, खिस्तीधर्माच्या स्वीकाराखेरीज हिंदुस्थानदेशाला धर्मसंबंधीं उर्जितावस्था येणें शक्य नाहीं. राजा राम-मोहन यांनीं भासाचा पडदा दूर केला, हिंदूंना तारण्यास हिंदू धर्माच्या अफाटपणांतच इतर सगळ्या धर्मांना दिपवून सोडणारीं अप्रतिम तत्वें आहेत. मारुतीच्या मूर्तीवर शेंदराचें कवच माजतां माजतां ज्याप्रमाणें आंतल्या सर्वांगरम्य मूर्तीचा मागमूस देखील लागत नाहीं व बाहेरील शेंदुरपुटांच्या अस्ताव्यस्त वृद्धीचीच, मारुतीचें तें बेडौल अक्राळविक्राळ स्वरूप समजून, लोक भक्तीनें पूजाअर्चा करूं लागतात, त्याचप्रमाणें हिंदूधर्माचें मंगल, रमणीय, शुद्ध स्वरूप शेकडों वर्षांत वर सांठलेल्या भ्रष्टाचारांच्या केरकचऱ्याची झाडलोट न झाल्यामुळें त्यांच्या विस्तारांत

गारद झालें आहे, पण माहितगारीनें जर पत्ता काढला तर मूळचें स्वरूप दृष्टीस पडल्याशिवाय रहात नाहीं, हा सिद्धांत राजा राममोहन-रायांनीं जाहीर केला. ख्रिस्ती व मुसलमान या दोन्हीं धर्मांचें पाखंड त्यांनीं आपल्या ज्ञानतेजानें दग्ध करून टाकलें व या दोन्ही धर्मांच्या प्रसाराचा रस्ता बंद केला. राजा राममोहन रायांनीं बजावलेली ही कामगिरी लक्षांत ठेवल्यास ख्रिस्तीधर्माची नक्कल वठविणारे, हा त्या-वरील आरोप लटका ठरतो. पण पुढें राजा राममोहन रायांच्या धर्म-विचारांच्या पुरस्कर्त्यांची एक निराळी जातच झाली. हा मुद्दा मुंबई-कडील धर्मोज्जीवन करणारांसमोर होता; आपली वेगळ्या जातींत गणना न होऊं देतां शुद्ध धर्माचाराला समाजानें मान द्यावा, अशी त्यांची इच्छा होती; परंतु मार्गदर्शकापुरता त्यांनीं ब्राह्मसमाजाचा उपयोग करून घेतला यांत संदेह नाहीं.

१८६४ सालची एक गोष्ट मागें दिली आहे. त्यावर्षी धर्मविचारांना चालना देणारे प्रसंग मुंबईस घडले. ब्राह्म संप्रदायाचे विख्यात प्रचा-रक वक्ते बाबू केशवचंद्र सेन यावर्षी प्रथमच मुंबईस आले. मुंबईला त्यांचीं व्याख्यानें झालीं. सेनबाबूसारखे उद्बोधक व परिणामकारक वक्ते हिंदुस्थानांत फारसे नाहींत. त्यांच्या वक्तृत्वाच्या प्रभावानें मोठमोठाले इंग्रज अधिकारी मोहून गेल्याबद्दल अनेक आख्यायिका आहेत. पण त्यांचें वक्तृत्व १८६४ च्या पहिल्या फेरींत मुंबईला अरण्य-रुदनवत् अगदीं निष्फळ ठरलें. सेनबाबू जसे आले तसेच परत गेले. परमार्थ आणि सुखस्थिति यांचा उभा दावा आहे. त्रिविध तापांनीं पोळणाऱ्या चित्ताला परमार्थाची कांस धरावीशी वाटते; सुखाच्या शीतलतेंत लोळणारांना परमार्थ रुचत नाहीं, किंबहुना तो डोळ्यांसमोर

आल्यास सुखस्वास्थ्याचा स्वैर उपभोग घेणाऱ्या लोकांचा अनिवार पित्तप्रकोप होतो, असा अनुभव आहे. १८६४ मध्यें मुंबई शहरांत पैशाचा धूर निघत होता. मुंबईतल्या व्यापाऱ्यांच्या घरीं संपत्ति बटकी-प्रमाणें वावरत होती. त्यावर्षी दिवाळीच्या सणांत दीपोत्सवांचा जो थाट उडाला त्याचें स्मरण आजदेखील वृद्धांच्या मुखांतून 'न भूतो न भविष्यति' असे विस्मयोद्गार* वदवीत असतें. लक्ष्मीच्या मंजुमधुर नादानें भरून गेलेले तत्कालीन मुंबापुरस्थांचे कान सेनबाबूंची धर्मसंबंधीं टकळी ऐकण्याला तयार नव्हते. त्यांची रससंपन्न वक्तृत्वशक्ति मुंबईंत इतकी फोल ठरली कीं, सेनबाबू आले होते कीं नाहीं, याचीही दाद लोकांत उरली नाहीं. धर्मप्रवण बुद्धीच्या लोकांच्या मनावर त्यांच्या प्रवचनांचा जो कांहीं परिणाम झाला असेल तेवढाच. अशा लोकांत माधवरावांसारखे प्रार्थनासमाजाचे कांहीं आद्य संस्थापक होते, असें मानण्याला आधार आहे.

कमलदलावरील जलबिंदूप्रमाणें लक्ष्मी चंचल आहे, हें साधुसंतांनीं केलेलें वर्णन अक्षरशः खरें असल्याचा अनुभव पुढच्याच वर्षी मुंबईच्या शेटसावकारांना आला व १८६५ सालीं शेकडो धनिकांचीं दिवाळीं वाजलीं. दिवाळखोरीच्या दणदणाटानें सर्वांच्या कानठळ्या बसल्या. कित्येक धनिकांनीं अन्नासाठीं प्राणत्याग केला, कित्येकांनीं देशोधडीच्या अज्ञातवसांत आपलीं तोंडें सैरावैरा लपविलीं. आधल्या वर्षी ऐश्वर्याच्या चकाकीमुळें ज्यांच्याकडे नुसती नजर टाकण्याचा कोणाचा मगदूर नव्हता, त्यांना यावर्षी निस्सीम प्रेतकळा आली. संपत्तीची इमारत

* सर दीनशा वाच्छा यांनीं लिहिलेल्या मुंबईच्या आठवणींत या दिवाळीचें बहुःळ वर्णन जिज्ञासूंना पहावयास सांपडेल.

कोसळण्याचें कारण शोधूं लागल्यास तें साऱ्या हिंदुस्थानांत सांपडणार नाहीं. युरोपांतही त्याचा थांग लागायचा नाहीं. ॲटलांटिक महासागर ओलांडून थेट अमेरिकेंत धाव घ्यावी, तेव्हां द्रव्यनाशाचें कारण उमगतें. १८६५ मध्यें अमेरिकेंत यादवीचा प्रादुर्भाव झाला. त्या यादवीनें हिंदुस्थानांतल्या व्यापाराला खो दिला आणि संपत्तीच्या साहित्यशृंगारानें सजलेली येथील व्यापाराची इमारत एकदम भंगली. तिच्या पडापडींत कितीजणांचा प्राण, मान व आश्रय गेला, हें सांगण्याची जरूरी नाहीं. संपत्तीच्या चांचल्याचा एकच अनुभव या व्यापारभंगानें आला नाहीं. इंग्रजी राज्यामुळें येथील व्यापार कसा परतंत्र बनला होता, त्याचीं सूत्रें कशीं परदेशांच्या हातांत गेलीं होतीं, त्याचा उगम येथें कसा नाहीं, आणि परदेशांतल्या सांपत्तिक घडामोडी हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व्यवस्थेमध्यें कसे भयंकर उत्पात घडवून आणूं शकतात, याविषयीं सगळ्यांना स्पष्ट कल्पना झाली. माधवरावांसारख्या देशहितैकनिष्ठ अर्थशास्त्ररसिकाच्या चित्तांत या भीषण प्रसंगानें चिरकालीन ठसा उमटविला असेल, याबद्दल दुमत होण्याचें कारण नाहीं.

प्रार्थनासमाजाच्या उत्पत्तीला या आर्थिक अनर्थानें अनुकूल परिस्थितीची प्राप्ति करून दिली. याचें प्रत्यंतर १८६८ मध्यें आलें. यावर्षी पुनः केशव चंद्रसेन यांनीं मुंबई शहरांत मुक्काम केला. त्यावेळीं लोकांच्या वृत्तींत अतिशय अंतर पडलें होतें. सेनबाबूंची ख्याति मधल्या चार वर्षांत वाढली होती. यामुळें त्यांच्या व्याख्यानाला श्रोत्यांच्या झुंडीच्याझुंडी सभास्थळाकडे लोटूं लागल्या. त्यांच्या वक्तृत्वानें श्रोत्यांच्या भावना धर्मनिरूपणाच्या रसांत बुडवून अगदीं तन्मय करून सोडल्या. अनुकरणेच्छेनें तरुणांच्या वाचेंत चैतन्य उचंबळून मुंबई शहरांत जिकडे तिकडे वक्तृत्वाच्या

कसरतीचे आखाडे उघडले गेले. १९०९ सालीं म्हणजे वरील गोष्टीला ४० वर्षे उलटल्यावर प्रार्थनासमाजांत व्याख्यान देत असतां सेन-बाबूंच्या वक्तृत्वाच्या स्मरणाला ताजेपणा चढून कै. सर नारायणराव चंदावरकारांचें चित्त तल्लीन झालें व Oh what a glorious thing it was in those years after 1867 to be a yong man! To be a young man! To be young, I may tell you, was then very heaven. असें मागल्या आठवणीनें भान हरपल्याचें निदर्शनास आणून देणारे उद्गार त्यांच्या तोंडून सहज बाहेर पडले. दुसऱ्यांदा केशवचंद्र मुंबईस आले, तेव्हां प्रार्थनासमाज अस्तित्वांत आला होता व त्याकडे नजर देऊन केशवचंद्रांनीं आपले श्रम वाया गेले नाहींत, असें समाधान व्यक्त केलें. १८६४ सालीं त्यांचीं व्याख्यानें झालीं, त्यावेळीं डॉ. भाऊ दाजी एकदां अध्यक्ष होते. व्याख्यानांत वक्त्यानें धर्मसंजीवनाची आवश्यकता सांगितली. केशवचंद्र हा एक उत्साहाचा अवतार होता. त्यांच्या रक्ताच्या थेंबाथेंबांत उत्साह भरला असावा, असा त्यांचें प्रवचन ऐकणारांना भास होत असे. सेनबाबूंच्या व्याख्यानानें श्रोत्यांच्या अंतरंगातील बंद असणारे धर्मविषयक भावनांचे दरवाजे खडाखड् उघडून त्यांतून उत्साहाच्या लाटावर लाटा खेळूं लागत. डॉ. भाऊ दाजींनीं ज्याचें अध्यक्षत्व स्वीकारलें, त्या व्याख्यानाच्या शेवटीं श्रोत्यांच्या वृत्ति तल्लीनतेच्या पराकाष्टेस पोंचल्या होत्या. व्याख्यात्याच्या विवेचनावर अध्यक्ष आपल्या अनुकूल भाषणानें कळस चढवितील आणि श्रोत्यांच्या मनःस्थितीची पूर्ण सांगता करतील, अशी हजर असलेल्या सर्वांची कल्पना होती. पण अध्यक्षांनीं उत्साहाच्या तावावर थंड पाणी ओतण्यास आरंभ करून सर्वांना निराशेच्या दरींत लोटून दिलें. ते म्हणाले कीं,

दीर्घ विचारान्तीं धर्मांतील सुधारणा सावकाशीनें व सावधपणानें केल्या पाहिजेत. हा उत्साहावर विरजण घालणारा उपदेश ऐकून श्रोत्यांचा अतिशय विरस झाला. पण पुढें तीनच वर्षांनीं प्रार्थनासमाजाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

धर्माचा विचार करणाऱ्या तरुणांना नव्या पंथाच्या स्थापनेसाठीं कोणी तरी जुन्या पिढींतला पुढारी हवा होता. परमहंस सभेची स्थापना करणारे दादोबा पांडुरंग या सुमारास आपला मागील चरित्रपट गुंडाळून ठेवून जुन्या वहिवाटींतील वृद्धापकाळास शोभण्याजोगें हरिचिंतन करूं लागले होते. त्यामुळें त्यांच्या गळ्यांत पुढारीपणाची माळ पडणें शक्य नव्हतें. कामाची तीव्र इच्छा असल्यास त्याच्या सिद्धीचा उपाय सुचतो, या इंग्रजी म्हणीप्रमाणें आमच्या तरुण मंडळींचा पुढाकार घेण्याला दादोबा पांडुरंगाचे बंधु डा. आत्माराम पांडुरंग तयार झाले. परमहंस सभेंत असलेली पुष्कळशी मंडळी पूर्वीच्या गोपनशीलतेला रजा देऊन उघडपणानें नवा पंथ निघाल्यास त्यामध्यें भाग घेण्यास उत्सुक होती. अखेरीस ही वाटाघाट चालतां चालतां नवपंथाचे भोक्ते ता. ३० डिसेंबर १८६६ रोजीं डा. आत्माराम पांडुरंग यांच्या घरीं जमले व 'प्रार्थनासमाज' ही संस्था स्थापन करण्याचा विचार नक्की करण्यांत आला. या बैठकींत माधवराव हजर होते कीं नाहीं हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. १८६७ च्या मार्च ३१ तारखेला रविवारी 'प्रार्थनासमाज' या नांवाखालीं पहिली जाहीर उपासना झाली, व तोच समाजाच्या स्थापनेचा आद्य दिवस मानला जातो. याही वेळीं माधवराव हजर होते कीं नव्हतें याचा पत्ता लागत नाहीं. सर डॉ. भांडारकर त्यावेळीं बाहेर गांवींच होते. परंतु 'आपण

केवळ शरीरानें दूर होतो, मनानें स्थापनाकर्त्यांच्या समुदायांत होतो' हें आश्वासन जसें त्यांनीं दिलें आहे, तसेंच माधवरावांच्या वर्तनेंही देतां येईल; कारण माधवराव प्रार्थना समाजाच्या आधारस्तंभांतले एक प्रमुख गृहस्थ होते, हें वाचकांना निवेदन करण्यांत सूर्याला प्रकाश असतो असें सांगण्याइतकींच अपूर्वता आहे.

१८६७ च्या ३० जुलई रोजीं प्रार्थनासमाजाच्या व त्यामार्फत चालणाऱ्या कामकाजाच्या तत्त्वांचा पक्का खर्डा जाहीर करण्यांत आला. त्यांत पुढें आणखी पांच वर्षांनीं सुधारणा झाल्या. परमेश्वर एक आहे, अद्वितीय आहे, तोच जगाचा नियंता, पालनकर्ता असून त्याचें स्वरूप अनंत, अतर्क्य, शाश्वत, निराकार, सर्वसाक्षी, सर्वशक्तिसंपन्न, दयाघन, पवित्र व पापनाशक आहे. त्याला शरण गेल्यानें इहपरलोकीं सुख मिळतें. त्याच्याविषयीं प्रेमादर बाळगणें, त्याचें गुणगान करणें, त्याला आवडणारी सत्क्रिया आचरणें, हीच त्याची खरी पूजा होय. मूर्तीची किंवा अन्य सृष्ट पदार्थांची पूजा केल्यानें ती परमेश्वराला पोंचत नाहीं. परमेश्वर कधींही अवतार धारण करीत नाहीं, व त्यानें कोणताही धर्मग्रंथ निर्माण केला नसल्यामुळें निर्दोष असा एकही धर्मग्रंथ सांपडणार नाहीं. सर्व माणसें ईश्वराचीं लेकरें असून आपसांत बंधुभावानें वागणें, हें प्रत्येक मनुष्यमात्राचें कर्तव्य आहे. परमेश्वर या कर्तव्यानेंच प्रसन्न होतो; असें प्रार्थनासमाजाच्या तत्त्वांचें स्थूल स्वरूप आहे. शांतपणें या तत्त्वांचा विचार केल्यास त्यांत उपहासास्पद भाग मुळींच आढळणार नाहीं. मूर्तिपूजेसंबंधीं एक आक्षेपार्ह वाटण्याजोगें तत्त्व आहे, पण त्यांतही हिंदुधर्माच्या मूळ तत्त्वांना सोडून कांहीं नाहीं. त्यामध्यें जातिभेदाच्या

उच्छेदाचा स्पष्ट निर्देश नाहीं, पण माणसें हीं ईश्वराचीं लेकरें व त्यांचा परस्परांतील वर्तनक्रम सहोदर भावंडासारखा निष्कपट प्रेमाचा असावा, या तत्त्वांत जातिभेदाच्या अडचणीचें निरसन केलें आहे. हीं तत्त्वें ठरविण्यांत माधवरावांचा पुष्कळच हात होता. प्रार्थनासमाजामुळें त्या समाजांत दाखल होणारांची वेगळी जात पडून पूर्वींच्या जाती-पोट-जातींच्या गुंतागुंतींत आणखी नव्या जातीचा पीळ घातला जाऊं नये, अशी सदर समाजाच्या उत्पादकांची आरंभापासून मनीषा होती. ती मनीषा तत्त्वरचनेंत सफळ झाल्याचें चाणाक्षांना दिसून येईल. १८७२ सालीं मिश्रविवाहाचा कायदा सरकारानें पास केला, त्यावेळीं प्रार्थनासमाजांतल्या पुष्कळांच्या मनांत ब्राम्हसमाजाप्रमाणें हिंदु धर्माच्या गोतावळ्यांतून बाहेर निघण्याचा विचार होता. माधवरावांनीं या विचारास अत्यंत कसून विरोध केला. प्रार्थनासमाज हें एक स्वदेश-बांधवांच्या धार्मिक उद्धाराचें साधन आहे, अशी माधवरावांची समजूत होती. प्रार्थनासमाजिस्टांची नवी जात झाल्यास धार्मिक उद्धाराच्या साधनांतून त्या समाजाचें उच्चाटन होईल व मग त्यांत मूळ उद्देश सिद्धीस नेणारी व्यापक कार्यक्षमता रहाणार नाहीं असें माधवरावांचें मत होतें.

माधवरावांनीं प्रार्थनासमाजाच्या मतांचें समर्थन करण्यासाठीं व सामान्यतः त्यासंबंधीं निघणाऱ्या शंकांच्या निरसनासाठीं एक Theist's confession of faith (एकेश्वरनिष्ठाची कफियत) या नांवाचा उत्कृष्ट निबंध लिहिला आहे. यांतल्या कांहीं मजकुराची व वर निर्दे-शिलेल्या तत्त्वरचनेची भाषा बऱ्याच जागीं शब्दशः सारखी आहे. याखेरीज वेळोवेळीं प्रार्थना समाजांतल्या प्रवचनांतून प्रार्थनाधर्माचें स्वरूप सांगून आक्षेपांचा माधवरावांनीं परिहार केला तो निराळाच.

कित्येक वर्षें गेल्यावर त्यांनीं एका व्याख्यानांत राजा राममोहन रायांच्या पंथांत नवीन कांहींच नसून हिंदुधर्माच्या इतिहासांत धर्मांतले दोष काढून टाकण्याकरितां अनेकदां अनेकांनीं प्रयत्न केल्याचीं यशस्वी उदाहरणें आहेत, त्यांतलेंच राममोहन रायांचें उदाहरण आहे; लोकांनीं त्यास भिण्याचें किंवा बिचकण्याचें कारण नाहीं, असा उपदेश केला. प्रार्थनासमाजांतल्या माधवरावांच्या व्याख्यानांची माहिती यथाकाळ पुढें येईल. उपरिनिर्दिष्ट निबंधांतील विचाररत्नें वाचकांना अर्पण करण्यापूर्वी सुरुवातीला प्रार्थनासमाजाचें काम कसें चाललें होतें व त्याला कोणकोणत्या गोष्टींची जोड पुढें देण्यांत आली याचें सर डॉ. भांडारकरांच्या * शब्दांमध्यें ज्ञान करून दिल्यास अप्रस्तुत होणार नाहीं:—

त्यावेळच्या उपासनांमध्यें उद्बोधन, स्तवन, प्रार्थना व उपदेश असें जे आज भाग आहेत, तसे नव्हते. प्रार्थना करावयाची व एक निबंध वाचावयाचा हा प्रघात असे. हे निबंधही बहुतकरून थिओडर पारकर व दुसऱ्या अशा प्रकारच्या लेखकांच्या लेखांचे तर्जुमे असत. हल्लीं जे प्रार्थनासंगीत आहे, तसें त्यावेळीं नव्हतें, त्यावेळीं पाळंदे यांचें 'रत्नमाला' नामक पुस्तक होतें. त्यांतील पद्यें म्हणण्याचा प्रघात असे. पूर्वी उपदेशाचा भाग लिहून आणून वाचावा असा प्रकार होता, असें म्हटलें आहे; पण, नंतर वाचण्यापेक्षां बोलणें बरें, असें वाटून तो क्रम सुरू झाला. .... एका वर्षी आम्ही तुकारामाचे कांहीं अभंग घेतले व ते सर्व मंडळींना फार आवडले......आजपर्यंत उपदेशाचीं जीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत, तीं पाहिलीं असतां असें आढळून येईल कीं, आपल्या सिद्धांतास जुळतील असे विचार उपनिषदें, अर्वाचीन साधुसंत, पाश्चात्य ग्रंथकार यांच्याही आधारें सादर करण्यांत येत असतात.

* रा. गो. भांडारकर यांचे धर्मपर लेख व व्याख्यानें. पृष्ठ ४७२–७३.

आपल्या धर्मांत जुन्या परंपरेला सोडचिठ्ठी मिळालेली नाहीं, उलट इंग्रजी शिक्षणानें धर्मासंबंधीं जी घातक अश्रद्धा उत्पन्न झाली, तिच्या उन्मूलनासाठीं आपला प्रयत्न चालू आहे, नवी जात निर्माण करण्याचा उद्देश त्यांत लवमात्र नाहीं, असें माधवरावांनीं आपल्या धर्मपर सार्वजनिक भाषणांतून सांगितलें असतांही या नव्या समाजाविषयीं गैरसमजुती उद्भवल्या व समाजाच्या टीकाकारांनीं त्यांचें पोषण केलें. रविवारची उपासना, लोडतक्क्यांऐवजीं बैठकीमध्यें दिसणाऱ्या खुर्च्या-बाकांचा सरंजाम, उपदेशाकरितां पाश्चात्य ग्रंथांतून निवडलेलीं वचनें, वगैरे नवे प्रचार टीकेला कारणीभूत झाले. या टीकेला समर्पक आणि ज्ञानलवदुर्विदग्ध किंवा दुराराध्य नसलेल्या शंकितांची खात्री पटण्या-लायक उत्तरें समाजाच्या पुरस्कर्त्यांनीं दिलीं आहेत. गोपाळराव देशमुख हे जुन्या चालीरीतींना व वाङ्मयाला नांवें ठेवणारांपैकीं एक गृहस्थ होते; त्यांचा व समाजाचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध होता; एकदां त्यांनीं 'सणांत शिमगा आणि ग्रंथांत पुराणें' अशी जोड घालून शिमग्याची व पुराणांची सडकून निंदा केली. त्यावेळीं सर डॉ. भांडारकर पुराणांच्या संरक्षणास धावले व त्यांनीं देशमुखांचीं सगळीं विधानें सप्रमाण खोडून काढलीं. पुराणांत ग्राह्यांश आहे व त्यांनीं भक्तिमार्गाच्या वाढीला पुष्कळ मदत केली, असें कबूल करणारे प्रार्थनासमाजिस्ट हिंदु धर्माच्या मानेवर सुरी फिरविण्याकरितां अवत-रले, असें मानणें किती चुकीचें आहे हें ध्यानांत येईल. हिंदूधर्मावर वाढलेल्या मळाच्या राशी दूर करण्यासाठींच समाज स्थापन झाला. १८७८ सालीं समाजाचें नांव बदलून त्याची बंगालच्या ब्राह्मसमा-जाच्या शाखान्तरांत गणना करावी, असा वाद समाजामध्यें उपस्थित

झाला. ब्राह्मसमाजांत शाखारूपानें अंतर्भाव झाल्यास उत्तम असें जोरानें म्हणणारा व हा उद्देश सिद्धीस न गेला तर समजाशीं फारखत करून घेण्याला तयार असलेला एक पक्ष होता. दुसऱ्या पक्षाचा, ब्राह्मसमाजांत प्रार्थनासमाजाचें विसर्जन करणें योग्य नव्हे, असा ठाम सिद्धान्त होता. समाजाच्या पोटांत अशा रीतीनें दुहीची कालवाकालव होऊं लागली. दुफळीचें प्रदर्शन जगासमोर होण्यापेक्षां प्रतिपक्षाच्या हेतूला मान द्यावा, असें वरील दुसऱ्या पक्षानें ठरविलें. पण ही घासाघीस चालू असतां ब्राह्मसमाजांत विरून जाण्याकरितां उत्कंठित असलेल्या पक्षाचें मत पालटलें व मुंबईच्या समाजाचें स्वातंत्र्य कायम ठेवण्याची कल्पना त्यानें मान्य केली. या सुमारास बंगालच्या समाजाला केशवचंद्रांनीं एक फाटा फोडला होता. केशवचंद्रांनीं काढलेल्या संप्रदायाचें मत खिस्ती धर्माला शोभेसें होतें. बंगाली ब्राह्म समाजाच्या नशिबाशीं प्रार्थनासमाजाचें नशीब बांधल्यास तेथील भांडणाच्या ओढाताणीचे परिणाम मुंबईच्या समाजाला भोगावे लागतील, हें उघड दिसत होतें. पण केशवचंद्रप्रणीत तत्त्वविवेचनाच्या मोहांत सांपडलेल्या कित्येक मुंबईकरांना नशीबाची सांगड घालण्यांत मोठा पुरुषार्थ वाटला. त्यावेळीं माधवरावांनीं आपला समाज विभक्त राखण्याबद्दलचें मत कळविलें व तें सर्वांच्या पसंतीस उतरलें. भांडारकर वगैरे मंडळी एकीकरणाच्या विरुद्ध होती, त्यांना अतिशय धीर आला, अखेरीस एकीकरणाचा प्रश्न निकालांत निघून समाजाच्या बोकांडीस बसलेलें दुफळीचें भूत गाडलें गेलें. ही हकीकत भांडारकरांनीं माधवरावांस उलट पत्रानें कळविली. माधवरावांच्या दप्तरांत भांडारकरांचें तें पत्र सांपडलें. त्यांतला कांहीं मजकूर प्रार्थनासमाजाच्या पुरस्कर्त्यांचें अंतरंग उघड करून दाखविणारा असल्यानें येथें देतों:—

There is much in the feelings and doings of Babu Keshab's section that I consider very objectionable, while Devendra's section consider it no business of theirs to encourage such reforms as intermarriages and giving up of caste......Keshab's religion clearly took its rise from Christianity. For years all his thoughts were cast in a Christian mould; and the party courts and values the sympathy of Christians, I may say exclusively. Even Principal Wordsworth acknowledged the other day in his address to the Elphinstone College Union, that there was at the present day a *renaisance*,....due to the study of Brahmanic and Buddhistic literatures. The religious and philosophic ideas of Hindus have been influencing Europe; and a neglect of them on our part is sure to be attended with melancholy results. It would be disastrous to parade our differences from the rest of our community.............

ख्रिस्तीधर्माचें अनुकरण किंवा हिंदूधर्माची पायमल्ली करण्याचा प्रार्थनासमाजाच्या चालकांचा कितपत उद्देश होता, हें या उताऱ्यावरून उत्तम प्रकारें लक्षांत येईल. मूर्तिपूजेचा व अवतारांचा अनादर व्यक्त केल्याबद्दल प्रार्थनासमाजाच्या संस्थापकांना कोणी कितीही नांवें ठेवलीं तरी तत्त्वतः प्रार्थनासमाजाच्या हेतूंचाच सांप्रत लोकांच्या वर्तनांत विजय आढळून येतो, हें नाकबूल करण्यांत हंशील नाहीं. हिंदूसमाजाच्या हिताकरितां त्याचा जन्म असल्यानें सामाजिक इष्ट कार्य त्याच्या विद्यमानें पुष्कळच घडत आहे.

समाजाच्या सूत्ररूप तत्त्वांचा व तद्दर्शित कर्तव्यांचा सर्व सांप्रदायिकांना व इतरे जनांना पूर्ण बोध होण्यासाठीं माधवरावांनीं

' एकेश्वरनिष्ठाची कैफियत ' (Theist's confession of faith) लिहून प्रसिद्ध केली. प्रथम ती खंडशः एका अँग्लोगुजराथी वृत्तपत्रांत छापली जात होती. नंतर ती पुस्तक रूपानें मिळण्याची व्यवस्था झाली. कांहीं काळानें हें पुस्तक दुष्प्राप्य होऊन बसलें. १९०१ सालीं त्याचा बॅ. कोल्हसकरांनीं संपादिलेल्या माधवरावांच्या लेखसंग्रहांत पुनरुद्धार करण्यांत आला. या कैफियतींत ३९ मतांची व कर्तव्यांची मीमांसा आलेली आहे. मीमांसेचीं आधारभूत तत्त्वें माधवरावांनीं प्रास्ताविक भागांत स्पष्ट केलीं आहेत. माधवरावांनीं प्रार्थनासमाजाच्या स्थापनेनंतर दरसाल धर्मपर व्याख्यानें देण्याचा प्रघात ठेवून धर्मासंबंधीं आपले विचार प्रकट केले आहेत. त्यांतलीं कित्येक व्याख्यानें ग्रंथाच्या रूपानें एकत्र मिळतात. त्यांच्या विचारांत पुढें अनेक प्रकारें वाढ झाली, पण एकेश्वरनिष्ठाच्या कैफयतींत जे विचार त्यांनीं निवेदन केले, त्यांत फरक झाला असा निष्कर्ष काढण्याला आधार नाहीं, म्हणून त्या विचारांचें स्वरूप संक्षेपानें येथें देतों. प्रत्येक संप्रदायांत उपासनेचे स्वतंत्र व विशिष्ट विधि असतात; त्याप्रमाणें प्रार्थनासमाजालाही विधींची आवश्यकता होती. विधि ठरल्यानंतर त्यांचा अर्थ किंवा हेतु सांगण्याची, निदान स्वतःपुरता समजून घेण्याची, जबाबदारी सांप्रदायिकावर येऊन पडते. हिंदुस्थानांत जितके संप्रदाय आहेत तितक्या सर्वांना हा नियम लागू आहे. कित्येक संप्रदायांतील विधींविषयीं पुस्तकें प्रसिद्ध आहेत. कित्येकांचे विधि फक्त सांप्रदायिकांनाच कळविण्यांत येतात व माहीत असतात. माधवरावांनीं यांतला पहिला मार्ग चोखाळला व आपल्या धार्मिक कल्पना, आचार, तत्त्वें इत्यादि गोष्टी लोकांसमोर मांडल्या.

त्यांची कैफियत ल्हान आहे, पण तिचें महत्त्व अतिशय आहे. वास्तविक ही कैफियत दरेक प्रार्थनासमाजिस्टाच्या संग्रहीं असावयास पाहिजे, परंतु तसा प्रकार आढळत नाहीं.

सदर कैफियतींतले विचार, तर्क आणि इतिहास या दोन साधनांचा आधार घेऊन, माधवरावांनीं प्रदर्शित केले आहेत. जगाच्या उत्पत्तिस्थितिलयाचीं गूढें, अमूक धर्मात त्याविषयीं अमूक उलगडा आहे, सारांश 'बाबा वाक्यप्रमाणं' या न्यायानें त्यांनीं स्वीकारलीं नाहींत. मनुष्याच्या बुद्धीची गति मर्यादित आहे; विश्वाच्या व्यापाराचे सगळे नियम तिला बिनचूक आकलन करतां येत नाहींत, तथापि बहुतेक धर्मग्रंथांतून विश्वाच्या उभारणीसंहारणीविषयीं ठाम वचनें आढळतात, त्यांना मान्यता देणें म्हणजे जाणून बूजून अंधश्रद्धेचा दोष पदरीं बांधून घेण्यासारखें आहे, म्हणून माधवरावांनीं हीं गूढें उकलणें शक्य नाहीं, असा स्पष्ट कबूलीजबाब दिला आहे. या गूढांचा नाद सोडला व मनुष्य, विश्व आणि ईश्वर यांच्या परस्परसंबंधाचा विचार करूं लागले तर अनेक प्रमाणांवरून परमेश्वर हा सृष्टीचा दयाळू नियंता आहे, अशी खात्री पटते. ईश्वर सृष्टीचें सदयतापूर्वक न्यायानें नियमन करतो हें तत्त्व एकदां अंगीकारलें म्हणजे सृष्टींतला मनुष्यप्राण्याचा अधिकार कोणता, हक्क कोणता व कर्तव्यें कोणतीं, याचा जबाब देणें भाग पडतें. मनुष्याला बिल्कूल स्वातंत्र्य नाहीं, तो दैवाचा दास आहे, दरवेशामागून जसें अस्वल तो नेईल तिकडे जातें, त्याप्रमाणें दैवामागें मनुष्य जात असतो. स्वयंप्रेरणेनें तो कांहीं करूं शकत नाहीं, असा एक पक्ष आहे. दुसरा पक्ष सांगतो कीं, मनुष्य स्वतंत्र असून त्याच्या कर्तबगारीला खीळ घालण्याचें सामर्थ्य जगांत नाहीं. तो जें मनांत आणील

तें शेवटास नेण्याची शक्ति त्यांच्यांत आहे. एकेश्वरनिष्ठ यांपैकी कोणत्याही टोंकास न जातां मधला मार्ग स्वीकारतो. शिक्षण, संगत, परिस्थिति, वगैरे गोष्टींवर मनुष्याच्या कर्तबगारीचा विकास अवलंबून असतो, हें एकेश्वरनिष्ठास मान्य आहे. पण सारासारनिर्णयाचें सामर्थ्य माणसांत ठेवलेलें आहे व त्यामुळें त्याच्या हातून घडणाऱ्या बाबींची जबाबदारी त्यावर येते, असा एकेश्वरनिष्ठांचा सिद्धांत आहे. देवाकडे बोट दाखविल्यानें कृतापराधाच्या प्रायश्चितांतून त्याची सुटका होणार नाहीं. एकेश्वरनिष्ठ मागल्यापुढल्या जन्मांची कोडीं उलगडण्याच्या उठाठेवींत न पडतां प्राप्त जन्माचें महत्त्व मानतो व या जन्माचें साफल्य माणसानें करावें असें त्याचें तत्त्व आहे. या जन्मांतलीं सत्कृत्यें ईश्वरावर पूर्ण भरंवसा असल्याशिवाय त्याच्या हातून घडणार नाहींत. म्हणून त्यानें परमेश्वराला आपण शरण गेलेले आहोंत, अशी बुद्धि ठेवली पाहिजे. प्रत्यहीं त्यानें ईश्वराचें भजन करावें, तथापि आपापल्या घरांत भजन केल्यानें मनुष्यांत माणुसघाणेपणा उत्पन्न होण्याचा संभव असतो. एकत्र जमून सर्वांनीं प्रार्थनादि कृत्यें केल्यास एकमेकांच्या उदाहरणांचा धडा शिकावयास सांपडतो; त्या योगानें धर्मनिष्ठेचा उत्साह अंगीं संचरतो. एकत्र उपासना केल्यानें दुसरे अनेक लाभ होतात. याठिकाणीं माधवरावांसंबंधीं एक आख्यायिका देण्यास हरकत नाहीं. ख्रिस्ती व मुसलमानी धर्मांत एकवटून प्रार्थना करण्याची चाल आहे. ख्रिस्ती दर रविवारीं मंदिरांत जमतात व मुसलमान शुक्रवारीं जमावानें ईश्वराचें ध्यान व प्रार्थना करतात. धर्मनिष्ठेला एकत्रोपासनेची अतिशय मदत होते. मुसलमानांतल्या धार्मिक कडवेपणाचें एक कारण एकत्रोपासना हें आहे, माधवराव कधीं कधीं

'शुक्रवारीं मशिदींत जमलें पाहिजे' असे प्रार्थनासमाजाच्या साप्ताहिक उपासनेबद्दल दृष्टांतपर उद्गार काढीत असल्याचें वृद्धमुखांतून ऐकावयास सांपडतें. ईश्वराच्या अवतारांना प्रार्थनासमाजाच्या व्यवहारांत अर्धचंद्र देण्यांत आला आहे. साक्षात्कार आणि चमत्कार यांचा वरच्या गोष्टीसारखाच निकाल लावला आहे. एखादें धर्मतत्त्व योग्य आणि स्वीकारणीय आहे एवढेंच साक्षात्काराच्या कथा दर्शवितात. पण ईश्वरी साक्षात्कारापासून उत्पन्न झालेल्या धर्मांना देशकालादि मर्यादा असल्यानें, धर्मविकासाच्या इतिहासांतली एक मजल, साक्षात्काराच्या कथा आधाराला घेऊन, ठरवितां येते. यापेक्षां त्यांचें जास्त महत्व मानतां येत नाहीं. येथें असा प्रश्न उद्भवतो कीं, जर साक्षात्कारांचें बंड पोकळ समजलें तर महान् महान् साधुसंतांच्या चरित्राची वाट काय? त्याला माधवरावांनीं समाधानकारक उत्तर दिलें आहे. साधुसंताच्या चरित्राची थोरवी त्यांस नाकबूल नाहीं. साधुसंत असामान्य कोटींतले असतात, नीतीच्या मार्गदर्शकत्वाचा मान त्यांस देणें इष्ट, अवश्य आणि उचित आहे, असें माधवराव म्हणतात. पण याहून त्यांचें स्तोम माजूं देण्याला एकेश्वरनिष्ठांची तयारी नाहीं. साक्षात्कार, चमत्कार आणि साधुसंत यांच्या महतीचें माप ठरल्यावर तीर्थें, धर्मोपाध्याययांची एकेश्वरनिष्ठाच्या कैफियतींत काय व्यवस्था लावली असेल हें निराळें सांगण्याची गरज नाहीं. तीर्थांचें स्थानमाहात्म्य एकेश्वरनिष्ठ अमान्य करीत नाहीं. तीर्थस्थानें आपल्या नैसर्गिक रमणीयतेनें व गांभीर्यानें मनांवर उत्तम परिणाम करितात, यांत संशय नाहीं. शिवाय या स्थानांना प्राचीन थोर पुरुषांच्या कर्तृत्वामुळें चढलेलें मोल नाकबूल करतां येत नाहीं. एखाद्या तीर्थक्षेत्रांत गेलें म्हणजे तेथें, मागें

होऊन गेलेल्या, थोर पुरुषांचें चरित्र आठवतें आणि पुष्कळदां त्यांचे अनुकरण करण्याची प्रेरणा हृदयांत स्फुरण पावते. रमणीयता, गांभीर्य आणि थोर पुरुषांची स्मृति, यांचा तीर्थांशीं संबंध असल्यानें त्यांचा उपयोग जरूर करून घ्यावा, असें एकेश्वरनिष्ठाचें सांगणें आहे; पण तेथें विशेष विधि केल्यानें पूर्वजांसह स्वतःला इहपरलोकीं सद्गति मिळते, या गोष्टीवर तो विश्वास ठेवीत नाहीं. आयुष्यांतील जन्म, मृत्यु, विवाह वगैरे घटना विशिष्ट संस्कारांच्या द्वारें साजऱ्या कराव्या हें तत्त्व एकेश्वरनिष्ठास पूर्णपणें संमत आहे. त्याची श्राद्धविधीविषयीं हरकत नाहीं. संस्कारविधीसाठीं धर्मोपाध्याय पाहिजेत, पण त्यांची वेगळी जात नसावी, आणि त्यांच्या हातीं स्वर्गनरकाच्या किल्ल्या आहेत, असें समजणें भ्रामक व चुकीचें आहे, असें त्याचें ठाम मत आहे. माणसांत जर ईश्वरांश पहावयाचा असेल तर तो त्याच्या सदसद्विवेकशक्तींत आढळतो. सदसद्विवेकाच्या प्रेरणेस अनुसरून माणसानें आपला वर्तनक्रम ठेवावा, पण दुसऱ्याच्या हक्कांचा त्यानें अतिक्रम करूं नये व दुसऱ्याची कुरघोडी आपल्यावर न होऊं देण्याबद्दलही जपावें, असें त्याचें मत आहे. सदाचरणानें शुद्ध झालेल्या आत्म्याच्या उपाधि सुटल्या, तो ईश्वरासंनिध गेला, ईश्वराचें सान्निध्य त्यास स्पष्ट प्रत्ययास आलें म्हणजे मग तो देहबद्ध असो वा नसो, तो मुक्त झाला, मोक्षावस्था त्यांस प्राप्त झाली, अशी एकेश्वरनिष्ठाच्या कैफियतींत माधवरावांनीं मोक्षाची व्याख्या दिली आहे.

सन्मार्गाकडे अश्रृंखल प्रवृत्ति असणें व असद्विचारांची स्फूर्ति मनांत कधींही न होणें हाच आम्ही मोक्ष समजतो.*

---

* न्या. मू. रानडे यांचीं धर्मपर व्याख्यानें पृ. ९८.

असा माधवरावांनीं पुढें एकदां एका व्याख्यानांत मोक्षाचा अर्थ सांगितला आहे. प्रार्थनासमाजांत १८७० सालानंतर वेळोवेळीं केलेल्या भाषणांत माधवरावांनीं एकेश्वरनिष्ठाच्या कैफियतींतले सूत्रमय विचार अधिक विशद करून श्रोत्यांच्या मनावर ठसविण्याचा यत्न केला आहे. भक्तिमार्ग वाढविण्याकरितां प्रार्थनासमाजाचा जन्म आहे, अशी माधवरावांनीं आपल्या भाषणांतून खात्री पटविली आहे. पण नांवाच्या व स्वरूपाच्या नवेपणामुळें प्रार्थनासमाजाचा भक्तिप्रसारात्मक उद्योग बहुजनसमाजाच्या मनावर विशेष परिणाम करीत नाहीं. नवेपणाचा दोष घालवून लोकांचा व प्रार्थनासमाजाचा दाट संबंध जडवावा, एतदर्थ माधवरावांनीं भक्तिमार्गाचें निरूपण, आयुष्याच्या उत्तर भागांत, चालविलें. सदर निरूपणांत जो भक्तिरस ओथंबलेला आढळतो त्याचा एकेश्वरनिष्ठाच्या कैफियतींत पूर्ण अभाव आहे. तत्त्वग्रंथांत सामान्यतः रुक्षपणा असतोच, तसा या प्रबंधांतही आहे. पण प्रस्तुत प्रबंध आणि त्यांचीं धर्मपर भाषणें यांचा मेळ घातल्यास त्यांचे धर्मविचार उत्तम प्रकारें समजतात.

येथवर प्रार्थनासमाजाविषयीं माधवरावांनीं सुरुवातीस केलेल्या कामगिरीचा वृत्तांत सादर केला. परंतु १८६८ मध्यें मुंबईस आल्यानंतर विधवाविवाहाच्या धामधुमींत व प्रार्थनासमाजाच्या विचारांत माधवरावांचा सर्व वेळ गेला, अशी कल्पना केल्यास ती चुकीची ठरेल. या दिवसांत माधवराव ॲडव्होकेटच्या परिक्षेचा अभ्यास करीत होते, शिवाय त्यांचे सरकारी नोकरींत प्रत्यहीं कांहीं तास जात होतेच. १८६८–१८७१ या तीन वर्षांत त्यांनीं न्यायखात्यांत व कॉलेजांत आलटून पालटून नोकरी केल्याची माहिती मागें आली

आहे. न्यायखात्यांतल्या नोकरीचा त्यांनीं वेगळ्या रीतीनें उपयोग केला. त्यांनीं दिवाणी व फौजदारी फिर्यादींचे आंकडे जमविले व त्यांचा अभ्यास करून या दोन्ही अदालतींच्या घटनेंत कोणते फेरफार केल्यानें लोकांना फायदा होईल हे, दोन निबंध लिहून, दाखविलें आहे. दिवाणी कोर्टाबद्दल निबंध लिहिण्याचें मुख्य कारण म्हणजे न्यायखात्यांतल्या कनिष्ठ हिंदी अधिकाऱ्यांसंबंधीं एका युरोपियन लेखकानें केलेलीं अनुदार विधानें होत. सबार्डिनेट जज्ज लांच खातात, खटल्याची सुनावणी वरवर करून निकाल देतात, अशा प्रकारचे न्याय-खात्यांतल्या हिंदी नोकरांवरील आरोप पाहून माधवरावांनीं आपल्या देश-बांधवांच्या अब्रूवरील घाला परतविण्याची तयारी केली. हें कर्तव्य करीत असतां त्यांनीं डिस्ट्रिक्ट जज्जाच्या किंवा ॲडिशनल जज्जाच्या जागेवर कधीं कधीं नेमल्या जाणाऱ्या सिव्हिल सिर्व्हिसमधील कच्च्या तरुणांच्या हातून नीट काम होत नाहीं, असा उलट आरोप केला आहे. त्यांच्या लेखाचा निष्कर्ष असा आहे कीं, प्रत्येक जिल्ह्याला हायकोर्ट स्थापन केल्याखेरीज न्यायखात्यांतील बजबजपुरी नाहींशी होणार नाहीं. हायकोर्टापासून तो तहत खालच्या कोर्टापर्यंत जी न्यायखात्याच्या कारभाराची सांखळी लागलीं आहे, तिच्यांतला खरा अधू दुवा जर कोणता असेल तर तो डिस्ट्रिक्ट जज्जाचीं कोर्टें हाच होय; त्यायोगानें निष्कारण पैशाचा व वेळाचा अपव्यय होतो, असें माधवरावांनीं सिद्ध केलें आहे. जिल्हा हायकोर्टाच्या कल्पनेवर निघणारे आक्षेप अगोदरच हेरून माधवरावांनीं त्यांचें भरपूर पुराव्यानिशीं निरसन केलें आहे. त्यांचे समग्र विचार दिल्यास ते नीरस वाटतील. माधवरावांनीं ॲडव्हो-केटच्या परिक्षेसाठीं अभ्यास करतांना, न्यायखात्यांतल्या नोकरीची संधी,

त्या खात्याच्या कारभाराचें खडान् खडा ज्ञान संपादून पथ्यावर पाडली, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. प्रथम त्यांनीं आपले विचार टाइम्समध्यें प्रसिद्ध केले. नंतर ते लहानशा पुस्तकाच्या रूपानें वेगळे छापले व सदर पुस्तक ना. टकर या नांवाच्या एका अंमलदारास अर्पण केलें. न्यायखात्यांत सुधारणा करण्याचा विचार यापूर्वी बरेच वर्षांपासून सरकारामध्यें चालू होता. माधवरावांनीं प्रस्तुत विषयावर १८६९ सालीं आगष्ट महिन्यांत इंदुप्रकाशामध्यें एक निबंध लिहिला होता.

१८६९ च्या डिसेंबरांत मरहूम सर फेरोजशहा मेथा यांनीं मुंबई इलाख्यांतील ग्रँट-इन-एड पद्धतीवर ईस्ट इंडिया असोसिएशनच्या मुंबई शाखेच्या विद्यमानें एक निबंध वाचला. जेथें ज्ञानसत्र दिसेल तेथें माधवराव हटकून हजर असायचे, असा एक मुंबईच्या नागरिक जीवनक्रमांत नियमच पडून गेला होता. फेरोजशहांनीं निबंध वाचला तेव्हां माधवरावांप्रमाणेंच त्यांचे भांडारकर, वागळे, परमानंद प्रभृति स्नेही हजर होते. फेरोजशहांचें सगळें विवेचन माधवरावांस पसंत पडलें नाहीं व त्यांनीं कांहीं आक्षेप दाखवून भाषण केलें. त्यांच्या मित्रांनीं या वादांत भाग घेतला. शेवटीं फेरोजशहांनीं उत्तर दिलें. श्री. सी. वाय्. चिंतामणी यांनीं संपादिलेल्या फेरोजशहांच्या व्याख्यानसंग्रहांत वादांतल्या व्यक्तींचा नामनिर्देश व त्यांतच माधवरावांना फेरोजशहांनीं दिलेला जबाब पहावयास सांपडतो. पण मूळचें भाषण उपलब्ध नसल्यामुळें फेरोजशहांच्या उत्तरावरून माधवरावांच्या प्रतिपादनाचा नीट बोध होत नाहीं. साक्रेटिसाप्रमाणें माधवरावांनीं फेरोजशहांच्या विचारांतला एकांगीपणा व हेत्वाभास हीं व्यंगें दाखविण्याचा यत्न केला असावा, एवढेंच सांगतां येतें.

ज्या संस्थेंत सर फेरोजशहांनीं शाळाखात्यासंबंधीं वरील निबंध वाचला ती संस्था निर्माण करण्यांत माधवरावांची खटपट होती. विष्णुशास्त्री पंडितांनीं तिच्या निर्माणांत बराच भाग घेतला. उपयुक्त वादाच्या प्रसंगीं माधवराव आणि त्यांचे पुष्कळसे मित्र कां हजर होते याचा आतां वाचकांस खचित उलगडा पडेल.

१८७० मध्यें माधवरावांनीं महाराष्ट्रीय समाजांत पुनर्विवाहाला मोकळीक मिळण्यासाठीं कोणतें कार्य केलें व त्याचा परिणाम काय झाला, हें मागें सांगितलें आहे. १८७१ सालीं त्यांना गुजराथी ज्ञातीतील पुनर्विवाहनिषेधाच्या तटाला खिंडार पाडण्याची संधी मिळाली. माधवदास रघुनाथदास नांवाच्या एका गृहस्थानें विधवेशीं लग्न लावण्याचें ठरविलें. समाजांत त्याचा भयंकर छळ सुरू झाला. कर्सनदास मूळजी, सोराबजी शापुरजी बंगाली, विष्णुशास्त्री पंडित यांनीं जर माधवदासांना साह्य केलें नसतें तर त्यांचे हाल कुत्र्यानेंदेखील खाल्ले नसते. या व्यक्तीप्रमाणेंच संकटकाळीं माधवरावांची आपणास परोपरीनें अतिशय मदत झाली, असें माधवदास सार्वजनिक रीतीनें कृतज्ञतापूर्वक कबूल करीत असत.

१८७१ च्या नोव्हेंबरांत माधवरावांची पुण्याला रवानगी झाली. त्यावर्षी उन्हाळ्यांत ते कोल्हापुरास गेले होते. तेथें त्यांनीं सामाजिक सुधारणेवर एक व्याख्यान दिल्याचा नाममात्र उल्लेख वृत्तपत्रांतून आढळतो.

# प्रकरण आठवें.

## पुण्यांतलीं पहिलीं वर्षें.

मागील प्रकरणाच्या शेवटीं माधवरावांना नोकरीनिमित्त पुण्यास १८७१ सालच्या नोव्हेंबरमध्यें जावें लागल्याची गोष्ट सांगण्यांत आली आहे. पुण्यास आल्यावर त्यांना आठशें रुपये पगार मिळूं लागला. यावेळीं माधवरावांचें वय तिशीच्या आंत होतें. ज्या जागेवर न्यायखात्यांतला नोकर आपल्या वयाच्या अखेरीस चढतो, ती जागा माधवरावांना ऐन तरुणपणीं व नोकरीच्या सुरुवातीस देण्यांत आली यावरून त्यांच्या योग्यतेची जाणीव सरकारास कशी पटली होती, हें लक्षांत येण्यास हरकत नाहीं. ही जागा मानानें मोठी होती, पण मानाप्रमाणेंच जोखीम व दगदग मोठी होती, हें विसरून चालणार नाहीं. पुण्याहून त्यांनीं मालवणास सेकंड क्लास सबार्डिनेट जज्जाच्या कामावर रुजू व्हावें, असा हुकूम त्यास पुण्याला गेल्यावर थोडयाच दिवसांनीं मिळाला, पण हा हुकूम अमलांत आला नाहीं. १८७३ सालीं त्यांची पुण्याच्याच जागेवर कायमची नेमणूक झाली व सरकारनें त्यांच्या गळ्यांत आणखी एक अधिकार अडकवून आपली गुणज्ञता व्यक्त केली. सामान्यतः सबार्डिनेट जज्जांना अपिलें

ऐकण्याचा अधिकार नसतो. डिस्ट्रिक्ट जज्जाकडून जीं अपिलें येतील त्यांचे निकाल माधवरावांनीं लावावें, असा सरकारानें ठराव केला. माधवरावांच्या अधिकारांत त्यामुळें वाढ होऊन लोकांतही त्यांचें वजन वृद्धिंगत झालें. मालवणच्या बदलीचा हुकूम जर सिद्धीस गेला असता तर माधवरावांच्या हातून जें देशकार्य पुण्यास राहिल्यामुळें घडलें, त्यास अजीबाद खो बसला असता.

पुणें शहराची या वेळची स्थिति विशेष आशाजनक नव्हती. पेन्शनर अमंलदारांची बरीच वस्ती येथें होती. पण त्यांच्यांत कर्तृत्वाचा अभाव होता. सरकारच्या मेहेरबानीनें मिळणारी सुखाची पोटभर भाकरी खावी, सायंकाळीं देवदर्शन घ्यावें, कथापुराणें ऐकावीं, किंवा वाचनालयांत जाऊन घटकाभर वृत्तपत्रें चाळण्यांत अथवा समानशीलांशीं चकाटया पिटण्यांत वेळ घालवावा, अशी पेंशनरांची दिनचर्या होती. पुण्यांत तेव्हां सरदारांचाही बराच भरणा होता, त्यांची स्थिति पेंशनरां-सारखीच शोचनीय होती. इनामाच्या उत्पन्नाचा फडशा कसा उडवायचा या विवंचनेंतच प्राय: बहुतेक सरदारांचा कालक्षय होत असे. ज्यांनीं वास्तविक लोकहितावह कार्यांत पुढाकार घ्यावयाचा त्यांची अशी अवस्था असल्यावर कारकून, भिक्षुक, मजूर, व्यापारी, यांजबद्दल बोलायलाच नको. पण यावरून संघटित उद्योगांचा उपक्रम पुण्यास केव्हांच झाला नाहीं, असें मानतां येत नाहीं. पेशवाईचा नाश आणि इंग्रजी राज्याचा पूर्ण अंमल या दरम्यानच्या संक्रमणावस्थेची समाप्ति झाल्यावर नवीन परिस्थितींतून उद्धाराचा मार्ग काढण्याचे विचार लोकांत उत्पन्न होऊं लागले. संक्रमणावस्थेच्या दिवसांत इंग्रज सरकार किंवा त्यांचे अंमलदार पूर्वीच्या वहिवाटीचा पुष्कळदां अवलंब करीत

याचीं एकदोन उदाहरणें दिल्यास पुरेशीं होतील. १८२८ सालीं संगमानजीक वेलस्ली पूल बांधून पुरा झाला, तो उघडण्याचे प्रसंगीं ख्रिस्ती राज्यकर्त्यांनीं ब्राह्मणास दक्षिणा वाटून खूष केलें. १८२४ मध्यें दोन मिशनरी आपलें धर्मप्रसाराचें ठाणें मांडण्याकरितां पुण्यास आलें असतां सरकारानें त्यांना बंदी केली व तेवढयानें त्यांच्या धर्मभक्तीला आळा बसला नाहीं, म्हणून अटकेंत कोंडलें. पेशवाई जाऊन यावेळीं अवघीं सहाच वर्षं झालीं असल्यानें जिंकलेल्या नव्या राजधानींतल्या लोकांची मर्जी प्रसन्न राखून आपल्या राजवटीला बळकटी आणण्याकरितां स्वतःस धर्मतः व तत्त्वतः संमत नसलेल्या गोष्टी करण्याकडे राज्यकर्त्यांचा संक्रमणावस्थेंत कसा कल होता हें यावरून ध्यानांत येईल. इंग्रजी राज्याची मिठी भक्कम बसल्यावर ही लोकांना खुष ठेवण्याची प्रवृत्ति ऱ्हास पावली आणि श्रावणमासांतील दक्षिणेचा रोकड देकार बंद पाडून त्याचा शाळेकडे उपयोग करण्यासारखे प्रकार राज्यकर्ते बिनदिक्कत अंमलांत आणूं लागले. १८२१ त पुण्याला नव्या थाटाची शाळा निघाली. तेव्हां इंग्रज शिक्षक लोकांच्या समजुतींत खिळलेल्या स्पर्शास्पर्शदोषांचा मान राखीत होते, परंतु जनक्षोभांतलें राज्याला धक्का लावण्याचें सामर्थ्य नाहींसें झाल्याबरोबर 'सब घोडे बारा टक्के' हा न्याय गाजण्याला विलंब लागला नाहीं. जुन्या शास्त्रांच्या अध्ययनानें पोटाची खळी भरत नाहीं, असा अनुभव येतांच बुद्धिमान् मंडळी भराभर इंग्रजी भाषेचें ज्ञान संपादण्यांत पुरुषार्थ समजूं लागली. कृष्णशास्त्री चिपळूणकर तारुण्याची तरतरी ओसल्यावर इंग्रजी भाषेच्या आश्रयास गेले हें एक काळाच्या परिवर्तनाचें चिन्ह आहे. हळूहळू जुने रिवाज विचारान्तरानें व सरकारी हुकुमानें नामशेष

झाले आणि लोकाच्या दैनंदिन जीवनक्रमाचें बाह्य स्वरूप साफ बदलत चाललें. ठोकळमानानें असें म्हणतां येतें कीं १८५० पर्यंत संक्रमणावस्था चालू होती. त्या सालापर्यंत पेशवाईच्या अखेरची पिढी मृत्युमुखांत जाऊन मागील काळाची ताजी व 'चक्षुर्वैसत्यं' स्मृति नसणारी नवी पिढी उदयास आली. इंग्रज राज्यकर्त्यांनीं या स्थित्यंतराचा फायदा घेऊन १८५१ त मुलींची शाळा काढली, त्याप्रमाणें अतिशूद्रांना शिक्षण देण्याची सोय केली गेली. याच सुमारास जुन्या सरदारांच्या हक्कांची झडती घेऊन अनेक सरदारांचीं इनामें नव्या सरकारानें बुडविलीं. १८५७ मध्यें उत्तर हिंदुस्थानांत आविंध्यहिमाचलाच्या औरस चौरस मुलखांत लष्करी बंडाचा भयंकर वणवा जळत होता, परंतु त्याचा लवमात्र परिणाम, त्या बंडांत पेशव्यांचा एक वंशज सामील असतांही, पुण्यासारख्या पेशव्यांच्या माजी राजधानींत दिसून आला नाहीं. उलट इंग्रजी अंमलामुळें उत्पन्न झालेल्या परतंत्रतेच्या जेरबंदाचा आणखी एक वेढा यावर्षी म्युनिसिपालटीच्या रूपानें बसला. १८५० मध्यें रस्त्यांत चालणारे तमाशे बंद करण्यांत आले. शिमग्यांतल्या धुळवडीचें दंगे आणि बीभत्स आचार यापूर्वीच इंग्रजी अंमलाखालीं नरम पडत चालले होते. ज्ञानप्रकाशपत्रानें पुणें शहरांत जन्मास येऊन मागल्या परंपरागत आचारविचारांवर झोड चालविली होती व लोकांत त्यांबद्दल विशेष तिरस्कार नव्हता. सारांश मराठेशाहीच्या सगळ्या हालचालींचें मूळ केंद्रस्थान जें पुणेंशहर त्यामध्यें स्मशानासारखी शांतता दिसत होती.

कै. टिळकांनीं माधवरावांच्या मृत्यूनंतर केसरींतील अग्रलेखांत माधवरावांच्या कर्तबगारीचें रहस्य समजण्याकरितां, वरच्यासारखी परि-

स्थिति वर्णून 'महाराष्ट्र म्हणजे त्यावेळीं एक थंड गोळा बनला होता' असें लिहिलें आहे. पेशव्यांच्या कारकिर्दीत मराठेशाहीच्या हिंदुस्थान-भर पसरलेल्या शरीराला चैतन्य पुरविणाऱ्या काळजाची योग्यता पुणें शहरास प्राप्त झाली होती. हें काळीजच पेशवाईनंतर निश्चेष्ट झाल्यामुळें सगळ्या महाराष्ट्रांत मरणप्राय थंडपणा पसरावा, यांत नवल नाहीं. तथापि हें काळीज कायमचें कार्यशून्य व्हावें अशी ईश्वरी योजना नव्हती. त्यामुळें नव्या मनूंत कर्तबगारी बजावण्याचा काळ येतांच त्याची कार्यक्षमता टवटवली. १८५३ सालीं कंपनी सरकारची सनद बदलण्याची वाटाघाट विलायतेस सुरू झाल्याचें इकडे समजलें तेव्हां आपल्या हक्कांची दाद लावण्याकरितां पुण्यांतल्या सरदारांनीं व लोकांनीं एक 'डेक्कन असोसिएशन' नांवाची संस्था निर्माण करून सदर काळजाचा जीवंतपणा निदर्शनास आणून दिला. या संस्थेच्या हातून फारशी कामगिरी झाली नाहीं व लवकरच तिनें दाक्षिणात्यांवर कोणा सुभाषितकारानें आरोपिलेल्या, आरंभशूरत्वाची यथार्थता सिद्ध केली. पुण्यास यावेळीं मोरशास्त्री साठे नांवाचे एक अत्यंत नामांकित विद्वान् शास्त्री होते. त्यांनीं १८५४ सालीं 'कल्याणोन्नायक' नांवाची सभा काढली. या सभेच्या बैठका दर रविवारीं होत. पण तिनें विचारी वजनदार लोकांस उन्नतीची आंच लागली आहे, एवढा मुद्दा सिद्ध करण्यापलीकडे विशेष पल्ला गांठला नाहीं. पुनः कांहीं वर्षें पुण्याच्या इतिहासांत सामुदायिक चळवळ आढळत नाहीं. १८६७ सालीं मुंबईच्या बॉंबे असोसिएशनच्या धर्तीवर 'पूना असोसिएशन' नांवाची संस्था निघाली आणि तिच्या पोटांतून १८७० सालच्या वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तावर 'सार्वजनिक सभा' अवतरली. पर्वती संस्थानाच्या कारभारांत गोंधळ

आहे, तो दूर करावा ही साधी इच्छा सदर सभेच्या मुळाशीं होती. पण संस्थाच काढावयाची तर तिच्या कार्याचें क्षेत्र विस्तृत ठेवणें उचित, असा दूरदर्शी मंडळीचा सल्ला पडल्यामुळें सगळ्या सार्वजनिक उलाढालींत भाग घेण्याचें तिच्या उत्पादकांनीं ठरविलें व तसें अन्वर्थक नांव देऊन तिचा प्रारंभ जाहीर केला. माधवराव पुण्यास आले त्यावेळीं हीं एकच नांव घेण्यासारखी संस्था पुण्यास होती. पेशवाईच्या नाशानें थंड बनलेला महाराष्ट्राचा गोळा उबवून, त्याच्यांत चैतन्य ओतून त्यास पुनः जोरानें हातपाय हालविण्याच्या स्थितींत आणून सोडण्यासाठीं माधवरावांनीं या संस्थेचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. सुदैवानें यांना एक अत्यंत उत्साही साह्यकर्ता मिळाला आणि पुढील चारपांच वर्षांच्या आंत या संस्थेनें :राज्यकर्त्यांना दरारा वाटण्याजोगी कामगिरी बजावली.

माधवरावांना जो उत्साही साह्यकर्ता मिळाला तो एका टोपण नांवानेंच महाराष्ट्रांत विशेष प्रसिद्ध आहे. 'सार्वजनिक काका' हें या साह्यकर्त्याचें टोपण नांव असून गणेश वासुदेव जोशी हें त्यांचें मूळ नांवही लोकांच्या परिचयाचें आहे. मात्र दुर्दैवानें यांचें तपशीलवार चरित्र महाराष्ट्राला उपलब्ध नाहीं. इंग्रजी राज्यकारभारांतून जो अन्याय दिसेल त्याचा अंतःकरणपूर्वक नायनाट उडवावा ही इच्छा एडमंड-बर्कच्या जीवनांत जशी प्रामुख्यानें दिसते तशीच ती परिस्थित्यनुरूप लहानशा प्रमाणांत सार्वजनिक काकांच्या जीवनांत उत्कटत्वानें दिसते. साताऱ्यास त्यांचा १८२८ मध्यें जन्म झाला. लहानपणींच काका पितृसुखास अंतरले. त्यांना उतारवयापर्यंत इंग्रजीचें चांगलेसें ज्ञान नव्हतें. मराठी शिक्षण पुरें झाल्यानंतर विसाव्या वर्षीं त्यांनीं पुण्यास

नाझर कचेरींत नोकरी धरली. सुमारे ७।८ वर्षे नोकरींत घालविल्या-नंतर त्यावर कुभांड आलें व नोकरी सुटली. चौकशीअंतीं हें कुभांड सपशेल खोटें असल्याबद्दल वरिष्ठांची खात्री होऊन त्यांनीं काकांना पुनः नोकरींत दाखल होण्यास हरकत नाहीं, असें कळविलें. हा निकाल लागण्याचे अगोदर काकांनीं कायद्याचा अभ्यास संपवून वकिलीच्या धंद्यांत शिरण्याचा पक्का बेत केला होता. नोकरीची लालूच सोडून त्यांनीं हा धंदा सुरू केला. काकांची बुद्धि जात्या अतिशय तीव्र होती. नव्या व्यवसायांतल्या खांचाखोचा समजण्यास त्यांना विलंब लागला नाहीं. सुरुवातीस त्यांनीं बिकट गुंतागुंतीचे तीनचार खटले जिंकल्या-मुळें वकीलींत मिळकतीच्या दृष्टीनें त्यांचा उत्कृष्ट जम बसला. एकदोन खट-ल्यांत त्यांनीं विशेषचः बाणेदारपणा दाखविला होता. बुद्धीचा तल्लखपणा त्यांच्या स्वभावांत ओतप्रोत असल्यामुळें स्वस्थ बसून व्यवसायाबाहेरची फुरसत व्यर्थ दडवणें त्यांना आवडत नसे. कांहींना कांहीं लोकहित-कारक काम काढून त्याची उस्तवारी करण्याची त्यांना दांडगी हौस होती. १८८० सालीं ते दिवंगत झाल्यावर त्यांस ओळखणाऱ्या एका गृहस्थानें मुंबईच्या 'नेटिव ओपीनियन' पत्रांत विस्तृत लेख लिहिला आहे. त्यांत सदर लेखक म्हणतो कीं, काका व्यर्थ माशा मारीत बसलेले कधींही आढळत नसत. रस्त्यानें मंद मंद पावलें टाकीत इतस्ततः रिकामें फिरण्याची त्यांना संवय नव्हती. त्यांच्या बुद्धीचें चक्र जसें वेगानें फिरे, तसेंच त्याचें चालणेंही वेगाचें असे. एखाद्या कार्याच्या चिंतेनें व्यग्र असलेल्या चर्येचा व रस्त्यांतून झपझप चालणारा जो इसम दिसेल तो 'सार्वजनिक काका' अशी एक त्यांना ओळखण्याची पुण्यास खूणच झाली होती, असें सदर लेखकानें त्यांचें वर्णन केलें

आहे. सामाजिक सुधारणेबद्दल त्यांचे विचार उदासीन किंवा तटस्थ-पणाचे असले तरी स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल त्यांना आस्था होती. त्यांच्या प्रत्येक कामांत त्यास मदत करणारे गोवंडे नांवाचे एक गृहस्थ त्यांस लाभले. काकांची पत्नी व गोवंडयांची पत्नी, या दोघींनीं ' स्त्रीविचार-वती सभा ' नांवाची एक संस्था काढली होती. या संस्थेच्या विद्यमानें गांवांतल्या स्त्रियांस कधींकधीं बोलावून स्त्रीशिक्षणासंबंधीं काकांच्या घरीं विचारविनिमय केला जात असे. काका मोठे मातृभक्त होते. मातेच्या सांगण्यावरून त्यांनीं १८६८ सालीं विष्णूचें मंदिर बांधलें. काकांनीं पुण्याच्या निराधार नागरिकांना निरपेक्ष साह्य केलें, असें नसून मुंबई इलाख्यांत जेथें जेथें मदतीची अवश्यकता उद्भवली तेथें काकांची स्वारी दत्त हजर राही व साह्य कसें मिळेल या काळजीनें निराश झालेल्यांना ते मदत देत. सुरतेच्या एका राजकीय प्रकरणांत काकांनीं उडी मारली म्हणून पुष्कळ असामी कैदखान्याच्या साडेसातीं-तून सुरक्षित बचावले. दुसरी कांहीं उदाहरणें पुढें प्रस्तुत चरित्रानु-संधानानें येणारच आहेत. माधवरावांना, असा लोकहिताची तळमळ नसानसांतून आपादशीर्ष वहात असणारा उत्साही, खटपटी, सहकारी मिळाल्यामुळें त्यांच्या सर्व आकांक्षा अपेक्षेबाहेर सफळ झाल्या. विचार माधवरावांचा आणि आचार सार्वजनिक काकांचा असें त्यांचें कार्य व्यक्ताव्यक्त स्वरूपांत अन्योन्यावलंबी होतें.

स्वदेशी व्यापाराला उत्तेजन देण्याची चळवळ अलीकडे वंगभंगांतून उत्पन्न झाली, तेव्हां महाराष्ट्राला या चळवळींत अपूर्वता किंवा नवलाई वाटली नाहीं; उलट या चळवळीचा पाया महाराष्ट्रानें व त्यांतल्या त्यांत पुणें शहरानें १९ वें शतक संपण्यापूर्वींच तीस वर्षें घातला

असें सर्वत्र प्रतिपादन केलें जात असे, ही गोष्ट वाचकांना अवगत असेल. ही आत्मप्रशंसा गाण्याची संधि माधवरावांनींच महाराष्ट्रीयांना दिलेली आहे. १८७२ सालच्या डिसेंबरांत माधवरावांचें एक स्वदेशी व्यापारावर अत्यंत विद्वत्ताप्रचुर व्याख्यान झालें. त्या व्याख्यानांत त्यांनीं आपल्या अर्थशास्त्राच्या ज्ञानाचें भांडार उघडून हिंदी व्यापाराची हीन दशा श्रोत्यांच्या गळीं उतरविली. हिंदुस्थानांतल्या संपत्तिरसाचें इंग्रजी राज्यकारभार व व्यापार कसें शोषण करून घेत आहेत, याचें त्यांनीं भयानक चित्र रेखाटलें आहे. प्रजेकडून मिळणाऱ्या उत्पन्नाचा एक तृतीयांश म्हणजे १६ कोट रुपये दरसाल अविच्छिन्न विलायतेस जातात. परदेशीं कच्चा माल जातो व त्यामानानें पक्का माल कमी येतो. त्यामुळें हिंदी कारागीरांच्या कलाकौशल्याचा क्षय होत असून 'सर्वांची प्रवृत्ति विलायती जिनसांकडेस दिवसें दिवस वाढत चालल्यामुळें स्वदेशीय जिनसांचा खप संसाराच्या सर्व कामांत कमीकमी होत आहे व ही गोष्ट सर्वांनीं ध्यानांत ठेवण्याजोगी आहे' अशी माधवरावांनीं सदर भाषणांत एका जागीं इशारत दिली आहे. ज्या देशाच्या व्यापारांत मालाची आयातनिर्यात सारख्या प्रमाणामध्यें असते, त्या देशाचा व्यापार उत्कृष्ट असा अर्थशास्त्राचा सिद्धांत आहे; पण हिंदुस्थानांत निर्गतीचें प्रमाण आयातीहून जास्त आहे, अर्थात् हिंदी व्यापाराची स्थिति शोचनीय आहे, पण ही स्थिति बदलण्याची सत्ता आपल्या हातीं नाहीं. व्यापार आणि राज्यकारभार हीं दोन्हीं साधनें परस्थांच्या तावडींत सांपडलीं आहेत. देशांत कारखाने वाढवून विलायती मालाच्या खपाची पीछेहाट करणें, हें एक साधन आपल्या हातांत आहे; पण त्याचा फलप्रद

उपयोग होण्याला भांडवलाची जरूरी आहे; भांडवलावांचून कारखाने काढण्याचा उपदेश म्हणजे शुष्क काथ्याकूट हें माधवरावांच्या ध्यानांत असल्यामुळें त्यांनीं भांडवलाच्या प्राप्तीचा दिशा दाखविली आहे. उत्पन्नावरील कर दरशेंकडा एक रुपया याप्रमाणें वसूल केल्यास एक कोट रुपये सरकारी तिजोरींत जातात. १८७१ पूर्वीं दहाबारा वर्षें हा कर सरकार घेत होतें. लोक आपल्या उत्पन्नाचा खरा आंकडा लपवितात, अशी सरकारी अंमलदारांची तेव्हां कुरकूर होती, पण या कुरकुरीकडे कानाडोळा न करतां अतिशय उदार मनानें अंदाज केला तरी दोनशें कोटि रुपयांपेक्षां हिंदुस्थानांतील जनतेच्या एकूण धनसंचयाची मजल जात नाहीं. खर्चवेंच वजा जातां ६०–६५ कोटींची निव्वळ बचत रहाते. तिच्यांतून पुन: सरकारच्या पदरांत पंधराकोट रुपये पडतात. म्हणजे सरकारदेणें वारून लोकांच्या पुंजींत रुपयापैकीं सगळे बारा आणे उरतात. भांड्याच्या बुडाला छिद्र ठेवून वरून पाणी भरण्याचा धडाका लावला तरी जसें तें भांडें भरत नाहीं, त्याप्रमाणें या देशाचा उद्योग वाढला असून देशाचें सामर्थ्य शुष्क होत चाललें आहे. परदेशस्थांचा अंमल म्हणून जें नुकसान सोसावें लागतें त्यांत आश्चर्य नाहीं. चमत्कार आहे तो आपल्याच लोकांच्या आत्मघातकीपणाचा. १८६१ पासून १८७० पर्यंत हिंदुस्थानांत सोनें व रुपें १५० कोटि रुपयांचें आलें, त्यांतल्या अर्ध्या सोन्यारुप्याचें नाण्यांत रूपांतर झालें, पण बाकीचें पाऊणशें कोटीचें सोनेंरुपें लोकांनीं आपल्या हातांनीं मातींत मिसळलें,ही गोष्ट माधवरावांनीं उघडकीस आणली आहे. ते म्हणतात:—

हिंदुस्थानदेश खेरीज करून बाकी मुलखांतील व्यवस्था अशी आहे कीं, जेवढें सोनें व रुपें नाणें पाडण्याचें कामीं लागतें, तसेंच किरकोळ कलाबुत वगैरे

व्यापारास लागतें, तें खेरीज करून, बाकी सोन्यारुप्याचा खप त्यादेशांत होत नाहीं. त्याचा लागलाच व्यवहारांत उपयोग होऊन इतर द्रव्याचें त्यांस रुपांतर मिळून देशांत रोजगार धंदे वाढण्याचे कामीं तें उपयोगी पडतें,तशी या देशाची स्थिती नाहीं. येथें विलायतेची वरात संभाळून जें सोनें रुपें देशांत येतें, तें या देशांत आलें म्हणजे निंमे सरकारीं टांकसाळींत जाऊन नाणें बनतें, व बाकी निंमे देशांतच मुरतें म्हणजे भुईंत गडतें. लोक आपल्या बायकामुलांच्या अंगावर त्यांचे दागिने बनवून तें सोनें रुपें जशी तापलेली जमीन पाणी शोषून घेते, त्याप्रमाणें अंगावर झिजवितात.त्यांस एकदां दागिन्याचें रूप पावलें म्हणजे व्यापाराचें कामीं त्याचा तादृश उपयोग होत नाहीं. मालकावर प्रसंग आला असतां तें बाहेर येतें, परंतु बहुशा लाख व झांज यांचे योगानें सर्वस्वीं लय होई पर्यंत त्याचें रूप बदलत नाहीं. + + + म्हणजे जें सोनें रुपें येतें, तें निंमें नाणें बनून चलन होतें व बाकीचे निंमे म्हणजे सात पासून आठ कोट रुपये दरवर्षांत मातींत मिसळतात. + + + आधींच आपला संचय थोडा, त्यांत विलायतेकडे १६ कोट रुपये खंडणी धाडावी लागते, शिवाय आपल्या लोकांच्या मूर्ख समजूतीमुळें व एकमेकांच्या अविश्वासामुळें या अत्यल्प संचयापैकी सुमारे आठ कोट रुपये दागिन्यांच्या रूपानें मातींत मिसळले जातात. + + + या गोष्टीचा सर्वत्रांनीं विचार करावा, कारण ही दुसरी गोष्ट सर्वत्रांच्या स्वाधीनची आहे. + + + ज्यादेशांत संचय मोठा होतो, तेथें असा प्रकार थोडाबहुत असल्यानें विशेष हानि होत नाहीं. परंतु आपल्या सारख्या दरिद्री देशांत परदेशस्थ लोकांच्या अमलामुळें व आपल्या गैरसमजुतीच्या वर्तनामुळें दरसाल पंचवीस कोटींची नागवण होत आहे; याचा सर्वत्रांनीं आपल्या योग्यतेप्रमाणें विचार करावा + + अर्थात हा जो मोठा पाझर लागला आहे, त्याच्या योगानें आपल्या सर्व राष्ट्ररूप शरीरांत अवसान कांहीं राहिलें नाहीं असें झालें आहे. मोठा जवान माणूस असला, आणि त्याचे डोक्यावर त्यास न तोलणारें वजन दिलें व त्याचें पायांत वजनाच्या बिडया घातल्या व त्यास उंच डोंगर चढण्यास लावलें, तर त्याचें सामर्थ्य दिवसेंदिवस कमी होईल यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं.

अशा रीतीनें देशाच्या द्रव्यशोषाची निराशाजनक माहिती सांगितल्यावर आपल्या भाषणानें निरुत्साह होण्याचा संभव आहे व आशेचा मार्ग दाखविण्याखेरीज आपलें कर्तव्य संपत नाहीं, हें माधवराव विसरले नव्हते. त्यांनीं आशावादाचे पुढील उद्गार काढले आहेत:-

तथापि याही प्रसंगीं हिम्मत सोडून उपयोग नाहीं. चारहजारवर्षांपासून हा देश हल्लींचे प्रसंगापेक्षांही दुर्धर प्रसंग अनुभवून पृथ्वीचे पाठीवर कायम राहिला आहे, तेव्हां आपल्या जीवनाचीं मुळें फार खोल गेलीं आहेत, यांत संशय नाहीं.इतक्या ओझ्यानिशीं व या बिडयांतूनही आपली सुटका होईल, या गोष्टीची सर्वांनीं खात्री बाळगून झटावें.

यासुमारास फ्रँको-जर्मन लढाईच्या घोर परिणामांतून फ्रान्स देश आपली मुक्तता करून घेत होता व त्याच्या स्वदेशाभिमानाकडे पाहून सारें जग आश्चर्यानें तोंडांत बोट घालीत होतें.फ्रान्सदेशाला हांहां म्हणतां जिंकून जर्मनीनें त्यावर तीनशें कोट रुपयाची खंडणी लादली. शिवाय फ्रान्सला लढाईचा खर्च करावा लागला तो वेगळाच. फ्रान्सच्या शिरावर पांचशें कोट रुपये कर्जाचें ओझें येऊन पडलें. हा प्रसंग धीर खचवून जमीनदोस्त लोळविणारा होता, पण फ्रान्सनें हिंमत सोडली नाहीं. प्रजेंतल्या प्रत्येक कुटुंबानें आपला खर्च कमी केला व मिजाशीला अजीबाद रजा दिली. नव्या कराचा भरणा बीनतक्रार केला आणि अशा विस्मयकारक स्वार्थत्यागाच्या जोरावर आपली संकटांतून मोकळीक करून घेतली. माधवरावांनीं आपल्या श्रोत्यांना फ्रान्सचें उदाहरण सांगून बजावलें आहे कीं—

फ्रान्सदेशावर हा जो एकाएकीं दुर्धर प्रसंग आला त्याच योग्यतेचा आपणावर नेहमींचा प्रसंग आला आहे. परदेशस्थ अंमलाच्या संबंधानें आपणास जी खंडणी द्यावी लागते ती खंडणी तूर्त कमी होण्याचे अगर चुकण्याचे विचार फार दूर आहेत. तेव्हां तें ओझें आपल्या शिरावर नेहमीं आहे, असें धरून सर्व प्रयत्न झाले पाहिजेत.

+ + + आपणही आपले निष्कारणीं खर्च कमी करून संचय विशेष वाढवावा, व तो संचय आपल्या लोकांस जेणेंकरून रोजगार धंदा लागेल अशा उद्योगांत लावण्याची तजवीज सर्वदा करावी.

आपण सर्वत्र सरकारांनीं एखादें सालीं जास्त कर वाढविला तर तो कर बिनबोभाट देतो व आपला इतर खर्च असतो, तो कमी करतो; तद्वतच आपल्यावर नकळत हा जो खंडणीचा दंड पडत आहे, त्याविषयीं ही तजवीज ठेवली पाहिजे. आपला विनाकारण जो खर्च होतो, त्यांतील बचत करून आपण बाहेर देशास खंडणी पाठवितों, त्या मालाइतका संचय वाढविल्यास आपण खंडणी दिली तरी न दिल्याप्रमाणें होणार आहे.

गंगेंत बुडविणें, जमिनींत गाडणें, सोन्यारूप्याच्या दागिन्यांत खर्चणें, मिजासींत उधळणें, असे द्रव्याच्या विनियोगाचे अनेक प्रकार आहेत. नफ्याच्या रूपानें दामदुप्पट वाढवून परत देणाऱ्या व्यापारांत पैसा घालणें, हाही एक त्याच्या विनियोगाचा प्रकार आहे. पैकीं धनसंचयाचा उपयोग शेवटच्या रीतीनें ज्या मुलखांत विशेष होतो, तो देश लवकर संपत्तिमान् होतो, असें सांगून व फिरून एकवार मितव्ययाच्या द्रव्यवर्धक व्यापारी तत्त्वाचा उच्चार करून माधवरावांनीं आपलें हें भाषण संपविलें आहे.

जोशीकाकांच्या परिणामसुलभ हृदयावर या भाषणाचा ठसा इतका उमटला कीं, त्यांनीं १८७२ सालच्या जानेवारींत स्वदेशी वस्तु वापरण्याचें व्रत अंगीकारलें. प्रथम त्यांनीं विलायतच्या वस्त्रांची स्वतः पुरती हकालपट्टी केली. या भाषणाचें वाङ्मय चाळल्यास असें दिसतें कीं, १८७१ सालीं माधवराव पुण्यास आल्यानंतर स्वदेशी व्यापारोत्तेजनासंबंधीं विचारविनिमय होऊन काकांनीं एक कंपनी स्थापन केली. या कंपनीच्या भागीदारांची स्वकार्याविषयीं जी सर्वजनोपयोगी

चर्चा चालत असे, तिच्यांतलेंच माधवरावांचें भाषण आहे. सरकारनें अमूक करावें, तमूक करावें, असे अर्ज करीत बसण्यामध्यें आपल्या प्रयत्नांची इतिकर्तव्यता मानण्याची हीन दीन याचकवृत्ति झुगारून शक्य असलेल्या व्यवहारांत स्वावलंबनाची कांस धरण्याची महत्त्वाकांक्षा महाराष्ट्रांत यावेळीं उद्भवली होती. माधवरावांनीं या महत्त्वाकांक्षेला, तिच्या बाबतींतल्या स्वाधीन कर्तव्याचा पाट फोडून प्रवाही करून सोडलें. काकांनीं त्याचा आदर करून आपल्या वर्तनाचा धडा समकालीन नागरिकांस घालून दिला. त्यांचा त्यावेळीं उपहास झाल्याच्या दंतकथा पुष्कळच आहेत. परंतु काका उपहासानें डगमगले नाहींत. १८७३ च्या फेब्रुवारी महिन्यांत माधवरावांनीं याच विषयावर विश्राम बागेंत दुसरें भाषण केलें.

प्रस्तुत भाषणांत माधवरावांनीं हिंदी व्यापाराच्या स्थितीचें इत्थंभूत विवेचन करून मागल्यापेक्षां जास्त कळवळ्याचा देशाभिमानपर व कार्यप्रवण बनविणारा उपदेश केला आहे. इंग्रजी राज्यांत या देशाचा व्यापार वाढला. चहा, काफी, नीळ या पदार्थांची लागवड नव्यानें होऊन हजारो हिंदी मजुरांना रोजगार मिळाला. आगगाड्यांमुळें व्यापाराच्या वाढीस मदत झाली, परदेशांत लोकर, ताग, जवस, तांदूळ हा माल जाऊन त्याची गरज भागविण्याचें काम हिंदुस्थानाकडे कायमचें आलें, परंतु देशाचें दारिद्र्य दुरावलें नाहीं. व्यापाराची व कंगालपणाची वृद्धि एकाच वेळीं कां व्हावी, हें एक विचित्र कोडें आहे, परंतु येथील व्यापाराच्या वाढीचा इतिहास लक्षांत घेतल्यास, हें कोडें उकलतें. व्यापाराची वाढ इंग्रजांच्या भांडवलानें व त्यांच्या ताब्यांत असलेल्या साधनानें झाली, त्यायोगानें सगळा नफा त्यांच्या खिशांत

जातो व मजुरीशिवाय—म्हणजे जेमतेम पोट भरण्याइतक्या मुशाहिन्याशिवाय—दुसरा मोबदला हिंदुस्थानाला मिळत नाहीं. दारिद्य बळावत असून हा देश मरत कसा नाहीं, या प्रश्नाला माधवरावांनीं पुढील उत्तर दिलें आहे:—

आतां आपल्या लोकांचें हें भाग्य मोठें आहे कीं, परमेश्वरकृपेनें ज्या भूमिमातेच्या ओटयांत आपण पडलों आहों, तिची समृद्धि व फलद्रूपता अशा मानाची आहे कीं, सर्व पृथ्वीवरील हवा, पाणी व जमीन आपल्या मुलखांत आहे, सर्व देशांतील झाडें, वनस्पति, औषधें, द्रव्यें, धान्यें, आपल्या जमिनींत विपुल व सहज पिकतात, असें म्हटलें तरी चालेल. हिंदुस्थानाच्या व्यापाराच्या संबंधानें या गोष्टीचा विचार विशेष रीतीनें मनांत ठसतो. येथील प्रजा दुर्बल, दुर्भिक्षानें पिडलेली, यंत्राचीं साधनें वगैरे माहीत नाहींत, अशा प्रजेच्या हातून पृथ्वीवरील अन्य देशांच्या बरोबर आपल्या देशाचा टिकाव कसा लागेल ही नेहमीं भीति मनांत वाटते. या भीतीचें निराकरण परमेश्वरानें आपल्या जनक भूमिमातेच्या अंगीं जी विलक्षण कामधेनुसारखी सिद्धि दिली आहे, त्या सिद्धीच्या योगानें होतें. ज्या ज्या वेळीं व्यापाराच्या संबंधानें एखाद्या उपयोगी व्यवहारांतील जिनसांची तूट अन्यदेशीं पडण्याचा प्रसंग आला, त्या त्या वेळीं आपला देश पुढें होऊन आपणासारख्या दुर्बल लोकांचे प्रयत्नानेंही ही तूट भरून आली येवढेंच नाहीं; परंतु त्या देशावर त्या पदार्थांच्या संबंधानें जो आपला पगडा बसला तो पुढें पहिली अडचण संपली असतांही आपण सोडला नाहीं.

या नंतरच्या उद्घाटनांत माधवरावांनीं व्यापारांतल्या पदार्थांचे तपशीलवार आंकडे देऊन सकृद्दर्शनीं व्यापाराची आनंददायक वाट दाखविणाऱ्या परिस्थितीच्या पोटांतलीं दुष्ट बिंगें स्पष्ट दिसण्याची तजवीज केली आहे. व्यापाराची घडामोड अनभिज्ञाच्या डोळ्यांत धूळ फेकीत असते. वस्तुतः जी हानि ती व्यापाराच्या उलाढालींत वर वर पहाणाऱ्या माणसाला लाभासारखी भासते. पण ही गोष्ट सगळ्यांना समजत

नाहीं. व्यापारांतल्या एका भ्रमाचें निराकरण माधवरावांनीं केलें आहे, तें असें:—

एकंदरींत तीस वर्षांपूर्वीं जो हिंदुस्थानाचा वसूल होता, त्याचे दुपटीनें हल्लीं वसुली बेरीज झाली आहे. इतका वसूल वाढला आहे, त्यामुळें त्याची फेड करण्याकरितां शेतकरी व इतर धंद्याचे लोकांस बाहेर देशीं माल पूर्वीपेक्षां जास्त पाठवावा लागतो. आपल्या देशांतच सदर माल खपवूं म्हटल्यास सवड नाहीं. बाहेर देशीं आपल्या मालास किंमत बरी येते, यामुळें आपण बाहेर माल धाडतो. जितका माल आपण बाहेर धाडतो त्यापैकीं जेवढा भाग कराची रक्कम दुप्पट झाली आहे, त्याचीं भरती करण्याकरितां बाहेर जातो, तितक्या मानानें आपला व्यापार खरोखरी वाढला असें म्हणवत नाहीं.

हीच बाब अधिक विशद करून व्यापाराची उद्वेगजनक अवस्था प्रत्ययास आणणारें दुसरें एक प्रमाण माधवरावांनीं श्रोत्यांच्या कानावर घातलें. ते म्हणतात:—

पृथ्वीवरील सर्व स्वतंत्र देशांच्या व्यापाराची स्थिति अशी आहे कीं, एका देशाचे निरनिराळे प्रांतांचा देशांतले देशांत जो परस्परव्यवहार होत असतो, त्यापेक्षां त्या देशाचा अन्य देशांशीं व्यवहार कमी असतो, किंवा निदान या दोन्हींमध्यें कांहीं सारखें प्रमाण असतें. आपल्या देशाची स्थिति तशी नाहीं. बाहेर देशाशीं आपली एकंदरींत व्यापारसंबंधानें सुमारें १०० रुपयांची घडामोड चालते. परंतु आपल्या देशांतील बंदरांचा एकमेकांशीं व्यापार अवघा पंचवीस कोट रुपयांचा होतो....म्हणजे अलीकडे जो आपला माल बाहेर जास्ती जातो. तितक्या अंशांनीं आपला व्यापार वाढला असें म्हणतां येत नाहीं.

हाच मुद्दा पुढील दृष्टान्तानें माधवरावांनीं आणखी स्पष्ट केला आहे:—

एक मोठें कुटुंब आहे असें समजा. त्यांतील पुरुष निरनिराळे धंदे करून एकमेकांची गरज पुरवितात, कोणी शेतकी करतो, कोणी वस्त्रें विणतो, कोणी व्यापार करतो, कोणी शिवतो, कोणी फाडतो, कोणी कांहीं, कोणी कांहीं धंदा करून

एकमेकास साह्य करतात, असें मानलें तर अशा कुटुंबाचें काम कुटुंबाबाहेर दुसऱ्या लोकांस थोडें मिळेल. व त्या संबंधानें त्याचा बाहेर व्यापारही थोडाच चालेल. त्याच कुटुंबांत आळस शिरल्यानें म्हणा, किंवा भांडणें लागल्यानें म्हणा, कोणी कोणास मदत करीनासा झाला, सर्व मागील मिळविलेली संपत्ति मोडून तोडून खाऊं लागले, व कुटुंबाबाहेरील लोकांकडून आपआपलीं कामें करून घेऊं लागले, असें झालें तर त्या कुटुंबांत बाहेर तयार झालेल्या मालाचा खप पुष्कळपट वाढला असें दिसेल, येवढ्यानें त्या कुटुंबाच्या पहिल्या स्थितीपेक्षां ह्या दुसऱ्या स्थितींत तें कुटुंब अधिक सधन किंवा समर्थ झालें, असें कोणी म्हणणार नाहीं. त्या आळशी व चैनी कुटुंबाप्रमाणें आपल्या देशाची हल्लीं स्थिति आहे.

याप्रमाणें व्यापाराची दुःस्थिति निवेदन करून त्यांनीं परदेशाहून इकडे येणाऱ्या मालांतले उपयुक्त व अनुपयुक्त कोणते, याची माहिती सांगितली आहे. विलायतचा जो माल येतो, तो बहुधा इकडून गेलेल्या कच्च्या मालाचें रूपान्तर असतो. त्यायोगानें सगळ्या जगांत ज्यांच्या कारागिरीची ख्याति एकदां गर्जत होती, ते कारागीर बुडाले. १८३०-४० मध्यें जो माल इकडून विलायतेस पक्क्या स्वरूपांत जाऊन खपत होता, तोच माल १८७०-७१ मध्यें तिकडून पक्क्या रूपानें येथें येऊन खपूं लागला. या तीस चाळीस वर्षांत विलायती कापडाच्या खपाचें मान पांच कोटीवरून वीस कोटी झालें. अशा रीतीनें येथील सर्व प्रकारचा व्यापार खालावला. शेतीच्या उद्योगानें उत्पन्न झालेले जिन्नस बाहेर देशीं जास्त जाऊं लागले. इंग्लंडखेरीज दुसऱ्या देशांशीं हिंदुस्थानाचा व्यापार वाढण्यांत या देशाला खरी किफायत आहे, पण हा व्यापार इंग्लंडच्या मध्यस्थीनें होत असल्यामुळें या व्यापारांतला नफा इंग्लंड परभारें पचवून टाकतें. देशांत संचय होत नाहीं; परदेशाहून इकडे

जो माल येतो, त्यापैकीं पुष्कळशा मालाचा लोकांना उपयोग होत नाहीं, रेल्वे आणि लष्कर हीं दोन खातीं या मालाला खाऊन गडप करतात; सोन्यारुप्यांतले ७।८ कोटी रुपयांचें सोनेंरुपें मातींत मिसळलें जातें. म्हणजे या सर्व गोष्टी बाद केल्यास एकटा शेतीचा धंदा बऱ्या स्थितींत आढळतो. प्रस्तुत चित्रामध्यें एकच सुचिन्ह माधवरावांनीं निदर्शनास आणलें आहे. सुएझ कालवा उघडल्यापासून हिंदुस्थानाचा स्वतंत्रपणें कांहीं परदेशाशीं व्यापार सुरू झाला, हेंच तें सुचिन्ह होय. शेतकीच्या धंद्यांतील पराधीनता उघड करून त्यांनीं सौम्य शब्दामध्यें स्वजनांची व राज्यकर्त्यांची पुढील शब्दांत निर्भर्त्सना केली आहे:—

अमेरिकेसारख्या नव्या वस्तीचा व अतोनात समृद्धीचा मुलूख या देशांत फार थोडा आहे. सदरील कारणाकरितां एक शेतकीचाच उद्योग आपल्या सर्व प्रजेनें करावा, इतर गोष्टींचा नाद सोडून द्यावा, हा उपदेश आपल्यावर हल्लीं जे सत्ता चालवितात, त्यांच्या मुखानें आपण ऐकतों. हें नीटच आहे, परंतु तेच शब्द पोपटांप्रमाणें आपण कांहीं न विचार करतां पुष्कळ प्रसंगीं बडबडतो हें मात्र आपणास शोभत नाहीं.

निवळ शेती आणि उद्योग धंदे यांतला माधवरावांनीं दाखविलेला फरक लक्षांत ठेवण्याजोगा आहे:—

साधारणपणें कामधंदा करणारी प्रजा शेतांत कष्ट करणाऱ्या प्रजेपेक्षां सधन शहाणी, समजदार, एक जुटीनें वागणारी अशी असते. शहरांतील वस्तींत व खेडे गांवच्या वस्तींत जो भेद दिसून येतो तो अंशतः याच संबंधानें उत्पन्न होतो, असें म्हटलें असतां चालेल. तांबट, सुतार, लोहार, रंगारी, कासार गवंडी कुंभार, सर्व जातीचा क्रय विक्रय करणारे वाणी उदमी लोक, या लोकांमध्यें शेती कुणबी लोकांपेक्षां स्वतंत्रता, सधनता शहाणपणा जास्ती नाहीं, असें कोण म्हणेल.

शेतकीच्या धंद्यात पोट भरणारांचें सामर्थ्य परिमितीचें असतें. इतर धंदे करणारे लोकांचें सामर्थ्य अपरिमित आहे, असें म्हटलें असतां चालेल. ज्या देशांत केवळ शेतकी लोकांपेक्षां, म्हणजे खेड्यांत रहाणारे अथवा खेडू लोकांपेक्षा नगरवासी लोकांचीं म्हणजे इतर कामधंदे करणारे उदमी व कारागीर लोकांची वस्ती जास्त असते, तोच देश सधन व सुखी असा साधारण सिद्धांत आहे. शेतकरी लोकांवर जुलूम झाला असतां, त्याची एकजूट होत नाहीं व त्या जुलमाचा बोभाटा होत नाहीं. इतर कामधंदे करणारे लोक बहुधा मोठ्या समुदायानें रहातात, यामुळें व त्यांस फुरसत चांगली असते व समजही चांगली असते, यामुळें जुलमाचा जोर फार वेळ चालत नाहीं, निदान बोभाटा तरी विशेष होतो. परस्थ लोकांच्या अमलाखालीं जो देश आहे, त्याच्या संबंधानें हा विचार विचार विशेष महत्त्वाचा आहे.

या भाषणाचा अखेरचा भाग विशेष वक्तृत्वपूर्ण व परिणामकारक आहे. माधवरावांनीं कर्तव्यस्फूर्तीचें बीज रुजण्याला योग्य अशी श्रोत्यांची मनोभूमिका भाषणांतील पहिल्या माहितीनें तयार केली होती. स्फूर्तिग्रहणाची पात्रता त्यांमध्यें उत्पन्न होण्याची वेळ येतांच माधवरावांनीं समारोपांत त्यांना आपली दुःस्थिति घालविण्याची तळमळ लावणारे उद्गार काढले आणि भाषणाची समाप्ति केली. ते उद्गार येथें न दिल्यास अपूर्ततेचा प्रमाद घडेल. ते म्हणाले:—

साधारणतः आपण आगगाडींत बसून जातों, तारायंत्रांतून आपले निरोप धाडतो, विलायतेंत यंत्र सामर्थ्यानें जे सर्व सोयीचे व शोकाचे पदार्थ तयार होतात ते आपण आवडीनें भोगतों, या सुखांत आपण मग्न असतों, हा सर्व उत्साह आपण करतों, व आपले डोळे दिपतात, त्यावेळीं उत्साहतेजाची पडछाया आपणास दिसत नाहीं, ह्मणून आपणास यांतच सुख वाटतें. परंतु आपल्यासारख्या समृद्ध देशांतील लोकांची अशी स्थिति व्हावी कीं, त्यांच्या निर्वाहाचे, सोयीचे, व शोकाचे सर्व पदार्थ त्यास तयार करतां येऊं नयेत,

केवळ पदार्थ आयते तयार केलेले भोगण्याची मात्र अक्कल आपणांस असावी ही मोठी दुःखाची गोष्ट आहे, असें कोण म्हणणार नाहीं, यामध्यें देशाचें सामर्थ्य वाढलें, असें होत नाहीं; उलट दिवसेंदिवस आपण सर्व पुरुष बायका झालों आहोंत, अथवा लहान मुलें झालों आहोंत, त्या अवस्थेंत जसें दुसऱ्यावर अवलंबून रहाणें जरूर पडतें, तद्वतच सर्व देशांतील प्रजेची स्थिति होत आहे. हें इष्ट आहे असें कोण म्हणेल. आपल्यास असें वाटतें कीं, पहिल्यापेक्षां आपल्या देशाचा बंदोबस्त चांगला आहे, या घमंडींत आपण निःशस्त्र झालों आहों ही गोष्ट विसरतों, हाच अनुभव सर्वत्र येत आहे. म्हणजे राज्यसत्तेच्या संबंधानें आपला स्वतःचा बचाव करण्यास जसें आपण निर्बळ झालों आहों, त्याचप्रमाणें व्यापार व व्यवहार यांच्या संबंधानें आपण आपलें पोषण व आच्छादन करण्यासही असमर्थ झालों आहों. ज्याप्रमाणें राज्यसत्तेच्या संबंधानें आपण परद्वीपस्थ लोकांचे दास झालों आहोंत, त्याचप्रमाणें व्यवहाराच्या संबंधानेंही आपण त्यांच्या दासांचे दास बनलों आहोंत. या व्यवहारासंबंधानें ज्यावेळेस विचार होतो, त्यावेळीं अशा प्रकारची स्थिति आपली झाली आहे, हें सर्व कबूल करतात; परंतु ह्याबद्दल आपणावर कोणी जुलूम केला नाहीं, आपण सुखानें या पाशांत सांपडलों, तेव्हां यांत कुरकूर करण्यास जागा नसून विशेष शहाणपणाही नाहीं, असें कित्येक ज्ञाते व सुखेच्छु पुरुष म्हणतात. अमेरिकेंत ज्यावेळीं गुलामांची वस्ती होती, त्यावेळीं त्या देशांतील कित्येक ज्ञाते व सुखेच्छु पुरूष असेंच ह्मणत असत कीं, गुलामांस आपल्या पोटापाण्याची कांहीं काळजी करावी लागत नाहीं, तोच गुलाम स्वतंत्र झाल्यास त्यास ही काळजी करावी लागेल, गुलामाची सर्व सोय त्याचा धनी पाहतो, यांत गुलामाचें काय वाईट होतें, शिवाय अशा स्थितीस गुलाम लोक फार खूष आहेत, इत्यादि अनेक प्रकारचें प्रतिपादन होत असे, त्याच तऱ्हेचें हें वरील प्रतिपादन कांहीं अंशीं आहे. ज्या गोष्टी खरोखरी अनिष्ट असून त्यांचें प्रथमदर्शन उलट दिसतें, व लोकांस मोह पडतो, त्या विषयींच विशेष जपलें पाहिजे. आपले लोक बिनबोभाट या भविष्यास अनुसरत आहेत, म्हणूनच त्याविषयीं आरडाओरड केली पाहिजे. एकंदरींत दिवसेंदिवस व्यवहारसंबंधानें पराधीन-

पणाची व निःसत्त्वपणाची दशा देशास प्राप्त होत आहे, ही अनिष्ट आहे, इष्टफलदात्री नाहीं, ही गोष्ट सर्वत्रांनीं गृहीत केली पाहिजे.

ही हकीकत १८७३ सालच्या सुरुवातीची आहे. याच सुमारास माधवरावांच्या योग्यतेची पुणेकरांना जाणीव होऊन त्यांच्या सल्ला-मसलतीनें सार्वजनिक सभेचें काम नांवारूपास येऊं लागलें. १८७२ च्या डिसेंबरांत सगळ्या महाराष्ट्रांतील जिल्ह्यांची सांपत्तिक स्थिति पहाण्याचें कार्य करण्याविषयींचा एक ठराव सार्वजनिक सभेनें केला व त्याची अंमलबजावणी या वर्षी होऊं लागली. विलायतेस यावेळीं हिंदुस्थानांतल्या जमाबंदीच्या व्यवस्थेचा विचार करण्याकरितां पार्लमेंटानें एक कमिटी नेमली होती. हिंदुस्थानांतून कांहीं हिंदी प्रतिनिधि सरकारनें सदर कमिटीपुढें साक्षी देण्याकरितां पाठविले होते. मुंबईच्या बांबे असोसिएशनच्या वतीनें नौरोजी फर्दुनजी विलायतेस गेले, सार्वजनिक सभेच्या प्रतिनिधित्वाचा मान देऊन कोणाची रवानगी करावी याचा नक्की निर्णय शेवटपर्यंत न लागल्यामुळें अखेरीस याही संस्थेच्या प्रतिनिधित्वाची माळ फर्दुनजींच्या गळ्यांत पडली. माधवराव साक्षीनिमित्त विलायतेस जाणार असल्याची त्यावेळीं दाट बोलवा होती. ते सरकारतर्फे जाणार कीं सभेमार्फत जाणार हें मात्र ठरलें नव्हतें. माधवरावांना विलायतेस जाण्याचा योग लाभला नसला तरी त्यांनीं आपलें कर्तव्य पुण्यास राहूनच नेटानें चालविलें होतें. विलायतेस होणाऱ्या साक्षींचा समग्र वृत्तांत इकडे छापून प्रसिद्ध झाला म्हणजे त्यांतील मथितार्थ येथील वाचकांना स्वतंत्र लेखांच्या द्वारें सादर करण्याची कामगिरी ते बजावीत होते. हिंदी प्रजेकडून सरकारला जें द्रव्य दरसाल मिळतें, त्याचे मार्ग अनेक आहेत. एकट्या शेतसाऱ्यावर

सरकाराचा निर्वाह होत नाहीं. हे सगळे मार्ग मोठे गुंतागुंतीचे आहेत. या मार्गांना एकमेकांच्या संबंधांतून सोडवून प्रत्येकाचा वेगळा वेगळा विचार करण्याचें काम किती बिकट असेल याची वाचकांना सहज कल्पना होईल. पण माधवरावांची बुद्धि एखाद्या विषयाचा माग काढीत निघाली म्हणजे तिची गति, मधल्या आडवाटांना किंवा फाट्यांना टाळून, थेट इष्ट मुक्कामाला पोंचेपर्यंत थांबत नसे. माधवरावांच्या बुद्धिमत्तेंतील पृथक्करणाचा गुण तीव्र असल्यामुळें विषयांतराच्या बजबजपुरींत अडकून दिङ्मूढ होण्याचा प्रसंग त्यांवर कधींच आला नाहीं. विलायतेस कमिटीच्या कामाला सन १८७१ मध्यें प्रारंभ झाला. १८७४ पर्यंत तिचें काम सुरळित व उत्साहपूर्वक चाललें होतें. हिंदुस्थानांतल्या जमाबंदीच्या व्यवस्थेचो तज्ज्ञ हिंदी व युरोपियन साक्षीदाराकडून माहिती मिळवून तिच्यांत योग्य ते फेरफार करावयाचे, या उदार हेतूनें प्रेरित होऊन त्यावेळीं राज्यारूढ असलेल्या ग्लॅडस्टन साहेबांच्या प्रधानमंडळानें कमिटी अस्तित्वांत आणली होती. पण कमिटीचें काम यथोद्देश शेवटास जाण्यापूर्वींच ग्लॅडस्टन साहेबाचें प्रधानमंडळ अधिकारभ्रष्ट झालें व त्याच्या अस्ताबरोबरच कमिटीचाही अस्त झाला. चार वर्षांच्या आयुष्यांत कमिटीनें एकंदर चार प्रचंड ग्रंथ प्रसिद्ध केले. चारी ग्रंथांची पृष्ठसंख्या साडेतीन हजारांवर आहे. पार्लेमेंटानें नेमलेल्या कमिट्यांच्या अहवालांचीं बाडें ज्यांच्या पहाण्यांत असतील त्यांना माधवरावांनीं पत्करलेलें काम किती कटकटीचें होतें याची कल्पना आल्याशिवाय रहाणार नाहीं. पण हें काम फार महत्वाचें होतें. या काळापर्यंत जमाबंदीच्या व्यवस्थेसंबंधीं एकही पुस्तक प्रसिद्ध नव्हतें. खुद्द जमाबंदीखात्यांत नोकरी करणारांनाहीं अशा पुस्तकाच्या

अभावीं अडचण भासत असे, शिवाय हिंदी राजकारणाचा पायाशुद्ध अभ्यास करणारानांही त्याची आवश्यकता होती. हीं कारणें लक्षांत घेऊन माधवरावांनीं सदर कमिटीच्या रिपोर्टांचा अफाट दर्या घुसळून त्यांतलें सार आपल्या देशबांधवांच्या हवाली करण्याची अवजड कामगिरी स्वीकारली. प्रथम त्यांनीं इंदुप्रकाशांत लेख लिहिले. या लेखांतल्या गुणाची पारख करून त्यांची स्तुति अनेक हिंदी वृत्तपत्रांनीं चालविली. लंडनच्या 'सॅटरडे रिव्ह्यू' नामक एका वजनदार विलायतीपत्रानें येथील गौरवाच्या ध्वनींत आपलाही सूर मिसळला. कमिटी नामशेष झाल्यानंतर माधवरावांनीं आपले लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावे, असें त्यांस त्यांच्या पुष्कळ मित्रांकडून प्रोत्साहन मिळालें. माधवरावांचें पुस्तक बाहेर पडण्यापूर्वीं सदर कमिटीच्या एका युरोपियन सभासदानें रिपोर्टाचा सारांश लिहिण्याची इच्छा जाहीर रीतीनें प्रदर्शित केली होती, पण ही इच्छा इष्टफलप्राप्तीच्या दृष्टीनें निरर्थक ठरण्यासारखी परिस्थिति आढळून आल्यामुळें त्यानें हा नाद सोडला. या युरोपियनानें आपली निराशा एका सभेंत व्यक्त केल्यामुळें माधवरावांना आपला प्रयत्न कितपत यशस्वी होतो, याविषयीं चिंता वाटणें स्वाभाविक आहे. परंतु त्यांनीं आपला उद्योग पुस्तकरूपानें प्रकाशांत आणलाच. श्रमसातत्य, विषयाच्या सारसर्वस्वाचें थोडक्यांत केलेलें निरसंदिग्ध स्पष्टीकरण, वगैरे गुण पाहून पुस्तककर्त्यांची हिंदी वृत्तपत्रकारांनीं मुक्तकंठानें वाहवा गाइली. इतकेंच नव्हे तर अनुभवी तज्ज्ञांची अक्कल गुंग करून सोडणाऱ्या या जमाबंदीसारख्या क्लिष्ट विषयांतील माधवरावांचें प्राविण्य व प्रभुत्व पाहून सारकारांतल्या कित्येक अमंलदारांनीं प्रशंसापर अभिप्राय माधवरावांकडे पाठवून दिले. माधव-

रावांच्या या कामगिरींतली आणखी एक लहानशी गोष्ट सांगण्याजोगी आहे. नुसत्या रिपोर्टांच्या भारूडाचें वाचन करतां करतांच सामान्य बुद्धीचा मनुष्य हातटेकीस आला असता. परंतु माधवरावांची विशाल मति रिपोर्टांच्या प्रचंड पृष्ठसंख्येखालीं गडप न होतां त्या रिपोर्टांस पुरून उरली. विषयाची पूर्तता होण्यासाठीं माधवरावांनीं पुस्तकप्रकाशनापूर्वीं सगळ्या प्रांतांच्या राज्यकारभारांचे ताजे अहवाल वाचून टाकले आणि अशा रीतीनें प्रकाशनाच्या तारखेपर्यंत जमाबंदीचा सारा तपशील आपल्या पुस्तकांत ग्रथित केला. या पुस्तकाची प्रसिद्धि १८७७ सालाच्या मार्च महिन्यांत झाली. कालानुक्रमदृष्टीनें पहिल्यास हा पुढचा वृत्तांत अगोदर दिल्याचें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. असें करण्याचें कारण, माधवरावांच्या कार्याचा या दिवसांतला अष्टपैलू व्याप आणि विविधता वाचकांच्या गळीं उतरावी, हें आहे.

पुण्यास १८७३ सालीं सार्वजनिक सभेच्या कामाला जोरानें सुरुवात होऊन त्याच्या उबेनें महाराष्ट्रांत पसरलेला राजकीय थंडपणा हटत चालला होता. माधवराव राजकीय चळवळीची जोपासना करून तिची उपयुक्तता व अभिरुचि लोकांत या सुमारास वाढवीत होते. या वर्षीं सार्वजनिक सभेनें आपली पहाणी संपवून तिचा रिपोर्ट लहानसा पुस्तकाच्या रूपानें लोकांस व सरकारास सादर केला होता. या रिपोर्टांत अहमदनगर, सोलापूर वगैरे जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची सरकारच्या धोरणामुळें कशी हलाखी उडाली आहे, याची माहिती होती. सरकारच्या ओंजळीनें पाणी पिऊन दिवस काढण्याऐवजी स्वतंत्र रीतीनें आपल्या दुःखांचा विचार करण्याचा व त्यावर उपाय सुचविण्याचा धडा माधवरावांनीं पहाणी योजून व रिपोर्ट लिहून शिकविला- या

रिपोर्टानें 'सार्वजनिक सभा' ही एक नजर ठेवण्यासारखी संस्था आहे, असा सरकारचा समज झाला व आणखी एक दोन वर्षांत सभेच्या चळवळींचा खरा सूत्रधार कोण हें देखील त्यांच्या ध्यानांत आलें.

माधवराव पुण्यास आल्यावर त्यांनीं सुरू केलेल्या दोन कार्यांची माहिती वर आलेली आहे. त्यांचें वास्तव्य पुण्यास होण्यापूर्वीं एक दोन वर्षे 'फ्रेंडली मीटिंग' या नांवाची एक सभा धर्माचा विचार करण्यासाठीं स्थापन झाली होती. या सभेच्या बैठकींत भाग घेणाऱ्या लोकांना धर्माच्या समजुतींत व चालीरीतींत फेरफार करणें अवश्य आहे, असें वाटूं लागलें होतें. त्यांचा तसा थोडा थोडा प्रयत्नही चालू होता. या क्रमाला १८७० च्या नोव्हेंबरांत कै. वामन आबाजी मोडक यांनीं जोराची गति दिली. विश्रामबागेंत त्यांचें 'धर्माची आवश्यकता' या विषयावर जाहीर भाषण झालें, त्या भाषणानें जी जागृति केली तोच आपला मुहूर्त समजून प्रार्थनासमाज स्थापन करण्याची 'फ्रेंडली मीटिंग' मधल्या मंडळीनें खटपट आरंभली आणि निष्कारण विलंब न होऊं देतां रविवार ता. ४ डिसेंबर १८७० या दिवशीं त्यांनीं आपल्या धर्मसुधारणेच्या इच्छेला मूर्तस्वरूप दिलें. प्रार्थनासमाजाच्या आरंभापासून स्वतःच्या मृत्यूपर्यंत चिंतामण सखाराम चिटणीस या नांवाच्या एका अंमलदारानें या कामीं अत्यंत परिश्रम घेतले. पुण्याच्या प्रार्थनासमाजाला चिरस्थायित्व आणून देण्याला माधवरावांचे श्रम जितके कारणीभूत झाले तितकेच चिटणिसांचे श्रम कारणीभूत झाले आहेत. पुण्याला १८७८ च्या मे महिन्यांत प्रार्थनासमाजाचें मंदिर तयार झालें. मंदिरानिमित्त झालेल्या खर्चापैकीं सवा सहाशें रुपयांचें कर्ज चिटणिसांनीं फेडलें, यावरून त्यांची कळकळ लक्षांत येण्यास

हरकत नाहीं. माधवराव पुण्यास आल्यानंतर त्यांनीं पदरमोड व अंग मेहेनत करून समाजाला उर्जितावस्था प्राप्त होण्याकरितां उद्योग चालविला होता.

समाजसुधारक या नात्यानें माधवरावांच्या कर्तव्यनिष्ठेची परीक्षा घेणारी एक आपत्ति त्यांच्यावर ता. ३ आक्टोबर १८७३ रोजीं कोसळली. माधवरावांच्या उत्कर्षाचा प्रारंभ आणि त्यांच्या तरुण सहचारिणीच्या प्राणघातक आजाराचा प्रारंभ एकदम झाला. त्यांच्या प्रथम पत्नी सौ. रमाबाई यांना पुण्याची हवा मानवेना; कदाचित् मुंबईच्या हवेनें त्यांच्या प्रकृतींत केलेली रोगबीजांची पेरणी पुण्यास फळाला येऊं लागली असेल. तेथें आल्यापासून त्यांना जीर्णज्वरानें ग्रासलें. हवापाण्याच्या फेरबदलामुळें उत्पन्न होणारें हें सामान्य दुखणें नसून त्यांचा आजार दु:साध्य रोगाचा दर्शक आहे, असें समजल्यावर नामांकित वैद्यांचे औषधोपचार सुरू करण्यांत आले. परंतु रोगाचें पाऊल मागें पडेना. दिवसेंदिवस तो बळावत चालला आणि शेवटीं डाक्टर वैद्यांनीं रमाबाईस क्षयरोगाची बाधा झाल्याचा निकाल सांगितला. क्षयरोगानें एकदां माणसांच्या शरीरांत घर केलें म्हणजे तो रुग्णाच्या प्राणांबरोबरच तेथून बाहेर पडतो; कितीही जालीम गुणकारी औषधांचा मारा केला तरीं तो हलत नाहीं, हें सांगावयास नको. रोग असाध्य ठरला तरी माणसाची आशा नष्ट होत नाहीं. त्यांतून माधवराव म्हणजे खंबीर आशावादी. त्यांनीं औषधोपचारांची जोखीम आपल्या डोक्यावर घेतली. कोर्टाचें काम संभाळून दिवसां व रात्रीं वेळच्यावेळीं माधवराव स्वत: आपल्या हातानें औषध देत असत. रात्रींच्या रात्र अलोचन जागरणें घडलीं; तरी त्याची माधवरावांनीं फिकीर केली नाहीं.

औषधोपचारांत त्यांनीं स्वतःच्या कष्टाकडे पाहून कव्हांही हयगय होऊं दिली नाहीं. पण औषधोपचार आणि माधवरावांची परिचर्या ही वाया जाऊन कार्तीक शुद्ध षष्ठी शके १७९५ म्हणजे उपरिनिर्दिष्ट तारखेस माधवरावांना विधुरावस्थेंत लोटून त्यांची प्रथम पत्नी स्वर्गलोकीं निघून गेली.

लहानपणापासून आपल्या आयुष्यांतल्या कौटुंबिक सुखदुःखाची सुशील भागीदारीण तरुणपणाच्या आणि सांसारिक भरभराटीच्या ऐन रंगांत परलोकीं चालती झाल्याचें पाहून माधवरावांच्या शोकास सीमा उरली नाहीं. बहिष्काराच्या अनुभवांत माधवरावांनीं 'आपल्या घरीं एखादा मृत्यु घडून आल्यास समाजाकडून कोणाची मदत होत नव्हती' अशी एक गोष्ट सांगितल्याचें वाचकांना स्मरत असेल. कदाचित् माधवरावांना हा अनुभव याप्रसंगींच आला असेल. दुःखांत सुख म्हणून त्यांनीं अगदीं उत्तरकार्यापर्यंतचे सर्व संस्कार आपल्या हातून घडल्याबद्दल समाधान मानलें असेल. परंतु त्यांना अपरिमित शोक झाला, आणि पुढें सुमारें वर्षभर मृतपत्नीच्या स्मरणानें त्यांच्या डोळ्यांतून अश्रु गळले नाहींत असा एकही दिवस गेला नाहीं. शोकावेग आवरण्याकरितां त्यांनीं तुकाराम महाराजांच्या अभंगांचीं पारायणें चालविलीं होतीं. पण हृदयस्पर्शी करुणापर प्रेमळ अभंग आला कीं, त्यांच्या डोळ्यांतून वाचतां वाचतां अश्रुधारा वाहूं लागत. परमेश्वराला दयासागर असें विशेषण लावण्यांत येतें; पण हा दयासागर आपल्या बाबतींत कसा कोरडा ठणठणीत पडला. आपणास त्याच्या कृपेचा एखादा सूक्ष्म बिंदु कां लाभूं नये, का ईश्वराला दयासागर हें नांव भ्रमानें विनाकारण देण्यांत आलें आहे, असें ईश्वराविषयीं माधवरावांच्या हृदयांत शंकांचें

काहूर माजलें होतें. यावेळीं त्याचे भावी चरित्रकार गणपतराव मानकर हे देखील शोकाच्या भोवऱ्यांत सांपडले होते. त्यांना सांत्वनपर पत्र लिहितांना माधवरावांनीं आपल्या विचारांची छाया प्रकट केली आहे. ते म्हणतात:—*

अशा प्रकारचा दैवदुर्विपाक अनुभवास आला म्हणजे मनुष्य कितीही ईश्वरनिष्ठ असला तरी त्याची विवेकशक्ति बुचकळ्यांत पडून पापमय निराशेचा, ईश्वर द्रोहाचा, नास्तिक्याचा त्याच्या चित्तावर पगडा बसतो. दुःखानें अंत:करण विव्हल झाले असतां मित्रमंडळी तात्त्विक उपदेश करण्याच्या भरीस पडते; पण तसें करणें योग्य नाहीं. शोकानें होरपळलेल्या अंतरंगांत 'जगाचा व्यवहार पुष्पकुंजासारखा एकान्तिक सुखानें भरलेला नाहीं' असा बोध प्रकट झाल्यानंतर मनुष्याला सांत्वनाला उपदेश रुचतो.

वरील उताऱ्यांत माधवरावांच्या अंत:करणाची स्थिति उमटलेली असून त्यावरून अनेक अनुमानें काढतां येतात. माधवराव याप्रमाणें विरहावस्थेच्या मन:स्थितीशीं झगडत असतां त्याच्या वडिलांनीं नव्या विवाहाची तयारी चालविली होती. पत्नीच्या मरणाला व त्यापासून होणाऱ्या दु:खाला गोविंदरावांच्या मनोरचनेंत कितीसें मानाचें स्थान मिळालें होतें, याविषयीं त्यांनीं नव्या पिढीची, माधवरावांची जननी दिवंगत होतांच तेरावें उरकल्यानंतर अवघ्या तीन दिवसांनींच द्वितीय विवाह करून, खात्री पटविली होती. घरांतला एखादा अतिशय उपयोगाचा जिन्नस हरवला म्हणजे मनुष्य ज्याप्रमाणें तांतडीनें बाजारांतून दुसरा जिन्नस आणून पहिल्याची उणीव भरून काढतो, त्याचप्रमाणेंच बायकांच्या बाबतींत हिंदूसमाजांतली दृष्टि आहे. माधवराव, त्यांची पत्नी

* या पत्राचा उतारा वाचकांना मानकरांनीं लिहिलेल्या चरित्राच्या पहिल्या भागांत पृ. २२ वर पहायला सांपडेल.

वारली तेव्हां एकतीस वर्षांचे होते. वयोमानानुसार माणसांच्या कर्तबगारीला आणि विचाराला परिपक्वता येते, हें सामान्य माणसांना लागू असणारें तत्त्व झुगारून सरकारनें त्यांच्याकडे मोठी कामगिरी दिली होती. पण सरकारांतल्या लोकांना जशी माधवरावांच्या गुणांची पारख होती, तशी त्यांच्या पित्याला नव्हती. आपला माधव नव्या विचाराच्या लाटेंतला एक अग्रेसर आहे, त्याची मित्रमंडळी त्याला भर घालील, तो नवीन सामाजिक सुधारणेच्या विचारांना बळी पडेल व एखाद्या विधवेच्या गळ्यांत मंगळसूत्र बांधून सगळ्या प्रपंचावर निखारा ठेवील अशी, सून गेल्यापासून,गोविंदरावांच्या मनाला दारुण चिंता जडली होती. त्यांनीं माधवरावांच्या टपालाची मधल्या मध्यें जप्ती करून मित्रांचें सांत्वन किंवा प्रोत्साहन मुलापर्यंत न पोचूं देण्याचा बंदोबस्त ठेवला. सुनेच्या मृत्यूची वार्ता समजतांच ते मुद्दाम कोल्हापुराहून पुण्याला आले. टपालाची व्यवस्था झाल्यावर ते मुलींचा शोध करूं लागले. टपालामागून मुंबईचे मित्र समक्ष भेटतील, यासाठीं त्यांचे हेलपाटे सुरू होण्यापूर्वीच जुन्या रीतीप्रमाणें योग्य वधू पाहून माधवरावांचे दोन हाताचे चार हात करून मोकळें व्हावें, असा गोविंदरावांनीं निश्चय केला. मुलीच्या शोधांतील त्वरेचें हें एक कारण होतें. या सुमारास जुन्या सरदार घराण्यांतील एक गृहस्थ आपल्या मुलीला स्थळ पहाण्याकरितां पुण्यास आले होते. यांचें नांव माधवराव अण्णासाहेब असें होतें. त्यांच्या पूर्वजांनीं पेशवाईमध्यें समशेरबहादरी गाजवून सरदारीचीं इनामें संपादन केलीं होतीं. एकदां यांचें घराणें पेशवाईतील प्रख्यात इनामदारांत गणलें जात होतें. अण्णासाहेबांची व गोविंदरावांची गांठ पडल्यावर त्यांची मुलगी आपल्या मुलाच्या इभ्रतीला शोभण्याजोगी

अनुरूप आहे, असें गोविंदरावांच्या मनानें घेतलें. पण त्याकाळांत गुरांप्रमाणें दारोदार मुली घेऊन हिंडण्याचा हल्लींसारखा प्रघात नव्हता. त्यांतून अण्णासाहेब हे घरंदाज सरदारी बाण्याचे गृहस्थ होते. त्यांनीं 'मुलगी पसंत पडल्याखेरीज पुण्याला आणणें शक्य नाहीं' असें स्वच्छ सांगून टाकल्यामुळें गोविंदरावांनीं आपल्या घरचे 'बाळंभट वाटवे' नांवाचे विश्वासू आश्रित अण्णासाहेबांच्या बरोबर पाठवून दिले. त्यांनीं मुलगी पसंत केली आणि अण्णासाहेब, वाटवे व मुलगी अशी मंडळी टपालाच्या टांग्यानें पुण्यास येऊन दाखल झाली.

आपल्या विवाहाची तयारी वडिलांनीं जारीनें चालविली आहे, हें माधवरावांच्या ध्यानांत आल्यानंतर त्यांचें व गोविंदरावांचें बोलणें सुरू झालें. माधवरावांच्या आयुष्यांत असा प्रसंग पूर्वी केव्हांही उत्पन्न झाला नव्हता. माधवरावांना आपले वडील लग्नाची घाई कोणत्या भयास्तव करीत आहेत, हें समजलें होतें. आपली बहीण एकविसाव्या वर्षी सौभाग्यास आंचवली व ती व्रतस्थ राहून दिवस कंठीत असल्याचें दृश्य त्यांच्या डोळ्यासमोर होतें. म्हणून त्यांनीं वडिलांशीं बोलतांना या गोष्टीचा उल्लेख केला आणि आपण पुनर्विवाह करूं नये अशी इच्छा असल्यास पुनश्च आमरण विवाह करणार नाहीं, अशी वडिलांसमक्ष शपथ वहाण्यास माधवराव तयार होते. आपणास विलायतला जावयाचें आहे, या करितां आणखी सहा महिने वाट पहावी असें त्यांनीं गोविंदरावांस सुचवून पाहिलें. पण मुलगा ऐकत नाहीं असा समज होऊन, उलट गोविंदरावांचा राग वाढूं लागला. अखेरीस लग्नाच्या पाशांतून सुटका होण्याचा मार्ग दिसेना, तेव्हां माधवरावांनीं 'मुलगी गांवातली नसावी, घराणें कुलीन व नांवाजलेलें असावें, मुलीच्या रंगारूपापेक्षां कुलीनतेकडे

लक्ष द्यावें' अशा लग्नाच्या अटी तीर्थरूपास कळविल्या. ही निरोपानिरोपीची किंवा समक्ष चर्चा चालू असतां मुलगी घेऊन अण्णासाहेब पुण्यास आले. त्यांजकडे जाऊन गोविंदरावांनीं मुलगी पाहून पसंत केली व 'तुम्ही माधवरावांस भेटा' अशी त्यांनीं अण्णासाहेबांस सूचना दिली. त्याप्रमाणें अण्णासाहेब माधवरावांच्या भेटीस गेले. माधवरावांनीं त्यांच्याजवळ लग्न लांबणीवर टाकण्याची गोष्ट काढली. 'पुनर्विवाहाचा पक्ष घेतल्यानें आपण बहिष्कृत आहों, बहिष्कृताला तुम्ही आपली मुलगी देणार आहां, लग्नासाठीं आपण प्रायश्चित घेणार नाहीं' असेंही सांगून पाहिलें; परंतु अखेरीस प्रायश्चित्ताच्या एका गोष्टीशिवाय माधवरावांना कोणत्याच गोष्टींत यश मिळालें नाहीं. त्यांचा विवाह मार्गशीर्ष शुद्ध ११ शके १७९५ (डिसेंबर १८७३) रोजीं निर्विघ्न पार पडला.

प्रथमपत्नीच्या निधनानें माधवरावांस जितकें दुःख झालें नसेल तितकें या विवाहानें झालें असल्याचा संभव आहे. माधवरावांवर चोहोंकडून टीकेची आग पांखडण्यांत येऊं लागली. या टीकेच्या दंगलींत माधवरावांना पाठीराखा असा कोणीच राहिला नाहीं. मित्र देखील शत्रूंच्या गोटांत गेले. माधवरावांनीं कुमारिकेशीं लग्न करून विधवाविवाहाच्या पक्षाशीं दगलबाजी केली, तत्त्वद्रोहाचें जीविताला आणि कर्तृत्वाला कलंक फासणारें घोर पातक त्यांच्या हातून घडलें, सामाजिक सुधारणेची हत्या केली, असा मित्रांचा त्यांवर आरोप होता. शत्रूंच्या टीकेंत साहजीकच उपहासाचा भाग अधिक आहे. विधवाविवाह पसंत नसल्यानें माधवरावांचें कृत्य त्यांना तत्त्वतः इष्टच होतें; परंतु स्वतःवर प्रसंग येतांच सुधारणेचे पुरस्कर्ते माघार घेतात,

असें म्हणून, माधवरावांची टर उडविण्याला त्यांस संधी मिळाली. माधवरावांनीं इहलोक सोडल्याला पाव शतक होत आलें, तरी सामाजिक सुधारणेचा विषय निघाला कीं, माधवरावांच्या द्वितीय विवाहाकडे उपहासानें बोट दाखविलें जातें, मग त्यावेळीं त्यांच्यावर कसा गहजब उडाला असेल, याची कल्पनाच करणें योग्य. परंतु बारकाईनें या गोष्टीचा विचार केल्यास, माधवरावांचा दोष सकृद्दर्शनीं वाटतो तितका तीव्र नसल्याचें समजण्याला उशीर लागत नाहीं.

पितृभक्ति, पित्याचा वृद्धापकाळ आणि सगळ्या संसाराच्या स्वास्थ्याची जबाबदारी, या गोष्टी जमेस धरून माधवरावांच्या द्वितीय विवाहाचें परीक्षण केल्यास दोषारोपाला बोथटपणा येतो. माधवराव महान् पितृभक्त होते, ही गोष्ट हंटरसाहेबास पाठविलेल्या पत्रांतल्या उताऱ्यावरून वाचकांच्या लक्षांत आली असेल. आपल्या पंक्तिसंसर्गाच्या संशयामुळें समाजाकडून पित्याला उपसर्ग पोचूं नये म्हणून, त्यांनीं स्वतःच्या घरांत स्वतःस अंपक्त करून घेतले होते. त्यांच्या पितृभक्तींत कृतज्ञतेचा अंश भरपूर होता. पित्यानें आपल्या विद्यार्जनासाठीं सर्वप्रकारें मदत केली, या विषयीं माधवरावांना विलक्षण कृतज्ञता वाटत असे. पित्याचें मन मोडण्याचा त्यांना ल्हानपणापासून केव्हांही प्रसंग आला नव्हता. त्यामुळें पित्याविषयींच्या आदराचें मनावरील नियंत्रण एकदम पायाखालीं तुडवून केवळ आपल्या तत्त्वांचें इमान राखण्याचें धाडस त्यांस यावेळीं करवलें नाहीं. समाजाच्या प्रेमाला ते अगोदरच मुकले होते. पित्याचा मनोदय धाब्यावर बसून जर त्यांनीं एखाद्या गतभर्तृकेला सनाथ केले असते, तर संसारांतल्या ममत्वापासून दूर ढकलले जाऊन बहिष्काराच्या हद्दपारीपेक्षांही अधिक निर्जनते-

मध्यें दिवस कंठण्याची पाळी त्यांजवर आली असती. बहीण, आई, बंधु, चुलती या प्रेमाच्या माणसांचा व त्यांचा विधवाविवाहानें संबंध तुटला असता. त्यांचे वडील या लग्नानंतर पुढें चारच वर्षांनीं परलोकवासी झाले. सगळ्या संसारांतला कर्तेपणा यामुळें उघडच माधवरावांच्या अंगावर पडला. माधवरावांनीं लग्नाच्या बाबतींत आपला हेका तडीस नेला असता, तर त्यांच्या कुटुंबपरिवाराची दैना उडण्याचा संभव होता. पितृभक्ति आणि सांसारिक कर्तव्य या मुद्यांबरोबरच आणखी एक मुद्दा ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. प्रथमपत्नीचा वियोग झाल्यास प्रत्येकानें विधवेशींच विवाह केला पाहिजे, असा विधवाविवाहाचा पुरस्कार करतांना त्यांनीं आग्रह धरला होता कीं काय, हाच तो मुद्दा आहे. विधवाविवाहाला समाजानें घातलेली आडकाठी मोडून टाकण्यापुरताच त्यांचा उद्योग होता. विधवाविवाहाबद्दलचा प्रतिबंध फोडून विधवांना सौभाग्यप्राप्तीचा मार्ग खुला करून देणें, हें त्यांचें ध्येय होतें. मार्ग मोकळा झाला म्हणून जशी प्रत्येक विधवेवर त्या मार्गानें जाण्याची सक्ती नव्हती, त्याच प्रमाणें विधुरांवरही सक्ती नव्हती. पुढें सामाजिक परिषदेमध्यें यासंबंधीं जे ठराव झाले आहेत, त्यामध्यें चाळिशी उलटलेल्या विधुरानें अल्पवयस्क बालिकेला वरण्याऐवजीं विधवेला अर्धांगित्वाचा मान द्यावा, अशा अर्थाचे ठराव आहेत. अशा स्थितींत माधवरावांनीं आपल्या तत्त्वाचा अनादर केला म्हणून त्यास नांवें ठेवणें कितपत योग्य आहे, याचा वाचकांनींच निर्णय लावावा. या समर्थनाची दिशा ज्यांना रुचणार नाहीं, त्यांना भीष्म, राम, यांच्या चरित्रांतही उदात्त भाग आढळणार नाहीं. पितृभक्त आणि संसारकर्तव्यपरायण अशा माधवरावांचे चित्र डोळ्यासमोर उभें केलें व पुनर्विवाह

करून जगांतून उठल्याप्रमाणें व्यवहार करणाऱ्या माधवरावांचें चित्र त्याच्या तुलनेला घेतलें, तर पहिलें चित्र जास्त बोधप्रद आणि हृदयंगम वाटतें. (समाजांत राहून सुधारणा करावयाची, हें माधवरावांचें एक तत्त्व होतें. विधवाविवाहाचा वाचिक पुरस्कार त्यांनीं कृतींत वठविला असता, तर अगोदरच दुरावलेला समाज आणखी दूर गेला असता व मग माधवरावांच्या कर्तबगारीचें क्षेत्र संकोचलें असतें.) वास्तविक त्यांना लौकिक दृष्टीनें कोणत्याही गोष्टीची कमतरता नव्हती. ते कोणावर अवलंबून नव्हते. उलट त्यांच्यावरच सगळा प्रापंचिक गोतावळा अवलंबून होता. समाजाचा बहिष्कार त्यांनीं जुमानला नव्हता, अर्थात्, त्यांच्या धैर्याचीं कसोटी पूर्वीच होऊन गेली होती. तरी त्यांनीं वडिलांच्या शब्दाखातर शत्रुमित्रांना सारखाच दूषणीय वाटणारा मार्ग स्वीकारला. यावरून त्यांचा कमालीचा स्वार्थत्याग दिसून येतो.

गतभर्तृकेऐवजीं कुमारिकेशीं विवाह केला, हें विवाहाचें स्वरूप क्षणभर दोषास्पद मानलें व माधवरावांच्या कृतीचा जास्त विचार केला, तर त्यांनीं विवाहसंस्कारांतल्या कित्येक चालीरीतींच्या बिडया तोडून टाकल्याचा देखावा पहावयास सांपडतो. प्रत्येक संस्कारांत साधेपणा व गांभीर्य असावें, असें त्यांचें मत होतें. त्यास अनुसरून त्यांनीं आपला विवाह शेवटास नेला. विवाहाच्या दिवशीं त्यांनीं कोर्टांतून रजा घेतली नव्हती. नित्याप्रमाणें कोर्ट सुटल्यावर ते घरीं आले. होमहवनादि वेदोक्त कर्में त्यांनीं केलीं आणि रात्रौ नूतन पत्नीसह पायांनीं चालत येऊन त्यांनीं गृहप्रवेश केला. एवढाच त्यांच्या द्वितीय विवाहाचा वृत्तांत आहे. पित्याच्या इच्छेला मान देऊन त्यांनीं अप्रत्य-

क्षपणें किती तरी कार्य साधलें. सासरा जुन्या चालीचा व सरदार घराण्यांतला, म्हणजे परंपरेचा संरक्षक, असें म्हणावयास हरकत नाहीं. त्याच्याकडून प्रायश्चित्ताचें बंड पोकळ असल्याचा एक प्रकारें कबूली-जबाब घेतला. मुलगा लग्नाला तयार झाला यांत सारें भरून आलें, अशा समजुतीमुळें लग्नसंस्कारांतल्या अनवश्यक रूढाचारावर तिलांजलि देण्यास माधवरावांचे वडील तयार झाले हा परिणाम कशाचा? हें त्यांनीं योजलेल्या तत्त्वप्रसाराच्या पीछेहटीचेंच लक्षण समजतां येईल काय? पुढेही त्यांच्या तत्त्वांची पीच्छेहाट झालेली आढळत नाहीं. विधवाविवाहाच्या कार्यावर त्यांच्या प्रोत्साहनाचें व आश्रयाचें छत्र अखंड कायम होतें. त्यांच्या हयातींत विधवांच्या विवाहाचा क्रम बिल्कूल बंद पडला नाहीं. उलट असें दाखवितां येईल कीं, समाजाची प्रतिकूलता मागें हटवून, विधवांच्या सौभाग्यसंवर्धनाच्या कामगिरीला त्यांनीं फार मोठ्या प्रमाणांत विजयी करून सोडलें.

विवाहानंतर दोन महिन्यांनीं, माधवराव आपल्या मित्रमंडळीसह चार महिन्याची रजा घेऊन हिंदुस्थानांतल्या मुख्य मुख्य प्रांतांचें निरीक्षण करण्याकरितां निघून गेले. या प्रवासांत त्यांनीं पंजाबांत लाहोरपर्यंत मजल मारल्याचा उल्लेख सांपडतो. आपण जगाच्या भूगोलाची उठाठेव करतो, पण आपला देश आपण पाहिलेला नाहीं, आपल्या देशाचें अवलोकन करावें या हेतूनें त्यांनीं प्रवास केला. ठिकठिकाणीं त्यांनीं ओळखी केल्या. माधवरावांनीं या पर्यटनांत स्वदेशाच्या निरनिराळ्या भागांतली आर्थिक, सामाजिक, धार्मिक स्थिती पाहून टाकली असेल, हें अनुमान, त्यांच्या सर्वंकष स्वभावाकडे आणि ज्ञानोत्सुक बुद्धि-मत्तेकडे पाहिल्यास चुकीचें ठरणार नाहीं.

यानंतर सार्वजनिक सभेनें माधवरावांच्या प्रेरणेस अनुसरून बजावलेली कामगिरी म्हणजे विलायतच्या पार्लमेंटांकडे पाठविलेला अर्ज, ही होय. 'जबाबदार राज्यपद्धति' हा शब्द आतां अतिशय परिचयाचा झाला आहे. १८७४ सालांत हा शब्द मुळींच परिचित नव्हता. परंतु माधवरावांनीं 'जबाबदार राज्यपद्धतीच्या' मागणीचा अर्ज तयार करून तो वृत्तपत्रांकडे, मोठमोठाल्या अधिकाऱ्यांकडे व पार्लमेंटाकडे धाडून दिला. आजचें जबाबदार राज्यपद्धतीचें ध्येय आणि या अर्जांत प्रकट झालेलें ध्येय, यांमध्यें थोडेसें अंतर आहे. हिंदुस्थानाचे प्रतिनिधि विलायतच्या पार्लमेंटांत असावे, आणि हिंदी राज्यकारभाराचे प्रश्न त्यांच्या संमतीनें सोडवावे अशा अर्थाचा मजकूर या अर्जांत आहे. आपल्या अर्जाला लोकांचा पाठिंबा आहे, हें दाखविण्याकरितां व राजकीय उद्धारांच्या साध्याविषयीं लोकांत जागृति होण्याकरितां, अर्जावर हजारो लोकांच्या सह्या घेण्यांत आल्या. हिंदी मतदारांनीं निवडलेले प्रांतोप्रांतींचे एकंदर अठरा प्रतिनिधि पार्लमेंटांत पाठविण्याचा हक्क हिंदी जनतेला असावा, जो कोणी सालीना पन्नास रुपयांपर्यंत कर भरीत असेल त्याला मतदानाचा हक्क देण्यांत यावा, असें या अर्जांत आणखी म्हटलें आहे. हा अर्ज प्रसिद्ध झाल्यानंतर कित्येक देशाभिमानी शिक्षितांनीं त्याविषयीं कसे कुचेष्टेचे प्रलाप काढले, याचा जर कोणाला पुरावा पहावयाचा असेल, तर त्यांनीं 'निबंधमाला' वाचावी. या अर्जाचें खरें महत्त्व देशहिताचें चिंतन करणारांनाही समजलें नाहीं, हें निबंधमालेंत त्यासंबंधीं आलेल्या निंदाव्यंजक मजकुरावरून गळीं उतरतें. आपला अर्ज हातांत पडतांच विलायतचें सरकार देणगीचें गाठोडें आपल्या पदरांत टाकील, असा माधवरावांचा

किंवा त्यांच्या सल्ल्यास वश होऊन अर्ज पाठविणाऱ्या सार्वजनिक सभेच्या इतर चालकांचा ग्रह नव्हता. इंग्रज सरकार फक्त आपल्या मागणीची वाट पहात आहे; मागणीचा कागद हातांत पडतांच प्रजेच्या हातावर राजकीय हक्कांच्या देणगीचें उदक सोडून तें मोकळें होईल, असा माधवरावांचा केव्हांही समज नव्हता. त्यांना या अर्जाचें महत्व राजकीय शिक्षणाच्या दृष्टीनें अधिक वाटत होतें. आपण कोणत्या अवस्थेंत आहोत, आपल्याला हक्क आहेत कीं काय, असल्यास त्यांची मागणी करण्याला कांहीं हरकत आहे कीं काय, हरकत नसल्यास ते मागावे कसे, आपल्यावरील राज्याची घटना कोणत्या स्वरूपाची आहे, या राज्यघटनेवर हिंदी लोकमताचा दाब बसण्याला कोणते दृश्य उपाय आहेत, वगैरे राजकीय विषयांचें ज्ञान लोकांना व्हावें, त्यांना राजकारणांतलें ध्येय गांठण्याचे मार्ग समजावे, त्यांना त्या ध्येयाच्या सिद्धीची तळमळ लागावी, त्यांनीं अहर्निश राजकारणाचा विचार करावा, या हेतूनें माधवरावांनीं हा अर्ज तयार केला होता. महाराष्ट्र नव्हे, तर सारें भारतवर्ष त्यावेळीं राजकारणाच्या अज्ञानामध्यें स्वस्थ घोरत पडलें होतें. हाताच्या बोटावर मोजतां येण्याजोग्या कांहीं अल्पसंख्य पुढाऱ्यांमध्यें जागृति उत्पन्न झाली होती. ते आपल्या इतर अज्ञानमग्न सोबत्यांना हाका मारून जागे करण्याचा यत्न करीत होते. सामान्य जनतेला त्यांचा राजकीय उपदेश म्हणजे वेडाच्या लहरींतली बडबड आहे, असेंच वाटत होतें. ज्याच्या दृष्टीला भविष्यकाळाच्या पोटांत घुसून आपल्या नियतीचा थांग लावण्याचें सामर्थ्य नव्हतें, त्यांच्यावर या जागृतीचा परिणाम निराशाजनक झाला व ते राजकीय उद्बोधकांना अविचारी भ्रांताच्या मालिकेंत गुंफून

उपहास करूं लागले. प्रत्येक राष्ट्रांतील जनतेला जागृति आणि सुषुप्तीच्या संधिकाळांत असाच अनुभव येतो. हा निराशेचा अनुभव शाश्वत किंवा आचंद्रदिवाकर टिकणारा नव्हे. आत्मविश्वासाचा अभाव आणि अज्ञानाचा प्रभाव, आपल्या उपदेशानें कमी कमी होऊन अखेरीस पूर्ण जागृत झालेली जनता आपलीं मतें ग्रहण करील, अशी दूरदर्शी ज्ञात्यांना खात्री असते. माधवरावांना अशीच खात्री होती. जबाबदार राज्यपद्धतीच्या मर्यादित मागणीचा आवाज महाराष्ट्राच्या निःशब्द राजकीय वातावरणांत उठतांच, सरकारी अंमलदार कान व डोळे टवकारून या अश्रुतपूर्व घटनेचें कारण शोधूं लागले. मूठभर राजकारणी वेड्यांचा हा खेळ आहे, असें मानून बाकीची समस्त जनता उपहासबुद्धीनें त्याकडे पहात होती; पण तिचें अंतिम कल्याण सुचविणारा व राजकीय महत्वाकांक्षांना प्रफुल्लित करणारा हा आवाज असल्यानें त्या आवाजाचा अनुकूल पडसाद काढण्याची प्रवृत्ति तिच्यांत बळावण्याला फारसा विलंब लागला नाहीं.

हा अर्ज सार्वजनिक सभेनें प्रसिद्ध केला, त्यावर्षीं गुजराथेंतील महाराष्ट्रीय संस्थानिकावर संकटाच्या कृष्णछाया पसरत चालल्या होत्या. या संकटानें १८७५ सालाच्या पहिल्याच महिन्यांत या संस्थानिकाचें सिंहासन हिरावून घेतलें. खालची बैठक सुटल्याबरोबर त्याच्यांत कांहींच अवसान उरलें नाहीं. तो निराधार झाला. स्वतःच्या राज्यांत त्याची सामान्य गुन्हेगारासारखी असहाय व निस्त्राण स्थिति झाली. बडोद्याचे दुर्दैवी राजे मल्हारराव गायकवाड यांची ही हकीकत आहे. भावाच्या मरणानंतर राज्यावर बसून पुरीं चार वर्षेंही लोटलीं नव्हतीं, तोंच त्यांची वरच्याप्रमाणें निस्सीम दुर्दशा उडाली. या चार वर्षांत त्यांच्या व तेथील इंग्रज रेसिडें-

टांच्या कितींदा तरी झटापटी झाल्या. मल्हारराव आपल्या ऐटींत व इंग्रज रेसिडेंट आपल्या गुर्मीत, अशी दोघांचीं तोंडें विरुद्ध दिशेस असल्यानंतर त्यांच्यांतला बेबनाव नाहींसा करण्याच्या खटपटींत शिरणाराच तोंडघशीं पडायचा. राजकीय चळवळींतले पितामह दादाभाई नौरोजी यांच्याकडे या धामधुमींत मल्हाररावांच्या हाताखालीं दिवाणगिरी करण्याची पाळी आली होती. त्यांनीं उभयपक्ष सामोपचाराच्या रस्त्यावर आणून, त्यांच्यांतल्या कटकटीला दिलसफाईच्या जोरावर घालविण्याचा यत्न केला, पण स्वतः ते सरळ स्वभावाचे असल्यानें, शेवटीं त्यांनाच अपेशी ठरून दिवाणगिरी सोडावी लागली. १८७४ च्या अखेरीस मल्हाररावांवर विषप्रयोगाचा आरोप घालून रेसिडेंटानें आपला बार उडविला. या बारामुळेंच मल्हारराव एकदम सिंहासनाखालीं आले व खटल्याच्या जाळ्यांत सांपडून सत्ताशून्य झाले. त्यांची संस्थानांतल्या फुटक्या कवडीवर देखील मालकी राहिली नाहीं. स्वतःच्या बचावाकरितां वकील सालिसिटर देण्याचे आवश्यक असतांही त्यांस कांहीं करतां येईना. लाचार होऊन त्यांनीं व्हाइसरायसाहेबांना आपली स्थिति तारेनें कळविली. मल्हाररावांच्या अकिंचन दशेचा बोभाटा होऊन, त्याची लाट पुण्यास येतांक्षणीं सार्वजनिक काकांनीं या दुर्दैवी राजास एक लक्ष रुपयांच्या मदतीचें आश्वासन तारेनेंच पाठवून दिलें. बडोदें राज्यांत लोक स्वस्थ होते; गुजराथ प्रांतानें आपलें तोंड घट्ट मिटून धरलें. महाराष्ट्र वस्तुतः बडोद्यापासून दूर, पण त्यानें मल्हाररावांच्या आपत्तीला तोंड दिलें. जानेवारीच्या पंधराव्या तारखेस पुण्याला जाहीर सभा भरली. सर्व जातीचे, सर्व वर्गाचे सुमारे तीन हजार लोक जमले. माधवरावांनीं व्हाइसरॉय साहेबांकडे पाठविण्याकरितां तयार

केलेला अर्ज सभेनें पसंत केला. महाराष्ट्राच्या राजकारणाला आतां वेगळाच रंग चढूं लागला.

मल्हारराव आणि इंग्रज रेसिडेंट यांच्यांत विरोध उत्पन्न झाल्यानंतर एकदां रेसिडेंटानें सरकारांत, मल्हारराव दक्षिणेमध्यें आपले हस्तक पाठवून राजद्रोहाचा फैलाव करीत आहेत, अशा अर्थाची बातमी दिली होती. पुणेंकरांनीं जेव्हां मल्हाररावाची पाठ राखण्याचा इरादा जाहीर केला, तेव्हांही रेसिडेंटाची बातमी खरी असावी असा, सरकारचा संशय दृढावला. माधवरावांनाही सरकारी संशयाची कुणकूण कळलेलीच होती, म्हणून त्यांनीं तयार केलेल्या अर्जांत महाराष्ट्राचा आणि बडोदेंसंस्थानचा संबंध कोणत्या स्वरूपाचा आहे, तें स्पष्ट रीतीनें व्यक्त केलें आहे. बडोद्याच्या विपन्न महाराजाच्या हिताहितसंबंधींत पुणेंकरांनीं लक्ष घालणें म्हणजे विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करण्यासारखा रिकामा उद्योग नसून, तें त्यांचें जिव्हाळ्याचें कर्तव्य आहे, हें सरकारला पटविण्याकरितां माधवराव अर्जांत लिहितातः—

Your memorialists, as the inhabitants of the late Capital of the Peishwas are bound by diverse ties of interests and relationship with the outlying conquests of the once great Maratha Confederacy, represented by the states of Baroda, Indore, Gwalior etc. They feel legitimate interest in the progress and well-being of those states, which maintain in their various service and by means of their large charities a considerable number of their fellow-countrymen, who have settled in those parts of these states. The Gaikwar kingdom, as being the oldest, richest and and nearest, has always been regarded as having greatest claim upon the affection of the people.

इंग्रजी भाषेच्या ज्ञात्यांना वरील उताऱ्याच्या प्रत्येक वाक्यांत किती स्वाभिमान भरलेला आहे, तें सांगावयास नको. आपण पेशव्यांच्या मानी राजधानींतले पौरजन आहोंत. पेशव्यांच्या मराठा राजमंडळांतले बडोदें, इंदूर, ग्वालेर, वगैरे संस्थानें अवशेष आहेत; त्यामुळें त्यांच्या हिताविषयीं पुणेकरांना साहजीकच आस्था वाटते. त्यांतून, गायकवाडांचें राज्य सर्वांत जुनें, संपन्न व जवळचें असल्यानें त्याचा महाराष्ट्रिय जनतेच्या प्रेमावर विशेष हक्क आहे, असें माधवरावांनीं या इंग्रजी उताऱ्यांत म्हटलें आहे. देशी संस्थानांच्या मजबुतीवर इंग्रजी राज्याचा भक्कमपणा अवलंबून आहे, ही गोष्ट १८५७च्या बंडाळीनें सिद्ध केली आहे,देशी संस्थानिक हे जनतेमधील इंग्रजी राज्यकर्त्यांविषयींच्या राजनिष्ठेचे आधारस्तंभ आहेत, अशी पुढच्या मजकुरांत या अर्जानें व्हाइसरायसाहेबास आठवण देऊन कर्तव्याची सूचना केली आहे. राजेलोकांच्या हातून चुका कां घडतात, याचें अर्जांतील विवेचन, असेंच माधवरावांच्या दूरदृष्टीचें निदर्शक आहे. ते म्हणतातः—

Your Excellency's Government are aware of the manners of Princes of the Royal blood in all countries. Power and wealth are necessarily attended with fickleness and such other weaknesses. But in the case of native Princes, particularly, such political circumstances have existed, as make them weakminded men of narrow views, who have much means of luxury and whose Sirdars and subjects cannot exercise legitimate check from the overawing presence of British Residents.

या उताऱ्यांतील मजकुरांत हिंदी संस्थानिकांच्या स्वभावांत आणि राज्यकारभारांत दिसून येणाऱ्या दोषांची नैसर्गिक व राजकीय कारणें दिग्दर्शित केलीं आहेत. राजकुळांतले तख्तनशीन पुरुष सर्व देशांत सारखेच चंचलवृत्तीचे व इतर अवगुणांनीं पूर्ण असतात. परंतु हिंदी राजांच्या अवगुणांची वृद्धि करणारी कांहीं विशेष राजकीय परिस्थिति कारणीभूत आहे. त्यामुळें ते प्रायः दुबळ्या मनाचे व संकुचित दृष्टीचे बनतात. विलासांत बुडून जाण्याचीं साधनें त्याजपाशीं भरपूर असतात व त्यांच्या सरदारांना आणि प्रजेला, ब्रिटिश रेसिडेंटांचें दडपण छातीवर असल्यामुळें त्यांस ताळ्यावर आणण्याच्या बाबतींत कांहींच करतां येत नाहीं; याप्रमाणें प्रस्तावना करून माधवरावांनीं बडोद्याच्या प्रकरणाचें आणखी एक विशेष कारण उजेडांत आणलें आहे. बडोद्याच्या राजांना रेसिडेंटमार्फत मिळणाऱ्या ब्रिटिश सरकारच्या सल्लामसलतीचें महत्त्व कधीं वाटलें नाहीं, याचा दोष रेसिडेंटाकडे आहे. त्यांनीं उलट मनसोक्त वागणुकीला उत्तेजनच दिलें. त्याचा परिणाम आतां या प्रकरणाच्या स्वरूपांत बाहेर आला, असें अर्जांत त्यांनीं निर्भीडपणें लिहिलें आहे. अर्जाच्या सहाव्या कलमांत, आणखी एका राजकीय तत्त्वाचें ब्रिटीश सरकारला माधवरावांनीं स्मरण करून दिलें आहे. तें असें:—

It is consonant with justice that the integrity of a Native State in alliance with the British Government is not bound up with the personal good behaviour of the ruler for the time being of that state. The state survives a succession of rulers that live and die. So long as the subjects of a Native state are not guilty of hostility towards British Government, it will not be just to punish them for

the errors or vices of their chiefs for the time being the State (Dowlat) does not belong of private right to the Chief. He and the Rajmandal (the men, whose ancestors fought and bled with the ancestors of the chief and independent civil and military population) is alike interested in it.

संस्थानिक आणि त्याचें राज्य हीं एकमेकांवर अवलंबून नाहींत.राजाचें वर्तन नीट असेंपर्यंत त्याचें राज्य टिकावें आणि तो दुर्वर्तनी निवाल्यास त्याचें राज्य नष्ट व्हावें, अशी न्यायाची रीत नाहीं. जोंवर एखाद्या संस्थानांतली प्रजा ब्रिटिश सरकाराशीं बेइमान झाली नाहीं, तोंवर तें संस्थान खालसा करणें शक्य नाहीं. राजे जगले आणि मेले तरी संस्थान कायमच असतें. राजाच्या दुर्गुणाचें प्रायश्चित्त साऱ्या संस्थानच्या प्रजेला देतां येत नाहीं. संस्थानांतली लष्करी व बिनलष्करी प्रजा आणि ज्यांच्या पूर्वजांनीं संस्थानिकांच्या पूर्वजांबरोबर लढायांतून रक्त सांडलें आहे, अशा लोकांचा संस्थानाशीं हितसंबंध असतो; असा वरील उताऱ्याचा भावार्थ आहे. प्रस्तुत विवेचनांत माधवरावांनीं मल्हारराव महाराजांच्या अपराधाबद्दल बडोदें संस्थान खालसा करतां येणार नाहीं, ही सूचना ध्वनित केली असून, पुढच्या भागांत विषप्रयोगाचा आळ मल्हाररावांवर लादणाऱ्या रेसिडेंटाच्या कारभाराची हजेरी घेतली आहे. शेवटीं मल्हाररावांना निःपक्षपात न्याय मिळण्याकरितां, हिंदी व युरोपियन अशा दोन्ही समाजांतील न्यायनिष्णात गृहस्थांचें संमिश्र मंडळ नेमावें, हिंदी गृहस्थांची निवड मुंबईकलकत्त्याच्या हायकोर्टाच्या जज्जांतून करावी किंवा मल्हाररावांच्या बरोबरीच्या हिंदू-मुसलमान राजेरजवाड्यांतून चौकशीमंडळाचें हिंदी सभासद नेमावें, या मंडळानें

ज्यूरीप्रमाणें खटला ऐकावा, पुरावा पारखावा, पण निकालाची सत्ता त्याच्या हातीं ठेवण्यांत येऊं नये, अशा अर्थाच्या सूचना केल्या आहेत.

सदर अर्जाचा इष्ट परिणाम होऊन हिंदी व युरोपियन लोकांचें चौकशी मंडळ नेमण्यांत आलें, बडोद्याचें राज्य खालसा केलें जाणार नाहीं, अशा आश्वासनाचा जाहीरनामा व्हाइसराय साहेबांनीं काढला. मल्हारराव महाराजांना त्यांच्या इच्छेप्रमाणें तरफदारी करण्यास खास विलायतचा एक नामांकित बॅरिस्टर मिळाला. खटल्याची सुनावणी झाल्यावर हिंदी व युरोपियन सभासदांत मतभेद झाला. अखेरीस हिंदुस्थान सरकारानें विषप्रयोगाचा आरोप शाबीत धरून, मल्हाररावांना मद्रासकडे हद्दपार केलें. १८७५च्या जानेवारींत सुरू झालेलें हें प्रकरण एप्रिलच्या २२ तारखेला समाप्त झालें. त्यादिवशीं मल्हाररावांची बडोद्यांतून उचलबांगडी झाली. तेविसाव्या तारखेस मद्रासला त्यांच्या तहाहयात अटकेची सुरुवात झाली. राजवंशांत जन्म झाला असतांही, पूर्वकर्मे दुर्दैवाच्या रूपानें कसा पिच्छा पुरवितात, याचें मल्हाररावांचें चरित्र हें एक उत्तम उदाहरण आहे. प्रथम त्यांस भावानें कैदखान्यांत घातलें. भावाच्या मरणानंतर चार वर्षे राज्यारोहणाचा आनंद त्यांनीं भोगला, पण तेवढया अवधींत सार्वभौम राज्यकर्त्यांच्या प्रतिनिधीचा व त्यांचा खटका उडून, सारें महाराष्ट्र आणि खटल्याचा निवाडा करण्यासाठीं बसलेले हिंदी कमिशनर पाठीशीं असतांही, त्या खटल्याचें पर्यवसान पुनः त्यांच्या बंदिवासांत झालें. खटला चालू असतां जसजसे नवीन नवीन प्रश्न उपस्थित होतील तस तसे सार्वजनिक सभेचे अर्ज जात होते. विषप्रयोगाचा गुन्हा सिद्ध झाला नाहीं, त्याबद्दल मतभेद झाला, तरी वरिष्ठ सरकारानें त्यांना पदच्युत व हद्दपार केलें, याचा निषेध व्यक्त करणारा एक अर्ज

गेला, परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. सार्वजनिक सभेविषयीं उलट सरकारचें अंतरंग मात्र राजद्रोहाच्या संशयानें गढूळ होत चाललें.

बडोदें प्रकरणांतून पुणेकरांचें मन मोकळें झाल्यावर तें उन्हाळ्याच्या सुट्टींत व्याख्यानें वगैरे चळवळींत रमलें. मे महिना संपून जून सुरू झाल्यावर नगर, सोलापूर जिल्ह्यांत दरवडयांची, जाळपोळीची सांथ उद्भवून सार्वजनिक सभेला म्हणजे प्रामुख्यानें माधवरावांना विचारार्थ नवीन विषय मिळाला. 'दक्षिणचे दंगे' (Deccan Riots) या नांवानें राज्यकारभाराच्या अहवालांतून त्यांचें विस्तृत वर्णन आहे. या दंग्यांत रक्तपातही झाला. सावकारवर्ग आणि त्यांचीं कुळें यांच्यांतली मारामारी असें या दंग्यांचें बाह्य स्वरूप दिसत होतें. कारण, दरवडयांच्या लाटेंत सावकारांचींच घरें बळीं पडलीं. त्यांनाच दुखापती सोसाव्या लागल्या. अर्थात सावकारांनीं कर्जाच्या देवघेवींत आपल्या कुळांना गांजल्यामुळें पिसाळून त्यांनीं सावकारांवर भयंकर पद्धतीनें सूड उगविला, असा सर्वांचा समज झाला. सरकारानेंही तो समज वाढविण्यास मदत केली. दंग्यांचें खापर सावकारांच्या माथ्यावर फोडल्यानें खऱ्या कारणांवर आपोआपच पांघरूण पडेल, व मग दंग्यांचा आपल्या अंगास चिकटणारा दोष लोकांना दिसणार नाहीं, हें सरकारास माहीत होतें. माधवरावांची अंतर्भेदी तीक्ष्ण दृष्टि असल्या लपवाछपवीच्या प्रकारास दाद देणारी नव्हती. तिला खरें कारण उमगलें होतें. सार्वजनिक सभेचे इतर चालक सरकारास आपले विचार कळविण्यास उत्सुक होते. परंतु माधवरावांनीं त्यांना घाई न करण्याचा सल्ला दिला. अगोदरच मल्हाररावांच्या प्रकरणांत भागीदार झाल्यामुळें सरकार संशयानें पछाडलेलें होतें. सावकार दोषी नसून सरकारच दोषी

आहे, असें दंग्यांचें तात्पर्य सरकारच्या कानावर, दंगे भरांत असतां, घातलें, तर सरकार दंग्याबरोबर सार्वजनिक सभेच्या उद्योगाचाही रागानें मोड करून टाकील, हें वाजवी भय माधवरावांना वाटत होतें. 'Embarrassment of the Government'—सरकाराला अडचणींत पाडलें हें एक अमोघ निमित्त सरकारापाशीं सदैव हजर आहेच, त्याच्या जोरावर दंग्यांच्या आहुतींत सरकार सार्वजनिक सभेची आहुति घेण्यास कचरलें नसतें. यासाठीं माधवरावांनीं, दंगे शांत होऊन सगळें वातावरण स्वच्छ झाल्यावर, सार्वजनिक सभेकडून दंग्यांसंबंधीं सविस्तर अर्ज पाठविला. सावकारांपासून कर्ज काढावें लागतें. सावकार मंडळी द्रव्यलोभानें शेतकऱ्यांना फसवीत नसेल असें म्हणतां येत नाहीं, पण सावकारांच्या दाराशीं जाण्याचा व कर्जाच्या उलाढालींत घरादारांना, शेतवाडीला, गुराढोरांना मुकण्याचा प्रसंग शेतकऱ्यांवर सरकारच्या धोरणामुळें येतो, असें या अर्जांत खुलासेवार दाखविलें आहे. मुंबई इलाख्याच्या सगळ्या जिल्ह्यांत सावकार आहेत, सर्वत्र सावकारीचा धंदा चालवितो, पण ऋणी शेतकऱ्यांनीं दंगे करून आपल्या सावकारांना मारल्याचीं उदाहरणें कांहीं विशिष्ट जिल्ह्यांतून घडलीं, या जिल्ह्यांतलें शेतसाऱ्याचें प्रमाण असह्य डोईजड झाल्याबद्दल सरकारच्या दप्तरांत पुरावे आहेत, सारा भरल्याखेरीज शेतावर सत्ता रहात नाहीं, शेतकीच्या उत्पन्नांतून शेतसाऱ्याचा भरणा करतां येत नाहीं, अर्थात् शेतकऱ्यांना सावकारापुढें दीनपणानें हात पसरावा लागतो, पण मुळांत सरकारच दोषी आहे, अशी सरकारापुढें, दंग्यांच्या कार्यकारणभावाची बिनतोड पकडींत धरणारी सांखळी, सार्वजनिक सभेच्या अर्जानें ठेवली. सार्वजनिक सभेच्या अर्जांतली विचारसरणि अगदीं बिनचूक होती, असें

दंग्यांच्या चौकशीकरितां बसलेल्या कमिशनानें नंतर ठरविलें. शरीरांतलें रक्त बिघडल्यानें अंगावर फोड उठतात, फोड हे रक्ताच्या अशुद्धतेचें बाह्यचिन्ह आहे. त्यावर मलमपट्टी केल्यास त्याचा तात्पुरता बंदोबस्त होतो, पण जोंवर रक्तशुद्धीचा इलाज अंमलांत येत नाहीं, तोंवर फोडाऐवजीं दुसरीं बाह्य लक्षणें प्रकट होत रहाणार, या दृष्टांताचें रहस्य सार्वजनिक सभेनें सरकारच्या दृष्टीवर अर्जद्वारें घातलें. शेतकऱ्यांचा कैवार घेऊन सावकारांना झोडपण्यांत हंशील नाहीं, सावकार गेले म्हणून शेतकऱ्यांतला असंतोष जात नाहीं. हात धुऊन सावकारांच्या पाठीस लागण्याचे सोडून सरकारानें आपलें सारावसुलीचें दुस्सह धोरण बदलावें, म्हणजे असंतोषाचे दंग्यासारखे स्फोट बंद पडतील; ही सार्वजनिक सभेची मसलत सरकारानें मान्य केली नाहीं.

जबाबदार राज्यपद्धतीचीं मागणी, मल्हारराव गायकवाड व शेतकऱ्यांचे दंगे, यांचें समर्थन करणाऱ्या सार्वजनिक सभेच्या चालकांविषयीं सरकारचा संशय याप्रसंगीं दुणावला आणि एकदां सभेच्या सूत्रधारांचा पक्का शोध लावण्याचा निश्चय करून, सरकारनें गुप्तहेरांचें जाळें पुण्यावर टाकलें. स्वार्थासाठीं सरकारच्या इतर पगारी नोकरीबरोबरच हेराचें बिनपगारी काम करण्याला उत्सुक असणारे आणि वरिष्ठ अंमलदारांसमोर लाळ घोटीत लांगूलचालन करणारे हिंदी गृहस्थ, त्यावेळीदेखील अनेक होते. माधवरावांचा सरकारला वहीम होता. सार्वजनिक सभेच्या चळवळीचें चक्र माधवराव फिरवीत आहेत, अशी त्यांची अटकळ होती. म्हणून सरकारनें, त्यांच्या व्यवहाराची टेहेळणी करणारे लोक नेमले. ज्यांचा कधीं चुकूनसुद्धां, ते हेरपणा करतील, असा संशय येणार नाहीं, तीं माणसें माधवरावांवर नजर ठेवूं लागलीं. माधवरावांना आपल्या

सभोंवती काय चाललें आहे, याचा पत्ता ताबडतोब लागला. असावध-पणानें किंवा अविचारानें ते केव्हांही कोणत्याच गोष्टीला हात घालीत नसत, यामुळें त्यांना विशेष संशयास्पद सावधगिरीनें वागण्याची गरज पडली नाहीं. स्वार्थाखातर माणसें किती अधमपणा करूं शकतील, याचा त्यांना अंदाज लागला. तथापि बाहेरून त्यांनीं आपली स्थिति दिसूं दिली नाहीं. सगळा कारभार यथापूर्व चालला होता. इतक्यांत एक बंगाली हेर पुण्यास आला व त्यानें कांहीं दिवसपर्यंत पुण्यास माधवरावांच्या वळणांतल्या बऱ्याच लोकांना झुलविण्याचा क्रम ठेवला होता, परंतु माधवरावांनीं सदर इसमाच्या टपालाचा पत्ता काढून त्याचें खरें स्वरूप सर्वांच्या लक्षांत आणून दिलें, वगैरे हकीकत ' आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी, ' या पुस्तकाच्या वाचकांना सविस्तर माहीत असेलच.

दूरच्या दंग्यांनीं पुणेंकरांचें चित्त व्यग्र असतां, त्यांच्या गांवांत दुसऱ्याच एका चळवळीचा उदय झाला होता. पुण्याच्या नापि-तांनीं मुलांचे व थोरांचें दर निरनिराळे ठरविल्यामुळें ब्राह्मणांना राग आला व त्यांनीं नापितांना बहिष्कार घालून, स्वतःच आपापसांत क्षुरा-कर्म करण्याचा निश्चय केला. ही ब्राह्मण-नापितांतली चकमक ज्या महिन्यांत उडाली, त्याच महिन्यांत उत्तरहिंदुस्थानांतले एक दिग्विजयी स्वामी पुणें शहरांत आले होते. त्यांचा मोघम उल्लेख मागें एकदां आला आहे. सुप्रसिद्ध दयानंद सरस्वती, हेच ते स्वामी होत. यांचा जन्म १८२४ मध्यें काठियावाडांत झाला. मोरवी शहराचे हे जन्मतः रहिवासी होते. हे जातीनें औदीच्य ब्राम्हण. यांचें पाळण्यातलें नांव 'मूळशंकर.' दहा अकरा वर्षेंपर्यंत त्यांनीं वेदाध्ययन केलें. चौदा वर्षांच्या आंत यांनीं

सारी यजुर्वेद संहिता कंठस्थ केल्याची आख्यायिका आहे. या सुमारास शिवरात्रीला शंकराच्या देवळांत जागरण करण्याविषयीं त्यांस वडिलांची आज्ञा झाली. त्याप्रमाणें मूळशंकर शिवालयांत गेला व लिंगप्रतिमेकडे ध्यान लावून जागत बसला. मूळ शंकराला लहानपणापासून तात्त्विक विषयांचें मनन करण्याची संवय लागली होती. सदर शिवरात्रीस त्याला जो देखावा देवळांत दिसला, तो पाहून एकप्रकारें त्यास साक्षात्कार किंवा उपरति झाली म्हटल्यास हरकत नाहीं. सांबाच्या पिंडीवर एक उंदीर खुशाल उडया मारीत होता, मलमूत्रोत्सर्गही करीत होता, सांबावर भक्तांनीं टाकलेल्या धान्यकणांचा फन्ना उडवीत होता; पण ती देवप्रतिमा हलेना कीं डोलेना! मूळशंकराला या देखाव्यानें मूर्तींत देवाचें सामर्थ्य नाहीं असें वाटलें व आपल्या शंकेचें निवारण करून घेण्याकरितां त्यानें आपल्या पित्याला उठविलें आणि त्यास शंका विचारली. मध्यरात्रींच्या अकल्पित निद्राभंगामुळें बापाचें पित्त खवळलें होतेंच, त्यांत नास्तिकासारखी मुलाची शंका कानीं पडली. बापाचा क्रोध अनिवार झाला, परंतु कोपाविर्भावानें दबणारा त्याचा मुलगा नव्हता. त्याची समजूत पडेना. येथून पुढें मूळशंकराच्या जीविताला निराळें वळण लागलें. बापाच्या मनांतून त्याच्या पायांत विवाहाचा खोडा घालून, वठणीस आणावयाचें होतें. पण मूळशंकरानें रामदासांप्रमाणें लग्नाच्या बेताची चाहूल लागतांच घरांतून पळ काढला व देवाच्या शोधाकरितां अरण्यांतून प्रवास आरंभिला. बापानें त्याचा शोध चालविला होता. एकदां मूळशंकर पकडला जाऊन शिपायांच्या पहाऱ्यांत अडकला. पण तेथूनही त्यानें रखवालदारांची नजर चुकवून धूम ठोकली आणि तो पुनः कोणाच्या तावडींत सांपडला नाहीं.

कालान्तरानें त्यास ' दयानंदसरस्वती ' हें संन्यासपंथांतलें नांव प्राप्त होऊन योग, वेद, शास्त्रें यांचा अभ्यास संपल्यावर त्यांनीं धर्मोद्धाराचें कार्य सुरू केलें. मूर्तिपूजेंत राम नाहीं, अशी त्यांची खात्री असल्यामुळें त्यांनीं प्रथम मूर्तिपूजेच्या प्रघातावर चढाई केली. त्यांनीं ख्रिस्ती व मुसलमानी धर्मांचें अध्ययन केलें होतें. हिंदूसमाजांत अनार्यधर्म माजला आहे, त्याचा नाश करून आर्यधर्माचें पुनरुज्जीवन करावें ही त्यांची महत्त्वकांक्षा होती. प्राचीन आर्यांच्या सामाजिक व्यवहारांत विधवाविवाहनिषेधासारखे निर्बंध नव्हते; सांप्रत असले निर्बंध धर्माचा प्राण होऊन बसले आहेत; हे निर्बंध नष्ट करणें प्राप्त आहे, असें स्वामींचें मत होतें. यामुळें स्वामींच्या मतांत व समाजसुधारकांच्या मतांत विशेष फरक नव्हता. स्वामी १८७५ च्या सुरवातीस मुंबईला आले, त्यापूर्वीं दहाबारा वर्षांत सारें उत्तर हिंदुस्थान पादाक्रांत करून त्यांनीं धर्मजागृतीला महापूर आणला होता. स्वामींना राजेमहाराजे वचकत असत व कित्येकांनीं स्वामींचें शिष्यत्व पत्करलें होतें. त्यांची कीर्ति सर्वत्र पसरल्यानंतर ते मुंबईकडे वळले व मुंबईलाच त्यांनीं आपल्या कार्याची रूपरेषा पक्की केली. गोपाळराव देशमुख हे स्वामींच्या चहात्यांपैकी एक गृहस्थ होते. मुंबईहून त्यावर्षी जुलई महिन्यांत स्वामींनीं आपला मुक्काम पुण्याला नेला. माधवरावांनीं स्वामींचा सत्कार कला. प्रार्थनासमाजाचीं तत्त्वें आणि स्वामी दयानंद यांचीं मतें, यांत एक मोठें अंतर होतें. प्रार्थनासमाज कोणत्याही धर्मग्रंथाला ईश्वरप्रणीत समजून मान देण्यास तयार नव्हता. दयानंद स्वामी वेदांना ईश्वरप्रणीत मानीत होते. तथापि माधवरावांनीं स्वामींना विरोध दिसूं दिला नाहीं. उलट त्यांची सर्वप्रकारें बडदास्त ठेवली. त्यांचीं व्याख्यानें करविलीं आणि माधवराव स्वामींच्या व्याख्यानांस स्वतः हजर राहू लागले.

दयानंद स्वामी पुण्यास येण्याचें मुख्य कारण म्हणजे त्यास माधवरावांनीं केलेलें पाचारण असावें, अशी त्यावेळची सगळी माहिती पाहिली म्हणजे वाटतें. मुंबईसारख्या अगदीं नजीकच्या शहरीं स्वामींचें आगमन झालें असतां पुण्याला त्यांच्या उपदेशाचा लाभ घडावा, या हेतूनें त्यांना पुण्याहून निमंत्रण जाणें स्वाभाविक आहे. स्वामींचीं मतें व रानडे प्रभृति मंडळींचीं मतें भिन्न असलीं तरी कोणत्या बाबतींत त्यांचें मतैक्य होतें, याचा उल्लेख वर आलेला आहे. मूर्तिपूजा, विधवाविवाहप्रतिबंध, जातिभेद, या गोष्टी स्वामींना मान्य नव्हत्या. या गोष्टींतलें लोकांचें अज्ञान घालविण्याकरितां स्वामींच्या उपदेशाचा उपयोग करून घ्यावा, असा माधवरावांचा उद्देश होता. एका गोष्टींत एखाद्याशीं मतभेद होतांच त्याच्यापासून दुसऱ्या गोष्टींत होणाऱ्या उपयोगावर पाणी सोडणें, माधवरावांस प्रशस्त वाटत नसे. ज्याचा जितका उपयोग होत असेल त्याचा तितका उपयोग करून घेण्याची योजकता माधवरावांच्या स्वभावांत अलौकिक होती. उदरंभरणाचे इतरांप्रमाणेंच व्यवसाय करणाऱ्या गृहस्थाश्रमी व्यक्तीपेक्षां संन्यासाच्या निस्संग मार्गांत राहून, केवळ लोककल्याणाच्या कार्यास वाहून घेणाऱ्या व्यक्तीचा उपदेश समाजाला रुचतो व त्याच्या सहज पचनीं पडतो, त्यांतल्यात्यांत स्वामी हें यावेळीं लहानसान प्रस्थ नव्हतें, त्यांच्या कर्तृत्वाचा हा मध्यान्हकाळ होता, हें जाणून माधवरावांनीं स्वामींच्या पुण्यांतल्या मुक्कामाचा बेत अंमलांत आणला. परंतु माधवरावांची योजकता ध्यानांत न आल्यामुळें स्वामींच्या कच्छपीं लागण्यांत प्रार्थनासमाजवाल्यांचा दुष्ट कावेबाजपणा होता, त्यांनीं आपल्या समाजाच्या पुष्ट्यर्थ स्वामींना बाहुल्याप्रमाणें नाचविलें, असे आक्षेप क्रियेकर्त्यांनीं

काढले. माधवरावांचें हें कृत्य शत्रूंच्या आणि मित्रांच्या गैरसमजुतीला सारखेंच कारणीभूत झालें.

पुण्याला स्वामींचा दोन महिने तळ होता. त्या अवधींत त्यांनीं पंधरा व्याख्यानें दिलीं. स्वामींची भाषा हिंदी असल्यानें सगळ्या पुणेकरांना त्यांच्या उपदेशाचा आस्वाद घेतां यावा, म्हणून महादेव मोरेश्वर कुंटे व गणेश जनार्दन अगाशे हे दोघे स्वामींच्या भाषणांचीं टिपणें घेऊन एकदिवसाआड त्याचें मराठी भाषांतर प्रसिद्ध करीत. दयानंदांच्या भाषणांतले मुद्दे खोडून टाकण्याकरितां पुण्याचे पुराणमताभिमानी महामहोपाध्याय रामशास्त्री आपटे यांनीं कंबर बांधली व व्याख्यानांचें सत्र सुरू केलें. पण सगळा सुशिक्षित समाज दयानंदांच्या भजनीं लागला होता. त्याच्यावर आपट्यांच्या भाषणाचा परिणाम होणें शक्यच नव्हतें. रामशास्त्री आपट्यांप्रमाणेंच आणखी एक गृहस्थ दयानंदांच्या उपदेशाला परिणामशून्य बनविण्याकरितां झटत होते. ते धर्मानें ख्रिस्ती असले, तरी जातीनें हिंदूच होते. त्यांचें नांव रेव्हरंड नीळकंठ शास्त्री. ज्या जागीं दयानंदांचीं भाषणें होत, तेथेंच दुसऱ्या दिवशीं या रेव्हरंड बुवांचीं होत. पण त्यांच्या व्याख्यानाला प्रायः श्रोत्यांचीच वाण पडे. हिंदूधर्माचे अभिमानी व ख्रिस्ती धर्माचे अभिमानी हे दोघेही समाजसुधारकांना सारखेच पाण्यांत पहात होते, याचा हा एक मासला आहे. दयानंदांची सगळ्या शहरांत बोलबाला वाढल्यामुळें, पुराणमतवादी बहुजन समाजानें आपला जळफळाट वेगळ्या उपायानें व्यक्त केला. स्वामींनीं पुण्यास 'आर्यसमाजा'ची शाखा स्थापन केली. माधवरावांनीं तिच्या कारभारी मंडळींत आपलें नांव दाखल केलें. पुण्यांतलें कार्य संपलें, असें समजून स्वामींनीं प्रयाणाची सिद्धता

केली. पुणें शहरचे तत्कालीन नामांकित वकील व माधवरावांचे मित्र गंगारामभाऊ म्हस्के यांनीं स्वामींना अखेरचा निरोप देण्याकरितां लष्करांत आपल्या बंगल्यावर भाषणास बोलावलें. त्यांनीं, आणखी स्वामींची हत्तीवरून मिरवणूक काढण्याचा बेत केला. स्वामींनीं वेदाची पोथी अंबारींत घालून मिरवावी, आपली मिरवणूक नको, असें सांगितल्यावरून वेदांची मिरवणूक काढण्याचें ठरलें. पण निबंधमालेंतल्या हकीकतीवरून दिसतें कीं, स्वामींची अंबारींतून मिरवणूक निघाली. इतकेंच नव्हे तर मिरवणुकीबरोबर मशाली व दिवट्या होत्या.* वेद पालखींत व स्वामी हत्तीवर असेंही मिरवणुकीचें एक वर्णन सांपडतें.

दयानंदांची मिरवणूक म्हणजे आपल्या अपमानाची पराकाष्टा, असा चिडलेल्या पुणेंकरांचा समज झाला. त्यांनीं सदर मिरवणुकीची थट्टा करण्यासाठीं स्वामीप्रमाणें पिवळ्या रंगाचा एक फेटा एका गाढवाच्या डोक्याला बांधला आणि त्याच्या पाठीवर भरजरीची शाल घालून 'गर्दभानंदा'चा जयघोष करीत त्याला शहरच्या सर्व रस्त्यांतून फिरविलें. हा प्रकार दयानंदाच्या मिरवणुकीपूर्वीच घडल्यामुळें, स्वामीच्या मिरवणुकींत कोणते घोटाळे माजतील याची माधवराव, कुंटे, म्हस्के वगैरे मंडळींना अगाऊ कल्पना झाली. कांहीं मंडळींना स्वामीच्या मिरवणुकीचा बेत रद्द करावा, असें वाटूं लागलें. माधवरावांकडे रदबदली करण्यासाठीं मिरवणुकीच्या आधल्या रात्रीस कै. अगाशे गेले. त्यांनीं माधवरावांना शहराच्या वातावरणांत पसरलेल्या मिरवणुकीसंबंधींच्या वार्ता सांगितल्या. त्यांतल्या कित्येक भयंकर होत्या, धैर्याचें पाणी करून

*निबंधमाला.अंक २३. यामध्यें दयानंदांच्या पुण्यांतील संभावनेचें रसभरित पण प्रतिकूलदृष्टीनें लिहिलेलें विस्तृत वर्णन आहे.

सोडणाऱ्या होत्या आणि यामुळेंच कुंटे, अगाशे, प्रभृति मंडळीला मिरवणुकीच्या यशस्वितेविषयीं काळजी लागली होती. खुद्द म्हस्के घाबरले होते. त्यांनीं बंदोबस्ताला पोलीस बोलवायचें ठरविलें. तथापि माधवराव डगमगले नाहींत. मिरवणूक काढणेंच श्रेयस्कर असें त्यांनीं अगाश्यांना निश्चयपूर्वक मत दिलें. ते म्हणाले:—

समाजसुधारणेच्या झेंडयामागून जाण्याला किती बहादूर पुण्यास सज्ज आहेत, याची या मिरवणूकींत कसोटी लागेल. सुधारणापक्ष कसास उतरला तर प्रतिकूल समाजाला त्याचें सामर्थ्य किती आहे, याचा अंदाज कळेल. आजपर्यंत कोणतीही सुधारणा छळाच्या भट्टींतून तावून सुलाखून निघाल्याखेरीज यशस्वी झालेली नाहीं. छळ सोसण्याला सुधारकांची तयारी पाहिजे. मिरवणुकीवर दगडांचा अगर गटारांतल्या घाणीचा वर्षाव झाला, तरी त्याबद्दल हूं कीं चूं न करतां तो निमूटपणें सहन करण्याला माझी तयारी आहे. तुम्ही सर्वांनीं माझ्याप्रमाणें वागावें, अशी माझी विनंती आहे.*

माधवरावांनीं मिरवणुकीचा आग्रह धरल्यावर त्यांचा शब्द खालीं पडणें शक्यच नव्हतें. दुसऱ्या दिवशीं मिरवणूक निघाली. ती बुधवारांतल्या भिडेवाडयानजीक आल्यावर, समोरून गर्दभानंदाची स्वारी आपल्या प्रेरकगणासह वाजतगाजत आली. त्याच्या जयजयकारानें सगळें वातावरण दणदणलें. दयानंदांच्या मिरवणुकीबरोबर पोलिसांची तुकडी होती, पण ती केवळ शोभेकरितां व गर्दभानंदाच्या भक्तांचा उच्छृंखळपणा अनिवार न होऊं देण्याकरितां होती. तत्कालीन वृत्तपत्रांतील हकीकतीवरून असें दिसतें कीं, गर्दभस्वामीची मिरवणूक भिडयांच्या वाडयापाशीं थोडया उशीरानें पोंचली. त्यामुळें दयानंद स्वामींना घेऊन मंडळींना वाडयांत सुरक्षित पोंचण्याला अवकाश

* १९०४ सालांतलें कै. ग. ज. अगाशे यांचें स्मृतिपर व्याख्यान.

सांपडला. दयानंद दिवाणखान्यांत पोचले व स्वस्थानापन्न झाले. त्यांचें समारोपाचें भाषण ऐकण्याला श्रोतृमंडळी पूर्वी दोनतीन तास तिष्ठत बसली होती. भररस्त्यांत दयानंद व त्यांचे सहचारी यांस गांठून त्यांची दाणादाण उडविण्याची गर्दभभक्तांची इच्छा निष्फळ झाल्यानें, त्यांना अधिकच त्वेष चढला व त्यांनीं गर्दभानंदाच्या जयजयकारांत स्वामींचें दिवाणखान्यांतलें भाषण जिरवून श्रोत्यांचा व समारंभाचा विरस करण्याची युक्ति योजली. स्वामीचा एक शिष्य ही परिस्थिति पाहून चिडला. त्यानें पोलिसांना मदतीस घेऊन गर्दभानंदाच्या पाठींत सोडग्याचे धपाटे घातले. बिचाऱ्या गाढवाला मिरवणुकीचा आनंद भोगण्याचें ज्ञान नसलें, तरी माराचें दुःख समजलें व ते आपल्या नैमित्तिक भक्तांच्या गराडयांतून पळून जाण्याचा प्रयत्न करूं लागले. भक्तांनीं त्यास आडवून धरलें, आणि येथून पुढें मिरवणुकीचें दंग्यांत रूपांतर झालें. दंगेखोर गर्दभभक्तांनीं प्रथम हत्तीवर दगडविटकरांचा मारा केल्यामुळें माहुतानें त्यास दुसरीकडे नेले. दंगेखोरांना अनायासानें पावसाची मदत झाली. त्या दिवशीं पाऊस पडून रस्त्यांत चिखल झाला होता. भिडेवाडयांतील समारंभाचा दिवाणखाना रस्त्यावरच होता. त्याच्या उघडया खिडक्यांतून चिखलाचे गोळे आंतल्या मंडळीवर जाऊं लागले, तेव्हां आंतल्या लोकांनीं खिडक्या लावून घेतल्या, पण तेवढयांत बऱ्याच सन्मान्य मंडळीला चिखलगोळ्यांचा प्रसाद मिळाला. खालीं रस्त्यांत यावेळीं पोलिसांची व लोकांची मारामारी जुंपली होती. दुसऱ्यांना चिथावून आपण नामानिराळे रहाणारे गृहस्थ गर्दभानंदाच्या जमावांत नव्हते, असें नाहीं. दूर उभा राहून ते चाललेला प्रकार पहात होते. गर्दभानंदाच्या मानवी साथीदारांनीं

आतां आपल्या गुरूच्या जयजयकारानें कंठशोष करण्याचें सोडून, दयानंदच्या स्नेही नागरिकांना नांवनिशींवार शिव्या हासडून घसा फोडण्याला आरंभ केला. हा धुमाकूळ रात्रीं साडेनऊ वाजेपर्यंत चालला होता. मध्यंतरीं स्वामी आपल्या मित्रमंडळीसह भिडेवाड्याच्या मागल्या दारानें पसार झाल्याची भुमका उठून बरेच लोक शिकार सुटल्याच्या निराशेनें आपापल्या घरीं निघून गेले. बुधवारवाड्यापासून कोतवाल चावडीपर्यंत रस्त्यांत लोकांची गर्दी होती. मारामारीपर्यंत मजल गेल्याचें समजल्यावरून, शहरमॅजिस्ट्रेट भिडेवाड्यापाशीं आले व मग स्वामी सुरक्षित बाहेर पडून आपल्या मुक्कामास दाखल झाले. माधवराव स्वगृहीं आले, तेव्हां त्यांच्या सर्वांगावर चिखलमाराचीं चिन्हें दिसत होतीं. हा प्रसंग सामान्य माणसांच्या चित्तवृत्तीचा क्षोभानें तिळपापड करून सोडणारा होता; पण शांतिनिष्ठ माधवरावांच्या हृदयांत अनिष्ट विकाराचा एकही तरंग उसळला नाहीं. बरोबर पोलिसशिपाई असतां माधवरावांच्या अंगावर चिखल कसा पडला, याविषयीं घरांतल्या मंडळींनीं पृच्छा केली, तेव्हां माधवराव हंसून म्हणाले:—

सगळ्यामध्यें मी जर होतों, तर ( चिखल ) मला कां लागणार नाहीं. पक्षाभिमानाचीं कामें म्हणजे अशींच असतात. दुसऱ्या पक्षांतील माणूस लहान असो कीं मोठा असो, त्यांची परवा त्यांना कां वाटावी ? अशावेळीं मानापमानाचा विचार आमच्या मनांत तरी कां यावा ? या गोष्टीं अशाच चालायच्या.*

वरील मारामारींत एका पोलीसाला जबर दुखापत झाली आणि चौदापंधरा दुसऱ्या आसामींना पोलीसांच्या दंडुक्यांचा मार मिळाल्यामुळें घायाळ व्हावें लागलें. गर्दभानंदाला मिरविणारांतले दोघे पुढारी

* आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी पृष्ठ ६३–६४.

पोलिसांनीं गिरफदार केल्यावर त्यास शिक्षा भोगावी लागली. हे पुढारी कमिशनरकचेरींतले पट्टेवाले होते. त्यांच्या हातून गुन्हा घडला होता, पण त्यांच्यामागें लपलेले खरे पुढारी निराळेच होते. गुन्ह्याच्या चौकशीमध्यें ते बुरख्यांतून बाहेर ओढले गेले. त्यांवर चिथावणीचा आरोप शाबीत करणारा भरपूर पुरावा माधवरावांपाशीं होता. या विघ्नसंतोषी लोकांना जेव्हां वाटलें कीं, आतां प्रकरण आपल्या अंगाशीं भिडून कांतडीं सोलण्या-इतकें शेकणार, आणि त्यांतून सुटण्याला माधवरावांचे पाय धरण्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं, तेव्हां त्यांनीं माधवरावांना शरण जाऊन त्यांची क्षमा मागितली. क्षमादानाच्या वेळीं हजर असलेल्या पुष्कळ मित्रांनीं माधव-रावांचा निषेध केला. पण माधवरावांच्या क्षमावृत्तीचा विक्षेप झाला नाहीं. त्यांनीं आपल्या मित्रांचें गंभीरपणानें तुकारामाचा एक प्रसंगोचित समर्पक अभंग म्हणून समाधान केलें 'शरणागता मरण चिंतूं नये' हा एक त्या अभंगांतला चरण आहे.* नुसत्या क्षमेच्या याचनेवर कार-स्थानी दयानंदद्वेष्ट्यांची सुटका झाली. या लांछनास्पद आचरणामध्यें कृता-र्थता मानणारे पुष्कळ लोक पुण्यास होते. दयानंदाची भली खोड मोडली अशी त्यांना धन्यता वाटली. निबंधमालेंतलें प्रस्तुत प्रकरणाविषयींचें वर्णन धन्यतेचेंच निदर्शक आहे. दयानंदांची टवाळी करणाऱ्या पुणें-करांनीं आपला गाजरपारखेपणा जगाला पटवून दिला. पुण्यांतल्या प्रकारानें दयानंदांची किंमत मुळींच न उतरतां उत्तरहिंदुस्थानांत त्याचा पंथ म्हणजे एक देशोद्धारक सामर्थ्य होऊन बसलें. आजच्या काळानें मनुष्याचे गुण ओळखण्यांतलें माधवरावांचें नैपुण्य पटवून दिलें आहे. ही गोष्ट १८७५ च्या सप्टेंबरांतल्या पांचव्या तारखेस घडली.

* कै. ग. ज. आगाशे यांचें १९०४ सालांतलें स्मृतिपर व्याख्यान, पृ. ९

या सालांत माधवरावांच्या प्रयत्नामुळें पुण्यास टाऊनहॉल बांधण्याची कल्पना फळास आली. दयानंदाची स्वारी तेथें असतांना आगस्ट महिन्यांत वजनदार पुणेंकर पुढाऱ्यांची सभा भरली. या सभेला विष्णुशास्त्री चिपळूणकर हजर होते. त्यांच्या तोंडून ऐकलेली सभेची हकीकत, त्यांच्या बंधूंनीं लिहिलेल्या चरित्रांत आलेली आहे.* तिचा सारांश असा कीं, सभेचा उद्देश सांगण्यांत आल्यावर वर्गणीची यादी घेऊन शिवराम हरि साठे सभेंत फिरूं लागले. पण कोऱ्या कागदावर आंकडा कोणाच्याच हातून पडेना. शेवटीं साठे, विष्णुशास्त्री ज्या मंडळींत बसले होते, तेथें आले. विष्णुशास्त्र्यांनीं चटकन् 'एका महिन्याचे भर पगाराचा' आंकडा टाकला. साठ्यांना याचें आश्चर्य वाटलें. पण 'व्यवहारदक्ष रावबहादुरांचा पगाराचे निम्मेच आंकडा पडला.' या गोष्टीचा निबंधमालाकारांचे अभिमानी पुष्कळदां कुत्सित उपयोग करीत असतात. कृष्णशास्त्री चिपळुणकरांनीं दीडशेंच रुपये यादींत घातले. पण त्याविषयीं निबंधमालाकारांच्या चरित्रांत पूर्ण मुग्धता आढळते. ज्ञानप्रकाश, नेटिव्ह ओपीनियन वगैरे वृत्तपत्रांनीं प्रसिद्ध केलेल्या हकीकतींत, माधवरावांनीं ८०० रुपयांचा आंकडा वर्गणीच्या यादींत घातल्याचा स्पष्ट निर्देश आहे. माधवरावांवर मोठा गृहप्रपंच चालविण्याचा बोजा होता. या काळांत विष्णुशास्त्र्यांना घरखर्चाकडे बिलकूल पहावें लागत नव्हतें.* असा दोघांच्या गृहस्थितींतला फरक असतांही, माधवरावांनीं आपला एका महिन्याचा पगार वर्गणीच्या गंगाजळींत अर्पण केला, हें ध्यानांत ठेवणें अवश्य आहे.

१८७६ सालीं माधवरावांवर मित्रवियोगाचें दुर्धर दुःख सहन करण्याची पाळी आली. पुनर्विवाहाचे धुरंधर पुरस्कर्ते विष्णुशास्त्री पंडित

* विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र भाग ४ पृ. १२१-१२२

हे प्रकृति बिघडून मुंबईची हवा मानवेना, तेव्हां महाबळेश्वरीं प्रकृति सुधारण्याकरितां गेले. परंतु ईश्वरी नेमानेम निराळा होता. महाबळेश्वराच्या निरोगी हवेंत त्याची तब्बेत सुधारण्याऐवजीं जास्त ढासळली, व एप्रिल महिन्याच्या अखेरीस काळानें त्यास इहलोकांतून ओढून नेलें. माधवरावांचें कोमल व प्रेमळ अंतःकरण मित्राच्या आकस्मिक निधनानें किती पोळलें असेल, याची कल्पनाच करणें उत्तम ! विष्णुशास्त्र्यांच्या मृत्यूनें समाजसुधारणेंतील एका कार्याच्या मूर्तिमान् अवताराचीच समाप्ति झाली. लढाई चौफेर तुंबळ चालू असतां, बरोबरीचा किंबहुना अधिक योग्यतेचा साह्यकारी योद्धा पडल्यानें जें दुःख होत असेल, तें दुःख यावेळीं माधवरावांना झालें. स्वमतप्रसाराच्या मोहिमेंत शत्रूंचा सर्व बाजूंनीं गराडा पडला असतां, चढाई करणाऱ्या वीरांच्या ल्हानशा पथकाला एकमेकांशिवाय विसाव्याचें, समाधानाचें, धैर्योत्साहाचें दुसरें स्थान कोणतें असणार ? समाजसुधारणेचा पुरस्कार केल्यामुळें माधवरावांची स्वतःच्या घरांतली स्थिति मागें दिली आहे. विष्णुशास्त्री पंडितांच्या निमित्तानें त्यांना आणखी एकदां घरांतल्या विरोधाचा कडू अनुभव आला होता. या अनुभवाचा वृत्तांत श्री. रमाबाई साहेबांनीं दिलेला आहे.* आपल्या घरच्या मेजवानीनंतर हा स्नेही लवकरच कायमचा पारखा होईल, ही दुष्ट कल्पना त्यांच्या मनाला शिवूनसुद्धां गेली नसेल. मरणसमयीं पंडिताचें वय अवघें ५० वर्षांचें होतें. काळाचा घाला पडण्यापूर्वी दोनच वर्षें त्यांनीं विधवाविवाहाचें तत्त्व स्वतःच्या बाबतींत आणलें होतें. मराठी भाषेची त्यांनीं अविरत सेवा चालविली होती. माधवरावांचे स्वदेशीवरील विचार लोकप्रिय होण्याकरितां त्यांनीं त्या विषयावर कीर्तनें रचून, कीर्तनसंस्थेला नवें वळण लावण्याचा उप-

* आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी पृ. ४०–४२.

क्रम केला होता. पण १८६७ पासून पुढें त्यांनीं विधवाविवाहाला समाजांत मार्ग मोकळा करून देण्याकरितां जे परिश्रम केले, त्यांचा अनिष्ट परिणाम झाला व ते काळाच्या भक्ष्यस्थानीं पडले. पुण्यास त्यांच्या मृत्यूची बातमी कळली, तेव्हां दरसालप्रमाणें विद्वान् मंडळीच्या व्याख्यानांचा हंगाम ऐन बहारींत होता. माधवरावांना पंडितांच्या मृत्यूची बातमी ऐकून अतिशय खेद झाला, पण जड अंतःकरणानें ते प्रात किंवा नियोजित कार्यें पार पाडीत होते. मेच्या सुरुवातीस वक्तृत्वोत्तेजक सभेचा वार्षिक कार्यक्रम उरकला. पंडितांच्या स्मारकाची सभा बोलावण्याबद्दल वाटाघाट होऊन निश्चय ठरतांच माधवराव, कुंटे वगैरे मंडळींच्या सह्यांचीं हस्तपत्रकें शहरांत वाटलीं आणि दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. ८ मे रोजीं पंडितांच्या निधनाचा शोक व्यक्त करण्याकरितां सभा भरली. माधवरावांच्या स्वभावांत औपचारिक असें कांहींच नव्हतें. त्यांना सभेंत नुसता दुःखाचा देखावा करावयाचा नव्हता. त्यांच्या मनाला मित्रविरहाची जी व्यथा झाली होती, ती श्रोत्यास उघड करून दाखवावयाची होती. यामुळें त्यांचें भाषण अत्यंत हृदयंगम झालें. या गोष्टीची साक्ष त्यावेळचीं वृत्तपत्रें देत आहेत. माधवरावांनीं पंडितांच्या कामगिरीचें मर्म श्रोत्यांना सांगितलें. वेदशास्त्राच्या अध्ययनानें पंडितांच्या अंगांत 'तप' उत्पन्न झालें होतें. इंग्रजीच्या ज्ञानानें देशहिताची कळकळ त्यांच्या स्वभावांत बाणली. विद्वत्तेच्या भांडवलाला देशहिताच्या कळकळीची जोड मिळतांच कार्यरूपानें तें लोकांच्या अनुभवास आलें. तपश्चर्येच्या योगानें स्वीकृतकार्यासंबंधीं एक प्रकारचा आत्मविश्वास उत्पन्न होतो. मग यशाविषयींच्या शंका भेडवावीत नाहींत. विष्णुशास्त्री पंडितांच्या चरित्राचें स्वरूप वरच्याप्रमाणें माधवरावांनीं वर्णिलें आहे.

पण त्यांचें या भाषणानें समाधान झालें नाहीं. सभेच्या दुसऱ्याच दिवशीं डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थीवर्गाचें संमेलन झालें. तेथें माधवरावांना निमंत्रण होतें. तेथें त्यांनीं प्रथम संमेलनामध्यें मागल्या वर्षांत झालेल्या प्रगतीसंबंधीं विद्यार्थ्यांनीं निबंध वाचावें, असा उपदेश केला आणि मग पंडितांच्या चरित्राचा विषय विचारास घेतला. त्याचें हें भाषण फार मोठें आणि अत्युत्कृष्ट होतें, अशी ज्ञानप्रकाशांत त्याची प्रशंसा आहे. पंडितांची जीवनकथा सांगून शेवटीं ते म्हणाले कीं, मृतानें ज्या ज्या गोष्टी केल्या त्यांची पुनरावृत्ति करण्याचें कारण नाहीं. त्या गोष्टींमागें जी तात्त्विक प्रेरणा होती, जो नैतिक निर्भयपणा होता, त्या गुणांचें ग्रहण करणें योग्य आहे. यानंतर मुंबईस सभा भरली तेथेंही आपलें मित्रकर्तव्य बजावण्यास माधवराव गेले होते.

जून महिन्यांत राणीसरकारानें नवा किताब जाहीर करण्यासाठीं दिल्लीला जो १८७७ सालीं जानेवारींत दरबार भरणार होता, त्याचा विचार करण्यासाठीं पुणेकरांची सभा भरली होती. या सभेंत, सार्वजनिक सभेकरितां माधवरावांनीं तयार केलेला राणीसरकाराला द्याव-याच्या मानपत्राचा मसुदा पसंत व्हावयाचा होता. मानपत्रांत कांहीं मागण्या होत्या व त्याविषयीं पुण्याच्या चळवळ्या मंडळींत एकमत नव्हतें. अनेक अँग्लोइंडियन वृत्तपत्रकारांनीं, राणीसरकारच्या नव्या किताबाचा आनंद दर्शविण्याकरितां दिल्या जाणाऱ्या मानपत्रांत राज-कीय हक्कांच्या मागण्यांचें रडगाणें कशाला पाहिजे, असा प्रश्न विचा-रून बुद्धिभेद चालविला होता. लोकांनीं आपली निस्सीम राज्यनिष्ठा प्रदर्शित करावी, महाराणीसाहेबांचें आयुरारोग्य चिंतावें, त्यांच्या राज्यावर ईश्वरी कृपेचें छत्र अखंड रहाण्याबद्दल इच्छा दाखवावी;

यापेक्षां मानपत्रांत जास्ती मजकूर असण्याची गरज नाहीं. त्याचें द्वारा हक्कांची याचना करणें म्हणजे निखालस औचित्यभंग असून प्रसंगाचें महत्त्व आणि कर्तव्य न ओळखण्यासारखें आहे, अशी अँग्लोइंडियनांची टीका सुरू होती. अशा वेळीं पुणेंकरांचें समाधान करण्याला तिऱ्हाईत सल्लागारांची जरूर होती. माधवरावांनीं याकरितां मुंबईहून बाळ मंगेश वागळे, काशिनाथ त्र्यंबक तेलंग वगैरे गृहस्थांना पाचारण केलें होतें. सभेंत हक्कांच्या मागण्यांचें समर्थन तेलंगांनीं केलें. दरबाराच्या आनंदांत प्रजा व सरकार सारखेंच वाटेकरी होते, अर्थात् या सभेंत माधवरावांना हजर रहाण्याला कांहींच प्रत्यवाय नव्हता. सदर मानपत्राला राजकीय महत्त्वाकांक्षेचा जाहीरनामा (Declaration of Rights) अशी संज्ञा दिल्यास अन्यथा होण्याची भीति नाहीं.

१९०३ सालीं कर्झनसाहेबांच्या कारकिर्दीत जो बडा दिल्लीदरबार झाला, त्यावेळीं पुष्कळांना माधवरावांनीं तयार केलेल्या प्रस्तुत मानपत्राचें स्मरण झालें. हिंदुस्थानाच्या राजकीय भवितव्याची रूपरेषा माधवरावांनीं यांत आंखली आहे. विजयप्राप्ति, पुत्रजन्म, एखादें विवाहासारखें मंगलकार्य, इत्यादि प्रसंगीं होणाऱ्या आनंदांत प्रजेला भागीदारी मिळावी म्हणून हिंदुस्थानांतले राजे फार प्राचीन काळापासून अन्नसंतर्पण, कैद्यांची मुक्तता वगैरे गोष्टींचा अवलंब करीत आले आहेत. या परंपरेस अनुसरून नव्या किताबाच्या दरबाराचा सुखसोहळा हिंदी प्रजेच्या स्मरणांत निरंतर रहाण्याकरितां महाराणी सरकारनें तिच्या पदरांत कांहीं देणग्या टाकाव्या असें सुचवून, या मानपत्राच्या सुरुवातीस माधवरावांनीं अँग्लोइंडियनांचा आक्षेप निरर्थक ठरविला आहे. हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धती सुरू करावी अशी

१८७४ सालच्या अर्जास अनुसरून प्रजेच्या वतीनें मानपत्रांत पहिली मागणी आहे. इंग्रज अधिकारी कितीही कर्तव्यनिष्ठ, सदसद्विवेकभीरु असले तरी हिंदी प्रजेच्या अंतरंगाचा ठाव त्यास काढतां येत नाहीं; हिंदी जनतेचें हृद्गत हिंदी माणसाला जसें समजेल आणि व्यक्त करतां येईल तसें तें युरोपियनाला समजणार नाहीं, मग व्यक्त करण्याची गोष्ट दूरच राहिली. यामुळें अनेकवेळां त्यांच्या हातून ' विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम् ' या न्यायाची इच्छा एक आणि कृति भलतीच घडते. पण हा मुद्दा सोडला व इंग्रजी मुत्सद्दयांचीं अभिवचनें आणि इंग्रजी राज्याच्या धोरणाचीं ऐतिहासिक वळणें पाहिल्यासदेखील ' जबाबदार राज्यपद्धतीचा ' उपक्रम हेंच महाराणी सरकारचें कर्तव्य ठरतें, अशी या मानपत्रांत प्रजेच्या महत्त्वाकांक्षेची तरफदारी केली आहे.

/ दुसरी मागणी अवलोकन केल्यास आजच्या ' नरेंद्र–महामंडळा'ची संघटना माधवरावांच्या दृष्टीला चाळीस वर्षें अगोदर निराळ्या रीतीनें दिसली होती, ही गोष्ट लक्षांत येऊन त्यांच्या राजकीय निदिध्यासाचें सविस्मय कौतुक वाटल्याशिवाय रहात नाहीं. मुसलमान बादशाहा जुलमी असतील, अनियंत्रित असतील, पण त्यांना साम्राज्यदृढीकरणाचें एक तत्त्व पक्कें समजलें होतें. त्यांनीं हिंदू राजेरजवाड्यांना विश्वासांत घेऊन त्यांच्यावर राज्यकारभारांतली दुय्यम हिस्सेरशीची जबाबदारी टाकली होती. राजकीय उलाढालींत त्यांची सल्लामसलत घेतली जात असे. मोठमोठाल्या मोहिमांचीं सूत्रें हिंदू राजांच्या हातीं देण्याला मुसलमान बादशाहांना तिळमात्र देखील दिक्कत वाटत नसे. त्यांच्या विश्वासाच्या धोरणामुळें, हिंदू राजेरजवाड्यांमध्यें बेजबाबदार रीतीनें प्रजेच्या हिताशीं फटकून वागण्याचा दोष शिरला नाहीं. आज हिंदी

संस्थानिकांमध्यें कर्तव्याची भावना बिलकूल नाहीं. त्यांच्यांतली वीरवृत्ति विलयास जात चालली आहे. ही परिस्थिति बदलून राणीसरकारानें जास्त उदार धोरण स्वीकारावें, असें माधवरावांनीं मानपत्रांत म्हटलें आहे. राजमहामंडलाच्या माधवरावांनीं केलेल्या विवरणाचें चौकसपणाच्या सूक्ष्मदृष्टीनें परीक्षण केल्यास, त्यांना ही कल्पना पार्लमेंटाच्या घटनेवरून सुचली असावी, असा खुलासा मिळतो. जबाबदार राज्यपद्धतीच्या आखाडयांत त्यांनीं लोकमतास जबाबदार असणाऱ्या कायदेकौन्सिलाची स्थापना ध्वनित केली आहे. लोकप्रतीनिधींच्या कौन्सिलास जोडून राजेरजवाडयांचें मंडळ निर्माण केल्यास, राजेरजवाडे व प्रजा यांच्या राजकीय ध्येयाची भिन्नता निघून जाईल. एकमेकांच्या संघर्षणानें दोघांमध्यें जिव्हाळा उत्पन्न होईल आणि हिंदी संस्थानिकापासून सामान्य प्रजेंतल्या रंकापर्यंत एकाच राजकीय महत्त्वांकांक्षेचे विचार खेळत रहातील. माधवरावांच्या विचाराचें जों जों अधिक मनन करावें तों तों त्याची व्यापकता निदर्शनास येते. हें माधवरावांच्या मानपत्राचें कायदेशीर स्वरूप आहे, पण राजेरजवाडयांना आपल्या कर्तव्याचें ज्ञान होण्याकरितां त्यांस अनुलक्षून मानपत्रांत सुचविलेल्या एकीकरणाच्या धोरणानें, सार्वजनिक काका व गोवंडे यांच्या सहीचें अनावृत पत्र पाठविलें. सदर पत्राच्या प्रती संस्थानिकांकडे रवाना करण्यांत आल्या. दिल्लीस दरबारनिमित्त गेल्यावर काकांनीं अनेक राजांच्या भेटी घेतल्या.

प्रस्तुत मानपत्र सभेच्या पसंतीस उतरून, त्याची सार्वजनिक काकांबरोबर दिल्लीस रवानगी झाली. हिंदी राजकारणाचें निश्चित धोरण कोणत्या तत्त्वांच्या अनुसंधानानें मुक्रर करतां येईल, याचें सोपपत्तिक

ज्ञान होण्याकरितां माधवरावांनीं यावर्षी एप्रिल महिन्यांच्या २४ व्या तारखेस 'India's Political future' या नांवाचें व्याख्यान दिलें होतें. तें व्याख्यान समग्र उपलब्ध नाहीं. त्याचा भावार्थ कोठें कोठें वृत्तपत्रांतून आढळतो; त्यावरून मानपत्रांतल्या मागण्यांचें त्यांनीं विस्तृत व सोदाहरण उद्घाटन केलें असावें, असा तर्क करतां येतो.

आगष्टमहिन्यांत टाउनहॉल कोठें बांधावयाचा अगर त्यासाठीं कोणची इमारत विकत घ्यावयाची याचा विचार करण्यासाठीं एक सभा भरली होती. हुजूर पागेची जागा विकत घेऊन तेथें नगर-भवनाची उभारणी करावी, असें माधवरावांचें मत होतें. या मताला फारसा कोणी विरोध केला नाहीं. परंतु आयत्या वेळीं अनपेक्षित अडचणी उद्भवल्यामुळें, हें मत यशस्वी झालें नाहीं आणि हीराबागेंतल्या इमारतींत टाऊनहॉलाची योजना करावी लागली.

हा वेळपावेतो पुणेंकरांचा काळ स्वास्थ्यांत गेला. पण यापुढचें सुमारें एक वर्ष माधवरावांनीं अतिशय काळजींत व दगदगींत काढलें. पावसाळ्यानें दगा दिल्यामुळें नगर, सोलापूर, पुणें, या जिल्ह्यांत दुष्काळानें आपलें भीषण स्वरूप प्रकट केलें. हिंदुस्थानसरकार यावेळीं दरबाराची व्यवस्था कशी करावयाची या विचारांत तल्लीन होतें. भावी दरबाराच्या आनंदमहोत्सवाचीं सुखस्वप्नें त्यांस पडत होतीं. कल्पनेनें भावी दरबारांतल्या वैभवरंगाबद्दल व्हाइसरॉय लिटनसाहेब अगाऊच मिटक्या मारीत असतां, दक्षिणच्या दुष्काळाचा भयप्रद हाहाकार त्यांच्या कानांत शिरला. मुंबईचे गव्हर्नरसाहेब महाबळेश्वरीं थंड हवेचा उपभोग घेण्यांत नेहमींप्रमाणें दंग असतां, सोलापुरच्या दयाळू कलेक्टरानें* त्यांना

* यांचें नांव ग्रँटसाहेब असें असून, दुष्काळांतल्या कामगिरीबद्दल लोक त्यांना दामाजीपंताचा अवतार म्हणत असत.

तेथें गांठलें व दुर्भिक्षाचें भयचकित करून सोडणारें वर्तमान त्यांच्या कानावर घातलें. गव्हर्नरसाहेबांनीं कलकत्त्यास तार ठोकून पुढच्या कर्तव्यांविषयीं लिटनसाहेबांस सल्ला विचारला. पावसाळ्यानंतर आक्टोबर महिन्यांमध्यें अंतरिक्षांत अभ्रपटलें दिसूं लागल्यामुळें, दुर्भिक्ष टळेल या आशेला पालवी फुटूं लागली. पण या अकालीं प्रकट झालेल्या मेघावडंबराची शुष्कता प्रत्ययास येऊन, पुनः सरकारी अंमलदार चिंतानलांत फेंकले गेले. या दुष्काळाच्या उग्रतेचें वर्णन वाचल्यानेंही आज अंगावर शहारे उभे रहातात, मग ज्यांना त्याचा प्रत्यक्ष अनुभव आला असेल त्यांची अवस्था काय होती, हें एक त्यांचें त्यांना किंवा ईश्वरालाच ठाऊक ! माधवरावांच्या अंतःकरणाला देशबांधवांच्या विपत्तीनें पीळ पडला व सार्वजनिक सभेच्या द्वारें ते आपल्या कर्तव्यानुष्ठानास प्रवृत्त झाले. दक्षिणेंत हजारों माणसें मरणाच्या दारीं बसलीं असतां, दिल्लीला दरबारचा भपका यथास्थित पार पडला.

सार्वजनिक सभा हें एक जीवंत सामर्थ्य आहे, नुसते प्रसंगोपात्त पोकळ ठराव करून स्वस्थ बसणारी कुचकामाची संस्था नाहीं, असें तिच्या दुष्काळांतल्या कामगिरीनें सर्वांच्या निदर्शनास आणून दिलें. त्यावेळीं सभेचे विश्वासू कामदार दुष्काळग्रस्तांच्या वस्तींत गेले. त्यांनीं दुष्काळाची स्थिती प्रत्यक्ष नजरेखालीं घातली. सभेच्या उपयुक्ततेविषयीं महाराष्ट्रांतल्या जनतेमध्यें विश्वास उत्पन्न झाला असल्यामुळें दुष्काळाच्या भागांतले कुळकर्णी, शाळामास्तर, पोष्टमास्तर यासारखी मंडळी स्वयंप्रेरणेनें अथवा सभेच्या प्रेरणेनें अंतःकरण उघडें करून, आपल्या गांवाच्या हलाखीची इत्थंभूत माहिती सभेच्या चिटणिसाकडे पाठवीत असे. सभेच्या कामदारांची निवड करण्याची व त्यांच्या कामाची दिशा ठरविण्याची

जबाबदारी माधवरावांनीं स्वीकारली होती. कामदारांकडून अगर वरील मंडळीकडून माहितीचे कागद आले म्हणजे माधवराव दुष्काळासंबंधीं लेख लिहून सरकारांत पाठवीत. हे लेख सभेच्या चिटणिसाच्या सहीनें सरकाराकडे जात, या गोष्टीचें स्मरण वाचकांना द्यावयास नकोच. सरकारच्या धोरणावर या लेखांतून निर्भीड टीका आहे. सरकारनें योजलेल्या कांहीं गोष्टींची यांत स्तुतीही आहे. सरकारनें स्वस्त धान्याचीं दुकानें काढण्याच्या भानगडींत पडूं नये, असा सभेच्या एका पत्रांत मजकूर आहे. धान्याचा पुरवठा व्यापाऱ्यांच्या चढाओढीनेंच व्हावा; व्यापारीवर्ग कट करून धान्य महाग दरानें विकूं लागल्यास, त्याच्या द्रव्यलोभाला खाजगी लोकांनीं स्वस्त धान्याचीं दुकानें काढून शह द्यावा, सरकारनें फक्त रेल्वेशीं करार करून थोड्या भाड्यांत धान्याच्या नेआणीची व्यवस्था लावावी, असा या बाबतींतला मजकूर आहे. स्वस्त धान्याच्या दुकानदारींत सरकारानें शिरावें अशी, सांपत्तिक घडामोडीच्या नियमांचा गंध नसलेल्या सामान्यजनतेची हाकाटी चालली होती; पण सभेनें माधवरावांच्या सल्ल्यावरून या हाकाटीस प्रोत्साहन दिलें नाहीं.

खालसा मुलखांत खाण्यापिण्याचा बंदोबस्त मनाजोगा लवकर लागेना म्हणून, हजारो माणसें निझामच्या राज्यांत वस्तीस गेलीं. नागपूरचे चीफ कमिशनर या स्थलांतरगमनाला अनुकूल होते. ज्या ठिकाणीं नेहमींच दाणापाण्याची टंचाई तें ठिकाण सोडून, दुसरीकडे लोकांनीं वसाहती कराव्या, ही गोष्ट माधवरावांनाही पसंत होती. दुसरीकडे जाणाऱ्या लोकांना सवलती द्याव्या, अशी त्यांनीं एका अर्जांत शिफारस केली आहे; अशा रीतीनें रास्त दिसेल त्याची प्रशंसा करणाऱ्या सभेला राजद्रोही समजणें, यावेळीं सरकारास शक्यच नव्हतें. म्हणून अनेक

अधिकाऱ्यांनीं सभेच्या कामगिरीची तारीफ केली. राजद्रोहाच्या आरोपाचें ग्रहण सुटण्याचा रंग दिसूं लागला, परंतु एका चमत्कारामुळें पुनः सरकाराला सभेच्या कामाविषयीं संशय आला. दुष्काळीं कामें चालू असतां मजुरांनीं संप केला. हजारों मजुरांच्या जमावानें एकदम पोटाच्या धंद्यावर लाथ मारल्याचें पहातांच सरकार दचकलें. त्याला वाटलें कीं, संपाच्या मुळाशीं कट असावा. एकदम स्वस्थ बसण्याची अक्कल अडाणी मजुरांची नाहीं. त्यांना कोणाची तरी आंतून फूस असावी, या शंकेचें उत्तर सार्वजनिक सभेच्या उद्योगांत आहे; सभेच्या हस्तकांनीं मजुरांना निष्क्रिय प्रतिकाराचा कानमंत्र दिला असावा, असा सरकारानें आपला ग्रह करून घेतला. सभेनें या शंकेचें, संपाचीं खरीं व स्वाभाविक कारणें दाखवून, उद्वेगपूर्वक निराकरण केलें; परंतु दरम्यान गरीब मजुरांना दुहेरी ताप भोगावा लागला. त्यांना ताळ्यावर आणण्यासाठीं अंमलदारांनीं रागाच्या भरांत मारहाण केली. कित्येकांच्या छातींत गुद्दे लगावले. दुष्काळांतल्या उपासमारीनें निस्सत्त्व झालेल्या मजुरांच्या शरीरांना गुद्दे सहन करवले नाहींत. पुष्कळांच्या छातींत कळा येऊं लागल्या. त्यासाठीं डाक्टराकडे जे गेले त्यांना 'कामाला नालायक' असा शेरा मिळून अन्नास मुकावें लागलें. यामुळें सरकारी धोरणाचा तिरस्कार वाटून, लाखावर मजुरांनीं यानंतर दुष्काळी कामाला सोडचिठ्ठी दिली व आपल्या घराचा रस्ता सुधारला. अंमलदारांना त्यांच्या या वर्तणुकीचा अर्थच कळेना. ज्यांच्या घरांत धान्याचा कण देखील सांपडणार नाहीं, अशीं माणसें भराभर निर्वाहाच्या साधनाला लाथाडतात कां, याचा अधिकाऱ्यांना अचंबा वाटला. अन्नावांचून प्राण गेला तरी बेहेत्तर, पण अपमानकारक दुष्काळी काम नको, हा निश्चय दक्षिणच्या मजुरांनीं

कां दाखविला, याचा बोध माधवरावांना झाला होता. स्वराज्याचा उपभोग घेतलेल्या दाक्षिणात्यांच्या अंगीं एक प्रकारचा उपजत स्वाभिमान आहे; त्याच्या रक्षणापेक्षां प्राणाचें मोल त्यांना जास्त वाटत नाहीं, असें माधवरावांनीं एका लेखांत लिहिलें आहे. किडामुंगीपासून तो माणसांपर्यंत सर्व प्राणिमात्रांना सृष्टीवर जगण्याचा माणसांइतकाच हक्क आहे, असें 'आत्मौपम्येन' मानणाऱ्या भूतदयाशील माधवरावांच्या विचारमर्यादेंतून, दुष्काळांत मरणारीं जनावरें सुटलीं नव्हतीं. जितकें माणसांच्या प्राणत्राणाकडे त्यांचें लक्ष होतें, तितकेंच जनावरांच्या जीवरक्षणाकडेही होतें. त्यांच्या लेखांतून गुराढोरांच्या संहाराविषयीं पुष्कळ मजकूर आहे. सरकारनें पदरचा खर्च करून सह्यसातपुडयांतील जंगलांत गुरांना पोचवावें आणि त्यांचा जीव वांचवावा, अशी त्यांच्या एका लेखांत सूचना आहे.

दुष्काळ संपला, लोक आपापल्या मूळच्या निवासस्थानीं निघून गेले, सरकारानेंही दुष्काळी कामाचा पसारा आवरून, त्यासंबंधीं अखेरचे अहवाल लिहिण्याला प्रारंभ केला; परंतु, माधवरावांचें काम शिल्लकच होतें. दुष्काळनिवारणाच्या कार्यांतला एकाग्रतेचा ताण ढिलावून, सरकारचें मन इतर गोष्टींचा विचार करायला मोकळें झालें म्हणजे, दुष्काळासारख्या आपत्तीपासून निघणारें तात्पर्य त्यांस कळविण्याचें कर्तव्य माधवरावांना करावयाचें होतें. १८७७ सालीं त्यांनीं हें कर्तव्य तडीस नेण्याला सुरवात केली. अवर्षणानें पिकें बुडालीं व धान्याचा दुष्काळ पडला, ही सरकारची समजूत त्यांनीं अगोदर खोडून काढली. धान्याचा दुष्काळ नव्हता, संपत्तीचा दुष्काळ होता; कारण, खंडोगणती मुबलक धान्य इतर प्रांतांतून येत असतांही, लोक अन्नाला महागले

होते, असा या दुष्काळांत अनुभव आला. याचें कारण लोकांचें निस्सीम दारिद्य. पाऊस नीट वेळेवर पडला, तर कर्ज काढून शेतकऱ्यांना जेमतेम गुजारा करतां येतो, पण पावसानें फसविलें कीं, शेतांप्रमाणेंच कुणब्यांच्या तोंडाला कोरड पडते व अन्नान्न करीत मरण्याखेरीज दुसरी गति रहात नाहीं. जवळ पैसाअडका असेल तर धान्य विकत घेतां येईल. तो कुणब्यांच्या पुंजींत नसतो, म्हणून त्यांना दुकाळाचा अनर्थ भयंकर रीतीनें जाणवतो. हाडया रोगाप्रमाणें कंगालपणानें शेतकीच्या व्यवहारांत कायमचें बिऱ्हाड केलें आहे. पैशाच्या निस्सीम अभावाचें मूळ सरकारच्या धोरणांत आहे, असें दोषाचें माप माधवरावांनीं आणखी एकवार सरकारच्या पदरांत पुराव्यानिशीं ओतलें आहे. दुष्काळांत मनुष्यहानि विशेष झाली नाहीं, असें जाहीर करून सरकारला स्वतःची पाठ थोपटून घ्यावयाची होती; परंतु, गांवोगांव माणसें परत गेलीं तरी दरगांवांत घरें ओस पडल्याचा देखावा दिसत होता. दुष्काळानिमित्त जेवढीं माणसें गांव सोडून बाहेर पडलीं, तेवढीं माणसें पुनः परत आलीं नाहींत, ही गोष्ट धडधडीत दिसत असतांना मनुष्यहानि झाली नाहीं, असा पुकारा करणें सरकारलाही सोपें नव्हतें. म्हणून त्यांनीं स्थलान्तरवासामुळें माणसांची कमतरता दिसते, असा मनुष्यहानीच्या डागावर सफेता चढविला. माधवरावांनीं हे डावपेंच उघडकीस आणून, सरकारचे सिद्धांत अप्रस्तुत असल्याचें रोखठोक दाखविलें आहे. दुष्काळांत सार्वजनिक सभेनें बजावलेल्या कामगिरीचा इतिहास वाचल्यास अशी निःसंशय कबूली द्यावी लागते कीं, माधवरावांच्या हातांत सार्वजनिक सभेच्या कामाचीं सूत्रें नसतीं, तर तिला उच्छृंखळ वर्तनाबद्दल सरकारांतून जें प्रायश्चित पुढें अठरा वर्षांनीं

मिळालें, तें प्रायश्चित यावेळींच मिळालें असतें. दुष्काळाच्या गडबडींत भांबावलेल्या सरकारी अधिकाऱ्यांनीं सभेकडून येणारे लेख खोडसाळ असतात, असा अभिप्राय व्यक्त केला होता. त्याचा तितक्याच जहाल-पणानें सभेच्या चालकांनीं निषेध केला असता, तर तिच्या कामाला सवड न देतां सरकारच्या चटकांना खुपणाऱ्या या संस्थेचें शल्य उपटून टाकण्याला त्यांनीं एका क्षणाचाही विलंब लावला नसता. परंतु माधवराव लवुतम प्रतिकाराच्या तत्त्वानें चालणारे असल्यामुळें, सरकारी अंमलदार गरम होतांच, स्वतः थंड राहून त्यांची समजूत घालीत. एकदां सभेच्या लेखांतलीं दुष्काळाचीं वर्णनें वस्तुस्थितीस सोडून असतात; गाऱ्हाण्यांचीं कारणें फुगवून लिहिलेलीं असतात, असा आरोप करण्यांत आला. माधवरावांनीं त्यास उत्तर दिलें कीं, सभेचे कामदार अतिशय दक्षतेनें आपली माहिती गोळा करतात, तथापि त्याच्या लिहिण्यांत अत्युक्ति असल्यास, ती खोडसाळपणाची द्योतक न समजतां दुष्काळग्रस्तांच्या मताचें तें आविष्करण आहे, असा तिचा अर्थ करावा. मुद्दा न सोडतां आरोपाची धार बोथट करण्याचें कौशल्य माधवरावांच्या या उत्तरांत दिसतें.

दुष्काळ सुरू झाला तेव्हां, वुडहौस नांवाचे गव्हर्नर मुंबईइलाख्याचा राज्यकारभार पहात होते. त्यांनीं दुष्काळनिवारणाच्या कामावर स्वतः देखरेख ठेवली होती. १८७७ च्या मे महिन्यांत ते विलायतेस गेले व सर रिचर्ड टेंपल यांची त्यांच्या जागीं नेमणूक झाली. दुष्काळामुळेंच त्यांचा व मुंबईइलाख्याचा संबंध आला. दुर्भिक्षनिवारणाच्या कामांत त्यांचा हातखंडा आहे, अशी सरकारची समजूत असल्यानें, त्यांना दुष्काळ कमिशनराचा हुद्दा देऊन, सरकारनें त्यांची दक्षिणेंत रवानगी केली; नंतर

त्यांना इलाखाधिपति होण्याचें भाग्य लाधलें. यांच्या नेमणुकीमुळें माधवरावांच्या चरित्रावर पुष्कळच परिणाम झाला.

या वर्षाच्या मार्च महिन्यांत माधवरावांचे वडील गोविंदराव परलोकवासी झाले. मरणाचे वेळीं ते कोल्हापुरास होते. त्याच्या आजाराची बातमी कळतांच माधवराव रजा घेऊन कोल्हापुरास गेले. पितृभक्त माधवरावांनीं आपल्या जन्मदात्याची किती सेवा केली असेल, हें सांगावयास नको. पण रजा संपून पुनः रजा काढण्यासाठीं त्यांना पुण्याला जाणें प्राप्तच होतें. परत येऊन त्यांनीं रजेचा अर्ज दिला. तो मंजूर होण्याला थोडा अवधि लागला; रजा मंजूर होऊन कोल्हापुराला जाण्याकरितां तयारी केली व आतां निघणार तोंच गोविंदरावांच्या मृत्यूची तार माधवरावांच्या हातांत पडली. त्यांना आतां कोल्हापुरास जाण्याचें कारण नव्हतें, शिवाय जुन्या प्रचारास अनुसरून होणारे विधि त्यांना पाहवले नसतें. दुष्काळाच्या कामांत या काळजीची भर पडली. तिचें शोकजनक पर्यवसान अनुभवतांना माधवरावांच्या मनाला किती दुःख झालें असेल, तें शब्दांनीं वर्णन करतां येणार नाहीं. माधवरावांनीं कोल्हापुरचें बिऱ्हाड मोडून सर्व मंडळी पुण्यास आणली.

यापुढील माहिती देण्यापूर्वीं, माधवरावांच्या राजकीय कामगिरीचें धोरण समजण्याकरितां कांहीं गोष्टी सांगणें आवश्यक आहे. सार्वजनिक सभेच्या स्थापनेमध्यें दक्षिणचे संस्थानिक व स्वतंत्र सरदार, इनामदार यांचा हात होता. लोकोद्धाराच्या चळवळींत त्यावेळीं संस्थानिकांना पडतां येत असे. या स्थितीचा फायदा घेऊन, राजकारणाच्या उलाढालींत संस्थानिकांना गुरफटून टाकावें, असें माधवरावांनीं ठरविलें होतें. एखादा संस्थानिक गादीवर बसला कीं, तेथें सार्वजनिक सभेचें उपदेश-

पर मानपत्र घेऊन जाणारें शिष्टमंडळ बिनचूक हजर रहात असे; मग तो संस्थानिक महाराष्ट्रीय असो अगर दुसऱ्या प्रांताचा व जातीचा असो. सार्वजनिक सभेच्या घटनेंत प्रातिनिधिक स्वरूपाचें तत्त्व माधवरावांनींच घातलें. सरकार, संस्थानिक, वतनदार आणि सामान्य रयत यांना एका राजकीय साध्याच्या सूत्रानें एकत्र बांधून टाकण्याचा माधवरावांचा विचार पाहिला, म्हणजे त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच वाटते. या दिवसांत त्यांनीं संस्थानांतून औद्योगिक चळवळी उत्पन्न करण्याचा उद्योग चालविला होता, असा पुरावा आढळतो. दिल्लीदरबार आटोपल्यावर सार्वजनिक काका सर्व देशभर फिरले. इंदुरास गेल्यानंतर त्यांनीं तेथें गिरणी काढण्याची वाटाघट सुरू केली. तुकोजीराव होळकरांना व्यापारांत भाग घेण्याची मोठी हौस होती. त्यांचें व सार्वजनिक काकांचें या बाबतींत सूत जमलें व त्यांनीं गिरणीसंबंधीं सल्लामसलतीचा पत्रव्यवहार दिवाणांच्या मध्यस्थीनें माधवरावांकडे सुरू केला. त्यांतलीं एकदोन पत्रें माधवरावांच्या दप्तरांत आढळलीं. माधवरावांकडून काय उत्तरें गेलीं, हें समजण्याला साधन नाहीं. पण पुढें कांहीं वर्षांनीं त्यांनीं संस्थानिकवर्ग औद्योगिक पुनरुज्जीवनाला कसा उपयोगी पडेल, याविषयीं एक भाषण केलें आहे. तें भाषण चरित्राच्या कालानुरोधानें वाचकांना पहावयास सांपडेल.

पुण्यास सहावर्षांत माधवरावांनीं सार्वजनिक जीवनक्रमांत जी क्रांति घडवून आणली तिचें दर्शन सरकाराला आतां असह्य भासूं लागलें होतें. स्वदेशी व्यापाराला उत्तेजन देणारीं दुकानें निघालीं; परदेशी मालाचा खप कमी करण्याचा विचार लोकांत तीव्रतेनें दिसूं लागला, सार्वजनिक

सभेच्या हालचालीनें सारें महाराष्ट्र हालविलें; इतकेंच नव्हे, तर इतर प्रांतांना ती मार्गदर्शक होऊन तिचा कित्ता सर्वत्र गिरवला जाऊं लागला; राजकारणाच्या विचारांचें नियमन व प्रसरण तिच्यामार्फत होऊं लागलें; प्रार्थनासमाजाच्या द्वारें धर्माच्या शुद्धीकरणाचें कार्य सुरू झालें; वाचनालयांचा उपयोग करण्याची अभिरुचि वाढली; विद्वानांना एकत्र बोलावून नानाविध विषयांचा व्याख्यानांच्या रूपानें ऊहापोह व विचारविनिमय होऊं लागला; होतकरू मंडळींना आपलें ज्ञान आणि वक्तृत्व दाखविण्याला वक्तृत्वोत्तेजक सभेचें साधन होतेंच; याशिवाय, कलाकौशल्यांचा जीर्णोद्धार करण्यासाठीं मंडळ्या निघाल्या, कायिक बळ वाढविणारे अखाडे उघडण्यांत आले, सुशिक्षितांमध्यें तालमीचा नाद बळावत चालला. सारांश माधवरावांच्या साक्षात् प्रेरणेनें, संबंधानें व कांहीं अनुकरणेच्छेनें अशीं नानाप्रकारचीं कार्यें शहरभर झळकूं लागलीं. अप्रिय चळवळींचा प्रतिकार करण्यासाठीं तशा स्वरूपाच्या संस्था निघाल्या. संसाराचा गाडा कसाबसा हाकीत आयुष्य व्यर्थ दवडण्याऐवजी संसाराच्या नियमित व्यवहाराला पुरून उरणारी मनाची, शरीराची व बुद्धीची शक्ति लोकोपयोगास अर्पण करण्याच्या भावनेचें साम्राज्य सुरू झाल्यामुळें, पुण्याला सजीवता आली. आपण जन्मास येऊन संसाराचें ओझें वाहतां वाहतां एखाद्या दिवशीं मरावें हें आपलें ध्येय नसून, अंगांत धमक असल्यास कालाच्या वाळवंटांत आपल्या कर्तबगारीच्या चिरस्थायी खुणा ठेवण्याचा मार्ग प्रत्येकाला मोकळा आहे; स्त्रीपुत्रादि आप्तपरिवारांचें पालनपोषण हें इतिकर्तव्य नसून, खरीं कर्तव्यें निराळींच आहेत, अशी माधवरावांच्या सहवासानें पुणेंकरास जाणीव झाली. पुण्याच्या कर्तृत्वाला पाणी चढलें. कर्तव्यबोधाच्या संस्थारूप ज्योति जागजागीं

पेटून लोकांची ध्येयदृष्टि निर्मळ झाली व तिच्यांत निश्चयाचें तेज चमकूं लागलें.) नवजीवनाच्या चैतन्यप्राप्तीनें माधवरावांच्या सहवासापूर्वीच्या, स्मशानशून्य निराशामय ओसाडींत फलाशेच्या टवटवीनें तेजःपुंज दिसणाऱ्या भरीव कार्याचा लखलखाट दिसूं लागला. एकाकित्वांत आनंद मानणारीं माणसें निरनिराळ्या ध्येयांच्या आवडीनें एकवटून, संघसामर्थ्याचा जोम प्रत्येक कार्यांत प्रकट होत चालला. माणसाला आपल्या कर्तबगारीची ओळख पटली म्हणजे त्याच्या वागणुकींत एकप्रकारचा आत्मविश्वासमूलक कणखरपणा उत्पन्न होत असतो. तसा कणखरपणा पुणेंकरांच्या व्यवहारांत अनुभवास येऊं लागला. सरकारला हें पुण्याचें स्थित्यंतर खपेना. त्यांनीं या स्थित्यंतराला अंकुरावस्थेंतच खुडून काढण्याचा इरादा केला. रोग व शत्रु यांचा प्रथमावस्थेंतच नायनाट उडवावा, हीं राजनीतींतलीं सुभाषितें सरकारास अवगत होतीं. पुण्यांतील चळवळीच्या डोक्यावर टोला मारून तिला निपचीत पाडण्याकरितां सरकारांत मसलती सुरू झाल्या. शेवटीं सबॉर्डिनेट जज्जांनीं पांच वर्षांपेक्षां जास्त दिवस एका जागीं रहाणें इष्ट नाहीं, अशी शक्कल निघाली व तिचा प्रयोग माधवरावांवर करण्यांत आला. चळवळींच्या कारस्थानाचे सूत्रधार माधवराव असल्यानें त्यांना उडवून लावतांच, मस्तकशून्य कबंधासारखी चळवळीची स्थिति होईल, या सरकारी कल्पनेचें, माधवरावांवरील सत्तीच्या स्थलान्तराचा प्रसंग, हें फळ होय. १८७७ च्या अखेरीस माधवरावांची नाशकास बदली केल्याचा हुकूम सुटला. सर रिचर्ड टेंपल यांच्या खडतर आमदानींचें हें पहिलें चिन्ह पुणेकरांच्या दृष्टीस पडलें. पुणेंकरांना कांहीं काळ वाटलें कीं, आपल्या विकासोन्मुख कर्तबगारीला बाल्यावस्थेंतच गिळून

नामशेष करण्याकरितां मुंबई इलाख्याच्या अधिपतीच्या रूपानें एव दानवावतारच प्रकट झाला आहे. सर रिचर्ड टेंपल हे एक हिंदुस्थानच्य युरोपियन अधिकारीवर्गांतले जुनाट मुरब्बी खोड होते. वारा वाहील तशी पाठ देण्याची त्यांना संवय होती. लार्ड नार्थब्रूक व्हाइसराय असतांना, त्यांच्या औदार्यास अनुसरून टेंपलसाहेबांनीं बंगालच्या दुष्काळाच्या प्रसंगीं अशी पैशाची उधळपट्टी केली कीं, त्याबद्दल त्यांचं स्तुतिस्तोत्रें गातां गातां बंगाली लोकांच्या लेखण्या व जिभा शिणल्या लिटन साहेबांच्या अनुदार धोरणाखालीं त्यांनीं १८७६-७७ च्या दुष्काळांत माणशीं अच्छेर अन्नाचें प्रमाण ठरवून, त्याच्या हिशोबाचें समर्थन केलें. त्या योगानें. 'अच्छेराचा रतीबवाला' या टोपण नावानें त्यांना सर्वत्र ओळखूं लागले. हिंदी लोक लोकाच्या आकांक्षाबद्दल यांना सहानुभूति वाटे, पण त्या आकांक्षामागलें स्वावलंबन त्यांना आवडत नसे. म्हणूनच त्यांनीं पुणेकराकडे वक्रदृष्टीनें पाहून, माधवरावांची बदली केली. माधवराव १८७८ च्या जानेवारींत नाशकास गेले. जातेवेळीं पुणेकरांनीं त्यांस दुःखित अंतःकरणानें निरोप दिला. परंतु माधवराव रजा घेऊन फेब्रुवारीच्या सुरुवातीस पुण्याला आले. त्यांची प्रकृति कामाच्या परिश्रमानें खालावली होती. शिवाय त्यांना घरांतली व्यवस्था लावावयाची होती. रजेची विश्रांति मिळतांच प्रकृति एकदम खचली. इतकीं कीं, ते विषमज्वराच्या प्रादुर्भावानें अंथरुणास खिळले. माधवराव या दुखण्यांतून खास उठत नाहींत. असें सर्वांना वाटलें. हा दैदीप्यमान् तारा अस्तंगत होतो कीं काय, या धास्तीनें सारें पुणेंशहर काळवंडलें.

# प्रकरण नववें.

## स्वभाव-परिचय.

येथवर वर्णन केलेल्या माधवरावांच्या चरित्रांत त्यांच्या हातून घडणाऱ्या कृत्यांपैकीं पुष्कळशीं कृत्यें सर्वसामान्य लोकांना आवडत नव्हतीं व कित्येकदां जनतेकडून होणाऱ्या प्रतिकाराचे तीव्र आघात त्यांना सोसावे लागले, वगैरे माहिती वाचकांना समजली आहे. दयानंदांच्या प्रकरणाचें वेळीं लोक फार खवळले होते, व त्यांनीं माधवरावांसारख्या थोर गृहस्थाचीही भीड मुर्वत बाळगली नाहीं; मग त्या प्रकरणानंतर अडीच वर्षांनीं माधवरावांचें दुखणें विकोपास गेल्याचें कळतांच पुणें शहरांत म्लानता कां दिसावी, याचा उलगडा होण्याकरितां माधवरावांच्या स्वभावाचा परिचय करून देणें आवश्यक आहे. माधवरावांचीं सामाजिक व धार्मिक मतें बहुजनसमाजाला पसंत नसलीं, तरी त्यांची इतर कार्यांत मिळणारी मदत इतकी होती कीं, सामाजिक व धार्मिक बाबतींतल्या विरोधाचा या प्रसंगीं लोकांत अगदीं विसर पडला आणि 'परमेश्वर या श्रेष्ठ पुरुषाला दीर्घायुष्य देवो' ही एकच भावना प्रत्येक समंजस पुणेंकराच्या हृदयांत संचरली. ज्ञानचक्षुपत्रांचे एका काळचे संपादक कै. वामन बाळकृष्ण रानडे

यांनीं १८९३ सालीं लिहिलेल्या माधवरावांच्या चरित्रांत सदर दुखण्याच्या वृत्तांतांत या प्रसंगीं पुण्यांतील आबालवृद्धांचे थवेच्या थवे माधवरावांच्या घरीं त्यांच्या समाचाराकरितां दरदिवशीं जात असत अशी माहिती दिलेली आहे. जेव्हां त्यांच्या जीविताविषयीं निराशा होऊं लागली, तेव्हां लोकांनीं आपापल्या उपास्य दैवतांना संकटांत घातलें. कित्येकांनीं देवळांतून रोगपरिहारार्थ अनुष्ठानें सुरू केलीं; आपली कामना पूर्ण होण्याकरितां देवाला भीड घालण्याचे जितके प्रकार आहेत, तितके सर्व लोकांनीं अंमलांत आणले. डा. विश्राम रामजी घोले या प्रसंगीं त्यांच्या रोगावर इलाज करीत होते; तथापि दोन दिवस इतके कठिण गेले कीं, माधवरावांचा इहलोकींचा ग्रंथ आटपत आला, असें वाटून पुणेंशहरावर भावी संकटाच्या शोकाची छाया पसरली. कोणाचाही जीव थाऱ्यावर नव्हता. एकटे माधवराव मात्र शांत होते. त्यांचें मानसिक अवधान शाबूत होतें. रोगाशीं झगडण्याचें काम शरिराकडे व त्यास उत्तेजन देणाऱ्या औषधोपचाराकडे सोंपवून, त्यांनीं आपलें चित्त परमेश्वराच्या चिंतनांत गुंतवून टाकलें होतें. त्यांनीं एका शुचिर्भूत ब्राह्मणाला शेजारीं बसवून, विष्णुसहस्त्रनामाचा पाठ सतत चालू ठेवला होता. या स्तोत्रांत ईश्वराचें स्वरूप नानापरीनें व्यक्त करणारीं हजार नांवें आहेत. त्या नांवांनीं ध्वनित होणारें ईश्वराचें स्वरूप व कार्य या जीवितनिराशेच्या वेळीं कानावर पडण्याची माधवरावांनीं व्यवस्था केली. अखेरीस रोगाचा जोर कमी कमी होत जाऊन, माधवरावांची प्रकृति पूर्णपणें सुधारली. त्यांच्या स्नेह्यासोबत्यांना जेव्हां दुखण्याची चिंताजनक वार्ता कळली, तेव्हां ते परगांवाहून भराभर पुण्यास धावत आले. गुजराथेंत ही बातमी पसरली, त्यावेळीं अनेक

गृहस्थांनीं आपापल्या शहरीं आरोग्यचिंतनपर जाहीर ईश्वरप्रार्थना केल्या व तसें सर्वत्र होण्याबद्दल वृत्तपत्रांतून लोकांस सुचविलें. माधवराव रोगाच्या तावडींतून सुटून हिंडूं फिरूं लागल्यावर सर्वांना आनंद झाला, हें सांगावयास नकोच.

हा परिणाम कशाचा? कुटुंबांतल्या पोषिंद्या व कर्त्या माणसावर रोगाची झडप पडल्यास त्या कुटुंबांतली मंडळी ज्याप्रमाणें चिंताकुल होतात, त्याप्रमाणें माधवरावांसारख्या एका व्यक्तीच्या दुखण्यानें एका प्रांताला चिंता जडण्यांचें कारण काय? वास्तविक विधवाविवाहाचा पुरस्कर्ता, जातिभेदाचा शत्रु, मूर्तिपूजेचा निंदक, असा अप्रिय मनुष्य आजारी पडून मरणपंथास लागण्याचीं चिन्हें दिसल्यावर, पेढे वाटण्याचे सोडून लोक त्यांच्या आरोग्यासाठीं ईश्वरोपासना व अनुष्ठानें करण्यांत कां दंग झाले? याचें कारण एकच आहे व तें हें कीं, माधवरावांची परोपकार-परायणता सर्वव्यापी होती. हा एक असामान्य व लोकोत्तर पुरुष आहे. याच्या अस्तित्वानें समाजाचा व देशाचा दर्जा वाढला आहे, परमेश्वर त्याला दीर्घायुष्य देईल तर त्याच्या हातून देशाचें व जनतेचें अधिक कल्याण होईल, अशी लोकांना जाणीव होती व म्हणूनच भेदभाव विसरून ते या दुखण्यांत त्यांचें अभिष्ट चिंतूं लागले. माधवरावांचें वय यावेळीं अवघें छत्तीस वर्षांचें होतें. विद्यार्थीदशा सुटून जगाच्या व्यवहारांत ते शिरल्याला नुसतीं बाराच वर्षें लोटलीं होतीं. मोठ्या वजनदार हुद्दयाच्या नोकरींत फक्त सहा सात वर्षें गेलीं होतीं, लोकसेवेंतलें त्यांचें कर्तृत्व उदयास आल्याला पुरीं चार वर्षेंही झालीं नसतील, पण माधवरावांनीं या लहानशा मुदतींत आपल्या चारित्र्याची लोकांवर छाप बसवून त्यांचें प्रेम आकर्षण करून घेतलें, यांत

संशय नाहीं. या दुखण्यांत लोकांची निस्सीम भक्ति निदर्शनास आली. माधवराव लहानापासून थोरापर्यंत सर्वांना हवेहवेसे वाटत. त्यांच्यापेक्षां वयानें मोठीं असलेलीं हुद्देदार माणसेंदेखील माधवरावांच्या उज्ज्वल चारित्र्यामुळें त्यांच्यासमोर दिपून जात व त्यांच्या शब्दास मान देत. त्यांच्या शत्रूंनाही त्यांच्याबद्दल आदर वाटत असे. हा सर्व शुद्ध चारित्र्याचा परिणाम असल्यानें, त्याचें दर्शन घेणें या स्थळीं प्राप्त आहे. अपमृत्यु टळल्यामुळें त्यांचा पुनर्जन्म झाला, यासाठीं पुढील चरित्रावलोकन करण्यापूर्वी मागल्या चरित्राचें गुणावलोकन करणें प्रशस्त ठरतें.

चारित्र्याकडे वळण्यापूर्वी त्यांच्या बाह्य स्वरूपाचा परिचय करून घेणें अवश्य आहे. अगदीं लहानपणीं त्यांना पाहिल्यास काय वाटत असे, याची अटकळ पहिल्या प्रकरणांतल्या कांहीं गोष्टीवरून वाचकांना झालीच असेल. त्यांच्या चेहऱ्याची ठेवण एकदम मनांत भरण्याजोगी नव्हती; पण एकंदर शरीरयष्टि धिप्पाड व त्यांतल्या त्यांत डोकें फारच विशाल असल्यानें, पहाणाराच्या वृत्ति स्तिमित झाल्याशिवाय रहात नसत. धिप्पाड शरीराला व भव्य मुखश्रीला वर्णाच्या गौरत्वाची जोड मिळाल्यामुळें, त्यांच्या दर्शनाची परिणामकारकता वाढली होती. त्यांच्या चेहऱ्याच्या मानानें नाक योग्य प्रमाणांत नव्हतें, असें मलबारींनीं वर्णन केलें आहे. भालप्रदेशाच्या विस्ताराखालीं त्यांचें लहानसें नाक पाहून, मस्तकाच्या रचनेंत सगळें साहित्य संपल्यानें, उरलेल्या थोडयाशा साहित्यावर ब्रह्मदेवानें नाकाचें काम भागवून घेतलें असावें, असा मलबारींनीं विनोदपर तर्क आपल्या वर्णनांत दिला आहे. कॉलेजांत अभ्यास करतांना मूळच्या व्यंगांत आणखी एक भर पडली. त्यांचे डोळे बिघडल्याचें वाचकांस माहीत आहेच. वाचनातिरेकामुळें त्यांचा उजवा डोळा जवळ-

जवळ निकामीच बनला होता. डावा डोळा सबंध शाबूत नव्हता, पण त्याची बरीच शक्ती अखेरपर्यंत शिल्लक होती. महापुरुषांच्या चरित्रांतून बहुधा त्यांच्या डोळ्यांची अंतर्भेदी व मर्मग्राही तेजस्विता वर्णिलेली असते. माधवरावांनीं नेत्रांकडून विद्यार्थीदशेंत अतिशय काम घेतल्यामुळें, त्यांच्या दृक्‌शक्तीचा प्रभाव सांगण्याला विशेष साधन राहिलें नाहीं. तथापि कै. सर नारायण गणेश चंदावरकर यांनीं डाव्या डोळ्याच्या प्रतापाची माहिती आपल्या भाषणांत टिपून ठेवली आहे. ते म्हणतातः—

The little that was left him of his left eye saw more than we with two eyes could see - it could pierce into the depths of another man's soul and search and find.

माधवरावांचा एक डोळा तर गेलाच होता, दुसरा देखील बराच कमजोर झाला होता; पण त्यांत जें कांहीं उरलें होतें, तेवढें आमच्या दोन डोळ्यांहून बलवत्तर होतें. परांतरंगाच्या विवरांत भेदकपणानें खोल खोल शिरून त्याचा ठाव काढण्याचें कार्य माधवरावांच्या एका डोळ्यांतल्या अवशिष्ट शक्तीला साधत असे, असा सर नारायणरावांच्या वरील वाक्याचा भावार्थ आहे. चर्मचक्षूंची अशी दशा उडाल्यामुळें माधवराव प्रज्ञाचक्षु बनले होते, असें म्हणावयास हरकत नाहीं. कधीं कधीं त्यांचें स्नेही त्यांना 'एकडोळ्या (one-eyed)' या संज्ञेनें संबोधीत, तेव्हां 'एकडोळ्या पुरवला, पण एकाच कल्पनेंत रमणारा एककल्ली (one-ideaed) वाईट,' असा ते जबाब देत असल्याची एक आख्यायिका आहे,

नैसर्गिक शरीररचनेच्या खालोखाल माणसाच्या पोषाखाचा प्रेक्षकाच्या चित्तावर इष्टानिष्ट परिणाम घडतो. 'एक नूर आदमी, और

दसनूर कपडा' या म्हणीप्रमाणें पोशाखाचा भपका व नीटनेटकेपणा माणसाला वश करतो किंवा दूर लोटतो. माधवरावांचा पोषाख अगदीं साधा असे. त्यांत नवीन मन्वंतराचा थाट बिल्कूल नव्हता आणि लोकांना अचंबा वाटून आदर उत्पन्न करणारी ही गोष्ट होती. विचाराचा नवेपणा त्यांच्या पोषाखांत न दिसल्यानें, लोकांना आश्चर्य वाटणें स्वाभाविक आहे. अंतरंगाचा इष्ट दिशेनें पालट झाला पाहिजे, बाह्य स्वरूपाच्या फेरफेरांत खरी सुधारणा नाहीं, असा त्यांनीं अनेकदां उपदेश केला आहे. हा उपदेश त्यांनीं आपल्या वर्तनांत उतरविला होता, याचें, त्यांच्या पोषाखांतला साधेपणा, हें एक प्रत्यंतर आहे. कॉलेजांत होते तेव्हांपासून त्यांच्या पोषाखाची साधी पद्धत होती. १८७० सालच्या शंकराचार्यापुढील वादप्रसंगीं माधवरावांना कै. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं प्रथम पाहिलें. त्यावेळच्या त्यांच्या पोषाखाचें महाजनींनीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे.*

त्यावेळीं ते अगदीं तरुण होते. अंगानें सडपातळच; अंगांत जुन्या तऱ्हेचा पेलेदार अंगरखा; धोतर साधें; उपरणें रेशीमकांठीं; पागोटे चक्रीदार गुलाबी; चेहेरा भारदस्त, पण हंसतमुख.

कॉलेजांत त्यांचें, अन्न किंवा पोषाख या गोष्टींकडे, फारसें लक्ष नव्हतें; त्यांच्या संवयी इतक्या साधेपणाच्या होत्या कीं, त्या एखाद्या संसारनिवृत्त साधु पुरुषालाच शोभतील, असें सर दीनशा वाच्छा यांनीं लिहिलें आहे. अध्यापकाच्या जागेवरून न्यायाधीशाच्या जास्त मानाच्या, वजनाच्या व पगाराच्या स्थानावर त्यांनीं आरोहण केलें, म्हणून त्यांच्या वृत्तींत अंतर पडलें नाहीं. समृद्धीनें सत्पुरुषांच्या स्वभावांत विनय प्रबळ

* विविधज्ञानविस्तार; पुस्तक ४५, अंक २. पृ. ४२.

होतो, अशा अर्थाचें एक संस्कृत सुभाषित आहे. त्याचा प्रत्यय माधवरावांना पहातांक्षणीं येत असे.

माधवरावांनीं भिन्नभिन्न विचाराचीं कर्तीं माणसें आपल्या कार्यक्षेत्रांत ओढून घेतलीं. याचें कारण त्यांच्या स्वभावांतले कित्येक गुण होत. माधवराव स्वतः अतिशय उच्च तात्विक वातावरणामध्यें संचार करीत असत. हिमालयाच्या शिखराला ज्याप्रमाणें मेघमंडलाची, त्याच्या गडगडाटाची आणि छायेची बाधा होत नाहीं त्याप्रमाणें अशुद्ध विकारांच्या खळबळीचा व मलिनतेचा स्पर्श माधवरावांच्या उन्नत स्वभावाला कधींच होत नसे. भगवद्गीतेंतील स्थितप्रज्ञाचीं बरींच लक्षणें त्यांच्या अंगीं वसत होतीं. त्यांच्या तोंडावर एखाद्यानें शिव्या हासडल्या, तरी त्यांच्या शांतिगंभीर वृत्तीचा भंग होत नसे. तुकाराम महाराजांनीं सांगितल्याप्रमाणें 'मानापमानाचें गोवें' त्यांनीं 'गुंडाळून' ठेवलें होतें. एका मोळीवालीनें नकळत त्यांच्या डोक्यावरली पगडी पाडली, तेव्हां त्यांना राग आला नाहीं, उलट पोलिस शिपायानें त्या बाईस अडकविलें असतां, त्यांनीं परत जाऊन तिची सुटका केली. दुसऱ्या प्रसंगीं एका भारेवाल्या बाईनें त्यांना आपलें ओझें उचलून देण्याविषयीं विनविलें. माधवरावांनीं तिचा शब्द खालीं पडू दिला नाहीं, उलट तिचें ओझें उचलण्याला मदत केली. त्यांच्या वृत्तींतल्या निरहंकाराचीं उदाहरणें पहातांना त्यांच्या थोरवीबद्दल कोणाच्या हृदयांत आदराची भावना उचंबळणार नाहीं ! ओझें उचलावयास मदत करणें किंवा पगडी पडली असतां न रागावणें या साध्या गोष्टी आहेत. माधवरावांची प्रेतें वाहून नेण्यालाही तयारी असे व एक दोनदां त्यांनीं पुण्यास मनुष्यबळाच्या अभावीं तासाचे तास

घरांत पडून राहिलेल्या प्रेताला वाहून नेण्याचीं कामें केल्याबद्दलच्या आख्यायिका प्रसिद्ध आहेत. परोपकाराच्या कामाची—मग तें कोणत्याही स्वरूपाचें असो—हाक ऐकूं आली कीं, त्याला सक्रिय ओ देण्यास माधवरावांकडून केव्हांही एका क्षणाचासुद्धां विलंब लागत नसे; असे त्यांचे स्वभावधर्म अनुभवल्यामुळें, पुणेंकरांचीच नव्हे, तर त्यांचा सहवास घडलेल्या परप्रांतस्थांचीही त्यांच्यावर भक्ति बसली.

लोकहिताच्या कार्यांमध्यें अग्रेसरत्व पत्करणाऱ्या व्यक्तीला अनंत दुस्सह यातना भोगाव्या लागतात. त्या यातनांच्या असह्यत्वामुळें जर ती गडबडली किंवा कचरली तर तिच्या हातून नियोजित कार्य आस्थेनें घडेनासें होतें. माधवरावांना पुण्यांतील वास्तव्याच्या पहिल्या पांच वर्षांत यातनांचा पुष्कळ मार सहन करावा लागला. अविश्वास, निंदा, उपेक्षा, अवहेलना, निराशा, फंदफितूरी, हे यातनांचे प्रकार आहेत. अनेकदां त्यांच्याविषयीं शत्रुमित्रांचा सारखाच गैरसमज होऊन, त्यांच्यावर जळजळीत टीकेची आग पाखडली गेली. सामान्य धैर्याच्या माणसाचें कर्तृत्व या टीकानलांत जळून खाक झालें असतें; बरें, माधवराव टीकेच्या बाबतींत पूर्ण बहिरे होते अथवा त्यांचें काळीज टीकेंतील तीक्ष्ण विधानें न झोंबण्याइतकें कठोर होतें, अशांतला भाग नव्हता. त्यांना टीकेचीं शल्यें बोंचत असत, पण आत्मसंयमनाच्या गुणाला अधिक बळकटी आणून क्षमाशीलता वाढविण्याकडे ते टीकांचा उपयोग करून घेत, अशी त्यांस दीर्घकालीन सहवासानें ओळखणाऱ्या अनेक गृहस्थांनीं वेळोवेळीं साक्ष दिलेली आहे. या संबंधांतलीं एक दोन उदाहरणें वाचकांना मागल्या विवेचनांत सादर केलेलीं आहेत. प्रतिकूल टीकालेख वाचण्याची व ऐकण्याची त्यांना फार आवड

होती. कोणी त्यांच्यासमोर स्तुतिपर लेख वाचूं लागला कीं, 'हें काव्य ऐकण्याची गरज नाहीं. प्रतिकूल टीकेचा एखादा लेख असल्यास वाचा,' असें ते सांगत. एकादे वेळीं प्रतिकूल टीकेंत आपल्याला न सुचलेला किंवा समजलेला मुद्दा सांपडेल व आपली समजूत सुधारतां येईल, असाही, तशा स्वरूपाचे लेख वाचण्यांत अगर वाचवून घेण्यांत, त्यांचा हेतु असे. एखादा गृहस्थ समक्ष येऊन माधवरावांस न पटणारी किंवा चुकीची वाटणारी गोष्ट दुराग्रहपूर्वक प्रतिपादन करूं लागला म्हणजे न रागावतां, माधवराव त्याला 'तुम्ही चुकतां आहांत, कांहीं दिवसांनीं तुमची चूक तुमच्या लक्षांत येईल व मग माझें म्हणणें तुम्हांस उमजेल' असें अत्यंत मृदु शब्दांनीं सांगून, वाटेस लावीत.

पोशाखांत व सामाजिक व्यवहारांत जसा त्यांचा साधेपणा प्रकट होत असे, तसाच त्यांच्या घरच्या रहाणींतही तो प्रत्ययास येत असे. त्यांच्या घरांत 'पौरस्त्य' पद्धतीला रजा मिळालेली नव्हती. एवढा मोटा पगारदार अधिकारी म्हणून त्याच्या घरांत खुर्च्याटेबलांची झकपक दृष्टीस पडल्याशिवाय रहाणार नाहीं, अशा खात्रीनें जर कोणी त्यांच्या घरांत गेला तर आपला ठाम समज खोटा ठरल्याचें पाहून, त्यास आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नसे. बसण्याच्या जागेंत लटकणाऱ्या झोपाळ्यावर माधवराव हटकून आढळायचें. त्यांच्याकडे जाण्याला कधींही कोणास मज्जाव नव्हता. त्यांच्या भेटीचा आमदरबार सर्वदां सगळ्यांना खुला होता. एका गृहस्थानें त्यांच्या घरांतल्या व्यवस्थेचें जें वर्णन केलें आहे, तें त्यांच्या साधेपणाबद्दल संशयच राहूं देत नाहीं. तो म्हणतो:—

ते पुण्यास असतांना एकदां मी त्यास भेटण्याकरितां गेलों होतों, त्यावेळीं ते आपल्या घरांत एका चटईवर मांडी घालून व त्या मांडीवर कांहीं कागद ठेवून बोरूच्या लेखणीनें इंग्रजी लिहीत होते. अलिकडच्या इंग्रजी विद्वानांप्रमाणें टेबल, खुर्ची किंवा इंग्लिश पेनेची आवश्यकता त्यांस मुळींच दिसली नाहीं. 'अशा प्रकारें मांडीवर कागद घेऊन देशी बोरूनें इंग्रजी लिहिण्यास तुम्हांस अडचण वाटत नाहीं काय ?' असा त्यांस मी प्रश्न केला. त्यावेळीं 'मला असल्या गोष्टींची संवय आहे व त्याकरितां माझें कधीं अडत नाहीं' असा त्यांनीं मला जबाब दिला.*

या बाबतींत मलबारींनीं लिहिलेली आठवण देखील नमूद करण्या-सारखी आहे. मलबारींची व माधवरावांची १८७७ सालीं सर रिचर्ड टेंपल गव्हर्नर झाल्यानंतर पुण्यास ओळख झाली. ओळखीनंतर माधव-रावांना भेटण्याकरितां मलबारी त्यांच्या घरीं गेले. त्यांची अटकळ होती कीं, माधवरावांच्या घरांत युरोपियन रहाणींतलें प्रतिबिंब दिसेल. ज्याच्या उदार, व्यापक, आणि उन्नत विचारांतला रसास्वाद घेतांना आपला नव्या सृष्टींत प्रवेश झाला आहे, असें वाचकांना वाटे, त्या माणसाची रहाणी एखाद्या इंग्रजी विद्येचा गंध नसलेल्या जुन्या मताच्या माणसाप्रमाणें असेल, अशी शंका येण्याचें मलबारींना कारण नव्हतें. त्यांना मुंबईचे दक्षिणी पुढारी ठाऊक होते. इंग्रजी शिक्षणा-मुळें मुंबईच्या दक्षिणी पुढाऱ्यांच्या रहाणीमध्यें व्यक्तीशः जी रीत आली होती, तीच, माधवराव त्यांचे स्नेही असल्यामुळें, त्यांच्या रहाणी-मध्यें आढळून येईल, अशी मलबारींची समजूत होती, पण माधव-

* १९०१ सालीं बडोद्यास दुखवट्याच्या सभेमध्यें रा. ब. हरगोविंददास यांनीं केलेलें भाषण. सयाजीविजय ता. २६ जानेवारी १९०१.

रावांची घरगुती व्यवस्था प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिल्यावर ही समजूत मिथ्या ठरली. ते म्हणतातः—*

माधवराव घरांत भुईवर बसून लहानशा बैठ्या मेजावर आपलें लिहिण्याचें काम करीत. मधून मधून त्यांना जाया झालेले डोळे ताणून पहावे लागे. नाक शिंकरण्याचें व धोतरानें तोंड पुसण्याचें काम अशा वेळीं सुरूच असे. एखाद्या महत्त्वाच्या कागदाचें वाचन किंवा तितक्याच महत्त्वाच्या इन्साफाचें लेखन चालू असतां, माधवराव बहुधा तुकारामाचा अभंग मनाशीं गुणगुणायचें किंवा जवळपास नागव्या उघड्या अवस्थेंत उड्या मारीत खेळणाऱ्या मुलाची थट्टा-मस्करी करायचे.

घरीं जाऊन भेटणाऱ्या गृहस्थाच्या मनांतून अर्थातच माधवरावांशीं संभाषण करण्याची इच्छा असणार, हें उघड आहे. माधवरावांच्या चेहऱ्यावरील अचल शांति व गंभीरता पाहून, त्यांच्या नांवानें परिचय असणाऱ्या प्रत्येकाचा समज असाच होत असे कीं, माधवरावांच्या संभाषणांत रसिकतेचा ओलावा किंवा हास्यविनोद, हे गुण सांपडण्याचा संभव नाहीं. पण वस्तुतः तसा प्रकार नव्हता. त्यांच्या स्वभावांत अंगचा विनोद होता आणि विनोदाचा प्रसंग चटकन् ओळखण्याचा चाणाक्षपणाही भरपूर होता. अगदीं समवयस्क आणि समानशील मित्राशीं एकान्तांत त्यांचा संवाद चालला असला म्हणजे परस्परांच्या थट्टेनें हास्यरसाला उकळ्यावर उकळ्या फुटत. माधवरावांना मनावरचा दाब सुटून खदखदून अगर पोट धरधरून हंसण्याचा योग क्वचितच यावयाचा, पण तसा योग आल्यावर माधवरावांच्या हास्याचें विकट स्वरूप पाहून, तिऱ्हाइताला चमत्कार वाटल्याखेरीज रहात नसे. मलबारींनीं असा एक

* ईस्ट अँड वेस्ट मासिकाच्या १९०३ सालांतल्या नोव्हेंबराच्या अंकांतील 'रानडे आणि त्यांचा काळ' हा लेख पहा.

प्रसंग आपल्या स्मरणहारांत गोंवलेला आहे. शंकर पांडुरंग पंडित व माधवराव एकारात्रीं विश्रब्धालाप करीत असतां मलबारी त्यांच्या भेटीस गेले, तेव्हां माधवरावांच्या हास्याचा ध्वनि त्यांच्या कानावर पडला आणि माधवरावांच्या स्वभावरचनेंत हास्याला स्थान आहे, अशी त्यांना कल्पना आली. पण असा प्रसंग त्यांच्या सहवासी मंडळीला वारंवार दिसत नसे. त्यांचें चित्त सर्वकाळ कोणत्याना कोणत्या उपयुक्त कार्यांत तल्लीन असल्यानें, विनोदाचे हलके विषय बोलण्याला त्यांना फुरसत नसे. कोणीही गेला तरी कामाशिवाय दुसरें बोलणेंच निघायचें नाहीं; मग रिकामटेकड्या विनोदाच्या वाटणीला वेळ कोठून सांपडणार? मात्र कामाविषयींच्या संभाषणांत रमणीयता पुष्कळच असे, हें येथें सांगणें अवश्य आहे. माधवरावांचें वाचन व अवलोकन अमर्याद असल्यामुळें विषयस्पष्टीकरणाच्या अनुरोधानें त्यांच्या तोंडून नाना देशांतल्या व व्यक्तींच्या ऐतिहासिक व प्रचलित आख्यायिका बाहेर पडत व संवादाच्या विषयाला रंग चढे. अगाश्यांनीं आपल्या आठवणींत म्हटलें आहे कीं, माधवरावांशीं एखाद्या प्रश्नासंबंधीं घटकाभर बोलणें झालें म्हणजे एखाद्या गहन विषयावरील रसाळ निबंध वाचल्याचें श्रेय पदरांत पडे. माधवरावांच्या गप्पागोष्टींत वायफळ किंवा टाकाऊ विचार मुळींच नसायचा. शिवाय त्यांत व्यक्तींचा निर्देश झालाच तर तिची निंदा, कुचेष्टा, किंवा दोषचर्चा कधीं चुकून देखील त्यांच्या मुखावाटें निघायची नाहीं व दुसऱ्याला तसें करण्यास त्यांच्याकडून प्रोत्साहन मिळायचें नाहीं, हा त्यांच्या संवादाचा नियम होता.

सारा दिवस आणि रात्रींसुद्धां त्यांच्या घरांत माणसांची आवजाव सुरू असतां, त्यांना एकट्याला दहा पंधरा माणसांना पुरून उरण्या-

इतकें काम कसें बिनबोभाट उरकतें, याचें सर्वांना आश्चर्य वाटत असे व ही आश्चर्य वाटण्यासारखीच गोष्ट आहे. जन्मतः त्यांच्या ठिकाणीं अनेक गुण होते, यांत शंका नाहीं, पण नैसर्गिक गुणांवर वाचन-मनननिरीक्षणादि श्रमाचे संस्कार झाल्याशिवाय त्याची तेजस्विता व कार्यक्षमता उमलत नाहीं. माधवरावांची बुद्धिमत्ता लोकोत्तर होती, पण बुद्धिमत्तेहून त्यांची परिश्रमशीलता अधिक लोकोत्तर होती, हें विसरतां कामा नये. परिश्रमाच्या संवयीमुळेंच त्यांना सर्वज्ञता संपादन करतां आली. कॉलेजांत त्यांनीं कसा अविश्रांत अभ्यास केला, हें पूर्वी निवेदन केलें आहे. पण कॉलेजांतली कायदेशीर विद्यार्थीदशा संपतांच त्यांची जिज्ञासा संपुष्टांत आली नाहीं. कॉलेजांत त्यांनीं हस्तगत केलेलें ज्ञान असामान्य कोटींतलें आहे. तें त्यांना सहजासहजीं प्राप्त झालेलें नाहीं. त्यापायीं त्यांनीं आपल्या डोळ्यांचें कायमचें नुकसान करून घेतलें. पुढें त्यांचा ज्ञानार्जनक्रम आमरण अव्याहत चालला होता. एखादा विषय न समजल्यास, त्याच्या दुर्बोध ग्रंथाचें पुनः पुनः त्याचें पूर्ण आकलन होई पावेतों वाचन ठेवावयाचें, समजत नाहीं म्हणून कंटाळा करावयाचा नाहीं, अशी त्यांची संवय होती. वाचलेल्या ग्रंथांचीं टिपणें करून त्यांच्या वह्या आपल्या संग्रहीं बाळगण्याचा त्यांचा नियम होता. पुस्तक मिटून त्यांतल्या विवेचनाचा बिनचूक सारांश लिहितां आला म्हणजे तें पचनीं पडलें, अशी त्यांनीं एक कसोटी ठरवून, तिच्यावर ते आपल्या अभ्यासाचा कस पहात. त्यांच्या वाचनलेखनाची वेगळी खोली नव्हती व त्या कामाकरितां वेगळी वेळही मुक्रर केलेली नव्हती. मंडळीं सल्लामसलतीकरितां किंवा मुलाखतीकरितां येत आहेत; त्यांच्याशीं माधवराव बोलताहेत

आणि दुसरीकडे त्यांच्या हातांतलें काम चाललें आहे, असा देखावा प्रत्यहीं दृष्टीस पडे. ते अनेकावधानी होते हें जितकें खरें आहे, तितकीच त्यांची एकाग्रता देखील खरी आहे. भोंवताली मुलांचा गलबला चालला आहे, नोकर चाकर इकडून तिकडे येरझारा घालीत आहेत, शेजारीं माणसें बोलत आहेत, अशा परिस्थितींत त्यांना एकाग्र चित्तानें वाचन किंवा लेखन करण्याला अडचण वाटत नसे. वर वर्णिलेल्या परिस्थितीचा त्यांना त्रास होत नव्हता, असें समजणें चुकीचें होईल. त्रास झाला तरी त्यांनीं मन इतकें जिंकून ताब्यांत ठेवलें होतें कीं, त्याची एकाग्रता मधून मधून सुटली, तरी पुनः तें दिलेल्या कामांत तल्लीन होण्याला उशीर लागत नसे. यामुळें माधवरावांना वेळाचा अभाव कधींही नडला नाहीं. आपणास काम फार करावें लागतें किंवा कंटाळा येतो, अशी तक्रार त्यांच्या तोंडून कोणीही ऐकली नाहीं. माणसांनीं आपल्याकडें यावें, नव्या नव्या कार्यांचा खल व्हावा अशी त्यांना मनापासून हौस, पण रिकाम्या चकाट्या पिटायला त्यांच्याकडे कोणी गेला कीं, त्याला एखाद्या कामास जुंपून प्रेमाच्या शब्दानें पिटाळून लावण्यांत, माधवरावांचें चातुर्य कांहीं 'और' होतें, असें त्यांस ओळखणारांनीं लिहिलें आहे.

त्यांची जीभ साठ वर्षांच्या हयातींत कधीं अपशब्दानें विटाळली नाहीं; त्यांची वृत्ति क्रोध, द्वेष, मत्सर, दंभ इत्यादि अमंगळ दुर्विकारांच्या तावडींत सांपडून भ्रष्ट झाली नाहीं, याचा अर्थ जात्या त्यांच्या प्रकृतींत तापटपणा नव्हता, असा केल्यास तो योग्य ठरणार नाहीं. त्यांनीं आपल्या नैसर्गिक स्वभावाला दमनाच्या व आत्मनिरीक्षणाच्या जोरावर इष्ट वळण लावलें होतें. कॉलेजांत असतांना एखाद्या गोष्टीचा

राग अनावर झाला म्हणजे ते दाराला कडी लावून, आपल्या खोलीच्या एकान्तांत तासचेतास घालवीत. त्यांच्या मित्रांनीं एकदां याबद्दल खुलासा विचारला, तेव्हां माधवराव म्हणाले कीं, रागाच्या सपाट्यांत अपशब्द उच्चारला जाणाचा संभव असल्यानें, मी स्वतःला कोंडून घेतो. त्यामुळें शब्दानें शब्द वाढण्याचा व त्याआवेशांत अपशब्द उच्चारण्याचा प्रसंग टळतो आणि वाचेची पवित्रता भंग पावत नाहीं. अशा प्रकारचा इंद्रियदमनाचा अभ्यास सतत राखल्यामुळें पुढें त्यांचीं इंद्रियें पूर्णपणें आहारांत आलीं व विकाराला बळी पडण्याचा इंद्रियाचा नैसर्गिक स्वभाव लयाला जाऊन, विवेकाच्या कह्यांत राहणें हाच त्यांचा स्वभाव बनला. त्यांच्या गुणाचा विचार करूं लागलें म्हणजे दैवी संपत्तीचा संचय ते अहर्निश वाढवीत होते, अशी खात्री पटल्याशिवाय रहात नाहीं. ईश्वराविषयींच्या अनन्यनिष्ठेची जोपासना हें त्यांच्या दैवी संपत्तीचें मूळ आहे व हा एकच विषय असा होता कीं, ज्यावर प्रतिकूल आघात झाल्यास त्यांच्या सात्त्विक संतापाला भरती चढे. १८७३ सालीं पुणेकरांना याचा अनुभव आला होता. त्यावर्षी माधवरावांचे स्नेही जनार्दन सखाराम गाडगीळ यांचें धर्मपर व्याख्यान झालें. व्याख्यानांत गाडगिळांनीं ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल शंका घेतल्या. माधवरावांना सृष्टीच्या बुडाशीं असलेल्या ईश्वरीतत्त्वाचा हा अपमान सहन झाला नाहीं व त्यांनीं आपलें ज्ञानाचें सामर्थ्य गाडगिळांच्या नास्तिक्यावर लोटून, इतक्या निर्व्याज भाषेनें ईश्वराच्या अस्तित्वाचें समर्थन केलें कीं, श्रोत्यांना त्यांच्या ईश्वरनिष्ठेबद्दल शंका राहिली नाहीं. पुढें १८८१ व १८८५ या दोन सालीं त्यांना या भावनेचा तिरस्कार व्यक्त करणारांची कडक शब्दांनीं कानउघडणी करावी लागली, याचा इतिहास यथावकाश निवेदन होईलच.

अहंबुद्धीचा निःशेष अभाव, हें त्यांच्या दैवी संपत्तींतलें अत्यंत तेजस्वी रत्न आहे. माधवरावांनीं अहंतेचा वासदेखील आपल्या वागणुकींत राहूं दिला नव्हता. ते मंडळींत बसले म्हणजे माधवराव जणूंकाय आपल्यांतलेच एक असें सर्वांना वाटे. 'मी अमूक केलें, मी तमूक केलें,' अशी बडबड त्यांनीं कधीं केल्याचें कोणास ठाऊक नाहीं. मात्र दुसऱ्यानें कितीही क्षुद्र काम केलेलें असो, माधवरावांकडून त्याची प्रशंसा व्हायची व त्याला जास्त काम करण्याचा हुरूप यावयाचा, असा त्यांच्या निरहंकार वृत्तीचा प्रभाव होता. निराशेच्या दलदलींत रुतलेल्यांची व माधवरावांची गांठ पडतांच निराशामग्नांचा उद्धार झाला असें समजावें. अहंतेप्रमाणेंच माधवरावांनीं आपल्या स्वभावांतून निराशेची हकालपट्टी केलेली होती. त्यांच्या अंतर्दृष्टींत अविनाशी प्रकाश सांठविलेला होता. प्रातकालच्या पलीकडे त्यांच्या दृष्टीची गति असल्यानें चालू घडीचा कठोर अनुभव त्यांच्या बुद्धीला निराशेच्या अंधार कोठडींत कोंडूं शकत नव्हता. निराशेची कोंडी फोडून तिच्या व्यापापलीकडचा सदुद्योगफलाच्या प्रभामय प्रदेशाचा किनारा त्यांच्या दृष्टीला स्पष्ट दिसे. त्यांनीं केलेलें मानवी इतिहासाचें अध्ययन सार्वजनिक कार्यांतलीं अवघड कोडीं उकलण्यास उपयोगी पडे. सामान्य माणसें अडचणींच्या टापूंत सांपडलीं कीं, त्यांची गाळण उडते व या टापूंतच आपल्या कारभाराचे ताबूत थंड होणार, अशी भीतिप्रद कल्पना डोक्यांत भरून, तीं निराशेनें माघार घेण्याच्या तयारीस लागतात. अडचणींच्या टापूला अंत आहे व तो अंत धीरानें न गांगरतां स्वीकृत कर्तव्य करीत राहिल्यास लवकर घडवून आणतां येतो, याची जाणीव अडचणींच्या पहिल्याच देखाव्यानें बावरणाऱ्या माणसांना

रहात नाहीं. माधवरावांच्या स्वभावांत हा दोष असता तर त्यांना लोकाग्रणी होण्याचा मानच मिळाला नसता. 'अडचणीशीं लढाई दिल्याशिवाय कार्यभाग झाल्यास त्यांत पुरुषार्थ कसला? अडचणींच्या डोक्यावर पाय देऊन जर आपलें ध्येय, कष्टाच्या जंजाळांत दम न सोडतां, सिद्धीस नेलें, तरच आपली खरी शहामत व करामत.' अशा अर्थाचें वाक्य त्यांच्या तोंडीं नेहमीं असे. त्यांच्या तोंडचा उत्साहजनक उपदेश ऐकला म्हणजे श्रोत्यांच्या अंतरंगांतल्या संकटदग्ध आशेला टवटवीत पालवी फुटे, असें त्यांच्या नेतृत्वाखालीं काम करणारांनीं आपले अनुभव सांगितले आहेत. लोकसंग्रहकर्ता स्वतः निराश झाला, तर तो दुसऱ्यांना प्रेरणा कशी देणार? आशावादित्वासारखेंच त्यांनीं आणखी एका गुणाचें संवर्धन केलें होतें. योजकता हाच तो गुण होय. कौशल्यपारंगत कारागीर कधीं हत्यारांना अगर उपकरणांना नांवें ठेवीत नाहीं. नर्तनविशारदाला कधीं अंगणाची वक्रता जांचत नाहीं. पांगळा सारथि व घोड्याची विषम संख्या सूर्याची गति खुंटवीत नाहीं, या म्हणी व सुभाषितें प्रसिद्ध आहेत. माधवरावांच्या कर्तृत्वांत त्यांची यथार्थता दिसत होती. त्यांनीं हातीं धरलेल्या माणसांतलीं कित्येक माणसें तर अशीं होतीं कीं, इडापिडा टळण्याकरितां त्यांना जगावरून ओंवाळून टाकल्यास उचित झालें असतें. सगळ्या दुनियेंत नाठाळ गणलेल्या व्यक्तींना माधवरावांच्या कार्यविस्तारांत थारा मिळाल्याशिवाय रहात नसे. खट्याळ, नाठाळ, आडदांड, लफंगा, असा कोणीही माधवरावाकडे जावो, माधवराव त्याची अवहेलना करावयाचे नाहींत. त्याचा आदरसत्कार करून त्यांच्या अवगुणांतून एखाद्या कार्याची ते हमखास निष्पत्ति करीत असत.

मग बुद्धीनें व कर्तबगारीनें चलाख असणारांबद्दल बोलायलाच नको. लोखंडाला परिसाचा स्पर्श जसा सुवर्णत्व देतो तसाच माधवरावाचा सहवासस्पर्श कलंकितांना सुवर्णत्व देत असे. माधवरावांच्या तंत्रानें सर्वजण वागत व माधवराव त्यांना प्रेमानें वागवीत. त्यांच्या तंत्रानें वागतांना कोणाला आपल्यावर सक्ती होत आहे, असें वाटत नसे. ते स्वतः केव्हांही दुसऱ्याच्या तावडींत जात नव्हते, ही गोष्ट नजरेआड करून चालणार नाहीं. माधवराव पुण्यास रहाण्याला गेले, तेव्हां तेथील चांगल्या चांगल्या नागरिकांची नीतिशुद्ध नसलेल्या व्यवहारामध्यें प्रवृत्ति होती. नायकिणींच्या मजलसींत भाग घेण्यानें नीति बिघडते, असें तेव्हां कोणाच्या गांवींही नव्हतें. नायकिणीचा नाच अगर गाणें करविण्याचा प्रकार शिष्टसंमत होता. एकदां डेक्कन कॉलेजच्या विद्यार्थ्यांना एका सुप्रसिद्ध पुणेंकर नागरिकानें मेजवानी दिली. मेजवानीनंतर पानसुपारीचा बेत चालू असतां नायकिणीला बोलावण्याची कल्पना निघाली व कित्येकांची अनुकूल कुजबूज सुरू झाली. माधवरावांनीं कुजबुजीचा उद्देश ताडला आणि डोक्याला पगडी चढवून घरचा रस्ता धरला. त्यांच्या मागोमाग केरूनाना छत्रे उठले. केरूनानांचें धोतर धरून त्यांच्या एका जिवलग मित्रानें त्यास खालीं बसण्याविषयीं सुचविलें. माधवराव इतक्या वेळांत जिन्याच्या कांहीं पायऱ्या उतरून खालीं गेले होते. केरूनानांनीं त्यांच्याकडे बोट दाखवून अडविणाऱ्या स्नेह्यास म्हटलेः—'अरे, पहा, माझा विद्यार्थी माधवराव तडक चालला आहे. तो काय म्हणेल?' हें वाक्य उच्चारून छत्र्यांनीं आपल्या स्नेह्याला बाजूस सारलें व चालू लागले. कृष्णशास्त्री चिपळूणकर हे अतिरसिक व रंगेल गृहस्थ असल्याविषयीं

त्यांचा लौकीक होता. पण माधवरावांच्या प्रखर नीतिमत्तेपुढें त्यांचाही रंगेलपणा लटपटला. केरूनानांच्या मागून त्यांनींही तें स्थान सोडलें. ही गोष्ट कै. ग. ज. अगाश्यांनीं आपल्या व्याख्यानांत सांगितली आहे. पुण्यांतल्या वयोवृद्ध नागरिकांना माधवरावांच्या शुद्ध चारित्र्याची कशी दहशत वाटत असे, याचें हें एक उदाहरण आहे. आचरटपणा करायला जेथें वयोवृद्धांची छाती होत नसे, तेथें तरुणांची काय दशा होत असेल, याचा अंदाज करतां येतो. कै. ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनीं माधवरावांसंबंधीं बोलतांना पुष्कळदां असें म्हटलें कीं, त्यांच्या सहवासांत मनांतील पापविचारांचीं रानें जळून शुभ, पवित्र व आत्मोन्नतिकर विचारांचें घनदाट पीक पोसलें जात असे. वरच्या प्रसंगीं केरूनाना छत्रे व कृष्णशास्त्री चिपळूणकर या दोघां वयोवृद्ध माणसांची कानउघडणी करण्याच्या भानगडींत माधवराव पडले नाहींत. कदाचित् हा त्यांच्या शालीनतेचा परिणाम असेल, कदाचित् त्यांनीं संपादन केलेल्या मनोजयाचा परिपाक असेल. १८६९ साळच्या सुमारास मुंबईस त्यांच्या एका समवयस्क स्नेह्यानें पुत्रजन्मोत्सव केला. निमंत्रण आल्यामुळें माधवराव त्याच्या घरीं गेले. त्यानें आपलें घर समारंभानिमित्त लतापल्लवांनीं शृंगारलें होतें. शृंगारांत सूक्तिफलकांचाही भरणा होता. त्यांतल्या एका सूक्तीमध्यें अहंकाराचा दर्प होता. माधवरावांनीं ही सूक्ति आपल्या आयुष्यक्रमाला लागू पडत नाहीं. आपल्यांत दोषांची विपुलता आहे; असा वाद उपस्थित करून खूप तंटा केला. तंट्यानें समारंभाचा विरस झाला, असें तो प्रसंग पाहिलेल्या एका गृहस्थानें १८९८ सालीं सुबोधपत्रिकेंत माधवरावांना स्मरण दिलें होतें. कारण त्यावेळीं ज्यांच्याशीं भांडण केलें, त्यांपैकीं एक दोघे

मित्र दिवंगत झाले होते व माधवरावांनीं त्यांचा सामाजिक परिषदेच्या भाषणांत 'ते ईश्वराचे योद्धे Soldiers of God होते,' असा गौरवपर उल्लेख केला होता. या गोष्टींतलें सगळें मर्म समजण्याला सांप्रत मार्ग नाहीं. तथापि माधवरावांचें आत्मनिरीक्षण किती सूक्ष्म होतें व आपल्या स्नेहीवर्गाला वृथाभिमानाच्या दोषापासून अलिप्त राखण्यासाठीं ते किती जपत असत याचा हा एक नमूना आहे.

होतकरू तरुण माणसें हेरून देशसेवेच्या कामास जुंपण्याकरितां माधवरावांची कशी चौफेर नजर असे, याबद्दल एक मजेचा स्वानुभव कै. महाजनींनीं आपल्या आठवणींत कथन केला आहे. तो असा:—

सन १८७३ किंवा १८७४ सालीं एके दिवशीं संध्याकाळीं लायब्ररींत खिडकीजवळ मी वर्तमानपत्र घेऊन वाचीत बसलों असतां, ते आपण होऊन मजकडे आले, व मला त्यांनीं प्रश्न केला कीं, 'तुम्ही वऱ्हाडांत असतांना?' मी आश्चर्यानें चकीत झालों, पण मन स्थिर करून या व इतर प्रश्नांचीं सरळ सरळ उत्तरें दिलीं. असा माझ्या परिचयाचा आरंभ झाला. तो परिचय कालेंकरून दृढच होत गेला. गुरु आपण होऊन दर्शन देतात, याचा मला प्रत्यय आला.

सामाजिक सुधारणेसंबंधीं सन १८७७-७८ सालीं असा बूट निघाला कीं, छापील पत्रकांवर विशिष्ट बाबतींत सुधारकांच्या सह्या घ्याव्या व या रीतीनें लोकांत जागृति करावी.....हीं पत्रकें सह्याकरितां रा. सा. नीं आम्हांकडे पाठविलीं.*

बार्शीचे वकील रा. रामचंद्र मोरेश्वर साने, यांची दुसरी एक आठवण माधवरावांच्या कार्यैकनिष्ठेवर प्रकाश टाकणारी असल्यानें येथें देतो:—

---

* वि. ज्ञा. विस्तार वर्ष ४५ अंक २. पृ. ४५ व ४९-५०.

† वि. ज्ञा. विस्तार वर्ष ४६ अंक १ पृ. ३-४.

प्रत्येक कार्यकर्त्या मनुष्याच्या मगदुराप्रमाणें उपयोग करून घेणें ही रावसाहेबांची नेहेमीं दृष्टि असे. तो मनुष्य कसा आहे, त्याचे दोष काय आहेत, याकडे लक्ष न देतां, त्याचे गुण काय आहेत, व लोककार्यांत त्याचा संग्रह कसा होईल. हें ते पहात असत. कै. महादेव बल्लाळ नामजोशी हे खटपटी व हुशार गृहस्थ सार्वजनिक कामांत पडणारे होते.....किरण नांवाचा छापखाना कोतवाल चावडीच्या ठिकाणीं असे, व तेथें 'किरण' नांवाचें पत्रही निघत असे. या संस्थेचे चालक नामजोशी होते. लिटनसाहेबाच्या प्रेसअॅक्टास तें पत्र बळी पडलें व पुढें छापखानाही मोडला. नामजोशी फार डूबघाईस आले. कित्येकांचा नामजोश्यांविषयीं यामुळें गैरसमज झालेला होता......नामजोश्यांना तुम्ही हाताशीं कां धरतां ?–असें रावसाहेब यांस खाजगी पत्रांतून त्यांच्या कित्येक बड्या स्नेह्यांनीं लिहिलेलें मला माहीत आहे. रावसाहेबांचें या सर्वांस एकत्र उत्तर असे कीं,नामजोश्यांचे अंगांत जें एक प्रकारचें पाणी आहे व काम करण्याची धमक आहे, त्या गोष्टींचा फायदा सार्वजनिक कामीं करून घेण्यास काय हरकत आहे ?

|माधवरावांनीं लोकसेवेंत आपली रसना व लेखणी झिजविली. या दोन्ही साधनांचा परिचय वाचकांना मागें दिलेल्या कित्येक उताऱ्यावरून झालेला आहे; तथापि त्यांचा थोडा जास्त तपशील सादर केल्याखेरीज दाट परिचय होणार नाहीं. /त्यांचे विचार जसे भव्य होते, तशीच त्यांची भाषा भव्य होती./ त्यांचा कोणताही लेख घेतल्यास त्यांतील विचार भव्य वाटतात. त्यांच्यांत क्षुद्रपणाचा अंश मुळींच नाहीं. उंच डोंगर किंवा अफाट समुद्र यांच्या देखाव्यांतला भव्यपणा जसा नैसर्गिक असतो तसाच नैसर्गिक भव्यपणा माधवरावांच्या विचारांत व भाषेंत आहे. तपशिलांचें अबाधित तात्पर्य काढण्यांत त्याचा हात धरणारे पुरुष विरळाच सांपडतील. आज त्याचे विचार निर्जीव शब्दांच्या द्वारें ग्रहण करीत असतांही, त्यास जन्म देणाऱ्या

व्यक्तीच्या बुद्धिमत्तेची जीवंतपणांतली उष्णता भासमान झाल्याशिवाय रहात नाहीं. वाचकांच्या हृदयांत ते सजीव होतात आणि त्याला आपल्या अर्थबोधानें प्रसन्न करून सोडतात. त्यांची गहनता, पल्लेदारपणा, चिरस्थायित्व वगैरे गुण अनुभवास येऊन, वाचकांची मति त्यांना जन्म देणाराच्या बुद्धिवैभवाचें कौतुक करूं लागते. त्यांच्या शरीराचा बांधा जसा उंच, रुंद व पुष्ट होता, तसाच त्यांच्या विचारांचा बांधा आहे. त्यांत तात्त्विकता असली तरी रुक्षपणा नाहीं. हृदयंगम गोष्टीचें वर्णन असल्यास त्यांत कवीसारखी प्रतिभेची भरारी आढळते. मुद्रणाच्या निर्जीव सृष्टींत जर माधवरावांचे शब्द वाचकांच्या अंत:करणाला खुलवितात, तर खुद्द माधवरावांच्या तोंडून ते बाहेर पडत असतां श्रोत्यांच्या हृदयाचें कसें आकर्षण करीत असतील, याची कल्पना करणें शक्य आहे. 'सार्वजनिक रीतीनें बोलण्याची संधी मी कधीं वाया दवडीत नाहीं,' अशी आपल्या वक्तृत्वाची एक खूण माधवरावांनीं बार्शीच्या टिळक वकिलांना सांगितली होती. 'भाषणांत रसिकता पाहिजे.' असें त्यांनीं एकदां वक्तृत्वसभेच्या अध्यक्षस्थानावरून समारोप करतांना उद्गार काढले होते. माधवराव 'तीन तीन तास इंग्रजींत व मराठींत अस्खलित व सम्यक् भाषण करितात..... व त्यांजकडून दिले जाणाऱ्या व्याख्यानासंबंधानें सर्व श्रोतृजनांची फार आवड व पूज्यता असते' असें त्यांच्या वक्तृत्वाविषयीं कै. वा. बा. रानडे यांनीं आपल्या छोटेखानीं चरित्रांत लिहिलें आहे. मानकर व अगाशे यांनींही त्यांच्या वक्तृत्वगुणांची आकर्षकता वर्णिली आहे. इंग्रजी भाषेवर त्यांचें विलक्षण प्रभुत्व असल्यानें, त्यांच्या त्या भाषेतल्या व्याख्यानांची सरसता सर्वच कबूल करतात. मराठी भाषेंतलीं

व्याख्यानें बोजड वाटतात, पण त्यांत गहनार्थाचें प्रतिपादन आहे, याबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं व तें प्रतिपादन निर्मळ मराठी भाषेंत आहे, यावरून मराठी व्याख्यानाचे वेळीं माधवराव अडखळत असतील, हें संभवनीय नाहीं. त्यांच्या व्याख्यानांत वशीकरणाची शक्ति आहे व तिचाच प्रभाव श्रोत्यांवर होत असे. स्वदेशीवरलीं व्याख्यानें ऐकतांच सहृदय मंडळींनीं देशी माल वापरण्याचा निश्चय कां केला, हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. त्यांचीं भाषणें वाचलीं म्हणजे तपशिलामागून तपशील उलगडून प्रतिपाद्य विषयाचें समग्र स्वरूप मांडण्याची व त्या योगानें शंकास्थान राहूं न देतां आपल्या सिद्धांताबद्दल खात्री पटविण्याची माधवरावांची हातोटी प्रत्ययास येते. पण 'वक्ता' या शब्दानें जितके गुण कल्पनेसमोर उभे रहातात तितके माधवरावांच्या ठिकाणीं नव्हते, किंबहुना त्यांना 'वक्ता' हा शब्द लावतां येईल कीं नाहीं, अशी शंका प्रदर्शित केल्यास ती वस्तुस्थितीस सोडून होणार नाहीं. त्यांचा आवाज गंभीर व खणखणीत होता. परंतु वक्त्याचे हावभाव किंवा अभिनय त्यांच्या व्याख्यानांत कधीं दृष्टीस पडत नसत. मलबारीनीं त्यांना पुण्यास भेट होण्यापूर्वी प्रथम एका सभेंत भाषण करीत असतां पाहिले. रेव्हरंड जॉन स्मॉल नांवाच्या युरोपियन गृहस्थाच्या अध्यक्षत्वाखालीं माधवरावांचें व्याख्यान चाललें होतें. ते म्हणतात:—

वक्त्यांपैकीं एकजण उंच, कुरूप, रुंद कपाळाच्या कड्याखालीं केवळ यदृच्छेनें चिकटलेल्या लहानशा चढेल नाकाचा हिंदू गृहस्थ बोलायला उभा राहिला. त्यानें भाषणाची सुरवात अगदीं थंड व आळसट पद्धतीनें केली. त्यानें असे विचित्र हातवारे क्षणभर केले कीं, जणूं काय तो स्वतःशींच भांडत आहे. प्रारंभीं तो अडखळला, चांचरला; पण त्याची ही स्थिति श्रोत्यांच्या लक्षांत

येण्यापूर्वीच त्याचें विषयाशीं तादात्म्य होऊन त्याचा सूर लागला. जादूच्या प्रयोगाप्रमाणें तत्काळ सगळी स्थिति पालटली. भूतलावरून पाय सुटून आम्ही अंतराळांत वरवर जात आहोंत, असा आम्हांस भाषण ऐकतांना भास झाला. त्याची अजस्र काया व निश्चल मुद्रा यामध्यें आतां फरक दिसूं लागला. विषय-देखील त्याच्या अभिरुचीला अनुरूप असाच होता. सुमारें अर्धातास त्यानें भाषण केलें व एखाद्या एकनिष्ठ खिस्त्याप्रमाणें त्याचें प्रवचन चाललें होतें. तत्त्वज्ञ ब्राह्मणाची विचारसरणि त्याच्या भाषणांत नव्हती. शेवटीं विषयाचा शांत, मुद्देसूद व शुद्ध रीतीनें उपसंहार सुरू झाला, तेव्हां आमच्या विवेकशक्तीसह सर्व भावना त्यानें हरण करून नेल्या, अशी आमची खात्री झाली. हा गृहस्थ कोण म्हणून मी शेजारच्या श्रोत्याला विचारलें, तेव्हां त्यानें 'रानडे' असें नांव सांगितलें. त्याचा माझ्या मनावर असा कांहीं परिणाम झाला कीं, मी दुसऱ्याच दिवशीं सकाळीं त्यांच्या घरीं गेलों. ज्या साक्रेटिसाच्या शोधांत मी होतों, तो साक्रेटीस रानड्यांच्या ठिकाणीं मला सांपडला व अत्यानंद झाला.

माधवरावांच्या वक्तृत्वासंबंधीं दुसरें वर्णन पुढीलप्रमाणें आहे :—*

बोलायला सुरवात करण्यापूर्वी ते कांहीं क्षण स्तब्ध उभे रहात; कदाचित ते आपल्या विषयाची विहंगमदृष्टीनें पहाणी करीत असावेत, असा श्रोत्यांना भास होत असे. त्यांच्या गाढ विद्वत्तेचा थेंब न् थेंब आपल्या हृदयपुटांत सांठविण्याकरितां श्वासक्रियादेखील थांबवून उत्कंठित झालेल्या श्रोतृगणावर त्यांची धिप्पाड मूर्ति, रुंद कपाळ, आणि गंभीर मुद्रा यांचा परिणाम होत असे. त्यांची बोलण्याची ढब प्रमाणबद्ध व आवाज धातुनादासारखा घणघणणारा होता. मात्र वर्णमालेंतल्या कांहीं अक्षराचा उच्चार साफ होत नसे. त्यांच्या विवेचनाचा रोख मन वळविण्याकडे नसून खात्री पटविण्याकडे असे. श्रोत्यांच्या भावना उचंबळून सोडण्याची त्यांची इच्छा असेल तेव्हां करुणाप्रधान शब्दांची योजना करून ते भावनोद्दीपन करीत. अभिनयाचें साह्य घेत नसत. एक हात टेबलावर ठेवून दुसऱ्या हातानें दुसरा

* डेक्कन कॉलेजाचें त्रैमासिक, खंड ९, अंक ३ रा.

डोळा चोळायचा, अशी त्यांची पद्धत होती व ती त्यांनीं कधीं बदलली नाहीं. बाह्यात्कारीं आकर्षक असें कांहीं नसतांही त्यांचीं व्याख्यानें मनोरंजक होत असत. त्यांची भाषा साधीच पण उत्कृष्ट असे. पुष्कळदां तिच्यांत प्रतिभेचा आणि वक्तृत्वाचा अंश दृष्टीस पडे. त्यांचें विवेचन स्पष्ट व चित्तवेधक असे. प्रथम विषयाची समग्र रूपरेषा दाखवून नंतर हळू हळू ते त्याच्या व्याप्तीचा संकोच करीत व अखेरीस प्रतिपाद्य सिद्धांताशीं श्रोत्यांना आणून भिडवीत. रानांतला वाघ जसा चोहोबाजूंनीं घेरून नेमका शिकारी इसमासमोर आणला जातो, तशीच कांहींशीं माधवरावांची पद्धत होती.

स्वजनांशीं अप्रिय वर्तन करणारा मनुष्य, पुष्कळदां सरकारी युरोपियन अंमलदारांच्या कच्छपीं लागलेला व त्यांच्यापुढें गोंडा घोळणारा असल्याचें पहावयास सांपडतें. पण माधवरावांच्या वर्तनांत ही गोम मुळींच नव्हती व त्यायोगानें लोकांची त्यांच्यावर अधिकच भक्ति जडली. युरोपियन वरीष्ठांकडे हेलपाटे घालण्याची खोड त्यांनीं लावून घेतली नव्हती. इंग्रज वरिष्ठांचा संपर्क जितका टाळवेल तितका ते टाळीत. कोणत्याही उपायानें टळत नाहीं अशी खात्री झाली, म्हणजे होणाऱ्या संपर्काचे वेळीं फाजील सलगी त्यांच्याकडून दाखविली जात नसे. पुष्कळदां त्यांच्या वर्तनांत युरोपियनासंबंधीं अनादर वसत असावा, अशी त्यांच्या वरिष्ठांना शंका येऊन, त्यांच्याविषयीं सरकारांत गैरसमज वाढत असत. हांजी-हांजीखोरपणाचा तिरस्कार हें एक वरिष्ठाकडे हेलपाटे न घालण्याचे व हेलपाट्याचे प्रसंग टाळण्याचें कारण आहेच, परंतु माधवरावांच्या स्वभावांत विनयातिरेकामुळें उद्भवणारा लाजाळूपणाचा एक दोष होता, त्यामुळें पुढें पुढें करण्याचें काम त्यांना साधत नसे, हें दुसरें कारण विसरतां येत नाहीं. सर विल्यम वेडरबर्न हे माधवरावांचे मोठे चहाते व मित्र होते. पुण्यास येण्यापूर्वी त्यांनीं माधवरावांचें नांव ऐकलें होतें. या गृहस्थाशीं

मैत्री जोडावी, असें त्यांच्या मनांत येऊन त्यांनीं स्वजातीय मित्रांचा सल्ला घेतला. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, रानडे हा एक मोठा धूर्त व कावेबाज ब्राह्मण आहे. त्याच्याशीं संबंध येईल तेव्हां फार सावधपणानें वागलें पाहिजे. सर विल्यम वेडरबर्न यांना निराळा अनुभव आला व ते माधवरावांचे पक्के दोस्त बनले. आपल्या वागणुकीमुळें सरकारांत गैरसमज माजतात, हें माधवरावांना कळत नव्हतें असें नाहीं. परंतु त्यांच्या स्वभावांतल्या निस्पृहपणाला गैरसमज दूर करण्याची स्वहितावह खटपटदेखील लांछनास्पद वाटे.

लोकहित आणि ज्ञानार्जन या दोन कार्यांचा पसारा मांडून बसलेल्या माणसाचें सरकारी नोकरींत कितपत लक्ष लागणें शक्य आहे, या प्रश्नाचा कोणी विचार करूं लागल्यास, त्याला असेंच उत्तर द्यावें लागेल कीं, अशा माणसाचें सरकारी काम चोख पार पडणें मुष्किलीचें आहे. माधवराव याही सामान्य सिद्धांताला अपवाद होते. न्यायदानापूर्वी सुनावणीस आलेल्या प्रत्येक खटल्याचे कागद, पुराव्यांत दाखल झालेल्या लहानसान चिटोऱ्यासुद्धां, ते पाहून टाकीत. दोन्ही पक्षाला आपापलें जितकें मंडन करावयाचें असेल तितकें करूं देण्याला माधवरावांची हरकत नसे. निकाल देतांना अत्यंत कसोशीनें देत. त्यांचे निकाल पाहून हायकोर्टांतल्या मोठमोठ्या जज्जांना सुद्धां आश्चर्यांत बुडून जावें लागे. सबॉर्डिनेट जज्जाच्या कनिष्ठासनावर हा गृहस्थ आज असला तरी त्याची खरी योग्यता श्रेष्ठ प्रतीची आहे, हायकोर्टांतल्या उच्चतम न्यायासनावर तो विराजमान झाल्यास त्याचा गौरव होण्याऐवजीं त्या आसनाचाच बहुमान केल्याप्रमाणें होईल, असें हायकोर्टांतल्या युरोपियन जज्जांना माधवरावांचे निकाल पाहून

वाटत होतें व एकदां तर सरन्यायाधीश सर मायकेल वेस्ट्रॉप यांनीं तसें बोलून दाखविल्याची एक आख्यायिका आहे. त्यांच्या निकालांत नुसते बुद्धिचापल्याचे चमत्कार नसून परिश्रमाचे आणि विद्वत्तेचे चमत्कार दृष्टीस पडत. 'रानडयांना आपलें काम उत्कृष्ट रीतीनें करण्याचा अभिमान दिसतो. त्यांचें कायद्याचें ज्ञान आणि त्यांतली गति इतर सगळ्या सबॉर्डिनेट जज्जाहून जास्त आहे.' असें सर मायकेल वेस्ट्रॉप यांनीं आपलें मत कळविलें होतें.

फिर्याद कोर्टांत दाखल झाली म्हणजे फिर्यादीबरोबर दाखल झालेले सर्व कागद पाहून टाकण्याचा माधवरावांचा परिपाठ होता. हे कागद पहात असतांना खटल्याचे मुख्य मुख्य मुद्दे व त्यासंबंधाची माहिती त्यांच्या स्मरणांत पक्की बसे. कांहीं वर्षांनीं फिर्यादीचे कागद कारकुनानें पहावें, सबॉर्डिनेट जज्जांनीं पहाण्याचें कारण नाहीं, असा सरकारांतून नियम झाला, तरी माधवरावांची कागद वाचण्याची संवय सुटली नाहीं. कारकुनावर भरंवसा न ठेवतां ते स्वतः सगळे कागद वाचीत. असें कां करितां म्हणून कै. मानकरांनीं* एकदां विचारलें तेव्हां ते म्हणाले कीं, दाव्यातले कागद अगोदर पाहून ठेवलेले असले म्हणजे दावा ऐकतांना त्रास पडत नाहीं. पण विशेष आश्चर्याची गोष्ट त्यांच्या स्मरणशक्तीची आहे. फिर्याद दाखल होतांच तिच्यासंबंधीं कागद वाचण्याचें काम करतां येईल. पण वर्षानुवर्षं त्या कागदांतली माहिती बिनचूक लक्षांत रहाणें कठिण आहे. माधवरावांच्या स्मरणशक्तीचा याप्रमाणें १८७५-७७ या दोन वर्षांत मानकरांना अनुभव आला. त्यांच्याजवळ एखाद्या खटल्याची गोष्ट काढली कीं, तावडतोब त्यांतल्या अगदीं बारीक

* मानकरकृत 'रानडयांचें चरित्र.' भाग दुसरा. पृ. १९१

सारीक किरकोळ मुद्यांची माहिती त्यांच्याकडून मिळे, असें मानकरांनीं लिहिलें आहे.

माधवरावांनीं सबार्डिनेट जज्ज या नात्यानें दिलेले निकाल हायकोर्टांतल्या मान्यतेमुळें वज्रलेप झाले आहेत व त्यायोगानें कायद्यांच्या रचनेंत राहून गेलेल्या व अन्याय घडवून आणणाऱ्या चुका दुरुस्त होऊन लोकांच्या कल्याणास हातभारच लागला आहे. लोकांचें हित व्हावें, हें एकच ध्येय त्यांच्या डोळ्यांसमोर सदैव असल्यानें सरकारी नोकरीसुद्धां त्यांनीं त्याच कार्यांत वेंचली. कायद्याच्या अंमलबजावणीचे कित्येक नियम असे असतात कीं, त्यामुळें सबजज्जांची हातपाय बांधल्याप्रमाणें स्थिति होऊन, लोकांचें हित करण्याची इच्छा असतांही तिचा उपयोग होत नाहीं. माधवरावांना हे नियम कधीं नडले नाहींत. न्यायाच्या मूलतत्त्वानुसार निकाल देण्याची त्यांची रीत होती. ही रीत व वरील नियम यांच्यांत विरोध उत्पन्न झाल्यास ते आपल्या ज्ञानानें विरोधाचा परिहार करून न्यायदानाचा हेतु सिद्धीला नेत असत. ज्याचे निकाल हायकोर्टांत कधीं फिरविले जात नाहींत, तो सबजज्ज उत्तम, असें एक सबजज्जांच्या बाबतींतलें लक्षण आहे. माधवरावांच्या कामाला हें लक्षण पूर्णपणें लागू पडत होतें आणि म्हणूनच त्यांची वरिष्ठांत वाहवा झाली.

सरकारी नोकरी, लोकहिताचीं कार्यें, ज्ञानार्जन आणि कुटुंबपोषण अशा चतुर्विध व्यवहारव्यापांत निरंतर राहून पुन: त्यामध्यें कधींही विरोध न उत्पन्न होऊं देणाराविषयीं प्रत्येकाला आदर वाटावा आणि हा पुरुष सामान्य कोटींतला नाहीं, याची जाणीव व्हावी, हें योग्यच आहे. ज्ञानार्थी व्यक्ति समाजांत मिसळण्याला तयार नसतात, मोठ्या

कुटुंबांच्या भरणपोषणाचा भार वहाणाऱ्या व्यक्तींना समाजहित किंवा ज्ञानार्जन या दोन्ही उद्योगास बहुधा मुकावें लागते; बहुतेकांची सरकारी नोकरीखालीं कंबर मोडते, मग ती नोकरी साध्या कारकुनीची असली तरी हरकत नाहीं. परंतु माधवरावांच्या कामांत वरील चारी व्यवहारांचा इतका सुंदर व प्रमाणशीर मिलाफ झाला होता कीं, विरोधाचें कधीं कारणच उपस्थित झालें नाहीं. सरकारी नोकरी व कुटुंबसंगोपन हीं कामें परिस्थितीमुळें माणसाच्या अंगावर पडतात. परंतु लोकहिताचें कार्य अथवा ज्ञानार्जन हीं कामें कोणी कोणावर लादीत नाहीं; त्यांची जबाबदारी स्वयंस्वीकाराखेरीज अंगावर पडत नाहीं. एकदां तशी जबाबदारी घेऊन तिचा कालांतरानें निखालस त्याग केला तरी 'असें कां' म्हणून कोणी विचारणार नाहीं. शिवाय हीं कार्यें वाढवावीं तितकीं वाढतात व करावीं तितकीं कमी होतात. वर आणखी लोकहितकर्तृत्वाचा मान मिळतो. माधवरावांनीं या स्वयंस्वीकृत कार्यांचा व्याप अतिशय वाढविला होता. पुण्यास अमूक एका कामाशीं त्यांचा संबंध नाहीं, असें एकही प्रगतिकारक काम १८७१–१८७७ च्या काळांत दाखवितां येणार नाहीं. परंतु लोकहितकर्तृत्वाचा अहंकार त्यांच्यांत उत्पन्न झाला नाहीं, यांतच त्यांच्या चारित्र्याचें सर्व रहस्य आहे. कोणाच्याही मनांत कांहीं सार्वजनिक प्रगतीचें काम करण्याची इच्छा प्रबळ झाली कीं, त्यानें माधवरावांकडे जावें आणि सल्ला घ्यावा. सल्ला विचारला, तो प्रामाणिकपणानें दिला, मग आपलें कर्तव्य संपलें, नंतर त्या कामाचें कांहीं होवो, अशी माधवरावांची रीत नव्हती. तें काम जर महत्त्वाचें असेल तर माधवराव स्वतः त्यांत भाग घेण्याला तयार होत; हा त्यांच्या स्वभावांतला विशेष

होता. कामामागून कामें उपस्थित होत आहेत, त्यांच्या सिद्धीचा भार माधवरावांच्या अंगावर लादला जात आहे आणि माधवराव आनंदानें तो भार वाहून नेत आहेत. हा देखावा आज देखील स्फूर्तिदायक व विस्मयकारक वाटतो; यामुळें त्यांच्या सहकारी मंडळीनें त्यास 'घाट इंजन' असें अन्वर्थक नांव दिलें होतें. मग ज्या दिवसांत हा देखावा प्रत्यक्ष घडत होता, त्या दिवसांत त्यांजविषयींच्या आदराच्या भावनेनें पुणेंकरांच्या हृदयामध्यें कायमची वस्ती करावी, यांत आश्चर्य नाहीं.

माधवरावांना व्यसन कोणतेंच नव्हतें. व्यसन या शब्दाचा उपयोग करावयाचा झाल्यास तो एकाच बाबतींत करतां येईल. ती बाब म्हणजे ज्ञानार्जन किंवा लोकहित. व्यसनी मनुष्य ज्याप्रमाणें आपल्या शरिराची माती होत असली तरी व्यसन सोडीत नाहीं, त्याचप्रमाणें माधवरावांचें हें व्यसन होतें. त्यांनीं लहानपणीं व्यायाम करून शरीर कमावलें नव्हतें. मैदानी अगर मर्दानी खेळांचाही त्यांना नाद नव्हता. सकाळ संध्याकाळ फुरसत असेल त्याप्रमाणें चार सहा मैल स्वच्छ हवेंत हिंडायला जाण्याचा मात्र त्यांचा नित्यक्रम होता. हिंडतांना बरोबर चारदोन मंडळी हमेश असायची व चालतां चालतां उपयुक्त कार्यांचा खल करावयाचा, अशी माधवरावांची रीत होती. भोंवताली पसरलेल्या सृष्टीच्या रमणीय देखाव्यांत त्यांचें चित्त रमत नसावें, असा कित्येकांचा तर्क आहे, पण त्यांच्या लेखांतून व भाषणांतून जीं निसर्गांतील देखाव्याचीं वर्णनें येतात, त्याकडे लक्ष दिल्यास सृष्टीच्या रमणीयतेनें त्यांचें अंतःकरण वेधलें जात नव्हतें, असा निष्कर्ष काढणें चुकीचें ठरतें. पण एवढें मात्र खरें कीं, पुष्कळदां त्यांच्या डोक्यांत कांहीं विचार चाललेला असला म्हणजे सहचारी

मंडळीचें किंवा भोवतालच्या सृष्टीचें त्यांना भान रहात नसे. ज्ञानार्जनाशिवाय त्यांना दुसरी करमणूक माहीत नव्हती. एका विषयाचा कंटाळा आला म्हणजे दुसऱ्या विषयाचीं पुस्तकें उघडावयाचीं, त्यांत लक्ष लागेनासें झालें कीं, तिसऱ्या विषयाकडे नजर टाकावयाची. याप्रमाणें अर्थशास्त्रांतून तत्त्वज्ञानांत, तत्त्वज्ञानांतून राजकारणांत, राजकारणांतून समाजशास्त्रांत आणि हे सर्व बेचव वाटल्यास आवडत्या इतिहासग्रंथांत त्यांचा करमणुकीखातर संचार चाले. ज्ञानार्जनाबाहेरची करमणूक म्हणजे बुद्धिबळाचा किंवा सोंगट्यांचा डाव, हीच होय. खाण्यापिण्यांतल्या आवडीनिवडी फारशा सांगतां येणार नाहींत. बदाम व चिकणीसुपारी काम करीत असतांना मधून मधून तोंडांत टाकण्याचा त्यांचा प्रघात होता. भोजनोत्तर ताजीं फळें खाण्याची त्यांना आवड होती. तिखटामिठाच्या खमंग चुरचुरीत खाद्यांविषयीं त्यांना भक्ति होती, असें कांहीं वृद्धांच्या आठवणीवरून दिसतें. 'आमच्या आयुष्यांतील काहीं आठवणी' या पुस्तकांत तपकिरीच्या डबीची गोष्ट दिली आहे. ती तपकिरीच्या नादाची द्योतक आहे. हे त्यांच्या अभिरुचीचे प्रकार असले, तरी त्यावांचून त्यांचें कधीं अडत नव्हतें. अभिरुचीच्या तृप्तीनें आनंद होत असला तरी तिची तृप्ति प्रसंगीं चुकल्यास विषाद अगर मनःसंताप होत नव्हता, यावरून अभिरुचीबद्दल आसक्ति नसे, हें लक्षांत येण्यास हरकत नाहीं.

हा वेळ पावेंतो सार्वजनिक व्यवसायांत गुरफटलेल्या माधवरावांचें व उघड दिसणाऱ्या संवयीचें दर्शन घेतलें. सभा, वाचनालय, स्नेह्यांचा एकत्र जमण्याचा अड्डा, कोर्ट, घरची लिहिण्यावाचण्याची किंवा बाहेरील लोकांच्या भेटण्याची खोली, हीं स्थानें सोडून त्यांच्या खाजगी व्यवहारांत

घुसल्याशिवाय त्यांच्या जीविताची सर्वांगपरिपूर्णता दृष्टीस पडणार नाहीं. त्यांच्या घरांत आप्तस्वकीय स्त्रीपुरुषांची गर्दी होती, आश्रितांना तोटा नव्हता, नोकरचाकरांचा परिवार मोठा होता. जगाशीं निरतिशय प्रेमानें वागून त्याला उपकारबद्ध करणाऱ्या व्यक्ति पुष्कळदां घरच्या माणसांशीं तुटक किंवा तुसडेपणानें वागतात. परंतु माधवरावांच्या चरित्रांत असा दोष नव्हता. त्यांचा पुत्रधर्म पूर्वी पहाण्यांत आलाच आहे. पित्याच्या शब्दासाठीं त्यांनीं द्वितीय विवाह कुमारिकेशीं केला व टीकेचा मारा सोसला. सापत्न माता, विधवा बहीण, चुलते, वगैरे नातलगांशीं त्याचा अत्यंत प्रेमाचा संबंध होता. वडिलांच्या मृत्यूनंतर सापत्न मातुःश्रीच्या दुःखाचें परिमार्जन करण्यासाठीं दरदिवशीं रात्रीं एक तासभर सुखावह गोष्टी बोलण्यांत वेळ घालवीत, हें एक त्यांच्या कुटुंबदाक्षिण्याचें उदाहरण आहे. आश्रितांबरोबर त्यांची वागणूक नातलगांसारखीच जिव्हाळ्याची होती. आपल्या मनाविरुद्ध गोष्ट घडत असली तरी तिला मोडता घालून नातलगांचा हिरमोड करण्याची कठोरता त्यांनीं कधीं दाखविली नाहीं. कुटुंबपरिवाराचें स्वास्थ्य टिकावें, धुसफुशीला क्षुल्लक देखील कारण सांपडूं नये, याविषयीं त्यांची विलक्षण दक्षता असे. सख्खे-सावत्रपणाचें व्यंग कुटुंबांत असतांही त्यांनीं त्याचे दुष्परिणाम केव्हांही होऊं दिले नाहींत. यांत माधवरावांचा थोरपणा तर आहेच, पण त्याच्या सहधर्मचारिणाचाही त्यांत मोठा हिस्सा आहे. पुरुषांची अब्रू बायकांच्या हातांत असते, हें तत्त्व लक्षांत ठेवल्यास माधवरावांच्या सहचारिणीनें जर परिस्थिति ओळखून मन थोर केलें नसतें, तर माधवरावांचा घनदाट शांतिशीतल संसारवृक्ष कोसळून त्यावरील आप्तस्वकीयांचा गोतावळा दशदिशांत उधळायला उशीर लागला नसता. १८७१ सालांत त्यांचा द्वितीय विवाह



श्री. सौ. रमाबाई रानडे.

झाला. विवाहाचा त्रोटक वृत्तांत मागें आला आहे. विवाहसमयीं श्री. रमाबाईंच्या जीविताचें भिन्नत्व लोपलें. त्याचें माधवरावांच्या जीवितांत विसर्जन झालें. तथापि त्यांची एकरूपता वर्णन केल्याशिवाय, श्री. रमाबाईंच्या आत्मार्पणाची महती समजणार नाहीं.

श्री. रमाबाई लग्नांत अकरा वर्षांच्या होत्या. त्या काळाकडे नजर टाकल्यास त्या वयानें मोठ्या होत्या, परंतु शिक्षणाचा संस्कार त्यांस बिलकूल झालेला नव्हता. त्यांनीं आपल्या बालपणच्या शिक्षणासंबंधीं ज्या कल्पना 'आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणीं'त दिल्या आहेत, त्यावरून विद्येच्या बाबतींतला त्यांचा मागसलेपणा समजतो. परंतु ज्या वर्षांतल्या भयंकर प्रसंगाचें निमित्त घेऊन माधवरावांच्या चरित्राचें समालोचन चाललें आहे, त्या वर्षांपर्यंत श्री. रमाबाईंना आपल्या लोकवंद्य पतीचा चार वर्षें सहवास घडला होता व या मुदतींत त्यांची ज्ञानार्जनमार्गांत बरीच गति झाली होती. विवाहानंतर एक दोन दिवसांतच माधवरावांनीं श्री. रमाबाईकडून 'श्रीगणेशायनमः' घटवून, विद्यामंदिराच्या आवारांत त्यांस आणून सोडलें. घराबाहेरच्या जगांतल्या स्त्रियांच्या उद्धारासाठीं अहर्निश तळमळणारा पुरुष, स्वतःचें अर्धांग अज्ञानशताच्या झटक्यांत राहूं देईल, हें शक्यच नाहीं. माधवरावांनीं आपल्या कर्तव्याला प्रारंभ केला, पण श्री. रमाबाईंनीं 'भर्तृसदृश' होतांना चित्ताची स्थिरता ठेवली नसती, तर माधवरावांना अतिशय ताप झाला असता. श्री. रमाबाईंना विद्येचा संस्कार नसला, तरी त्यांच्या स्वभावाला गृहशिक्षणाच्या संस्कारानें इष्ट वळण लागलें होतें. त्यांनीं आपल्या आठवणींत आपल्या जननीचें जें स्वभावचित्र रेखाटलें आहे, तें पाहिल्यास अशा गृहकर्मकुशल, परोपकारदक्ष

औदार्यपावन माउलीच्या पोटीं जन्म घेणारी मुलगी आपल्या गृहकर्त्याल ओळखणार नाहीं, असा तर्क अज्ञानाचा द्योतक ठरेल. लग्न झाल्याव श्री. रमाबाईंना त्यांच्या तीर्थरूपांनीं उत्तम उपदेश केला होता. त्य उपदेशाची ज्योत त्यांच्या हृदयांत अखंड तेवत होती. त्या ज्योतील अधिक उज्ज्वल करून सोडणाऱ्या पतीचें सान्निध्य त्यांना लाभलें आणि त्या उज्ज्वलतर बनलेल्या ज्योतीनेंच चित्तस्थैर्याचा प्रकाश पुरवून श्री. रमाबाईंना प्रतिकूल सासुरवासाच्या पहिल्या बिकट खांचखळग्यांतून अस्खलित तारून नलें. 'चहाडीनें एक कुटुंबच काय पण मोठमोठालीं राज्यें देखील रसातळास जातात' अशा अर्थाचा सदुपदेश श्री. रमाबाईंच्या वडिलांनीं केला होता. या सदुपदेशाची बजावणी अक्षरशः करीत असतां श्री. रमाबाईंना कोणत्या प्रसंगांशीं झगडावें लागलें, याची हकीकत त्यांच्या आठवणीमध्यें मुळांतून पहावी. पतीची आज्ञा पाळावी तर नणंद, सासू वगैरे प्रतिकूळ मंडळींशीं सारा दिवस गांठ; त्यांचा छळवाद ऐकून भारावणारें मन हलकें करायला निवाऱ्याची जागा नाहीं. पुनः पतीच्या नजरेसमोर वावरतांना मुद्रा उदास होऊं देण्याची सोय नाहीं. उदास चर्या पाहून पतीनें त्याबद्दल कारणें विचारलीं तर चहाडखोरीचा गुन्हा घडतो, म्हणून प्रत्यक्ष सौभाग्यदेवतेसमोर खरें बोलण्याची चोरी. श्री. रमाबाईंची 'इकडे आड व तिकडे विहीर' यासारख्या दुहेरी संकटामध्यें वेळ मारून नेतां नेतां कशी त्रेधा उडत असे, याचा त्यांनीं आपल्या 'आठवणीं'त फारच सुरस व बोधप्रद वृत्तांत दिला आहे. प्रपंचपरिवारांतला जुन्या परंपरेचा पायबंद तुटला नसतां, नवीन मन्वंतराच्या प्रगतीमध्यें ओढ घेणाऱ्या व्यक्तींचे कसे हाल होतात, याचें हें एक उदाहरण आहे व याच दृष्टीनें श्री. रमाबाईंनीं दिलेला

इतिहास वाचनीय आहे. परंपरेचे अथवा खोट्या मानाचे भक्त, आपल्या विचाराशीं विसदृश नसलेल्या कर्तव्यांवरदेखील अभिमानास पेटून कसे बोळ फिरविण्याला तयार होतात, याचा एक मासला श्री. रमाबाईंच्या 'आठवणीं'त आहे. वास्तविक पतिसेवा हेंच परंपरेनें स्त्रियांचें आद्य व प्रमुख कर्तव्य मानलें आहे. पतीनें विहिरींत उडी मारून जीव द्यायला सांगितला, तरी पत्नीनें क्षणाचाही विलंब न लावतां पतीची आज्ञा खरी करून दाखवावी, येथवर परंपरेनें पातिव्रत्याची व्याख्या ताणलेली आहे. श्री. रमाबाईंनीं सुशिक्षित व्हावें, अशी माधवरावांची इच्छा व आज्ञा होती, पण एकदां घरांतल्या इतर बायकांनीं आज्ञापालनाचें पतिव्रतांतलें एक कलम धाब्यावर बसविण्याचा श्री. रमाबाईंना उपदेश केला. माधवरावांची प्रथम पत्नी असेंच करीत असल्याचा आणखी वर सहज बुद्धिभेद करणारा वहिवाटीच्या हक्काचा दाखला दिला. आज्ञाभंगाच्या मायावी उपदेशाची ही शर्करावगुंठित विषारी गोळी घशाखालीं सोडून तिच्या अमलानें माधवरावांच्या मनोरथावर घाव घालण्याला कच्च्या पतिनिष्ठेची अल्लड स्त्री सिद्ध झाली असती, परंतु श्री. रमाबाईंची पतिभक्ति रोमरोमांत भिनली असल्यामुळें, या मायावी उपदेशाची मात्रा त्यांच्या मनावर लागू पडली नाहीं. आपल्या पत्नीला शिक्षणाच्या आवडीखातर कोणते खडतर अनुभव येत असतील, हें माधवरावांना कळलें होतें. घरांतल्या सहोदर व सावत्र आतांनीं निष्कारण चालविलेल्या मनोविरसानें त्यांनाही 'त्रासल्यासारखें' झालें होतें. माधवरावांना श्री. रमाबाईंची स्थिति कशी समजली, याची जी मीमांसा 'आठवणींत'* आहे, ती गद्य प्राकृत सुभाषितासारखी आहे. श्री. रमाबाई म्हणतात:—

* आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी पृ. ५५.

बाहेरून कितीही समाधान दाखविलें व त्रासाबद्दल उच्चारही केला नाहीं, तरी खऱ्या प्रेमाच्या माणसांना एकमेकांचीं मनें जितकीं सहज व चांगलीं ओळखतां येतात, तितकीं दुसऱ्या कोणालाही कोणत्याही उपायानें ओळखतां येणें शक्य नाहीं.

माधवराव या परिस्थितीवर उपाय शोधीत असतील. कारण श्री. रमाबाई सांगतात कीं, 'असेच आणखी दिवस गेले असते, तर हा आवरून धरलेला बांध फुटला असता व कांहींतरी त्रास उद्भवण्याची भिति होती. पण पुण्याई सबळ म्हणून....लवकरच आमची बदली नाशकास झाली.' जानेवारी महिन्यांत माधवराव नाशकास गेले. तेथून रजा घेऊन परत पुण्यास आल्यानंतरचा अपमृत्यूचा प्रसंग या प्रकरणच्या सुरुवातीस सावंत दिला आहे. प्रकृति सुधारून मार्च महिन्यांत माधवराव दोघा धाकट्या भावांसह सपत्नीक नाशकास गेले. वडील बायका मुद्दामच बरोबर नेल्या नव्हत्या. स्वातंत्र्याच्या वातावरणांत विहरण्याचा काळ नजीक आला, तेव्हां श्री. रमाबाई दोन आठवडे भावी कर्तव्यांच्या मनोराज्यांत गढून गेल्या होत्या. जिवावरच्या दुखण्यांतून माधवराव बचावले म्हणून, पुणेकरांनाही यावेळीं आनंद झाला होता.

# प्रकरण दहावें.

## सरकारी इतराजीचा फेरा.

नाशकास पोंचल्यावर तेथल्या एकंदर परिस्थितीचें निरीक्षण करून, आपलीं लोकोद्धाराचीं कामें कशी सुरू करतां येतील, याचा माधवरावांच्या डोक्यांत विचार चालू असतां त्यांनीं एका कामाची जाहिरात वृत्तपत्रांकडे पाठवून दिली. पुण्यांतील कार्यांच्या मालिकेंत त्यांनीं वाङ्मयाला स्थान दिल्याचें आठवत नाहीं. त्यांच्याकडे होतकरू ग्रंथकारांचीं हस्तलिखितें किंवा छापील पुस्तकें अभिप्रायासाठीं पुष्कळच येत असत, परंतु महाराष्ट्राच्या ग्रंथवृद्धीकरितां त्यांनीं एखादी संस्था काढल्याचें उदाहरण त्यांच्या पुण्याच्या कारभारांत दिसत नाहीं. नाशकास गल्यावर त्यांनीं तशी संस्था काढण्याचा बेत नक्की केला व तोबडतोब कार्यक्रमाची रूपरेषा आंखून वृत्तपत्रांमध्यें जाहिराती पाठवून दिल्या. माधवराव आजारी पडण्याच्या सुमारास या जाहिराती प्रसिद्ध झाल्या. 'मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी' हें त्यांनीं काढलेल्या संस्थेचें नांव होतें. 'इतिहास, शास्त्रें, देशाची सुधारणा, सन्मार्गवर्तीचीं चरित्रें, धर्म, उपयुक्त कथा, संस्कृत उपयुक्त विषय' अशीं नानाविध विषयांसंबंधीं पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा ग्रंथोत्तेजक मंडळीचा उद्देश होता. मंडळीच्या

स्थापनेचा समारंभ मे महिन्यांत पुण्यास झाला. पांचशें वर्गणीदार मिळतांच कामाला सुरुवात करण्याचा मंडळीचा बेत होता. पुस्तकें पसंत करण्यासाठीं रावजी शास्त्री गोडबोले, कृष्णशास्त्री चिपळूणकर व कृष्णशास्त्री तळेकर, या तिघा विद्वान् गृहस्थांची कमिटी नेमण्यांत आली होती. या कामांत माधवरावांच्या जोडीला गोपाळ हरि देशमुख अग्रेसर होते. संस्थेचा मुख्य उद्देश माधवरावांनीं खालील शब्दांत दिलेला आहे.:—*

पुस्तककर्त्यांनीं पुस्तकें लिहिण्याची मेहेनत घेतल्यावर त्या पुस्तकांची योग्यता चांगली आहे अशाविषयीं लोकांच्या घरोघर जाऊन अभिप्राय मिळविण्याची खटपट करावी लागते व मग ते प्रसिद्ध करण्याकरितां वर्तमानपत्रांकडे जावयाचे. या ग्रंथकाराच्या मार्गांतल्या अडचणी दूर व्हाव्या म्हणून मंडळी निघाली. हा उद्देश सर्वसंमत आहे.

महाराष्ट्रांत ग्रंथकारांना प्रोत्साहन मिळण्याकरितां ही संस्था निघाली, त्याचवेळीं गणेश वासुदेव जोशी कलकत्त्यास वृत्तपत्रकारांचें संमेलन भरविण्याच्या गर्दींत होते. वृत्तपत्रकारांना एकत्र गोळा करून, त्यांचें संमेलन भरविण्याची कल्पना पुण्याच्या सार्वजनिक सभेच्या चालकांनीं काढली व एका पुणेंकरानें तिला कलकत्त्यास मूर्त स्वरूप आणलें, हें महाराष्ट्राला अत्यंत अभिमानास्पद आहे. वृत्तपत्रकारांचें संमेलन या वर्षींच भरण्याचें कारण, लिटनसाहेबांनीं योजलेला मुद्रणस्वातंत्र्याची मुस्कटदाबी करणारा कायदा, हें होय. देशीं वृत्तपत्रें बेजबाबदार रीतीनें यद्वातद्वा लिहून सरकाराविषयीं अप्रीति वाढवितात, राजद्रोहाचा प्रसार करतात, असें लिटनसाहेबांच्या डोक्यांत भरवून, त्यांच्या सल्लागारांनीं देशी वृत्तपत्रांची गळचेपी करण्यासाठीं कायदा अम-

* १८८१ सालचा 'मंडळी'चा दुसरा अहवाल.

त्यांत आणण्याची व्यवस्था केली होती. प्रस्तुत कायदा म्हणजे सगळ्या वृत्तपत्रकारांवर कोसळलेली एक आपत्तीच होती. सदर कायद्याचा प्रतिकार करण्याची भावना त्यांच्यामध्यें उत्पन्न झाली होती. या प्रतिकारभावनेंतून त्यांची संघशक्ति निर्माण करावी, असा माधवरावांचा विचार होता. त्यांच्याच प्रेरणेनें सार्वजनिक काकांनीं कलकत्त्यास संमेलन भरविलें, असें मानायला जागा आहे. हिंदुस्थानाच्या उद्धाराला National Press, National Education व National Church या तीन साधनांची अत्यंत आवश्यकता आहे, असें या दिवसांत टिळक—आगरकरांना लिहिलेल्या एका पत्रांत त्यांनीं म्हटलें आहे. सर्व वृत्तपत्रकारांमध्यें राष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न होण्याला कांहींतरी कारण हवें होतें. तें कारण लिटनसाहेबांच्या कायद्यानें उपस्थित केलें त्याचा फायदा घेण्याची क्रिया सुरू झाली. कलकत्त्याचें संमेलन आटपून फिरत फिरत 'सार्वजनिक काका' मार्च महिन्यांत पुण्यास आले. परंतु ते स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं मुंबईस वृत्तपत्रकारांचें संमेलन भरविण्याचा उद्योग चालविला व त्या महिन्याच्या अखेरीस इंदुप्रकाशपत्राचे तत्कालीन संपादक जनार्दन सुंदरजी कीर्तीकर यांच्या अध्यक्षत्वाखालीं मुंबईचें संमेलन निर्विघ्न पार पडलें.

एप्रिल महिन्याच्या शेवटीं माधवराव पुण्याला उन्हाळ्याच्या रजेंत आले. पुण्यास येतांना त्यांनीं लोकजागृतीचें काम बरोबर आणलें होतें. मे महिन्याच्या पहिल्याच आठवड्यांत सार्वजनिक सभेच्या विद्यमानें पुण्याच्या नागरिकांनीं, देशी वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करणाऱ्या कायद्याचा निषेध व्यक्त करण्यासाठीं, जंगी सभा भरविली. त्या सभेला अनेक अंमलदार हजर होते. मग माधवराव असतील, हें सांगण्याची

गरजच नाहीं. या सभेला बरेच सरदार देखील आले होते. या सभेनें कांहीं ठराव पास केल्यानंतर व्हाइसरायसाहेबांकडे धाडण्यासाठीं एक अर्ज पसंत केला. सदर अर्ज माधवरावांच्या हातचा होता. त्यांत देशी भाषेंतल्या वृत्तपत्रांविषयीं सरकारानें जो प्रतिकूल ग्रह करून घेतला आहे, तो रास्त नाहीं; असें सप्रमाण दाखवून दिलें. १८७७ सालांत रशियाचें व तुर्कस्थानाचें रणकंदन माजलें होतें. तुर्कस्थानाबद्दल हिंदी मुसलमानांना सहानुभूति वाटते, हें प्रसिद्धच आहे. प्रस्तुत संग्रामांत तुर्कांची बाजू इंग्लंडनें संभाळली व रशियाच्या विजयाचे दुष्परिणाम टाळले, परंतु लढाईचा निकाल लागण्यापूर्वी हिंदुस्थानांतल्या वातावरणांत क्षोभाच्या उष्ण लहरी खेळत असल्याचा सरकारास अनुभव आला व या क्षोभाला देशी भाषेंतलीं वृत्तपत्रें मदत करतात, असा सरकारचा ग्रह झाला. मुस्कटदाबीच्या कायद्याचें तुर्को-रशियन युद्ध हें कारण आहे, असा त्याला जन्मास घालतांना सरकारानें खुलासा केला होता. कायदा पास झाल्यावर इंदुप्रकाश पत्राला मुंबईच्या पोलेस कमिशनरानें तंबी दिली, पुण्याचें 'किरण' पत्र तर त्यानें नामशेषच केलें; आणखी कित्येक वृत्तपत्रांना हा कायदा बोंचला. या सगळ्या वृत्तपत्रांचें माधवरावांच्या अर्जांत समर्थन आहे. जातीजातीतल्या वैमनस्याचा बागुलबोवा, या कायद्याच्या जन्मकाळीं, सरकारानें पुढें केला होता. धार्मिक व सामाजिक विचारकलह चालू असतां दोन पक्ष एकमेकांवर तुटून पडतात व परस्पराविषयीं जलाल भाषा वापरतात, हें खरें असलें तरी त्यायोगानें जातीजातींमध्यें धार्मिक वैमनस्य उत्पन्न होतें, हा सरकारचा समज खरा नाहीं, असें माधवरावांनीं या अर्जांत दाखविलें आहे.

म महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत पुण्याची व्याख्यानमाला सुरू झाली, व माधवरावांचा बराच वेळ तिकडे खर्ची पडूं लागला. जातांजातां सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे शिवाजी व अफझुलखान यांच्या झटापटींतून कोणतें तात्पर्य काढावयाचें, याविषयीं सदर व्याख्यानमालेंत एक व्याख्यान झालें, ही होय. या वादानें महाराष्ट्राच्या राजकीय वातावरणांत पुढें एकोणीस वर्षांनीं काळेकुट्ट ढग उत्पन्न केल्याचें, ही गोष्ट वाचतांना, स्मरण झाल्याशिवाय रहाणार नाहीं. व्याख्यानमालेंत माधवरावांनीं एखादें पुष्प गुंफल्याची नोंद तत्कालीन वृत्तपत्रांत सांपडत नाहीं. कदाचित् या दिवसांत कृष्णशास्त्री चिपळूणकर अजारी होते व यांच्या समाचारांत माधवरावांचा वेळ जात असल्यानें, व्याख्यानाची तयारी करण्याला फुरसत मिळाली नसेल. मध्यंतरीं ता. ११ मे रोजीं पुण्याला ग्रंथकारांचें पहिलें संमेलन भरलें होतें व त्यांत माधवरावांनीं भाग घेतला होता. भाग घेतला नसता तरच आश्चर्य, कारण हें संमेलन भरविण्याची कल्पना माधवरावांचीच होती. त्याविषयीं अगोदर एकदोन महिने वाटाघाट चालली होती. परंतु हें संमेलन विशेष यशस्वी झालें नाहीं. संमेलनाची व्यवस्था नीट नसावी, असेंही वृत्तपत्रांतील टीकेवरून दिसते. ग्रंथकार जातीनें थोडे आले होते. पुष्कळांनीं पत्रें पाठविलीं होतीं. जे आले होते, त्याची सरबराई योग्य रीतीनें झाली नाहीं. कित्येकांनीं शंका काढली कीं, संमेलनाच्या संस्थेमुळें कांहीं फायदा होणार नाहीं, चारदोन वर्षें तिच्या अस्तित्वाची टिमकी वाजेल व मग तिचें स्मरणदेखील कोणास रहाणार नाहीं. संमेलन एका दिवसांत आटोपलें, समारोप करतांना माधवरावांनीं वरच्या शंकेला उत्तर दिलें. शंका घेणारांपैकी कांहींनीं विलायतकडच्या ग्रंथवृद्धिकारक संस्थांची

उदाहरणें सांगितलीं होती. माधवरावांच्या भाषणांत वरच्या दोन्ही आक्षेपांना उत्तर आहे. त्यांनीं प्रथम इंग्लंड, युरोप व हिंदुस्थान या देशांतले भेद दाखवून तिकडच्चें सर्वांशीं अनुकरण करणें कसें शक्य नाहीं, याचा ऊहापोह केला आहे. पहिल्या आक्षेपाला 'संस्था निघून लयाला गेली तरी तिचा उपयोग आहे.' असा त्यांनीं आशादर्शक जबाब दिला आहे.

कृष्णशास्त्री चिपळूणकर आजारी होते, असा उल्लेख वर आला आहे. ता. २० मे रोजीं दुपारीं त्यांना मृत्यूनें गांठलें आणि महाराष्ट्रसरस्वतीच्या गळ्यांतला एक मणि कायमचा दृष्टीआड झाला. चिपळूणकरांचा व माधवरावांचा अतिशय स्नेह होता. दोघांच्या वृत्तीची तुलना केल्यास मात्र या जोडीमध्यें विलक्षण फरक दिसून येतो. माधवरावांचा ईश्वरावर पूर्ण विश्वास, तर कृष्णशास्त्री निस्सीम नास्तिक. माधवराव वैराग्याचे भक्त, तर कृष्णशास्त्री अतिरसिक, माधवराव कृष्णशास्त्र्यांच्या नास्तिकपणाकडे पाहून त्यांस Philosophical thiest—तात्त्विक ईश्वरवादी—असें म्हणत असत. व्यावहारिक दृष्टीनें कृष्णशास्त्री नास्तिक असले तरी तत्त्वतः नास्तिक नव्हते, असा माधवराव त्यांच्या विचारसरणीचा अर्थ करीत असत. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं महाराष्ट्राची व मराठी भाषेची, अशी दुहेरी सेवा बजावली. तिच्यांतला भाषेच्या सेवेचा भाग सर्वांना विदित आहे व त्याचा गौरव केला जातो. पण महाराष्ट्राची त्यांनीं जी इतर महत्त्वाची सेवा पार पाडली, तिची माहिती बहुधा कोणास नाहीं. कृष्णशास्त्र्यांनीं १८५० पासून १८६० पर्यंतच्या काळांत मिशनरी लोकांच्या धर्मप्रसाराला आळा घालण्याचें अत्यंत महत्त्वाचें काम सिद्धीस नेलें.

त्यानंतर ज्ञानप्रकाश पत्रांत तीन चार वर्षें लेख लिहून, नवीन विचारांचा फैलाव केला. विधवाविवाहाला शास्त्रांची आडकाठी नाहीं, अशा अर्थाचे कांहीं लेख त्यांनीं या वेळीं संपादकीय पडद्यामागें राहून लिहिले. १८७० सालीं शंकराचार्यासमोर पंच या नात्यानें त्यांनीं विधवा-विवाहाला अनुकूल मत दिलें. ते सार्वजनिक सभेच्या कामांत अत्यंत उत्साहानें व कळकळीनें पडत असत. माधवराव पुण्यास येण्यापूर्वीच्या काळांत त्यांच्याकडेच सभेचें कर्णधारत्व होतें, असा पुरावा आहे. सार्वजनिक सभा काढण्याचें ठरत होतें, तेव्हां सार्वजनिक काकांना कृष्णशास्त्र्यांकडून जितकें प्रोत्साहन मिळालें, तितकें दुसऱ्या कोण-त्याही इसमांकडून मिळालें नाहीं. 'सार्वजनिक सभेचे ते एक अत्यंत मेहेनती सभासद होते' असें त्यांच्या मृत्युलेखांत ज्ञानप्रकाशकारांनीं म्हटलें आहे. ते सरकारी नोकर होते, पण सरकाराला न आवडणाऱ्या कित्येक बाबींत त्यांचा सडेताडेपणा दिसून येत असे व तसाच निःस्पृह बाणेदारपणा त्यांनीं सार्वजनिक सभेच्या कामांत दाखविला. असे निर्भीड, देशहितैकनिष्ठ, वजनदार आणि विद्वान साह्यकर्ते भोंवताली होते, म्हणूनच माधवरावांना सार्वजनिक सभेच्या कार्याची इमारत रंगारूपाला आणतां आली. त्यांच्या मृत्यूनंतर पुण्यास माधवरावांनीं ता. २४ मे रोजीं भरविलेल्या स्मारक सभेला मुद्दाम खंडाळ्याहून भांडारकर, तेलंग वगैरे मंडळी आली, हें मयत शास्त्रीबोवांविषयीं महाराष्ट्रांतल्या नवीन पुढाऱ्यांना किती आदर वसत होता, याचें द्योतक आहे. निःस्पृहता, सत्याभिमान, करारीपणा हे गुण कृष्णशास्त्र्यांच्या स्वभावांत उत्कट-त्वानें वसत होते. सभेंत माधवरावांचें मोठें भाषण झालें. त्यांनीं कृष्णशास्त्र्यांच्या सार्वजनिक गुणांची प्रशंसा केली. कृष्णशास्त्र्यांनीं

आपली विद्वत्ता, घटपटाच्या निष्फळ कसरतींत फुकट न घालवतां, तिचा लोकांच्या हितासाठीं व्यय केला. ते सरकारचे नोकर होते, प्रजा होते, पुणेंशहराचे नागरिक होते, प्रजा व नागरिक या दृष्टीनें त्यांनीं आपलें कर्तव्य चालविलें होतें. त्यांच्यासारखी नागरिकत्वाची जाणीव फार थोडयांत पहावयास सांपडते. नागरिक म्हणजे नगराचा एक घटक. त्याच्यावर घटक या नात्यानें नगराच्या सामुदायिक जीवनाचा विकास करण्याची जबाबदारी असते. या जबाबदारीची जाणीव कृष्णशास्त्र्यांना होती. नागरिकत्वापेक्षां देशाच्या प्रजेतले आपण एक आहोंत, ही भावना जास्त व्यापक आहे. परंतु तिचाही कृष्णशास्त्र्यांनीं अनादर केला नाहीं. या भावनेमुळें अंगावर पडणाऱ्या कर्तव्याची त्यांनीं अमलबजावणी केली व यांतच त्यांच्या चरित्राचें सारसर्वस्व आहे, असा माधवरावांच्या भाषणाचा इत्यर्थ आहे.

माधवरावांच्या मागून कुंटयांचें कृष्णशास्त्र्यासंबंधीं स्तुतिपर मार्मिक भाषण झालें, हें वाचून वाचकांना अचंबा वाटण्याचा संभव आहे. कृष्णशास्त्र्यांबद्दल एकदां कुंटयानीं कुत्सित विधान केल्यामुळें, विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या मनांत कुंटयाविषयीं दीर्घद्वेष उत्पन्न झाला, असा वृत्तांत धाकटया शास्त्रीबोवांच्या चरित्रकारानें लिहिलेला आहे. परंतु कृष्णशास्त्र्यांबद्दलचें खोडसाळ विधान उच्चारतांना कुंटयांच्या हृदयांत पाप असेल, असें त्यांच्या प्रस्तुत सभेंतल्या भाषणावरून म्हणवत नाहीं. कुंटे फटकळ होते. त्याना बोलतांना आगापीछा रहात नसे, यामुळें त्यांनीं विष्णुशास्त्र्यांदेखत त्यांच्या वडिलांबद्दल मर्मभेदक वाक्य उच्चारलें, ही गोष्ट खरी मानली तरी कृष्णशास्त्री व कुंटे या दोन व्यक्तींमध्यें परस्पराविषयीं आदर असावा, असा निष्कर्ष काढण्याजोगीं कांहीं उदा-

हरणें आहेत. कृष्णशास्त्र्यांच्या मृत्यूनंतर कुंट्यांनीं हा आदर सार्थकी लावला. कृष्णशास्त्र्यांनीं लेखणी हातांत धरण्यापूर्वीं मराठी भाषेची अवस्था हीन होती. लोकांच्या आपापसांतल्या व्यवहारामध्यें तिचा उपयोग होता. कचेऱ्यांतल्या कारकुनांची भाषा, एवढाच तिला मान होता. वाङ्मय किंवा सारस्वत या दृष्टीनें जगांतल्या इतर समृद्ध भाषांच्या बरोबरीला बसण्याची तिची प्राज्ञा नव्हती. कृष्णशास्त्र्यांनीं तिला बाजारांतून, घरांतून व कारकुनांच्या दप्तरांतून बाहेर काढून गौरवाच्या स्थानावर बसविलें, असा कुंट्यांच्या भाषणाचा सारांश आहे.

उन्हाळ्याची रजा संपल्यावर, जून महिन्यांत माधवराव नाशकास गेले. सभा भरवायच्या, लोक बोलवायचे, भाषणें करावयाचीं, हा माधवरावांचा क्रम, नाशकासही सुरू होता. तेथें त्यांनीं वाचनालय काढलें, नगरभवन ( टाउन हॉल ) बांधण्याची वाटाघाट आरंभली. प्रार्थनासमाजाच्या स्थापनेचा विचार चालविला. नाशिक हें क्षेत्र अर्थात् धर्माचें माहेरघर. त्या ठिकाणीं माधवरावांनीं सामाजिक सुधारणेच्या विचारजागृतीला सुरवात केली, तेव्हां गोदाकिनारीं प्रतिकूळतेच्या लाटावर लाटा आदळूं लागल्या. त्या दिवसांत नाशकास असलेल्या एका गृहस्थानें आपल्या रोजनिशींत लिहून ठेविलें आहे कीं,* रा. ब. रानडे स्वधर्माविषयीं अनादरानें बोलतात, ही गोष्ट फार वाईट आहे. हाच गृहस्थ पुढें माधवरावांचा चरित्रकार बनला. नाशकास माधवरावांनीं दिलेलीं व्याख्यानें, एकाखेरीज बाकी, अनुपलब्ध

---

* कै. बा. वा. रानडे यांच्या खाजगी रोजनिशींतली ही गोष्ट आहे. रोजनिशी खाजगी स्वरूपाची असल्यानें साहजीकच अप्रसिद्ध व अप्रकाशित आहे.

आहेत. एकच व्याख्यान इंदुप्रकाशांत सांपडलें. तें लहानसें असल्यानें समग्र, जसें मुळांत प्रसिद्ध झालें तसेंच, पुढें दिलें आहे.

ह्याविषयाचे संबंधानें येवढा वेळ येथें झालेली सर्व वाटाघाट पाहतां, जसा एकाद्या लहानशा गांवांत एकादा सावकार असतो; व त्याची त्या गांवांतील पाटील, कुळकरणी, भट, पुराणिक वगैरे सर्व लोकांस नेहमीं जरूर असते आणि त्याप्रमाणें ते सर्व त्याच्याशीं व्यवहारही करीत असतात; पण एकादे वेळीं त्या गरजू लोकांपैकींच जो पुराणिक असेल, त्याला विचारावें कीं, बाबा, हा गांवांतील सावकार व त्याचा पैसा कसा आहे ? म्हणजे तो खाडकन् सांगेल कीं, अरेरे ! त्या सावकाराचें नांव देखील काढूं नका. तो आज हे जगत् बुडवायाला बसला आहे ! पैशासारखी मोहकारक व परमार्थास अडविणारी वस्तु ह्या जगत्र-यांत नाहीं, वगैरे. सारांश पुराणिकबोवा ह्या वेळीं सावकाराशीं पदोपदीं लागणारी जरूर अगदीं विसरून वाटेल तशी त्याची निंदा करतील, त्याप्रमाणेंच येथें इंग्रेजी विद्येच्या संबंधानें झालेल्या कोटया होत. वास्तविक इंग्रजी भाषेचे लाभ व तिचा आपला संबंध किती, हें कोणीच पाहत नाहीं. आतां खरा विचार केला तर ह्या भाषेचे व त्यांतील विद्येचे लाभ काय ? हें कोणासही नुसतें सांगि-तल्यानें समजावयाचें नाहींत व तसें सांगतांही येत नाहींत. त्याचा खरा अनुभव त्या भाषेचा व विद्येचा अभ्यास केल्याशिवाय समजणार नाहीं. तसेंच आज आपणांस इंग्रजी भाषा म्हणजे केवळ इंग्लंडांतील न घेतां पश्चिमेकडील सर्व सुधार-लेल्या राष्ट्रांची मिळून एकंदर मानिली पाहिजे. कोणी म्हणतात कीं, आमच्या इकडे काय भाषा नाहींत कीं, विद्या नाहींत ? आम्हांस परकीयांचें येवढें भूषण कशास पाहिजे ? ह्यावर आमचें म्हणणें इतकेंच आहे कीं, आपल्या विद्या व युरोपियन विद्या ह्यांची जर आपण तुलना केली, तर आपल्या विद्या अगदी भरभराटीच्या काळांतही केवळ बाल्यावस्थेंत होत्या, व सांप्रतची युरोपियनांची विद्या तारुण्य दशेंत आहे, असें सहज दिसून येईल. ह्या जगतामध्यें कांहीं राष्ट्रें संपन्न असतात व कालगतीनें तींच दुबळीं होतात; अथवा दुबळीं असतात तीं संपन्न होतात. ही राहटी सतत चालू आहेच; परंतु त्याजमध्यें खऱ्या विद्येचा संसर्ग कोणास झाला व कोणास

नाहीं, हें मात्र पाहिलें पाहिजे. नाहीं तर शेकडो विद्वान् ग्रंथ पाहतां पहातां जन्माचे जन्म घालवितात; पण त्याचा उपयोग त्यांस काडीमात्र झालेला नसतो. तेव्हां अशा विद्येचा व राष्ट्राचा काय उपयोग? वास्तविक म्हटलें तर विद्या शिकून आपण कोण, आपलें कर्तव्य काय? व आपणास या जगांत काय करावयाचें आहे? वगैरे गोष्टी मनुष्यमात्रास अवश्य समजल्या पाहिजेत; त्या ज्या विद्येच्या कोटि ग्रंथापासून देखील समजत नाहींत ती विद्या कोठली? व तिचा काय उपयोग? मनुष्यास जी विद्या सदरील गोष्टींचें ज्ञान करून देते, तीच त्यास शिकणें आहे. एरवीं रसायनशास्त्रें किंवा पदार्थविज्ञानशास्त्रें कांहीं सर्वांस शिकावयाचीं नाहींत व तीं सर्वांनीं शिकण्यापासून फायदाही नाहीं. आतां हाच विद्या शिकण्याचा मुख्य हेतु असें धरून पाहिलें, म्हणजे हें शिक्षण आपल्या कोणत्याही विद्येंत आजपर्यंत आलें नाहीं. इतकेंच नाहीं तर साहजिक मनुष्याच्या मनांत जो उत्साह व जी पुरुषार्थाकडे प्रवृत्ति असते ती देखील नष्ट करून घेण्याकडे आपल्या मागील विद्येचा आपण उपयोग केला. त्या योगानें हल्लीं देखील आपलीं अंतःकरणें इतकीं सोसक झालीं आहेत कीं, तीं चांगल्या अभ्यासाशिवाय कर्तव्यास अनुसरणार नाहींत. सांप्रत जरी आपली विद्या अगदीं लयास पोंचत आहे, तरी तिचा ऐन भरभराटीचा म्हणजे रामराज्यांतील जरी काल धरिला तरी त्यावेळेसही ह्या विद्येच्या संसर्गानें लोकांच्या मनाची स्थिति व त्यांची पुरुषार्थाविषयीं बुद्धि हीं पाहिलीं असतां ह्या राष्ट्राची स्थिति अगदीं बाल्यावस्थेंत होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण मनुष्याचे हक्क काय? व त्यास करावयाचें आहे काय? हें हल्लीं जसें थोडेबहुत युरोपियनांस समजतें त्याचा त्या वेळेस गंधही नव्हता, असें म्हटल्यास चालेल. रामराज्यांत अन्य जातीनें श्रुति ऐकिल्या असतां त्यांच्या कानांत शिसें ओतावें! कोणे एका शूद्रानें तपश्चर्या आरंभिली होती, त्या योगानें पातक होऊन पृथ्वीवर अनर्थ होऊं लागले!! व ही गोष्ट रामचंद्रास कळतांच त्यानें त्या शूद्रास देहान्तशासन केलें!!! असा न्याय होता. तेव्हां अशा समजुतीच्या राष्ट्रास कोणची अवस्था द्यावी ह्याची देखील पंचाईत वाटते. आह्मांस तर ह्या अवस्थेस बाल्यावस्था म्हणण्यापेक्षां वृद्धावस्था व त्यांतही अगदीं आसन्नावस्था

म्हटल्यास चिंता नाहीं असें वाटतें! पण ही स्थिति ज्या विद्येच्या आकंठ सेवनानें प्राप्त होणार तीसही नांव देणें म्हणजे कांहीं सुचत नाहीं. मोठमोठे पंडित, शास्त्री वगैरे लोकांनीं आपलें कर्तव्य व आपल्या विद्येचा उपयोग करणें म्हणजे जो कोणी शूद्र, गवळी अथवा दुसरा जो कोणी राजा असेल त्याची मोठमोठाले अलंकार घालून कूटकवितांनीं पाहिजे तशी स्तुति करणें व त्याचें प्रेम आपल्यावर राखणें, ह्याशिवाय कांहीं समजत नसत. मग तो राजा शूद्र असो, भितरा असो, मूर्ख असो, जुलमी असो, कसा कां असेना; त्याकडे पाहावयाचें नाहीं!! जन्मभर ग्रंथांचे ग्रंथ उलथे करणाऱ्या विद्वान पंडितांकडून एकदां राजाला बृहस्पतीसारखा विद्वान, पर्वतासारखा गंभीर, कुबेरासारखा संपत्तिमान, वगैरे ठरीव विशेषणें मिळालीं म्हणजे राजाच्या जन्माचें सार्थक झालें व त्याच्या कर्तव्याचीही पूर्णता झाली. मग प्रजापालन कसें कां असेना. बरें, इकडे शास्त्रीबोवांनाही एक खाशी शालजोडी व दुसरी कांहीं संभावना झाली, म्हणजे जन्मभर केलेल्या अध्ययनाचें व तज्जन्य ज्ञान संपादनाचेंही चीज झालें!!! ही राजपंडितांची गोष्ट झाली. ह्याशिवाय इतर प्रजेचा व राजाचा संबंध पाहिला तर तो अगदींच भयंकर म्हणजे त्या पंडितमान्य सर्वसंपन्न राजानें प्रजेशीं हवें त्या रीतीनें व हवें त्या न्यायानें जरी आचरण केलें, तरी त्याच्या प्रजेनें सहन करणें तर राहिलेंच, पण त्या विरुद्ध एक चकारशब्द देखील उच्चारणें म्हणजे नरकाचें साधन करणें होय! तेव्हां अशा राजा व प्रजेच्या संबंधांत सुखाच्या व पुरुषार्थाच्या गोष्टी स्यतेस करण्याची सवड मिळणें अगदीं दुरापास्त होय! करितां सांप्रत ह्या विद्येस एकीकडे ठेवून आपले खरे हक्क कळविणारी जी विद्या असेल ती आपणास घेतली पाहिजे; मग ती आपली असो किंवा परक्यांची असो. व हें जर खचित झालें तर मग मनुष्यमात्रास इंग्रजी विद्येशिवाय दुसरी विद्याच खरें ज्ञान देणारी नाहीं असें म्हणण्यास काय चिंता आहे! केवळ इंग्रजी राज्य आपणावर आलें आहे म्हणून मात्र ती विद्या शिकणें नसून आपण ह्या अज्ञानांत गर्क असतां अनायासानें ही विद्या प्राप्त करून घेण्याचा प्रसंग आज आपणांस आला आहे हा आपला सुदैवाचा दिवस समजला पाहिजे. राज्याचाच संबंध म्हटला तर जे इतर जपानी, चिनी, वगैरे लोक

हजारो रुपये खर्चून व श्रम करून ही विद्या शिकतात व तिची थोरवी मानितात ते काय म्हणून ? त्यांवर तर कांहीं इंग्रजांचें राज्य नाहीं ना ? पण जी गोष्ट खरी महत्वाची आहे तीस हीं उपकरणें कांहींच लागत नाहींत. हें महत्व जर त्या लोकांस समजलें नसतें, तर ते कधींही इतका श्रम व खर्च करितेना ! व आपलीं तरुण मुलें परदेशास ह्या विद्येकरितां पाठवितेना. सारांश, नौकरी मिळविण्याकरितां अथवा आपल्या राज्याशीं किंवा त्याच्या कामदाराशीं उगीच 'शेकहॅन्ड' करण्याकरितां इंग्रजी शिकणें नसून, ह्या जगांत येऊन आपणांस काय करावयाचें आहे हें ज्यांस समजणें आहे त्यांस हीं विद्या शिकणें अवश्य आहे. व हा लाभाचा प्रसंग आपणास फार चांगला व अनायासें प्राप्त झाला असून, चिनी किंवा जपानी लोकांपेक्षां फार सुलभतेनें प्राप्त होणारा आहे, हें प्रत्येकानें लक्षांत वागवून त्याची हयगय बिलकुल न करितां करवेल तितका ज्ञानाचा संग्रह करून जगतांतील आपले हक्क ओळखावे, व सांप्रत विद्येनें जें आपल्या राष्ट्रावर आज हजारो वर्षें आभाळ कोसळलें आहे, तें दूर करून आपला पुरुषार्थ गाजवावा, व राष्ट्रास तारुण्यदशा आणावी.

या भाषणावर भाष्य करण्याची गरजच नाहीं. तें जेव्हां प्रसिद्ध झालें तेव्हां अनेक वृत्तपत्रांतून त्यावर टीका झाली. रा. ब. रानडे आमचे जुने शास्त्रग्रंथ न पहातां त्यांची निंदा करतात, असें याप्रसंगीं त्यांच्या पुष्कळ टीकाकारांनीं म्हटलें आहे. परंतु विद्याप्राप्तीचें ध्येय आणि जुन्या नव्या विद्येच्या परिणामांतला फरक, यांचें जें वर्णन माधवरावांनीं आपल्या भाषणांत केलें आहे, तें अयथार्थ आहे, असें आज कोणी म्हणेलसें वाटत नाहीं. या व्याख्यानाला 'इंग्रजी भाषेंतील विद्या' असें नांव असून, ता. १८ ऑगस्ट १८७८ रोजीं झालें. ९ सप्टेंबर १८७८ च्या इंदुप्रकाशांत तें प्रसिद्ध करण्यांत आलें. या व्याख्यानावरून माधवरावांच्या कर्तबगारींतलीं कित्येक गूढें उकलतात.

हें भाषण होऊन त्यावरील टीका चालू असतां माधवरावांचें एक फार दिवसांचें कांक्षित फळास आलें. १८६९ सालीं दिवाणी कोर्टांच्या

सुधारणेसंबंधीं निबंध लिहितांना सुरुवातीस त्यांनीं आपल्या प्रांतांत भारदस्त विषयांच्या विवेचनाला वाहिलेलें एकदेखील त्रैमासिक नाहीं, असा उल्लेख केला आहे. सार्वजनिक सभेमार्फत उत्तम प्रकारें काम सुरू झाल्यावर राजकारण, अर्थशास्त्र, सामाजिक सुधारणा, इत्यादि विषयांची चर्चा करणारें त्रैमासिक काढण्याचा बेत माधवरावांनीं ठरविला आणि यावर्षीं तो बेत तडीस नेला. जुलई महिन्यापासून मासिकाचे अंक निघूं लागले. जुलई, आक्टोबर, जानेवारी आणि एप्रिल, असें या मासिकाच्या प्रकाशनाचे चार महिने ठरले होते. तथापि माधवराव परगांवीं असल्यामुळें पहिलाच अंक निघण्यास उशीर झाला. या अंकांत माधवरावांनीं लिहिलेलीं दुष्काळविषयक पत्रें आणि 'मुंबई इलाख्यांतील दुष्काळी धोरण' या नांवाचा एक निबंध यांचा समावेश करण्यांत आला. मागल्या हकीकतींत सांगितलेले अर्ज यांतच आहेत. त्रैमासिकाला योग्य, तरुण व तरतरीत असा संपादक हवा होता. सीताराम हरि चिपळूणकर यांची संपादकाच्या जबाबदारीसाठीं निवड झाली. विष्णुशास्त्री चिपळुणकरांचे हे सावत्र चुलते. यांच्यासारखे निःस्पृह व प्रामाणिक गृहस्थ विरळाच आढळतात.

याप्रमाणें माधवरावांच्या बदलीचें पहिलें वर्ष संपलें, आणि सगळ्या महाराष्ट्राला व त्यांतल्या त्यांत पुणें शहराला जाणवलेलें नवें वर्ष सुरू झालें. याची पहिली तिमाही विशेष गडबडीची गेली नाहीं. मार्च महिन्यांत पुढच्या घोटाळ्याचीं दुश्चिन्हें दृष्टीस पडूं लागलीं. 'फडक्यांचें बंड' या नांवानें महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासामध्यें ओळखल्या जाणाऱ्या राजकीय उत्पातानें एप्रिल महिन्यांत चांगलेंच मूर्त स्वरूप धारण केलें होतें. वासुदेव बळवंत फडके ही व्यक्ति १८४५ सालीं

पनवेल तालुक्यांतील शिरढोण या गांवीं जन्मास आली. त्यांचें प्राथमिक शिक्षण कल्याणला झाल्यानंतर, मुंबईच्या ग्रँट मेडिकल कालेजांत त्यांनीं कांहीं दिवस रोगविद्येचा अभ्यास केला. तो पुरा होण्यापूर्वीच त्यास नोकरी धरावी लागली, पण नोकरींत त्यांचें चित्त रमेना. आपला देश इंग्रजी राज्यकर्तृत्वाच्या तावडींतून कसा सुटेल, या विषयाकडे त्यांचें लक्ष लागलें होतें. लष्करी सामर्थ्य उत्पन्न करून त्याच्या जोरावर पारतंत्र्याच्या शृंखला तोडल्याखेरीज तरणोपाय नाहीं, ही कल्पना त्याच्या चित्तांत बाणली. लष्कराच्याच एका खात्यांशीं त्याचा संबंध असल्यानें शस्त्रविद्येचें कामापुरतें ज्ञान करून घेतांना त्यांस अडचण आली नाहीं. १८७८च्या सुमारास ज्या मंडळींना देशाची हालहवाल समजण्याची पात्रता होती, अशा वृद्ध गृहस्थांच्या तोंडून कळतें कीं, फडक्यांचे बंडाचे विचार पुण्यांत त्यावेळीं पुष्कळांना ठाऊक होते. परक्यांच्या अंमलामुळें आपला देश विपत्तींत सांपडला आहे व हरप्रयत्न करून त्याची परवशतेंतून सुटका केली पाहिजे, वगैरे देशाभिमानाचे सामान्य विचार, फडक्यांच्या डोक्यांत लष्करी बंडाचें वारें भरायला कारणीभूत असतीलच; पण सरकारी नोकरीचा आणि इंग्रज राज्यकर्त्यांचा तिरस्कार वाटण्याला, त्यांच्या बाबतींत कांहीं विशेष कारणें घडलीं. तीं क्षुल्लक आहेत. बहुधा प्रत्येक नोकराला त्यांचा अनुभव येतो, पण परिणामाच्या दृष्टीनें विचार केल्यास, त्यानीं फडक्यांच्या हृदयाला असाध्य जखम केली, असा निष्कर्ष काढावा लागतो. एक जिव्हाळ्याच्या नातलग आजारी पडल्यानें, फडक्यांनीं त्याच्या भेटीस जाण्याकरितां रजा मागितली. रजा लवकर मंजूर झाली नाहीं व जेव्हां झाली तेव्हां तिचा उपयोग नव्हता. एक

दोन वेळां असा प्रकार घडतांच फडक्यांनीं नोकरीचें बंधन तोडून टाकलें आणि देशसेवेचा मार्ग धरला. इंग्रजी राज्याचा नाश कसा होईल, हा प्रश्न त्यांना सारखा डंवचीत होता. व्याख्यानें देऊन लोक-जागृति करावी, असें ठरवून ते हा प्रश्न सोडविण्याच्या तयारीला लागले. पनवेल, पळस्पे, पुणें, तासगांव, नरसोबाची वाडी, वगैरे गांवास जाऊन त्यांनीं व्याख्यानें दिलीं. तासगांव, नरसोबाची वाडी या गांवां-तून संचारास जाण्याचें कारण बहुधा ते दत्तभक्त होते, हें असावें. व्याख्यानें देऊन जीभ पुष्कळ शिणविली, पण सद्यःफल कोणतेंच दृष्टीस न पडल्यामुळें, फडक्यांना जास्त धीर धरवेना. ज्ञानानें देशा-तल्यां प्रत्येक व्यक्तिमात्रास जागृत करून, राजकारणाचें अंतिम ध्येय गांठण्याचा मार्ग फार लांबचा आहे. त्याचें आक्रमण करतांना वारंवार निराशा होते व आत्मविश्वासाचें, निश्चयाचें बळ गळायला लागतें. आजच्या राजकीय परिभाषेंत या मार्गाची 'सनदशीर' या कांहींशा निंदागर्भित विशेषणानें सार्वजनिक व्यवहारामध्यें संभावना केली जात असते. या मार्गाचा अवलंब माधवराव आणि त्यांच्या तंत्रानें चाल-णारे महाराष्ट्रांतले पुढारी यांनीं केला होता. फडक्यांनीं प्रथम त्यांचीच कांस धरली, परंतु थोडक्याच अवधींत हा पंथ फल्दायक नाहीं, असा त्यांचा समज होऊन त्यांनीं दुसरा म्हणजे बंडाचा मार्ग स्वीकारला. प्रस्तुत मार्ग तत्कालीन समंजस व शिक्षित लोकांना पटणें शक्यच नव्हतें. १८५७ सालांतलें बंड मोडून या सुमारास नुकतीच कोठें पंधरा वर्षे पार पडलीं होतीं, अर्थात त्या बंडाची हकीकत लोकांच्या स्मरणांत अगदीं शिळी झालेली नव्हती. किंबहुना, नानासाहेब म्हणून धरपकडी करण्याचे प्रयोग १८७० नंतर देखील मधून मधून

सुरू होते. १८७४ सालीं नानासाहेब समजून एका गोसाव्याला ग्वालेरला पकडल्याची कथा विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या चरित्राच्या ज्ञात्यांना विदित आहेच. पंधरावर्षांमागील बंडाच्या आठवणीला वरच्यासारखे प्रसंग ताजेपणा आणून देत. परंतु १८५७ सालानंतर इंग्रजांच्या राज्यकर्तृत्वाची घडी जास्त भक्कम बसली होती व बंडाच्या मार्गाचा नुसता विचारसुद्धां निरर्थक आणि वेडेपणाचा आहे, अशी लोकांची खात्री झाली होती. मग फडक्यांना सुशिक्षित समाजाकडून प्रोत्साहन कसें मिळणार? खेडयांतल्या अडाणी, अनपढ लोकांनीं त्यांस मदत द्यायचें मनांत आणलें असतें, तरी ती देण्याला साधन नव्हतें. फडक्यांच्या कल्पनेचा फोलपणा खेडवळांनादेखील समजण्याजोगा होता. म्हणूनच कीं काय, फडक्यांनीं या सगळ्यांचा नाद सोडला व नगर, नाशिक, खानदेश, वऱ्हाड, या भागांतल्या भिल्लकोळ्यांना हाताशीं धरलें. महाराष्ट्रांतले रामोशी लुटालुटीच्या आशेनें फडक्यांचा पुढारीपणा मान्य करायला तयार झाले. फडके बंडास प्रवृत्त होण्यापूर्वीच कोळी व रामोशी यांनीं दरवडयांचा धुमाकूळ कांहीं मर्यादित टापूंत मांडला होता, असें म्हटल्यास वस्तुस्थितीचा विपर्यास होणार नाहीं. १८७५–७६च्या काळांत पुरंदरच्या रानांत 'होन्या' नांवाच्या एका कोळ्यानें आसपासच्या गांवांतली शांतता व सुरक्षितता नाहींशी केली होती. १८७५ सालीं शेतकऱ्यांच्या दंग्यांची जी लाट उसळून अशांतता फैलावली, तिचे कांहीं परिणाम शिल्लक होते व ते टोळीनें फिरत राहून लुटालूट करणाऱ्या रामोश्यांच्या रूपानें पुणें जिल्ह्याच्या डोंगराळ भागांत प्रत्ययास येत होते. फडक्यांनीं या परिस्थितींतच आपल्या कर्तृत्वाचा फांसा टाकला. १८७९ सालच्या

एप्रिल, मे महिन्यांत त्यांच्या बंडावर खपल्या जाणाऱ्या दरवडयांनीं पुणें जिल्ह्याचें सर्वांग ठणकूं लागलें होतें. वासुदेव बळवंताचें बंड हा एकच विषय लोकांत व सरकारांत गाजत होता.

एप्रिल महिन्याच्या शेवटीं महाराष्ट्रांतले पुढारी व ज्ञाते पुण्यास नेहमींच्या क्रमानुसार जमा होऊं लागले. मे महिन्याच्या वसंतकाळांत व्याख्यानें, वार्षिकोत्सव, वगैरे कार्यांची गर्दी उडाली. एखाद्या मंगलकार्याच्या निमित्तानें एकत्र जमणाऱ्या आप्तांच्या गांठी पडल्या, म्हणजे जशी त्यांच्या चित्तांत उल्हास, उत्साह, आनंद या भावनांखेरीज इतर भावना असत नाहींत, त्याचप्रमाणें, मे महिन्यांत पुण्यास येणाऱ्या मंडळीची स्थिति होत असे. माधवरावांकडे नेतृत्व असल्यामुळें त्यांच्या घरीं सकाळपासून तो रात्रीं दोन दोन वाजेपर्यंत येणाऱ्या जाणाऱ्यांची थाप असावयाची. तुलनाच करावयाची झाल्यास हा प्रसंग मराठ्यांच्या इतिहासांतल्या एका गोष्टीचें स्मरण करून देणारा आहे. पावसाळ्यांत सगळीकडच्या मोहिमा आटपून पेशवे पुण्यास येत. ठिकठिकाणीं स्वारीसाठीं दूरवर गेलेले मराठे सरदारही आपापल्या कामाचा तपशील सांगण्याकरितां पुण्याला जमत आणि मग पावसाळ्याच्या चातुर्मास्यांत पेशव्यांच्या वाड्यांत हिंदुस्थानच्या राजकारणाचीं खलबतें घोटलीं जात.तसाच प्रकार मे महिन्यामध्यें पुण्याला अनुभवास येत होता. ही तुलना वाचीत असतां राजकीय परिस्थितीचा फरक लक्षांत ठेवणें अवश्य आहे.पुणेंशहर हें महाराष्ट्राचें केंद्रस्थान व पुणेंशहराचें केंद्रस्थान म्हणजे माधवरावांचें घर, असा त्या घराचा महिमा माधवरावामुळें वाढला होता. महाराष्ट्रांतले पुढारी पुण्याला एकवटून देशस्थितीची, सुधारणेच्या योजनांची व चालू कार्यांची वाटाघाट माधवरावांच्या

घरीं करीत असत. आपल्या कामांबद्दल माधवरावांकडून प्रशंसेचा शब्द ऐकायला सांपडला कीं, परिश्रमाचें सार्थक झाल्याचा आनंद प्रत्येकाला व्हावा, अशी माधवरावांच्या प्रोत्साहनपर प्रशंसेंत जादू भरलेली होती. मे महिन्याच्या नियमास अनुसरून, पहिला आठवडा दर सालाप्रमाणें यावर्षी यथासांग पार पडला. दुसरा आठवडा संपत आला. या दुसऱ्या आठवड्यांत एका नवीन कार्याचा उपक्रम करण्याचें ठरलें होतें. १८७० सालापासून एकच पुरुषांपुरती वक्तृत्वोत्तेजक सभा होती. यावर्षी स्त्रियांचा वक्तृत्वसभारंभ प्रथमच अंमलांत यावयाचा होता. निश्चयाबरहुकूम ता. १३ मे रोजीं हा सभारंभ अतिशय उत्साहानें व थाटानें पार पडला. त्याकरितां हजर असलेली मंडळी सायंकाळीं घरोघर निघून गेली. त्यांच्या अंतरंगांत आनंदाशिवाय दुसऱ्या भावनेला मुळींच जागा नव्हती. पुण्यासारखें पुराणमताभिमानाचें आगर. चार वर्षांमागें दयानंद स्वामींची राळ उडविण्याचा तेथें कसून प्रयत्न झालेला. पुरुषांच्या सुधारणेला पावलोपावलीं आणि प्रत्यहीं बहुजनसमाजाची प्रतिकूलता नडत होती. स्त्रीविचारवती सभेसारख्या खाजगी, निरुपद्रवी, अनियमित व स्त्रीमय संस्थेलासुद्धां लोक नाकें मुरडीत होते. मग पुरुषांचा अंतर्भाव असणाऱ्या स्त्रियांच्या वक्तृत्वसभेचा नवीन समारंभ प्रतिकूलांच्या विघ्नकारक सांवळ्यागोंधळाशिवाय पार पडण्याची आशा त्याच्या पुरस्कर्त्यांना कोठून असणार? पण दैवयोगानें हा समारंभ अत्यंत उत्साहजनक स्थितीमध्यें शेवटास गेला. समारंभाचे पुरस्कर्ते घरीं परतले, तेव्हां त्यांच्या चित्तांत आनंदाच्या उर्मि उंचबळण्याचें कारण हेंच होय.

रात्रीं दहा अकरा वाजेपर्यंत शहराच्या कोणत्याही भागांत गडबड नव्हती. ही रात्र संकटाची जाणार व त्या रात्रीचें संकट पुढेंही कांहीं

काळपर्यंत पुणें शहराला 'दे माय धरणी ठाय' करून सोडणार, याचें स्वप्न देखील कोणास पडलें नव्हतें. या दिवसांतल्या आनंदाच्या उठावदारपणाला किंचित् फिकेपणा आणणारें काळजीचें एकच कारण होतें. दरवडयांच्या दहशतीनें खेडयापाडयांतलीं सधन माणसें आपल्या वास्तव्यस्थानांचा त्याग करून प्रायः दररोज पुणेंशहराच्या आश्रयाला येत होतीं. त्यांच्याबरोबर दरवडयांच्या बातम्यांचें बाजारबुणगेंही पुष्कळसें येऊन लोकांच्या गप्पाष्टकांना भरती चढे. नागरिकांस वाटणाऱ्या निर्भेळ आनंदाच्या शुभ्रपणाला दरवडयांच्या बातम्या किंचित् मळकटपणा आणीत, परंतु प्रत्यक्ष पुण्याला दरवडयांनीं ग्रासलें नसल्यामुळें 'परदुःख शीतळ' या न्यायानेंच त्याचा निकाल लागत असे. मग भावी संकटाचें दुःस्वप्न कोणालाही दिसलें नाहीं, यांत आश्चर्य कसलें? पुढें प्रकट होणाऱ्या विपत्ति आपली छाया अगोदरच कांहीं वेळ पसरीत असतात, या म्हणींतला सत्यांश निदर्शनास आणणारी एकच गोष्ट त्या दिवसाच्या सायंकाळीं घडली होती. पुण्याला मे महिन्यांत वळवाचा पाऊस पडतो. वळवाच्या सरी म्हणजे पर्जन्यमहाराजांच्या स्वारींतल्या बिनीवरल्या फौजा. त्या कधीं शांतपणानें येत नाहींत. विजांच्या मशाली पाजळीत व मेघगर्जनांचे नगारे वाजवीत, अतिशय उच्छृंखळपणानें यांचा संचार चालतो. त्या संचारांत किती बागांचा फडशा उडेल, किती जुनाट वृक्ष कोलमडून पडतील, किती घरांचीं छपरें उडतील आणि विजांच्या थयथयाटांत कोण प्राणास मुकतील, याचा नियम नाहीं. मंगळवार ता. १३ मे रोजीं सायंकाळीं असेंच एक वळवाचें वादळ पुणेंशहरावरून गेलें. रात्रीं दहावाजेपर्यंत त्यानें गदळून टाकलेलें वातावरण निवळलें. पुण्यपत्तनस्थ

नागरिकांना झोंपेचा अंमल चढूं लागला, जिकडे तिकडे सामसूम झालें. इतक्यांत पुण्याच्या अगदीं गर्द मध्यवस्तींत आगीचे लोक उठले आणि 'बुधवार वाडा पेटला' 'धावा, पळा' अशा अर्थाच्या आरोळ्या ठोकणारांनीं सारें शहर जागें केलें. मंगळवाराची रात्र अमंगळ ठरली.

बुधवार वाडयाची आग विझविण्याकरितां पाण्याचे बंब आले; बंदोबस्ताकरितां पोलीस व लष्करी शिपाई हजर झाले; मदतीसाठीं हजारों माणसें जमलीं. या आगीचा जोर कमी करण्यांत नगरवासी आपापल्या परीनें चूर असतां, विश्रामबागवाडा पेटल्याचा बोभाटा झाला आणि तिकडे माणसें लोटूं लागलीं. पुण्याच्या नागरिकांची हा अग्नि-प्रलय पाहून काय अवस्था झाली असेल, त्याचें ज्ञान कल्पनेवरच सोप-विणें उचित आहे. दोन्हीकडची आग विझविण्यांत सार्वजनिक सभेच्या चालकांनीं अचाट परिश्रम केले. पेशव्यांच्या दोन ऐतिहासिक वाडयांची एका रात्रींत रक्षा झालेली पाहून पुढें कित्येक दिवसपर्यंत सहृदय पुणें-करांच्या डोळ्यांतून दुःखाच्या अश्रुधारा वहात होत्या. पुणेंकरांनीं जर यावेळीं मेहेनत घेतली नसती, तर या आगीनें पुणेंशहराच्या बऱ्याच भागाची राखरांगोळी केली असती. त्यांच्या मेहनतीमुळें विश्रामबाग-वाडयाचा पुष्कळसा भाग बचावला. ही रात्र पार पडली. प्रत्यक्ष अग्नि-नारायण थंड पडत चालला, पण त्यानें सरकाराच्या मानसिक सृष्टींत ठिणग्या फेंकून राजद्रोहाच्या संशयाची खाई पेटविली. बुधवार--विश्रामबाग-वाडयांच्या आगीमुळें सरकारच्या शंकाकुल अंतरंगांत असा लख्ख उजेड पडला कीं, महाराष्ट्रांतल्या सुशिक्षितांचा पुण्याला फार मोठा कट चालला असून, त्यांनीं इंग्रजी राज्य उलथून पाडण्याचा विचार केला आहे. फड-क्यांच्या बंडांत सुशिक्षित 'नेटिव्ह' सामील असून, वाडयांची आग ही एक

त्यांच्या राज्यक्रांतीच्या उद्देशाची जाहिरात आहे. अशी ठाम समजूत झाल्यावर संशयाची खाई भडकायला उशीर लागण्याचें कारण काय? या खाईच्या आगींत तेल ओतायला अँग्लोइंडियन वृत्तपत्रें टपून बसलींच होतीं. त्यांची अगोदरपासूनच पुण्याच्या ब्राह्मणांवर करडी नजर ठेवण्याबद्दल ओरड चालली होती. सरकारची विवेकबुद्धि आतां वाडयांच्या आगीनें वितळूं लागली होती. अँग्लोइंडियनांच्या भीषण कलकलाटानें ती अधिक विदीर्ण झाली. राज्यकारभाराच्या मुख्यासनावर जातिवंत थंड डोक्याचा विचारी मनुष्य असता तर दोन वाडे एका रात्रीस पेटल्याबरोबर त्यांच्या दाहानें तापून तो कावराबावरा झाला नसता. पण त्या आसनावर सर रिचर्ड टेंपल यांच्यासारखा थिल्लर मनाचा गृहस्थ विराजमान झालेला होता. वासुदेव बळवंत फडक्यांचें बंड, पुण्याची आग व अँग्लोइंडियन वृत्तपत्रांचा गोंगाट, याप्रमाणें सिद्धता दिसतांच कटाची कल्पना खरी धरून त्यांनीं भारतमंत्र्याकडे तशी तार पाठविली आणि दडपशाहीच्या शस्त्रागारांतलीं प्रखर आयुधें परजण्याला प्रारंभ केला.

सामाजिक अस्वस्थतेला बाजारगप्पांची जन्मभूमि म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. पुणें शहराच्या जवळपास जिल्ह्यामध्यें बंडाच्या दरवडयांचा वायु फिरत होता, त्यांतच पुण्यास अग्निकल्लोळ उडाला, सरकारला संशयपिशाचिकेनें घेरलें, या परिस्थितींत 'किति पडती, किति झडती, कितीएकांचीं धृतायुधें गळतीं' अशासारखी केविलवाणी दशा होणें स्वाभाविक आहे. मग बाजार मनसोक्त कांहीं खरें व कांहीं खोटें बरळत सुटल्यास आश्चर्य कसलें? सार्वजनिक सभेच्या दसरांची झडती होणार, तिच्या चालकांच्या हातांपायांत

सरकारच्या पाहुणेपणाचे कडीतोडे चढणार, माधवरावांना चौकशी-वांचून हद्दपारीचें शासन मिळणार, अशा अर्थाच्या किंवदंतींचा पुण्याला घरोघर सुळसुळाट झाला. या बातम्यांनीं पुणेंकरांना गांगरून सोडलें. माधवरावांवर कांहींतरी भयंकर किटाळ येणार असा सर्वांचा समज होण्याला बिलकूल आधार नव्हता, असें मात्र नाहीं. वाड्यांना आग लावणारा गृहस्थ कर्मधर्मसंयोगानें 'रानडे' आडनांवाचा निघाला. माधवरावांचेंही आडनांव तेंच, यापेक्षां आणखी आरोपाला भक्कम पुरावा तो काय पाहिजे ? आगलाव्याचा पत्ता लागतांच मुंबईच्या टाइम्सपत्रानें माधवरावांचें नांव घेऊन किंकाळ्या फोडण्यास प्रारंभ केला. इतके दिवस दबतदबत, उघड नांव न उच्चारतां, जें किल्मिष अँग्लोइंडियन पत्रें व्यक्त करीत होतीं, तेंच आतां राजरोस ओकून टाकून, त्याच्या शिसारीनें सरकारचा कोठा ढवळण्याचा टाइम्सपत्रानें विडा उचलला. टाइम्सचे लेख अवलोकन करून माधवराव सरकारच्या उग्र रोषास बळी पडणार, असा प्रत्येकाचा ग्रह होण्याजोगी पुण्याची स्थिति होती. पण माधवराव हा एक धैर्याचल आहे, याची ओळख पुणेंकरांना झाली. त्यांच्या हृदयाला भयाची बाधा झाली नाहीं. अत्यंत निर्भयपणानें ते आपली दिनचर्या पार पाडीत होते. त्यांनींच आग लावणाराचा सुगावा काढला. पुण्याच्या आगीशीं दरवडेखोरांचा संबंध नाहीं, असें त्यांच्या लक्षांत आलें होतें. त्यांनीं आगीच्या पूर्वी वाड्यां कोण होते, कितीवेळ होते, काय करीत होते, या गोष्टींची चौक केली आणि धाग्याला धागा जोडून खरा गुन्हेगार जाळ्यांत ध वाड्यांतल्या सरकारी बुकडेपोकडील 'रानडे' आडनांवाचा एक क आगीच्या मुळाशीं आहे, असा शोध लागल्यावर, त्यास लवाद व

सार्वजनिक जागेंत बोलावलें व गणेश वासुदेव जोशी वगैरे मंडळींच्या साह्यानें खाजगी तपास केला. कित्येक प्रश्नांच्या उत्तरावरून तोच गुन्हेगार असावा, अशी सर्वांची खात्री झाली व त्याला कोणत्याही प्रकारची सवड न देतां पोलिसांच्या स्वाधीन केलें. पोलिसांत त्यानें अपराधाचा कबूलीजबाब दिला. सरकारी पैशाची अफरातफर छपविण्याकरितां त्यानें वाड्याला आग लावली, असें त्याच्या जबानींत बाहेर पडलें. सरकारच्या अवास्तव संशयाचा पुष्कळसा जोर माधवरावांच्या या कामगिरीनें कमी झाला.

आगलाव्याचा पत्ता लागला, तरी कटाच्या संशयाची खवखव सरकारच्या पोटांत होतीच. त्यामुळें आगीनंतर एका आठवड्याच्या आंत देखतहुकूम धुळ्यास निघून जाण्याबद्दलचें सरकारी आज्ञापत्र माधवरावांच्या हातीं पडलें. वास्तविक कायद्याप्रमाणें ही बदली हायकोर्टाच्या मार्फत व्हावयास पाहिजे होती. पण सरकार यावेळीं शुद्धीवर नव्हतें. त्यानें हायकोर्टाचा अधिकार गुंडाळून ठेवला व आपल्याच जोरांत बदलीचा हुकूम सोडला. माधवरावांनीं ताबडतोब पुणें सोडण्याची तयारी केली. यावेळीं त्यांच्या मित्रांना अतिशय खेद झाला. 'सरकारानें तुमचा छळ मांडला आहे. तुम्ही धुळ्यास जाऊं नका. धुळ्याची हवा माझ्या अशक्त डोळ्यांना मानवणार नाहीं अशा र्थाचा अर्ज तरी पाठवा' अशी मित्रांची विनवणी सारखी सुरू होती. पण माधवरावांनीं निक्षून एकच जबाब दिला कीं:—*

"कोणती गोष्ट मात्र अगदीं सांगूं नका. जोंपर्यंत मला त्यांची नोकरी करावयाची आहे, तोंपर्यंत कोणतीही सबब सांगणें मला आवडत नाहीं. सबब

* निक ...च्या आयुष्यांतील आठवणी पृ. ८०

सांगून विनंती करण्याची वेळ आली कीं, मी राजीनामा देऊन मोकळा होईन. तें मला अधिक पसंत पडेल.

माधवरावांनीं धुळ्यास जाण्याचा निश्चय तडीस नेला. तेथें गेल्यावर त्यांना वेळच्यावेळीं टपाल मिळेनासें झालें, व मिळालें म्हणजे त्यांतलीं बरींच पत्रें फोडून पुन: चिकटविलेलीं असत. त्यांतल्या त्यांत आणखी मौज अशी कीं, जीं बिनफोडलेलीं असत, त्यांच्या खालीं दरवडेखोरांच्या सह्या असत, आपल्या टपालावर पोलिसखात्याकडून नजर ठेवली जात आहे, ही गोष्ट लक्षांत येण्याला माधवरावांना मुळींच वेळ लागला नाहीं. दरवडेखोरांच्या सहीचीं बनावट पत्रें माधवराव जशींच्या तशीं पोलिसांच्या हवालीं करीत. हा क्रम सुमारें दोन महिने चालल्यावर धुळ्याचे इंग्रज असिस्टंट कलेक्टर माधवरावांच्या घरीं संध्याकाळीं आले व माधवरावांना आपल्या बरोबर फिरायला घेऊन गेले. वाटेंत या दुय्यम कलेक्टरसाहेबांनीं माधवरावांपाशीं टपालावर नजर ठेवण्याच्या कृतकर्माबद्दल खेद प्रदर्शित केला. या सुमारास खालीं दक्षिणेंत कलदगी जिल्ह्यांत सरकारचा पाठलाग चुकवीत रानोमाळ पळत सुटलेल्या फडक्यांस पोलिसांनीं पकडलें होतें. फडके गिरफदार झाल्यानंतर जो तपास निघाला, त्यावरून माधवरावांचा दरवडयांशीं मुळींच संबंध नसल्याचें सरकारच्या निदर्शनास आलें आणि माधवरावांस लागलेल्या संशयप्रेरित स्थलान्तराच्या ग्रहणाचा मोक्षकाळ नजीक येऊन ठेपला. आपल्या प्रस्तुत ग्रहदशेच्या फेऱ्याची हकीकत सांगत असतां कै. ना. गोखल्यांजवळ* माधवरावांनीं या प्रकरणाचा जो निष्कर्ष बोलून टाकला, तो त्यांच्या विचार सरणीची तऱ्हा समजण्याच्या दृष्टीनें ध्यानांत ठेवण्याइतका महत्त्वाचा आहे. ते म्हणाले:—

* १९०३ सालांतलें गो. कृ. गोखल्यांचें स्मृतिपर भाषण.

अहो, हल्लींच्या परिस्थितींत अशा गैरसमजुती थोड्या फार अंशांनीं मधून मधून उत्पन्न होणारच. पण असल्या गैरसमजुतीच्या वेळीं आपल्या हातून जास्त आततायीपणाचे प्रकार खचित झालें असतें, हें विसरून चालणार नाहीं.

संकटाच्या सोसाट्यांत सांपडल्यानंतर त्यांनीं सरकारी नोकरीचा पाश तोडून मोकळें व्हावें, अशी इच्छा पुष्कळांनीं प्रदर्शित केली. नाशिकचे कै. गणेशशास्त्री लेले यांनीं एकदां नोकरीचा पाश झुगारून देण्याबद्दल अतिशय कळकळीनें व खऱ्या सदिच्छेनें माधवरावांपाशीं गोष्ट काढली असतां, त्यांनीं जें उत्तर दिलें, तें त्यांच्या आत्मविश्वासाचीं साक्ष पटविणारें आहे. माधवराव म्हणाले :—*

मी जर सरकारची नोकरी पत्करली आहे तर सरकार मला जिकडे पाठवील तिकडे मला गेले पाहिजे. सरकारच्या मनांत मजविषयीं लाख संशय आले असले तरी नुसत्या संशयानें सरकाराकडून माझें कांहीं एक नुकसान होणार नाहीं. सरकाराला आलेले संशय हळूहळू आपाप नाहींसे होतील, व त्याची त्यास आपली चूक यथाकाळीं कळून येईल.

वर माधवरावांच्या अचल धैर्याचा उल्लेख केला आहे. ता. १३ नंतर २० पर्यंत डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट रिलीफ ॲक्टाचा सार्वजनिक सभेमार्फत विचार चालला होता. ॲक्टमध्यें दुरुस्या सुचविण्याकरितां सभेनें एक कमिटी नेमली होती. त्या कमिटींत माधवरावच पुढारी होते. आपल्यावर अनर्थ कोसळणार, ही भावना जर त्यांच्या हृदयांत यावेळीं प्रबळ असती, तर त्यांच्यानें या कारभारांत भाग घेववला नसता. ही त्यांच्या धैर्याची एक गोष्ट झाली. या दिवसांतलें दुसरें कार्य म्हणजे टिळक–आगरकरांना नवी शाळा स्थापन करण्याच्या बाबतींत सल्लामसलत देणें ही होय. टिळक–आगरकरांच्या विचारांत

* वा. बा. रानडे यांचें 'रानड्यांचें चरित्र' पृ. २३.

माधवरावांना महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीविताची प्रगतीच होत आहे, असें दिसून आलें. टिळक–आगरकरांच्या बेताचा उपहास करणारांची ते याच दृष्टीनें समजूत घालीत होते.

जुलई महिन्याच्या शेवटीं फडके कैद झाले व त्यांना पुण्यास आणलें. फडक्यांनीं आपल्या उद्योगाची एक रोजनिशी लिहिलेली होती व आत्मचरित्रही तयार केलें होतें. या पुराव्यावरून पुण्याच्या ब्राह्मणांचा फडक्यांच्या बंडाशीं संबंध नव्हता, हें सिद्ध झालें. पण पुण्याची साडेसाती अद्यापि संपली नव्हती; उलट तिला यावेळीं अगदीं ऊत आला होता. पुण्याला लष्करी कायदा जारी करण्यांत आला. शनवारवाड्यापुढें लष्कराचा तळ पडला होता. रात्रीं नवाची तोफ वाजली कीं, 'शहरांतली रहदारी बंद,' असे हुकूम अमलांत आले. तोफेच्या आवाजानंतर रस्त्यांतून चिटपाखरूं देखील फिरकण्याची मारामार. जो ज्याठिकाणीं असेल, त्यानें तेथेंच तोफेचा बार होतांक्षणीं बैठक मारून सूर्योदयापर्यंतचा वेळ काढला पाहिजे. कोणी बारानंतर फिरण्याचा हिय्या धरलाच तर त्याला पकडून, गस्तीचे पोलीस नाक्याच्या कोंडवाड्यांत घालीत असत. यामुळें कित्येकदां चांगल्या चांगल्या अंमलदारांना विकट अनुभव भोगण्याची पाळी आली. हे पावसाळ्याचे दिवस असल्यामुळें, रात्रीं चुकून रस्त्यांत थांबणारांची काय स्थिति होत असेल, याचें जास्त वर्णन करण्याची आवश्यकता नाहीं. फडक्यांचा खटला गिरफदारीनंतर दोन महिन्यांनीं सुरू झाला. ज्याच्याशीं संबंध ठेवल्याच्या निराधार संशयावरून पुणेकरांच्या कपाळीं दडपशाहीचा असह्य भोग आला, त्याच्याशीं साक्षात् संबंध ठेवण्याला कोण धरणार ! खटला संपून ही पीडा जाते

केव्हां, असें पुणेकरांना झालें होतें. यामुळें फडक्यांचें वकीलपत्र घेण्याला पुण्यास एकही वकील मिळेना. परंतु पुण्याचा नामर्दपणा अशारीतीनें चव्हाट्यावर यावयाचा नव्हता. न्यायासनासमोर फडक्याची बाजू मांडायला पुण्याचा एक महात्मा तयार झाला. या महात्म्यांचें नांव आबालवृद्धांच्या परिचयाचें आहे. 'सर्वजनिक काका' हें त्याचें नांव, पण त्याचें वरील साहस फारसें कोणाला ठाऊक नाहीं. फडके हे एक देशभक्त आहेत, त्यांच्या देशभक्तीला विचाराचें व तारतम्याचें जड बूड नसल्यानें, ती बंडासारख्या अत्याचारांच्या उतारानें घसरत घसरत सरकारच्या लष्करी सामर्थ्यावर जाऊन आदळली व तिच्या ठिकऱ्या उडाल्या. पण तेवढ्यानें मूळच्या भावनेची प्रशंसनीयता किंवा वंदनीयता कमी होत नाहीं, अशी 'सार्वजनिक काकां'ची समजूत होती व त्या मूळच्या भावनेचें चीज करण्यासाठींच त्यांनीं फडक्यांचें वकीलपत्र घेतलें. 'तुमच्या धाडसाचा परिणाम तुमच्या लक्षांत आला आहे काय ?' असा कोणी इशारतीचा पोक्त प्रश्न* विचारला तर त्यास काकांनीं चटकन् उत्तर द्यावें कीं, 'परिणाम काय व्हायचा आहे ? येऊन जाऊन सरकार रागावण्याची भीति. पण सरकार अतिशय रागावले तर वासुदेव बळवंताबरोबर गणेश वासुदेवाला फांसावर लटकावील. यापेक्षां सरकारच्या हातीं जास्त काय आहे ?' जिवावर उदार होऊन काकांनीं फडक्यांची वकिली केली, पण फडक्यांची शिक्षा सर्वथैव चुकली नाहीं. काकांच्या वकिलीनें देहान्त टळून हद्दपारीची

* हीं प्रश्नोत्तरें सार्वजनिक काकांच्या मृत्यूनंतर थोड्या वर्षांनीं 'पुढारी कसा पाहिजे' या प्रश्नाचें विवेचन करीत असतां इंदुप्रकाशाच्या एका संपादकीय लेखांत अख्यायिकारूपानें आलीं आहेत.

सजा फडक्यांस मिळाली. १८७९ च्या अखेरीस जन्मठेपीचें शासन भोगण्याकरितां त्यांची एडनच्या तुरुंगांत रवानगी झाली. पुढें चार वर्षांनीं त्यांचा तेथेंच अंत झाला. फडक्यांचा खटला निकालांत निघाल्यावर पुण्याचा लष्करी कायदा सरकारानें संपुष्टांत आणला.

फडक्यांच्या बंडाबद्दल माधवरावांचे विचार काय होते, हें समजण्यांची वाचकांना उत्कंठा लागणें स्वाभाविक आहे. पण त्यांचें या बाबतींतलें हृद्गत प्रत्यक्षपणें समजून घेण्याचें आज कांहींच साधन नाहीं. फडके माधवरावांचा सल्ला विचारण्यास एकदां रात्रीं आले होते, व त्यांनीं त्यांस अनुकूल सल्ला दिला, असे लोकप्रवाद क्वचित् ऐकूं येतात. परंतु त्यांना कांहीं आधार नाहीं. बंड चालू असतां व संपल्यावर ज्या गोष्टी उजेडांत आल्या, त्यावरून वरच्यासारखे प्रवाद तर अगदींच लटके ठरतात. तथापि माधवरावांचें या घडामोडीबद्दल कांहीं तरी मत खास असलें पाहिजे. त्याचा छडा काढण्याचें एक परोक्ष साधन आहे. माधवरावांच्या विचारांचा परावर्तनरूपानें लाभ देणारें तत्कालीन वाङ्मय, हेंच तें साधन होय. त्या साधनावरून असें दिसतें कीं, माधवरावांना फडक्यांनीं स्वीकारलेला मार्ग संमत नसला, किंबहुना तिरस्करणीय वाटत असला तरी त्यांची देशभक्ति माधवरावांस सर्वस्वीं मान्य होती. फडक्यांनीं बंडाचा खटाटोप स्वार्थासाठीं उभारला नव्हता. त्यांनीं उपजीविकेच्या नोकरीसारख्या साधनावर लाथ मारली, घरादारावर निखारा ठेवला, बायकामुलांना भिकेस लावलें, पण हें सर्व देशभक्तीच्या उज्ज्वल मनोविकाराला वश होऊन केलें. त्यांच्या या निधड्या छातीच्या निस्सीम स्वार्थत्यागाकडे डोळेझांक करतां येत नाहीं किंवा त्यावर मार्गदोषाबद्दल काळें फांसतां येत नाहीं. ते एक

बंडाच्या कल्पनेनें खुळावलेले देशभक्त होते, पण देशभक्त होते व महाराष्ट्राला त्यांचें स्मरण सदैव जागृत ठेवलें पाहिजे, अशा अर्थाचे माधवरावांचे त्यासंबंधीं विचार होते, असें ध्वनित करण्यापलीकडे जास्त कांहींच सांगतां येत नाहीं.

बंड, आग लूट यांच्या धामधुमीमुळें जीं शुष्क, निष्फळ अभ्रें महाराष्ट्राच्या वातावरणांत उठलीं, त्यांचें खरें स्वरूप उघडकीस आणण्याच्या कामांत माधवरावांनीं जीं कामगिरी बजावली ती संशयातीत असल्यामुळें तिचा स्पष्ट निर्देश करण्यास हरकत नाहीं. ती कामगिरी १८७९ सालाच्या सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत 'दख्खनच्या दंग्यासंबंधीं पत्रें' या मथळ्याखालीं पहावयास सांपडते. बाह्य देखाव्याच्या पडद्यामागें नजर टाकून त्या देखाव्याचें मूळ शोधण्यातलें त्यांचें कसब सदर पत्रांतून आढळतें. बंड, जाळपोळ, लुटालूट या तिन्ही घोटाळ्यांत राजकीय हेतूचा वास सरकारच्या घ्राणेंद्रियाला आला व म्हणूनच भ्रमानें सरकार 'सापसाप' असें ओरडत नुसती जमीन बडवीत सुटलें. पण या तिन्ही प्रकारांत राजकीय कृष्ण हेतु नव्हते, असें माधवरावांनीं दाखवून दिलें आहे. पुण्याच्या आगीचें खरें कारण पूर्वीच उमगलें होतें. लुटालुटींत बंडाचा म्हणजे राजकीय हेतु होता. परंतु तो महत्त्व देण्यासारखा नाहीं. कारण सगळ्या दरवडयांचा फडक्यांशीं संबंध नव्हता. दुसरे कित्येक उपटसुंभ लुटारू फडक्यांच्या नांवावर दरवडे घालीत होते, किंवा वाटेल त्यानें दरवडा घालावा आणि तो फडक्यांच्या नांवास चिकटावा, असाही प्रकार होत असे. अर्थात फडक्यांचे दरवडे अगदीं थोडे होते, याप्रमाणें दरवड्यांचें पृथक्करण केल्यानंतर माधवरावांनीं लुटारूपणाची मीमांसा

केली आहे. या मीमांसेंत त्यांनीं लुटारूंच्या कोणत्या टोळींत कोण-कोणत्या जातीचे किती लोक होते, त्यांनीं लुटारूपणाचा धंदा किती दिवस केला आणि केव्हां व कां सोडला, यांचा, पकडलेल्या दरवडेखोरांच्या खटल्याची माहिती मिळवून, तपशीलवार वृत्तांत लिहिला आहे. दरवड्यांची इतकी चिकित्सा केल्यावर खरीं कारणें किती वेळ लपून राहणार ? तीं भराभर उजडांत आलीं. लोकांचा अठराविश्वे कंगालपणाच लुटालुटीचा जनक आहे, असें माधवरावांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. कंगालपणाचें कारण सरकारचा सारावसुलींतला द्रव्यलोभ, म्हणजे अखेरीस सरकारच्या धोरणालाच लुटारूपणाच्या पितामहाचें स्थान द्यावें लागतें. माधवरावांनीं काढलेलें एकंदर धामधुमीचें निदान पूर्वनिर्दिष्ट पत्रांतून सरकारच्या नजरेवर घातलें गेलें. लोकांना निःशस्त्र केल्यामुळें त्यांचा दरवडेखोरांसमोर पाड लागत नाहीं, ह्मणून हत्यारांचा कायदा सैल करून त्यांच्या हातांत दरवड्यासारख्या संकटांच्या प्रतिकाराचीं साधनें द्यावींत, असेंही त्यांनीं या पत्रांत सुचविलें आहे.

दरवड्यांचें पृथक्करण, त्यांच्या कारणांची मीमांसा, वगैरे उरस्फोडीचे प्रकार माधवरावांना कां करावे लागले, हें सांगणें अवश्य आहे. सर रिचर्ड टेंपल यांनीं दरवड्यांच्या मुळाशीं ब्राह्मणांचा कट आहे, अशी आपली खात्री करून घेतली होती. या खात्रीला भ्रमाशिवाय दुसरा आधार नव्हता. परंतु भ्रमालाच सत्य मानण्यांत त्यांनीं इतका हट्ट दाखविला कीं, त्याला त्यांच्या थिल्लरपणाशिवाय दुसरी जोड सांपडणार नाहीं. विलायतेस परत गेल्यानंतर '१८८० सालांतलें हिंदुस्थान' या नांवाचें एक पुस्तक लिहिलें, त्यांतही त्यांनीं आपल्या

संशयालाच सत्य विधान म्हणून दडपलें आहे. महाराष्ट्रांतले डोंगर व त्यावरील किल्लेकोट पाहून महाराष्ट्रीयांना आपण एकदां मुसलमानांचें साम्राज्य धुळीस मिळविलें, याचें नित्य स्मरण होत असतें. यासाठीं ब्रिटिश सरकारानें या डोंगराळ मुलखांतल्या रहिवाश्यांवर आणि त्यांच्या वस्तीच्या मुख्य मुख्य ठिकाणांवर सारखी, डोळ्यांत तेल घालून, नजर ठेवणें अवश्य आहे, अशी फडक्यांच्या बंडाबद्दल प्रस्तावना करून टेंपलसाहेबांनीं पुढें निश्चयाच्या शब्दांत म्हटलें आहे:—

The Brahmin leader and his immediate adherents were avowedly forming a conspiracy against the Government.

शेवटीं त्यांनीं सरकारला पुढील शब्दामध्यें इशारत दिली आहे:—

...though any exaggeration of the importance of such silly and clumsy designs ought to be avoided, still these occurances demand the thoughtful attention of politicians.

१८८० सालांत विशेष कांहीं घडलें नाहीं. जें विशेष घडलें तें सार्वजनिक काकांचें निधन हेंच होय. जुलई महिन्याचा २५ व्या तारखेस काकांनीं केवळ लोकोपकारार्थ चंदनाप्रमाणें झिजविलेला आपला देह ठेवला. निधनानंतर दुखवट्याच्या व स्मारकाप्रीत्यर्थ सभा भरल्या, त्यांत माधवरावांचें अंग होतें. वर्गणी गोळा करून माधवरावांनीं पुढें सार्वजनिक सभेकरितां काकांचें स्मारक या नात्यानें दाणेआळींतली सध्याची जागा खरेदी केली. इतर व्यवसायांच्या दृष्टीनें हें वर्ष यथातथाच गेलें. मात्र माधवरावांसंबंधीं सरकारांतल्या गैरसमजुती मावळून त्यांना पुनः पूर्वस्थळीं पाठविण्याबद्दल हरकत उरली नाहीं. फडक्यांच्या बंडाशीं त्यांचा संबंध नव्हता, हें एक सरकारची दृष्टि नित्रळण्याचें कारण असलें तरी सर रिचर्ड टेंपल यांनीं

आपल्या अधिकाराचा राजीनामा देऊन स्वदेशीं प्रयाण केलें, हें कारण तितकेंच बलवत्तर आहे. दरम्यान त्यांच्या कारकिर्दीमध्यें सार्वजनिक सभेबद्दल सरकारचें मन किती कलुषित झालें होतें, यांचा एक मासला येथें सादर करण्यास हरकत नाहीं. नवे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन आले, तेव्हां सार्वजनिक सभेनें आपल्या रिवाजाप्रमाणें त्यांना मानपत्र देण्याचें ठरविलें, पण यावेळीं एकदां सरकारांतून त्याचा स्वीकार झाला नाहीं.

१८८१ मध्यें माधवरावांची प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटच्या जागेवर मुंबईस नेमणूक झाली व जानेवारीपासून मार्च अखेरपर्यंत त्यांचे तीन महिने इलाख्याच्या राजधानींत गेले. आजवर ते दिवाणी न्यायांत वाकबगार आहेत, अशी त्यांची ख्याति होती, आतां ते फौजदारी काम चालविण्यांतही प्रवीण आहेत, असें सर्वांना दिसून आलें. या ठिकाणीं त्यांचा सगळा मित्रपरिवार होता. मित्रांच्या सहवासांत त्याचा काळ सार्वजनिक कार्यांचा खल करण्यांत जाऊं लागला. सरकारी हुद्देदार या नात्यानें त्यांच्या कामावर एका प्रकरणाबद्दल अँग्लोइंडियन वृत्तपत्रांनीं, अगदीं पिसाळून लचके तोडण्याच्या इराद्यानें, दुष्ट टीका केल्याचें पहावयास सांपडतें. फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीस त्यांनीं एका 'मरे' नांवाच्या युरोपियनाला ५० रुपयांची चोरी केल्याबद्दल सहा महिन्याची सक्तमजूरी फर्मावली. त्यापूर्वीं एका हिंदी इसमाला, शंभर रुपयांची नोट बाजारांत मोडण्याकरितां नेऊन ती गहाळ झाल्याचा त्यानें बहाणा केला व तेवढे रुपये पचनीं पाडण्याचा त्याच्या हातून यत्न झाला, म्हणून अवघी एक महिन्याची सौम्य शिक्षा दिली होती. या दोन गोष्टींतला फरक पाहून युरोपियनाला द्वेषामुळें जास्त शिक्षा केली, असा टाइम्सकारानें गवगवा

माजविला. माधवरावांच्या हातून सहसा अन्याय व्हावयाचा नाहीं, अशी हिंदी वृत्तपत्रकारांची खात्री असल्यामुळें त्यांनीं माधवरावांची तरफदारी केली, परंतु ठाण्याचे डिस्ट्रिक्टजज्ज कॉगलन यांनींच जेव्हां दोन्ही खटल्यांतला फरक दाखवून 'जस्टिस' या सहीनें टाइम्स-काराचे कान पिळले, तेव्हां हा गवगवा थंडावला. नोट गहाळ झाली म्हणणारा हिंदी नोकर प्रामाणिक होता व फक्त त्यानें फसवाफसवीचा लपंडाव करून पाहिला. प्रामाणिक होता याचा अर्थ हा कीं, कधीं त्याच्या हातून अफरातफर न झाल्याबद्दल कोर्टांत त्याच्या मालकानें साक्ष दिली होती. कोर्टानें दया करावी असें त्याच्या मालकाचें म्हणणें होतें. वरील युरोपियनानें रात्रीं एका रेल्वेगार्डाच्या खोलींत प्रवेश केला, दुसरी चावी लावून त्याच्या पैशाची पेटी उघडली, आणि यदाकदाचित् धरपकडीची वेळ आली असती तर संरक्षणानिमित्त अर्थात् जास्त गुन्हा करण्याचा हेतूनें भरलेलें पिस्तुल जवळ ठेवलें होतें. हिंदी नोकरांपेक्षां या परिस्थितीमुळें सदर युरोपियनाचा अपराध जास्त भयंकर ठरतो व हेंच त्याला मिळालेल्या शिक्षेच्या जास्त प्रमाणाचें कारण आहे, असें न्यायतत्त्वांच्या विवेचनासह कॉगलन साहेबांनीं स्पष्ट करून आपल्या हिंदी व्यवसायबंधूची बाजू राखली.

प्रार्थनासमाजाचें 'संगमसभा' या नांवाचें एक उपांग होतें. एकेश्वरनिष्ठाच्या कैफियतींत माधवरावांनीं सत्संगतीचा महिमा गाइला आहे. त्याच धोरणानें गहन तात्त्विक विषयांची आपसांत चर्चा करून धार्मिक विचारांतला मळ झाडण्यासाठीं ही सभा प्रार्थनासमाजाच्या चालकांनीं अस्तित्वांत आणली होती. माधवराव मुंबईस आल्यानंतर या संस्थेला तरतरी आली व प्रार्थनेच्या दिवाणखान्यांत दर गुरुवारीं संध्याकाळीं

पन्नास साठ परमार्थजिज्ञासू व्यक्ति जमूं लागल्या. प्राचीनकाळीं तपोवनांतून ऋषिमुनींचे जसे आत्मानात्मविचारमय वादविवाद चालत असल्याचा पुरावा हिंदू संस्कृतीच्या ग्रंथांतून आढळतो, तसाच वादविवाद संगतसभेंत माधवराव, भांडारकर, तेलंग वगैरे विद्वान् मंडळी यावेळीं करीत होती. या मंडळीची ज्ञानसंपत्ति पाहिल्यास त्यांना ऋषिमुनींची उपमा देण्याला कांहींच प्रत्यवाय दिसत नाहीं. तेलंग हे पक्के नास्तिक नसले तरी अनीश्वरवादी होते. प्रार्थनासमाजाला मान्य व प्रिय असलेल्या सृष्टीच्या ईश्वरकारणावर त्यांचा विश्वास नव्हता, परंतु मनुष्य अनीश्वरवादी बनल्यानें विश्वरचनेचीं गूढें उकलण्याची त्याची इच्छा, आवड व जबाबदारी सुटत नाहीं. तेलंग यामुळेंच संगतसभेंतल्या चर्चेला मधून मधून हजर रहात होते. बहुधा माधवराव आणि भांडारकर हे दोघेच गहन प्रश्नांच्या वादामध्यें जास्त भाग घेत, असेंही सदर सभेच्या हकीकतीवरून प्रत्ययास येतें.

जानेवारीच्या शेवटीं 'पापाची व्याख्या व शिक्षा' हा विषय संगतसभेंत निघाला. माधवरावांनीं पापाच्या शिक्षेचे चार प्रकार सांगितले. पापकर्माबद्दल वाईट वाटणें हीं पहिली शिक्षा, पण वाईट वाटण्याइतकी बुद्धि प्रगल्भ होण्याला अभ्यास व सत्संगति या दोन साधनांची अवश्यकता आहे. संगतीनें व सद्वर्तनानें बुद्धि जागृत होते, असें ते म्हणाले. दुसरी शिक्षा राजदंड; तिसरी शिक्षा स्वजनाकडून पापाबद्दल होणारी फटफजीती; आपल्या स्थितींत किंवा रूपांत शास्त्रानुसार पडणारें अंतर, ही चवथी शिक्षा होय. या चारी शिक्षा ईश्वरी समजाव्या. चौथ्या शिक्षेचा प्रभाव जन्मांतरांत दिसतो; यामुळें पुनर्जन्म खरा कीं खोटा याविषयीं मतभेदाचा वाद माजला आणि दुसऱ्या आठवड्यांत माधव-

रावांनीं आपले विचार सांगून त्याची समाप्ति केली. पापासाठीं नरकवास भोगावा लागतो, अशीं शास्त्रवचनें आहेत. नरकाचीं भयप्रद वर्णनें सर्व देशांतल्या धार्मिक वाङ्मयांत पहावयास सांपडतात. पण विचारवंतांना, नरक ही मानव जीवितांतली ऐहिक अवस्था आहे का पृथ्वीसारखाच पण कवळ यातनामय दुसरा लोक आहे, याविषयीं शंका उत्पन्न होते. अनेक सूक्ष्म दृष्टीच्या अध्यात्मनिपुणांनीं मानवी जीवितांतच अनुभवास येणारी ही एक मनाची अवस्था असल्याचें ठरविलें आहे. माधवरावांनीं अध्यात्मपारंगतांच्या वरील सिद्धान्तास दुजोरा दिला आहे. पापाबद्दल खेद होतो, पण खेदाचा झटका संपतांच पुनः पाप घडतें; हा खेद आणि खेदानंतरचा पापाचार, यालाच नरक हें नांव आहे. सद्वर्तनामुळें घडणारा निरंतर आनंद, त्याविषयीं होणारा लोकांतला गौरव, हेंच वस्तुतः स्वर्गसुख, असें विवेचन केल्यावर माधवराव म्हणाले कीं, स्वर्ग नरक येथेंच आहेत. 'कालेंकरून आत्म्याची उन्नति या जगांतच व्हावयाची आहे,' असें माधवरावांचें मत यावेळीं प्रकट झालें. सर्वांनाच तें संगतसभेच्या बैठकीच्या वेळीं ग्राह्य वाटत होतें, असा समज करून घेणें चुकीचें ठरतें. माधवरावांनीं या मताचा विस्तारपूर्वक ऊहापोह 'स्वर्ग आणि नरक' या स्वतंत्र व्याख्यानांत केला असून तें व्याख्यान धर्मपर व्याख्यान संग्रहांत पृष्ठ १०२-१०९ मध्यें जिज्ञासूंना पहावयास सांपडेल.

फेब्रुवारीच्या सुरवातीस प्रार्थना समाजाचे कट्टे भक्त आणि प्रचारक कै. सदाशिवराव केळकर यांनीं 'नारायणीं जेणें घडे अंतराय, होका बापमाय त्यजावे ते' हे तुकोबाचें अभंगवचन घेऊन त्याचें जोरानें समर्थन केलें. आईबापांची पर्वा बाळगूं नये, असें त्यांनीं ठासून क

लिहून सांगितलें. माधवरावांनीं उत्तरादाखल जें भाषण केलें, तें त्याच्या चरित्राचें मर्म दाखविणारें असल्यामुळें विस्तारानें येथें सादर करण्यास हरकत नाहीं. सत्कार्यांत किती आग्रहबुद्धि असावी, याचें उद्घाटन त्यांत आहे. ते म्हणाले:—

ही गोष्ट इतकी सुलभ नाहीं. आपणास सत्य वाटणाऱ्या गोष्टींचा आग्रह धरून वडिलांच्या मनास दुःख देणें योग्य नाहीं. जसा कांहीं गोष्टींचा आपल्या मनावर पगडा असतो तसाच तद्विरुद्ध गोष्टींचा वडिलांच्या मनावर ग्रह असतो. मग आपलाच हेका पुरविण्यांत अधिकार कोणता? वडिलांची समजूत घालावी आणि समजूत पटल्यास उभयतांनीं त्या गोष्टींचा पुरस्कार करण्यास प्रवृत्त व्हावें. सत्यासत्याबद्दल बालंबाल खात्री होऊन ज्यांनीं कोणाची पर्वा न ठेवतां ईश्वराची उपासना केली, ते पावन पुरुष धन्य होत. राजाच्या कायदा अन्यायाचा आहे, हजारो लोकांना त्रास होत आहे, लोकांचें अकल्याण होत आहे. सत्यतेच्या जोरावर एकदम एकानेंच तो कायदा मोडल्यानें फायदा होणार नाहीं, कायद्याबद्दलचे आपले विचार दुसऱ्याच्या मनांत भरवून देण्याचे उद्योग चालू ठेवावे. सर्वांचा समज आपल्याप्रमाणें झाला म्हणजे कांहीं काळानें तो कायदा मोडला जाईल. घरच्या वहिवाटीचा तसाच प्रकार आहे. कपाळाचें कुंकू लावण्यांत व हातांत बांगड्या वागविण्यांत कांहीं हंशील नाहीं, म्हणून कुंकू पुसण्याचें व बांगड्या फोडण्याचें कृत्य करतां येणार नाहीं. घरच्या मंडळींशीं नित्य प्रसंग असतो. त्यास सदुपदेश करून मन वळवावें.

ज्यानें हें भाषण लिहून काढून वृत्तपत्रांत प्रसिद्ध केलें, तो लेखक हमीनें सांगतो कीं, रा. ब. रानड्यांचें हें व्याख्यान अत्यंत परिणामकारक झालें. फेब्रुवारीच्या अखेरीस ब्राम्हसमाज आणि हिंदूधर्म हा विषय सभेत निघाला. या दिवसांत कलकत्त्याकडची ब्राह्म समाजांतली फाटाफूट अगदीं कडेलोटास गेली होती. मुंबईस आल्यावर माधवरावांनीं इतर समाजबंधूंना बरोबर घेऊन केशवचंद्र सेन यांस दुही

मोडून एकी करण्याविषयीं आर्जवाचीं मुद्देसूद पत्रें लिहिलीं होतीं. तीं पत्रें शिवनाथशास्त्री यांनीं लिहिलेल्या ब्रह्मसमाजाच्या इतिहासांत परिशिष्टामध्यें दिलेलीं आहेत. ब्राह्मसमाज आणि हिंदूधर्म हा विषय संगत सभेंत निघण्याचें हें एक कारण आहे. माधवरावांच्या प्रस्तुत विषयावरील मताचें दिग्दर्शन पूर्वीं केलेलें आहे, त्याच धोरणानें यावेळीं त्यांनीं आपलीं मतें सभेपुढें मांडलीं. ता. ५ मार्च रोजीं केळकरानीं 'विलक्षण भुरळ' या आशयाचें एक व्याख्यान दिलें. माधवरावांनीं त्यांतल्या चुका दाखवून अत्यंत सुरस व परिणामकारक भाषण केलें, असें संगतसभेचा हकीकतनवीस म्हणतो, पण त्यानें समग्र भाषण नमूद केलें नाहीं, यानंतर विधवाविवाहोत्तेजक मंडळीचा वार्षिकोत्सव करण्यांत आला. ता: ७ रोजीं एक पुनर्विवाह झाला. या दोन्ही समारंभांत माधवराव हजर होते. प्रार्थनासमाजाच्या उत्सवांत धर्मसंस्थेच्या सभासदानें स्वतःला प्रतिज्ञेचें बंधन घालूं नये. शपथेची आवश्यकता नसावी, असें सांगितल्याचें उत्सवाचा अहवाल वृत्तपत्रांत देणाऱ्या एका बातमीदारानें लिहिलें आहे. संगत सभेंतले वाद विवाद ऐकण्याकरितां पुढें पुढें प्रार्थनासमाजाबाहेरची मंडळी येऊं लागली. ज्ञानप्रकाशाच्या मुंबईच्या तत्कालीन बातमीदारानें प्रत्येक सभेचा वृत्तांत कळवून, प्रत्येकानें संगतसभेच्या वादाचा लाभ घ्यावा, अशी शिफारस केली आहे.

मुंबईला माधवरावांचें वास्तव्य असतांना त्यांच्या अध्यक्षत्वाखालीं आपले वार्षिकोत्सव पार पडावे, अशी सर्व संस्थांच्या चालकांची इच्छा असणें स्वाभाविक आहे. त्यांतून ज्या संस्थांच्या स्थापनेशीं त्यांचा संबंध होता, अशा संस्थांचा त्यांच्यावर जास्त हक्क होता. मुंबईची वक्तृत्वो-

त्तेजक सभा ही संस्था १८६७ सालीं मुंबईस निघाली. नानाशंकरशेट यांच्याकडे तिचें जनकत्व होतें, असें म्हटल्यास हरकत नाहीं. माधवरावांनीं तिच्या कारभारांत प्रारंभीं बराच भाग घेतला होता. या वर्षीं अनायासानें माधवराव मुंबईला असल्यामुळें तिच्या वार्षिकोत्सवाची तारीख जरा अलीकडे ओढून त्यांना अध्यक्ष होण्याविषयीं संस्थेच्या चालकांनीं गळ घातली. उत्सवांत अनेकांचीं व्याख्यानें झालीं. परीक्षक व अध्यक्ष या दुहेरी जबाबदारीमुळें माधवरावांचा त्या कामांत बराच वेळ गेला. फेब्रुवारीच्या १७ तारखेला त्यांचें भाषण झालें. त्यांनीं ' साहित्य ' या विषयाचा विशेष ऊहापोह केला. त्याचें कारण वाचकांच्या लक्षांत आल्याशिवाय रहाणार नाहीं. मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीचे, माधवराव हे एक चिटणीस होते. त्यांना या सुमारास मंडळीच्या उद्योगाचा अतिशय निरुत्साह करून सोडणारा अनुभव आला होता. त्याची माहिती पुढें येणार आहे. त्यामुळें त्यांनीं मराठी सारस्वताच्या प्रगतीचें ज्ञान संपादन केलें होतें व असें समजतें कीं, त्यांच्याच सुचनेवरून ' मराठी साहित्य ' हा विषय नेमला गेला होता. आपल्या भाषणांत माधवरावांनीं पुढीलप्रमाणें प्रास्ताविक माहिती दिली:—

आपल्या देशांत लहानमोठे ४० छापखाने आहेत, इंग्रजीपासून अलीकडच्या ६० वर्षांत ग्रंथ काय ते एक हजाराच्या आंत झाले. त्यांतले पद्य ३००, व गद्य ७००; या गद्यापैकीं शालोपयोगी २०० आहेत. इतिहास ३०, नाॅव्हेल्स ६०, नीतिपर ४००, बखरी १०, धर्मशास्त्र ४० राजकीय विषय १०, आणि बाकी सर्व प्रकार मिळून ११० ग्रंथ आहेत.

ही माहिती संपल्यावर माधवराव मराठी साहित्याची प्रगति कां होत नाहीं, याच्या विवेचनाकडे वळले. यांतला शेवटचा भाग संतापोत्तीप्रमाणें भासतो. आपल्या देशबांधवाच्या स्वभावदोषांची अभेद्य

पाषाणासारखी अवस्था पाहून क्षणभर माधवरावांची शांति व आशामय प्रकृति विस्कटली. कदाचित् अंजारणीगोंजारणीनें किंवा प्रोत्साहनाच्या चुचकारणीनें लोकांची झोंप उडत नाहीं, असें पाहून रागाच्या उग्र शब्दांचा त्यांस धक्का मारावा, असेंही त्यांच्या मनांतून असेल. ते म्हणाले:—

असें कां? याचें उत्तर पाया कच्चा. अमूक जातीनेंच विद्येचा व्यवहार करावयाचा, इतरांस अधिकार नाहीं. ही चूक झाली आहे. अशाच चुका पुढें होत गेल्या. छापखान्याची कला निघण्यापूर्वी इतर देशांची जी स्थिति होती, ती आज आपली आहे. आपल्या लोकांस नुसतें ओझें घेऊन चालावयाचें मात्र समजतें. पण कोणतीही गोष्ट समजून घेण्याची मात्र आस्था नाहीं. आपल्या देशांतील शास्त्रीय विषयांचीं भाषांतरें परक्यांनीं जितकीं केलीं आहेत, त्याचा शतांश आमच्याकडे नाहीं. नुसतें टपालहंशील घेऊन ग्रंथ वाचायला देऊं केलें तर लोक ते घेऊन वाचायला तयार नाहींत. इतकी अनास्था आपल्या भाषेची आहे. तेव्हां मानवी सृष्टीस धरणीकंप होऊन सर्व आंतडीं बाहेर पडतील, तेव्हां ही स्थिति सुधारली तर कोण जाणें!

याप्रमाणें माधवरावांचा नानाविध उपयुक्त व्यवसायांमध्यें मुंबईला काळ जात होता. इलाख्याच्या राजधानींतलें त्यांचें वास्तव्य जसें लोकांना तसें त्यांनाही उपकारक झालें. नवे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन हे हाताखालच्या अमलदारांच्या ओंजळीनें पाणी पिणारे नव्हते, शिवाय जात्या उदार विचाराचे होते. वरिष्ठ सरकारच्या सूत्रचालकाच्या जागेवर रिपनसाहेबासारखा हिंदुस्थानच्या हिताची खरी कळकळ बाळगणारा इसम होता. यामुळें माधवरावांची खरी योग्यता सर्व बड्या अंमलदारांना समजून सरकारांत त्यांच्याविषयीं अणुमात्र संशय उरला नाहीं आणि माधवरावांची मार्चे अखेरीस बदली होऊन ते आपल्या लाडक्या पुण्यपत्तनास गेले.

# प्रकरण अकरावें.

## नव्या कार्यांचा आरंभ.

पुण्यास गेल्यानंतर माधवरावांच्या उद्योगाची जोरानें सुरुवात झाली आणि वक्तृत्वोत्तेजक सभेंत त्यांनीं अतिशय महत्त्वाचें भाषण केलें. वक्तृत्वोत्तेजक सभेंत प्रचलित राजकारण, धर्म समाज, इत्यादि विषयांची व्याख्यानासाठीं निवड केली जात असे. १८८१ सालांत राजकारणामध्यें मागल्या तीन चार वर्षांतल्या आमदानीपेक्षां महदंतर पडलें होतें. लिटन साहेबांनीं १८८० सालीं लार्ड बिकान्सफील्ड यांचें प्रधानमंडळ अधिकारच्युत होतांच आपल्या अधिकाराचा त्याग केला. टेंपलसाहेबांची स्वारी आपली पंचवार्षिक मुदत संपण्यापूर्वींच घाईघाईनें विलायतेस गेली याचें एक कारण,ही प्रधानमंडळींतली उलथा पालथ, हें होय. येथून जातांना आपण पार्लमेंटांत निवडून येणार, असें ते मनांत मांडे खात होते. परंतु विलायतच्या मतदारांनीं त्यांच्या तोंडाला, भीडमुर्वत, दयामाया न बाळगतां,ठणठणींत कोरडीं पानें पुसलीं. इंग्लंडाचे नामांकित उदारमतवादी ग्लॅडस्टन यांच्या हातांत साम्राज्याचा कारभार गेल्यामुळें उदारधोरणाची अंमलबजावणी करण्यासाठीं त्यांनीं आपल्या पसंतीचे, आपल्या विचाराचे उमराव रिपन् यांस हिंदुस्थानांत व्हाइसराय म्हणून

पाठवून दिलें. लिटन साहेबांच्या कारकिर्दीला लोक किती वैतागले होते, याचें प्रदर्शन त्याकाळच्या सार्वजनिक सभेच्या अर्जांतून, अपीलांतून झालें असल्यानें त्याचें महत्त्व निराळें सांगायलाच नको. लिटन साहेबांनीं हत्यारांचा कायदा जास्त कडक केला, देशी वृत्तपत्रांचें स्वातंत्र्य हिरावून घेतलें, अफगाणिस्थानांशीं निष्कारण कुरापत काढून लढाई दिली. या लढाईनें हिंदुस्थानाच्या संपत्तीची धूळधाण उडाली, देशी राजेरजवाडयांचे, अफू, मीठ वगैरे पदार्थांच्या उत्पन्नावरील हक्क बुडवून त्यांच्यावर नवे कर बसविले, लोकांच्या हृदयाला घरें पाडणारी जी गोष्ट केली ती म्हणजे दिल्ली दरबार. हिंदुस्थानाच्या दक्षिणेस हजारो माणसें दुष्काळांतल्या उपासमारानें तडफडून मरत असतां दिल्लीच्या दरबाराचा, निष्ठुरपणा व्यक्त करणारा, खेळ लिटनसाहेबांनीं तडीस नेला. हिंदुस्थानांतील जें बुद्धिमान् तरुण विलायतेला सिव्हिलसर्व्हिसच्या परिक्षेकरितां जात असत, त्यांच्या मार्गांत कांटे पसरण्याची योजना लिटनसाहेबांनीं काढली. ही सगळी लीला पाहून हिंदुस्थानाचे होणार तरी काय, असा प्रश्न प्रत्येक देशहितचिंतकाच्या मनांत सारख्या घिरटया घालूं लागला. इतक्यांत लार्ड बिकान्सफील्ड यांचें प्रधानमंधळ ब्रिटिश लोकमताच्या विरोधी तडाख्यानें खालीं पडून नव्या लोकप्रिय पुढाऱ्यांचा राज्यकारभार सुरू झाला. हिंदुस्थानच्या लोकांना ही एक ईश्वरी कृपाच वाटली. ही खरोखर ईश्वरी कृपाच होती, अशी त्यांची रिपन साहेबांच्या कारकिर्दींत खात्री झाली.

लिटनसाहेबांच्या वरील प्रत्येक कृत्यावर माधवरावांनीं त्रैमासिकांत लेख लिहून टीका केली आहे. हिंदुस्थानांतल्या राजकारणी लोकांनीं

विलायतच्या उदारमतवादी पक्षाशीं संबंध ठेवावा, त्यांचे प्रेम संपादावें, आणि त्यांच्यामार्फत पार्लमेंटच्या वेशीवर हिंदी दुःखें बांधावीं, असें त्यांचें मत होतें. लार्ड बिकान्सफील्ड राज्यतंत्रारूढ होण्यापूर्वी १८७३ सालीं त्यांनीं फॉसेट साहेबांच्या निवडणुकीला सार्वजनिक सभेच्या द्रव्यनिधींतून थोडीशीं मदत पाठविल्याचा पुरावा, सार्वजनिक सभेच्या इतिहासांत आहे. १८८० सालीं त्यांनीं फॉसेट, ब्रॅडला, ब्राइट वगैरे मंडळीच्या निवडणुकीला हातभार लावला कीं नाहीं, तें समजत नाहीं, पण त्यांनीं विलायतच्या मतदारांना अनुलक्षून एक 'अपील' तयार केल्याचें प्रमाण त्रैमासिकांत आहे. त्यांत लिटनसाहेबांच्या कारकीर्दीतलीं सर्व दुष्कृत्यें स्पष्टपणानें मांडलेलीं असून कोणत्या उपायानें हिंदुस्थानांत संतोष संपादन करतां येईल, याचाही उडत उडत ऊहापोह केला आहे. जोंवर हिंदुस्थानाला आयलंड, स्कॉटलंड यांच्याप्रमाणें पार्लमेंटांत प्रत्यक्ष प्रतिनिधि धाडण्याचा हक्क प्राप्त होत नाहीं, तोंवर हिंदुस्थानांतलीं कायदेकौन्सिलें सुधारून वाढवावीं, त्यांच्या द्वारें हिंदी लोकमताचा दाब राज्यकर्त्यांवर पडेल अशी व्यवस्था करावी, असें त्यांनीं विलायतच्या मतदारांना अपीलांत सुचविलें आहे. लार्ड रिपन हिंदुस्थानांत आल्यानंतर प्रांतिक राज्यकारभारांची घटना बदलण्याची वाटाघाट सुरू होतांच माधवरावांना आपले विचार प्रकट करण्याला अनुकूल संधी मिळाली व त्यांनीं राज्यव्यवस्थेची घटना स्वतंत्र निबंधाच्या रूपानें सुचविली आहे. १८८१ सालांत या विषयींचे विचार त्यांच्या मनांत घोळत असल्यानें त्यांनीं 'कौन्सिलांची सुधारणा किंवा जबाबदार राज्यपद्धति' हा एक विषय वक्तृत्वोत्तेजक सभेच्या कार्यक्रमांत घातला. या काळामागें नजर टाकल्यास सामान्य जनता राजकीय प्रश्नांचा

फारसा खल करीत नव्हती, असेंच म्हणावें लागतें. परंतु लिटन साहेबांच्या कारकीर्दीतील कित्येक प्रकारांमुळें तिच्यांत आपलें मनोगत बोलून दाखविण्याचें धैर्य आलें होतें. आपल्या मनोगताच्या निरूपणांत समतोलपणा ठेवायचा नाहीं, अशी स्थिति त्यावेळींसुद्धां लेखकांमध्यें व वक्त्यांमध्यें दिसत होती. एका वक्त्याला 'जबाबदार राज्यपद्धति' या विषयावर बोलतांना असा कांहीं आवेश चढला कीं, त्यानें इंग्रजांच्या हातांतलें राज्य हिसकावून घेतलें पाहिजे, हें विधान उच्चारण्यापर्यंत उडी ठोकली. तो याच अनुसंधानानें आणखी बरेंच बेबंद बोलला. माधवरावांनीं समारोपाच्या भाषणांत 'इंग्रजाच्या हातांतून राज्य काढून आपल्या हातांत घेण्याची गोष्ट बोलणें, हा फाजीलपणा होय. असें बोलणें उपहासास्पद आहे, ही गोष्ट १०० २०० वर्षांपुढचीं असल्यानें तिची आजच विवंचना कशाला!' अशी सुरुवातीस कानउघडणी करून पुढें जे राजकीय धोरणावर भाषण केलें, तें मननीय आहे. ते म्हणाले:—

सांप्रत आपले पार्लमेंटांत मुखत्यार नसले, तरी असल्याप्रमाणें मोठमोठाल्या कामांचा निकाल होत आहे. कारण इंग्लंडांत मुखत्यार नेमण्याचा अधिकार साडेतीन कोटींपैकीं फक्त १५–२० लाख लोकांनाच आहे. पण सर्वानुमतें कारभार चालला, असें म्हणतात. तिथल्या बिनमतवाल्यांची जी स्थिति तीच आपली स्थिति आहे. आपल्या बातम्या इंग्लंडला पोचविण्याचीं साधनें आपल्या हातीं आहेत, पण आपण अभागी म्हणून त्यांचा उपयोग होत नाहीं. प्रेस ॲक्टाचें उदाहरण घ्या. आपण त्या विरुद्ध तक्रार केली. ग्लॅडस्टन साहेबांनीं आपलें काम केलें. अफगाण लढाईच्या खर्चाचा प्रश्न अशाच रीतीनें सुटला.

मुखत्यार नेमण्याचा अधिकार मिळेपर्यंत आपलें कांहीं कर्तव्य नाहीं, असें मानण्याचें कारण नाहीं. असलेल्या साधनांचा उपयोग करणें आपलें कर्तव्य

आहे. विलायतच्या पांच पक्षांपैकीं एखाद्याशीं स्नेह संपादन करणें, हें आपलें काम आहे. त्यांच्यांत हौस व कळकळ उत्पन्न केली पाहिजे. या कळकळीच्या प्रयत्नानेंच निवडणुकीचा प्रयत्न झाला व फॉसेट साहेबांची नेमणूक तशीच झाली. तिकडे निवडल्या जाणाऱ्या मुखत्यारांच्या विचारांत आपल्या विचाराचें प्रतिबिंब पाडण्याचीं साधनें आपल्या हातांत आहेत, तें काम हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत घडून येईल.

यानंतर माधवराव डेक्कन कॉलेजच्या वार्षिक संमेलनांत आढळतात. १८७० सालापासून या संमेलनाचा प्रवात सुरू होता. माधवरावांना बहुधा त्यांत भाग घेण्यासाठीं निमंत्रण केलें जात असे. यावर्षी माधवराव तेथें गेले असतां नीळकंठ जनार्दन कीर्तने यांनीं मूर्तिपूजेवर व्याख्यान दिलें. विशेष गुणांचीं रूपकें म्हणून मूर्ति राखाव्या, पण लोकांना उपदेश करून त्यांची अव्यक्ताकडे भक्ति लागेल अशी व्यवस्था करावी, असें दुटप्पी तात्पर्याचें व्याख्यान कीर्तन्यांनीं दिलें. कुंट्यांनीं त्यास मान्यता दर्शविली. माधवरावांना ही धरसोड रुचली नाहीं. त्यांनीं कीर्तने व कुंटे या दोघांचा निषेध केला. त्यावेळीं आगरकर तेथें होते. त्यांनीं उठून सांगितलें कीं, धर्म सोडून नास्तिक मताचा व मिल्लप्रणीत उपयुक्ततापंथाचा आश्रय केल्याशिवाय हीं भांडणें मिटणार नाहींत. नास्तिक मताचें आणि माधवरावांचें अगदीं हाडवैर होतें, यामुळें त्यांना आगरकरांचा राग आला, परंतु १८८५ सालीं दोन्ही पक्ष जसे निकरावर येऊन एकमेकांचा अपमान करण्यापर्यंत मजल गेली, तशी यावेळीं गेली नसावी, असें या संबंधाच्या वृत्तपत्रांतील हकीकतीवरून म्हणावें लागतें.

ग्रंथोत्तेजक मंडळी केव्हां स्थापन झाली, तिचा उद्देश काय होता, ही माहिती मागें दिली आहे. मंडळीचा पहिला रिपोर्ट

१८७९ सालीं प्रसिद्ध झाला. दुसरा रिपोर्ट माधवरावांच्या सहीनें या वर्षी जूनमध्यें बाहेर पडला. या रिपोर्टांतल्या हकीकतीचा पाढा वाचला म्हणजे मराठी भाषेच्या अभिवृध्द्यर्थ निघणाऱ्या संस्थेची त्यावेळीं आजच्या सारखीच निराशाजनक अवस्था होती, हें पाहून विषाद वाटल्याखेरीज रहात नाहीं. ग्रंथोत्तेजक मंडळीची जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर आठशें गृहस्थांनीं वर्गणीदारांच्या पटांत नांवें नोंदविलीं. पांचशे वर्गणीदार मिळतांच ग्रंथ प्रकाशनाला प्रारंभ करावयाचा असा मंडळीचा विचार होता. पांचशेंऐवजी आठशें वर्गणीदार पाहून चालकांना आनंद झाला असेल, पण वर्गणी वसूल करण्याचेवेळीं त्यांचें तोंड आंबट झाल्याखेरीज राहिलें नाहीं. पहिले वर्षी शेंकडा दहा जणांकडून वर्गणी आली. दुसऱ्या सालीं हें प्रमाण पांचावर आलें आणि तिसऱ्या सालीं हें प्रमाण किती असावें? पहिल्या दोन वर्षांच्या अनुभवावरून शेंकडा अडीच किंवा हा आंकडा विचित्र असल्यामुळें शेंकडा दोन, हें प्रमाण असेल अशी वाचकांची कल्पना होईल. पण महाराष्ट्रियांच्या वाङ्मयप्रेमाचा पारा तिसऱ्या सालीं अतिशय खालीं येऊन पोंचला. त्या वर्षी शेंकडा एक इसमानें वर्गणी दिली, असें माधवरावांनीं आपल्या अहवालांत म्हटलें आहे. एवढयानें मंडळीच्या दुर्दैवाचा इतिहास संपत नाहीं. पहिल्या वर्षी माधवरावांना परगांवीं जावें लागलें. गोपाळराव देशमुखही पुण्याबाहेर आपल्या नोकरीची उरलेली मुदत पुरी करीत होते. यामुळें दुसरा चिटणीस नेमण्याची पाळी आली. त्या बहाद्दरानें आलेलें द्रव्य आपल्या खिशांत टाकून मंडळीबद्दल लोकांना अगोदरच वाटणाऱ्या अविश्वासाला हातभार लावला. त्याच्या कृत्याचे परिणाम निस्तरण्यांत माधवरावांचा

बराच काळ गेला. सगळी व्यवस्था नीट लागल्यावर वर्गणीदारांकडे वर्गणीसंबंधीं पत्रें पाठविलीं. वर्गणीदारांच्या वर्तनावर प्रकाश पडण्यासाठीं माधवरावांचे शब्द येथें सादर केल्यास अधिक उचित होईल. ते म्हणतात:—

वर्गणी वसूल करण्याचे कामीं बहुत पत्रें धाडलीं. तगादेही पुष्कळ केले. त्या संबंधानें एकंदर सुमारें ३० रुपये बुडीत खर्च आला. ज्याकडे पत्रें धाडलीं व तगादे झाले. त्या गृहस्थांचीं नांवें येथें लिहिणें अवश्य नाहीं. पण ते सर्व विद्वान् आणि सभ्य यांत मोडत आहेत. तेव्हां त्यांजकडून या कामीं अशी अनास्था झाली हें देशाचें दुर्भाग्य होय. तथापि एवढ्याकरितां अजीबाद उद्योग सोडून देऊन निराश होणें हेंही वाजवी नाहीं, असें व्यवस्थापकांचें मत आहे.

मराठी ग्रंथांचा संग्रह वाढावा, ही कल्पना सर्व संमत आहे. गुजरायेंत दरसाल वर्गणीदार थिनमोबदला ५ रु. दान करतात. अशा रीतीची इकडे व्यवस्था झाल्यास महाराष्ट्री बोलणारे ११ जिल्हे आहेत, शिवाय संस्थानें आहेत. एवढ्या विस्तीर्ण प्रदेशांत पांच रुपये देणारे पांचशें लोक मिळू नयेत, असें वाटत नाहीं.

या वर्षांत व्यापाराच्या दृष्टीनें माधवरावांनीं एका नव्या उपयुक्त कार्याला हात घातला. कागदाची गिरणी पुण्यास काढण्याविषयीं कल्पना निघाली. माधवरावांनीं या कल्पनेला पाठबळ देऊन तिचा पुरस्कार केला. शेअर खपविण्याच्या कामांत मेहेनत घेतली. पुढें तीन वर्षांनीं हें कार्य मूर्त स्वरूपांत आलें.

पुढचीं दोन वर्षें विशेष धामधुमीचीं नाहींत. वसंत–मालेंतल्या व्याख्यानांखेरीज त्यांची महत्त्वाची कामगिरी आढळत नाहीं. १८८३ सालीं वक्तृत्वोत्तेजक समारंभ चालू असतां दुसरी एक आगंतुक सभा भरली होती. यावेळीं बंगालचे बाबू सुरेंद्रनाथ (हल्लींचे सर सुरेंद्र नाथ) यांना कैदखान्यांत जाण्याचा प्रसंग आला. एका खटल्यासंबंधीं

लिहितांना त्यांनीं आपल्या 'बंगाली' वृत्तपत्रांत कोर्टाला बेअदबी वाटण्यासारखा मजकूर लिहिला. सुरेंद्रनाथ हे या सुमारास बंगालमध्यें सार्वजनिक चळवळींतले प्रमुख पुढारी होते. सरकारला त्यांचे उद्योग आवडेनासे झाले होते, अशा वेळीं हा बेअदबीचा खटला उपस्थित झाला. सुरेंद्रनाथांनीं सामोपचारानें खटल्याची घोरपड उडवून लाव- ण्याचा यत्न केला, पण बेअदबीबद्दल हायकोर्टांतून त्यांस कैदेची शिक्षा देण्यांत आली. हा खटला व त्याचा निकाल अवलोकन करून देशांत चोहोंकडे खळबळ उडाली. जागजागीं निषेधप्रदर्शक सभा झाल्या. ज्या पुणें शहरानें दहा वर्षांपासून राजकीय चळवळीचा सर्व देशाला धडा घालून दिला त्या शहरांत या खटल्याचा विचार होणें आवश्यक नव्हतें, असें कोण म्हणेल? विचार करण्याकरितां सभा भरली. वर सांगितलेली आगंतुक सभा ती हीच होय. सभेला नेहमींच्या रिवाजा- प्रमाणें सबजज्ज हजर होते. अँग्लो-इंडियन वृत्तपत्रकारांना हा सब-जज्जांचा अतिशय: हिडीस स्वरूपाचा गुन्हा वाटला, आणि 'राजद्रोह राजद्रोह' असा गवगवा त्यांनीं आरंभला. सरकारला न आवडणाऱ्या व्यक्तीबद्दल सहानुभूति दाखविण्याकरितां सभा भरते आणि त्या ठिकाणीं सरकारचे बंदे सबजज्ज राजरोस निर्धास्त हजर रहातात. त्यांना सभेचें स्वरूप ठाऊक नव्हतें, हें शक्य नाहीं, पण सभेच्या स्वरूपाविषयीं ते अज्ञान होते, असें मानलें व सभेंत हजर रहाण्याबद्दल त्यांस क्षमा केली, तरी त्यांचें पुढचें वर्तन दोषास्पद ठरतें. सभेंत सरकारची निंदा सुरू होतांच त्यांनीं :उठून जाणें किंवा निंदेला सरकारच्या बाजूनें उत्तर देऊन आपल्या मायबाप अन्नदात्या- बद्दल इमान दाखविणें, असे दोन मार्ग त्यांना खुले होते, पण त्यांपैकी

एकाचाही अवलंब त्यांनीं केला नाहीं. सरकारचे नोकर राजद्रोही सभेंत खुशाल भाग घेतात हा सरकारचा केवढा अंधळेपणा, केवढा बुद्धिभ्रंश, अशी चर्पटपंजरी अँग्लोइंडियन पत्रांनीं चालविली. हिंदी वृत्तपत्रांनीं सबजज्जांचा कैवार घेतला. ही शाब्दिक लढाई महिना पंधरादिवस चालून आपोआप थंड पडली. सरकाराच्या कानांत विष ओतण्याकरितां अँग्लोइंडियन पत्रें कसा पराचा कावळा करीत असतात याचा हा एक मासला आहे. सर रिचर्ड टेंपलसारखा कडवा इसम असता तर त्यानें सबजज्जांना वरच्यासारख्या प्रसंगानें सळो कीं पळो करून, सोडलें असतें; आणि कदाचित् माधवरावांची, बदलीच्या रूपानें अन्यत्र उचलबांगडी झाली असती. पण यावेळीं सर जेम्स फर्ग्युसन हे गव्हर्नर विचारी असल्यामुळें कोणत्याही प्रकारचा अनर्थ उद्भवला नाहीं.

माधवरावांच्या घरांत एखादें मंगलकार्य निघालें कीं, त्याच्यांत कोणकोणतीं व्यंगें सांपडतात, हें पहाण्याकडे लोकांची नजर लागलेली असे. १८८४ सालीं माधवरावांच्या दुसऱ्या धाकट्या भावाचें लग्न निघालें. १८८० सालीं पहिल्या भावाचा विवाह झाला होता. या दोन्ही प्रसंगीं त्यांनीं हुंडा घेतला व विवाहांतले जुन्या चालीचे सुधारकांना मान्य नसलेले सोहळे होऊं दिले, याबद्दल वृत्तपत्रांतून टीका आढळते. हुंडया-विरुद्ध सुधारकांचा आक्षेप आहे, यांत संशय नाहीं. व आक्षेप घेण्याजोगीच ती अनिष्ट बाब आहे. परंतु आक्षेप कोणत्या हेतूनें घेतला जातो, याकडे लोकांचें फारसें लक्ष नसल्यानें माधवरावांचें कृत्य प्रतिकूळ वृत्तपत्रकारांना टीकास्पद वाटलें. लग्नाच्या वाटाघाटींतली हुंडा ही एक अपरिहार्य अट होऊन बसली आहे व तिच्यामुळें उपवर मुलींच्या निर्धन बापांचे विलक्षण हाल होतात, एवढयाकरितां सुधारक

वर्ग हुंडयाचा अत्यंत निकरानें निषेध करीत असतो. कन्यादानाबरोबर मुलीच्या बापाकडून जामाताला आपखुषीनें कांहीं रोख किंवा वेगळ्या स्वरूपाची देणगी मिळाली तर तिचा स्वीकार करूं नये, असें सुधारकांनीं कधीं म्हटलें नाहीं व ते म्हणतही नाहींत. हुंडयाच्या व्यवहारांत आपखुषीऐवजीं जबरदस्ती किंवा सक्ती घुसली आहे, तिच्याविरुद्ध सुधारकांचा कटाक्ष आहे. माधवरावांनीं भावांच्या लग्नांत हुंडयाला संमति दिली, परंतु हुंडयाचा आंकडा ठरल्याशिवाय किंवा तो अगाऊ पदरांत पडल्याशिवाय विवाहच करावयाचा नाहीं, असा सक्तीचा व अडवणुकीचा भाग त्यांत नव्हता. त्यांच्या संमतीचें दुसरेंही एक कारण सांगणें अवश्य आहे. माधवरावांचे दोघेही बंधु सावत्र होते. गोविंदरावांच्या मृत्यूनंतर त्यांच्या सापत्न मातेचें दुःख हलकें करण्यासाठीं त्यांचा प्रयत्न चालला होता. तिच्या इच्छेला या लग्नांतून मान दिला नसता तर सौभाग्यास अंतरल्यामुळें आपल्या इच्छेला कोणी विचारीत नाहीं, अशी स्त्रीबुद्धीस अनुसरून दुःखदायक कल्पना तिच्या मनांत आल्याशिवाय राहिली नसती. सापत्न मातेच्या सुखासाठीं माधवरावांना हुंडयाच्या गोष्टीला अनुमति देणें भाग पडलें व त्यामुळें त्यांना भावाचें लग्न जरा लवकरच करावें लागलें. सख्खी सून घरांत आली म्हणजे तिचा लळा जडून सावत्र आईला आपल्या दुःखाचा विसर पडेल, असा माधवरावांचा या लग्नाचे वेळीं एक हेतु होता. तो त्यांनीं सिद्धीस नेला. त्यांच्या प्रत्येक खाजगी व सार्वजनिक कृत्यांतले, असतील नसतील ते दोष, चव्हाट्यावर मांडणाऱ्या मंडळींना मोठी शिकार सांपडल्याचा आनंद झाला व त्यांनीं माधवरावांवर टीकेची लाखोली वाहून आपलें कर्तव्य बजावलें.

माधवरावांचें व संगीताचें कधींच सख्य नव्हतें. १८८२ सालीं एकदां नवीन उदयास आलेल्या किर्लोस्कर मंडळीच्या नाटकाला इतरांच्या भिडेखातर गेल्याबद्दल उल्लेख सांपडतो. रंगभूमीसमोर ते बसले होते. पण त्यांनीं नाटक पाहिलें कीं नाहीं, हें सांगतां येणार नाहीं. संगीताच्या श्रवणानें कितपत आनंद झाला, हेंही समजण्याला मार्ग नाहीं. परंतु संगिताचीं कला या दृष्टीनें असलेली महती त्यांना मान्य होती. भक्तिरसाची संगीतानें अंतःकरणांत उठावणी होते म्हणून प्रार्थनासमाजांतही गायनवादनाचा उपक्रम करण्यांत आला होता. कला या नात्यानें संगीत विद्येचें संरक्षण आणि संवर्धन करण्याला त्याची कशी तयारी होती, याचा मासला १८८४ सालीं पुणेंकरांना पहावयास सांपडला. त्यावर्षी पुण्याच्या गायनसमाजाला एक वैरी उत्पन्न झाला होता. एका संस्थेऐवजी दोन संस्था अस्तित्वांत आल्या व त्यांतली नवी संस्था पहिलीच्या मुळावर जन्मास आली होती. जुन्या संस्थेच्या चालकांनीं तंटा मिटविण्याची स्वतंत्र रीतीनें पुष्कळ खटपट करून पाहिली, पण भांडण मिटण्याचें बाजूस राहून उलट विकोपासमात्र गेलें, तेव्हां निरुपाय होऊन दोन्ही संस्थांचें चालक माधवरावांकडे आले. तंटा मिटण्याची आपसांत तोड निघेनासी झाली कीं, मग माधवरावांना सल्ला विचारायचा व त्यांनीं सुचविलेले उपाय अंमलांत आणून तंटा मिटवायचा, अशी पुण्याला या दिवसांत रीतच पडली होती. गायनसमाजांचें भांडण माधवरावांकडे आलें, तेव्हां दोन्ही तटांतल्या दुराग्रही भांडखोरांना एकत्र बोलावून माधवरावांनीं, त्यांचें भांडण मिटून जुन्या समाजांत वर्चस्व राहील, अशी युक्ति काढली आणि फाटाफूट मोडून पूर्वीच्या समाजाला जास्त मजबुती आणून

दिली. या तंट्यांचा निकाल लावण्याकरितां माधवरावांना दर आठव-ड्यास तीन तीन चार चार तास हट्टी भांडकुदळांची समजूत घालण्यांत खर्चावे लागले.

१८७६, १८७८, १८८० असे दोन दोन वर्षांच्या अंतरानें तीनदां मित्रांच्या मृत्यूचे आघात माधवरावांना सहन करावे लागले होते, हें वाचकांस माहीत आहेच. तिसऱ्या आघातानंतर काळानें चार वर्षें विश्रांति घेतली आणि या वर्षी मार्च महिन्यांत गुरु, स्नेही व भक्त या तिन्ही दृष्टीनें माधवरावांना अत्यंत पूज्य वाटणारे सुप्रसिद्ध गणितशास्त्रज्ञ केरो लक्ष्मण छत्रे यांना ता. १९ मार्च रोजीं काळानें एकाएकीं ओढून आलें. बाळशास्त्री जांभेकरांनंतर गणितशास्त्राचें पाश्चात्यांना दिपवून टाकणारें पांडित्य केरूनानांनींच दाखविलें. हिंदुस्थानाबाहेर त्यांच्या विद्वत्तेची ख्याति पसरून त्यांच्या शास्त्रीय मतांना मान दिला जात होता. शिक्षणाचा विशेष संस्कार नसतां केवळ बुद्धिमत्तेच्या जोरावर डेक्कन कॉलेजां-तल्या अध्यापकमुख्याच्या श्रेष्ठासनापर्यंत महाराष्ट्रामध्यें प्रथम यांनींच मजल मारली, असें म्हणावें लागतें. मरणापूर्वी कित्येक दिवस त्यांची प्रकृति खालावली होती. पण आपलें शारीरिक दुःख त्यांनीं कधीं एका चकारानेंही बाहेर दाखविलें नाहीं. माधवराव विद्यार्थी असतांना त्यांचा व नानांचा परिचय झाला. ज्ञानप्रसारक सभेंत नानांनीं पुष्कळ शास्त्रीय विषयांवर निबंध लिहिले आहेत. पेनश घेतल्यावर पुण्यास त्यांनीं स्त्रीशिक्षणाचें काम कसें चालविलें होतें, याची माहिती श्री. रमाबाईंच्या आठवणींत विस्तृत आहे. त्यांचा स्वभाव मानी व तापट होता, परंतु परोपकारवृत्तीच्या निर्मळ ओघाच्या अनुभवामुळें त्यांच्या पोटांतले हे

दोष फारसे कोणाला दुखवीत नसत. विद्यार्थीवर्गाला त्यांच्यासारखा सढळ आश्रय पूर्वी व नंतर कोणीच दिला नसेल. प्राचीन कुलपतींच्या वर्णनाला तंतोतंत शोभेल अशी त्यांची विद्यार्थ्यांच्या बाबतींतली वागणूक होती. असा श्रेष्ठ पुरुष दिवंगत झाल्यामुळें माधवरावांचें अंतःकरण दुःखाच्या ओझ्याखालीं दडपून गेलें. तथापि आपल्या मित्राला वाङ्मयतिलांजलि अर्पण करण्यासाठीं त्यांनीं ज्ञानप्रकाशांत एक मोठा लेख लिहिला. In memoriam हा त्याचा मथळा असून पहिलेंच वाक्य, माधवरावांच्या हृदयांत बसणाऱ्या आदराचें व त्यास नानांच्या मृत्यूमुळें वाटणाऱ्या हानीचें, दर्शक आहे. तें असें:—

A prince of men has fallen, and the pride of Poona is laid low in the dust!

पुढच्या भागांत नानांच्या श्मशानयात्रेचें आणि प्रोफेसर या नात्यानें त्यांनीं बजावलेल्या कामगिरीचें इत्थंभूत वर्णन देऊन माधवराव म्हणतात:—

Great as his claims are upon the gratitude of the nation, as a Professor and Scientist, these claims sink into nothing by the side of his greatness as a gentleman representative of all that is best and noblest in our national character.

यानंतर रीतसर सभा भरून त्यांच्या स्मारकाची योजना करण्यांत पुण्याचे नागरिक माधवरावांच्या नेतृत्वाखालीं दंग झाले.

या दिवसांत रिपनसाहेबांची स्थानिक स्वराज्यसंस्थांची योजना लोकांच्या चर्चेत होती. अनेक शहरांतल्या होतकरू, चळवळ्या नागरिकांना आपली कर्तबगारी दाखविण्याला नवें क्षेत्र लाभणार म्हणून आनंद झाला होता. त्या विषयाचा अभ्यास करण्यांत अशीं माणसें

मग्न होतीं. पुण्याला या विषयाचा कै. महादेव बल्लाळ नामजोशी यांनीं पिच्छा पुरविला होता. वसंत--व्याख्यान--मालेंत नामजोश्यांचें त्यासंबंधीं व्याख्यान झालें. स्थानिक स्वराज्यांतला प्रतिनिधि कसा असावा, त्याच्या हातून प्रामाणिकपणानें काम होण्यासाठीं कोणता उपाय काढावा, कर कोणते बसवावे आणि कोणी भरावे, असे व्याख्यानाचे चार विभाग होते. नामजोश्यांच्या व्याख्यानानंतर माधवरावांनीं प्रतिनिधीच्या जबाबदारीचें जें वर्णन केलें, ते महत्त्वाचें आहे. मतदारांना शिकविण्याची व अडचणीच्या वेळीं त्यांना मार्ग दाखविण्याची जबाबदारी प्रतिनिधीवर आहे. मतदारांच्या विचारांची पोपटपंची करणें, हें त्याचें कर्तव्य ठरत नाहीं, असें माधवरावांनीं आपलें मनोगत बोलून दाखविलें. आपल्या देशांत स्थानिक स्वराज्याचें सगळें साहित्य तयार करावयाचें आहे; मतदार, त्यांचे प्रतिनिधि आणि त्यांचीं स्थानिक स्वराज्यांतलीं कर्तव्यें, याविषयीं लोकांत मुळींच ज्ञान नव्हतें, हें ओळखूनच माधवरावांनीं वरील विचार प्रदर्शित केले. प्रतिनिधींना मुशाहिऱ्यादाखल थोडेसें वेतन द्यावें, हा त्यांचा दुसऱ्या प्रश्नाला जबाब असून आस्टेलियाचा स्वमतपुष्ट्यर्थ त्यांनीं दाखला दिला आहे. अप्रत्यक्ष कर बसविण्याला हरकत नाहीं, असें ते तिसऱ्या प्रश्नासंबंधीं बोलतांना म्हणाले. धनोत्पादक कामाचा फायदा नागरिकांनाच मिळतो, म्हणून त्याबाबतींत त्यांनीं खर्च सोसण्याची कुरकूर करूं नये; असा त्यांनीं चौथ्या प्रश्नांचा निकाल लावला.

व्याख्यानमालेंत माधवरावांनीं हिंदुस्थानाच्या राज्यकारभारावर स्वतंत्र भाषण करून १७८४पासून १८८४पर्यंतचा आमूलाग्र वृत्तांत निवेदन केला. हें व्याख्यान पुढें सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत प्रसिद्ध झालें

आहे. या दिवसांत वसंत–व्याख्यान–मालेमध्यें लोकांची एका नव्या विषयामुळें चांगलीच करमणूक होत असे. कुंटयांना यावेळीं कारखान्यांचें वेड लागलें होतें. कारखाने उभारल्याखेरीज देशाचा उद्धार होणार नाहीं, असें त्यांचें प्रत्येक व्याख्यानांत जोरजोरानें सांगणें असे. स्थानिकस्वराज्य, कौन्सिल वगैरे सगळे उपाय झूट आहेत. कारखाने पाहिजेत, धर्मनीति इत्यादि गोष्टीदेखील व्यर्थ आहेत, असा त्यांच्या मनाचा पक्का ग्रह होता. आपल्या विचारांचा पंथ समजण्याकरितां त्यांनीं 'चिसाडिझम' असा नवा शब्द वापरण्यास प्रारंभ केला होता. माधवरावांना एकटया कारखान्यांतच उद्धाराची गुरुकिल्ली आहे, असें वाटत नव्हतें. चटकदार कल्पनेमुळें वेडावून जाणें, हें त्यांच्या स्वभावालाच माहीत नव्हतें. त्यामुळें या दोघा महादेवांचें सभास्थानीं शाब्दिक द्वंद्व माजून लोकांच्या करमणुकीला तूट पडत नसे. कुंटे हास्यरसाला जास्त उकळी फोडीत होते, हें न सांगतांही लक्षांत येण्याजोगें आहे. या द्वंद्वाचें वृत्त पुष्कळांच्या आठवणींत व तत्कालीन वर्तमानपत्रांत नमूद आहे.

माधवरावांचे एक विद्वान् शिष्य व कर्तबगार स्नेही कै. काशिनाथ त्रिंबक तेलंग यांना त्यावेळीं नामदारी प्राप्त झाली, म्हणून पुण्यास बोलावून सार्वजनिक सभेच्या विद्यमानें तेलंगांचा माधवरावांनीं सन्मान केला. कुंटे अध्यक्षस्थानीं होते. तेलंगांचें अभिनंदन करतांना, हिंदी सभासदांनीं एकवटून देशाच्या हिताचें संरक्षण केलें पाहिजे, अशी कौन्सिलांतल्या कर्तव्याची दिशा माधवरावांनीं दाखवून दिली.

पुण्याला माधवरावांनीं, उणीपुरीं बारावर्षें घालविलीं. अनेक संस्था निघाल्या. परंतु मुलींच्या शिक्षणासाठीं हायस्कूल स्थापन करण्याचें

कार्य झालेलें नव्हतें. त्या कार्याचा योग यावर्षी आला, १८८२ सालीं सर विल्यम वेडरबर्न यांची पुण्यास बदली झाली, त्यांच्या व माधवरावांच्या विचारांत अतिशय साम्य होतें. बंगालसारखी कायमधारापद्धति मुंबई प्रांतांत किंबहुना सर्व हिंदुस्थानांत सुरू करावी, असें वेडरबर्नसाहेबांचें मत होतें, त्याला सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत मोठा लेख लिहून माधवरावांनीं दुजोरा दिला आहे. शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याकरितां पतपेढया काढण्याविषयीं वेडरबर्न आग्रहानें वारंवार प्रतिपादन करीत होते, माधवरावांनीं त्यांच्या मताची ग्राह्यता स्वतंत्र निबंध लिहून सिद्ध केली आहे. या समान विचारांच्या पुरुषांची मैत्री झाल्यामुळें फीमेल हायस्कूलची स्थापना करण्याचा योग आला. आपल्या मृतबंधूच्या स्मरणार्थ वेडरबर्न यांना हजार रुपयाची रक्कम स्त्रीशिक्षणाकडे खर्चावयाची होती. सरकारी फीमेल नार्मल शाळेला ही रक्कम देऊन टाकावी असें त्यांनीं ठरविलें. माधवरावांनीं या हजार रुपयांला वर्गणीच्या रूपानें दुसऱ्या हजारों रुपयांची जोड देण्याची योजना निश्चित करून, जुलई महिन्यांत सभा भरविली आणि मुलींच्या हायस्कुलाचा विचार जाहीर केला. पंडित, मोडक, भांडारकर, वगैरे त्यांचे स्नेही त्यांच्या साह्यास तत्पर होतेच. याप्रसंगीं शंकर पांडुरंग पंडितांनीं अतिशय श्रम घेतले. आगष्ट महिन्यांत सरकारकडे शिष्टमंडळ रवाना झालें व सरकारचे सहानुभूतिपर अभिवचन पदरांत पडलें. सप्टेंबरांत दसऱ्याच्या विजयमुहूर्तानें शाळा स्थापन झाली. सदर चळवळींत मोठमोठाले दक्षिणी संस्थानिक भागीदार होते. त्यामुळें हुजूरपागेची जागा हायस्कुलाकरितां झटक्यास मिळाली. संस्था काढण्याचा विचार ठरल्यापासून अवघ्या दोन महिन्याच्या आंत

ती लोकांना मूर्तावस्थेंत दिसूं लागली. असा कर्तबगारीचा झपाटा पूर्वी कधीं पुणेकरांनीं अनुभवला नव्हता. त्यामुळें फीमेल हायस्कूलच्या पुरस्कर्त्यांचा वेग पाहून पुराणमतवादी पुणेकरांना घेऱ्या आल्या. त्यांचा मेंदू डोक्याच्या पोकळींत गरगर फिरायला लागला. बहुतेक सर्व वृत्तपत्रांनीं स्त्रीशिक्षणाविरुद्ध इतकी हाकाटी माजविली कीं, आजच्या दिवसांत तिचें हंसूंच येतें. पुण्यास घरोघर हा एकच विषय चर्चेच्या खलांत मोठ्या आवेशानें कुटला जात होता. स्त्रीशिक्षण पाहिजे पण आजच उच्चप्रतीची शाळा स्थापन करण्याची आवश्यकता काय होती, असा आत्मविरोधी प्रश्न बहुतेक सर्व वृत्तपत्रें विचारीत होतीं. पुणेंवैभवानें प्रतिकूल टीकेच्या शर्यतींत अघाडी मारतां मारतां सगळ्यांवर ताण केली. पण थोडयाच अवकाशांत सज्जड ठेंच बसून सपशेल माफीचें त्याला लोटांगण घालावें लागलें. ही वेळ मोठी आणीबाणीची होती. स्त्रीशिक्षणाच्या पुरस्कर्त्यांना एकही पाऊल मागें घेणें शक्य नव्हतें आणि विरोधाचें शाब्दिक वादळ भयानक रीतीनें वहात होतें. शिक्षणानें स्त्रियांची नीति बिघडविण्याचा माधवराव, पंडित प्रभृति मंडळीचा घातक विचार आहे, अशी ओरड करण्याच्या भरांत सगळ्या युरोपियन स्त्रियांना काळिमा फासणारीं विधानें पुणेंवैभवानें प्रसिद्ध केलीं. सर विल्यम वेडरबर्न यांना ही गोष्ट कळतांच त्यांनीं माधवरावांना याचा प्रतिकार करण्याविषयीं निरोप पाठविला. माधवरावांनीं पुणेंवैभवकाराला पाचारण केलें. माफी मागण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. माधवरावांनीं सदर लेखकाला आपल्याबरोबर वेडरबर्न साहेबांच्या घरीं नेलें. त्यानें माफीपत्र छापण्याविषयीं कबूली दिली, पुढें माफीपत्र प्रसिद्ध झालें आणि तेवढयावर हें प्रकरण मिटलें. मध्यस्थींत माधवराव नसते तर

नुसत्या माफीवर पुणेंवैभव सुटलें नसतें. पुणेंवैभवाला थप्पड बसल्या-बरोबर पुष्कळशा वृत्तपत्रांचा आणि वाक्पंडितांचा आवेश ओसरला. तथापि फीमेल हायस्कुलाला पहिल्या कांहीं वर्षांत बराच त्रास पोंचला, यांत संशय नाहीं.

निःस्वार्थ समाइकीच्या तत्त्वावर निपजणाऱ्या फीमेल हायस्कूलचे डोहाळे जेव्हां पुण्याच्या नागरिकांस दिसूं लागले, तेव्हां दुसऱ्या एका संस्थेला त्याच तत्त्वाच्या भूमीवर स्थिर करण्याची योजना माधवराव, भांडारकर वगैरे मंडळींनीं ठरविली होती. १८८० सालांत न्यूइंग्लिश-स्कूल अस्तित्वांत आलें. परंतु त्याच्या मालकीची जबाबदारी विष्णुशास्त्री चिपळूणकरांकडे होती. १८८२ मध्यें शास्त्रीबोवा मरण पावले. त्यावेळीं तंटाबखेडा उत्पन्न झाला नाहीं. १८८४ सालांत संस्थेच्या चालकांत दुही डोकावूं लागली. तिला प्रबळ न होऊं देण्याला समाइकीचें तत्व हा एकच उपाय होता व त्या उपायानुसार आक्टोबरमध्यें 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' उत्पन्न झाली. सार्वजनिक सभेला स्वतःच्या सत्तेची जागा या वर्षांतच माधवरावांच्या खटपटीनें लाभली.

या चार वर्षांतल्या आणखी एकदोन गोष्टी सांगून सदर मुदतींत माधवरावांनीं सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांतून प्रसिद्ध केलेल्या कांहीं लेखांची माहिती देणें अवश्य आहे. १८८२ सालीं सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षत्वाखालीं हिंदुस्थानांतल्या शिक्षणाचा विचार करण्यासाठीं कमिशन नेमण्यांत आलें होतें, माधवराव या कमिशनपुढें साक्ष देतील अशी सर्वांची अपेक्षा होती, परंतु त्यांनीं साक्ष देण्याचें नाकारलें. कदाचित् न्यूइंग्लिशस्कुलाचे सुपरिंटेंडंट वामन शिवराम आपटे व सार्वजनिक सभेचे चिटणीस सीताराम हरि चिपळूणकर यांच्या साक्षींत

माधवरावांचा हात असल्यामुळें त्यांना स्वतंत्र साक्ष देणें इष्ट वाटलें नसेल. याशिवाय साक्ष नाकारण्याच्या कारणांविषयीं दुसरा तर्क करतां यत नाहीं. माधवराव साक्ष देणार नाहींत, ही गोष्ट लोकांत समजली तेव्हां कित्येक वृत्तपत्रांनीं त्यांच्या इनकाराचा निषेध व्यक्त करून त्यांची साक्ष होणें आवश्यक आहे, असें आग्रहपूर्वक लिहिलें, परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. माधवरावांनीं हंटर कमिशनाच्या कामास अनुलक्षून दोन निबंध त्रैमासिकांत प्रसिद्ध केले. ते जिज्ञासूंना श्री. रमाबाईनीं छापविलेल्या निबंध-संग्रहांत पहावयास सांपडतील.

एकदां कै. ग. ज. अगाशे पुण्याच्या लायब्ररींत माधवरावांशेजारीं बसून वाचीत असतां माधवरावांनीं मध्येंच त्यांना 'तें पाहिलेत का' असा प्रश्न केला. अगाश्यांनीं वाचनविषयांतून डोळे काढून माधवरावांकडे पाहिलें, तों माधवरांच्या नेत्रांतून आसवांच्या धारा वहात आहेत व त्यांचा कंठ दाटून आला आहे, असा देखावा त्यांच्या नजरेस पडला. हा काय प्रकार असावा म्हणून अगाशे बुचकळ्यांत पडले. ही वेळ संध्याकाळची होती आणि आजूबाजूस हृदयद्रावक असा कोणताच देखावा नव्हता. फक्त ज्ञानोबा-तुकारामाच्या पालखीची गर्दी रस्त्यांतून चालली होती. अगाश्यांना थोडयाच वेळांत समजलें कीं, या पालख्यांचें दृश्य पाहून माधवरावांना गहिंवर आला होता. महान् भगवद्भक्तांच्या पुण्याईचा प्रभाव कसा असतो, त्यांनीं इहलोक सोडल्याला दोनतीनशें वर्षें झालीं तरी त्यांच्या नांवाचा गजर सालोसाल अखंडित लोकांच्या स्वयंप्रेरणेनें चालला आहे. ही गोष्ट पाहून माधवरावांच्या मनांत भगवद्भक्तीचा उद्रेक झाला व तोच अश्रुप्रवाहाच्या रूपानें अगाश्यांना दिसला. अगाश्यांचा हा अनुभव बहुधा

१८८२ सालांतला असावा, कारण त्यावर्षी माधवरावांचें या विषयावर प्रार्थनासमाजांत अतिशय मनोरम व्याख्यान झालें. विशेष प्रसंगानें, अनुभवानें किंवा टीकेनें माधवरावांच्या मनांत एखाद्या विचाराची लाट उसळली म्हणजे ती सभांतून प्रकट करण्याचा त्यांची रीत होती. पंढरीस जाणाऱ्या पालख्यांसंबंधाचें प्रस्तुत भाषण धर्मपर व्याख्यान संग्रहांत ( पृष्ठ १६३ ) प्रसिद्ध झालेलें आहे. पालख्यांचा मार्ग, देहू-आळंदी येथून त्या निघाल्यानंतर मार्गांत त्यांस येऊन मिळणारीं दिंडीवाल्यांचीं पथकें, भजनी मेळ्यांचें माहात्म्य, वगैरे माहिती या भाषणांत विपुल आहेच, परंतु प्रार्थनासमाजाच्या कर्तव्याच्या दृष्टीनें त्यांत शेवटीं त्यांनीं उलगडा केलेला आहे. आपला पंथ भक्तिमार्गांतलाच एक आहे, अशी पक्की खूण माधवरावांना यावेळींच पटली असावी.

१८८४ सालीं मलबारींना लिहिलेल्या पत्रांत माधवरावांनीं आपण तीन वर्षांमागें म्हणजे १८८१ मध्यें सामाजिक सुधारणेच्या बाबतींत शपथा घेण्याच्या चळवळीला प्रारंभ केल्याचें लिहिलें आहे. मुलांचें १७ किंवा १८ वर्षांच्या आंत व मुलींचें १० किंवा ११ वर्षांच्या आंत लग्न करूं नये, अशा अर्थाचें एक पत्रक तयार करून पुण्यांतल्या अनेक सुशिक्षित व्यक्तींच्या सह्या घेण्याचें काम त्यांनीं चालविलें होतें. १८७३ सालीं त्यांनीं पुण्यास एक सभा भरवून, देशांतरास जाणाऱ्या लोकांना प्रायश्चित्ताचें बंधन नसावें, अशा आशयाच्या एका पत्रकाखालीं लोकांच्या सह्या घेण्याची खटपट केली होती. लोकमत तयार करण्याचें माधवरावांचे मार्ग यावरून कळून येतात. केवळ शिकलेल्या लोकांचें मत तयार केल्यानें सगळा कार्यभाग होत नाहीं,

याची जाणीव माधवरावांना होती. मलबारींना पाठविलेल्या पत्रांत त्यांनीं याबद्दल असें म्हटलें कीं, शिक्षणानें व्युत्पन्नचित्त ( cultivated sentiment ) बनलेल्या लोकांचीं मतें घेणें म्हणजे मोठ्या कार्याचा प्रारंभ आहे. या सुमारास त्यांचा दुसराही एक उद्योग सुरू होता. कायदे—कौन्सिलांतील हिंदी सभासदांच्या भेटी घेऊन सामाजिक सुधारणेसंबंधीं कांहीं कायदा त्यांनीं आपापल्या कौन्सिलांत आणावा, असें माधवराव त्यांना सांगत होते. 'तुम्ही आपल्या कौन्सिलदारीची मुदत, असें एखादें कार्य हातीं घेऊन, चिरस्थायी करून सोडा, सरकारी ठरावावर टीका करण्यांत काय हंशील आहे' अशाप्रकारचे उत्तेजनपर व स्फुरणदायक उद्गार ते कौन्सिलरांजवळ काढीत असत. कौन्सिलांत सामाजिक विषय आला कीं, लोकांचें लक्ष तिकडे वेधून जातें व राष्ट्रीय अंतःकरणाच्या शिक्षणाला त्याची मदत होते, असे माधवरावांचे याबाबतींतल विचार होते.

लार्ड रिपन यांच्या कारकिर्दीला प्रारंभ झाल्यानंतर हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत बरेच फेरबदल होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. हिंदुस्थानासारख्या अवाढव्य देशाचीं सूत्रें मध्यवर्ती वरिष्ठ सरकारानें सर्वांशीं आपल्या हातांत ठेवल्यामुळें प्रांतिक व्यवस्थेमध्यें वारंवार घोटाळे उपस्थित होतात. त्या घोटाळ्यांचा बंदोबस्त करण्याचा विचार प्रथम लार्ड मेयो यांनीं अंशतः अमलांत आणला, पण तो जसा टिकावा तसा टिकला नाहीं. मध्यवर्ती सरकारच्या तंत्रानें वागण्यामुळें प्रांतिक कारभारांत दिसणारी बजबजपुरी तशीच कायम राहिली. लार्ड रिपन यांनीं पुनः प्रांतिक सरकारें आणि मुख्य वरिष्ठ सरकार यांच्यांतले अधिकार नक्की ठरविण्याचा घाट घातला. अधि-

कारांची विभागणी केल्याखेरीज सगळा कारभार सुयंत्र चालणार नाहीं, अशी रिपनसाहेबांची खात्री झाली होती. ही संधी पहातांच माधवरावांनीं अधिकारविभागणीची एक योजना तयार केली. अधिकार विभागणीच्या सोपानपरंपरेंतली अगदी खालची व शेवटची पायरी जिल्हा होय, असें त्यांनीं या योजनेंत दाखविलें आहे. म्युनिसिपाल्टयांकडे व लोकल बोर्डांकडे पुष्कळशीं खातीं सोंपवावीं. जिल्ह्याच्या शहरीं तीन जज्जांचें हायकोर्ट असावें, हें त्यांनीं पूर्वीच्या लेखांत म्हटलें होतें. प्रांतिक कायदेकौन्सिलांचे अधिकार वाढविण्यांत यावे, असें त्यांनीं यावेळच्या योजनेंत म्हटलें आहे. १८८२ सालांतील एप्रिलच्या अंकांत Administrative Reforms in the Bombay Presidency या मथळ्याखालीं त्यांनीं ही योजना विशद करणारा लेख लिहिला आहे. आपली योजना दृष्टीस पडतांच पुष्कळांना ती कल्पनेची लीला वाटेल, अशी जाणीव माधवरावांना असल्यामुळें त्यांनीं शेवटीं पुढील उद्गार काढले आहेत:—

We are fully aware that the majority of our proposals will be denounced as purely visionary and radical by the bureaucratic mind. In all ages and in all countries the vested interests have been the strongest opponents of progress and reform. These opponents, must however be met and overcome in a constitutional manner. And this can not be done unless a strong public opinion is educated and brought to bear upon the bureaucratic mind.

सगळ्या देशांत एकाच ठशाची राज्यपद्धती चालू असावी, ही गोष्ट माधवरावांना मान्य नव्हती. हिंदुस्थानांतल्या प्रत्येक प्रांतांत कांहींना कांहीं सामाजिक विशिष्टत्व आहे, यामुळें प्रगतीमध्यें पुढें गेलेल्या

प्रांतांना जो राज्यकारभार आवडेल व मानवेल, तो मागसलेल्या प्रांतांना रुचणार नाहीं व पचनीं पडणार नाहीं, म्हणून प्रांताच्या परिस्थितीस अनुसरून राज्यपद्धतीचें धोरण असावें, असें मत त्यांनीं The Central Provinces Land Revenue and Tenancy Bills यालेखांत १८८१ सालीं ( त्रैमासिकाच्या एप्रिलच्या अंकांत ) व्यक्त केलें आहे. ते सुरवातीसच म्हणतातः—

If there is one point more than another which strikes every student of British Indian Administration in this country, it is its incapacity to realise to itself the fact that the institutions of a country can never be permanently, or even for a long time, out of harmony with its intelligence, social advance, and economic conditions, without producing demoralizing consequences. The differing conditions of national development in various provinces of India are too often ignored and set aside to make room for a uniform administration. One code, one law, one measure, the same taxation, the same routine forms, a fondness for uniformity as an end in itself, this is the besetting sin of the administration. The mischief is aggravated by alterations of policy, which alike err in exaggerating the action of Government, out of accord with the contemporary wants and aspirations of the people. The change when it comes is to late, and has such a violent swing, that far from curing the mischief already accomplished, it leads to fresh and great troubles and further demoralization, setting class against class, destroying the best elements of national life and growth, and stimulating the worst instincts.

हा निबंध मध्यप्रांतांतल्या शेतकऱ्यांसंबंधीं झालेल्या नव्या कायद्यास अनुलक्षून लिहिला आहे. १८७५ सालीं शेतकऱ्यांचे दंगे झाल्यावर त्या वर्गाच्या दुःखनिवारणाकरितां १८७९ सालीं Deccan Agriculturist Relief Act नांवाचा कायदा पास झाला. या कायद्यांतील दोषांचा ऊहापोह माधवरावांनीं एकंदर चार निबंध लिहून केला आहे. त्यांच्या सुचनेवरून सर फेरोजशहांनीं वरिष्ठ कायदेकौन्सिलांत कांहीं दुरुस्त्या आणल्या, परंतु शेतसाऱ्याच्या वसूलींतला मुख्य दोष कायम ठेवून शेतकऱ्यांच्या त्रासाला दुसऱ्या उपायांनीं कमी करण्याचा हेतु सरकारानें पार पाडला. कायमधाऱ्याची पद्धति अंमलांत आल्याखेरीज शेतकऱ्यांची स्थिति सुधारणार नाहीं, असा माधवरावांच्या मनाचा पक्का ग्रह झाला होता. त्या विषयीं त्यांनीं एकंदर तीन निबंध लिहिले. त्यांपैकी दोन Indian Economics या पुस्तकामध्यें प्रसिद्ध झाले आहेत. तिसरा निबंध 'वेडरबर्न साहेबांनीं सुचविलेल्या कायमधारा पद्धतीवरील आक्षेपांचें निरसन' या सदराखालीं सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत प्रसिद्ध झाला आहे. मध्यप्रांताच्या शेतकऱ्यांचा कायदा झाल्यावर बंगालच्या शेतकऱ्यांसंबंधीं एक कायदा अंमलांत आला. त्यावर त्यांनीं लिहिलेला निबंध Prussian land law and Bengal Tenancy Bills या सदराखालीं Indian Economics या पुस्तकांत घातलेला आहे. या सर्व लेखांतून माधवरावांचा निर्भीडपणा आणि विषयाची मुळापासून अभ्यास करण्याची रीत, हे दोन गुण दिसून येतात. त्या योगानें लेख चिरस्थायी स्वरूपाचे झाले आहेत.

१८८४ पर्यंत त्यांनीं लिहिलेल्या आणखी चार लेखांचा परामर्ष घेणें प्राप्त आहे. मध्य आशियांतील प्रश्न, देवस्थानांची व्यवस्था,

देशी संस्थानांचा राज्यकारभार व इल्बर्टबिल या चार विषयांवर हे निबंध असून चारी फार महत्त्वाचे आहेत. देशी संस्थानांच्या राज्यकारभाराच्या सुरुवातीस त्यांचें कसें चोहोकडे लक्ष होतें, तें समजतें. दिवाणाची निवड, कौन्सिलची निवड, खाजगी व दौलत यांची विभागणी वगैरे मुद्यांचा त्यांत सांगोपांग खल असून इंग्रज-सरकारनें संस्थानांची राज्यघटना ठरवावी, असें सुचविलेलें आहे. हिंदुस्थानांतल्या प्राचीन राज्यपद्धतीचें त्यांत थोडेसें पण मार्मिक विवेचन आहे. देवस्थानांच्या व्यवस्थेबद्दल त्यांनीं स्थानिक कमेट्या नेमाव्या आणि त्यांच्या हातीं कारभार सोंपवावा, असें म्हटलें आहे. इलाख्याच्या शहरांत सर्व देवस्थानांवर देखरेख करणारी कमिटी नेमावी, असा या बाबतींत सरकारचा विचार होता. तो विचार लोकमताचें पोषण करणारा नसून त्याची उपेक्षा करणारा आहे, असें माधवरावांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे. Central Asian Question (१८८२ जानेवारी) या निबंधांत माधवरावांनीं पुढें वारंवार प्रतिपादिलेल्या एका मुद्याची चर्चा आहे. विश्वाच्या घडामोडी मानवी राजकारणाला कशी गति देतात, याचें विवरण प्रारंभीं केलें असून तें पहातांच माधवरावांच्या विशाल विचारांचा भव्यपणा मनाला वाटतो. ते म्हणतात:—

The cosmic forces which shape the material world into form and activity have their consequences in the political arrangements of men and determine political conditions under a stern fatal necessity, which human art cannot overrule.

आशियाखंडाच्या मध्यभागांत रशियानें आपले हातपाय पसरले आहेत, रशियापासून हिंदुस्थानाला भय आहे, अशी ओरड करून

हिंदुस्थानांतल्या जनतेला इंग्रज राज्यकर्त्यांनीं भेवडावलें होतें. भय दाखवून हिंदी जनतेची संमति मिळण्याचा डाव इंग्रज राज्यकर्ते वारंवार खेळत असतात. लिटन साहेबांनीं अफगाणांशीं लढाई उकरून काढण्याचें कारण अशा प्रकारचें भय होय. माधवरावांनीं या प्रश्नाचा निराळ्या रीतीनें विचार केला आहे. आशियाखंडाच्या उद्धारासाठींच परमेश्वर रशिया, इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका इत्यादि देशांचें या खंडांत वर्चस्व माजूं देत आहे, असें सदर निबंधाच्या शेवटीं माधवरावांनीं म्हटलें आहे व उद्धाराचें कार्य कसें आस्तेकदम नकळत चाललें आहे, याचें इतिहासाला धरून सोपपत्तिक उद्घाटन केलें आहे. त्यांनीं काढलेलें तात्पर्य त्यांच्याच शब्दांत देणें जास्त उचित आहे. तें तात्पर्य असें:—

Asia must pass through the Caudine Forks of a surrender, temporary but complete, to the descipline of European forces, if she anxiously aspires to emerge into the fullness of her own great destinies in near future. No great civilization had lasted long on its own indegenous resources. It is the conflict of the stronger races which leads to the survival of the best and the fittest. Russia and England, and in a remote way America, and France, these are the great masters of the Asiatic, or rather the world's situation for many hundred years yet to come, and the sooner their territories come into close contiguity, and are thrown into the whirlpool of national emulation in peace and war, the earlier will be the future deliverance. With the whole resources of England to back us, we, as the first born of the converted Empires, must

lead the van. It is this hope of final deliverance, which reconciles the millions of this land to their present situation, and spurs them on to higher and nobler activities, to be prepared to take advantage of the day now drawing so near, when we shall have civilized neighbours all round our borders, and railways shall penetrate the Himalayas, the Hindukush and the Caucasus mountain and abolish the distinction of race and civilization which now seperates Europe from Asia. This is the great moral of the Central Asian Question.

रिपनसाहेबांच्या कारकिर्दीत येथील अँग्लो इंडियन समाजाला न आवडणाऱ्या अनेक गोष्टी झाल्या, परंतु इल्बर्ट बिल या नांवानें जो कायदा करण्याचें त्यांनीं मनांत आणलें होतें, त्यानें जितकी खळबळ उडाली तितकी दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें उडाली नाहीं. युरोपियन गुन्हेगारांच्या खटल्याची सुनावणी करण्याचा अधिकार हिंदी मॅजिस्ट्रेटांना द्यावा, असा या कायद्याचा हेतु होता. युरोपियन गुन्हेगारांना याबाबतींत ज्या विशेष सवलती आहेत, त्या काढून टाकाव्या एवढेंच प्रस्तुत कायद्याचें कार्य होतें, परंतु अँग्लो-इंडियन समाजाला या कायद्याची योजना कळतांच त्याच्या तळपायाची आग मस्तकास भिडली आणि त्यांनीं त्वेषाचे फूत्कार काढून राज्यकर्त्यांची पांचावर धारण बसविण्याचा यत्न केला. अँग्लो-इंडियन समाजाच्या उच्छृंखळपणाचा अतिरेक यावेळीं दृष्टीस पडला. त्यांनीं चालविलेल्या हिंदी समाजाच्या नालस्तीला धरबंधच नव्हता, कारण हिंदी जनता निस्त्राण आहे, तिला कोणीही लाथाडावें, परंतु अँग्लो-इंडियनांनीं राज्यकर्त्यांवर बेसुमार आग पांखडण्यास व बंडाची उघड दहशत घालण्यासही

यावेळीं कमी केलें नाहीं. लार्ड रिपन आपल्या वर्चस्वाचें गाठोडें बुडविण्याकरितां अवतरले आहेत, असें मानून अँग्लो-इंडियनांनीं याप्रसंगीं जे शब्दाचे व कृतीचे अत्याचार केले, ते पाहिल्यास त्यापुढें अगदीं जहालांतल्या जहाल किंबहुना क्रांतिकारक हिंदी तरुणांचे आचारविचार फिक्के पडतील, अशी खात्री झाल्याशिवाय रहात नाहीं. समाजांत जातिविशिष्ट मोठेपणा भोगणाऱ्या ब्राह्मणांना वेळीं अवेळीं शिव्या देणारे अँग्लो-इंडियन यावेळीं आपल्या जातिश्रेष्ठतेकरितां एकवटून विरोधाला सिद्ध झाले. राजनिष्ठेच्या भावनेचा लवमात्र अतिक्रम न करतां हिंदी पुढारी रिपनसाहेबांना पाठिंबा देत होते. अखेरीस इल्बर्ट बिलाची वाताहत उडाली. हा प्रसंग हिंदी जनतेला खवळून सोडणारा होता. ही खळबळ शांत झाल्यावर माधवरावांनीं तिचा सारांश स्वमतासह एका निबंधांत ग्रथित केला. आपल्या वृत्तींचा समतोलपणा जाऊं न देतां अनिष्टांतून इष्ट काढण्याची माधवरावांची खुबी या निबंधांत ओतप्रोत आहे. सुरवातीस इल्बर्ट बिलानें माजविलेल्या खळबळीमुळें अँग्लो-इंडियाच्या अंतःकरणांतलीं हिंदुस्थानांविषयींचीं कोणकोणतीं काळींबेरीं बाहेर आणलीं, याचा गोषवारा देऊन पुढें माधवराव म्हणतात:—

हिंदुस्थानांतला अँग्लोइंडियन समाज हिंदी महत्त्वाकांक्षेचा पुरस्कार कधींही करणार नाहीं, हें या चळवळीचें पहिलें तात्पर्य आहे. हें तात्पर्य सदैव ध्यानांत न ठेवल्यास त्याचे दुष्परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहींत. स्वदेशांत युरोपियनांचे विविध पक्ष असले तरी हिंदुस्थानाच्या बाबतींत त्या सगळ्यांचा एकच म्हणजे कान्सर्वेटिव्ह पक्ष आहे.

अशास्थितींत हिंदुस्थान देशानें काय करावें या प्रश्नाला माधवरावांचें उत्तर पुढीलप्रमाणें आहे:-

The educated minority of the native population, with their free Press, and their Associations unconsciously sympathised with by the mass of their countrymen, represent the soul of Indian Liberalism, and their strength lies in the justice of their claim. Arrayed against them are the mighty forces of the official hierarchy, supported by the non-official phalanx of their countrymen here and the great reserve of power and prejudice stored in the large vested interest of their mother country. These are the liberal and conservative forces at work In india.

हिंदुस्थानांतले युरोपियन हिंदी समाजाला तुच्छ कां लेखतात, याचे विवेचन माधवरावांच्या व्यासंगाचें व मननाचें द्योतक आहे. तें असें:-

This prejudice and aversion is the nature and besetting sin of all conquering races. The spartan had his helot, the early Roman Patrician had his plebian subjects, the later Roman has his Latins and Italian allies, the American and the West Indian Planter had his Negro and his Chinese settler. In our own country, the regenerate castes had the mass of the aborginal population under their foot and put them down with the severity, which had reacted on themselves with terrible vengence. The British population in India has arrogated to itself the distinctive position of a superior caste, and history but repeats itself in their cry for power and privilege, and their contempt for the conquered and subject population.

याप्रमाणें जेत्यांच्या स्वभावांतली गोम उघडकीस आणून माधवरावांनीं पुढलेंच वाक्य आशावादाचें लिहिलें आहे. ते म्हणतात:—

The Aryan race in India has however, lived through greater trials, and been benefitted on the whole by the pressure brought to bear upon it.

यानंतरच्या भागांत मुसलमान व पोर्तुगीज लोकांनीं हिंदुस्थानांत घातलेल्या धुमाकुळाचें वर्णन असून इंग्रज मुत्सद्यांच्या कामगिरीपर्यंतचा इतिहास निवेदन केला आहे. इंग्रजी राज्याची गरज आपणास कोणत्या कारणामुळें वाटतें, याचें विवरण मार्मिक आहे.

The aegis of British protection is an acknowledged necessity, and none feels its need with greater emphasis than the leaders of native thought. But it is not as the representative of brute force, but of the order and genius of equal law, that we bow down to this supreme necessity.

इलबर्ट बिलांतील कलमांचा आणि त्यासंबंधीं झालेल्या साधक बाधक वादाचा मथितार्थ सादर करण्यापूर्वी माधवरावांनीं आपल्या तात्त्विक व मार्मिक प्रस्तावनेच्या शेवटीं पुढीलप्रमाणें हिंदुस्थानाचें राजकीय भवितव्य सांगितलें आहे. ते म्हणतात:--

There can be no question that a nation of 250 millions can never be permanently held down by sheer force, and sooner or later in God's Providence, and under the encouragement of British example and descipline, the people of this country must rise to the status of self-governed community, land earn to control their own affairs in subordinate alliance with Englad. The transfer of power is inevitable,...

# प्रकरण बारावें.

## संमतिवयाचा कायदा.

१८८५ हें साल साऱ्या हिंदुस्थानांच्या इतिहासांत अत्यंत संस्मरणीय गणलें जातें. त्याच्या संस्मरणीयतेस माधवरावांनीं पुष्कळच हातभार लावला असल्यामुळें त्यांच्या आयुष्यांतदेखील त्या वर्षाला महत्त्व यावें, हें उघड आहे. पूर्वीच्या वर्षांत मुंबईचे एक नामांकित वृत्तपत्रकार बेहरामजी मलबारी यांनीं सामाजिक सुधारणेसंबंधीं दोन पत्रकें तयार करून हिंदुस्थानांतल्या सर्व पुढाऱ्याकडे पाठवून दिलीं होतीं. मलबारींनीं केवळ पुढाऱ्यांना पत्रकें पाठविण्यांत व त्यांचीं मतें मागविण्यांत संतोष न मानतां हिंदुस्थान सरकाराकडे तीं पत्रकें रवाना केलीं आणि हिंदूसमाजसुधारणेच्या बाबतींत सरकारानें कांहींतरी हातपाय हालवावे, अशी इच्छा दाखविली. या बाबतींत सर्वतोपरी मदत करण्याचें माधवरावांनीं त्यांस अभिवचन दिलें होतें व १८८५ पासून पुढचीं पांचवर्षें याच मदतींत गेलीं. बेहरामजी मलबारी ही एक हिंदुस्थान देशाच्या अर्वाचीन इतिहासांतली विख्यात व्यक्ति आहे. त्यांचा जन्म १८५३ सालीं एका गरीब घराण्यांत सुरतेस झाला. त्यांचें बालपण गरिबींतच गेलें. लहानपणीं यांची बुद्धिमत्ता पाहून

शाळेंतल्या शिक्षकांना ते प्रिय झाले होते. परंतु त्याची बुद्धिमत्ता सकंटक होती. त्यांचा स्वभाव व्रात्य, हूड आणि उनाड होता. आपल्या वयाच्या १२।१३ वर्षांपर्यंत त्यांनीं समानशील सोबत्यांना बरोबर घेऊन जे दांडगाईचें प्रकार केले, ते त्यांचे चरित्रकार दयाराम गिडूमल यांनीं आपल्या पुस्तकांत समग्र दिले आहेत. एखादा मनुष्य खाटेवर गाढ निजला असतां त्याची खाट उचलून श्मशानांत नदीकांठीं नेऊन ठेवायची, एखादा इसम दारूच्या निशेंमध्यें लोळत असतां त्याला खांद्यावर घेऊन श्मशानयात्रेचा नामघोष करीत हिंडवायचे; या मलबारींच्या कांहीं बालिश लीला आहेत. त्यांच्या हूडपणांत निष्कपट रंगेलपणाचा भाग बराच होता. एखाद्या बुड्ढ्याची तरुण खूपसूरत बायको असली म्हणजे त्याच्या तोंडावर तिची प्रशंसा करून चिडवायचे, असाही त्यांचा खेळ चालत असे. १६ व्या वर्षांपर्यंत असा पोरकट व्रात्यपणा त्यांनीं केला, परंतु त्या सुमारास त्यांची आई महामारीच्या विकारानें मृत्युमुखीं पडली, व मलबारींच्या स्वभावांत एकदम अंतर दिसूं लागलें. त्यांचें वडील लहानपणींच वारले होते. आईनें त्यांचा सांभाळ करून दारिद्र्याची प्रखरता आपल्या एकुलत्या एक लेकाला भासूं दिली नाहीं. आईच्या ममतेचा पडदा दूर होतांच दारिद्र्य डोळ्याशीं डोळा भिडवून त्यांच्या समोर अक्राळविक्राळ स्वरूपांत उभें राहिलें आणि मलबारींना निर्वाहाच्या चिंतेनें एकदम ताळ्यावर आणलें. मलबारींना विद्याभ्यासाखेरीज पुढें आपला निभाव लागणार नाहीं, असें वाटलें व त्यांनीं सुरतेच्या मिशनरी शाळेंत इंग्रजी शिकण्याला प्रारंभ केला. निर्वाहासाठीं शिकवण्या धरल्या होत्या. उच्च शिक्षण संपादन करण्याची त्यांची ऐपत नव्हती, तथापि त्यांनीं इंग्रजी भाषेचा उत्तम अभ्यास केला. इंग्रजींतले

सर्व प्रसिद्ध वाङ्मय वाचून टाकलें. त्याची पाठशक्ति व धारणाशक्ति चांगली असल्यानें इंग्रजी लिहिण्यांत त्याची गति व्हायला विलंब लागला नाहीं. गुजराथी भाषेवर त्यांचें प्रभुत्व वाखाणण्याजोगें होतें. लहानपणीं खालच्या वर्गांत उनाडक्या करण्यामध्यें त्याचा काळ गेला असल्यानें त्यांना लावण्यासारखें कनिष्ठ प्रतीचें काव्यवाङ्मय अतिशय माहीत होतें. त्यांतलीं कित्येक काव्यें त्यांना तोंडपाठ होतीं. गुजराथी भाषेंत काव्यें रचतांना त्यांस या बालपणींच्या पाठांतरामुळें बिल्कूल अडचण भासली नाहीं. गुजराथीप्रमाणेंच त्यांनीं इंग्रजी भाषेंतही पुष्कळशा स्फुट कविता केल्या आणि त्याचें पुस्तक अभिप्रायार्थ अनेक इंग्रजी अमलदारांकडे पाठवून दिलें. जगाच्या व्यवहारांत त्यांचा लेखनद्वारा प्रवेश झाला आणि लेखणी हेंच त्यांचे अखेरपर्यंत निर्वाहाचें व कीर्तीचें साधन होतें. त्यांच्या अंगांत एक प्रकारची धडाडी असल्यामुळें त्यांचें नांव सर्वत्र गाजायला फार दिवस लागले नाहींत. त्यांच्या ओळखीचा आणि पत्रव्यवहाराचा पसारा फार मोठा होता, त्यांची व माधवरावांची ओळख केव्हां झाली, हें मागें वाचकांना समजलेंच आहे, त्यांनीं १८८४ सालीं 'बालविवाह आणि सक्तीचें वैधव्य' या दोन विषयांवर टिपणें लिहून हिंदुस्थानांत व विलायतेस पाठविलीं. यावर्षापर्यंत १८७० नंतर सामाजिक सुधारणेचा वाद कोठेंही ऐकूं येत नव्हता. मलबारींच्या टिपणांनीं सुधारणेच्या वादाचें वादळ उत्पन्न झालें व हळूहळू तें वाढत जाऊन १८९१ सालीं त्याचा जोर संपला. मलबारी हे कवि होते. कवीच्या हृदयांत इतरांच्यापेक्षां कोमलतेच्या अंश अधिक असतो. अन्याय दृष्टीस पडतांच त्याचें हृदय जितक्या त्वरेनें व तीव्रतेनें कळवळण्याचा संभव असतो, तितकें इतरांचें कळवळत

नाहीं. मलबारींच्या दृष्टीला हिंदू विधवांचे हाल असह्य वाटत. त्यांना समाजाकडून होणाऱ्या छळांतून सोडवावें, असे विचार त्यांच्या मनांत अहर्निश घोळत असत. विधवांच्या दुखाचें स्मरण अगर दर्शन घडून खेदाचे निःश्वास सोडले नाहींत, असा एकही दिवस त्यांनीं बाळपणापासून घालविला नव्हता. कार्य करण्याची धमक अंगीं येतांच त्यांनीं वरील टिपणाच्या रूपानें इष्टसिद्धीच्या मार्गाचें आक्रमण सुरू केलें.

या वर्षापर्यंत सामाजिक सुधारणेचा वाद नव्हता, असें वर म्हटलें त्याचा अर्थ सुधारणेची चर्चादेखील होत नव्हती, असा केल्यास चुकीचें होईल. कालाच्या गतीला पूर्वींच्या समाजसुधारकांनीं जें वळण लावलें होतें, त्या वळणानें काळाचा ओघ वहात होता व त्याच्या प्रभावानें सुधारणेचीं तत्त्वें सामान्य जनतेच्या अंतरंगांत फुलूं लागलीं होतीं. १८८३ सालीं सोलापुरास शंकराचार्यासमोर तेथील ब्राह्मणांनीं कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे, या जातींत मिश्रविवाह होण्याला काय हरकत आहे, असा सवाल टाकला. ब्राह्मणांच्या प्रेतसंस्काराबद्दल कांहीं चाटाघाट झाली. शंकराचार्यांनीं मिश्रविवाहाला हरकत नाहीं, असा निर्णय दिला. आणखी असेंही सांगितलें कीं, १७ वर्षांच्या आंत मुलाचें लग्न करूं नये. ५५ वर्षांनंतर पुरुषानें विवाह करूं नये, कन्या विक्रय करूं नये, वगैरे. गांवांतल्या कित्येक शास्त्रीपंडितांना शंकराचार्यांचा निर्णय आवडला नाहीं. कोंकणस्थ देशस्थांच्या विवाहाला शास्त्राधार नाहीं, असे ते म्हणूं लागले. शंकराचार्य यावेळीं मनानें कमकुत नव्हतें, त्यांनीं शास्त्राधार नसल्याचें सप्रमाण वचनें दाखवून सिद्ध करा, असें विरोधी पंडितांना बजावतांच "ग्रंथ पाहिल्याखेरीज वचनें दाखवितां येणार नाहींत" असा गुळमुळीत

उडवाउडवीचा जबाब देऊन वेळ मारण्याची युक्ति लढविली. शंकराचार्यांनीं त्यांस आठ दिवसांची मुदत दिली. त्या मुदतींत विरोधी मंडळीचे शास्त्रधार निघाले नाहींत व शंकराचार्यांना आपला निर्णय तसाच लोंबकळत ठेवून परगांवीं जाणें भाग पडलें. जोंवर जगद्गुरु अहंमन्य शास्त्रीपंडितांच्या किंवा भटाभिक्षुकांच्या तंत्रानें चालतील तोंवर त्यांचा मान, जर ते सदर मंडळीच्या मनाविरुद्ध वागले तर त्यांच्या जगद्गुरुत्वाची बडेजावी संपली म्हणून समजावें, असा अनुभव सोलापूरच्या शास्त्रवादानें आणून दिला. शंकराचार्यांच्या सामर्थ्यावर सुधारकांना कितपत भिस्त ठेवतां येईल व त्यांना हाताशीं धरल्यानें अडाणी लोकमतावर किती परिणाम घडेल, याबद्दल प्रस्तुत उदाहरणानें अंदाज झाला.

सोलपुरास दक्षिणच्या शंकराचार्यांना शास्त्रीपंडितांच्या आडमुठेपणाचा तडाखा बसला, त्यावेळीं मद्रासकडच्या शंकराचार्यांना हायकोर्टानें एका पुनर्विवाहित जोडप्याची बेअब्रू केल्याबद्दल दोनशे रुपये दंडाची व तो न दिल्यास एक महिना साध्या कैदेची याप्रमाणें शिक्षा ठोठावून धर्माभिमानी समाजाच्या काळजालाच हात घातला. ज्या दंपत्याची बेअब्रू केली, त्यांचें लग्न राजमहेंद्रीस झालें होतें. शंकराचार्यांनीं त्या दंपत्याला वाळींत टाकलें व बहिष्काराच्या फर्मानांत बेअब्रू करणारा मजकूर घातला होता. शंकराचार्यांना त्याबद्दल शासन मिळालें. धर्माभिमानाचें उद्दीपन करण्यासाठीं पुष्कळ वृत्तपत्रांनीं या प्रसंगीं इंग्रजी राज्यनीतीवर टीका केली. लोकांत शंकराचार्यांची किंमत किती आहे, हें सोलापूरप्रकरणानें दाखवून दिलें, मद्रासच्या प्रकरणानें राज्यकर्ते त्यांना कितीसे मोजतात, हें निदर्शनास आणलें.

स्त्रियांच्या दुःस्थितीकडे सगळ्या देशाचें लक्ष लागण्याला १८८१ सालीं एक गोष्ट घडली होती. गुजराथेंत विजयालक्ष्मी नांवाच्या एका बाईनें बालहत्या केली. कोर्टानें तिचा अपराध शाबीत धरून काळ्या पाण्याची शिक्षा दिली. ही शिक्षा जबर आहे, असें त्यावेळीं सर्वांनीं मत प्रतिपादन केलें. सार्वजनिक सभेच्या वतीनें या संबंधीं एक मोठा अर्ज सरकारांत गेला होता. समाजानें स्त्रियांचा सगळ्या बाजूंनीं कोंडमारा केल्यामुळें त्यांच्या हातून भयंकर स्वरूपाचे गुन्हे घडतात, आणि गुन्ह्याप्रमाणें कायद्यांतले जबरदस्त शासन भोगण्याची पाळी त्यांच्यावर येते, यापेक्षां स्त्रियांना सामाजिक रूढाचारांच्या प्रतिबंधांतून सोडविण्याचा सरकारानें प्रयत्न केल्यास उचित होईल. अपराध घडल्यास शासन देणें, हें जसें सरकारचें कर्तव्य आहे, त्याप्रमाणेंच विशिष्ट अपराध ज्या कारणांमुळें उद्भवतात तीं कारणें नाहींशीं करणें, हें सुद्धां सरकाराचें कर्तव्य आहे, असे विचार पुष्कळ वृत्तपत्रांनीं व पुढाऱ्यांनीं व्यक्त केले. विजयालक्ष्मीसारखे अपराध स्त्रियांच्या हातून अपवादादाखल घडतात, अशांतला भाग नाहीं, परंतु विजयालक्ष्मीप्रमाणें त्यांची प्रसिद्धि होत नाहीं. या अपराधाच्या प्रसिद्धीनें स्त्रियांच्या दुःस्थितीवर उपाय शोधण्याची इच्छा समाजधुरीणांत उत्पन्न झाली, तथापि त्या इच्छेला फळ आलें नाहीं. मलबारींनीं पुनः त्या इच्छेला प्रदीप्त केले.

१८८४ च्या नोव्हेंबर महिन्यांत पुण्याला मलबारींच्या टिपणांची जाहीर चर्चा झाली. या दिवसांत वाय्. एन्. रानडे या नांवानें ओळखले जाणारे एक पदवीधर गृहस्थ पुण्याच्या सार्वजनिक आयुष्यांत बरेच पुढें आले होते. त्यांनीं मलबारींच्या टिपणावर एक व्याख्यान दिलें, या प्रसंगीं माधवराव येथें हजर होते व त्यांनीं सरकारापाशीं

आपल्यांतल्या विवाहाचें नियमन करणारा कायदा मागण्यांत गैरशिस्त किंवा धर्मबाह्य असें कांहीं नाहीं, या मताचें विवेचन केलें. आपोआप सुधारणा होतील, त्याकरितां मुद्दाम उद्योग करण्याची जरूर नाहीं, असा उपदेश करणारांना माधवरावांनीं या विवेचनांत उत्तर दिलें आहे. ते म्हणाले:—

काळ हें स्वतंत्र साधन नाहीं. ज्याला आपण कालप्रभाव किंवा कालमहिमा म्हणतो तो वस्तुतः व्यक्तींच्या प्रयत्नाचा एक परिणाम आहे. मनुष्य हा कालाचा प्रतिनिधि आहे. त्याच्या उद्योगामध्यें कालाचें प्रतिबिंब दिसतें. मागल्या पिढ्या म्हणजे गतकाळ, सध्याच्या पिढ्या म्हणजे वर्तमानकाळ आणि पुढच्या पिढ्या म्हणजे भविष्यकाळ, अशा काळाच्या तिन्ही अवस्था माणसांच्या योगानेंच ठरविल्या जातात, म्हणून माणसांनीं सतत इष्ट दिशेनें उद्योग चालू ठेवला पाहिजे. काळावर विसंबून स्वस्थ रहाण्यानें मनाचा दुबळेपणा व कर्तव्याचें खेदावह अज्ञान, हे दोन दोष उघडकीस येतात. लोकांच्या सामाजिक व धार्मिक व्यव-स्थेंत सरकारनें हात घालूं नये, असा पुष्कळजणांचा समज आहे. सरकारनें हात घातल्यास नुकसान होईल, हें भय व्यर्थ आहे. सरकार व जनता यांच्या पर-स्परसंबंधाबद्दल स्पष्ट कल्पना नसल्यामुळें हें भय उत्पन्न होत असतें. सरकार देशाचे नोकर आहे किंवा लोकांच्या इच्छा अंमलांत आणणारें तें एक अंमल-बजावणी खातें आहे, असा त्याचा अर्थ केल्यास योग्य होईल. हिंदू समाजाला जी सुधारणा हवी असेल, तिची एकजुटीनें निस्संदिग्ध व स्पष्ट मागणी केल्यास सरकार कायदा करून ती सुधारणा अमलांत आणील. अशा रीतीनें पहिल्यास कायदा सरकारकडून लादला जाणार नसून लोकच आपल्यावर लादून घेणार आहेत, हें लक्षांत येईल. पार्शी समाजानें स्वतःपुरते स्वतंत्र कायदे मागून घेतले आहेत, खोजेलोक सांप्रत वारसाच्या हक्कासंबंधाचा कायदा ठरविण्यांत गुंतले आहेत. मग खोजे किंवा पारशी यांच्या मागें रहाण्यांत हिंदू समाजाला पुरुषार्थ कां वाटावा, हें समजत नाहीं.

पुढें सतत सहासात वर्षें चाललेल्या वादाचें हें भाषण सूतउवाच समजण्यास हरकत नाहीं.

१८८५ सालच्या पहिल्या चार महिन्यांत माधवरावांची विशे हालचाल दिसत नाहीं. एप्रिलांत रायगड येथील शिवाजी महाराजांच्य समाधीचा जीर्णोद्धार करण्याची कल्पना उदयास आली. ही कल्पन माधवरावांच्या इतिहासभक्त चित्ताला अतिशय आवडली आणि तिल मूर्त स्वरूप येण्याकरितां सहानुभूतीच्या रूपानें जीर्णोद्धाराच्या पुरस्क त्यांना त्यांनीं मदत दिली. सरकारदेखील या कल्पनेला तेव्हां अ कूल होतें.

मे व जून या दोन महिन्यांत मात्र माधवरावांनीं व्याख्यानां पाऊस पाडून आपल्यावर प्रतिकूल टीकेचा चिखल उडवून घेतला. महिन्याच्या सुरुवातीस त्यांनीं 'मराठी भाषाग्रंथालय' नावांची ए नवीन संस्था काढण्याचा विचार विनंतीपत्राच्या रूपानें जाहीर केल मराठी भाषेंतले सगळे ग्रंथ एकत्र ठेवण्याकरितां संग्रहालयाची आवश्य कता आहे, हें त्यांनीं लोकांच्या निदर्शनास आणून दिलें. १४ रोजीं डेक्कन कॉलेजाचें वार्षिक संमेलन झालें व त्यांत धर्माच विषयावरून एक लहानशी पण निकराची चकमक उडाली. संमेलना अध्यक्ष सर डॉ. भांडारकर यांनीं, धर्मभावनेचें प्रत्येक माणसानें पोष करावें, त्यावांचून अंतःकरणाची शुद्धता संपादन होणार नाहीं, अ विचार तरुण श्रोत्यांच्या कानावर घातले. धर्मभावनेची हेळसांड केल्या माणसाचें नुकसान झाल्याशिवाय रहात नाहीं, असेंही त्यांच्या भा णांत एक वाक्य होतें. या वाक्यामुळें आगरकरांना स्वस्थ बसवेन धर्माच्या नादानें माणसाचें सामर्थ्य वाया जातें. धर्म हें संस्कृत अत्यावश्यक अंग नाहीं. त्याला फांटा देऊनही संस्कृतीची अभिवृ होऊं शकते, असे आपल्या मनांतले विचार आगरकरांनीं बोल

दाख
प्रसि
उप
इच्छे

टाकले. आगरकर ईश्वर, धर्म वगैरे गोष्टींचा अनादर करणारे होते व अखेरपर्यंत त्यांचीं असलीं नास्तिक मतें कायम होतीं, पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, मलबारींच्या हेतूंना विरोध करतांना धर्मरक्षकांच्या गोटांत शिरून तेथें बहुमानास पात्र ठरलेले कै. बाळ गंगाधर टिळक हे यावेळीं आगरकरांना पाठिंबा देण्याकरितां उभे राहिले व त्यांनीं आगरकरांचा प्रत्येक विचार योग्य असल्याबद्दल जोराचें भाषण केलें. यानंतर भांडारकरपक्ष व आगरकरपक्ष यांच्यांत प्रश्नोत्तरांचा गोळीबार होऊं लागला. शेवटीं माधवरावांनीं भाषणास प्रारंभ केला. परंतु यावेळीं संतापाच्या लहरी त्यांच्या चेहऱ्यावर उसळत होत्या. संताप आवरण्याची खटपट एकीकडे चालू असतां दुसरीकडे धर्माचें महत्त्व पटवून देण्यासाठीं त्यांच्या तोंडांतून क्षोभदर्शक शब्द बाहेर पडत होते. 'हिंदुस्थानांत जर कांहीं विशेष असेल तर तो धर्म आहे. धर्माधर्मांत सहिष्णुता कशी नांदते याचा उत्तम धडा हिंदूनींच जगाला घालून दिला आहे. हिंदूला जर प्राणांहूनसुद्धां कांहीं प्रिय असेल तर तो धर्मच होय. आमच्यांतल्या कांहीं मंडळींनीं मिल, स्पेन्सर, सिज्विक, यांचीं मतें आपल्या चित्तांत ठसविलीं आहेत; पण या ग्रंथकारांना इंग्लंडांत मोल असलें तरी हिंदुस्थानाला त्यांची गरज नाहीं व किंमत नाहीं, हें मिल–स्पेन्सर–भक्तांना कळत नाहीं. इंग्लंडांतल्या ख्रिस्ती धर्माच्या कांहीं कडव्या संप्रदायाचा प्रतिकार करण्यासाठीं सदर ग्रंथकारांनीं आपले विचार लिहिले आहेत. हिंदूसमाजाला त्यांचे विचार लागू पडतील, अशी ज्यांची कल्पना असेल त्यांनीं खुशाल सहाराच्या वाळवंटांत जावें आणि वरील ग्रंथकारांच्या मताचा उदोउदो करावा.' असा माधवरावांच्या यावेळच्या भाषणाचा इत्यर्थ आहे.

आपण निष्कारण वादांत भाग घेतला असें ज्यांना वाटलें असेल, त्यांच्या समजुतीकरितां माधवरावांनीं शेवटीं माफी मागितली. पण माफी मागतां मागतां ते म्हणाले कीं, माझ्या भाषणाचा इष्ट परिणाम झाल्यास कडक उद्गार काढल्याचें मला वाईट वाटणार नाहीं. माधवरावांचें भाषण चालू असतां प्रतिपक्षांतली मंडळी तिरस्कारदर्शक शब्दांचा उच्चार करीत होती. माधवरावांच्या भाषणानें वादाचा क्षोभ निवण्याऐवजी जास्तच भडकला व समारंभ संपल्यामुळें उभयपक्षाची मंडळी चडफडत घरोघर चालती झाली.

माधवरावांच्या रागासंबंधीं एक 'आठवण' महाजनींनीं लिहिली आहे, ती बहुधा यावेळचीच असावी. मिलस्पेन्सरचे ग्रंथ वाचून अलीकडचे तरुण बिघडतात, या माधवरावांच्या विधानाला, आगरकरांच्या चारित्र्यशुद्धतेबद्दल ग्वाही देऊन, महाजनींनीं खोडून काढलें. पण माधवरावांच्या मनाला तो प्रसंग झोंबला होता, यांत संशय नाहीं.

ता. १८ मे रोजीं माधवरावांचें वक्तृत्वसभेंत समारोपादाखल भाषण झालें. 'कौन्सिलांतलें कामकाज' हा एक वक्तृत्वाचा विषय होता, त्याचा समारोप माधवरावांनीं पुढीलप्रमाणें केला:—

इंग्रजी राज्यांतली शिस्त म्हटली म्हणजे कोणतीही गोष्ट मागितल्यानें न मिळणें, ही होय. तिला दहापांच वर्षें जावीं लागतात. एकप्रकारें ही शिस्त चांगली आहे. याकरितां कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासद पाहिजेत, असें म्हणण्यास जेव्हां आज आपण प्रारंभ करूं, तेव्हां दहापांच वर्षांनीं ही गोष्ट होणारी आहे. लार्ड रिपन साहेबांनीं मोठ्या उदारपणानें जे हक्क आपणास दिले आहेत, ते चांगल्या रीतीनें चालण्यास वरच्या प्रतीचे हक्क संपादन करण्याची आवश्यकता आहे. लोकलबोर्डें सुरळित चालण्यास चांगल्या कळकळीचे लोक कायदेकौन्सिलांत पाहिजेत. हल्लींची मंडळी चांगली नाहीं, असें नाहीं.

सरकारनें नेमलेलीं कित्येक माणसें इतकीं चांगलीं आहेत कीं, त्यांची निवड आपण करून देऊं. नेमलेलीं माणसें निवडलेल्या माणसांइतकें चांगलें काम करीत आहेत. पण लोकांनीं निवडून दिल्यानें त्यांच्यावर एकप्रकारची जबाबदारी राहील व आपल्या पाठीशीं लोकमताचें बळ आहे, व लोकमताचे आपण मुख आहोंत, असें त्यांस वाटल्यानें ते जास्त ठासून बोलतील व प्रत्येक गोष्ट जास्त नेटानें करतील.

दुसरा विषय 'एकत्र रहाण्याची चाल' हा होता. त्याबद्दल माधवराव म्हणाले:—

एकत्र रहाण्याची चाल सोडा, असें म्हणणें म्हणजे परक्या चाली उचलणें असा आग्रह धरल्यासारखें होत नाहीं. स्मृतिकालानंतरचें ग्रंथ अविभक्त कुटुंबपद्धतीला विरुद्ध आहेत. मालमत्तेंत स्त्रियांचा हिस्सा ठेवल्याचें या ग्रंथांत आढळतें. एकत्र रहाण्याची चाल मोडण्याचा प्रयत्न जुनाच आहे, पण ही चाल मात्र मोडली नाहीं. अलीकडचीं दिवाणी कोर्टें विभक्त रहाण्याच्या पद्धतीचा पुरस्कार करीत आहेत....कोणतीही नवी गोष्ट एकदम अंमलांत येणार नाहीं. सोयी सोयीनेंच अमलांत आणली पाहिजे व उतावीळपणा करून उपयोग नाहीं. अविभक्त कुटुंबपद्धतीनें निरुद्योगीपणा व आळस वाढतो. दुसऱ्याच्या कमाईवर टपून बसण्याची संवय जडते. वाटणीच्या पायीं शेंकडो कुटुंबें दीनावस्थेस पोचलीं आहेत. संचित द्रव्याचे तुकडे तुकडे होऊन त्याचे कवडीपर्यंत विभाग झाल्यानें तिचा उपयोग समाजास अगर व्यक्तीस होत नाहीं. या व अशा अनेक कारणांकरितां एकत्र रहाण्याच्या चालींत फेरफार केला पाहिजे.

वक्तृत्वपरीक्षणार्थ तुकाराम महाराजांचा एखादा अभंग नेमण्याची वहिवाट होती. माधवरावांनीं त्यासंबंधीं आपल्या उपजत व कमावलेल्या प्रेमळपणानें निरूपण केलें. व चौथा विषय 'शेतकीची स्थिति' हा होता, त्याबद्दल ते म्हणाले:—

तीस वर्षांपेक्षा हल्लीं शेतकीची स्थिति चांगली आहे. शेतकऱ्यांचें धान्य बाजारांत सुलभ रीतीनें जातें व दुसऱ्या अनेक सुधारणा झाल्या आहेत. दहा

वर्षांमागें दुष्काळ पडला तेव्हां स्थिति खालावली, तरी पण आजची स्थिति तीस वर्षांमागल्या स्थितीपेक्षां चांगली ठरते. जंगलाच्या कायद्यानें व करानें त्रास होत नाहीं, व त्रास दूर होण्याकरितां प्रयत्न करूं नये, असें माझें म्हणणें नाहीं. कालव्याचें किंवा विहिरीच्या पाण्यानें भिजणारी जमीन कमी आहे, असें वक्ते म्हणाले, पण आंकडे पाहिल्यास तें खरें ठरत नाहीं. देशांत इतर व्यापारधंदे वाढल्यानें रिकाम्या वेळांत शेतकऱ्यांना धंदा मिळतो व त्यानें त्यांची स्थिति सुधारणार आहे, ही गोष्ट विशेष रीतीनें लक्षांत ठेवली पाहिजे, त्या लोकांत विद्याप्रसार होणें, सरकारी देणें कायमचें ठरणें, हेही उपाय शेतकी सुधारण्यास उपयोगी पडतील व ते आपण केले पाहिजेत.

याच भाषणांत माधवरावांनीं वतनी जमीनदार वर्गाचें ( Aristocracy ) समर्थन केलें आहे. या वर्गाचा देशास उपयोग आहे व तो फार आहे, असें माधवराव म्हणाले.

वक्तृत्वसभेनंतर वसंतव्याख्यानमाला सुरू झाली. ता. २१ मे रोजीं कै. रा. ब. काशिनाथ बाळकृष्ण मराठे यांचें ' धर्मविचार ' या विषयावर व्याख्यान झालें. व्याख्यात्यांचे आभार मानण्याचें काम बहुधा माधवरावांकडेच असे. त्यांनीं यावेळीं आभार मानतांना डेक्कन कॉलेजांत झालेल्या प्रकाराबद्दलची आपल्या मनांतली मळमळ काढून टाकली. धर्माची अवहेलना केल्यास ती त्यांच्या मर्मी कशी लागत असे, याचें हें एक उदाहरण आहे. ते म्हणाले:—

व्यवहारशास्त्रांची उन्नति झाल्यानें धर्माचा लोप होत नाहीं. ज्यांचीं पुस्तकें वाचून आमची नवीन मंडळी नास्तिक मार्गांत उडया मारते, त्यांनीं हे व्यवहारशास्त्रज्ञ देखील जगाच्या मुळाशीं ज्ञानसंपन्न तत्त्व आहे, असें कबूल करतात, इकडे लक्ष दिलें पाहिजे. अंगवस्त्राप्रमाणें आम्ही धर्म बगलेंत मारतों, हें म्हणणें खोटें आहे. स्पेन्सर टिंडाल यांच्या मताचे धर्म हवा म्हणणारे विद्वान् आहेत. अमूकच धर्म घ्या, असें मी म्हणत नाहीं. अनास्था मात्र उपयोगी नाहीं. ज्यानें

त्यानें आपापल्या बुद्धीप्रमाणें धर्मविचार करावा. पूर्वजांच्या धर्मविचारांतला उणेपणा मान्य केला पाहिजे.

या भाषणापूर्वी एकच दिवस कुंटयांच्या अध्यक्षतेखालीं नूतन मराठी विद्यालयाचा वार्षिक समारंभ साजरा करण्यांत आला होता. तेथें माधवरावांनीं शिक्षणासंबंधीं मोठे मननीय विचार सांगितले. ते म्हणाले:—

हल्लींच्या आमच्या शाळा म्हणजे खरोखर शाळा नव्हेत. तर निरनिराळे कांहीं विषय शिकविण्याचे वर्ग आहेत. घरच्या माणसांना मुलांच्या शिक्षणाकडे पहाण्याला वेळ नाहीं, म्हणून तीं त्यास शाळेंत पाठवितात, तर त्यांची सर्व प्रकारें सुधारणा झाली पाहिजे. नीति सुधारली पाहिजे, शरीरें सुधारलीं पाहिजेत. अशा सर्व गोष्टी झाल्या पाहिजेत. शहरांतलें व खेड्यांतलें शिक्षण सारखें नसावें. धर्मशिक्षण पाहिजे. पूर्वीच्या परंपरा बदलून नव्या सांच्यांतून ओतून काढण्याची पद्धत अनिष्ट आहे. पंजाब बंगालमध्यें धर्मशिक्षण देणारे महात्मे आहेत. इतर प्रांतांत नाहींत. याकरितां महाराष्ट्रांतल्या जोश्यांना धर्मशिक्षणाकडे लावून त्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे. नगराच्या शाळांतून अशी व्यवस्था पाहिजे. पोहणें घोड्यावर बसणें, या कला त्यांस शिकविल्या पाहिजेत.

ता. २४ मे रोजीं ग्रंथकारांचें दुसरें संमेलन भरलें. एकंदर थाट पूर्वीसारखाच होता. फारसे ग्रंथकार आले नाहींत. ग्रंथकारांचीं पत्रें आलीं होतीं. यापेक्षां जास्त माहिती आढळत नाहीं. जूनच्या पहिल्या तारखेस 'पुढारी' या विषयावर माधवरावांचें लहानसें भाषण झालें. पुढारी दोन प्रकारचे असतात. विचारवान् (men of ideas) आणि क्रियावान् (men of action). पहिल्या वर्गाचे लोक जगास माहीत नसतात. येशूख्रिस्त, हें या वर्गातल्या पुढाऱ्याचें उदाहरण आहे. शिवाजी हा दुसऱ्या वर्गातला पुढारी होता. पुढारी निपजायला जनसमूहाची तयारी व ईश्वरीकृपा अशीं दोन कारणें लागतात. त्यांतलें दुसरें कारण जास्त महत्त्वाचें आहे, अशा अर्थाचें माधवरावांचें भाषण

झालें. याच दिवसांत शिवाजीमहाराजांच्या समाधीचा जीर्णोद्धार करण्यासाठीं एक सभा झाली. माधवराव हजर होतेच, त्यांचा व्यवस्थापक मंडळींत समावेश करण्यांत आला. ता. ४ जून रोजीं मोडकांचें हिंदी व्यापारासंबंधीं विचारपरिप्लुत भाषण झालें. रीतीप्रमाणें आभार मानतांना माधवरावांनीं जी माहिती सांगितली, तिचा सदैव उपयोग होणारा असल्यानें विस्तारपूर्वक ती सादर केल्यास अप्रस्तुत ठरणार नाहीं. ते म्हणाले:—

संस्थानिकांनीं इंग्रजसरकाराप्रमाणें व्यापारांत मन घालावें, याचा अर्थ त्यांनीं हिंग जिऱ्याचीं दुकानें घालावीं, असा नाहीं. एकत्र भांडवलाच्या जोरावर व्यापार करण्याची पद्धत आमच्या लोकांना परिचित नाहीं. शिवाय भांडवलाची वाण सामान्य जनतेला भासणारी आहे. संस्थानिकांनीं आपला पैसा भांडवलाच्या रूपानें व्यापारांत घालावा.

येथील राज्यकर्ते म्हणजे इंग्लंडचा जनसमूह. त्याच्याच तंत्रानें राज्य चालतें. इंग्लंडचा माल अमेरिका व फ्रान्स या देशांनीं बंद केला. समानशक्तीच्या राष्ट्रांस अप्रतिबंध व्यापार मानवता. दुबळ्या देशाला खुला व्यापार मारतो, म्हणून त्याला विशेष सवलती पाहिजेत. व्यापारांत सरकार हरकती उत्पन्न करील. लँकाशायर, मँचेस्टर यांचें येथील सरकारावर दडपण आहे. पण अडचणी ओळखून प्रयत्न करण्यास हरकत नाहीं. कारखाने काढले पाहिजेत.

लूथरच्या पूर्वीं धर्मसंबंधीं तत्त्वें अगम्य आहेत, असा लोकांचा समज होता. लूथरनें तो दूर केला व तेव्हांपासून युरोपच्या सुधारणेस प्रारंभ झाला. कारखाने, वाफेची शक्ती, हें सुधारणेचें मूळ समजणें चुकीचें आहे. नीति, धर्म, वगैरे गोष्टींचा कांहीं उपयोग नाहीं, असें म्हणणें म्हणजे राष्ट्र बनण्यास लागणारे गुण विसरणें होय.

यानंतर टिळू नांवाच्या एका गृहस्थाचें 'स्त्रियांचे हक्क' याविषयावर व्याख्यान झालें. मलबारींचीं टिपणें लोकांच्या चर्चेंत आल्या-

पासून माधवरावांना या विषयाचा ध्यास लागला होता व ते धर्मग्रंथांतून स्त्रियांच्या हक्काबद्दलचीं वचनें गोळा करीत होते. सदर व्याख्यान झाल्यावर समारोप करतांना माधवराव म्हणाले:—

वेदाच्या काळीं किंवा त्याच्या पूर्वी स्त्रियांची स्थिति चांगली नव्हती. स्मृतिकाळांत ती सुधारली. स्त्रियांना स्वतंत्रता देणें म्हणजे समुद्रापलीकडच्या परक्याचें अनुकरण करणें नव्हे, परक्यांचें अनुकरण म्हणणाऱ्या लोकांना आपल्या पूर्वेतिहासाचें स्मरण असत नाहीं. त्या जुन्या उज्वल काळाचा खरा अभिमान त्यांना नाहीं.

बोलतां बोलतां आपण या विषयाचें विवेचन दुसरीकडे केलें आहे, असें माधवरावांनीं याप्रसंगीं सांगितलें. पंडित नारायण केशव वैद्य नांवाच्या एका गृहस्थानें १८५६ सालच्या विधवाविवाहाच्या कायद्यासंबंधीं सर्व वाङ्मय गोळा करून एक संग्रहग्रंथ प्रसिद्ध केला होता. त्याची प्रस्तावना माधवरावांनीं लिहिलेली असून त्यांत स्त्रियांच्या हक्कांचा हिंदुस्थानांतील उदयास्त वर्णिलेला आहे. Rise and Decay of female rights in India या नांवांचा एक निबंध पुष्कळ शोधूनदेखील सांपडला नाहीं, असें माधवरावांच्या मृत्यूनंतर त्यांच्या निबंधाचा संग्रह प्रसिद्ध करणाऱ्या एका संपादकानें गाऱ्हाणें गाइलें आहे. वैद्यांच्या पुस्तकाचा उपोद्घात हाच तो निबंध होय, असें मानण्याला वरील विवेचनांत प्रमाण आहे.

दरम्यान मधल्या काळांत माधवरावांची कायदेकौन्सिलांत नेमणूक झाली. सगळ्या पुणेंकरांना अतिशय आनंद झाला. ता. ७ जून रोजी या आनंदाप्रीत्यर्थ माधवरावांना हीराबागेंत पुणेंकरांनीं टोलेजंग मेजवानी दिली. मेजवानीच्या कामांत एक सरदार श्रीमंत रंगराव अप्पा पुरंदरे यांनीं पुढाकार घेतला होता. मेजवानींचीं निमंत्रणें त्यांच्या

सहीनें वाटण्यांत आलीं होती. मेजवानीनंतर भाषणें झालीं. माधवरावांनीं नोकरी सोडून लोककार्यांत पडावें, असा उपदेश त्यांना वारंवार केला जात असे. १८७८ सालीं ते आजारी पडले, तेव्हां अनेकविध कामें संभाळण्याचा बोजा अंगावर घेतल्यामुळें त्यांची प्रकृति पुनः पुनः बिघडते, यासाठीं त्यांनीं नोकरीचें एक ओझें कमी करावें, असें कित्येक वृत्तपत्रांनीं लिहिलें होतें. फडक्यांच्या बंडानंतर हे विचार पुष्कळांनीं माधवरावांच्या कानावर घातले होते. याप्रसंगीं माधवरावांनीं नोकरी सोडल्यास त्यांना कौन्सिलांत जास्त निर्भीडपणानें लोकपक्षाची बाजू मांडतां येईल, असे एकदोघांनीं उद्गार काढले. मेजवानीबद्दल आभारप्रदर्शन करतांना माधवरावांनीं यासंबंधीं पुढीलप्रमाणें खुलासा केला आहे. ते म्हणाले—

मी काय करावें याबद्दल पुष्कळजण मला उपदेश करतात, त्यांचा मी आभारी आहे. व्यवहारांत एक गोष्ट धरून चालत नाहीं. तसेंच लोककल्याणाचें आहे. एकाच गोष्टीबद्दल एकमत म्हणजे एकी असें मी समजत नाहीं. ठशांतल्या नाण्यासारखी आमच्या मताची स्थिति आहे. हा दोष नाहींसा झाला पाहिजे.

जातां जातां सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे माधवरावांचा यावर्षी प्रथमच फोटो काढण्यांत आला, ही होय. माधवरावांना फसवून फोटोचा बेत पुणेंकरांनीं तडीस नेला. माधवरावांच्या फोटोबद्दल 'केसरी' पत्रांत एक स्वतंत्र स्फुट आहे.

जूनच्या तेरा तारखेला माधवरावांचें Limits and conditions of State legislation in social matters या विषयावर व्याख्यान झालें. वैद्यांच्या ज्या पुस्तकाचा मागें उल्लेख केला आहे, त्यांत या भाषणांतले बहुतेक सर्व विचार गोंवले आहेत. माधवरावांच्या स्वतंत्र व्याख्यानांच्या दिवशीं श्रोत्यांच्या गर्दीचा दरसाल तोबा उडत असे.

पण यावर्षी विशेषच गर्दी झाली होती, असे तत्कालीन वृत्तपत्रांतून आढळतें. कित्येक युरोपियन अधिकारी आले होते. व्याख्यान जवळ जवळ तीन तास चाललें होतें. माधवराव मलबारींच्या चळवळीकरितां जमीन कशी तयार करीत होते, याची कल्पना या दिवसांतल्या चळवळीवरून येते.

माधवरावांनीं या दीड महिन्यांत काढलेल्या धर्मपर उद्गाराकडे 'केसरी'चे तत्कालीन संपादक आगरकर यांची बारकाईनें नजर होती आणि माधवराव डेक्कन कालेजांत घडलेल्या प्रकाराबद्दल जसें बोलत होते, तसेंच आपण एकदां त्यांच्या डोळ्यांत अंजन घालावें, या विचारांत आगरकर होतें. नूतन मराठींतल्या व्याख्यानानंतर 'केसरी'नें गर्जना केली. त्या व्याख्यानांत नीतिशिक्षण, धर्मशिक्षण पाहिजे, या विषयाचा ऊहापोह करतां करतां नवीन नीतिशिक्षणाची व्यवस्था होत नसेल तर जुनी रामरक्षा, पवमान वगैरे स्तोत्रें मुलांना शिकवावीं, असें सांगण्यापर्यंत माधवरावांनीं मजल मारली. आगरकरांनीं या वाक्याला इतर विवेंचनांतून बाहेर ओढून 'आनरेबल रा. ब. रानडे बाटले' या मथळ्याचा सणसणीत अग्रलेख लिहिला. या टीकेबद्दल डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सभासदांवर माधवरावांच्या मित्रांकडून पुढें कानपिळीचा आठवण रहाण्याजोगा प्रयोग झाला.

ता. १५ जून रोजीं लवादकोर्टाचा वार्षिक समारंभ झाला. लवाद-कोर्टांची स्थापना १८७९ सालांत झाली. त्यांच्या वार्षिक समारंभाला बहुधा माधवराव हजर असत. या वर्षी तेलंग, वेडरबर्न, देशमुख वगैरे मंडळी हजर होती. न्यायखात्याच्या सुधारणेबद्दल माधवरावांचें कांहीं विचार या प्रसंगीं व्यक्त झाले आहेत. ते असे:—

पंचांकडून न्याय घेण्याची पद्धत जुनी आहे. १८२७ पर्यंत ती चालू होती. १८३५ मध्यें पंचांनीं कांहीं चूक केली व त्यास शिक्षा झाल्या आणि या व्यवस्थेचा पाय मागें आला. दिवाणीकोर्टांत येणाऱ्या खटल्यापैकीं शेकडा २५ खटले भानगडीचे असतात. बाकी ७५-८० खटले बिनभानगडीचे असतात. ते पंचांमार्फत तुटण्यास कांहीं हरकत नाहीं. त्याला न्यायकोर्टाचीं जरूरी नाहीं. शेजाऱ्यापाजाऱ्याचें खटले आपण तोडतो, ही पद्धत लुप्तप्राय झाली. गांवांतले लहानसहान खटले पंचांनीं तोडल्यास द्वेष माजत नाहीं व खर्च कमी होतो. १८७९ सालीं लवाद कोर्टें मिळालीं. पण नवी पद्धत म्हणून अधिकार देण्यांत आला नाहीं, पण गेल्या पांच वर्षांतल्या कामावरून जास्त हक्क मागण्यास हरकत नाहीं. पंचाच्या गुणाचे एकमेकावर वजन पडून निकाल चांगला होतो. पांचामुखीं परमेश्वर यालाच म्हणतात. मुलकी व फौजदारी कामें एकाच अधिकाऱ्यांकडे असतात. फौजदारी काम मुन्सफाकडे दिल्यास त्याचें काम वाढेल. स्थानिक स्वराज्य किंवा बोर्डें यांच्या कचेऱ्यांना पंचांचीं कोर्टें जोडून दिल्यास स्थानिक स्वराज्याचें पाऊल पुढें पडेल. लहानसान दिवाणी कामें लोकांनीं संभाळल्यास फौजदारी कामें दिवाणी अंमलदाराकडे देतां येतील.

वरील उतारे वाचून प्रत्येकाला माधवरावांच्या अष्टपैलू बुद्धिमत्तेची व स्वतंत्र विधायक विचारशक्तीची जाणीव झाल्याशिवाय रहाणार नाहीं व त्याचदृष्टीनें थोडा विस्तारदोष पत्करून ते उतारे येथें सादर केले आहेत. त्यांतले माधवरावांचे कित्येक विचार आजच्या काळांत देखील उपयोगी पडण्याला हरकत नाहीं. जून महिन्यानंतर जुलई व आगस्ट या दोन महिन्यांत पुण्याच्या सार्वजनिक जीवितामध्यें विशेष उलाढाली घडल्या नाहींत. सप्टेंबरांत पुनः माधवराव आणि त्यांच्या प्रबोधकारक सभा आढळतात. त्या महिन्याच्या सुरवातीस थिआसफी पंथाचे प्रचारक कर्नल अल्काट पुण्याला आले. माधवरावांनीं याप्रसंगीं पुनः एकदां शाळांतल्या नीतिशिक्षणाची महती गाइली. अर्धा सप्टेंबर

गेल्यावर पुण्याच्या फीमेल हायस्कूलचा पहिला वार्षिकोत्सव झाला. महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड हे त्यावेळीं पुण्यास आलेले असल्यानें त्यांना अध्यक्षस्थान देण्यांत आलें. होतें माधवरावांनीं आभार मानतांना अतिशय जोरदार भाषण केलें. 'आम्ही आपल्या पायांवर उभा राहून सरकारची हातसोडवणूक करूं' असा त्यांच्या भाषणांतला मुख्य मुद्दा होता. श्री. सयाजीरावांचे जाहीर रीतीनें आभार मानण्याचा माधवरावांना यापूर्वी याच महिन्यांत दोनदा प्रसंग आला होता. एक, न्यूइंग्लिश स्कुलांत व दुसरा, मराठे मंडळींत. दोन्ही ठिकाणा त्यांचीं महत्त्वाचीं भाषणें झालीं, परंतु दुसऱ्या ठिकाणचें भाषण जास्त महत्त्वाचें झालें.

पुण्यास १८७४ सालीं जोतीराव गोविंदराव फुले या प्रसिद्ध व्यक्तीनें 'सत्यशोधक' नांवाचा समाज स्थापन करून ब्राह्मणांच्या सामाजिक वर्चस्वाचा जुनाट आणि भक्कम वृक्ष पोंखरण्याचें कार्य हातीं घेतलें. सत्यशोधक समाज काढण्यापूर्वी त्यांनीं स्वजनसेवा पुष्कळच केली होती. महाराष्ट्रांतल्या ब्राह्मणेतर जनतेला साक्षर करण्याची कामगिरी फुल्यांनींच आरंभली. जातिभेदाच्या नाशासाठीं ते ब्राह्मणांच्या वर्चस्वावर प्रहार करीत होते, यामुळें त्यांनीं ब्राह्मणेतरांतला श्रेष्ठकनिष्ठभाव पुष्ट होऊं दिला नाहीं. त्यांनीं शूद्र, अतिशूद्र असला पंक्तिप्रपंच सोडून अंत्यजांना शिक्षण देणारी शाळा घातली. सरकारांतून त्यांचा उत्तम गौरव झाला. फुल्यांच्या उपदेशाचा परिणाम हळू हळू कसा दिसूं लागला याचें एक तत्कालीन ताजें उदाहरण देणें उचित आहे. १८८४ च्या जुलई महिन्यांत ब्राह्मण सावकार, भट, जोशी, ब्राह्मणेतरांना फसवितात, लुटतात, नागवितात, याचा

सरकारानें विचार करावा, अशा अर्थाचा एक अर्ज जुन्नर तालुक्यांतले कुणबी, माळी व इतर शेतकऱ्यांनीं सरकाराकडे पाठविला होता. सवतासुभा स्थापन करणाऱ्या मराठे मंडळींनीं १८८५ सालीं श्री. सयाजीरावांना वेगळी आपल्या पंथातर्फे पुण्यास पानसुपारी दिली. याठिकाणीं भांडारकर व माधवराव यांना निमंत्रण होतें.माधवरावांचें या स्थळीं 'मराठे व महाराष्ट्र' यासंबंधीं 'अत्युत्कृष्ट भाषण झालें' एवढाच उल्लेख वृत्तपत्रांतून सांपडतो. दुर्दैव हें कीं, समग्र भाषण कोणीच प्रसिद्ध केलें नाहीं. या भाषणानें मराठे मंडळीच्या डोक्यांतला ब्राह्मणद्वेष नाहींसा होईल व त्यांचे डोळे उघडतील, अशी सदाशा त्यावेळीं ज्ञानप्रकाश पत्रानें व्यक्त केली आहे.

या वर्षीं पुण्यास स्थानिक स्वराज्याचा नवा उदार कायदा अंमलांत यावयाचा असल्यानें मोठी गडबड उडाली होती. माधवरावांचे स्नेही कुंटे यांनीं पेठोपेठीं स्थानिक स्वराज्याविरुद्ध व्याख्यानें देण्याचा धूम धडाका लावला होता. म्युनिसिपालट्या म्हणजे राजकीय शिक्षणाच्या प्राथमिक शाळा, अशी माधवरावांना जाणीव असल्यामुळें त्यांनीं प्रत्येक जिल्ह्याच्या शहरीं होतकरूं मंडळींना निवडणुकींत भाग घेण्याची चेतना दिली होती. सार्वजनिक सभेमार्फत वारंवार सरकारकडे अर्ज पाठवून लोकांच्या हातांत म्युनिसिपालट्या देण्याची माधवरावांनीं खटपट केलेली होती. ती १८८५ सालीं फळास आलेली पाहून त्यांना आनंद व्हावा, त्यांचा उत्साह वाढावा, हें योग्यच होतें. माधवरावांच्या प्रत्यक्ष सल्लामसलतीमुळें पुण्याच्या निवडणुकींत विशेष चैतन्य दिसत होतें; परंतु माधवरावांचे बालस्नेही कुंटे यांना यावेळीं विक्षिप्तपणाची लहर आली. एकदां माधवरावांचा व त्यांच्या खटका उडाला. त्यांत कुंट्यांना

माघार घ्यावी लागली, पण त्या योगानें गप्प बसण्याचें सोडून ते पेठोपेठीं व्याख्यानें देत सुटले. या व्याख्यानांतून कुंटे माधवरावांची नांव घेऊन उघड उघड नालस्ती करीत होते. कुंट्यांच्या दुष्परिणामांची भीति नसती तर माधवरावांनीं या नालस्तीची पर्वा केली नसती, पण कुंट्यांच्या भाषणांनीं सरकारचा विपरीत ग्रह करून दिल्यास स्थानिक स्वराज्याची अगदीं नजीक आलेली प्राप्ति लांबणीवर पडेल, असा रंग माधवरावांना दिसूं लागला, म्हणून माधवरावांनीं कुंट्यांच्या वक्तृत्वाला खीळ घालण्याचें ठरविलें व रास्त्याच्या पेठेंतील त्यांच्या एका व्याख्यानाला माधवराव जातीनें हजर राहिले. कुंट्यांच्या व्याख्या-नाला सुरुवात होऊन वक्तृत्वाला भरती चढूं लागली असेल नसेल, इतक्यांत माधवरावांची स्वारी हलकेंच आंत आली. श्रोतृगण खुर्च्याटेबलांच्या अभावीं भुईवरच बसला होता. त्यांतच माधवराव बसले. त्यांना पहातांच श्रोत्यांकडे कुंट्यांनीं पाठ फिरविली आणि मागल्या भिंतीकडे तोंड करून जिभेचा पट्टा कांहीं वेळ चालू ठेवला. पण कुंट्यांचें अवसान अशा स्थितींत फार वेळ टिकणें शक्य नसल्यानें त्यांचें व्याख्यान थोडक्याच वेळांत आटपलें व कुंटे खालीं बसले. माधवरावदेखील आपली जागा सोडून कुंट्यांजवळ जाऊन बसले. सभा बरखास्त झाल्यावर ‘माझ्या गाडींतून फिरायला येतां कां?’ असें माध-वरावांनीं कुंट्यास विचारलें. कुंटे घुश्शांत होते. त्यांनीं ‘मला तुमच्या गाडींतून फिरायला जाण्याची इच्छा नाहीं’ असा तुसडा जबाब दिला व ते दाराशीं उभ्या असलेल्या आपल्या वाहनांत जाऊन बसले. माधवराव मुकाट्यानें त्यांच्या मागोमाग गेले व ‘बरें तर, तुम्हांला जर माझ्या गाडींत बसावयाचें नसेल तर मी तुमच्या गाडींत

असतो ' असें म्हणून त्यांनीं आपले शब्द खरे केले. आतां कुंट्यांना कांहींच करतां येईना. त्यांनीं माधवरावांना बसूं दिले व दोघेही फिरायला गेले. फिरण्याच्या वेळांत माधवरावांचा व कुंट्यांचा मत-भेद समूळ विराम पावला व दुसऱ्या दिवसापासून कुंट्यांचीं या विषयावरील व्याख्यानें साफ बंद पडलीं. लोकहितासाठीं कित्येकदां माधवराव कसे उपाय योजीत असत, याचें हें एक उदाहरण आहे.

आमचीं विद्यापीठें सुधारलीं पाहिजेत, ही तक्रार विद्यापीठांच्या पांच-वीलाच पुजली आहे, असें म्हटल्यास हरकत नाहीं. मधून मधून या तक्रा-रीचा कोणी पुरस्कर्ता निघाला म्हणजे तिचा बराच गवगवा होतो. यावर्षी मागें उल्लेखिलेले वाय्. एन्. रानडे यांनीं एक सभा भरवून सप्टेंबरांत विद्यापीठाच्या सुधारणेची योजना लोकांपुढें मांडली. माधवराव हजर होतेच. सभेला पोरसवदा व्यक्तींची बरीच गर्दी होती आणि त्यांपैकी पुष्कळांनीं वादविवादाची गंभीरता घालवून बाष्कळपणा आरंभला, तेव्हां माधव-रावांना जरा रागाच्या शब्दांत उपदेश करावा लागला. ज्या विषयाचा कधीं पूर्ण विचार केला नाहीं, त्या विषयांत, जणूं काय आपण त्यांतले निष्णात पंडित आहोंत, अशा फाजील आत्मविश्वासानें निर्धास्तपणें तोंड घालण्याची संवय चांगली नाहीं. ज्या विषयावर बोलायचें असेल त्या विषयाचें सांगोपांग ज्ञान संपादन करावें आणि मग बोलावें, असा त्यांनीं बोध केला. ज्या विषयाची आवड नाहीं, तो विषय परिक्षेसाठीं विद्यार्थ्यांना अभ्यासावा लागतो, त्यामुळें चिकाटीचे गुण त्यांमध्यें उत्पन्न होतात. विद्यार्थ्यांना चांगल्या संवयी लावणें, त्यांच्या अंगांतले गुण वाढविणें, हा शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. मॅट्रिकची परीक्षा ही ज्ञानार्जनाची अंतिम सीमा नसल्यानें जर सुधारणा कराव-

याची असेल, तर पदवीचा अभ्यासक्रम वाढविण्याबद्दल शिफारस करावी, मॅट्रिकच्या क्रमांत ढवळाढवळ करण्याची सांप्रत आवश्यकता नाहीं, असेंही ते आणखी म्हणाले. यावेळीं आगरकर व टिळक ही जोडी या सभेंत होती. त्यांनीं माधवरावांच्या विचारास दुजोरा दिला.

हितकर परंतु अप्रिय उपदेश करणाऱ्या लोककल्याणचिंतकांच्या अंगीं त्याचे कित्येक देशबांधव किंवा नगरबांधव गैरसमजुतीनें कसे विचित्र दोष चिकटविण्याचा प्रयत्न करतात, याचें माधवरावांच्या बाबतींत यावर्षीं पुण्यास एक उदाहरण घडलें. माधवरावांनीं सुमारें दहा वर्षांमागें खरेदी केलेल्या घराच्या मागल्या बाजूस एक विकाऊ जागा होती. दहापांच जणांनीं ठरविलेली किंमत रीतसर रोख देऊन ती जागा माधवरावांनीं विकत घेतली. परंतु कित्येक दुष्ट माणसांनीं या साध्या व्यवहाराचा विलक्षण विपर्यास केला आणि जगामध्यें 'अप्रमाणिकपणानें म्युनिसिपालटींतल्या लोकाकडे वजन खर्चून भीड घालून थोड्या किंमतींत ही जागा माधवरावांनीं उपटली' अशा खोट्या कंड्या पिकविल्या. बरेच जण म्हणूं लागले कीं, कारण नसतां माधवराव म्युनिसिपालटीच्या भानगडींत पडतात, याचें कारण वरच्यासारख्या स्वार्थाशिवाय दुसरें काय असणार? या खरेदीचा बभ्रा त्यावेळच्या वृत्तपत्रांतून असून म्युनिसिपालटीच्या बैठकींत त्यासंबंधीं प्रश्नोत्तरें होऊन समजूतदार शंकितांचें पूर्ण समाधान झाल्यानंतर हा प्रवाद निकालांत निघाला व मग त्याविषयीं लोक बोलेनासे झाले.

सरकारची नोकरी, कायदेकौन्सिल, नित्याच्या व नैमित्तिक सभा वगैरे कामें संभाळून माधवराव या वर्षी—विशेषतः या वर्षाच्या उत्तरार्धांत—

आणखी एका हेतूला मूर्तस्वरूप देण्याच्या नादांत होते. आजवर प्रत्येक प्रांतानें राजकारणाची व सुधारणची चळवळ केली. यावर्षी तिचें एकीकरण करून सगळ्या प्रांताना एका महत्त्वाकांक्षेच्या सूत्रानें बांधण्याची चळवळ पत्रोपत्रीं पुढारी मंडळींत सुरू होती. अशा महत्त्वाच्या कामांत माधवरावांची मसलत न घेतली जाणें शक्यच नव्हतें. सर्व हिंदुस्थानांतल्या पुढाऱ्यांचा बिनसरकारी राजकीयसंघ निर्माण करण्याचा पुढाकार ह्यूमसाहेबांनीं घेतला होता. सुदैवानें यावेळीं वरिष्ट सरकाराची अनुकूलता होती. पहिल्या वर्षीं प्रस्तुत संघाचें अध्यक्षस्थान मुंबईचे गव्हर्नर लार्ड रे यांना देण्याचें घाटत होतें. पुण्याला माधवरावांचा जम उत्कृष्ट असल्यामुळें तेथें हें कार्य सहज करतां येईल असा माधवरावांचा अंदाज होता व त्याप्रमाणें पुण्याला तयारी चालली होती. पण दैवानें आयत्या वेळीं सदर बेतास खो घातला आणि कांग्रेसच्या पहिल्या बैठकीचा मान मुंबईशहराला मिळाला. पुण्यास महामारीचा फेरा येऊन कांग्रेसची बैठक मुंबईला नेणें भाग पडलें. कांग्रेसची सिद्धता चालू असतां सामाजिक सुधारणेचा संघ उत्पन्न करावा, अशी माधवरावांची इच्छा होती व त्या अर्थाचा पत्रव्यवहार त्यांनीं चालविला होता. हें वर्ष संपतां संपतां माधवराव नगरास गेले होते. तेथें कै. गोविंद वासुदेव कानिटकर हे त्यांचे तरुण मंडळींतले एक स्नेही होते. माधवराव तडक त्यांच्या घरीं गेले व लेखनाचें साहित्य मागून घेऊन दोन तीन तास पत्रें लिहिण्यांत गर्क झाले. कानिटकरांना माधवरावांच्या पत्रलेखनाचा हेतु पुढें बऱ्याच दिवसांनीं समजला. कांग्रेसची बैठक जवळ जवळ आल्यानें माधवरावांनीं त्यासंबंधीं आपल्या स्नेहीवर्गाला पत्रें लिहिलीं, असा संभव कानिटकरांनीं ‘ माझ्या स्मरणवहींतली

कांहीं पानें' या मथळ्याखालीं सुधारकांत १९०१ सालीं प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या आठवणींत, व्यक्त केला आहे.

डिसेंबराच्या अगदीं अखेरीला मुंबईला कांग्रेसची बैठक झाली आणि त्या बैठकींतच सामाजिक परिषदेचा पाया घालण्यांत आला. दि. ब. रघुनाथराव, काशिनाथ त्रिंबक तेलंग, यांची सामाजिक सुधारणेवर अत्यंत परिणामकारक भाषणें झालीं. रघुनाथराव यांचे 'हिंदू विवाहाचा कायदा' या विषयावर व्याख्यान झाल्यावर माधवरावांनीं संस्कृत धर्मग्रंथांतल्या अनेक वचनांच्या आधारानें प्राचीनकाळीं बालविवाहांचा प्रचार नव्हता, आजची बालविवाहाची रूढि शास्त्रवचनांना आणि संस्कृतीच्या रहस्याला सर्वथैव सोडून आहे, आज बालविवाहाला पुष्टि देणारीं जीं कांहीं शास्त्रवचनें ग्रंथांतून कोठें कोठें आढळतात, तीं मागाहून घुसडलेलीं आहेत.बालविवाहाचा पुरस्कार आणि विधवाविवाहाचा निषेध, केवळ अज्ञानानें व भ्रमानें केला जातो. हा भ्रम व हें अज्ञान दूर करण्याला कायद्याची मदत घ्यावी लागली तरी हरकत नाहीं,' असें अत्यंत जोराचें भाषण केलें. तेलंगांनीं माधवरावांच्या विचारांना सर्वस्वीं अनुमोदन दिलें, परंतु सरकारी कायद्याच्या बाबतींत मतभेद दर्शविला. माधवरावांचें यावेळचें समग्र भाषण कोठेंच आढळत नाहीं. त्याचा जो सारांश कित्येक वृत्तपत्रांमध्यें प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून पंडित नारायण केशव वैद्यांच्या पुस्तकास जोडलेल्या प्रास्ताविक निबंधांतील विचारांचा त्यांनीं खुलून विस्तार केला असावा, असें म्हणावयास हरकत नाहीं. या लेखाचा या वर्षाच्या हकीकतींत तीनदां तीन प्रकारें उल्लेख आला आहे. श्री. रमाबाईंनीं प्रसिद्ध केलेल्या माधवरावांच्या निबंधसंग्रहांत याचा समावेश झाला

असल्यामुळें जिज्ञासूंनीं त्याचा प्रत्यक्ष परिचय करून घ्यावा. संग्रहाच्या ७०व्या पानांत त्याचा प्रारंभ झाला आहे. यांत सरकारी कायद्याच्या आक्षेपकांना भरपूर उत्तर आहे. स्त्रियांचे हक्क कोणत्या परिस्थिती-मुळें ऱ्हास पावले, याचा इतिहास वाचनीय आहे.

यास्थळीं पहिल्या कांग्रेसच्या बैठकींत माधवरावासंबंधीं एक 'आठ-वण'* देऊन पुढील इतिहासाकडे वळणें श्रेयस्कर आहे. कांग्रेस ही राजकीय संस्था असल्यानें तिच्यांत भाग घेण्याला सरकारी नोकरांना मुभा नव्हती. परंतु माधवरावांना लोकहिताच्या कार्यांत आपण सर-कारी नोकर आहों, याचें भान रहात नसे, कदाचित् सरकारी नोकरांना पाळावे लागणारे निबंध आपल्या वर्तनाचा कित्ता घालून शिथिल करण्याचा त्यांचा हेतु असावा. कारण कांहीं असलें तरी एवढें मात्र खरें कीं, सरकारी नोकरांनीं कांग्रेसमध्यें भाग घेतां कामा नये, असा सरकारचा स्पष्ट हुकूम सुटेपर्यंत माधवरावांना कांग्रेसच्या बैठकींत उघडपणें पडण्याला दिक्कत वाटली नाहीं. पुढें आपल्या नोकरांच्या वर्तनावर सरकार करडी नजर ठेवूं लागल्यानंतर माधवरावांनीं कांग्रे-सच्या कारभारांतून अंग काढून घेतलें, पण आंतून त्यांची सर्वप्रकारें मदत होती. पहिल्या बैठकींत इंडियाकौन्सिलचा वाद चालू असतां त्यांत कांहीं चूक होऊं लागली, तेव्हां माधवराव आपल्या खुर्चीवरून उठले आणि मंडळींत येऊन त्यांनीं लहानसें भाषण केलें. ही आठवण रा. रामचंद्र मोरेश्वर साने, यांनीं दिली असून माधवरावांच्या प्रस्तुत वर्तनाचा खुलासा होण्याकरितां त्यांनीं लिहिलेलें पुढील वाक्य महत्त्वाचें आहे. ते म्हणतातः—

* विविधज्ञान विस्तार वर्ष ४६ अंक १. पृ. ८.

आपण डेलिगेट नव्हे, प्रेक्षक आहों, असला भेदाभेद त्यांच्या लक्षांतही राहिला नाहीं. सार्वजनिक विषयांशीं त्यांचें तादात्म्यच इतकें असे कीं, कृत्रिम भेदाकडे त्यांचें लक्षच जात नसे.

१८८६ सालांत माधवरावांचा बहुतेक सर्वकाळ अखेरपर्यंत फायनॅंस कमिटीच्या कामामध्यें सिमला, मद्रास, कलकत्ता वगैरे ठिकाणीं गेल्यामुळें पुण्याच्या व पर्यायानें सर्व देशाच्या सार्वजनिक कार्याकडे त्यांना विशेष लक्ष घालण्याला फावलें नाहीं. याचा अर्थ ते सर्वस्वीं फायनॅंस कमिटींत गढून गेले होते, असा कोणीही करणार नाहीं. त्यांचें लक्ष सार्वजनिक कामाकडे होतें व पत्रद्वारें सल्लामसलत देण्याच्या उद्योगांत याही वर्षीं खळ पडला नव्हता. बाहेर गांवीं रहावें लागल्या- मुळें पुण्याला व्याख्यानें देण्याचा त्यांचा नेहेमीचा क्रम चुकला. परंतु सामाजिक सुधारणेच्या दृष्टीनें पाहिल्यास हें वर्ष मुंबई पुण्याला अतिशय गडबडीचें गेलें, यांत संशय नाहीं. मलबारींच्या टिपणांवर मतें घेण्याकरितां, तीं टिपणें वरिष्ठ सरकारानें प्रांतिक सरकारांकडे व देशांतल्या प्रमुख प्रमुख व्यक्तीकडे पाठवून दिलीं होतीं. ही लोकमत व्यक्त करण्याची वेळ होती, म्हणून सुधारणाविरोधी पक्षानें आपल्या सभा भरविल्या आणि मलबारींनीं सुचविलेल्या सुधारणांची आवश्य- कता नाहीं, असे ठराव आणि अर्ज या पक्षानें पास केले व ते सरकार-दप्तरीं पाठवून दिले. कै. विश्वनाथ नारायण मंडलिक यांच्या अध्यक्षेतेखालीं मुंबईला माधवबागेंत भरलेली सभा अतिशय प्रसिद्ध आहे. यावेळीं देशांतल्या अनेक पुढाऱ्यांनीं धर्मशास्त्राचे, इंग्रजी राज्याच्या इतिहासाचे, समाजशास्त्राचे ग्रंथ उलथेपालथे केले. समाज सुधारणा म्हणजे काय, तिच्या बुडाशीं कोणतीं तत्त्वें असतात, तिचे

मार्ग कोणते व इतर देशांतून तिचें धोरण काय दिसून येतें, वगैरे प्रश्नांचा अनेक रीतीनें देशांत विचार सुरू झाला. सुधारक-वर्गांत मोडणाऱ्या व्यक्तींमध्यें यावेळीं मतभेदाची फाटाफूट दिसूं लागली. मुंबईस तेलंगांनीं ' आधीं सामाजिक सुधारणा कीं, राजकीयसुधारणा' या विषयावर १८८६ च्या फेब्रुवारींत व्याख्यान देऊन Line of least resistance लघुतम प्रतिकाराचा विचार प्रतिपादन केला. त्यांच्या मनां-तून सामाजिक सुधारणेच्या चळवळींतला एक अबाधित सिद्धांत या नात्यानें हा विचार श्रोत्यांसमोर मांडावयाचा नव्हता, परंतु त्यांच्या इच्छेविरुद्ध लोकांत या व्याख्यानाचा परिणाम घडला, यांत संशय नाहीं. माधवरावांनीं तेलंगांच्या व्याख्यानानें आपली गैरसमजूत करून घेतली नाहीं, पण तें व्याख्यान समाजसुधारणेच्या शत्रूंना अतिशय उपयोगी पडण्याचा संभव असल्यानें त्यांना फार खेद झाला. सदर व्याख्याना-नंतर थोडया दिवसांनीं चंदावरकरांची व माधवरावांची पुण्यास गांठ पडली, तेव्हां माधवरावांनीं त्यांना आपलें मत सांगितलें. अगोदरच लोकांत बुद्धिभ्रम आणि अनास्था पुष्कळ आहे, त्यांत तेलंगांच्या भाषणानें भर पडेल, असें माधवरावांचें मत होतें. हें मत बरोबर अस-ल्याचा अनुभव पुढें चंदावरकरांना आला. तेलंगांच्या मताचा आधार घेऊन बरींच शहाणींसुर्ती माणसें सामाजिक सुधारणेच्या प्रयत्नाची टर उडवूं लागल्याचें चंदावरकरांना आढळून आलें. सुधारणाविरोधी मंडळीला तेलंगांच्या भाषणाप्रमाणेंच आणखी एक हत्यार सांपडलें. प्रिंसिपाल वर्डस्वर्थ यांनीं मलबारींच्या टिपणांसंबंधीं स्वतःच्या प्रतिकूल मताचें दिग्दर्शन करणारें एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें होतें. वर्डस्वर्थ-साहेबांच्या मताचा आधार घ्यायला सांपडतांच धर्मभक्तांचा आनंद

गगनांत मावेनासा झाला. वर्डस्वर्थसाहेबांच्या लोकप्रियतेलाहो यावेळीं सीमा राहिली नाहीं. तेलंगाबद्दलचा लोकांतला आदर त्यांच्या भाषणामुळें शतगुणित झाला. माधवरावांचें मत चंदावरकरांनीं मुंबईस परत आल्यानंतर तेलंगांना कळविलें. चंदावरकर आणि तेलंग यांचा याविषयीं बराच संवाद झाला. आपल्या व्याख्यानानें माधवरावांना वाईट वाटलें, हें ऐकून तेलंगांनाही विषाद झाला, पण सरकारनें समाजसुधारणेसाठीं कायदा करावा, हें माधवरावांचें म्हणणें त्यांना आणखी कांहीं दिवस पटलें नाहीं.

इतका वेळपर्यंत माधवरावांनीं मलबारींना पाठविलेल्या पत्राचा उल्लेख करण्यांत आला, परंतु प्रत्यक्ष पत्रांतल्या मजकुराविषयीं कांहीं सांगितलेलें नसल्यानें पुढला संदर्भ समजण्याकरितां त्याची माहिती देणें अवश्य आहे. मलबारींच्या टिपणांना अनुलक्षून माधवरावांनीं लिहिलेलें पत्र बरेंच मोठें आहे, परंतु माधवरावांचें व मलबारींचें पूर्ण मतैक्य असल्यानें सदर टिपणांना पाठिंबा व्यक्त करण्याखेरीज माधवरावांनीं कांहीं केलें नाहीं. या पत्रावरून दिसतें कीं, मलबारींचीं टिपणें हातीं पडल्यावर माधवरावांचीं आपल्या मित्रमंडळींना बोलावलें आणि टिपणांतल्या विचारांचा ऊहापोह केला. मित्रांना त्यांत आक्षेपार्ह कांहींच न वाटल्यामुळें त्यांनीं मलबारींना दुजोरा देण्याची इच्छा प्रदर्शित केली व माधवरावांनीं त्याप्रमाणें जबाब धाडून दिला. मलबारीसारख्या पारशी गृहस्थानें हिंदूंच्या समाजसुधारणेबद्दल आस्था दाखवावी, हें पाहून पुष्कळ मंडळींना आश्चर्य वाटूं लागलें होतें. हिंदूंपैकीं बरेचजण जसे त्यांचे वैरी किंवा टीकाकार बनले, त्याचप्रमाणें अनेक गृहस्थ त्यांचे मित्र व अनुयायी बनले. पं. नारायण केशव वैद्य हे दुसऱ्या वर्गांतील गृहस्थ

होत. १८५६ सालच्या विधवाविवाहाच्या कायद्याचा इतिहास प्रसिद्ध करण्यांत त्यांचा मलबारींना मदत करावी, हाच हेतु होता. तें पुस्तक त्यांनीं मलबारींना अत्यंत कृतज्ञतेच्या भाषेंत अर्पण केलें आहे. माधवरावांनीं त्यास प्रस्तावना लिहून तिच्यांत सरकारनें कायदा करण्याबद्दल, अपेक्षित आक्षेपांच्या निरसनासह, कारणें दाखविलीं, यामुळें मलबारींच्या उद्दिष्टाला फार साह्य झालें. हें पुस्तक व त्यांचीं प्रस्तावना या दोन्ही गोष्टी १८८५ सालांत घडल्या. प्रस्तावनेंतल्या विचारांचें जास्त विवेचन निरनिराळ्या प्रसंगीं माधवरावांनीं त्या वर्षांत कसें केलें, याचा वृत्तांत मागें आलेला आहे. माधवरावांनीं एकदा या प्रस्तावनेचा जाहीर निर्देश केला होता, परंतु लोकांचें तिकडे लक्ष गेलें नाहीं. १८८६ सालीं जेव्हां त्यांनीं मलबारींना पाठविलेलें पत्र प्रसिद्ध झालें, तेव्हां पुण्यातले कांहीं नागरिक जागे झाले आणि त्यांनीं माधवरावांच्या प्रस्तुत पत्राबद्दल लेखी खुलासा विचारला.

१८८६ च्या ऑगस्टांत माधवराव पुण्यास आले होते. वाचकांना माहीत आहेच कीं, ते या वर्षीं सिमल्यास फायनॅंस कमिटीच्या कामाकरितां गुंतले होते. सप्टेंबरांत कमिटी मद्रासला जाणार होती. मद्रासला पोंचण्यापूर्वींच्या मधल्या काळांत माधवरावांनीं पुण्यास कांहीं दिवस मुक्काम केला आणि त्या अवधींत वर उल्लेखिलेला खुलासा माधवरावांना विचारण्यांत आला. जाहीर रीतीनें खुलासा सांगण्याला आपली तयारी असल्यामुळें पृच्छकांनीं किंवा शंकितांनीं सभा बोलवावी, असें माधवरावांनीं त्यांस उलट कळविलें, परंतु पृच्छकांनीं सभा बोलावण्याच्या भानगडींत न पडतां मूळचा खुलासा मागणाऱ्या पत्रावर आणखी कांहीं जणांच्या सह्या घालून तेंच पुनः माधवरावांच्य

हातीं पडण्याची व्यवस्था केली. या सुमारास माधवरावांना मद्रासला जाण्याची घाई असल्यानें त्यांनीं सभेचा नाद सोडला व एक स्पष्टीकरणाचें लांबलचक पत्र लिहून तें ज्ञानप्रकाशाकडे प्रसिद्धीकरितां पाठवून दिलें. लोकांना सगळें प्रकरण समजण्याकरितां मूळचें शंकितांचेंही पत्र छापण्याला ज्ञानप्रकाशकारांना त्यांनीं परवानगी दिली. हें पत्र २० सप्टेंबर १८८६ च्या ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झालें आहे. माधवरावांनीं मलबारींना लिहिलेलें पत्र व्यक्ति या नात्यानें लिहिलें कां पुढारी या नात्यानें लिहिलें, एवढाच काय तो शंकितांचा मुख्य प्रश्न होता. शंकितांमध्यें कुंटे होते, ही एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे.

शंकितांना दिलेल्या उत्तरांत प्रथम मलबारींना दुजोरा देणारीं माणसें आपापल्या मतांबद्दल व्यक्तिशः जबाबदार आहेत असें लिहिलें आहे. पण माधवरावांनीं सुरुवातीसच आक्षेपकांच्या विचारांतल्या विरोधाची तीक्ष्णता कमी केली आहे. तें म्हणतातः—

या संबंधांत भेद तारतम्याचा राहील, परंतु हल्लीं प्रचारांत असलेल्या विवाहसंबंधाच्या सर्व चाली सशास्त्र, युक्तिविरुद्ध व नीतीस अनुसरून आहेत, यांत दोष होण्यासारखें मुळींच कांहीं नाहीं, व त्यापासून मि. मलबारी म्हणतात, त्या मानानें नाहीं, पण कांहीं मानानें अनर्थ व अन्याय होत नाहींत, असें आपण कदापि म्हणणार नाहीं व ते अनर्थ टाळावेत आणि दोष दूर व्हावेत, अशी आपणांसही इच्छा आहे. दोष कोणते व किती प्रमाणानें आहेत, याविषयीं मतभेद असूं शकेल. दुरुस्ती होण्यास मार्ग कोणते व याबाबतींत बंदोबस्त कोणत्या प्रकारें व्हावा, याविषयीं भिन्न अभिप्राय होतील. याहून अधिक प्रकारचा फरक आपल्या व मि. मलबारी यांनीं प्रसिद्ध केलेल्या अभिप्रायांत व लेखांत नाहीं; अशी माझी समजूत आहे.

पत्रांतील या पुढच्या भागांत माधवरावांनीं हिंदुस्थानांतल्या विवाहांचे प्रकार वर्णिले आहेत व एका भ्रमाचें निरसन केलें आहे. मलबारींना विरोध करणारे लोक प्रायः ब्राह्मण किंवा उच्च वर्णाचे होते. या विरोधकांनीं मलबारींच्या विधानास खोडण्याकरितां उलट पुरावे आणले, ते फक्त आपल्या समाजांतल्या चालीरीतीवरून आणले. आपली जात म्हणजे सारें हिंदुस्थान, असा भ्रम डोक्यांत असल्याखेरीज अशी चूक होणार नाहीं. यासाठीं हा भ्रम योग्य नव्हें, असें दाखवून मग माधवरावांनीं विवाहाच्या तऱ्हा सांगितल्या आहेत. पंजाबांत व हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या मुलखांत एका बायकोनें एकाकालीं एकाहून अधिक ( सहोदर बंधू ) नवरे करण्याची वहिवाट लाखो लोकांत चालू आहे. कुटुंबांतल्या फक्त एका पुरुषानें लग्न करावें आणि बाकीच्यांनीं मनसोक्त व्यभिचारपरंपरेनें रहावें अशी मल्याळांत (दक्षिणेस) चाल आहे, जाट लोकांत नियोगाचा म्हणजे थोरल्या भावाच्या विधवेपासून धाकटया भावानें संतति उत्पन्न करण्याचा प्रघात आहे. बंगालमध्यें कुलीन नामक ब्राह्मणजातींतल्या पुरुषांना एकावेळीं वाटेल तितक्या बायका करण्याचा अधिकार आहे व असा बहुपत्नीक ब्राह्मण मरण पावला म्हणजे त्याच्या अनेक बायकांना संसारसुखास अंतरावें लागतें. गुजराथच्या कांहीं जातींत बहुधा वधूचें वय वराच्या वयापेक्षां दहापांच वर्षांनीं जास्त असतें. त्याच प्रातांत रजपूत लोक राजरोस कन्याविक्रय करतात. मुंबईकडच्या अडाणी जातींत बायकांना, पुरुषाची इच्छा नसतांही, वाटेल त्यावेळीं काडी मोडून देतां येते, उलट बायकोचा दोष नसतांना पुरुषाला द्वितीय संबंध करण्याची कांहीं जातींत परवानगी आहे. अल्पवयांत आताच्या जुलमामुळें केशवपनाच्या घोराचाराला

बालविधवांना बळी पडावें लागतें; कित्येक जातींत मुलींना उपजतांक्षणीं मारून टाकण्यांत अब्रूदारपणाची कमाल समजली जाते, अशा रीतीचे कांहीं वैवाहिक मासले व रूढाचार नमूद करून पूर्वीचीं अनेक बंधनें लयास गेल्यामुळें वरच्यासारख्या अनर्थांना सरकारी कायद्याखेरीज प्रतिबंध होणार नाहीं, अशी माधवरावांनीं ठाम सूचना केली आहे. संख्येवरून निर्णय करावयाचा झाल्यास बालविवाह न करणाऱ्या आणि विधवाविवाह करणाऱ्या जाती जास्त आहेत. केवळ उंच म्हणविणाऱ्या जातींत आचाराचा भेद पडला आहे, म्हणून माधवरावांनीं लिहिलें आहे कीं:—

हा अभिप्राय कोणाचा आहे, एका व्यक्तीचा आहे किंवा बहुत समाजाचा आहे, यावर विशेष कटाक्ष न ठेवतां अभिप्राय यथान्याय, सशास्त्र व सत्य आहे कीं नाहीं, एवढेंच पहाणें रास्त होईल.

श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माचारांऐवजी अनार्य धर्माचार समाजांत रूढ झाले आहेत व त्यांच्या जोरापुढें मूळचे श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माचार कांहीं बाबतींत लोपले आहेत. अनार्य धर्माची हकालपट्टी करण्याचें सामर्थ्य शास्त्र्यांत व शिष्टसंमतींत राहिलें नाहीं. 'तेव्हां नियमन करण्याची सत्ता ज्या ठिकाणीं आहे, त्या सत्तेचा उपयोग करून बंदोबस्त झाला पाहिजे.' कायदा मागून घेतल्यानें विवाहविधीचें स्वातंत्र्य जातें, असा एक आक्षेप पुढें आणला जातो. त्यास माधवरावांचें पुढील प्रमाणें उत्तर आहे. ते म्हणतात:—

हल्लीं विवाहासंबंधानें मुळींच कायदा नाहीं, अशी आपली समजूत असल्यास ती ययुचित नाहीं. ज्या नियमांचा अंमल कोडतांतून होतो, तो कायदा. शास्त्रनियमांचा अंमल कोडतांतून होतो, तितक्या मानानें त्या बाबतींत कायदा हल्लीं आहे, असेंच समजलें पाहिजे.

हल्लीं प्रचारांत असलेल्या कायद्याचीं निरनिराळीं उदाहरणें देऊन कायद्याचें महत्त्व पुढच्या मजकुरांत त्यांनीं सांगितलें आहे. कायद्याखेरीज कोणतीही वहिवाट निरंतर सुरळित चालत नाहीं. कोडताच्या भीतीशिवाय कोणतीही व्यवस्था टिकत नाहीं, हा विचार केल्यास आपल्या व विरोधी मंडळीच्या मतांत फारसें अंतर रहात नाहीं, असें माधवरावांनीं म्हटलें आहे.

कोणताही विशिष्ट स्वरूपाचा कायदा मागून घेण्यापूर्वीं सगळ्या हिंदुस्थानांतल्या जातींतील विवाहासंबंधीं व्यवहाराचा तपास व्हावा, या व्यवहारांत दोष कोणते आहेत, ते दूर करण्याचे काय प्रयत्न झाले, पंच, गुरु, धर्माधिकारी इत्यादि मंडळींना त्यांच्या ज्ञातींत कितपत मान दिला जातो व त्यांच्या हातून आपापल्या ज्ञातीपुरतें धर्मनियमनाचें काम कसें घडतें, त्यांच्या नियमनाची अंमलबजावणी कशी केली जाते व कितपत होते, वगैरे गोष्टीचा अगोदर तपास करणें योग्य आहे व नंतर तपासाअंतीं निघणाऱ्या अनुमानांच्या धोरणानें कायद्याचें स्वरूप ठरविणें जास्त उपयोगी आहे, मग तपासाला दिनावधि लागला तरी हरकत नाहीं. पण प्रत्येक समाजांतल्या ज्ञात्यांकडे तपासाचें काम दिल्यास त्यांचें व समाजाचें आपल्या धार्मिक व्यवहाराकडे लक्ष जाईल, ते या बाबतीत विचार करूं लागतील, हा एक अशा तपासाचा दुसरा फायदा आहे, असें माधवरावांनीं पत्राच्या अखेरच्या भागांत लिहिलें आहे. पत्र संपविण्यापूर्वीं माधवराव म्हणतात:—

मी ज्या अभिप्रायाची प्रसिद्धि केली आहे, तें मत माझें एकट्याचें नसोन या व अन्य प्रांतांतील कित्येक पोक्त व विद्याविभूषित व श्रेष्ठ अशा मानलेल्या लोकांचें आहे. बहुजनसमाज कोणीकडे आहे, याविषयीं निर्णय सांगण्यास अड-

चण आहे, तथापि काळाचा व एकंदर व्यवस्थेचा ओघ या मतास अनुकूल आहे व या मताच्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, ही गोष्ट मी आपणास सांगावी, असें नाहीं.

हें पत्र प्रसिद्ध होण्याच्या सुमारास माधवराव मद्रासकडे निघून गेले होते. तेथें गेल्यावर त्यांचें Facts and Fiction या नांवाचें एक व्याख्यान झालें. त्यांत त्यांनीं वरील पत्रांतलेच विचार अधिक स्पष्टपणें व विशद रीतीनें सांगितले. इकडे महाराष्ट्रांतलीं कांहीं वृत्तपत्रें हिंदुस्थानांतल्या धर्मव्यवहारांच्या चौकशीची माधवरावांच्या पत्रांतली इच्छा पाहून घाबरल्याचें आढळून येतें. माधवरावांनीं तीच इच्छा मद्रासच्या व्याख्यानांत व्यक्त केल्याचें समजल्यावर त्यांनीं विशेष कोलाहल माजविला असता, परंतु त्या व्याख्यानाला विशेष प्रसिद्धि मिळाली नाहीं. मद्रासच्या व्याख्यानांत माधवरावांनीं दुसरें व्याख्यान Hindoo Ideals of Duty कर्तव्यासंबंधीं हिंदूंचें ध्येय, या विषयावर दिलें. हें व्याख्यान ८ आक्टोबर १८८६ रोजीं पंचप्पा कॉलेजांत सर सुब्रह्मण्य अय्यर यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. प्रथम माधवरावांच्या एका मित्रानें 'आपल्या देशाच्या उद्धारासंबंधीं राजनिष्ठ हिंदूचें कर्तव्य,' या विषयावर व्याख्यान देण्याबद्दल त्यांस विनंती केली. परंतु 'विचार केल्यावर मला असें आढळून आलें कीं, राजनिष्ठ हिंदू हा शब्दप्रयोग चुकीचा आहे, कारण हिंदू या नांवांतच त्याच्या राजनिष्ठेच्या गुणाचा अंतर्भाव होतो. जास्त विचार केल्यावर व्याख्यानविषयाचें नांव निष्कारण लांब आहे, असें वाटलें व त्यांतही काटछाट केली' असा माधवरावांनीं व्याख्यानाच्या सुरवातीला थोडासा पूर्ववृत्तांत सांगितला आहे. यादवीं मुंबईच्या बिशपसाहेबांनीं प्रस्तुत विषयावर एक व्याख्यान दिलें

होतें, पण त्यांत हिंदूच्या कर्तव्यकल्पनेचा नुसता ओझरतादेखील उल्लेख नव्हता, असें आपल्या व्याख्यानाच्या प्रारंभीं माधवरावांनीं म्हटलें आहे. कदाचित् बिशपसाहेबांनीं हिंदूविषयीं दाखविलेल्या उपेक्षाबुद्धीमुळें माधवरावांनीं हा विषय व्याख्यानासाठीं पसंत केला असेल, कारण युरोपियन वक्त्यांना उत्तर मिळण्यासाठीं माधवरावांनीं व्याख्यानें दिल्याचे बरेच दाखले आहेत.

प्रस्तुत व्याख्यान माधवरावांच्या अगाध विद्वत्तेचें द्योतक आहे, त्यांनीं प्रथम ग्रीक, रोमन, ख्रिस्ती, यहुदी लोकांतील कर्तव्यांच्या कल्पनांचें गुणदोषविवेचन करून नंतर हिंदूची तत्संबंधीं कल्पना स्पष्ट केली आहे. हिंदू समाज धार्मिक कर्तव्याशीं एकरूप झालेला असल्यामुळें त्याचें कर्तव्य वेगळें दिसत नाहीं. परंतु हिंदूंइतकी ऐहिक कर्तव्यांच्या ध्येयाची जाणीव जगाच्या पाठीवरील कोणत्याही धर्मांत व समाजांत नाहीं, असें त्यांनीं आपल्या व्याख्यानांत निःसंदिग्ध रीतीनें सिद्ध केलें आहे. यज्ञाची व अहिंसेची कल्पना कडेलोटास कशी गेली, तिचा प्रतिकार कसा झाला व सांप्रत हिंदूंची काय स्थिति आहे, वगैरे मुद्दयांचा ऊहापोह केल्यावर माधवराव आपल्या नेहेमींच्या आवडत्या मुद्द्याकडे वळले. परमेश्वराची लाडकी जात जर कोणती असेल तर ती हिंदूशिवाय दुसरी नाहीं. हा मुद्दा विवरिल्यानंतर त्यांनीं ब्रिटिशांपासून कोणकोणतें गुण हिंदूंनीं शिकण्याची अवश्यकता आहे, याबद्दल उपदेश केला. तो असा:—

चिकाटी हा इंग्रजांच्या अंगीं अमोलिक गुण आहे. तो हिंदूंनीं आपल्या अंगीं आणला पाहिजे. धिम्मेपणा आणि निश्चयाचें बळ ( strength of determination ) हे आणखी गुण हिंदूंनीं आपल्या स्वभावांत रुजविण्याची आवश्य-

कता आहे, हिंदूसमाजांत निरुत्साह, निराशा, उदासीनता वगैरे दोष वसत आहेत. ते घालविणें जरूर आहे. युरोपियन लोक अतिशय खेळाडू आहेत. घराबाहेर उघड्या स्वच्छ हवेंत ते खेळांचा व्यायाम करतात, परंतु कामाच्या वेळीं ते कामही खूप करतात. काम करण्यांत त्यांचा हात साऱ्या दुनियेमध्यें कोणी धरूं शकणार नाहीं. हिंदूंमध्यें अशा गुणांचा मिलाफ आढळत नाहीं. कोणी अतिशय विलासमग्न दिसतील तर कोणी सर्वसंगपरित्यागी पहावयास सांपडतील. युरोपियन व देशी गुणांचें माफक प्रमाणांत मिश्रण झालें तर दुसरें वरचढ इष्ट तें काय असूं शकणार? आपल्याला युरोपियनांसारखे बहुगुणी शिक्षक लाभले, म्हणून हिंदूंनीं आनंद मानला पाहिजे.

डिसेंबरांत माधवराव कलकत्त्यास गेले. तेथें त्यांनीं बिधून नांवाच्या शिक्षणसंस्थेंत धंदे शिक्षणावर दिलेलें एक व्याख्यान उपलब्ध आहे. सामाजिक सुधारणेबद्दल त्यांनीं कांहीं चळवळ केली कीं नाहीं, याविषयीं इकडील वृत्तपत्रांतून माहिती मिळत नाहीं. या वर्षीं कांग्रेसची बैठक कलकत्त्यास झाली. माधवरावांनीं तिच्यांत भाग घेतला. सामाजिक परिषद या वर्षीं एकंदर कार्यक्रमांतून साफ गळली. कलकत्त्याचें काम आटोपल्यावर माधवराव पुण्यास परत आले व त्यांनीं समाजसुधारणेबद्दल १८८७ च्या मार्च महिन्यामध्यें प्रार्थनासमाजांत जोराचें भाषण केलें. १८८६ सालीं समाजसुधारकांवर साऱ्या देशांतले अनेक पुढारी दांतओठ खात होते. १८७० च्या वादानंतर बऱ्याच अंशांनीं शांत झालेले दोन्ही पक्ष या प्रसंगीं दंड थोपटून सामन्याला उभे राहिले. या १६ वर्षांमध्यें समाजाच्या प्रवृत्तींत अतिशय फरक पडलेला दिसतो. १८७० सालीं इंग्रजी शिकलेले व इंग्रजी विद्येचा गंध नसलेले, असे दोन पक्ष अस्तित्वांत होते. आतां शास्त्रीभिक्षुकांचा वर्ग मागें पडून आंग्लविद्याविभूषितांतले चांगले चांगले पंडित समाजसुधारणेच्या

चळवळीला हाणून पाडण्याकरितां सज्ज झाले. १८७० च्या वादांत उदासीन असलेले विश्वनाथ नारायण मंडलिक या वेळीं मलबारींना प्रतिकार करणाऱ्या समाजाचे अग्रणी झाले, हा एक लोकप्रवृत्तींत पडलेल्या फरकाचा पुरावा आहे. मलबारी पक्षाला या वेळीं सुशिक्षित व अशिक्षित या दोन्ही वर्गांच्या एकोप्याशीं टक्कर देण्याची पाळी आली. तथापि मागल्या सोळा वर्षांत सुधारणापक्षाबद्दल सर्व जनतेमध्यें अनुकूल बुद्धीचा अस्पष्ट उदय झाला होता, हे विसरतां येत नाहीं १८८५ सालीं सुरतेच्या पुष्कळशा विधवांनीं आपल्या पुढारी ज्ञातिबांधवांना उद्देशून एक अर्जवजा :जाहीरनामा प्रसिद्ध केला होता व त्यामध्यें वर्णिलेल्या विधवांच्या दु:खाकडे डोळेझांक करणें कोणासच शक्य नव्हतें. १८८६ मध्यें पुण्याच्या शास्त्रीवृंदाचें एक शिष्टमंडळ गव्हर्नरसाहेबांच्या भेटीस गेले होतें; त्याला विवाहासंबंधीं अनेक दुष्ट व घातक चाली रूढ आहेत व त्यांचें निर्दलन होणें अवश्य आहे, असा रोखठोक कबूलीजबाब देणें भाग पडलें. माधवरावांनीं आपल्या उपरिनिर्दिष्ट पत्रांत या कबूलीजबाबाचा उल्लेख करून फायदा घेतला आहे.

वादाच्या झटापटी सर्वत्र उडूं लागल्यावर प्रतिपक्षाकडून केल्या जाणाऱ्या आरोपांचा धुव्वा उडविणें, हें सुधारणापक्षाच्या धुरीणांचें कर्तव्य होतें. १८८६ सालांत निघालेल्या सर्व आक्षेपांना माधवरावांनीं १८८७ सालच्या मार्च महिन्यांतील प्रार्थनासमाजाच्या व्याख्यानांत उत्तर दिलें आहे. मागल्या वर्षांत तेलंगांच्या Line of least resistance लघुतम प्रतिकाराच्या सिद्धांताचा फायदा सुधारणानिंदकांनीं सपाटून घेतला होता. तोच मुद्दा घेऊन माधवरावांनीं भाषणाची सुरुवात केली. ते म्हणाले:—

लघुतम प्रतिकाराचा सोयिस्कर मुद्दा सांप्रत सर्वांना मोठा प्रिय होऊन बसला आहे. लोकांना राजकारणांत भाग घेण्याची अतिशय हौस वाटते. जबाबदार राज्यपद्धतीबद्दल सारखी वाचाळता सुरू आहे. पण सामाजिक सुधारणेचा प्रश्न निघाला कीं, सगळें गाडें फिरतें. राजकारणाविषयींचा दिसणारा ताव मावळून सामाजिक सुधारणेचें नांव निघालें कीं, अगदीं थंडगार मामला अनुभवास येतो. राजकारणांतल्या वाचाळांची समाजसुधारणेच्या दर्शनानें दांतखीळ बसते. ते या विषयाला नाकें मुरडतात आणि फार पाठीस लागले तर नानाप्रकारचे बहाणे लढवून 'हा प्रश्न जाऊं द्या, आपोआप जें होईल तें होईल' असें म्हणतात. ही झाली राजकारणाच्या आवडीची सामान्य स्थिति. लोकांच्या प्रवृत्तींतही असाच विचित्र विसंगतपणा पसरला आहे. राजकारणांत कोणाला यश मिळालें कीं,–मग तें लवमात्र अगर कितीही क्षुद्र असो–ताबडतोब अशा यशस्वी माणसाला लोक डोक्यावर घेऊन नाचतात, त्याचे देव्हारे माजायला उशीर लागत नाहीं. राजकारणांतल्या माणसाला वाटेल त्या सवलती द्यायला आणि त्याच्या लहान मोठ्या सर्व दोषांकडे शक्य तितकी डोळेझांक करायला लोकांची तयारी आहे. सुधारकाला मात्र अगदीं क्षुल्लक बाबतींतसुद्धां गय करायला त्यांची तयारी नाहीं. त्यांच्या तोंडांतून निघणाऱ्या व हातून घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीची कसून परीक्षा केली जाते. ढोंगी, स्वार्थी, धर्मबुडव्या, अशा नानाविध कुशब्दांची त्याच्यावर वृष्टि करण्याला लोक तत्पर आहेत. कोठेंही जा. 'परमेश्वराकरितां तरी सामाजिक प्रश्न उपस्थित करूं नका, जी स्थिति आहे ती सर्वथैव योग्य आहे.' असेंच बहुतेक सर्वजण तुम्हांला कळवळ्यानें सांगतील.

इतकी प्रस्तावना झाल्यावर माधवरावांनीं आक्षेपांची हजेरी घेतली. सुधारकांच्या बोलण्यांत आणि वागणुकींत मेळ नसतो, हा पहिला आक्षेप आहे. सुधारकांच्या बोलण्यांत आणि वर्तनांत मेळ नाहीं, म्हणून मूळची सुधारणा त्याज्य ठरत नाहीं; असें माधवरावांचें यावर समर्पक उत्तर आहे. सुधारकांची धाव फार मोठी व जलदीची आहे, असा त्यांवर दुसरा आरोप करण्यांत येत असतो. परंतु

त्यांतही तथ्य नाहीं. कारण लहानपणीं लग्न होऊं नये, विधवा-विवाहाचा प्रतिबंध काढून टाकावा, असें सांगण्यांत कोणतें असाध्य ध्येय पुढें ठेविलें जातें? शिवाय त्यामध्यें नवीन कांहीं नाहीं, कारण प्राचीन काळीं प्रौढविवाह आणि विधवाविवाह होत असत. सुधारकांवर लादल्या जाणाऱ्या दुसऱ्या आरोपाचें वरच्याप्रमाणें निरसन केलें म्हणजे त्यांचे प्रतिपक्षी म्हणूं लागतात कीं, सुधारणा लोकांना मानवणार नाहीं. येथल्या हवापाण्याला अनुसरूनच सामाजिक व्यवहार अंमलांत आले आहेत. पण इतिहासाची याविषयीं साक्ष घेतल्यास ती वरील विधानांच्या उलट पडते. आज दिसणारे आचार सनातन नाहींत. त्यामध्यें आजवर कितीतरी फेरफार झाले आहेत. या फेरफारांची हवापाण्यानें कशी अडवणूक केली नाहीं? अशा रीतीनें पहिले तिन्ही आक्षेप उडविले गेले म्हणजे इतर जाती स्वस्थ बसल्या असतां आम्हीं हिंदूंनींच सुधारणेकरितां कां कासावीस व्हावें, असा प्रश्न विचारण्यांत येतो. यालाही माधवरावांपाशीं स्फूर्तिदायक जबाब होता, तो त्यांनीं या भाषणांत दिला. ते म्हणाले:—

आम्हां हिंदूंवर विशेष जबाबदारी आहे. जगांतील इतर राष्ट्रें प्रगतीच्या मार्गानें जलद जलद चालली असतांना हिंदूंनीं देखील हातपाय हालविले पाहिजेत आणि अर्वाचीन काळांतल्या घडामोडीमध्यें भाग घेतला पाहिजे. हिंदू एकदा वैभवाच्या अत्युच्च शिखरावर होते. आतां ते खालीं पडले आहेत. पण त्यांनीं पुन्हा पूर्वीच्या स्थानावर जाण्याचा यत्न करणें प्राप्त आहे. ख्रिस्ती धर्माप्रमाणें हिंदूंचा धर्म त्यांना रोजची भाकर मिळण्याविषयीं प्रार्थना करायला सांगत नाहीं. इहलोकांतली वस्ती सुखविलासांत आयुष्य दवडण्याकरितां नसून येथें पुढल्या जन्माची तयारी करण्याकरितां आपणास ईश्वरानें पाठविलें आहे, असें आपला धर्म आपणास शिकवितो. स्वधर्माच्या या शिकवणीचा जोंवर आपले पूर्वज

व्यवहारांत अंमल करीत होते, तोंवर त्यांचा उत्कर्ष होत गेला. आपल्याला या शिकवणीची उपेक्षा करतां येत नाहीं व म्हणूनच सामाजिक प्रश्नाकडे काना-डोळा करणें यावेळीं शक्य नाहीं. आपल्या अंगांत जर पूर्वजांचें रक्त खेळत असेल, तर ज्या आचारांनीं आपल्या राष्ट्राला एकदां वैभवास चढविलें, त्या आचारांचें पुनरुज्जीवन करण्याखेरीज गत्यंतर नाहीं.

एप्रिलांत सुधारकांच्या नांवानें खडे फोडायला आणखी एक विषय उत्पन्न झाला. रखमाबाई-संरक्षक-मंडळ हाच तो विषय होय. या विषयाची वाटावाट १८८४ सालापासून थोडी थोडी चालली होती व त्याचें बीज १८७१ सालांत पेरलें गेलें होतें. १८६७ सालीं जनार्दन पांडुरंग नांवाचा एक पांचकळशी जातींतला सुखवस्तू गृहस्थ वारला. त्यांची सुमारें २५ हजार रुपयाची स्थावरजंगम मिळकत होती. त्याला एका मुलीशिवाय दुसरें अपत्य नव्हतें. त्याच्या विधवेनें १८७१ सालीं कै. डा. सखाराम अर्जुन यांच्याशीं पुनर्विवाह केला. दुसरा विवाह झाल्याबरोबर हिंदू कायद्याप्रमाणें पूर्वपतीच्या मिळकती-वरील तिच्या हक्काची इतिश्री होऊन ती सर्व मिळकत तिची मुलगी रखमाबाई हिच्याकडे जाण्याची वेळ आली. रखमाबाईचे तेराव्या वर्षी वीस वर्षें वयाच्या दादाजी नामक तरुणाशीं लग्न झालें. आपली बायको ऋतुमती होतांच तिनें आपल्या घरीं नांदायला यावें, म्हणून दादाजीनें डॉ. सखाराम अर्जुन यांजकडे मागणी केली. रखमाबाईचें वय अजून लहान असल्यानें आणखी कांहीं दिवस तिला आपल्या घरीं नेण्याची घाई करूं नको, असा डॉक्टरमजकुरांनीं दादाजीस उपदेश केला. दादाजीनें तो उपदेश ऐकला व १८८४ पर्यंत बायकोची मागणी केली नाहीं. या वर्षीं आणखी सबबी निघाल्या व तडजोडीचे उपाय थकल्यावर दादाजीनें कोर्टांत दावा मांडला. कोर्टांत खटला गेल्यावर

रखमाबाईनें दादाजी क्षयरोगी, अगदीं अक्षरशत्रु ठोंब्या आहे, वगैरे नांदायला न जाण्याचीं कारणें सांगितलीं. पुराव्यांत तीं खोटीं ठरलीं खालच्या कोर्टानें दादाजीविरुद्ध निकाल दिला. हायकोर्टानें मात्र हिंदु कायद्याप्रमाणें रखमाबाईनें आपल्या नवऱ्याकडे नांदायला गेलेंच पाहिजे, नाहीं तर तिला कैदेची शिक्षा भोगावी लागेल, असा निकाल सांगून दादाजीच्या नवरेपणाच्या हक्कांवर आलेलें गंडांतर उडवून लावलें. रखमाबाईची नवऱ्याकडे जाण्याची तयारी नव्हती, हें पूर्वीच सिद्ध झालें होतें. आतां हायकोर्टाच्या निकालाला धाब्यावर बसविल्यास तिची कैदखान्यांत रवानगी केली जाईल, असा प्रसंग येऊन ठेपला, तेव्हां प्रिन्सिपाल वर्डस्वर्थ यांनीं १८८७ सालीं रखमाबाई डिफेन्स कमिटी नांवाची कमिटी स्थापन केली आणि तिच्यांत रानडे, तेलंग वगैरे मंडळीनें भाग घेण्याचा निश्चय केला. असे नवराबायकोमधल्या बेबनावाचे खटले कोर्टांत येत नाहींत व रखमाबाईचा खटला अपवादादाखल होता, अशांतला भाग नाहीं, पण या खटल्यामागें-विशेषतः डा. सखाराम अर्जुन यांच्या संबंधामुळें रखमाबाईमागें-पुष्कळ सुधारकांचा जमाव असल्यानें हा खटला इतका गाजला कीं, कित्येक दिवस याखेरीज दुसरा विषय लोकांच्या तोंडीं नव्हता. या खटल्याबद्दल सगळ्या सुधारकांची भक्कम एकजूट होती, असेंही समजणें चुकीचें आहे. रखमाबाईचा पक्ष स्वीकारणें अन्यायाचें आहे व या खटल्याचें वृथा स्तोम माजविण्यांत आलें आहे, असाही पुष्कळांचा ठाम ग्रह होता. रखमाबाईच्या बाजूनें वृत्तपत्रांत पत्रव्यवहार झाला, पण प्रथम रखमाबाईच्या तर्फेनें पत्रें येतां येतां त्यामध्यें भ्रामक असत्य विधानांचा अतिरेक होऊं लागला, तेव्हां दादा-

जीनें आपली बाजू मांडण्याला प्रारंभ केला. अखेरीस ही पत्रापत्री निकरावर जाऊन बदनामीच्या फिर्यादीपर्यंत पोंचली व मग ती अंतर्धान पावली. हा पत्रव्यवहार पाहिल्यास दादाजीबद्दल गहजब उडाला असतांही त्यानें डोकें थंड ठेवूनच आपलें गाऱ्हाणें लोकांसमोर मांडलें, असें म्हणावें लागतें.

दादाजी–विरुद्ध–रखमा या खटल्याच्या मुळाशीं हिंदूचालींतल्या अनिष्ट किंवा घातक बाबींचा विशेष संबंध येत नसला तरी हिंदूधर्मानें बायकोवर जुलूम करण्याची कशी सवड ठेविली आहे, हा तात्त्विक व सामान्य विचाराचा प्रश्न उघडकीस आला, यांत संशय नाहीं. दैववशात् उच्च शिक्षणाचा लाभ घेतलेली बायको अडाणी नवऱ्याजवळ साहजीकच बुद्धिसंस्कारांच्या विसदृशतेमुळें नांदायला सिद्ध न झाली तर हिंदूधर्म तिला बांधून नवऱ्याच्या घरांत लोटणार, ही गोष्ट या खटल्यामुळें सुधारणेच्या वादांत नवीनच घुसली. बायकांची दशा हिंदूसमाजांत वाईट आहे, अशी सुधारकांची हाकाटी सुरवातीपासून चालू होतीच. तिच्यांत या खटल्यानें प्रत्यक्ष उदाहरणाची भर टाकली. सदर खटल्याची कीर्ति विलायतेपर्यंत जाऊन हिंदी स्त्रियांच्या दुःस्थितिसंबंधीं माहिती असणाऱ्या कित्येक चौकस युरोपियन बायांचें त्याकडे लक्ष वेधलें व त्या रखमाबाईच्या कुशलाची विचारपूस करूं लागल्या.

रखमाबाईच्या खटल्यामुळें स्त्रियांच्या हक्काचा जो प्रश्न उपस्थित झाला त्यावर आपलें शास्त्रसिद्ध मत प्रदर्शित करण्यासाठीं माधवरावांनी मे महिन्यामध्यें वक्तृत्वोत्तेजक सभेंत एक जंगी व्याख्यान दिलें. नेहेमींच्या क्रमास अनुसरून यावर्षी हा एक प्रचलित विषय वक्तृत्वासाठीं ठेवण्यांत आला होता. वक्त्यांनीं आपल्या भाषणांतून, स्त्रियांना कोण-

त्याही प्रकारचें हक्क देण्यांत हंशील नाहीं. त्या स्वभावतः दुर्वृत्त असतात, त्यांना स्वातंत्र्य अर्पण केल्यास त्या जास्त स्वैराचारिणी होतील, शिवाय हिंदू शास्त्रानें मान्य केलेल्या व शेंकडो वर्षांपासून रूढ असलेल्या समाजाच्या रचनेंत क्रांति घडून सबगोलंकार माजेल, अशा अर्थाचें विवेचन झालें. स्त्रियांच्या उन्नतीविषयीं सामान्यतः अतिशय प्रतिकूल असलेल्या लोकांना हें विवेचन आवडणारें होतें. विवेचनाची रुचि वाढविण्याकरितां स्त्रियांच्या दुराचारांच्या वर्णनाचा मीठमसाला भरण्यासही कांहीं वक्त्यांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं. त्यांचीं व्याख्यानें सुरू असतां मनाला पटणारे मुद्दे उच्चारले जातांच श्रोत्यांकडून प्रोत्साहनपर टाळ्यांचा कडकडाट मधून मधून होत असे. बिचाऱ्या वक्त्यांना या तालिकाघोषामुळें वक्तृत्वपटुत्वाचें बक्षीस हमखास आपल्या पदरांत पडेल, असें वाटलें असेल, परंतु परीक्षकांनीं हीं भाषणें नापसंत ठरवून कोणालाच बक्षिसें न दिल्यामुळें त्यांची पूर्ण निराशा झाली. शेवटीं माधवरावांनीं समारोप केला आणि इतर विषयांकडे लक्ष न देतां 'स्त्रियांचे हक्क' या एकाच विषयावर आपले विचार सांगण्यांत दीड दोन तास खर्ची घातलें. त्यांनीं याच विषयावर वसंतव्याख्यानमालेंत व्याख्यान देण्याचा निश्चय केला होता. त्यामुळें त्यासंबंधीं सर्व तयारी झालेली होती. त्यांच्या वक्तृत्वोत्तेजक सभेंतील भाषणाचा विस्तृत गोषवारा ता. २३ मे १८८७ च्या ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झालेला आहे. हा सगळाच लेख वाचनीय आहे. त्यांत स्त्रियांच्या हक्काबद्दल स्मृतींतलीं अनेक वचनें असून परस्परविरोधी वचनांचा युक्तिवादानें मेळ घालून दाखविला आहे. स्मृतिग्रंथ स्त्रियांच्या हक्काला अनुकूल आहेत, 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' किंवा तसल्याच कित्येक वचनांमुळें लोक स्त्रियां-

संबंधीं जो समज करून घेतात, तो अयोग्य आहे, असें माधवरावांनीं अनेक प्रमाणें काढून स्पष्ट केलें आहे. या भाषणाच्या प्रारंभीं कित्येक वक्त्यांनीं स्त्रियांबद्दल जो अनुदारपणा व्यक्त केला, त्यावर माधवरावांनीं कोरडे झाडले आहेत. ते म्हणाले:—

कैद व दंड करून नवराबायकोचा संबंध जोडावा, हें इष्ट आहे, असें प्रतिपादन झालें, त्यासाठीं स्त्रियांवर आरोप करण्यांत आले; तथापि ते आरोप सर्वथैव मिथ्या आहेत, हें विशेष रीतीनें सांगावयास नको. पूर्वकालीन जे ग्रंथ झाले आहेत, त्यास आपण शास्त्र म्हणतो, त्यांत स्त्रीजातीचें सदैव रक्षण त्यांच्या पुरुष आप्तांनीं करावें, स्त्रिया सेव्य आहेत, स्त्रिया पूज्य आहेत, स्त्रिया सन्मान्य आहेत, इत्यादि जीं वचनें आपण पहातों, त्यांची आठवण पुरुषांनीं विसरावी, हें मोठें दुर्भाग्य आहे. स्त्रीजातीचे जे दोष आपण वर्णन करतों, त्यावेळीं ते दोष आपण आपल्या मातेवर, कन्येवर व आपल्या भगिनीवरही आरोपितों, हे लक्षांत राहूं नये, हें आश्चर्य आहे. आपल्या मातेची, कन्येची भगिनीची, व पत्नीची अशा रीतीनें विटंबना भरसभेंत करावी, याहून अधिक कृतघ्नपणाची कल्पनाच होत नाहीं. आपला पुरुषार्थ आतां स्त्रियांपुरताच राहिला आहे, असें आपण आपल्या तोंडांनींच म्हणून घेणें, याहून दुसरें लाजिरवाणें कृत्य कोणाच्याही हातून घडणार नाहीं. पुरुषार्थ दाखवावा, असें वाटत असेल तर त्याला अन्य स्थळें पुष्कळ आहेत. सर्व पृथ्वींतील लोक आपल्यावर चढ करून आपल्यास तुच्छ मानीत आहेत, त्याची लज्जा वाटावी, हें एकीकडेच राहून पुरुषास काय सत्ता चालविण्याची ती घरांतील आपल्या स्त्रीसमाजावर चालवावी, असें वाटणें याहून अधमपणाची दुसरी कोटी दिसत नाहीं.

जूनच्या सुरवातीस माधवरावांचे या विषयावरील भाषण वसंतव्याख्यानमालेंत व्हावयाचें होतें, परंतु पावसाळा लवकर सुरवात झाल्यामुळें तें तहकूब करावें लागलें. माधवरावांचें व्याख्यान झालें नसलें तरी त्यांनी वक्तृत्वोत्तेजक सभेंत सांगितलेल्या मुद्यांत तथ्य

नाहीं, असें सिद्ध करण्याकरितां कै. वामन शिवराम आपटे यांनीं वसंतव्याख्यानमालेंत एक व्याख्यान दिलें. माधवरावांनीं जितक्या बाबतींत शास्त्रांची अनुकूलता दाखविली होती, तितक्याच बाबतींत शास्त्रांची प्रतिकूलता असल्याचें आपट्यांनीं सिद्ध केलें. आपट्यांच्या व्याख्यानाला माधवराव हजर होते. त्यांनीं आपट्यांचें व्याख्यान संपल्यावर अनुकूलप्रतिकूलतेचीं दोन्हीं टोकें सोडून तडजोडीचा मधला मार्ग सुचविला. याप्रसंगीं आपट्यांची व त्यांची थोडी खडाजंगी उडाली व आपट्यांनीं माधवरावांच्या संस्कृतच्या ज्ञानाबद्दल स्वमताभिमानाच्या आवेशांत कांहीं दुरुक्ति तोंडावाटें जाऊं दिल्या. वक्तृत्वोत्तेजक सभेंतले स्त्रियांच्या हक्कांचें माधवरावांनीं केलेलें मंडन सर्वथैव चुकीचें आहे, अशा आशयाचा एक लेख कै. बाळ गंगाधर टिळक यांनीं केसरींत लिहिला होता. त्यांना यामुळेंच आपट्यांचे विचार आवडले व त्यांनीं त्यांचे केसरींत गोडवे गाइले. या वर्षी वसंत–व्याख्यान–मालेंतलीं कित्येक व्याख्यानें राजद्रोही स्वरूपाचीं झालीं, अशी सरकारांत बातमी गेल्यामुळें, तेव्हांच्या पब्लिक सर्व्हिस कमिशन पुढें साक्ष देतांना, सार्वजनिक सभेचे चिटणीस चिपळूणकर यांना, सदर व्याख्यानासंबंधीं कलुषित बुद्धीनें विचारलेल्या प्रश्नास तीं व्याख्यानें राजद्रोहीं स्वरूपाचीं नव्हती, असा इतर पुरावा दाखवून, लेखी व तोंडीं जबाब देण्याची पाळी आली.

रखमाबाईचें प्रकरण, त्यावरून उपस्थित झालेला वाद, यांची समाप्ति होण्यापूर्वींच सरकारनें मलबारीचीं टिपणें निकालांत काढलीं होतीं. १८८५-८६ सालांत त्या टिपणांच्या प्रति सर्व प्रांतिक सरकाराकडे, त्याजकडून विशिष्ट अधिकाऱ्याकडे आणि वजनदार पुढाऱ्यांकडे

गेल्या. युरोपियन व हिंदी अधिकाऱ्यांनीं आणि पुढाऱ्यांनीं आपलीं मतें सरकारांत रवाना केलीं, याखेरीज निरनिराळ्या ठिकाणीं भरलेल्या दोन्ही बाजूंच्या सभांतील ठराव आणि अर्जे सरकारांत रुजू झाले आणि वरिष्ठ सरकारानें दोन्हीकडचीं मतें तराजूंत घालून विरुद्ध बाजूस बहुमत दिल्यामुळें या बाबतींत आपल्याला कांहीं करतां येत नाहीं, अशा अर्थाचें पत्रक प्रसिद्ध करून सुधारणापक्षाला निराशेच्या खाड्यांत ढकलून दिलें. मलबारींनीं आपल्या टिपणांचा सर्वत्र पुरस्कार व्हावा, म्हणून अतिशय परिश्रम घेतले होते; जितके आक्षेप निघतील तेवढ्या सर्वांना यथोचित व समर्पक उत्तरें देण्यांत त्यांनीं बिल्कूल कसूर होऊं दिली नाहीं. त्याचे मित्र दयाराम गिडूमल यांनीं या उत्तरांचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. ते पाहिल्यास मलबारींचें चातुर्य, दक्षता आणि स्वीकृत कार्याबद्दलची कळकळ, हे गुण दिसून येतात. समाजांतले दोष चव्हाट्यावर आणणाऱ्या वृत्तपत्रांतून देशांत घडणाऱ्या सामाजिक जुलूमजबरदस्तीचीं उदाहरणें त्यांनीं गोळा केलीं, कोणी आंकडेशास्त्राच्या आधारावर खंडनाला उभा राहिल्यास आंकडेशास्त्राच्याच बळानें त्याचे दांत त्याच्या घशांत घालण्याचा मलबारींनीं यत्न केला. सारांश जशा स्वरूपाचे आक्षेप असतील, तशा स्वरूपाचा जबाब देण्याला त्यांनीं केव्हांही विलंब लावला नाहीं. समाजसुधारणेबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्या वृत्तपत्रांनीं सामाजिक व्यवहारावर बारीक नजर ठेवून जितकी घाण उपसतां येईल, तितकी उपसून तिच्या दर्शनानें सुधारणेची आवश्यकता जनतेला पटविण्याचा उद्योग चालविला व त्यांची तेवढी मलबारींना फार मदत झाली, परंतु सरकारानें वाटाण्याच्या अक्षता त्यांच्या तोंडावर टाकल्यामुळें सगळा खटाटोप

वाया गेला आणि सुधारकांत जर बावनकशी कर्तव्यनिष्ठा नसती तर आणखी कित्येक वर्षेंपर्यंत सुधारणेच्या चळवळीचें नांवदेखील ऐकूं येण्याचा संभव नव्हता. पण 'पराभवोऽप्युत्सव एव मानिनाम्' या न्यायानें या पराभवांतच भावी यशाचीं बीजें आहेत, असें ओळखून सुधारकांनीं आपला प्रयत्न तसाच कायम ठेवला. 'उदासीनतेपेक्षां प्रतिकार उत्तम' असें एक माधवरावांचें तत्त्व होतें. कायदा करून सुधारणा अंमलांत आणण्याचा अखेरचा डाव हुकला तरी झालेल्या खळवळीनें लोकांत जागृति उद्भवली, हा ल्हानसान फायदा नाहीं, असें माधवराव म्हणूं लागले व त्यांनीं आशेचा प्रदीप जळता ठेवला.

इतर पुढाऱ्यांप्रमाणें मुंबई सरकाराकडून मलबारींच्या टिपणांसंबंधीं माधवरावांना मत विचारण्यांत आलें, तेव्हां त्यांनीं कायदा करण्याची गरज आणखी एकदां विशद करून सांगितली. हिंदूसमाजांत आत्म-नियंत्रणाची शक्ति ( self-regulating power ) शिल्लक नाहीं. अशी शक्ति असती तर हल्लींसारखे सामाजिक घोटाळे दृष्टीस पडले नसते. यासाठीं शास्त्राचीं अभेद्य बनलेलीं बंधनें काढून कायद्याचीं बंधनें ( Civil restraints ) निर्माण करावीं. कायद्याचीं बंधनें जशीं काला-नुसार बदलून घेतां येतात, तशीं शास्त्राचीं बंधनें बदलतां येत नाहींत. पुष्कळांचा यावर असा आक्षेप निघतो कीं, कायद्याच्या योगानें नवीन बंधनें उत्पन्न होतील, परंतु हा आक्षेप खरा नाहीं, कारण कायदा नवीन बंधनाकरितां नसून जुनीं बंधनें दूर करण्यासाठीं करा-याचा आहे, अशी प्रस्तावना करून माधवरावांनीं एकंदर सहा बाब-तींत सुधारणा करण्याविषयीं सरकारास सुचविलें आहे. पहिली बाब मुलांमुलींच्या लग्नाची होती. अमूक वयाच्या आंत त्यांचें लग्न करावयाचें

नाहीं, असा सरकारनें कायदा करावा. त्यापूर्वी होणारीं लग्नें मोडण्याकडे सदर कायद्याचा उपयोग होऊं नये, एवढी खबरदारी त्यांत ठेवली जावी. एखाद्या प्रसंगीं असें लग्न मोडण्याला आडकाठी नसावी. मुलांच्या लग्नाची १६ किंवा १८ आणि मुलींच्या लग्नाची १० किंवा १२ याप्रमाणें वयोमर्यादा ठरविण्याबद्दल माधवरावांचें मत होतें. लग्नांत मुलामुलींचें वय कायद्यान्वयें बरोबर होतें कीं नाहीं, हें पहाण्याचें काम लोकलबोर्डें व म्युनिसिपालट्या यांजकडे सोपवावें. लग्नें ठरलीं म्हणजे या संस्थाकडून व्याह्यांनीं परवाने काढावे; मात्र लग्नाची वयोमर्यादा ठरविण्याची जबाबदारी सदर संस्थांकडे नसावी, अशी माधवरावांनीं सुचविलेल्या सुधारणांतली दुसरी बाब आहे. विश्वविद्यापिठांनीं अविवाहित रहाणाऱ्या विद्यार्थ्यांनाच उच्चप्रतीच्या पदव्यांचा मान दिला जाईल, इतरांना दिला जाणार नाहीं, असा नियम जाहीर करावा, अशी माधवरावांच्या सुधारणांतली तिसरी बाब आहे. संभोगसंमतीचें वय १४ ठरविण्यांत यावें व त्याप्रमाणें पीनलकोडांत दुरुस्ती व्हावी; ही चौथी बाब असून ज्यांचें पंचेचाळीस वर्षांवर वय असेल, त्यांनीं अल्पवयस्क कुमारिकांशीं विवाह करूं नये, त्याचप्रमाणें अल्पवयाच्या मुलाशीं त्याच्याहून अधिक वय असणाऱ्या वधूशीं विवाह केला जाऊं नये. यादोन्ही प्रकारच्या विजोड विवाहाबद्दल सरकारनें कायदा करावा, असें माधवरावांच्या सुधारणायोजनांतलें पांचवें कलम आहे. शास्त्रांत एक बायको जीवंत असतांना एखाद्याला दुसरें लग्न करावयाचें झाल्यास कांहीं निर्बंध शास्त्रांत सांगितले आहेत. जीं व्यंगें पहिल्या बायकोंत आढळल्यास दुसरें लग्न करण्याला हिंदु शास्त्र परवानगी देतें, तीं व्यंगें नसल्यास दुसरें लग्न करण्याला

सांप्रत कायद्यानें प्रतिबंध ठेवावा. या बाबतीतल्या शास्त्रांच्या निर्बंधांचें सरकारानें पुनर्ज्जीवन करावें, अशी माधवरावांच्या सुचनेंतली सहावी बाब आहे. अशा रीतीनें त्यांनीं मलबारींच्या पहिल्या टिपणासंबंधीं आपले विचार प्रदर्शित केले.

दुसऱ्या टिपणांत हिंदू स्त्रियांना भोगाव्या लागणाऱ्या सक्तीच्या वैधव्याचीं दुःखें कशीं कमी करतां येतील, याबद्दलचा ऊहापोह होता. माधवरावांचें या बाबतींत असें मत होतें कीं, निदान पंचवीस वर्षेंपर्यंत बालविधवांचें केशवपन करू नये. त्यांचें त्यांना हिताहित समजूं लागल्यावर वपनविधीला त्या आपखुषीनें सादर झाल्यास हरकत नाहीं. पण त्यांच्यावर जो जुलूम केला जातो, तो पंचवीस वर्षांची अट ठेवल्यास टळेल. बालविधवेला आपल्या परिस्थितीचें पूर्ण ज्ञान असतें कीं नाहीं, याची चौकशी स्वतंत्र बिनसरकारी गृहस्थांनीं करावी, म्हणजे तिच्या दुःखांचा कांहीं तरी प्रतिकार होईल. हिंदू बालविधवेची स्थिति अत्यंत शोचनीय व अनुकंपनीय असते. प्रत्येक सुसंघटित समाजाला हिंदू विधवेसारखी दुःस्थिति राहूं देणें लांछनास्पदच वाटेल. हिंदुसमाजानें विधवांची गांजणूक हजारों वर्षांपासून मांडली आहे व हा एक त्या समाजाला लागलेला काळिमा आहे, असा माधवरावांनीं विधवांच्या स्थितीविषयीं आपलें हृद्गत व्यक्त करणारा आणखी जळजळीत मजकूर घातला होता.

मलबारींच्या टिपणांबद्दल सरकारानें मागविलेलीं मतें मिळवून माधवरावांनीं सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत १८८६ व १८८७ या वर्षीं दोन लेख लिहिले आहेत. त्यांत सर्व मतांचा सारांश आहे. कोण-त्याही प्रश्नाच्या सांगोपांग अध्ययनाला नाना मतांचा संग्रह अत्यंत

उपयोगी असतो, त्यावरून स्वतंत्रपणें निष्कर्ष काढण्याची पात्रता अंगीं येते, हें तत्त्व माधवरावांच्या बुद्धींत ठसलेलें असल्यामुळें स्वतःच्या ज्ञानासाठीं व लोकांच्या हितासाठीं, त्यांनीं हीं मतें जमविण्याची यातायात केली.

यासालचीं पुणें व अहंमदनगर येथील दोन धर्मपर व्याख्यानें श्री. रमाबाईंनीं प्रसिद्ध केलेल्या संग्रह-पुस्तकांत आलेलीं आहेत. अहंमदनगरच्या प्रार्थनासमाजाचें मंदिर बांधून तयार झाल्यावर प्रवेश-समारंभ माधवरावांच्या नेतृत्वाखालीं साजरा करण्यांत आला. या प्रसंगीं त्यांनीं प्रार्थनासमाजाच्या आवश्यकतेसंबंधीं भाषण केलें. त्यांत 'अनुकरणाचा' आक्षेप खोडून काढला आहे. 'प्रचारांत असलेल्या व्यवस्थेंत विशेष न्यूनता दिसून तिजमुळें चित्तास शांति प्राप्त होईनाशी झाली म्हणजे नवीन पंथाची स्थापना होत असते' असें त्यांनीं प्रार्थनासमाजाचें कारण सांगितलें आहे. (धर्मपर व्याख्यानें पृ. २०१) शेवटीं उतावळेपणाचा जो दोष अंगीं लावण्यांत येत असतो, तो अगदीं खोटा कसा, याचेंही विवरण आहे. वामन शिवराम आपटे यांनीं आपल्या व्याख्यानांत सुधारकांना 'आगगाडी-सुधारक' असा एक टोमणा मारला होता. त्याबद्दल माधवराव म्हणतात:—*

आम्ही उलट प्रकारच्या दोषांस मात्र पात्र आहों! तो दोष हा कीं, आम्हीं कांहीं केल्या जागचे म्हणून हालतच नाहीं! तोंडानें मात्र बोलतों; पण हातून तशी कृति मुळींच होत नाहीं.... घाई करून फार पुढें जाण्याची मुळींच भीति नको! कारण, आपण सर्वच लोक असे मह आहोंत कीं, कोणतीही गोष्ट अमर्याद वेगानें होण्याची भीति नको! उलट आमच्यामध्यें जी शिथिलता आहे, तिला घालविण्याचा प्रयत्न फार मोठ्या प्रमाणानें व्हावयास पाहिजे,

* न्या. मू. रानडे यांचीं धर्मपर व्याख्यानें पृ. २५४

दुसरें व्याख्यान पुण्याला मित्रमेळ्यांच्या समारंभानिमित्त त्यांनीं दिलें. तें माधवरावांच्या धर्मविषयक चौकसपणाचें निदर्शक आहे. माधवरावांनीं केवळ लूथरनें घडवून आणलेल्या युरोपांतल्या धर्मक्रांतीचे इतिहास वाचले नव्हते. इंग्लंडांत जो धर्मविचार चालू होता, त्याकडेही त्यांचें लक्ष होतें. यावर्षी रे. व्हायसे नांवाच्या एका मिशनऱ्यानें मतांतर करून पूर्वी स्वीकारलेला एक ख्रिस्ती पंथ सोडून दिला. त्यासंबंधीं त्याचा एक लेख फॉर्टनाइटली रिव्ह्यू नांवाच्या इंग्रजी नियतकालिकांत प्रसिद्ध झाला होता. तो वाचल्यानंतर सुचलेले विचार माधवरावांनीं या प्रसंगीं मांडले. माधवरावांच्या प्रत्येक व्याख्यानांत कांहीं तरी विशेष नवीनपणा असतो, अशी सर्वांची खात्री झाली असल्यानें, त्यांचीं मतें आवडोत, न आवडोत, त्यांचें भाषण चुकवायचें नाहीं, असा निर्धार पुण्यांत पुष्कळ आबालवृद्धांमध्यें उत्पन्न झाला होता. त्यायोगानें त्यांच्या व्याख्यानाला श्रोत्यांच्या गर्दीची उणीव कधीच भासत नसे. याही प्रसंगीं श्रोत्यांचा खूप समुदाय लोटला होता. त्यांत होतकरू विद्वानांचा भरणा पाहून प्रारंभीं माधवरावांनीं आनंद व्यक्त केला आणि नंतर आपल्या विचारांचें भांडार उघडलें. ख्रिस्तीधर्म आणि हिंदूधर्म यांतला भेद प्रस्तुत भाषणांत माधवरावांनीं उत्तम प्रकारें दाखविला आहे. हिंदुधर्माची वाढ अमर्याद असून इतर धर्मांच्या विचारवृद्धीला मर्यादा आहे, या मुख्य भेदाचें उद्घाटन झाल्यावर प्रार्थनासमाजाच्या तत्त्वांना हिंदूधर्माच्या वाढत्या विस्तारांत कशी जागा आहे, हें पटविण्यासाठीं ते म्हणाले*:—

आमच्या सर्व नव्या दिसणाऱ्या विचारांस आमच्या धर्मांत स्थान आहे. दुसरी संतोषाची गोष्ट अशी आहे कीं, जातिभेद मानणें, मूर्तिपूजा करणें, स्पर्शा-

---

* न्या. मू. रानडे यांचीं धर्मपर व्याख्यानें पृ. २५८

स्पर्शाचा बाजार घालणें, अशांपैकीं कोणतीही गोष्ट खऱ्या हिंदुत्वास आवश्यक नाहीं.

हीं दोन्हीं भाषणें आत्मसंरक्षणाच्या धोरणाचीं आहेत. चढाईच्या थाटाचें भाषण करण्याची संधि त्यास वर्षाअखेर मिळाली. सुधारणेच्या कांहीं तत्त्वांची अंमलबजावणी यावर्षी आपोआपच दुसऱ्या एका राजकीय कारणामुळें झाली होती. महाराणी व्हिक्टोरिया यांच्या गद्दीनशीनीचीं पन्नास वर्षें यासालीं पूर्ण होत असल्यामुळें त्याच्या आनंदाप्रीत्यर्थ साऱ्या ब्रिटिशसाम्राज्यांत उत्सव करण्यांत आले. इंग्लंडांत तर महोत्सव झाला. या भाग्यशालिनी सम्राज्ञीचें प्रत्यक्ष दर्शन घेण्याकरितां हिंदुस्थानांतले राजेराजवाडे विलायतेस गेले आणि सामाजिक सुधारणेंतील देशांतरगमनाच्या तत्त्वाची अमंलबजावणी आपोआप झाली. हे राजे परत आल्यानंतर त्यांच्या राज्यांतील शास्त्रज्ञ प्रजेनें त्यांना प्रायश्चित्त देण्याचा अट्टाहास धरला नाहीं. प्रायश्चित्ताचा उच्चार करण्याची जेथें चोरी तेथें बहिष्कार पुकारण्याची गोष्ट मनांतदेखील आणण्याचें कारण नव्हतें. सदर राजे आपल्या राज्यांत आले व त्यांच्याकडचीं ब्राह्मणभोजनें, सण, कुलधर्म वगैरे व्यवहार पूर्वक्रमानुसार यथासांग पार पडूं लागले. माधवरावांच्या नजरेंतून ही परिस्थिति सुटली नाहीं. त्यांनीं डिसेंबरांत ( १८८७ ) प्रार्थनासमाजामध्यें भाषण करतांना याच गोष्टीचा प्रामुख्यानें उल्लेख केला आहे. ते म्हणाले:—

यंदाचें वर्ष अनेक दृष्टींनीं संस्मरणीय झालें आहे. पहिली व महत्त्वाची बाब म्हणजे आमच्या संस्थानिकांचें जुबिलीनिमित्त विलायतेस जाऊन येणें, ही होय. एका शिकलेल्या हिंदी तरुणाला ख्रिस्तीधर्मांतून परत हिंदू धर्मांत घेतलें, ही या वर्षांतली दुसरी महत्त्वाची गोष्ट आहे. या पतितपरावर्तनाच्या कारभारांत चांगल्या विद्वान् राजकारणी पुढाऱ्यांनीं भाग घेतला, हें त्यांतल्या त्यांत लक्षांत

ठेवण्यासारखें आहे. जुबिलीच्या उत्सवांत गोवध न करण्याचा निश्चय मुसलमानांनीं पाळला, या गोष्टीचें महत्त्व थोडेंथोडकें समजूं नका. मुसलमानांनीं परधर्मसहिष्णुतेचा हा एक धडाच घालून दिला आहे. यंदा गोरक्षणाची चळवळ विशेष नेटाला लागली. तिच्यांत पारशी गृहस्थांनीं भाग घेतला. मुसलमान- देखील प्रतिकूळ दिसत नाहींत. अशा अनेक कारणांनीं हें वर्ष संस्मरणीय झालें.

आमचे प्रतिपक्षी आमच्या मार्गाबद्दल सदैव गाऱ्हाणें गात असतात. यासाठीं त्यांचीं सर्व मासिकें, वृत्तपत्रें, मी काळजीनें वाचलीं. पण मला त्यांच्या लिहिण्यांत एकही मार्ग दिसला नाहीं. म्हणून असेंच म्हणावें लागतें कीं, सुधारकांनीं ठरविलेला मार्गच निर्दोष आहे. ज्यांना सुधारणा मान्य असून मार्ग पसंत नाहींत, पण जे मार्ग दाखवीत नाहींत, त्यांच्या म्हणण्याचा अर्थ मी इतकाच समजतों कीं, बाह्योपाधींनीं आपोआप आपणांस नकळत जी सुधारणा होईल, ती योग्य सुधारणा; वेळ येईल तशी जाणूनबुजून सुधारणा करणें, हा सदोष मार्ग. असा अर्थ असेल तर बुद्धिपुरस्सर सुधारणा करणें, याला मी श्रेष्ठ समजतों. कारण बुद्धिपुरस्सर प्रयत्न केल्यावांचून स्वोन्नति होत नाहीं.

जो देश प्रचंड सामाजिक क्रांत्यामधून पूर्वीं अनेकदां पार पडला, ज्यानें आजपर्यंत एकंदर पांच धर्मांना जन्म दिला, त्याची सुधारणा परिवर्तनाच्या अतिशय अनुकूल काळांत अडवून धरतां येईल, ही कल्पना वेडेपणाची आहे व विचारी माणसें तिला आपल्या अंतःकरणांत कदापि थारा देणार नाहींत.

या प्रमाणें १८८७ साल संपलें. त्या वर्षाच्या डिसेंबर अखेरीस माधवराव मद्रासला गेले होते. कांग्रेस हें एक कारण होतेंच, पण कांग्रेसला जोडून सामाजिक परिषद् चालू करण्याचा इरादा सिद्धीस नेणें, हा एक मद्रासला जाण्याचा त्यांचा हेतु होता. १८८५ सालीं नुसत्या व्याख्यानावरच परिषदेचें काम आटोपलें. १८८६ सालीं या बाबतींत हालचाल झाली नाहीं. या सालीं मात्र सामाजिक चळवळीला संघटित स्वरूप देण्याचा त्यांचा बेत तडीस गेला व त्या वर्षापासून

पुढच्या काळांत त्यांनीं हें काम इतक्या आस्थेनें, धडाडीनें आमरण चालविलें कीं, त्याला हिंदुस्थानाच्या अर्वाचीन इतिहासांत दुसरी जोड सांपडत नाहीं.

१८८८ सालांतल्या महत्त्वाच्या गोष्टी थोड्याच आहेत. या वर्षी मे महिन्यांत माधवराव नाशिक जिल्ह्यांत गेले होते. तेथें येवल्याच्या आर्यसमाजांत त्यांचें एक भाषण झालें. भाषण—समारंभासाठीं येवलेकरांनीं अतिशय थाटाचा बंदोबस्त केला होता. भाषणासाठीं विस्तीर्ण मंडप उभारून त्याला लतापताकांच्या आभरणांनीं नटविलें होतें. या भाषणाचा गोषवारा इंदुप्रकाशाकडे पाठविणाऱ्या येवल्याच्या बातमीदारांनीं 'माधवरावांचें भाषण शांत, गंभीर, सुश्राव्य आणि हृदयंगम' झालें, असें लिहिलें आहे. त्या भाषणाचा सारांश पुढील प्रमाणें:—

आर्य म्हणजे संस्कार पावलेले जन, असंस्कृत म्हणजे अनार्य. आर्यसमाज हें एक विचारवृद्धीचें स्थळ आहे. तें सर्वांनीं साजरें झालेलें असावें, त्यावांचून विचारवर्धन, ज्ञानवर्धन होत नाहीं. समाजांत जसजसे ज्ञाते, विचारी, संस्कृत लोक असतात, तसतसा त्यांचा उपयोग जास्त होतो. मनाची स्वच्छता, प्रसन्नता, पवित्रता, संस्कारांवांचून होत नाहीं. ती होण्यास अवलोकन सुसंगति हीं लागतात. कोणतीही सुधारणा समाजसुधारणेखेरीज होणार नाहीं.

याच महिन्यांत क्रॉफर्डसाहेबाविरुद्ध सरकारांत तक्रारी जाऊन सगळ्या प्रांताचें लक्ष वेधून घेणारें नवें प्रकरण माजलें व सामान्य जनतेला हा एक धामधुमीचा नवीन विषय मिळाला. ज्येष्ठ महिन्यांत धार्मिक श्रद्धेच्या अतिरेकाचा एक नमुना लोकांना अनुभवायला सांपडला. ज्येष्ठच्या दशमीपासून अमावास्येपर्यंत बहीणभावंडांनीं एकमेकांस भेटावें, न भेटल्यास पुढें तीन वर्षें भेटू नये, मध्यंतरी भेटल्यास दोहों-

पैकी एकास मरणाचें भय आहे, अशा अर्थाची एक हूल उठली. या हुलीनें कांहीं दिवस कुणबी, माळी महार, इत्यादि वर्गांतल्या लोकांच्या तोंडाचें पाणी पळविलें होतें. ज्येष्ठ महिना उलटल्यानंतर या हुलीची खळबळ शांत झाली.

सप्टेंबरांत पुण्याला गोरक्षणकार्याचा उपक्रम होऊन आनंदोद्भव नाटकगृहांत त्यासंबंधीं एक सभा झाली. माधवराव या सभेला हजर होते, व त्यांचें गोरक्षणाबद्दल भाषण झालें. मागल्या वर्षीं पारशी व मुसल्मान समाजानें या कार्याला हातभार लावण्याचें श्रेय संपादन केलें होतें. त्याचा उल्लेख मागें एका उताऱ्यांत आला आहे. त्याची पुनः एकदां वाच्यता करून माधवराव म्हणाले कीं, गोरक्षणाच्या कार्यांत हिंदू, पारशी व मुसल्मान, या तीन वर्णांची एकी झाली आहे. चौथा वर्ण इंग्रजांचा. तो या एकींत 'कालेंकरून' आल्याशिवाय रहाणार नाहीं. मात्र ही एकी मजबूत व टिकाऊ व्हावयास पाहिजे, असा त्यांनीं आपल्या भाषणांत इशारा देऊन ठेवला.

माधवरावांवर पडलेल्या मित्रविरहाच्या चार घाल्यांचें वर्णन पूर्वी सविस्तर आलेलें आहे. यावर्षीं आक्टोबरांत त्यांच्यावर कुंट्यांच्या मरणाचा आघात झाला. कुंटे व माधवराव यांचा लहानपणापासून स्नेह. कोल्हापुरच्या प्राथमिक शाळेंपासून ते सहाध्यायी. मुंबईस त्यांचें सहाध्यायित्व कायम राहिलें. विद्यार्जनानंतरच्या काळांत प्रथम कांहीं वर्षें त्यांना एकमेकांपासून दूर रहावें लागलें. पण पुण्यास पुनश्च त्यांना परस्परांच्या सहवासाचा लाभ कित्येक वर्षें घेतां आला. मधून मधून कांहीं बाबतींत दोघांचा मतभेद झाला तरी मूळच्या मैत्रीचा धागा तुटला नाहीं. मतभेदाचें वारें आलें म्हणजे बरवर विरोधाचे

तरंग उठत, परंतु त्यामुळें मैत्रीच्या भावनेला धक्का पोंचत नसे. ज्या बाबतींत मतभेद झाला असेल तेवढी बाब सोडून बाकीच्या सगळ्या चळवळींत त्यांचा एकोपा दिसून येई. प्रार्थनासमाजाच्या आणि दयानंद स्वामींच्या कार्यांत कुंटे माधवरावांच्या खांद्याला खांदा भिडवून काम करीत होते. १८८१ सालीं बालविवाहप्रतिबंधाची संस्था स्थापन करून त्याबद्दल शपथपत्रावर सह्या घेण्याच्या कामांत कुंटेच पुढारी होते. पुढेंही माधवरावांच्या कार्यांना मतभेद नसेल तेव्हां मदत करण्याला कुंटयांनीं कधीं माघार घेतली नाहीं. माधवराव आणि कुंटे या पुण्याच्या दोन महाकाळी तोफा आहेत व त्यांच्या समोर टिकाव लागणें फार कठीण, असे पुण्यावर स्वारी करून येणाऱ्या मिशनरी इंग्रजांनीं अनेकदां उद्गार काढले होते. एखादा युरोपियन डाळ न शिजतां परत गेला म्हणजे आपल्यामध्यें अशी धुरंधर जोडी असल्याबद्दल पुणेंकरांना व पर्यायानें सगळ्या महाराष्ट्रियांना साभिमान धन्यता वाटे. कुंटे माधवरावांसारखेच विद्वान् होते. शिवाय त्यांच्या स्वभावांत तल्लखपणाचा मोठा गुण असल्यानें एकदां एखादी गोष्ट करण्याचें मनानें घेतलें कीं, तिच्या सिद्धीसाठीं सर्वस्व वेंचण्याची कुंटयांची तयारी असे. देशांतल्या उद्योग धंद्याला हातभार लावण्याचें मनांत येतांच त्यांनीं पेन्सिलीचा लहानसा कारखाना काढला, हें त्यांच्या तडफदारपणाचें एक उदाहरण आहे. त्यांचें Vicissitudes of Aryan Civilization हें पुस्तक त्यांच्या विद्वत्तेची साक्ष देणारें आहे. असा जुना मदतगार स्नेही मरण पावल्यानें माधवरावांच्या चित्ताला अतिशय क्लेश झाले. कुंटयांच्या आजारांत माधवराव त्यांच्या संनिध होते. प्रस्तुत मित्राच्या मृत्यूनंतर त्यांनीं एका भाषणांत Prophet 'भविष्यद्रष्टा' ही

पदवी त्यांना, त्या शब्दाची विद्वत्ताप्रचुर व्याख्या सांगून, अर्पण केली. कुंटयांचें शव चितेवर ठेवल्यावर त्याचें जें भाषण झालें, त्यांतही माधवरावांच्या खोल विचाराची छटा आढळते. ते म्हणाले:—

कन्या आपल्या सासरपणास जातांना तिचे मातापितरास जसें वाईट वाटतें, वाईट वाटतें म्हणजे ती दुःखांत पडतें म्हणून नव्हे तर तिचा व आपला वियोग होतो म्हणून दुःख वाटतें—तसेंच माधवरावजी कुंटे हे आपले मित्र, बंधु, गुरु वगैरे कोणत्याही निमित्तानें व रूपानें आजपर्यंत आपल्या सहवासाला होते, त्यांचा व आपला आतां वियोग होत आहे, म्हणून आपल्याला अत्यंत दुःख होत आहे. बाकी ते येथल्यापेक्षां चांगल्या लोकीं शाश्वत सुखांत गेले आहेत.

कुंटयांच्या निधनानें माधवरावांना दुःख झालें, परंतु ते विवेकानें आवरून त्यांनीं नव्या कार्याचें चिंतन चालविलें. आक्टोबर महिन्यांत विजयादशमीच्या दिवशीं माधवरावांच्या घरीं शहरांतल्या शेट-सावकारांची बैठक झाली. तेव्हां हिंदूमलशेट या नांवाचे एक प्रख्यात धनिक व्यापारी पुण्यास होते. त्यांच्या मनांत गिरणी काढण्याचा विचार आला. सल्लामसलतीला माधवरावांपेक्षां दुसरा योग्य पुरुष पुण्याला कोण होता ? हिंदूमल यांनीं आपला बेत पक्का करण्यासाठीं विजयादशमीच्या सुमुहूर्तावर माधवरावांच्या घरीं खाजगी स्वरूपाची बैठक भरविली. माधवरावांनीं आपल्या व्यापारविषयक ज्ञानाच्या जोरावर एकंदर व्यवस्थेची रूपरेषा त्यांस काढून दिली आणि त्याप्रमाणें पुढें कार्याला प्रारंभ होऊन आज पुणें स्टेशनानजीक असलेली गिरणी अस्तित्वांत आली.

१८८९ साल पुनः समाजसुधारणेच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. सामाजिक परिषदेच्या संघटनेची सुरुवात झाल्यामुळें परिषदेचे चिटणीस दि. ब. रघुनाथराव आणि माधवराव यांनीं हिंदुस्थानभर सर्वत्र

पत्रें पाठवून ठिकठिकाणीं सुधारणेच्या संस्था काढण्याचा उत्साह लोकांत उत्पन्न केला. परिषदेचे चिटणीस दि. ब. रघुनाथराव होते. परंतु ते केवळ नामधारी होते. माधवरावच बहुतांशीं चिटणिसाचें काम करीत होते. पुण्यास समाजसुधारणेची एक संस्था अस्तित्वांत आलेली होती. तिच्यामार्फत या वर्षी गांवोगांव पत्रें जाऊन सुधारणेच्या शपथा एकंदर ५४९ माणसांनीं घेतल्या होत्या. या प्रसंगीं सदर चळवळींत इनामदार, जहागीरदार आणि दक्षिणचे संस्थानिक भाग घेण्याला तयार झाले. बडोद्याच्या व इंदूरच्या महाराजांनीं या संस्थेच्या आश्रयदात्यांत आपलीं नांवें नोंदविलीं. मिरजेचे श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन यांनीं संस्थेचे अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. या संस्थेमध्यें हिंदूप्रमाणें मुसलमान, यहुदी, ख्रिस्ती वगैरे धर्मांतल्या लोकांनीं प्रवेश करून घेण्याची इच्छा दर्शविल्यामुळें त्यांचाही भरणा करण्यांत आला. मद्यपाननिषेध, मुलींना शिक्षण देणें, हुंड्याची चाल मोडून टाकणें, विधवाविवाहाला संमति असणें, मुलामुलींचे विवाह लहानपणीं न करणें, अशा शपथपत्रिकेंतल्या कांहीं अटी होत्या. त्या अटीखालीं प्रतिज्ञेची सही टाकण्याला पहिल्या वर्षीच पांचशें इसम सिद्ध झाले, ही प्रगति थोडी नव्हती.

पण या वर्षांतली विशेष खळबळ उडवून देणारी गोष्ट निराळीच आहे. दयाराम गिडूमल यांनीं संभोगसंमतीचें वय कायद्यांत दहा वर्षांचें होतें, तें बारा वर्षांचें करावें, अशा अर्थाचें एक लहानसें पत्रक प्रसिद्ध केलें. इंडियन पिनल कोडांतल्या कांहीं कलमांत हें वय बारा मानलें होतें व बलात्कारासंबंधींच्या कलमांत मात्र वयाची मर्यादा दहा वर्षांची धरली होती. हा पीनल कोडांतला घोटाळा काढून टाकावा, एवढेंच गिडूमल यांनीं

सुचविलें होतें. स्त्रियांवर गुदरणारा अनिष्ट प्रसंग टाळण्याचा हा एक मार्ग होता, व त्यानें कोणत्याही प्रकारचा धर्मावर घाला पडत नव्हता. परंतु कायद्यांत सरकार फेरबदल करणार, या एकाच गोष्टीनें पुराणमताभिमानी समाज संतापला. गिडूमल यांच्या पुस्तकांतल्या मुद्द्यांना जबाब देऊन संमतीचें आहे तेंच वयोमान योग्य आहे, असें आग्रहानें प्रतिपादन करणारें एक पुस्तक टिळकांनीं छापून काढलें व यावेळेपासून त्यांची गणना धर्मसंरक्षकांत होऊं लागली. कायद्याच्या कलमांतली विसंगति काढून टाकणें, यावेळीं सरकारलाही श्रेयस्कर वाटल्यामुळें हा प्रश्न घटाला लागला, परंतु पुढच्या वर्षापर्यंत त्याविषयीं टीकाप्रतिटीकांचा विशेष भडिमार सुरू झाला नाहीं. कारण यावर्षी क्रॉफर्ड प्रकरण पेटलेलें होतें.

क्रॉफर्डप्रकरणांत माधवरावांचें, सार्वजनिक सभेनें जितकी चळवळ केली, तेवढ्या चळवळींत पूर्ण साह्य होतें. सार्वजनिक सभेमार्फत नेहेमींच्या रिवाजास अनुसरून सभा झाल्या, अर्ज लिहिले गेले. साऱ्या महाराष्ट्रांत यासंबंधीं चळवळ उडवून देण्याला पुष्कळ अंशीं माधवरावच कारणीभूत आहेत. मुंबईचे पुढारी आपापल्या परीनें येथें आणि विलायतेस न्याय मिळण्याकरितां खटपट करीत होते. पुण्याच्या पुढाऱ्यांपैकी तरुण मंडळींत टिळकांनीं विशेष श्रम घेतले व त्याबद्दल त्यांना कृतज्ञ मामलेदारांनीं घड्याळाचें पारितोषिक दिलें. क्रॉफर्ड या सिव्हिलियन अधिकाऱ्यावर बेसुमार लांच खाल्ल्याचा मुख्य आरोप होता. लांच देऊन नोकरी मिळविणाऱ्या मामलेदारांच्या साक्षीखेरीज हा आरोप सिद्ध करणें मुष्किलीचें होतें व मामलेदारांना माफी करण्याची सरकारानें हमी घेतल्याशिवाय खऱ्या साक्षी देण्याला ते पुढें येणार

नाहींत, हें सरकारला दिसत होतें. माफीची हमी प्रांतिक सरकारनें घेतली तरी तिला थेट भारतमंत्र्याची अनुमति मिळणें अवश्य होतें. यामुळें क्रॉफर्डसाहेबावरील लांचाचा आरोप सिद्ध करण्यासाठीं साक्षी देणाऱ्या मामलेदारांची माफी, हाच या प्रकरणांतला मुख्य मुद्दा होऊन बसला होता व त्यांच्या बचावाकरितांच महाराष्ट्रांत चळवळ झाली. सदर चळवळींत माधवरावांचा किती संबंध होता, याचा उल्लेख वर आलाच आहे.

१८८८ सालांत मलबारींचे चरित्रकार दयाराम गिडूमल यांनीं ' हिंदुस्थानांतील स्त्रियांची स्थिति ' (Status of woman in India) या नांवाचें एक पुस्तक तयार करण्याचें काम चालविलें होतें. या पुस्तकासाठीं प्रस्तावनेदाखल एक लेख गिडूमल यांनीं माधवरावांकडे लिहून मागितला. माधवरावांनीं ' बालविवाहासंबंधीं शास्त्रवचनें ' ( Shastric texts on the subject of Infant Marriage ) या मथळ्याचा इंग्रजी लेख तयार केला. तो १८८९च्या जानेवारी-एप्रिल अशा त्रैमासिकाच्या जोड अंकांत The Sutra and Smriti Dicta on the subject of Hindu marriage या सदराखालीं प्रसिद्ध झाला आहे. जिज्ञासूंना प्रस्तुत लेख श्री. रमाबाईनीं प्रकाशित केलेल्या संकीर्ण लेखसंग्रहांत पहावयास सांपडेल. हा लेखदेखील माधवरावांच्या विद्वत्तेस साजेसाच आहे. या लेखाच्या सुरुवातीस माधवरावांनीं पूर्वेकडील राष्ट्रांच्या स्थाणुत्वाची कल्पना कशी भ्रामक आहे तें दाखविलें आहे. संस्कृतीची वाढ खुंटली म्हणजे ती स्थिरावते असें मानणें चुकीचें आहे. व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक व्यवहारांत ज्याप्रमाणें वाढ खुंटल्यावर नाशाचीं चिन्हें दिसूं लागतात, त्याचप्रमाणें व्यक्तिसमुदायाचा किंवा राष्ट्राच्या व्यवहारांमध्यें अभिवृद्धीचा ओघ कुंठित

झाल्यावर नाशाचीं बीजें शिरतात, असें सांगून माधवरावांनीं पुढच्या विवरणांत हिंदू विवाहपद्धतीचा इतिहास दिला आहे. विधवाविवाहासंबंधीं लिहितांना जशी त्यांनीं वेद, स्मृति, पुराणें व इतिहास या साधनांच्या आधारानें आपल्या विषयाची माहिती दिली होती तशीच माहिती या लेखांतही दिली आहे. स्मृतिकारांपैकीं ३० जणांनीं १२ वर्षें ही मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा योग्य मानली आहे. आयुर्वेद शास्त्राच्या ग्रंथांतून याच वयोमानाला पाठिंबा दिल्याचें आढळतें. १२व्या वर्षी लग्न आणि १६व्या वर्षी गर्भाधान–संस्कार, असा एकंदर स्मृतिग्रंथांचा निश्चित मथितार्थ समजण्याला हरकत नाहीं. शेवटीं माधवराव म्हणतातः—

अशी आशा आहे कीं, सुधारणेच्या प्रतिकाराची लाट ओसरल्यावर रूढाचारांना उराशीं घट्ट धरून बसल्यानें जुन्या शास्त्रोक्त उज्वल परंपरेची पायमल्ली केली जात आहे, हें लोकांच्या लक्षांत येईल. जुन्या परंपरेस अनुसरून फेरबदल करा, असें सांगण्यांत सुधारकांचा मनोसोक्त क्रांति घडवून आणण्याचा उद्देश नसून धर्माच्या जुनाट वृक्षावर जीं बांडगुळें उत्पन्न झालीं आहेत, तीं कापून काढण्याचा त्यांचा उद्देश आहे, असें लोकांना दिसून येईल.

१८८९ च्या एप्रिलांत माधवरावांचें मुंबईच्या प्रार्थनासमाजांत सामाजिक सुधारणेच्या प्रगतीसंबंधीं एक भाषण झालें. समाजसुधारणेच्या प्रगतीचीं चिन्हें पहाण्याकरितां ते आपली तीव्र व व्यापक दृष्टि किती बारीक गोष्टीपर्यंत पोंचवीत असत, याचा सदर व्याख्यानांत भरपूर पुरावा आहे. वास्तविक देशांतल्या एखाद्या भागांत एक दोघाजणांनीं प्राचीन अवतारी पुरुषांचीं चरित्रें लिहिल्यानें समाजसुधारणेला हातभार लागतो, असें कोणीही समजणार नाहीं. परंतु विद्यमान काळाच्या गतीला उपयोगी पडणारीं पुस्तकें प्रसिद्ध झाल्यास, तीं

समाजसुधारणेचीं द्योतक आहेत, असें माधवरावांनीं या व्याख्यानांत सांगितलें आहे. या वर्षी बंगालमध्यें श्रीकृष्णाचीं दोन चरित्रें प्रसिद्ध झालीं. त्यापैकीं एक ब्राम्होनें लिहिलेलें व दुसरें हिंदूनें लिहिलेलें होतें. श्रीकृष्णाच्या चरित्रानें हिंदुस्थानांत अनीतिवर्धक धर्मपंथांना जन्म देऊन हिंदू समाजाच्या राष्ट्रीय अध:पाताला मदत केली, हें कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं. श्रीकृष्णाच्या नांवावर अनीतीचा प्रचार चालू ठेवणारे कांहीं संप्रदाय गुजराथेंत आहेत. उत्तर हिंदुस्थानांतही राधाकृष्णाच्या भक्तीचें नांव पुढें करून दुराचार वाढविणारे कित्येक पंथ शेकडो वर्षांपासून अस्तित्वांत आहेत. ज्या ईश्वराताराकडे या पंथांतल्या भ्रष्टाकाराचा दोष जातो, त्याच्या चरित्रांत खरोखरींच दूषणीय अंश कितपत आहे, याचा शोध करून लोकांच्या डोळ्यांत अंजन घालण्याकरितांच हीं चरित्रें लिहिलीं गेलीं असल्यानें समाजसुधारणा हाच त्यांचा प्रधान हेतु ठरतो व म्हणूनच माधवरावांनीं त्यांचा निर्देश आपल्या भाषणांत केला. त्यांच्या भाषणांतला आणखी कांहीं भाग पुढें दिल्याप्रमाणें आहे:—

मद्रासकडे दि. ब. रघुनाथराव आणि सर टी. माधवराव यांनीं व्यक्तिश: दहादहा हजारांची देणगी देऊन व एकंदर लाख रुपये गोळा करून हिंदूधर्माचें ज्ञान विद्यार्थीवर्गाला मिळण्याकरितां एक पाठशाळा स्थापन केली, हें एक धर्म जागृतीचेंच चिन्ह आहे. उत्तर हिंदुस्थानांत श्रीमत् स्वामी यांनीं गोरक्षणाची चळवळ उडवून दिली आहे. श्रीमत् स्वामी हे बापट आडनांवाचे कोणी दक्षिणी गृहस्थ आहेत. पंजाबांत आर्यसमाजानें दयानंद सरस्वती कॉलेज काढलें आहे. त्यांत कित्येक सुशिक्षित लोक धनप्राप्तीच्या आशेवर पाणी सोडून शिकविण्याचें काम करीत आहेत. राजपुतान्यांतल्या सरदार लोकांनीं अजमीर येथें जमून आपल्या लग्नांतल्या अपायकारक चालींत सुधारणा करण्याबद्दल

आपणांस बांधून घेतलें आहे. अहमदाबादेस बालविवाहनिषेधक मंडळी उत्पन्न झाली आहे. आमच्या प्रांतांत तशी कांहीं हालचाल दिसत नाहीं हें खरें, पण कांहीं विवक्षित जातींनीं उपाध्येपण वंशपरंपरेच्या ब्राह्मणाकडे न ठेवतां आपल्या जातींतून उपाध्ये तयार करण्यास आरंभ केला आहे. एकंदरींत निराश होण्याचें कारण नाहीं.

या उताऱ्याचा विचार करूं लागलें कीं, ब्राह्मणेतरांच्या चळवळींतल्या एका गोष्टींसंबंधीं माधवरावांचें हृद्गत समजतें. उत्तरहिंदुस्थानांत गोरक्षणाचें कार्य करणाऱ्या श्रीमत् स्वमींची मूळ पिठिका माधवरावांनीं मिळविली म्हणून हे स्वामी महाराष्ट्रिय होते, एवढा तरी सुगावा लागतो. अहमदाबादच्या बालविवाहनिषेधक मंडळीच्या उत्पत्तीचें श्रेय माधवरावांचें आहे, याबद्दल १८८९ सालच्या सामाजिक परिषदेचा अहवाल पाहिल्यास खात्री पटते. वरच्याप्रमाणें समाजसुधारणेच्या प्रगतीचा वृत्तांत सांगून 'धर्म आणि भौतिक शास्त्रें' याविषयीं माधवरावांनीं कांहीं विचार प्रकट केले. ते असे:—

हा लढा आजकालचा नसून हजारों वर्षांचा आहे. त्यांत कितीकांनीं मनोविकारास प्राधान्य देऊन विचारशक्तीस हरताळ लावला. कितीकांनीं विचारशक्तीस प्राधान्य देऊन मनोविकारांचें प्राबल्य आंखडलें आहे. या दोहोंपैकीं कोणत्याही एका मार्गाचें अनुकरण करून समाजाचें चालावयाचें नाहीं. भौतिक शास्त्रांचें अनुकरण केल्यास जगांत न्याय, परोपकारबुद्धि, दुर्बलांचें रक्षण, इत्यादि गोष्टींचा ऱ्हास होईल, म्हणजे कुटुंब, समाज, राज्य, ही व्यवस्था ज्या कारणाकरितां केलेली दिसते—म्हणजे दुर्बलांचें रक्षण—तें कार्य होणार नाहीं. त्याचप्रमाणें निवळ धर्माच्या सिद्धांताची कांस धरल्यानेंही समाजाचा निभाव लागणें कठिण म्हणून दोन्ही पक्षामध्यें तोड काढली पाहिजे.

या वर्षाच्या डिसेंबर महिन्यांत मुंबईला कांग्रेसची बैठक झाली. या बैठकीला विलायतचे विख्यात पुढारी चार्लस ब्रॅडला हे आले अस-

त्यामुळें तिच्यांत उत्साह विशेषच दिसून आला.लोकांच्या नैसर्गिक आव-डीमुळें या राजकारणाच्या संस्थेचा जोम प्रतिवर्षी वाढत होता व तितक्या मानानें सामाजिक सुधारणेकडे जनतेचे लक्ष कमी होत चाललें होतें-या कार्याची राजकारणाइतकीच आवड उत्पन्न करण्यासाठीं माधव-रावांचा उद्योग चालला होता. प्रथम सामाजिकपरिषद् यावर्षी मुंबईला भरेल कीं नाहीं, याचीच खात्री वाटत नव्हती. पण माधवराव आणि त्यांचे कांहीं मित्र यांनीं अतिशय खटपट करून ऐनवेळीं परिषदेची व्यवस्था जमवून आणली. अगोदरपासून रीतसर पत्रव्यवहारादि कामें चालू होतीं, पण माधवरावांनीं मुंबईस ठाणें देऊन निकड व उठावणी केली नसती तर सामाजिक परिषदेची बैठक यथातथाच पार पाड-ण्याचा संभव होता. याप्रसंगीं परिषदेचे सगळे ठराव माधवरावांनींच लिहून काढले, नंतर ते अनेक मित्रांना दाखविले. पसंत झाल्यावर त्यांची परिषदेपुढें मांडणी झाली. संमतिवय आणि सामाजिक संस्थाचा कायदा, हे दोनच ठराव वादग्रस्त होते. हे दोन्ही ठराव माधवरावांनींच परिषदेपुढें ठेविले व त्यांनींच त्यांचें समर्थन केलें. सामाजिक संस्था सरकारांत रजिष्टर करतांना कंपनीच्या कायद्यांतलीं बरींच कलमें त्यांस नडत असत. यासाठीं अशा संस्थापुरता नवा कायदा किंवा कंप-नीच्या कायद्यांत अनुकूल फेरफार करवून घेणें, हा या ठरावाचा उद्देश होता. माधवरावांनीं आपल्या भाषणांत फेरफार सुचविले आहेत. परंतु आगखी कांहीं दिवस यासंबंधीं विचार करण्याची सवड जन-तेला मिळावी, असा मुद्दा परिषदेंत काढला गेल्यामुळें माधवरावांनीं ठराव मागें घेतला. संमतिवयावर बोलतांना त्यांनीं दयाराम गिडूमल व टिळक या दोघांच्या पुस्तकांचा उल्लेख करून आपलें मत निराळ्या

ठराव आले, यामुळें स्वावलंबनाच्या पुरस्कर्त्यांची फसवणूक झाली, असें टिळकांच्या पत्रांत अनेक आक्षेप होते. हे आक्षेप एकमेकांशीं ताडून पाहिल्यास एका आक्षेपाचें उत्तर दुसऱ्या आक्षेपांत आहे, असें समजण्याला उशीर लागत नाहीं. माधवरावांनीं या सर्व आक्षेपांस सविस्तर उत्तरें दिलेलीं असून शेवटच्या फसवणुकीच्या आरोपाचें खंडन खुलासेवार केलें आहे. सामाजिक सुधारणेच्या पुण्यांतील संस्थेनें स्वावलंबन, हा आपला मार्ग ठरविला होता, पण परिषदेच्या चिटणिसांनीं हिंदुस्थानांतल्या एकंदर ३२ संस्थांना पत्रें लिहून त्यांचीं मतें मागविलीं होतीं. बाकीच्या सर्व संस्थांनीं सरकारी कायदा होणें अवश्य आहे, असें आपलें मत कळविल्यामुळें सरकारी कायद्याचा ठराव परिषदेपुढें मांडावा लागला. पुण्याच्या एका संस्थेनें सगळ्या संस्थांवर आपल्या हेतूची अरेरावी गाजविणें उचित ठरलें नसतें, पुण्याच्या संस्थेंतील कांहीं मंडळींना आपण म्हणजेच सारें हिंदुस्थान असा भ्रम झाल्यामुळें त्यांनीं फसवणुकीचा आरोप परिषदेच्या चालकांवर लादला आहे. परिषदेच्या चालकांनीं त्यांची वंचना केली नसून त्यांच्या समजुतीच्या घोटाळ्यानें त्यांना तोंडघशीं पाडलें, असा माधवरावांचा खुलासा आहे. टिळकांनीं पुढें हा वाद गॅझेटांतून चालविण्याचें सोडलें व आपल्या इंग्रजी मराठी साप्ताहिकांतून सुधारक पक्षावर वाक्प्रहार सुरू ठेवला. यावेळीं पुण्याला केसरीच्या तोडीचें दुसरें एक वृत्तपत्र अस्तित्वांत असल्यामुळें संमतिवयासंबंधीं हमरीतुमरी अतिशय निकरानें झडूं लागली. हें वृत्तपत्र दुसरें कोणतेंही नसून आगरकरांनीं १८८८ च्या विजयादशमीला काढलेलें 'सुधारक' हें होय. केसरीला महाराष्ट्रांतील वृत्तपत्रांमध्यें अग्रपूजेचा मान मिळवून देण्याचें श्रेय बहुतांशीं आगर-

करांचें असल्यामुळें त्यांनीं नवें पत्र काढतांच त्याचाही लोक आदर करूं लागले. सामाजिक परिषदेबद्दल केसरींतून केल्या जाणाऱ्या टीकेला माधवरावांनीं उत्तर दिलें नाहीं. केसरीचा समाचार परभारें आगरकरांचा 'सुधारक' घेत होता.

सदर वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यांत मुंबईला समाज सुधारणेच्या एका हेतूचें समर्थन करणारी एक नवीन चळवळ उदयास आली. जोतीराव गोविंदराव फुले यांनीं स्वमतप्रसारार्थ काढलेल्या 'दीनबंधू' पत्रांतून ब्राह्मण विधवांच्या केशवपनाबद्दल एक लेखमाला सुरू झाली. नापितांचा वर्ग निष्कारण विधवांचे शाप आपल्या शिरावर घेत असतो, केशवपनाच्या पापाचरणापासून त्यांना किफायत होते म्हणावी तर तसाही भाग नाहीं, असे बरेच लेख दीनबंधूनें प्रसिद्ध केले. दीनबंधूच्या संपादकांनीं नापितांना समक्ष उपदेश करून याबाबतींत त्यांचीं मनें वळविलीं. दीनबंधूला त्याच्या दोघा व्यवसायबांधवांनीं (इंदुप्रकाश व सुबोध पत्रिका) प्रोत्साहन दिलें. इंदुप्रकाशांतून एका गृहस्थानें 'वपनाच्या जबरदस्तीबद्दल कोणी विधवा फौजदारींत फिर्याद नेण्याला तयार असल्यास त्या कामीं लागेल तितकें द्रव्य खर्चायला आपण तयार आहों' अशा अर्थाची जाहीरात प्रसिद्ध केली. विधवांनीं हा जुलूम टाळण्याकरितां फौजदारी कोर्टांत धाव घ्यावी, असेंही इंदुप्रकाशाचें मत यावेळीं बाहेर आलें. अखेरीस न्हाव्यांची १४ एप्रिल रोजीं एलफिन्स्टन हायस्कूलनजीक कँपाचे मैदानांत मोठी सभा भरली. ४००|५०० न्हावी जमले होते. आर्यसमाजाच्या व प्रार्थनासमाजाच्या कांहीं पुढाऱ्यांचीं भाषणें झालीं. कित्येक न्हाव्यांनीं आपले विचार प्रदर्शित केले. एक वृद्ध न्हावीबोवा म्हणाले कीं, शास्त्राला मान्य नसलेलें पापकर्म

ब्राह्मण चार पांच आण्याच्या प्राप्तीसाठीं आपल्याला करायला लावतात आणि आपण मात्र आठदहा रुपये उपटतात. सभेंत विधवांचें वपन करूं नये, अशा अर्थाचे ठराव पास झाले. यापूर्वी न्हाव्यांच्या आपापल्या वस्तींत तीन चार सभा भरल्या होत्या. त्यांच्यावर या सभेनें कळस चढविला; न्हाव्यांच्या सभेची बातमी इंग्लंडला पोचल्यावर तेथील कांहीं स्त्रियांनीं न्हाव्यांना हें सदयतेचें कार्य हातीं घेतल्याबद्दल एक अभिनंदनपर पत्र पाठविलें. न्हाव्यांनीं उलट बांबे गॅझेटांत एक आभारप्रदर्शनाचें पत्र लिहून आपला निश्चय तडीस नेण्याला विलायतच्या स्त्रियांनीं मदत करावी, अशी विनंती त्यांस केली. १८९० च्या सामाजिक परिषदेच्या बैठकींत ही न्हाव्यांच्या सभांची माहिती मुंबईकर सुधारकांनीं कळविल्यामुळें, तिचा परिषदेच्या अहवालांत समावेश करण्यांत आला. परंतु सभा आणि ठराव या पलीकडे सदर चळवळीची मजल गेली नाहीं, असें नंतरच्या अनुभवावरून म्हणावें लागतें.

या वर्षाच्या मे महिन्यांत वसंत–व्याख्यान–मालेवर सामाजिक सुधारणेच्या वादाची छाया पडून ती साफ कोमेजण्याची वेळ आली होती. पण माधवरावांनीं स्वतः अनेक गृहस्थांना व्याख्यानें देण्याविषयीं विनविल्यामुळें मालेचें कार्य दरसालप्रमाणें सुरक्षित पार पडलें. माधवरावांनीं आपणांस सुचविल्यावरून आपण व्याख्यान देण्यास तयार झालों, असें पुष्कळ वक्त्यांनीं आपल्या भाषणाच्या प्रारंभीं सांगितल्यामुळें माधवरावांची ही प्रच्छन्न कामगिरी उजेडांत आली. मालेमध्यें कै. श्रीधर गणेश जिनसीवाले यांचें एक भाषण झालें. त्यामध्यें त्यांनीं स्त्रीशिक्षणाबद्दल खूप तोंडसुख घेतलें. कै. जिनसीवाले म्हणजे महाराष्ट्रांतली एक चीज होती. त्यांनीं अत्यंत कष्ट सोसून विद्याभ्यास केला होता व

त्या दृष्टीनें त्यांचें चरित्र महाराष्ट्रांतील तरुण पिढयांनीं सदैव डोळ्यापुढें ठेवण्यासारखें आहे. टिळक-आगरकरांच्या अगोदरचे डेक्कन कॉलेजाचे हे एक विद्यार्थी होते. विद्यार्थीदशेंत अपार क्लेश भोगावे लागले असतांही त्यांचा कर्मठपणा सुटला नव्हता. कॉलेजांतले त्यांचें सहाध्यायी कर्मठपणाबद्दल त्यांची नेहेमीं विटंबना करीत असल्याच्या आख्यायिका आहेत. केवळ उदरंभरणाच्या आशेनें त्यांनीं विद्या संपादन केली नव्हती. त्यांचें वाचन जबर होतें व स्मरणशक्ति उत्तम असल्यानें भाषण प्रसंगीं सगळ्या दुनियेच्या इतिहासांतले दृष्टान्त त्यांच्या जिव्हाग्रावर नाचूं लागत. परंतु कित्येक विद्वान् आपल्या पूर्वग्रहांच्या पोषणाकरितांच वाचनाचा व्यासंग ठेवतात; मनाला पूर्वग्रहांची बाधा न होऊं देतां नवे नवे ज्ञानसंस्कार करून घ्यावयाचे, प्रत्येक प्रश्नाच्या दोन्ही बाजू पहावयाच्या आणि नंतर समतोलपणानें त्या त्या विषयांतील सिद्धांतांचा संचय जवळ बाळगावयाचा, अशी जिनसीवाल्यांची वृत्ति नव्हती. त्यांनीं आपल्या कर्मठपणाच्या अर्थात पुराणमतांच्या समर्थनासाठीं वाचनाचा उपयोग केला होता. तथापि ते सामाजिकसुधारणेच्या विचारचक्रांत कधींच सांपडले नव्हते, असें म्हणतां येत नाहीं. कारण आपल्या पत्नीला शिकवून बी. ए. च्या मुक्कामापर्यंत नेण्याची त्यांची इच्छा होती. वेद ईश्वरनिर्मित नाहींत, असेंही त्यांचें ठाम मत होतें व त्या मतामुळेंच ते प्रथम ख्यातीस चढले. पुढें त्याचें स्त्रीशिक्षणाच्या बाबतींतलें मत पालटलें. वेदांविषयांचें मत मात्र अखेरपर्यंत कायम होतें. या वर्षी स्त्रीशिक्षणाबद्दलच्या मतांतराला अनुसरूनच त्यांनीं व्याख्यान झोडलें. सुसंबद्धतेचा गुण त्यांच्या वक्तृत्वांत नव्हता. नानाविषयांची त्यांच्या वक्तृत्वांत खिचडी होत असे, हें वरील वर्णनावरून

वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. या प्रसंगीं बोलण्याच्या आवेशांत त्यांनीं दोन अशीं विधानें केलीं कीं, ज्यांच्या योगानें त्यांस पुढें त्रास भोगावा लागला. त्यांपैकी एका विधानाचा त्रास 'क्षमस्व' म्हटल्यानें सुटला व दुसऱ्या विधानानें त्यांच्या निर्वाहसाधनावर गदा आणली. पहिल्या विधानांत त्यांनीं पुण्याच्या फीमेल हायस्कुलांतल्या व्यवस्थेवर शितोडा उडविला होता. फीमेल हायस्कुलांतल्या इंग्रज हेडमास्तरणीनें एकदां उष्टीं केळीं मुलींना खायला घातलीं, असें त्यांचें पहिलें विधान होतें. दुसऱ्या विधानांत त्यांनीं आपला एक खाजगी पराक्रम सांगितला. 'आपली बायको स्वयंपाक करतांना वारंवार पीठ सांडूं लागली, तेव्हां एकदां रागावून मी तिच्या मुस्कटांत जोराची चपराक भडकावली व या शिक्षेचा इष्ट परिणाम घडला.' असें ते म्हणाले. बायकांना प्रसंगोपात्त मार दिल्यानें संसार सुरळित चालतो, असा त्यांच्या बोलण्याचा भावार्थ होता. पहिल्या विधानाबद्दल फीमेल हायस्कूलच्या हेडमास्तरणीनें फिर्याद करण्याची धमकी घालून खुलासा विचारला. तेव्हां 'मी असें बोललों नाहीं, माझ्या बोलण्याचें अमूक स्वरूप होतें' अशा रीतीनें अनुताप दर्शवीत शेवटीं स्पष्ट माफी मागण्याची जिनसीवाल्यांना पाळी आली. स्वतःच्या बायकोला मारण्याची बाब विकोपास जाण्याचें वस्तुतः कारण नव्हतें. पण ज्या मिशनरी कॉलेजांत ते मुंबईला अध्यापकाचें काम करीत होते, त्या संस्थेच्या युरोपियन चालकांना, असला बायकोवर हात टाकणारा आणि पुनः वर त्याचें भर सभेंत समर्थन करणारा रानटी गृहस्थ आपल्या संस्थेंत नसणेंच योग्य, असें वाटल्यामुळें नोकरी सोडण्याशिवाय जिनसीवाल्यांना मानाचा मार्ग उरला नाहीं, व तोच मार्ग त्यांनीं शेवटीं पत्करला. परंतु त्यापूर्वी या खाजगी व प्रासंगिक

मारहाणीची वृत्तपत्रांतून उघड व अनुचित चर्चा झाली. जिनसीवाल्यांचा कैवार टिळकांनीं घेतला होता, पण तो वाया गेला.

माधवराव, पंडित, भांडारकर, प्रभृति मंडळींनीं स्थापन केलेल्या स्त्रियांच्या हायस्कुलावर जिनसीवाल्यांनीं उडविलेला शिंतोडा त्यांच्याच हातून पुसून काढण्याची क्रिया चालू असतां दुसऱ्या एका संकटानें या संस्थेस ग्रासलें होतें. मिरजेची एक मुलगी या शाळेंत शिकत होती. तिला पुण्यास पाठविण्यांत तिच्या आईचें अंग होतें. तिच्या सासूला ही गोष्ट कळली तेव्हां तिनें तिला परत बोलाविलें. सासूचें निमंत्रण नाकारण्यांत आल्यावर तिचा नवरा पुण्यास आला व त्यानें तिला बरोबर घरीं नेण्याची खटपट केली. ज्या मंडळींनीं मुलीला पाठविलें, त्यांच्या संमतीखेरीज तिला इतरांच्या स्वाधीन करणें हायस्कुलाच्या व्यवस्थापकांना शक्य नव्हतें. सदर मुलीचा नवरा यामुळें रागावला आणि त्यानें पुण्याच्या कोर्टांत बायको ताब्यांत मिळण्याबद्दल फिर्याद ठोकली. या नवऱ्याला फिर्यादीचा सल्ला देणारे कित्येक स्त्रीशिक्षणाचे शत्रु पुण्यास होते. स्त्रीशिक्षणाच्या कार्यावर हरताळ फांसण्याची व त्याची नाचक्की करण्याची ही संधी आहे, असें त्यांना याप्रसंगीं वाटलें. क्षतावर चंचुप्रहार करण्यासाठीं टपून बसलेले काकस्वभावाचे कांहीं गृहस्थ पुण्याला यावेळीं होते. गांव तेथें महारवाडा या न्यायानें यांचें अस्तित्व सदैव रहाणारच. त्यांनीं वरील मुलीच्या नवऱ्याला पाठिंबा दिला. पुणेंवैभव पत्रानें या प्रकरणाचा फायदा घेतला, परंतु हें प्रकरण मिटून सामोपचारानें स्त्रीशिक्षणाच्या पुरस्कर्त्यांवर येऊं पहाणारे दुष्ट आरोप साफ गाडले गेले. या प्रकरणांत माधवरावांना भाग घ्यावा लागला, हें न सांगतांही समजण्याजोगें आहे.

यावर्षी बेहेरामजी मलबारी विलायतेस गेले होते. तेथें त्यांनीं समंतिवयाचें मान वाढविण्याच्या कार्याला सहानुभूति संपादन करण्याचा उद्योग चालविला होता. हिंदुस्थानांतल्या आणि विलायतच्या खटपटीचें पर्यवसान अखेरीस संमतीचें वयोमान वाढविणाऱ्या कायद्यामध्यें झालेंच असतें, परंतु आगस्ट महिन्यामध्यें बंगालप्रांतीं एका इसमानें आपल्या अल्पवयस्क पत्नीवर बलात्कार केल्याचा खटला कोर्टांत येऊन सुधारक वर्गाला संमतिवयाचें प्रमाण वाढविण्याचा आग्रह धरण्याला एक आयतेंच साधन मिळालें. हा खटला 'फुलमानीप्रकरण,' या नांवानें तत्कालीन वृत्तपत्रांतून पहावयास सांपडतो. फुलमानी हें, ज्या बालिकेवर बलात्कार झाला, त्या बालिकेचें नांव. फुलमानीप्रकरणानें संमतिवयाचा कायदा करण्याची आवश्यकता सरकारास इतर सर्व उपायांपेक्षां जास्त पटविली. फुलमानी प्रकरणानंतर थोडयाच दिवसांत मुंबईच्या सुधारकांनीं संमतिवयाचा कायदा करण्याबद्दल सरकारकडे एक अर्ज पाठविला. तेथील डाक्टरवर्गानेंही संमतीचें वय १० चें १२ करण्याविषयीं सरकारास स्वतंत्र अर्जद्वारें आपलें मत कळविलें. त्याच सुमारास मलबारी विलायतेहून परत आले व मुंबईस तेलंगांच्या अध्यक्षतेखालीं खाजगी स्वरूपाच्या सभा भरवून संमतिवयाच्या चळवळीचा ते पाया भरूं लागले. या बाबतींत कायदा करण्याविषयीं सरकारचा बेत झाल्याचें समजल्यानंतर पुण्याला तुळशीबागेंत पुराणमताभिमानी लोकांची प्रचंड सभा भरली. या सभेला भांडारकर, रानडे वगैरे सुधारणापक्षाचे पुढारी हजर होते. टिळकांनीं सुधारकांची या सभेंत बरीच टवाळी करून विरोधी पक्षाच्या आवेशांत भर घातली होती. त्यामुळें सुधारणापक्षानें आणलेली एक उपसूचना ताबडतोब फेटाळली गेली. टिळकांचें तुळशीबागेंतलें भाषण

सुधारणेच्या विचारांना विघातक असलें तरी या दिवसांत त्यांचे विचार सर्वस्वीं प्रतिकूल नव्हते. तुळशीबागेंतली सभा झाली त्याच दिवसांत त्यांनीं समाजसुधारणेबद्दल एक स्वतःच्या सहीचें विनंतीपत्रक काढलें होतें. कायद्यानें सर्वांवर सुधारणा लादण्याऐवजी सुधारणा ज्यांना मान्य असेल त्यांनीं स्वतःला बांधून घ्यावें, असा त्यांच्या विनंतीपत्राचा आशय होता. सदर विनंतीपत्राचा विचार करण्यासाठीं नूलकर, विष्णु मोरेश्वर भिडे, वगैरे मंडळींनीं सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत सभा भरविली. टिळकांच्या विवेचनाला माधवरावांनीं उत्तर दिलें. या वेळेपर्यंत सामाजिक सुधारणेच्या शपथपत्रिकेवर सह्या करणारांची संख्या पंधराशेच्या पलीकडे गेली होती. त्या संख्येचें पृथक्करण करून लोकांचा कल सुधारणेच्या कोणत्या तत्त्वाकडे किती आहे, याचा अंदाज माधवरावांनीं काढला असल्यानें टिळकांच्या विवेचनांतली दुराग्रहाची नांगी त्यांना सहज मोडून टाकतां आली. ते म्हणाले:—

बंधनाची चळवळ अलीकडे पांच सहावर्षें चालली आहे. १५००, १७०० लोकांनीं सह्या केल्या आहेत, ज्यांना जेवढीं तत्त्वें मान्य, त्यांचीं त्या त्या तत्त्वापुरतीं वेगळीं मंडळें स्थापन करण्याचा विचार आहे. या प्रश्नाचा निकाल येत्या सामाजिक परिषदेंत लागेल. पंधराशे माणसांपैकीं १० वर्षांच्या आंत मुलीचें लग्न करूं नये, असें म्हणणारे १२००।१३०० लोक आहेत. १२ वर्षांखालीं लग्न करूं नये, असें म्हणणारे सारे शंभर दीडशे सांपडतात. १४ वर्षांची लग्न मर्यादा पाळूं इच्छिणारे अवघे १५-२० आहेत. मुलाचे १६ वर्षांखालीं लग्न करूं नये, असें म्हणणारे ११००-१२०० आहेत. १८ वर्षांखालीं करूं नये म्हणणारे २००-३०० हून जास्त नाहींत. आणि २० वर्षांखालीं म्हणणारे शंभराच्या घरांत आहेत.

ही आकडेवारी पाहिल्यानंतर टिळकांना आग्रहबुद्धीनें आपल्याच मताला चिकटून रहाणें शक्य नव्हतें. शिवाय या सभेंत 'जुनें तें सर्व

सानें' असें मानणाऱ्या लोकांचा भरणा फारसा नव्हता. त्यामुळें बुद्धिभ्रंशाला जागा नव्हती. या सर्व परिस्थितीचा परिणाम असा झाला कीं, टिळक व माधवराव यांच्यांत द्विधाभाव उरला नाहीं. मुंबईच्या वृत्तपत्रांतून या सभेच्या ज्या हकीकती प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यावरून टिळक आणि माधवराव यांच्यांत विचाराचा भेद उरला नव्हता, असें म्हणायला हरकत नाहीं. इंदुप्रकाशानें टिळकांच्या समंजसपणाची तारीफ केली असून सुधारणेचा निषध करणाऱ्या नेटिव ओपीनियन पत्रानें टिळकांच्या मतांतराबद्दल भय व्यक्त केलें. बाहेर गांवच्या लोकांची टिळकांविषयीं या सभेनंतर काय कल्पना झाली, हें वरील दोन परस्परविरोधी वृत्तपत्रांच्या समान धोरणावरून दिसून येतें. पण टिळकांच्या पदरीं या सभेनें बांधलेला समंजसपणा फार दिवस टिकला नाहीं. ही सभा नोव्हेंबरच्या सुरुवातीस झाली. डिसेंबरांत पुण्याच्या शास्त्रीमंडळीनें खुन्या मुरलीधराच्या देवळांत सभा भरवून कांग्रेसच्या मंडपांत सामाजिक परिषद् भरविण्याची रीत बंद करावी, अशा अर्थाचा ठराव कलकत्त्यास भरणाऱ्या कांग्रेसच्या स्वागतमंडळीकडे धाडण्याचें ठरविलें. हा ठराव पोंचविण्याची कामगिरी या शास्त्रीवृन्दानें टिळकांच्या गळ्यांत घातली व ती त्यांनीं पत्करली. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, केसरींत शास्त्र्यांच्या हेतूचा निषेध प्रदर्शित करून या कामगिरीला ते सादर झाले. या सुमारास त्यांच्या वृत्तीमध्यें सामाजिक सुधारणेच्या प्रश्नासंबंधीं कसा अनिश्चय वावरत होता, याचें हें एक प्रमाण आहे.

खुन्या मुरलीधराच्या देवळांत सभा करून शास्त्रीमंडळी सामाजिक परिषदेची व कांग्रेसची मंडपापुरती फारखत घडवून आणण्याचा खल करीत असतां दुसरीकडे कांहीं मंडळी आपले गर्दभावरील अवान्वित

प्रेम व्यक्त करण्याच्या विचारांत मग्न झाली होती. सुधारकांची कुटा-ळकी करण्यासाठीं त्यांची दृष्टि पुनः एकदां पशुराज्यांतल्या या त्यांच्या आवडत्या जनावराकडे गेली. दयानंद स्वामींच्या मिरवणुकीच्या वेळीं त्यांनीं या जनावराला संन्यास देऊन आपले सुधारणेविषयीचें मनोगत चव्हाटयावर आणले होतें. त्या प्रसंगाला पंधरावर्षे लोटलीं तरी गर्द-भाच्या उपयोगाविषयीं सुधारणाविरोधी मंडळीचा आदर मागल्या इतकाच जाज्वल्य होता. या वेळीं या मंडळीनें सदर जनावराला परिव्राजका-चार्योची दीक्षा दिली नाहीं. या वर्षी त्यांच्या हृदयांत सदयतेचा अंश प्रबळ झालेला असल्यामुळें संन्यासऐवजीं संसाराची दीक्षा देऊन गाढवाबद्दलची आपली भक्ति प्रकट करण्याची योजना पुण्याच्या गर्दभभक्तांनीं ठरविली. सहा महिन्याचा गाढव आणि दोन महिन्याची गाढवी, अशीं दोन गाढवाचीं पिल्लें आणून त्यांचा मोठया समारंभानें विवाह लावण्यांत आला. गर्दभवराच्या पित्याचा अधिकार कै. डा. आनंदीबाई जोशी यांचे पतिराज गोपाळराव जोशी यांनीं आपखुषीनें स्वीकारल्याचा वृत्तान्त तत्कालीन वृत्तपत्रांतून पहावयास सांपडतो. लग्न-चिठ्ठयांवर दोन बाजूस वधूवरांचा परिचय करून देणारे गाढवाचे मुखवटे काढले होते. त्या वेळची बातमी अशी आहे की, या विवाहाला बराच खर्च आला. या गर्दभदंपतीची वरात काढण्याला पोलिसांतून परवानगी न मिळाल्यानें तेवढया बाबतींत वऱ्हाडी मंडळीचा विरस झाला. प्रस्तुत विवाहसमारंभाच्या हकीकतीनें बरेच दिवस महाराष्ट्रांतल्या वृत्तप्रेमी जनतेची करमणूक झाली, यांत संदेह नाहीं. पुणेकरांना मधून मधून मानसिक फेंपऱ्याचे झटके येतात, असें आगरकरांनीं सुधारकाच्या एका लेखांत लिहिलें आहे. त्या झटक्याचा हा एक मासला होता.

कलकत्त्यास कांग्रेसच्या मंडपांत सामाजिक परिषद भरली व पुण्याच्या शास्त्रीमंडळाचा ठराव केराच्या टोपलींत जाऊन पडला. तो ठराव कांग्रेसच्या व्यवस्थापकांकडे रुजू करणारे टिळक मात्र परिषदेंतून बाहेर पडले नाहींत. त्यांनीं परिषदेच्या कारभारांत भाग घेतला. सामाजिक कार्यासाठीं फंड गोळा करावा, या ठरावाला त्यांनीं दुजोरा दिला. कलकत्त्याहून टिळक पुण्याला परत आल्यावर पुनः त्यांचें मन बिथरलें. पण ही हकीकत सांगण्यापूर्वीं माधवरावांना १८९० सालांतल्या एकंदर घडामोडीबद्दल काय वाटत होतें, याचा थोडा खुलासा करणें अवश्य आहे. त्यावर्षीं डिसेंबरांत प्रार्थनासमाजामध्यें त्यांचें एक भाषण झालें. 'सुधारकांचे चारवर्ग' या मथळ्याखालीं धर्मपर व्याख्यानांच्या संग्रहांत तें ( पृष्ट २८६ ते २९४ ) प्रसिद्ध झालेलें आहे. लोकांची खळबळ निराशाजनक नाहीं, असें त्यांनीं या व्याख्यानांत सिद्ध केलें आहे. ते म्हणाले:—

'लष्करच्या भाकरी कोण भाजतो' या न्यायानें कोणी कांहींही बोलो, कांहींही करो, जोंपर्यंत त्यापासून आपलें व्यक्तिदृष्ट्या प्रत्यक्ष व तात्कालिक नफानुकसान दिसत नाहीं, तोंपर्यंत त्या गोष्टीच्या म्हणून वाटेस जावयाचें नाहीं, ही स्थिति वास्तविक पहातां फार भयंकर व अनर्थावह मानली पाहिजे. या औदासीन्यापासून जितकें नुकसान होतें, त्यापेक्षां प्रत्यक्ष प्रतिबंधापासून फारच थोडें नुकसान होतें. सुधारणेस पहिली व मुख्य अडचण म्हटली म्हणजे तिजविषयीं उदासीनता, ही होय. तें औदासीन्य नाहींसें होऊन लोक सुधारणेविषयीं एकदां विचार करूं लागले, म्हणजे मग सुधारणेस अडचण काय ती काळाबधीची. लोकांनीं एकदां विचार करण्यास आरंभ केला, म्हणजे मग थोडक्याच कालानें ते योग्य विचार करण्यास लागतील यांत संशय नाहीं......ज्या गोष्टीपासून उघांच आपलें व्यक्तिदृष्ट्या हिताहित नाहीं, अशा सामाजिक गोष्टींविषयीं वाटाघाट करण्यास तुळशीबागेंत पांच हजार लोकांनीं जमावें, हेंच

मुख्यतः अभिनंदन करण्यासारखें आहे. सभांतून ठिकठिकाणीं होणारीं भाषणं ज्यांच्या कधीं कानीं पडलीं नाहींत, व वर्तमान पत्रांतून होत असलेली चर्चाही ज्यांच्या कधीं डोळ्याखालून गेली नाहीं, अशा वर्गांतील लोकांचा एवढा मोठा समुदाय सामाजिक वाटाघाटीकरतां एका ठिकाणीं जमावा व त्यांनीं क्षणभर आपल्या पायापुरतेंच पहाण्याच्या क्षुद्रवृत्तीचा अव्हेर करून उंचावर भरारी मारावी व सामान्य जनसमूहाच्या सुखदुःखाचा विचार करण्यास प्रवृत्त व्हावें हें मनुष्यत्वाचा उच्च कर्तव्यपरायणतेचें व्यंजक आहे......जोंपर्यंत मनुष्य ईश्वरदत्त बुद्धीचा उपयोगच करण्याचें मनांत आणीत नाहीं, तोंपर्यंतची स्थिती मात्र खरोखर निराशेची होय. परंतु एकदां त्या बुद्धीचा मनुष्य उपयोग करूं लागला, म्हणजे मग निराशेचें अगदीं कारण नाहीं.

जिज्ञासूंनीं हें सगळें व्याख्यान एकवार अवश्य नजरेखालीं घालावें. त्यांत माधवरावांचा आशावाद कसा विवेकाच्या, सूक्ष्म आणि दीर्घ अवलोकनाच्या, पायावर उभारलेला होता, हें दिसून येतें. या भाषणाच्या शेवटीं त्यांनीं संमतिवयाच्या चळवळींत स्त्रियांनीं भाग घेतल्याचा उल्लेख केला आहे. १८९० सालीं मुंबईच्या सुमारे दोन हजार स्त्रियांच्या सहीचा एक संमतिवयोमानाच्या वाढीला पाठबळ देणारा अर्ज सरकारकडे गेला होता. १८९१च्या सुरुवातीस पुण्याला स्त्रियांची एक सभा भरून प्रतिकूल अर्ज रवाना करण्याचें घाटत होतें. माधवराव यासंबंधानें म्हणतात:—

परवांच्या सभेप्रमाणें पांच हजार स्त्रिया तुळशीबागेंत जमून एकमेकांच्या सुखदुःखाचा विचार करूं लागल्या तर मग सुधारणा लांब नाहीं. त्या तेथें जमून आपापल्या स्वतःच्या समजुतीप्रमाणें वाटेल ते ठराव करोत, तो एक अश्रुतपूर्व सुदिन होय, असें मी मानीन....स्त्रियांनीं बंड केल्यावर पुरुषाचें कांहीं चालेनासें होऊन त्यांच्या म्हणण्यास निमूटपणें मान वाकवावी लागते, याचा अनुभव सर्वांस आहेच.

१८९१ सालाच्या प्रारंभीं वरिष्ठ कायदे कौन्सिलांत संमतिवयाच्या कायद्याचें बिल प्रविष्ट झालें. ज्या अनर्थाच्या प्रतिकारासाठीं पुराणमताभिमानी लोक मागल्या वर्षी धडपडत होते, तो अनर्थ अखेरीस सरकारच्या आश्रयानें त्यांच्या छातीवर बसणार, अशी खात्री होतांक्षणीं जिकडे तिकडे क्षोभ दिसूं लागला. मुंबईस पुनः १८८६ प्रमाणें माधवबागेंत जमून नाना मोरोजींच्या अध्यक्षतेखालीं पुराणमताभिमानी लोकांनीं कायद्याचा निषध जाहीर केला. जव्हेरीबागेंत कायद्याच्या पुरस्कर्त्यांची सभा भरून कायदा पाहिजे, अशा अर्थाचा अर्ज सरकारकडे पाठविण्यांत आला. पुण्यास तुळशीबाग सोडून पुराणमताभिमानी समाजाची शनवार वाड्यासमोर मोकळ्या मैदानांत फेब्रुवारी महिन्यांत सभा भरली. टिळक, जिनसीवाले यांनीं प्रस्तुत सभेचा पुढाकार घेतला होता. 'आतां खचित धर्म बुडणार, सरकार प्रतिज्ञाभंगाचें पातक करीत आहे,' अशा स्वरूपाचा पुष्कळसा कंठशोष या सभेंत झाला. या सभेस संमतिवयाचे कांहीं पुरस्कर्ते गेले होते. त्यांनीं आपली बाजू मांडण्याबद्दल सभेच्या चालकापाशीं परवानगी मागितली. परंतु तशी परवानगी त्यास मिळाली नाहीं. या स्थळीं जिनसीवाल्यांचें जें भाषण झालें, तें मासलेवाईक आहे. सुरुवातीला त्यांनीं 'वादांत प्रतिपक्षाविषयीं उदारबुद्धि ठेवावी.' असा उपदेश केला. पण हा उपदेश हातून पाळला जाण्याइतकें आत्मसंयमन त्यांच्या अंगीं नव्हतें. यामुळें प्रतिपक्षांतल्या पुढाऱ्यांचीं, नांव घेऊन, मतें सांगण्याची व त्यावर टीका करण्याची वेळ येतांच वरील उपदेशाचें भान जिनसीवाल्यांना उरलें नाहीं व ते बरळत सुटले. भांडारकरांची त्यांनीं अपरिमित नालस्ती केली व मग त्यांचा मोर्चा आगरकरांकडे वळला. आगरकरांबद्दल

त्यांनीं काढलेले उद्गार त्यांच्या वक्तृत्वशैलीचे द्योतक आहेत. ते म्हणाले:—

अरे, तोफेचा गोळा हवा कशाला? एक काठी फेकली तर सहन होणार नाहीं! आधींच दमा झाला आहे. एक बुक्कादेखील सहन होणार नाहीं!

प्रतिपक्षाविषयीं इतकें औदार्य दाखविलें गेल्यावर श्रोत्यांनीं या वक्त्याचा टाळ्याच्या कडकडाटानें सन्मान केला असेल, हें निराळें सांगण्याची गरज नाहींच.

सभाप्रमाणेंच अनुकूल प्रतिकूल शास्त्रवचनांची धुमश्चक्री वृत्तपत्रांतून सुरू झाली. भांडारकर तेलंग यांनीं अनुकूल पक्षातर्फे शास्त्रवचनांचे पुरावे पुढें आणले. टिळकांनीं प्रतिकूल शास्त्रवचनांचीं घोडीं नाचवलीं. राणीच्या जाहीरनाम्यांतल्या कांहीं कलमांच्या अर्थाची ओढाताण टिळक व तेलंग यामध्यें झाली. त्यांच्या केसरीच्या धर्माभिमानाची नकली आयाळ हसडण्याचें काम आगरकरांच्या सुधारकानें चालविलें होतेंच. धर्माभिमानी पक्षाच्या संरक्षणाची धुरा एकट्या टिळकांनींच घेतली होती. त्यांचें साह्य नसतें तर पुण्याच्या धर्माभिमानी लोकांना पुढाऱ्याची वाण भासून त्यांचे हातपाय मोडण्याला विलंब लागला नसता. शास्त्रवचनांचा कीस काढतां काढतां तेलंग, भांडारकर, प्रभृति प्रतिपक्षीय विद्वानांना अपमानकारक खाजगी टीकेचे चावे घेण्यासही टिळकांनीं याप्रसंगीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. पुरुषांच्या सभा व त्यांचे लेखी वाद एकीकडे सुरू असतां श्री. काशीबाई कानिटकर, पंडिता रमाबाई यांच्या प्रयत्नानें एक स्त्रियांची सभा भरली आणि संमतिवयाच्या कायद्याचे त्यांनीं अभिनंदन केलें. कायदा करण्याविषयीं सरकाराला सुचविणाऱ्या अर्जाखालीं पुण्यांतल्या सुमारे तीनशें स्त्रियांनीं तेव्हां सह्या केल्या होत्या.

हें वादरण तुंबळ स्थितीत असतांनाच क्रीडाभुवनांत सुधारकांची सभा भरली. या सभेवर पुण्यांतल्या विद्यार्थी वर्गानें दगडविटांची वृष्टि केल्यामुळें तिचें कार्य सुरळित पार पडण्याची आशा उरली नाहीं व दगडविटांच्या वृष्टींतच घाईघाईनें सुधारकांना सभेचा उद्देश सिद्धीस न्यावा लागला. या सभेला टिळक हजर होते. त्यांची मूर्ति सभास्थाना-नजीक येतांच त्यांच्या नांवाचा जयजयकार झाला. ते जोंवर दिसले नव्हते तोंवर 'आमचा पार्नेल कुठें आहे?' अशा गौरवदर्शक चौक-शीच्या आरोळ्या सभा मोडणारांकडून ठोकल्या जात होत्या. वास्तविक या सभेला जाण्याचा टिळकांना हक्क नव्हता, परंतु आपण केसरी-मराठ्याच्या बातमीदारांना पोंचविण्याकरितां आलों आहों, असें सांगून टिळकांनीं सभास्थानीं प्रवेश करून घेतला. सभा संपल्यावर कित्येक मंडळी मारामारी केल्याच्या आरोपावरून फौजदारी न्याया-सनासमोर खेंचली गेली. पण आरोप कोणावरच शाबीत न झाल्या-मुळें फिर्यादीचा खटाटोप व्यर्थ ठरला.

पुण्यामुंबईच्या सभांचा आणि वृत्तपत्रांतील वादाचा गदारोळ चालू असतां माधवराव नगर जिल्ह्यांत फिरतीवर गेले होते. अहमदनग-रच्या शहरांत त्यांचा मुक्काम झाला, तेव्हां संमतिवयाचा विचार कर-ण्यासाठीं भरलेल्या सभेंत त्यांनीं एक भाषण केलें. इतके दिवस त्यांनीं आपले विचार कोठेंच प्रदर्शित केले नसल्यामुळें त्यांच्या स्तब्ध-तेचा समाजांत विपर्यास होऊं लागला होता. त्यासाठीं त्यांना स्तब्धता सोडणेंच भाग होतें. नगरास त्यांनीं संमतिवयाच्या वादीला अनुकूलता दर्शवून विपर्यासाचें पूर्ण निरसन केलें. नगराहून ते सोलापूर जिल्ह्यांत गेले आणि कॉलऱ्याच्या तावडींत सांपडून अगदीं मरणाच्या दाराशीं

पोचले होत. पण हा अपमृत्यूचा प्रसंग टळला. ते पुण्यास परत आले, तेव्हां वरिष्ठ कायदेकौन्सिलांत संमतिवयाचा कायदा पास झाला होता.

कायदा झाल्यानंतर संमतिवयाचा वाद संपतां संपतां शिमग्याचा सण आला आणि सुधारकांच्या नांवानें अहर्निश जळफळणाऱ्या पुणेकरांनीं आपली सूड उगविण्याची हौस परोक्ष रीतीनें पुरवून घेतली. इंग्रजी राज्यांत सुधारकांचे मुडदे पाडून कोल्ह्याकुत्र्यांना त्यांच्या शवांची मेजवानी चारणें सुधारणेच्या शत्रूंना शक्य नव्हतें, म्हणून त्यांनीं धुळवडीच्या दिवशीं सुधारकाचें एक नकली प्रेत तयार केलें; आणि ठळक ठळक सुधारकांच्या दारावरून मिरवीत व त्यांच्या नांवानें 'दुनियेंतले सुधारक मेले' असा तोंडाचा पांचजन्य वाजवीत त्या प्रेताला श्मशानभूमीकडे नेलें. प्रेताला सजविण्यांत त्याच्या कर्त्यांनीं बरीच कल्पकता लढविली होती. तोंडांत अंडें, गळ्यांत पावबिस्किटांचा हार, उरावर दारूची बाटली आणि खाकेंत सुधारक आणि इंदुप्रकाश हीं दोन पत्रें, असा त्या प्रेताचा साज होता. प्रेतामागून शाळांतलीं मुलें व बरेच मोठ्या वयाचे टवाळ, यांची गर्दी चालली होती. श्मशानभूमींत त्याला शास्त्रोक्त अग्निसंस्कार देण्यांत पुरुषार्थ नाहीं, असें वाटूनच कीं काय तेथून त्यास लांब नेलें व एका नाल्यांत फेंकून दिलें. परत घरोघर जातांना या प्रेतवाहकांनीं आणखी एकदां 'दुनियेंतले सुधारक मेले' असा तोंडाचा बाजा कांहीं वेळ चालविला होता. याशिवाय सदर शिमग्यांत पुण्यास संमतिवयाच्या कायद्याचे दुष्परिणाम दाखविणारे तमाशे अनेक पेठांतून झाल्याची साक्ष तत्कालीन वृत्तपत्रें देतात. शिमग्याच्या समाप्तीनंतर हा सामाजिक वाद ऐकू येईनासा झाला.

# प्रकरण तेरावें.

## प्रायश्चित्त आणि बढती.

मागल्या प्रकरणांत मलबारींनीं सामाजिक सुधारणेची चळवळ सुरू केल्यानंतर सालोसाल माधवरावांनीं त्या निमित्त चालविलेल्या कामगिरीचें वर्णन दिल्यामुळें त्यांच्या कर्तबगारींतल्या इतर खाजगी व सार्वजनिक गोष्टींचा समावेश त्यामध्यें करतां आला नाहीं. माधवरावांचें कर्तृत्व सर्वव्यापी होतें. त्यांच्या बुद्धिमत्तेमध्यें एकाच वेळीं अनेक कार्यांना व्यापून पुनः वर शिल्लक उरण्याचें सामर्थ्य होतें, याची ओळख वाचकांना झालेली आहे. सामाजिक सुधारणेव्यतिरिक्त, हायकोर्टाच्या अत्युच्च न्यायासनावर आरोहण करीपर्यंत ,त्यांनीं जीं अन्य कार्यें पार पाडलीं त्यांचा वृत्तांत या प्रकरणांत येणार आहे व त्याची सुरुवात त्यांच्या सरकारी नोकरींतल्या स्थित्यंतरापासून केल्यास अप्रस्तुत होणार नाहीं.

१८८१ सालीं माधवराव मुंबईहून सबजज्जाच्या जागेवर पुण्यास आले, परंतु लवकरच डॉ. पोलन यांच्या हाताखालीं शेतकऱ्यांच्या खटल्यांवर देखरेख करण्याचें काम असिस्टंट स्पेशल जज्ज या नात्यानें त्यांना मिळालें. डेक्कन अॅग्रिकल्चरिस्ट रिलीफ अॅक्ट पास झाल्यानंतर

मुंबई इलाख्याच्या चार जिल्ह्यांना तो प्रथम लागू केला गेला व त्यांपैकी दोन जिल्ह्यांत फिरत राहून शेतकऱ्यांच्या खटल्यांची तपासणी करण्याची कामगिरी सरकारानें माधवरावांच्या गळ्यांत घातली. ही निवड अत्यंत योग्य होती. कारण सदर कायद्याचा माधवरावांनीं जितका विचार केला होता, तितका दुसरा कोणीही केला नव्हता. मुंबई इलाख्यांतील किंबहुना साऱ्या हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांच्या स्थितीचें माधवरावांनीं अत्यंत बारकाईनें निरीक्षण व अध्ययन केलें होतें, हें बंगाल व मध्यप्रांत येथील शेतकऱ्यांच्या कायद्याबद्दल त्यांनीं लिहिलेल्या त्रैमासिकांतल्या लेखावरून सिद्ध झालें होतें. मुंबई इलाख्यांतील शेतकऱ्यांच्या स्थितीबद्दलचें त्यांच्याइतकें ज्ञान कोणालाच नव्हतें. यामुळें रिलीफ ॲक्टाच्या अंमलबजावणीचें काम त्यांनीं किती चोख बजावलें असेल, हें निराळें सांगण्याची गरज नाहीं. दुय्यम स्पेशल जज्ज या नात्यानें त्यांचा दर्जा कनिष्ठ प्रतीचा असला तरी वरचा अधिकारी समंजस व माधवरावांची योग्यता जाणणारा असल्यामुळें दुय्यमपणाच्या अडचणी माधवरावांना नडल्या नाहींत. माधवराव फिरतीवर निघाले म्हणजे आपल्या हद्दींतलीं झाडून सर्व खेडीं पहात असत. प्रत्येक लहानसान खेड्यापर्यंत दौरा नेण्याचा त्यांचा क्रम फार त्रासाचा होता, पण जबाबदारीची जाणीव आणि लोकहिताची कळकळ हे गुण त्यांच्या दौऱ्याच्या त्रासाची मात्रा त्यांवर चालू देत नसत. या बाबतींत श्री. रमाबाईंच्या 'आठवणीं'तला कांहीं मजकूर येथें देण्यासारखा आहे. 'पूर्वीचे कामगार इतके खेड्यापाड्यांत जातीनें न जातां तालुक्यावर दप्तरें मागवीत,' असें कारकुनांच्या तोंडून श्री. रमाबाईंनीं ऐकलें व त्या माधवरावांना म्हणाल्या कीं, 'तालुक्यावर

दप्तर मागवून चालत असेल तर त्रास कशाला करून घ्यावा? तेव्हां माधवरावांनीं जो जबाब दिला, तो कर्तव्यनिष्ठेच्या दृष्टीनें प्रत्येक सरकारी कामगारानें सदैव ध्यानांत ठेवण्याला हरकत नाहीं. ते म्हणाले:—*

सरकारनें जी आमची नेमणूक केली आहे, ती भत्ता घेऊन चैनीनें फिरण्याकरितां नव्हे. तालुक्यावर दप्तरें मागविलीं म्हणजे त्यांतल्या त्यांत जरा हुशार व लटपटी माणसें असतात, ती पुढें येतात व आपल्याला हवें असेल तसें चित्र रेखाटून कामगारांच्या पुढें ठेवतात. अशानें शेतकऱ्यांची खरी स्थिति कळत नाहीं; त्यांची खरी स्थिति समजून घेऊन त्यांच्या अडचणी दूर कराव्या, हा सरकारचा मुख्य हेतु आहे. तो कांहीं लोकांना कळत नाहीं. उगीच आळस करतात. बाकी आपण स्वतः खेड्यांपाड्यांत हिंडलो म्हणजे त्या गांवांतील घरंदाज व वृद्ध माणसांची गांठ पडून आपल्याला हव्या असतात, या गोष्टी त्यांच्याशीं बोलत असतांना सहज समजतात.

शेतकऱ्यांना सावकारी देवघेवीच्या चरकांतून सोडविण्यासाठीं हा कायदा करण्यांत आला. मध्यस्थ (conciliator) नेमून तंटे तोडणें, हा त्याच्या अंमलबजावणीचा भाग होता. प्रथम प्रथम विश्वासू आणि वजनदार मध्यस्थ मिळण्याची अडचण भासली व त्यामुळें हा कायदा रद्द करावा, असेंही सरकारच्या मनांत आलें. परंतु माधवरावांनीं आपलें काम अतिशय मेहेनत घेऊन बजावल्यामुळें कायदा रद्द करण्याची सरकारी इच्छा मावळली. कायद्याची आवश्यकता आणि हितावहता त्यांनीं प्रतिपादन केल्यामुळें १८८१ सालच्या वार्षिक अहवालांत सरकारला त्याच्या मताचा स्वीकार करावा लागला. त्या अहवालांत माधवरावांसंबंधीं पुढील वाक्य आहे:—

* आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी. पृ. १२६

A gentleman ( Mr. Ranade ) whose grasp of mind and keen powers of observation entitle his opinions to great weight.

१८८२ सालच्या रिपोर्टांत त्यांचे वरिष्ठ डा. पोलन लिहितातः—

His views upon the subject, I need hardly say, are entitled to the greatest respect and consideration, for he has been able to combine with his great natural powers of observation special facilities for becoming practically acquainted with all the details of the question.

१८८३ सालीं पुण्याला न्यायखात्याची एक परिषद् भरली होती. तेथें 'न्यायाची माहिती नसल्यानें कन्सीलिएटरांच्या हातून नीट काम होत नाहीं; ते अजाण व गैरहुशार असतात,' असा डा. पोलन यांनीं आक्षेप काढला, त्यावर गांवच्या माहितगार कन्सीलिएटरांसमक्ष उभयपक्षकाराची समजूत झाली असतां चांगला व खरा न्याय होण्याचा संभव जास्त असतो म्हणून कन्सीलिएटर पाहिजेत.' असा माधवरावांनीं आग्रहाचा जबाब दिला. सदर ॲक्टामुळें शेतकऱ्यांना जो थोडाफार फायदा घडत होता, त्या फायद्याला ॲक्ट रद्द झाल्यास शेतकरी मुकतील, असें माधवरावांना वाटत होतें व या साठींच त्यांनीं कायद्यांतले दोष मान्य असतांही त्याची वारंवार तरफदारी चालविली होती. सुरुवातीच्या बऱ्याच वर्षांत माधवरावांच्या हातीं या कायद्याच्या अंमलबजावणीचा सर्वाधिकार आल्यामुळेंच आजवर हा कायदा टिकला, असें म्हणावयास हरकत नाहीं.

१८८४ सालांत त्यांची पुण्याच्या स्मालकॉज कोर्टावर नेमणूक झाल्यामुळें फिरतीचें काम संपलें, पण पुनः थोड्याच अवधींत त्यांची सरकारानें बढती करून मुख्य स्पेशल जज्जाची हंगामी ( ॲक्टिंग )

जागा दिली. पूर्वीचे मुख्य स्पेशल जज्ज डा. पोलन हे रजेवर विलायतेस गेल्यामुळें त्यांची जागा भरून काढण्याला सगळ्या इलाख्यांत माधवरावांइतका लायक गृहस्थ दुसरा नव्हता. माधवरावांची या जागेवर नेमणूक झाली. तेव्हां अँग्लोइंडियन वृत्तपत्रांनीं 'ही जागा सिव्हिलियनची आहे, काळ्या माणसाला दिल्यानें सिव्हिलियनाच्या हक्कावर गदा येते' अशी कोल्हेकुई माजविण्यांत कसूर केली नाहीं. परंतु सरकारचा या बाबतींत पक्का विचार झाला असल्यानें 'ही जागा वास्तविक कोणाची,' याविषयीं न विचारतां केवळ स्वार्थप्रेरित चोमडपणानें सरकारला कर्तव्याचें स्मरण देणाऱ्या अँग्लोइंडियन वृत्तपत्रांच्या लांडया कारभाराचा या वेळीं कांहीं उपयोग झाला नाहीं. 'कोल्हा काकडीला राजी' या न्यायानें सरकार ऐकत नाहीं, असें दिसल्यावर त्यांनीं, माधवरावांना हंगामीच काम देण्यांत आलें आहे, त्यांची नेमणूक कायमची नाहीं, असें आपलें समाधान करून घेतलें आणि हाकाटी बंद ठेवली. १८८७ सालांत माधवरावांची स्पेशल जज्जांच्या जागेवर कायमची नेमणूक झाली, तेव्हां या पत्रांनीं आणखी एकदां गोंगाट केला. पुनः त्यांस मागलाच अनुभव आला. ही जागा सिव्हिलियनाची आहे, हा मुद्दा सरकारलाही कबूल होता. म्हणून माधवरावांना सिव्हिलियनाइतका पगार मिळाला नाहीं. त्यांतला एक तृतीयांश कापून बाकीचा पगार त्यांना देण्यांत आला. १८९१ च्या नोव्हेंबरांत माधवरावांना हायकोर्टाच्या उच्चासनावर सरकारनें चढविलें, तोपर्यंत ते याच कामावर होते.

१८८५ सालांत त्यांना कायदे कौन्सिलांतल्या नामदारीचा मान सरकारानें अर्पण केला, ही माहिती मागल्या प्रकरणांत आली आहे.

सर रिचर्ड टेंपल साहेबांनीं स्वदेशीं प्रयाण केल्यावर मुंबई इलाख्याला लाभलेले गव्हर्नर उदार मनाचे होते. सर जेम्स फर्ग्युसन येथें आल्यावर त्यांचें मन कलुषित करण्याची खटपट जवळच्या अधिकाऱ्यांनीं कांहीं दिवस चालविली, परंतु या खटपटीला ते बळी पडले नाहींत. त्यांनीं अनेक लोकप्रिय कार्यांत भाग घेतला व या इलाख्याच्या अनेक भूषणावह संस्था त्यांच्या कारकिर्दींत निर्माण झाल्या. फर्ग्युसन साहेबानंतर लार्ड रे या नांवाचे गव्हर्नर आले. हे अतिशय दिलदार व उदार प्रवृत्तीचे गृहस्थ होते. या इलाख्यांत यांच्यासारखा लोकप्रिय गव्हर्नर दुसरा आलाच नाहीं, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांचा व माधवरावांचा स्नेह जमला व त्यांनीं माधवरावांच्या गुणांना सार्थकी लावण्याकरितां १८८५ सालाच्या मे महिन्यांत कौन्सिलांत जागा दिली. ही जागा युरोपियन सिव्हिलियनाची होती. युरोपियन सिव्हिलियन गेल्यावर त्याच्याऐवजीं हिंदी बिनसनदी अंमलदाराला नेमल्याचें लार्ड रे यांनीं पहिलेंच उदाहरण घडवून आणलें व मागली वहिवाट मोडली. कौन्सिलची जागा देतांना या लाटसाहेबांनीं माधवरावांकडे एक पत्र पाठविलें. 'तुम्हांला कौन्सिलच्या सगळ्या–विशेषतः मुंबईस भरणाऱ्या–बैठकींना हजर रहातां येणार नाहीं, फक्त पुण्याच्या बैठकीला हजर रहाणें तुम्हांस शक्य आहे. तथापि त्या बैठकींत हजर राहिल्यानें तुमच्या ज्ञानाचा, लोकहितदक्षतेचा सरकारला व जनतेला जो उपयोग होईल तो अल्पस्वल्प नसल्यानें कौन्सिलांतल्या नेमणुकीचा अनादर करूं नका' असा या पत्रांत मोठ्या आर्जवानें लिहिलेला आदराचा मजकूर होता.

माधवरावांनीं कौन्सिलदारी स्वीकारली व १८८५ सालीं पुण्याच्या बैठकींत ते हजर राहिले. तथापि त्यावर्षी त्यांस फारसें काम करतां

आलें नाहीं. १८८६ सालांत त्यांचा वरिष्ठ सरकारानें नेमलेल्या फायनॅंस कमिटींत समावेश करण्यांत आला. या कमिटींत हे एकटेच हिंदी गृहस्थ होते. फायनॅंस कमिटींत त्यांना नेऊन बसविण्याचें श्रेय रे साहेबांनाच देणें अवश्य आहे. ही कमिटी सगळ्या देशाच्या राज्यकारभारांतील जमाखर्चाचा हिशोब पाहून काटकसर सुचविण्याकरितां अस्तित्वांत आली होती. राज्यकारभाराच्या जमाखर्चाच्या आंकड्यांची अगदीं खडान्खडा माहिती माधवरावांना आहे, हें ओळखून लार्ड रे यांनीं त्यांना मुंबईसरकाराचे प्रतिनिधि या नात्यानें कमिटीवर पाठविलें. या कमिटीला अधिकार फारच थोडे होते व मुदतीच्या बाबतींतही वरिष्ठ सरकारानें कंजुषी दाखविल्यामुळें १८८६च्या अखेरीस कमिटीमार्फत चालणारी चौकशी तांतडीनें बंद करण्यांत आली व शिल्लक राहिलेलें काम पुढें एका स्वतंत्र कमिशनरानें शेवटास नेलें. कमिटींत बसण्याच्या संधीचा माधवरावांनीं कसा उपयोग करून घेतला, हें त्यावेळीं सिमल्याहून त्यांनीं आपले एक आंकडेशास्त्री मित्र कै. गणेश व्यंकटेश जोशी यांस पाठविलेल्या एका पत्रांतील पुढील उताऱ्यावरून दिसून येईल.

I prize my connection with it (committee) chiefly for the rare opportunities it affords, of learning a good many details of large questions, the papers regarding which could not otherwise have been made available to us.

'एरव्हीं राज्यकारभाराच्या मोठमोठाल्या प्रश्नासंबंधीं जी माहिती मिळण्याचा संभव नाहीं, ती माहिती मिळण्याची ही एक दुर्मिळ संधी आहे व अभ्यासाच्या दृष्टीनेंच मी तिचा लाभ घेत आहे' असा वरच्या उताऱ्याचा अर्थ आहे. कमिटींत असतांना माधवरावांची काम कर-

ण्याची तऱ्हा कशी होती, हें समजण्याकरितां आणखी एक उतारा देणें अवश्य आहे. वरचा व पुढचा हे दोन्ही एकाच पत्रांतील उतारे आहेत. माधवराव म्हणतात:—

"Every subject I take up requires a good deal of reading. I take notes freely and these notes are utilized by being turned to account in a formal official Note which I submit to the Committee or rather the more prominent of its members for correction. After passing through this test, I get it printed and circulated.

'जो विषय मी हातीं घेतों, त्याबद्दल मला बरेंच वाचन करावें लागतें. वाचनाचीं मनसोक्त टिपणें घेऊन मग मीं त्यांचा उपयोग सरकारसाठीं लिहिल्या जाणाऱ्या मजकुराकडे करतो. हा मजकूर कमिटीकडे-किंवा तिच्यांतील प्रमुख्य सभासदांकडे म्हटल्यास जास्त शोभेल-दुरुस्ती करितां पाठवितों आणि दुरुस्ती झाली म्हणजे छापून त्याची योग्य स्थानीं रवानगी होते.' असें माधवरावांनीं आपल्या कामाचें वर्णन केलें आहे, छापण्याकरितां गेलेल्या मजकुराचीं प्रुफें माधवरावांकडे आली म्हणजे पुन: त्यांवर कलम चालविण्याची त्यांची रीत होती. प्रुफांत ते इतक्यांदा खोडाखोड व नव्या मजकुरांची भरती करीत कीं, पांच सात वेळ असा अनुभव आल्यावर छापखानेवाले त्यांच्याकडे प्रुफें न पाठवितां शेवटच्या वेळीं तपासून झालेलीं प्रुफें छापून काढीत. पुण्याच्या ज्ञानप्रकाश छापखान्याला माधवरावांच्या प्रुफ-तपासणीचा वरच्यासारखा जिकिरीचा अनुभव पुष्कळदां येत होता. तोच अनुभव सिमल्याच्या छापखान्याकडील अधिकाऱ्याला आल्यामुळें माधवरावाकडे त्यानें वरचेवेळा त्याबद्दल

गाऱ्हाण्याचीं पत्रें लिहिलीं. त्यांतलीं एक दोन पत्रें माधवरावांच्या अवशिष्ट दप्तरांत पहावयास सांपडलीं.

फायनॅन्स कमिटीच्या रिपोर्टांत माधवरावांनीं बऱ्याच प्रकरणांना आपलीं मतभेदाचीं पानें जोडलीं आहेत. न्यायखात्यांतले सबजज्ज कमी करावे आणि नवे ठेवतांना त्यांच्या पगाराचें मान होतें त्यापेक्षां खालीं आणावें, असा कमिटीच्या इतर सभासदांचा इरादा होता. तो इरादा त्यांनीं रिपोर्टांत व्यक्त केला होता. माधवरावांनीं याबद्दल सबजज्जांचा कैवार घेऊन मतभेद दाखविला. सबजज्जांची तरफदारी करण्याचा माधवरावांना सर्वतोपरीनें अधिकार होता व याप्रसंगीं त्यांनीं तो गाजविला. शिक्षणखात्याच्या खर्चावर काटकसरीची कात्री फिरवावी, अशी रिपोर्टांत इतर सभासदांनीं सरकाराला मसलत दिली. माधवरावांना शिक्षणासारखा दुसरा प्रिय विषय नव्हता व त्यावर काटकसरीची धाड पडणार, असें दिसतांच त्यांनीं स्पष्टपणानें आपलें मनोगत मतभेदपत्रिकेच्या द्वारें सरकारच्या कानावर घालण्याची व्यवस्था केली. माधवरावांचे विचार आणखी कित्येक बाबतींत इतर सभासदांशीं जुळले नाहींत व त्याप्रमाणें ते त्यांनीं रिपोर्टांत स्वतंत्र रीतीनें मांडले आहेत. शिक्षणासंबंधीं कांहीं मजकूर त्यांनीं पुण्यास परत आल्यावर १८८७ सालीं लिहिला. त्यांत थोडी चूक झाल्यामुळें ती चूक कमिटीच्या अध्यक्षांनीं टीप जोडून सरकारच्या निदर्शनास आणली. या टिपेवरून असें म्हणावें लागतें कीं, माधवरावांना हा मजकूर लिहितांना कमिटीच्या अधिकारव्याप्तीचें भान राहिलें नाहीं व त्यांनीं अतिक्रमपूर्वक आपले विचार प्रकट केले. भान जाणें हें देशहिताशीं झालेल्या त्यांच्या पूर्ण तादात्म्याचेंच एक लक्षण आहे.

फायनँस कमिटींतल्या बहुमोल कामगिरीबद्दल त्यांना १८८७ च्या फेब्रुवारींत सी. आय्. ई. हा किताब सरकारकडून देण्यांत आला.

डेक्कन कालेज नुकत्याच निघालेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या ताब्यांत देण्याची कल्पना काळकसरीच्या वेडांत मुंबई सरकारामध्यें १८८६ सालीं अतिशय प्रबळ झाली होती. प्रस्तुत सोसायटीचे बहुतेक सर्व कार्यचालक डेक्कन कॉलेजांतलेच विद्यार्थी असल्यानें तें कॉलेज आपल्या ताब्यांत घेण्याची त्यास उत्कंठा वाटावी, यांत आश्चर्य नाहीं. पुण्याच्या सार्वजनिक जीवनाचीं सूत्रें हालविण्याची जबाबदारी माधवरावांच्या अंगावर नसती तर कदाचित् डेक्कन कॉलेजाचा स्वतंत्रपणा जाऊन तें १८८६ मध्येंच नामशेष झालें असतें. पण माधवरावांनीं पुण्यांतल्या वजनदार नागरिकांची उठावणी करून सरकारचा बेत सिद्धीस जाऊं दिला नाहीं. डेक्कन कॉलेजाचा खर्च सरकारच्या उत्पन्नांतून होत नाहीं. पेशव्यांच्या वेळच्या श्रावण मासांतल्या दक्षिणेचा निधि या कॉलेजाकडे खर्ची पडतो. डे. ए. सोसायटीची ग्रँट थोडी वाढवून हा निधि एकदां सरकारच्या जमाखर्चांत बुडाला म्हणजे पुनः तो कधीं वेगळेपणानें वर येण्याची आशा नको, ही दूरदृष्टीची भीति माधवरावांना वाटली व सार्वजनिक सभेमार्फत पुण्याच्या नागरिकांची सभा भरवून डेक्कन कालेजाच्या स्वतंत्र अस्तित्वाची आवश्यकता व अपरिहार्यता गळीं उतरविणारा एक अर्ज त्यांनीं सरकारांत पाठविण्याची व्यवस्था केली. डे. ए. सोसायटीशीं माधवरावांचा अतिनिकट संबंध असल्यामुळें त्यांना डेक्कन कॉलेज सोसायटीच्या ताब्यांत जाऊं न देण्याचें कार्य फार चातुर्यानें करावें लागलें. सोसायटीचा आव जाऊं द्यावयाचा नाहीं व सरकारी

काटकसरीच्या तडाख्यांतून डेक्कन कॉलेज वांचवावयाचें, अशी दोन सारख्याच तोलाचीं कामें त्यांस पार पाडावयाची होती. ती त्यांनीं तडीस नेऊन शिक्षणकार्याच्या जोपासनेचे उपकार जनतेवर केले.

फायनँस कमिटीच्या कामानिमित्त माधवराव पुण्याबाहेर असतांना कायदेकौन्सिलच्या बैठकींत वतनदारांच्या कायद्याच्या दुरुस्तीचें बिल चर्चेस निघालें. माधवरावांचें सिलेक्ट कमिटींत नांव असल्यामुळें फायनँस कमिटीच्या घाईंत सवड काढून त्यांनीं सदर कायद्यासंबंधीं रिपोर्ट लिहिला. वतनदारवर्गाचे हक्क मारण्याकडे सरकारची प्रवृत्ति आहे, असें या बिलामध्यें धडधडीत दिसत होतें. माधवरावांनीं या प्रवृत्तीचा बिलाच्या कलमांत दुरुस्त्या सुचवून निषेध केला आहे. पण सिलेक्ट कमिटीच्या रिपोर्टांत त्यांना आपले या विषयींचे सगळे विचार मांडण्याला सवड नव्हती, म्हणून त्यांनीं त्रैमासिकांत एक स्वतंत्र लेख लिहिला. हा लेख वतनदारांच्या हक्कांचें ऐतिहासिक वृत्त व महत्त्व समजून घेण्याच्या दृष्टीनें वाचनीय आहे. सिलेक्ट कमिटीच्या रिपोर्टानंतर हें बिल कौन्सिलांत दुसऱ्या वाचनाकरितां आलें, तेव्हां माधवराव पुण्यास नव्हते. बिलांतल्या दुरुस्त्यांचें अधिकारानें समर्थन करणारी व्यक्ति हजर नसल्यामुळें तिच्या गैरहजिरींत बिलाचें वाचन करणें इष्ट नाहीं, असें त्या बिलाच्या पुरस्कर्त्या सरकारी सभासदानें, माधवरावांच्या गुणाची स्तुति करून, कौन्सिलास सांगितलें. माधवराव सरकारी नोकर असल्यानें त्यांना जे विचार बोलून दाखविण्याची पंचाइत पडे, ते विचार आपल्या सलगींतल्या दुसऱ्या बाणेदार सभासदाला पटवून त्याच्याकडून कौन्सिलांत वदविण्याची युक्ति माधवरावांना बेमालूम

साधली होती. यामुळें कौन्सिलच्या कामांत कोणत्याही प्रकारची उणीव त्यांनीं पडूं दिले नाहीं.

१८८५ सालांत कांग्रेसच्या स्थापनेची वाटाघाट चालली होती, त्या बाबतींतली कांहीं माहिती मागल्या प्रकरणांत आली आहे. परंतु याखेरीज त्यांनीं एक निराळें काम त्या वर्षांत केलें. सदर सालांत हिंदुस्थानांतून ब्रिटिश मतदारांना जागृत करण्यासाठीं कांहीं वक्तृत्व-संपन्न आणि कर्तबगार पुढारी विलायतेस गेले होते. मुंबईतर्फे कै. सर नारायणराव चंदावरकर यांनीं इंग्लंडांत प्रयाण केलें. तेव्हां पार्ले-मेंटाच्या नव्या निवडणुकीची तेथें धामधूम चालली होती. हिंदुस्थानाच्या राजकीय परिस्थितीचें ज्ञान ब्रिटिश मतदारांना समक्ष कळवून त्यांची सहानुभूति संपादन करावी, हा हिंदी पुढाऱ्यांनीं विलायतेस जाण्यांतला हेतु होता. माधवरावांना हा उद्देश पसंत होता, इतकेंच नव्हे तर विलायतेस मतदारामध्यें वाटण्याकरितां जीं राजकीय पत्रकें तयार करण्यांत आलीं, त्याचा मसूदा माधवरावांनीं लिहिला होता. पुढें त्या मसुद्याचे विषयवारीनें सुटसुटीत व चित्ताकर्षक भाग पाडण्यांत येऊन तशीं लहान लहान पत्रकें विलायतेस वाटलीं गेलीं. या पत्रकांवर कै. काशिनाथ त्रिंबक तेलंग यांच्याही लेखणीचा संस्कार झाल्याची हकीकत तेलंगाच्या लेखाच्या आणि व्याख्यानांच्या एका संग्रह-ग्रंथाला लिहि-लेल्या प्रस्तावनेंत, सर दीनशा वाच्छा यांनीं निवेदन केली आहे. लार्ड रिपन यांच्या लोकप्रियतेचीं कारणें, हिंदी प्रजेला चिरडून टाकणारा लष्करी खर्च, असे विषयवारीनें त्या मसुद्याचे तुकडे पाडण्यांत आले. मूळचा मसूदा आपण लिहिला होता असें ता. १०-१०-१८८५ या तारखेच्या कै. जोशी यांस पाठविलेल्या पत्रांत माधवरावांनीं कबूल

केलें आहे. हे दिवस कांग्रेसच्या स्थापनेच्या वाटावाटीचे असल्यानें वरील पत्रांत त्यांनीं आपल्या राजकीय ध्येयाचें दिग्दर्शन करणारा थोडासा मजकूर लिहिला आहे. तो असा:—

We must push the volume and momentum of the Central absolutism, without endangering our defence against Foreign attack. This should be the leading motto of native political aspirations. Centralized India is a giant like steam-roller which crushes good and bad things under the same process and the germs of progress are nipped in the bud by the dead weight of inert force.

वृद्ध, तरुण, होतकरू व अनुभवी मंडळी जमवून विचार विनिमय करण्याची माधवरावांना विलक्षण हौस होती. पुण्याला ते प्रथम गेले तेव्हां 'हिंदू क्लब' नांवाची एक संस्था अस्तित्वांत होती, परंतु ती लवकरच लयाला गेली आणि पुढें माधवरावांनीं अनेक नव्या संस्था काढल्या. वाचनगृहें, प्रदर्शनें, व्याख्यानमाला, आणि मोठ्या प्रमाणांत राष्ट्रीयसभा, सामाजिक परिषद्, या संस्था काढण्याचा मुख्य उद्देश निरनिराळ्या विचाराची कर्तीं माणसें एकत्र आणून त्यांच्यांत सहकारिता व मैत्री उत्पन्न करावी, पर्यायानें त्यांच्यांत संघ-शक्ति निर्माण करावी हाच होता. कर्ता पुरूष आपल्या क्षेत्राबाहेर न गेल्यास त्याच्या स्वभावांतले दोष जाणार नाहींत, त्यांच्या दृष्टीचा विस्तार होणार नाहीं, कूप मंडूकवृत्ति बळावत जाईल, हें उघड आहे. आपापल्या जमावांत रहाण्याच्या व बरोबरीच्या कर्त्या लोकांत न मिसळण्याच्या प्रवृत्तीचे दुष्परिणाम हिंदुस्थानच्या राष्ट्रीय प्रकृतीवर झाले

आहेत, ही गोष्ट माधवरावांसारख्या सूक्ष्म-दृष्ट्याच्या नजरेंतून सुटली नव्हती व म्हणून ते स्वतःच्या उदाहरणानें समानशीलांच्या सहवासाची आवड, निरनिराळ्या संस्था स्थापन करून वाढवीत होते. त्यांच्या प्रोत्साहनानें व प्रेरणेनें अशा अनेक संस्था निघाल्याचें पुण्याच्या इतिहासांत दाखवितां येईल. फायनँस कमिटीच्या कामाकरितां हिंदुस्थानांत प्रवास करीत असतां सहवासाची किंवा परस्परसंगतीची अभिरुचि कोणकोणत्या प्रांतांत किती प्रमाणामध्यें आढळते, याचें त्यांनीं अवलोकन चालविलें होतें १८८७ सालीं मुंबईच्या हिंदू यूनियन क्लबानें त्यांना पानसुपारी दिली. त्याप्रसंगीं त्यांनीं 'Club-life in India' 'हिंदुस्थानांतले क्लब' या विषयावर भाषण करून या देशांतल्या कोणत्या प्रांतांतील समाजामध्यें एकमेकांत मिसळण्याची आवड विशेष आहे, हें सांगितलें. मद्रासमध्यें ही आवड फार आहे. बंगालमध्यें मद्रासपेक्षां कमी आहे, आणि इतर बहुतेक प्रांत मद्रासबंगालच्या मागें आहेत, असें त्यांचें मत झालें होतें. तें त्यांनीं मुंबईच्या व्याख्यानांत बोलून दाखविलें. १८९० सालांत पुण्याला एक 'युनियन क्लब' नांवाची नवीन संस्था निघाली, त्यावेळीं माधवरावांनीं आणखी एकदां याच विषयाचा ऊहापोह केला. 'क्लबाचे अनेक उपयोग आहेत. क्लबामुळें बरोबरीच्या मंडळींत बसून एकमेकांच्या गुणदोषांची प्रांजलपणानें व प्रेमळपणानें स्पष्ट चर्चा करतां येते. आपल्या अंगांत जे दोष वसत असतील ते दोष आपले आपल्याला दिसत नाहींत व कळत नाहींत. ते दोष नजरेस न आल्यास स्वभावांत अहंकार माजतो, आणि त्याची स्वच्छता जाऊं लागते. स्वभावसंशोधनाला क्लबासारखा रामबाण उपाय नाहीं. मात्र दोष दाखवितांना ते प्रेमाच्या गोड शब्दांनीं निद-

र्शनास आणावे व दोष दाखविणाऱ्या उपकार्याबद्दल मनांत राग आणूं नये' अशा अर्थाचे त्यांनीं यूनियन क्लबांत भाषण केलें.

१८९० मध्यें सामाजिक सुधारणेच्या वादानें अत्यंत कठोर स्वरूप धारण केलें होतें. या वादानें सार्वजनिक कार्यांत पडणाऱ्या अनेक व्यक्तीमध्यें चिरकालीन वैमनस्याचें बीजारोपण केलें. पुण्यांत तेव्हांपासून दुहीला प्रारंभ होऊन दोन्ही पक्ष—विशेषतः पुराणमताभिमानी—प्रतिपक्षाला पाण्यांत पाहूं लागले. त्याचेंच पर्यवसान पुढें सार्वजनिक सभेला आणि पुण्यास भरलेल्या कांग्रेसच्या बैठकीला भोंवलें.' परंतु माधवरावांच्या चित्तांत या दुफळीच्या अस्वस्थतेला किंवा वैमनस्याला थारा मिळाला नाहीं. त्यांनीं या वादांतून जुन्या संस्था तर सुरक्षित बचावून नेल्याच, पण एका उपयुक्त नव्या संस्थेला जन्म दिला. ती संस्था म्हणजे Industrial Association of Western India पश्चिम हिंदुस्थानांतील औद्योगिक संघ, ही होय. औद्योगिक चळवळींत लक्ष घालणाऱ्या माणसांना आपली कर्तबगारी दाखविण्याला स्थळ नव्हतें, तें या संस्थेनें त्यांस करून दिलें. १८८९ सालांत त्यांनीं या प्रश्नावर प्रांतोप्रांतींच्या वृत्तपत्रांचीं व पुढाऱ्यांचीं मतें घेण्याला प्रारंभ केला. बहुतेकांनीं अनुकूलता दर्शविली. सामाजिक, राजकीय, अशीं राष्ट्रीय चळवळीचीं दोन अंगें मूर्तावस्थेस येऊन जोमानें कार्य करीत होतीं, पण तिसरें औद्योगिक अंग त्यांस जोडल्याशिवाय ही चळवळ सर्वांगपूर्ण होणार नाहीं, असें माधवरावांना वाटत होतें व त्याविषयीं त्यांच्या मनाला हुरहूर अथवा चुटपूट लागली होती. तिसऱ्या अंगाला मूर्तावस्था आणण्याचा विचार करण्याकरितां माधवरावांनीं ह्यूमसाहेबांना एक लांबलचक पत्र लिहिलें. ह्यूमसाहेबांना कल्पना पसंत पडली, पण

कांग्रेसच्या पुढाऱ्यांना या नव्या कामाचा बोजा झेपेल कीं नाहीं, असा संशय त्यांनीं व्यक्त केला. ह्यूमसाहेबांच्या संशयानें माधवरावांचा निरुत्साह झाला नाहीं. कांग्रेसच्या नादीं न लागतां आपण आपल्या प्रांतापुरता प्रयत्न करावा, असें त्यांनीं ठरविलें. या विषयाकडे लोकांचें लक्ष वेधून घेण्याकरितां त्यांनीं १८८८ सालीं नगरास व्याख्यान दिलें व असा त्यांचा स्वतंत्र प्रयत्न सुरूच होता. संगमनराहून १८८९ च्या फेब्रुवारी २५ तारखेला कै. जोशी यांना लिहिलेल्या पत्रांत त्यांनीं आपली कल्पना स्पष्ट मांडली आहे. ते लिहितातः—

I am fully aware of the difficulties of the subject, rendered still more formidable by the want of study of industrial subjects and the absence of teaching in regard to it from those who guide the press, yet the effort has to be made and when I spoke about it at Nagar, I had in my mind's eye a few men-yourself prominently, a friend in Bengal, whose name I forget......Mr. Javerilal, Mr. D. Wachha as likely to help us.

'औद्योगिक चळवळीला अडचणी फार आहेत. वृत्तपत्रांचे चालक या विषयाचें लोकांना शिक्षण देत नाहींत. स्वतंत्र रीतीनें औद्योगिक प्रश्नाचा कोणी अभ्यास करीत नाहीं, या दोन कारणामुळें मूळच्या अडचणी जास्तच तीव्र भासतात. परंतु प्रयत्न हा केलाच पाहिजे. नगरास या बाबतींत भाषण करतांना माझ्या डोळ्यापुढें, आपण ( कै. जोशी ), बंगालचा एक मित्र, मि. जव्हेरीलाल, मि वाच्छा, अशी कांहीं मंडळी होती. त्यांची आपल्याला या कामीं मदत होण्याचा संभव आहे.' असा वरील उताऱ्याचा आशय आहे. त्यांतली नामावळी देण्याचें एक कारण येथें सांगणें अवश्य आहे. १९०५ सालीं कांग्रे-

सला जोडून एक औद्योगिक परिषद् बनारस येथें भरली होती. तिच्या अहवालाच्या प्रस्तावनेंत तेव्हांच्या परिषदेच्या चालकांनीं औद्योगिक चळवळीचा पूर्वेतिहास दाखल करतांना मुंबई इलाख्यांतल्या चळवळीचें सगळें श्रेय माधवरावांच्या पदरीं बांधलेलें पाहून, टिळकांनीं केसरींत सदर इतिहासामध्यें कै. महादेव बल्लाळ नामजोशी यांचें नांव गाळल्याबद्दल प्रस्तावना लिहिणाऱ्या मंडळीला कोरडे मारले आहेत. नामजोशी सुरुवातीपासून या चळवळींत नव्हते, पुढें त्यांनीं तींत भाग घेतला, असें सिद्ध करण्याला वरील उतारा पुरेसा आहे. मुंबईइलाख्यातील या चळवळीच्या उत्पादकाचा मान माधवरावांबरोबर नामजोश्यांना देतां येत नाहीं, अशी वरील उताऱ्यावरून वाचकांची खात्री पटेल.

कै. गणेश व्यंकटेश जोशी यांनीं वरील पत्राला लिहिलेल्या उत्तरांत, आणखी कांहीं अडचणी दाखविल्या. माधवरावांनीं त्यांचें पुढील वाक्यानें खेडाहून ता. ६-३-१८८९ रोजीं लिहिलेल्या पत्रांत निराकारण केलें आहे. हें वाक्य त्यांचें सार्वजनिक चळवळींतलें ब्रीद दर्शविणारें आहे. ते म्हणतातः—

In these, as in all other matters-I attach more value to the work of educating the public mind to entertain new and solvent ideas.

'नव्या व भ्रमनाशक कल्पना लोकांच्या मनाला पटण्याकरितां जें शिक्षण पाहिजे तें शिक्षण असल्या चळवळीनें मिळतें व त्यालाच मी जास्त महत्त्व देतों' असें वरील वाक्यांत माधवरावांनीं म्हटलें आहे.

याप्रमाणें प्राथमिक पूर्वतयारीची चर्चा संपल्यावर १८९० सालीं औद्योगिक परिषदचा उपक्रम करण्यांत आला. अध्यक्षांनीं प्रास्ताविक

भाषण करून परिषदेचा हेतू सांगण्याची कामगिरी माधवरावांकडे सोंपविली. तेव्हां 'औद्योगिक परिषद्' या विषयावर माधवरावांनीं जें भाषण केलें, तें त्यांच्या हिंदी अर्थशास्त्र Indian Economics नांवाच्या पुस्तकांत प्रसिद्ध झालेलें आहे. हिंदी उद्योगधंद्यांचा विचार करणारांनीं त्याचीं पारायणें करावीं, इतकें तें महत्त्वाचें आहे. राजकारण आणि समाजकारण या दोन्ही व्यवहारांत मतभेदाला जागा सांपडते. अर्थशास्त्रांत वाद होण्याचें कारण नाहीं. जुन्या वेदांताच्या वाङ्मयांत आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक, असे त्रिविध ताप वर्णिलेले आहेत. त्यांपैकीं पहिल्या व दुसऱ्या तापांच्या बाबतींत मतभेदामुळें अनेक संप्रदाय उत्पन्न झालेले असून ते सर्व स्वयंमन्य आहेत. त्यांना दुसरा कोणी उपदेश करायला गेला तर सहन होत नाहीं. तिसऱ्या म्हणजे आधिभौतिक दुःखांची बाब अशी आहे कीं, प्रत्यक्ष प्रमाणांमुळें सर्वांना एकाच स्वरूपाचा अनुभव येतो व मतभेद होण्याला वाव रहात नाहीं. अर्थशास्त्राचे प्रश्न आधिभौतिक दुःखांशीं संलग्न असल्यामुळें त्यांचा विचार करतांना मतभेदाचा वाद माजण्याचें भय नको. अशी प्रस्तावना करून माधवरावांनीं हिंदुस्थानाच्या दारिद्र्याची थोडक्यांत माहिती दिली आहे. दुष्काळ आणि मृत्यु यांच्या दरम्यान सरहद्दीवर आमच्यांतलीं लक्षावधि माणसें बसलेलीं आढळतात, लक्षावधि लोकांना पोटभर अन्न मिळत नाहीं, ज्यांची रोजची दोन आणे-देखील कमाई नाहीं, अशीं लाखों माणसें दाखवितां येतील, अशा स्थितींत दारिद्र्याच्या विषयावर विस्तारानें बोलण्याची गरज नाहीं, शिवाय ही गोष्ट युरोपियन व हिंदी विचारवंतांना मान्य झालेली आहे, एवढयावरच माधवरावांनीं प्रस्तुत विषयाला रजा दिली आहे, परंतु

माधवरावांचा 'माधवरावपणा' या लहानशा विवरणांतही दिसतो. हिंदुस्थानाला पारतंत्र्यामुळें व परदेशी व्यापाऱ्यांच्या स्पर्धेमुळें दारिद्र्य आलें, असा त्यांचा सिद्धांत नव्हता. ते म्हणतात:—

It is an old, a very old Inheritance. If we feel it more keenly now, we feel it because we are being roused from the Sleep of Ages, and our eyes have learnt to see, and our ears have learnt to hear.

या व्याख्यानांत १८७२–७३ सालांत त्यांनीं व्यक्त केलेल्या विचारांची पुनरावृत्ति आहे. 'इंग्रजी राज्यांत शेतकीशिवाय चरितार्थाचा दुसरा धंदा उरलेला नाहीं.' हें याप्रसंगीं त्यांनीं पुनः प्रतिपादन केलें, पण ऐतिहासिक काळांत आमच्या देशामध्यें शेतकरी, कच्चा माल पैदा करणारे मजूर व कारखानदार, आणि पक्क्या मालाचा जगांत प्रसार करणारे दुकानदार, या चौघांची सहकारिता नांदत नव्हती, असेंही बजावण्यास माधवराव विसरले नाहींत व यांतच त्यांच्या वृत्तींच्या समतोलपणाचें वैशिष्ट्य आहे. त्यांचा सिद्धांत असा:—

The co-ordination of Industries, which regulates the due proportions of men who plough the soil and raise raw produce, with those, who manufacture this raw produce, and others still who exchange and distribute it and the interplay of whose three-fold activities makes a Nation thrive, was never a very strong factor of our Collective Social Polity.

परदेशचे भांडवलवाले येथील व्यापार करूं लागल्यामुळें हिंदी जनतेच्या हातांतून व्यापार जात चालला, ही गोष्ट माधवरावांना कबूल नव्हती, असें नाहीं; पण याचें मुख्य कारण परदेशचे व्यापारी नसून

त्यांना वश असलेलीं निसर्गाच्या शक्तीचीं स्वस्त साधनें, हीं होत, असें त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे. हिंदी व्यापाराच्या घडामोडीचें चिंतन करणारांनीं त्यांचें पुढील वाक्य आपल्या हृदयावर कोरून ठेवावें. तें वाक्य असें:—

Foreign Competition, not because it is foreign, but because it is the competition of Nature's powers against man's Labour,—it is the competition of organised Skill and Science against Ignorance and Idleness,—is transferring the monopoly not only of wealth, but what is more important, of skill, talent, and activity to others.

ज्याला आपण परदेशच्या व्यापाऱ्यांची स्पर्धा म्हणतो ती वास्तविक निसर्गाचें व माणसाचें सामर्थ्य यांमधील चढाओढ आहे. एका बाजूला संघटनेच्या पायावर उभीं असलेलीं शास्त्र व कौशल्य हीं सामर्थ्यें असून दुसऱ्या बाजूस अज्ञान आणि आलस्य हीं आहेत. या झगडयांत हिंदुस्थानाचा केवळ द्रव्यापहारच होत नाहीं. कौशल्य, बुद्धि आणि कर्तबगारी, या महत्त्वाच्या गोष्टी या देशांतून जात चालल्या आहेत, असें त्यांनीं वरच्या उताऱ्यांत म्हटलें आहे. यानंतर आयात-निर्यात, विलायतेस जाणारा पैसा, वसाहतींची शक्यता, भांडवल वगैरे मुद्द्यांचा ऊहापोह करून त्यांनीं एकाच वाक्यांत कर्तबगारीचे मुख्य मुख्य गुण दाखविले आहेत. ते म्हणतात:—

We have to work with a will, to pull long, and pull all and to pull till we succeed.

औद्योगिक प्रश्नांचा खल करून माधवरावांनीं या नवीन संस्थेच्या कामाची १२ कलमांत रूपरेषा स्पष्ट केली आहे. जात, गोत, पक्ष यांचा संस्थेंत शिरकाव होतां कामा नये, अव्यवहार्य उद्देश पुढें

ठेवला जाऊं नये, आपली स्थिति पूर्णपणें ओळखावी, कर्तव्याचा निश्चय व उद्योग अखंड कायम ठेवावा, परदेशांत ज्या औद्योगिक उलाढाली चालल्या असतील, त्यांचा अभ्यास करावा आणि त्यापासून जो फायदा घेतां येण्याजोगा असेल तो घ्यावा, परदेशांतल्या कुशल कारागीरांचा धिक्कार करूं नये, त्यांना येथें आणून शिक्षण संपादन करावें, सरकारी मदतीवर विसंबून राहूं नये, आपलें भांडवल वाढवावें, बँका, उद्योगधंद्यांच्या शाळा स्थापन कराव्या, असा त्यांच्या कांहीं कलमांचा सारांश आहे. त्यांतलें आठवें कलम अत्यंत मननीय आहे व त्यांचें तात्पर्य चिरकाल टिकणारें असल्यामुळें तें जसेंच्या तसें येथें देणें प्राप्त आहे. स्वदेशांतल्या व्यापाराच्या उद्धाराची चळवळ हिंदुस्थानांत मधून मधून अतिशय उत्कटतेनें उसळत असतें व मग व्यक्तिशः व्यापार वाढविण्याची इच्छा दिसूं लागते, किंबहुना तिचा पुढारी म्हणविणारे गृहस्थ पुरस्कार करतात. माधवरावांचा खालील सिद्धांत हृदयाशीं धरल्यास देशाला व्यापाराच्या व्यवहारांत खरोखरा लाभ होण्याचा संभव आहे. तो सिद्धांत असा:—

No Hand-made Industry can hope to thrive in competition with Industry moved by cheap natural Agents. The free use of Natural Agents, moreover, makes large investments of capital a necessity, and thus handicaps all individual efforts beyond rivalry. What we have to bear in mind is, therefore the organization for Industry and Capital on the Joint Stock principle for collective and large undertakings.

या प्रास्ताविक निबंधाशिवाय त्यांनीं दुसराही निबंध वाचला Netherlands India and the Culture System हें त्याचें नांव

असून शेतसाऱ्यासंबंधीं डच सरकारानें जावा बेटांत करून पाहिलेल्या एका हितकारक प्रयोगाचें त्यांत वर्णन आहे.

औद्योगिक परिषदेच्या रूपरेषेंत त्यांनीं जितक्या कार्यांचा निर्देश केला, तितक्या सर्व कार्यांचा लोकांस पूर्ण परिचय करून देण्यासाठीं त्यांनीं पुढच्या तीन वर्षांत निरनिराळ्या विषयावर परिषदेच्या बैठकींतून निबंध वाचले. त्यांतल्या बहुतेकांचा 'हिंदी अर्थशास्त्र' या पुस्तकांत समावेश करण्यांत आला आहे. 'देशांतर–गमन' ( Foreign Emigration ) 'हिंदी पक्क्या मालाची सद्य:स्थिति आणि भवितव्यता' (Present State of Indian manufactures and out-look of the same) 'लोखंडासंबंधीं उद्योग–आरंभीचे प्रयत्न' (Iron Industry-Pioneer attempts) हिंदुस्थानांतील खऱ्या पतींची पुनर्घटना ( The Re-organization of Real Credit in India ) असे त्यांपैकीं कांहीं निबंध आहेत. १८९२ सालीं त्यांनीं डेक्कन कॉलेजांत 'हिंदी अर्थशास्त्र' या विषयावर एक निबंध वाचून अर्थशास्त्राच्या हिंदी मन्वंतराला प्रारंभ करून दिला. त्यापूर्वी 'हिंदी अर्थशास्त्र' हा शब्द प्रचारांत नव्हता. रसायनशास्त्राचे किंवा पदार्थविज्ञानशास्त्राचे सिद्धान्त जसे अबाधित व सार्वत्रिक आहेत, त्याचप्रमाणें अर्थशास्त्राचे सिद्धान्त अबाधित असून देशपरत्वें त्यांच्या परिणामांत अंतर पडत नाहीं, असा माधवरावांच्या प्रस्तुत व्याख्यानापूर्वी सर्वांचा समज होता. एका राष्ट्राला जे अर्थशास्त्राचे नियम लागू पडतील ते दुसऱ्या राष्ट्राला लागू पडणार नाहींत, प्रत्येक राष्ट्राचें अर्थशास्त्र निराळें, त्यांनीं अशी आपल्या भाषणानें खात्री पटविली. आपण नवीन कल्पनेचें प्रवर्तन करीत आहों, या कल्पनेच्या चिंध्या उडविण्याकरितां

पुष्कळसे गतानुगतिक वृत्तीचे जाडे जाडे शत्रु उत्पन्न होईल, याची अटकळ असल्यामुळें माधवरावांनीं अर्थशास्त्राच्या उत्पत्तिविकासाचें आणि मूलतत्त्वांचें ऐतिहासिक पद्धतीनें आमूलाग्र विस्तृत विवेचन केलें आहे. विशेषतः खुला व्यापार आणि संरक्षित व्यापार याचें अधिक विवेचन या निबंधांत आहे. निबंध वाचला तेव्हां लीवार्नरसाहेब अध्यक्ष होते. हिंदीपुढाऱ्यांविषयीं साहेबमजकुरांना सहानुभूति नव्हती, पण माधवरावांच्या विद्वत्तेच्या प्रकाशापुढें तेही दिपले व स्तुती करून मोकळे झाले. त्यांचे अर्थशास्त्रविषयक जेवढे निबंध लिहिले तेवढयांतलें रहस्य समजायला हा निबंध मननपूर्वक वाचल्याशिवाय गत्यंतर नाहीं. सांप्रत हिंदी अर्थशास्त्रावर पुष्कळ पुस्तकें झालेलीं आहेत व होत आहेत, पण हिंदी अर्थशास्त्राच्या युगाचें प्रवर्तकत्व सर्वस्वी माधवरावांनाच द्यावें लागतें.

१८९१ सालीं सरकारच्या प्रतिगमी व्यापारी धोरणामुळें स्वदेशीची लाट उत्पन्न झाली होती. डेक्कन कॉलेजमधल्या विद्यार्थीवर्गानें एक देशीमालाचें दुकान काढून स्वदेशी व्यापाराच्या उत्तेजनार्थ कांहीं भाषणें करविलीं. एका व्याख्यानाला माधवरावांना निमंत्रण होतें. माधवरावांनीं स्वदेशीचें व्रत देशांतलें यांत्रिक सामर्थ्य वाढविल्याखेरीज योग्य रीतीनें पाळलें जाणार नाहीं, असा उपदेश केला. या प्रसंगीं टिळक हजर होते. त्यांनीं स्वदेशी माल वापरणें हा स्वदेशाभिमानाचा भाग असल्यामुळें अर्थशास्त्राच्या सिद्धान्तांना व त्या शास्त्राच्या अध्ययनानें मनांत उद्भवणाऱ्या समजुतींना धाब्यावर बसविण्याला हरकत नाहीं, असा अर्थाचें भाषण केलें. त्यावरी औद्योगिक परिषदेमध्येंही दुहीचा प्रादुर्भाव झाला होता. शेतकऱ्यांच्या बँकासंबंधीं एक निबंध

माधवरावांनीं लिहिला होता. परदेशी भांडवल हिंदुस्थानांत आलें म्हणून नुकसान होत नाहीं, अशी माधवरावांची बालंबाल खात्री असल्यानें त्यांनीं परदेशी भांडवलवाल्यांना आपल्या विचारांतून वगळलें नव्हतें. पुण्यास १८९० नंतर उदयास आलेल्या नव्या देशभक्तांना माधवरावांनीं परदेशी भांडवलाविषयीं दाखविलेली अनुकूलता आवडली नाहीं व त्यांनी अनुकूलता व्यक्त करूं नये, असा टिळक नामजोशी वगैरे नव्या देशभक्तांचा आग्रह पडल्यामुळें माधवरावांनीं तेवढा भाग गाळण्याचें कबूल केलें. सदर देशभक्तांच्या आग्रहांत तथ्य होतें म्हणून माधवरावांनीं ही कबूली दिली नव्हती. परिषदेच्या कार्याची नौका दुहीच्या खडकावर आदळून दुसऱ्याच वर्षी फुटण्याचा रंग दिसत होता, तो प्रसंग टाळण्याकरितां त्यांनीं माघार घेतली, परंतु माघार घेतांना नव्या मंडळीला, 'त्यांनीं परदेशी भांडवलाबद्दल चकारसुद्धां काढूं नये', अशी उलट अट घातली. उभयपक्ष या अटीनें बांधले गेले होते, पण व्यासपीठावर आरोहण करतांक्षणीं नव्या देशभक्तांचा देशाभिमान भडकला व त्यांनीं जन्मभाषेच्या आश्रयानें परदेशी भांडवलवाल्यांवर आवेशपूर्वक तोंडाचा पट्टा चालविला. एका पक्षानें अट मोडल्यामुळें माधवरावांनीं मूग गिळून बसण्याची आवश्यकता नाहींशी झाली, त्यांनीं परदेशी भांडवलामुळें झालेल्या फायद्याचें विवेचन आरंभलें, त्यासरशीं या देशभक्तांनीं व त्यांच्या गोतावळ्यानें 'प्रतिज्ञा मोडली, बोलांत बोल नाहीं' अशा अर्थाची ओरड सुरू केली. औद्योगिक परिषदेंत पुष्कळसे युरोपियन आले होते आणि सर्व जातींचा व वर्गांचा समावेश या कार्यांत व्हावा, या बुद्धीनें माधवरावांनींच त्यांना पाचारण केलें होतें. परदेशी भांडवलवाले म्हणजे

अर्थात युरोपियन, यामुळें भांडवलवाल्यांवर टोले मारतां मारतां कित्येक वक्त्यांनीं सर्वसामान्य युरोपियनांसही शाब्दिक धक्केचपेटे लगावले. मराठींत हीं भाषणें झालीं, यांमुळें निभावलें; नाहींतर माधवरावांनीं आपली तोंडावर भरसभेंत परभारें विटंबना करण्यासाठींच बोलाविलें, असा परिषदेस आलेल्या युरोपियनांचा निष्कारण गैरसमज झाला असता. साध्या शिष्टाचाराच्या दृष्टीनेंदेखील देशभक्तांचें वरील वर्तन निंद्य ठरतें. अट व शिष्टाचार या दोन्ही बंधनांचा चुराडा उडाल्यावर माधवराव बोलावयास उभे राहिले, परंतु अडथळा केला जात आहे, असें पाहून माधवरावांच्या चित्तांत क्रोधाचा संचार झाला. याप्रसंगीं त्यांनीं अतिशय कडक भाषेंत सदर देशभक्तांची कानउघाडणी केली, असें त्यावेळच्या वृत्तपत्रांवरून दिसतें. माधवरावांचें उग्र स्वरूप पाहून गोंगाट करणारांची बोबडीच वळली व त्यांच्या पुढाऱ्यांची गाळण उडून त्यांनींही जिभेला खीळ घातली. माधवरावांनीं केलेल्या कानउघाडणींत ज्ञानाचा आणि उपदेशाचा भाग जास्त होता. परिषदेची ही दुसरी बैठक बरखास्त झाल्याचें जाहीर करतांना माधवरावांनीं समारोपादाखल जें भाषण केलें, तें अत्यंत रसाळ व ज्ञानप्रचुर होतें. प्रतिपक्षाच्या मनाचें समाधान करणारें होतें, असें कांहीं वृत्तपत्रांतून त्याचें वर्णन आहे. परंतु प्रतिपक्षांतल्या कित्येक व्यक्तींचा राग प्रसंगापुरताच नव्हता, परिषदेंत उद्भवलेल्या रागानें त्यांच्या अंतःकरणांत दीर्घद्वेष व खुनशीपणा या दोषांना जन्मास घातलें व त्याचा परिणाम केसरीच्या एका लेखांत दिसून आला. या लेखांत 'परदेशी भांडवलाचे गोडवे गाणारे माधवराव देशद्रोही आहेत' असा स्पष्ट ध्वनि आहे.

माधवरावांना व्यापारोत्कर्षाच्या मार्गाबद्दल अनिष्ट कल्पना लोकांत बलवत्तर झाल्यास व्यापारोत्कर्ष होणार नाहीं, असें वाटत असल्यामुळें त्यांनीं आपले विचार यावर्षी डिसेंबरांत सोलापुरास पुनः बोलून टाकले. ‘देशी व्यापार व तो सुधारण्याचे उपाय’ असा भाषणाचा विषय होता. इतर वक्त्यांनीं आपले अर्ध्याकच्च्या ज्ञानावर पोसलेले विचार प्रकट केल्यावर माधवरावांनीं आपले विचार निवेदन केले. हा व्याख्यानाचा योग सोलापुरचे सुप्रसिद्ध व्यापारी कै. अप्पासाहेब वारद यांनीं जुळवून आणला होता. माधवरावांनीं व्यापाराचे तीन अर्थ सांगितले. १ माल विकत घेऊन दुसऱ्यास देणें, २ कारखाने घालून माल तयार करणें, ३ दुकानदारी. नंतर त्यांनीं स्वराज्यामध्यें व्यापार भरभराटींत होता व आतां इंग्रजी राज्यांत खालावला या भ्रामक दुर्ग्रहाचें निर्मूलन केलें. ते म्हणाले:—

स्वराज्यांत व्यापार फार होता व आतां कमी झाला, असें म्हणण्यास ऐतिहासिक आधार नाहीं. १७९१ ची स्थिति पहा, १८१८तील स्थिति पहा, १८४८तील पहा. अशी खात्री पटेल कीं, हल्लींच व्यापार वाढला आहे. व्यापार सांप्रत वाढत आहे, पण दिशा चुकली आहे. काशीला जाण्याचा हेतु मनांत धरून आपण रामेश्वराची वाट चालत आहों. पान तंबाखूवाल्यांची अक्कल निराळी, कोटींची उलाढाल करणाराची निराळी. आमचे व्यापारी घरकोंबडे आहेत. त्यांना घर सोडवत नाहीं. इंग्रज व्यापारी उद्योगी आहेत, ते स्वस्थ बसत नाहींत व निराश होत नाहींत. कारखान्यांची गोष्ट निराळी आहे. दाणापाण्यावांचून काम करणारे हत्ती म्हणजे कारखाने. खर्च कायतो एकदांच पुष्कळ होतो. हस्तकौशल्याची कारागिरी करणारे सारेच देश आमच्यासारखे मागासलेले आहेत. पण कांहीं कारखान्यांना किंवा धंद्यांना फार पैसा लागत नाहीं. उदाहरणार्थ छत्री घ्या. छत्रीपायीं दरसाल ३० लाख रुपये परदेशीं जातात.

शेतकीवर अवलंबून रहाण्याची संवय आम्हांस जडली आहे. कांसेवरच्या गोचिडीसारखी आमची स्थिति आहे. धान्य असूनही दुष्काळांत तें विकत घेण्याची ऐपत शेकडा ८०-९० लोकांना असत नाहीं. आपला पैसा कारखान्यांत घालून आपण बऱ्याच लोकांस भाकर विकत घेण्याला द्रव्य पोंचविलें पाहिजे. मुंबईस दुष्काळ दिसत नाहीं, याचें कारण काय ? याचा विचार केल्यास कारखान्यांचें महत्त्व समजून येईल.

कारखाने, शेतकी, आमच्या लोकांतले दोष, यांचें विवेचन केल्यावर ते स्वदेशीच्या प्रश्नाकडे वळले व निग्रहाच्या शब्दांत म्हणाले:—

माझी अशी पक्की खातरी आहे कीं, विलायतेसारखा माल आमच्या देशांत तयार झाल्याशिवाय इतर सगळ्या खटपटीस फारसें यश येणार नाहीं. पैशाची व उपभोगाची जास्त सोय ज्यांत आहे त्याच वस्तु बहुजनसमाज वापरणार. मग त्या देशी असोत वा विदेशी असोत, ही गोष्ट अगदीं निःसंशय खरी असल्यानें हस्तकौशल्यासारख्या प्रयत्नास यश मिळण्याची आशा करणें व्यर्थ दिसतें. सबब आपल्या देशांमध्येंच उद्योग वाढवून समाईक व्यापाराचे तत्त्वास अनुसरून भांडवल गोळा केले पाहिजे. विलायतच्या तोडीचा माल तयार केला पाहिजे, म्हणजे आपोआपच विलायती माल मागें पडून देशांत व्यापारवृद्धि होईल व देश संपन्न होईल. सारांश माल उत्तम जिकडून तयार होईल, तिकडे गेले पाहिजे व आळस सोडून कारखाने उभारले पाहिजेत. त्याशिवाय देशाच्या व्यापाराची भरभराट होणें दुरापास्त आहे.

माधवरावांची प्रतिवर्षी सरकारांत व लोकांत मानमान्यता वाढत चालली होती. त्यांच्या सल्लामसलतीवांचून राष्ट्रांतल्या चळवळीचें पान हालत नव्हतें; परंतु जगामध्यें घराबाहेर जो त्यांचा दराव होता तो घरांतल्या निकट नातेवाइकांत नव्हता. त्यांचें मन ओळखून त्याप्रमाणें एकच व्यक्ति घरांत वागत होती, ती म्हणजे श्री. रमाबाई याच होत. माधवरावांची नाशकास बदली झाली, तेव्हांपर्यंतचें श्री. रमाबाईंचें

चरित्र पूर्वी येऊन गेलें आहे. त्या गोष्टीला यावेळेपर्यंत बारा वर्षें झालीं असल्यानें त्यांच्या चरित्रांच्या विकासाचें समालोचन करण्यास हरकत नाहीं. नाशकास श्री. रमाबाईंना पूर्ण स्वातंत्र्य असल्यामुळें आपल्या सन्मान्य पतीच्या मनोगतानुसार आपल्या जीविताला वळण देण्याला त्यांस यथेच्छ अवसर सांपडला. शिक्षणाची गोडी त्यांना इतकी लागली होती कीं, थोडयाच दिवसांनीं आपणांस इंग्रजी शिकण्याचा अभिलाष उत्पन्न झाल्याचें त्यांनीं पतीच्या कानावर घातलें. माधवरावांना त्यांच्या महत्त्वाकांक्षेचें सकृद्दर्शनीं नवल व कौतुक वाटलें. परंतु त्यांनीं हिरमोड न करतां इंग्रजी शिकविण्याला प्रारंभ केला. १८८१ सालीं पुण्यास परत आल्यानंतर या शिक्षणाला खळ पडला नाहीं. मिशनरी बायांपैकीं एका बाईला त्यांनीं श्री. रमाबाईंना शिकविण्याचें काम सांगितलें. इंग्रजींत प्रवेश झाल्यानंतर बायबलचा नवा करार वाचण्याला त्यांनीं प्रारंभ केला. घरांतल्या इतर वडील स्त्रियांना हा प्रकार साहजीकच खपला नाहीं. त्यांच्या कांचणींतच श्री. रमाबाई आपला अभ्यास चालवीत होत्या. १८८२ सालामध्यें पतीच्या आज्ञेवरून त्यांनीं एका सभेंत व्याख्यान दिलें, आणि त्यावरून जो गहजब उडाला, त्याचा वृत्तान्त श्री. रमाबाईच्या आठवणींतून वाचल्यास उत्तम. आपल्या पत्नीला घरांतल्या मंडळीकडून त्रास होतो, हें माधवरावांना समजत नव्हतें, असें नाहीं. परंतु श्री. रमाबाईंच्या अंगीं स्वावलंबनाचा जोम व कणखरपणा उत्पन्न होण्यासाठीं त्यांनीं, कधीं 'असें कां करतां' म्हणून घरांतल्या मंडळींना विचारलें नाहीं. मात्र श्री. रमाबाईंची समजूत घालून त्यांस धीर देण्याची पद्धत ठेवली होती. शिवाय रमाबाईसमोर त्यांच्या स्वतःच्या वर्तनाचा कित्ता होताच. कोणी तोंडावर कितीही भडिमार केला तरी माधवराव कधीं

उलटून जबाब देत नसत. परंतु आपला क्रम सोडीत नसत. श्री.रमाबाईंनीं तोच कित्ता गिरवला आणि सगळ्या अडचणींतून आपलें ज्ञानार्जनाचें ध्येय गांठलें. या दिवसांत श्री. रमाबाईंना पं. रमाबाईसारख्या मैत्रिणीचें संगतिसुख लाभल्यामुळें त्यांचे दिवस जास्त आनंदांत जाऊं लागले होते. महाराष्ट्रानें ज्यांचें चिरंतन भूषण मानावें, अशा व्यक्तींपैकीं पं. रमाबाई ही एक व्यक्ति होऊन गेली. परंतु ख्रिस्ती धर्माच्या कळपांत जाऊन त्या धर्माच्या वाढीला त्यांची मदत झाल्यामुळें महाराष्ट्राला त्यांच्याविषयीं स्वकीयत्वाचा जिव्हाळा आणि अभिमान वाटत नसल्यास आश्चर्य नाहीं. पं. रमाबाईची बुद्धिमत्ता व कर्तृत्वशक्ति अलौकिक होती. त्यांच्या गुणाचें महाराष्ट्रानें साफल्य केलें नाहीं, याबद्दल संदेह बाळगावयास नको. पण स्वजनांत राहून हालअपेष्टा सोशीत देशाच्या उद्धाराला हातभार लावण्याचें लोकोत्तर धैर्य त्यांच्यांत दिसलें नाहीं. परधर्माच्या स्वीकारानंतर त्यांनीं ज्या कार्याला प्रारंभ केला, त्या कार्याचें महत्त्व महाराष्ट्रियांच्या लक्षांत आल्यामुळें स्त्रियांच्या उन्नतीकरितां चाललेल्या उद्योगाच्या इतिहासाला नवीन दिशा लागली. अल्पांशानें असेंही म्हणतां येईल कीं, पुण्याला फीमेल हायस्कूल काढण्याच्या पूर्वतयारीला त्यांची मदत झाली. पुढें सात आठ वर्षांनीं त्यांच्या कर्तबगारीसंबंधीं प्रतिकूलतेचें वारें लोकांत वाहूं लागलें असलें तरी १८८२ व तदनंतर श्री. रमाबाईंना पंडिताबाईच्या सहवासापासून सुख झालें हें खचित. १८८४ सालीं माधवरावांनीं मलबारींस लिहिलेल्या पत्रांतील पुढील उताऱ्यावरून घरांतल्या कटकटींचा व त्रासाचा बोध होण्यास हरकत नाहीं. सामाजिक सुधारणेच्या बाबतींत घरांतल्या मंडळीचा व आपला वेबनाव होतो, असा संभव दिसेपर्यंत सामाजिक सुधारणा अंमलांत

आणतां येते, असें माधवरावांनीं या उताऱ्यांत म्हटलें आहे. ते लिहितात:—

People find fault with us, even abuse us, for half-heartedness, for our apparent want of fire and enthusiasm. God only knows that in our households, we are perpetually at war with our dearest and nearest. We struggle and strive to do our best, and have perforce to stop at many points, when we fear the strain will cause the rupture.

शेतकऱ्यांच्या ॲक्टाची अंमलबजावणी करण्याचा अधिकार माधवरावांना मिळाल्यानंतर श्री.रमाबाई त्यांच्याबरोबर जाऊं लागल्या. दौऱ्यांतदेखील त्यांच्या शिक्षणाला खंड पडला नाहीं. माधवरावांच्या स्वभावांतल्या दैवीगुणांचा परिचय त्यांना दौऱ्यांत झाला. उषःकाळाच्या ब्राह्म मुहूर्तावर उठून ईश्वराचें स्तोत्रपाठानें किंवा महाराष्ट्रिय साधुसंतांच्या अभंगवाणीनें भजन करण्याचा माधवरावांचा नित्यक्रम होता. फिरतीवर असतांना प्रस्तुत क्रमानुसार स्तोत्रांतल्या किंवा संतवचनांतल्या अर्थाशीं तल्लीन होऊन माधवरावांची गुणगुण सुरू असली म्हणजे त्याच्या मुखमंडलावर दैवी गुणांची प्रभा पसरून श्री. रमाबाईंना त्याकडे अनिमिष दृष्टीनें पहात रहावेसें वाटें. भजनाच्या कामांत ते श्री. रमाबाईंची बहुधा मदत घेत असत. पहाटेस उठून त्यांनीं पुस्तक हातांत घेऊन वाचण्याला प्रारंभ केला कीं, ‘ त्यांतले श्लोक, केका, अभंग ’ माधवराव म्हणूं लागायचे. ‘ किंवा ऐकत असतां अर्थाकडे मन गढलें म्हणजे तल्लीनतेनें चुटक्या अगर टाळ्यासुद्धां वाजवावयाच्या. एखादा नामदेवाचा अभंग आवडीसारखा आला तर तो पुनः पुनः म्हणावयास सांगावयाचा व अभंगाच्या विचारांत मन गढून गेल्यामुळें डोळे मिटून ’ माधवराव ‘ डोलूंसुद्धां

लागावयाचे,' याप्रमाणें स्थिति झाल्यावर माधवरावांच्या चर्येवर जो देखावा विलसे, त्याचें वर्णन श्री. रमाबाईंनीं स्वानुभवाच्या शब्दांत केलें असल्यामुळें तेंच येथें सादर करणें श्रेयस्कर आहे. त्या म्हणतात:—*

अशावेळीं सकाळच्या संधिप्रकाशाच्या शांत उजेडांत हें भक्तिपूर्ण मुख फारच प्रेमळ दिसून माझें मन सद्गदित होई आणि स्वतःबद्दल प्रेम व पूज्यबुद्धि आपोआप वाढे. मी एकटी असलें म्हणजे माझ्या मनांत असें येई कीं, नुसत्या संसाराच्या किंवा नात्याच्या दृष्टीनें मी इकडे पहातें; पण येथें सामर्थ्य व दैवी भाग जास्त आहे.

१८९१ सालीं माधवरावांना सोलपुराकडे दौऱ्यावर असतां कॉलऱ्याच्या विकारास बळी पडण्याची वेळ आली होती, पण त्यांतून ते सुटले याचा उल्लेख मागें आला आहे. या प्रसंगीं श्री. रमाबाईंनीं प्रसंगावधान दाखविल्यामुळें माधवराव मृत्यूच्या जबड्यांतून सुरक्षित बाहेर पडले. माधवरावांच्या सहवासामुळें त्यांच्या मनावर जे संस्कार झाले होते, त्याचा परिणाम यावेळच्या प्रसंगावधानांत दिसून आला. करमाळ्यासारख्या कांहींशा आडगांवात माधवरावांवर मृत्यूनें आपले पाश टाकले. तेथें डाक्टराची कामचलाऊ मदत मिळाली पण श्री. रमाबाईंनीं जर आपल्या जबाबदारीवर कित्येक गोष्टी केल्या नसत्या तर त्या अल्पस्वल्प मदतीसही माधवराव मुकले असते. या दुखण्याची हकीकत व त्यावेळीं श्री. रमाबाईंना आलेला अनुभव त्यांनींच आपल्या हृदयंगम 'आठवणीं'त स्वतंत्र प्रकरणाच्या रूपानें जनतेच्या स्वाधीन केले असल्यामुळें त्याची पुनरुक्ति येथें करण्याची आवश्यकता नाहीं. 'आठवणीं'च्या सतराव्या भागांत दुखण्याचा कथाभाग आहे. तो

* आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी. पृ. १२१-२२.

जिज्ञासूंनीं पहावा. तो वाचीत असतां ज्याला गहिंवर येणार नाहीं, असा सहृदय वाचक विरळाच आढळेल.

दुखण्यांतून बचावून माधवराव पुण्यास आल्यानंतर पुनः पूर्ववत् काम करण्याची शक्ति येण्याला त्यास बरेच दिवस लागले, परंतु हिंडण्याफिरण्यापुरती शक्ति आल्याबरोबर माधवरावांचे कार्यक्रम सुरू झाले. त्यांचें यावर्षी वसंतव्याख्यानमालेंत एक ' हिंदुस्थानांतलें लोकमत ' ( Public opinion in India ) या विषयावर व्याख्यान झालें. मुंबईसरकारांतले एक बडे अधिकारी लीवार्नर यांनीं मद्रासच्या एका मासिकांत या विषयावर लेख लिहून तो माधवरावांकडे अभिप्रायार्थ पाठविला होता. म्हणून व्याख्यानाला हा विषय त्यांनीं घेतला. संमतिवयामुळें माजलेल्या विचारकलहाला अनुलक्षून त्यांनीं भाषणांत बरेच उद्गार काढले. त्यांत प्रतिपक्षाचा हेकटपणा व विचारसंभ्रम दाखविला गेल्यामुळें केसरींत त्याबद्दल टीका प्रसिद्ध झाली. आपल्या विचारसरणीचा विपर्यास लोकांत झाल्याचें पाहून १८९१ च्या डिसेंबरांत त्यांनीं प्रार्थनासमाजामध्यें ' युगप्रभाव ' ( Time-spirit ) या विषयावर फिरून व्याख्यान दिलें. या व्याख्यानाला गर्दीची कमतरता नव्हती. प्रस्तुत व्याख्यान धर्मपर व्याख्यानांच्या नव्या आवृत्तींत परिशिष्टरूपानें जोडण्यांत आलें आहे. काळाचा ओघ कसा चालला आहे, हें यथार्थ रीतीनें समजून घेण्याची इच्छा असणारांनीं हें समग्र भाषण मुळांतून एकवार अवश्य वाचावें.

या वर्षांतली त्यांनीं दुसरी एक महत्त्वाची कामगिरी प्रार्थनासमाजाच्या संबंधांत केली. प्रार्थनासमाज हें नांव बदलून ब्राह्मसमाज असें नामांतर करण्याबद्दल पुनः कित्येक सभासदांच्या डोक्यांत उसळी आली व त्यांनीं सुबोधपत्रिकेंतून या विचाराचा खल चालविला. माधव-

रावांच्या मनांतून प्रार्थनासमाजाच्या सभासदांची सभा बोलावून तेथें समक्ष आपलें मत सांगण्याचा बेत होता. परंतु दौऱ्यावर जाणें अपरिहार्य झाल्यामुळें त्यांनीं आपलें मत पत्रद्वारें कळविलें. हें सगळें पत्र १८९१ च्या आक्टोबर ४ च्या अंकामध्यें सुबोधपत्रिकेंत प्रसिद्ध झालें आहे. ब्राह्म हें नांव जुनें म्हणून तें पत्करावयाचें असल्यास प्रार्थनासमाज या नांवालाही जुनेपणा आला आहे, शिवाय ब्राह्मसमाजांत तीन फळ्या असल्यामुळें आपण कोणत्या फळीचे भागीदार होणार, व कां होणार हा प्रश्न शिल्लक रहातोच. 'प्रार्थना' या साधननामामुळें त्यांत सर्व जातीच्या आणि धर्माच्या लोकांना प्रवेश करण्याला सवड आहे; निराकार शाश्वत ब्रह्माची उपासना करणारे ते ब्राह्म, असा अर्थ होत असला तरी ब्रह्म शब्दानें जो अद्वैताचा बोध होतो, तो प्रार्थनासमाजास मान्य नाहीं, वगैरे युक्तिवादानें नव्या नांवाच्या पुरस्कर्त्यांचें शंकासमाधान केल्यावर माधवरावांनीं आपलें हृद्गत समाजबांधवापुढें मांडलें आहे. त्यांत त्यांचे ऐतिहासिक व खोल धर्मविचार असल्यानें तें येथे सादर करणें प्राप्त आहे. ते म्हणतातः—

उपनिषद् ग्रंथांतील उपास्य दैवतांवरून ब्राह्म हें नांव घेतल्यास दुसरी एक अडचण पुढें पाठीमागें उत्पन्न होण्यासारखी आहे, तिचाही विचार करणें जरूर आहे. कलकत्त्याकडील समाजाची मंडळी ब्रह्म ह्मणतात तो ब्रह्म शब्द उपनिषदांतील प्रतिपाद्य ब्रह्म शब्दाहून फार भिन्न आहे. उपनिषदांतही कोठें कोठें द्वैतमतास मान्य अशा ब्रह्म शब्दाचा उपयोग केलेला आढळतो, परंतु एकंदर धोरण अद्वैत मतानें प्रतिपाद्यशून्य निर्गुण ब्रह्माकडे आहे, तेव्हां तसें निर्गुण ब्रह्म ज्यांस मान्य नाहीं त्यांनीं केवळ बंगाल्यांतील लोकांनीं अर्थांचें अर्थांतर केलें ह्मणून आपणही चूक करावी हें बरोबर होणार नाहीं. तशी चूक केल्यानें पुढें पाठीमागें उपनिषद्-प्रतिपाद्य ब्रह्म हेंच समाजास अभिप्रेत ब्रह्म, शब्दवाच्य जो परमेश्वर याहून भिन्न नाहीं, असा पक्ष होण्याचा संभव आहे. ही अडचण मनांत आणून भक्तिमहात्म श्रेष्ठ मानणारे जे वैष्णव साधु त्यांनीं

ब्रह्म शब्द एकीकडे ठेवून परमेश्वरास विष्णू, भगवान् किंवा हरी अशीं नांवें देऊन वैष्णव, भागवत किंवा हरीदास असें आपणांस ह्मणवून घेतलें. तीच वैष्णवांतील परंपरा समाजांतील मंडळींनीं अधिक विकसित केली आहे. देव करुणामय आहे. आपण क्षुद्र आहोंतच व पापी आहोंत; त्याच्या कृपेनें आपले सर्व व्यवहार होतात. त्याची भावयुक्त भक्ति करून त्यास शरण जावें हाच मुख्य मार्ग आहे. या भक्तीशिवाय कर्मज्ञानादि मार्ग व्यर्थ आहेत. व जाति-परत्वें पंक्तिप्रपंच परमेश्वराजवळ नाहीं. इत्यादि वैष्णव सांप्रदायांचीं मतें हींच समाजाचीं मतें आहेत. भारतकालींही पंचरात्र वगैरे ग्रंथांत या मतांचा प्रकाश झाला आहे. असा २००० वर्षांचा इतिहास असून तो विसरून या गोष्टीस अवघा ५० वर्षांचाच इतिहास आहे, असें मानून संकोचाचें रूप देणें यथार्थ नाहीं. वरील इतिहासाप्रमाणें नांव देणें झाल्यास भागवत हें नांव अधिक सोय-कर होईल. परंतु त्या नांवाचा एक पृथक् सांप्रदाय आहे ह्मणून आहे या स्थितींत बदल करूं नये.

उपास्य दैवताविषयीं वाद नसतां त्याच्या नांवावरून कोणत्याही समाजास भिन्न नांव ठेवल्यास कालांतरानें भूल पडून विरोध उत्पन्न होतात. याच भीतीनें महंमद पैगंबर यानें देवाच्या नांवावरून किंवा आपल्या नांवावरून आपल्या अनुयायांस नांव न देतां मुसलमान ह्मणजे शरण गेलेला असें नांव ठेविलें. शीक लोकांनीं याच विचारानें शिष्य अशा शब्दाचा अपभ्रंश करून नांव घेतलें.बौध लोकांनीं बुद्धीच्या मुख्य लक्षणावरून नांव घेतलें; जैन लोकांनीं याच धोरणानें नांव घेतलें आहे. तेव्हां हा सर्व विचार मनांत आणिला असतां प्रार्थना हेंच मुख्य कर्तव्य व ईश्वरप्राप्तीचें साधन आहे, असें ज्या समाजास वाटतें त्यांनीं प्रार्थनासमाज असें नांव घेण्यास व्यावहारिक रीतीनें व तात्विक रीतीनें फार विचार झालेला असून तो विचार श्रेयस्कर सोयकर व शुद्ध आहे, असें सर्वांस कळून येईल ही आशा धरून, इकडील अभिप्राय विस्तारानें कळविला आहे तो सर्वांस वाचून दाखवून शांत विचारानें काय कर्तव्य असेल तें करावें. कळावें हे विनंति.

पुणेंकरांना माधवरावांबद्दल अत्यादर वाटावयास लागणारें जें कार्य माधवरावांनीं यावर्षी केलें तें अगदीं प्रासंगिक किंवा यदृच्छाप्राप्त होतें.

पुण्यास डा. पेंटीकॉस्ट नांवाचे एक अतिशय विद्वान् आणि विख्यात मिशनरी यावर्षी पुण्यास आले. त्यांचीं आनंदोद्भव थिएटरांत सप्टेंबरांत एकंदर सुमारें १५ व्याख्यानें झालीं. त्यांच्या बोलण्यांत प्रायः हिंदूधर्माची नांव घेऊन निंदा केली जात नसे, पण ख्रिस्तीधर्मातल्या तत्वांची अपरिमित स्तुति आणि त्यावांचून सद्गति नाहीं हा ठाम सिद्धांत, त्यामध्यें असल्यामुळें अप्रत्यक्ष टीका होती, हें वेगळें सांगायला नको. त्यांची भाषणशैली मोहक असल्यामुळें श्रोतृसमाजाची दाटी वेसुमार होऊन जागेच्या अभावीं पुष्कळांना हिरमुसून परत जावें लागे. भाषणाचें सत्र आटोपल्यावर पुणेंकरांतर्फे मिशनरी मजकुराचे आभार मानण्याचें काम माधवरावांनीं केलें. माधवरावांनीं डा. पेंटीकॉस्ट यांच्या व्याख्यानास हजर राहून त्यांचे पुष्कळसे विचार ऐकले होते. त्यांचे आभार मानण्याचें काम आपण करावें अशी त्यांची इच्छा नव्हती. व्याख्यानें संपल्याबरोबर दौऱ्यावर जाण्याचा विचार ठरला होता. पण त्यांच्या मित्रांनीं त्यांस आभार मानण्याची जबाबदारी पार पाडल्याखेरीज दौऱ्यावर जाऊं नये, असा आग्रह केल्यामुळें त्यांनीं बाहेर गांवीं जाण्याचा बेत रहित केला. माधवरावांनीं आभार मानण्याची कामगिरी आणखी एका कारणासाठीं पत्करली. डॉ. पेंटीकॉस्ट यांना पुण्याची ख्याति ठाऊक असल्यानें आपल्याला तेथील विद्वानांचे धर्मविचार समजावे, अशी इच्छा त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली. माधवरावांना ही इच्छा समजल्यामुळें त्यांनीं आभारप्रदर्शनाची जोखीम स्वीकारली, अशी थोडी जास्त कच्ची हकीकत सुबोधपत्रिकेंतील पुण्याच्या बातमीपत्रांत आहे. माधवराव आभार प्रदर्शन करणार आहेत, असें अगाऊ दोन तीन दिवस वृत्तपत्रांनीं जाहीर केलें. इतकें समजल्यावर माधवरावांच्या तोंडून या प्रसंगीं निघणाऱ्या ज्ञानामृताचा लाभ कोण सोडणार! शेवटच्या दिवशीं (ता. २५ सप्टेंबर) थिएटरांत लोट गर्दी

जमली. डा. पेंटीकॉस्ट यांनीं समारोपाचें भाषण सुमारें पावतास केल्यावर माधवराव आभार मानण्याला उठले. मूळच्या वक्त्यापेक्षां माधवरावांचें भाषण फार वेळ झालें. माधवरावांनीं आपल्या भाषणांत ग्रीक, रोमन, ज्यु, ख्रिस्ती व मुसलमान यांच्या धर्मेतिहासांतल्या घडामोडी सांगून नंतर हिंदू धर्म त्यांतील निरनिराळे पंथ व शेवटीं वैष्णव साधुसंतांनीं बजावलेली कामगिरी वर्णन केली. ते हिंदूधर्मांतलीं न्यूनें दाखविण्यास विसरले नाहींत. पण त्यांनीं ख्रिस्ती धर्मांतल्या दोषांचाही स्पष्ट शब्दांत परिस्फोट केला व त्या धर्माहून हिंदूधर्म श्रेष्ठ कसा याचीही डा. पेंटीकॉस्ट यांस ओळख करून दिली. माधवरावांच्या विद्वत्तेचा महिमा आणखी एकदां पुणेकरांना या निमित्तानें पहावयास सांपडला. डा. पेंटीकॉस्टदेखील माधवरावांसमोर दिपले. इंदुप्रकाश पत्राच्या तत्कालीन बातमीदारानें म्हटलें आहे कीं, 'भररस्त्यावर आणि घरोघर, लोकांचे तोंडून हा विद्वन्मणि केवळ ब्राह्मण जातीस व पुणें शहरासच भूषण आहे, असें नसून साऱ्या महाराष्ट्राचें भूषण आहे. यास खरा लोकनायक म्हणूं नये तर कोणास म्हणावें ? असे उद्गार निघत होते.' माधवरावांनीं आपल्या रीतीप्रमाणें हें व्याख्यान अगोदर लिहून काढलें होतें, व ज्ञानप्रकाशांत तोच लेख प्रसिद्ध झाला. तथापि आयत्यावेळीं लेखांतल्या मुद्द्यांच्या अनुरोधानें माधवराव पुष्कळच जास्त बोलले. लेख प्रसिद्ध झाल्यावर त्याचा संक्षेप पाहून श्रोत्यांपैकी कांहीं जणांनीं ज्ञानप्रकाशाकडे तक्रार केली. ज्ञानप्रकाशांत वरच्याप्रमाणें खुलासा प्रसिद्ध करण्यांत आला. हें व्याख्यान छापतांना ज्ञानप्रकाशकारांनीं जी प्रस्तावना जोडली आहे, तिच्यांत म्हटलें आहे कीं, हें व्याख्यान हिंदु, ख्रिस्ती मुसलमान या सर्व जातींनीं वाचावें

आणि त्याचें वारंवार मनन करावें. ज्यांनीं हें व्याख्यान ऐकलें, त्यांना त्याचें अद्यापि, माधवरावांचें नांव निघतांच, स्मरण होत असल्याचें आढळतें. तीस वर्षांनंतर जर त्याचा प्रभाव ऐकणारांच्या मनांत शिल्लक आहे. तर जेव्हां त्याचें प्रथम श्रवण घडलें तेव्हां त्याचा प्रभाव किती पडला असेल, हें कल्पनेनें जाणण्यास अवघड नाहीं.

स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत घरांतल्या मंडळीकडून जसा माधवरावांना त्रास सोसावा लागला तसाच त्रास त्यांना लोकांकडून सोसावा लागला. १८८७ सालांत–पुण्याच्या फीमेल हायस्कूलास जेमतेम तीन वर्षें झाल्या-नंतर–केसरीमध्यें फीमेल हायस्कुलांतल्या शिक्षणक्रमासंबंधीं एक लेखमाला सुरू झाली. त्या लेखमालेंत कांहीं केवळ तात्त्विक व काल्पनिक आणि कांहीं खरे आक्षेप काढले होते. हायस्कुलाच्या शिक्षणक्रमांत हिंदु रीतीभीतीचा उच्छेद करणारें कांहींच नव्हतें, अशी माधवरावांकडून माहिती मिळवून १८८७ सालच्या अखेरीस उत्तरादाखल ज्ञानप्रकाशानें लेख लिहिले आहेत. शिक्षणक्रमांतल्या कित्येक आक्षेपांना केसरींतूनच तेव्हां आगरकरांनीं उत्तर दिलें. आगरकरांचे व ज्ञानप्रकाशांतले असे लेख वाचल्यास फीमेल हायस्कुलाच्या शिक्षणक्रमाची उभारणी किती विचारपूर्वक माधवराव प्रभृति मंडळींनीं केली होती, हें समजतें.

१८९० सालीं पं. रमाबाईचें शारदासदन पुण्यास आलें. शारदा-सदनांचा मुख्य उद्देश विधवा स्त्रियांना आश्रय देणें, हा होता. हा उद्देश समजावून लोकमताची अनुकूलता संपादन करण्यासाटीं पंडितावाईनीं साऱ्या महाराष्ट्रांत व्याख्यानांचा दौरा काढला. माधव-रावांची या संस्थेविषयीं सहानुभूति होतीच. संस्था पुण्यास आल्यावर तिचा हेतु लोकांच्या गळीं उतरविण्याकरितां पंडितावाईच्या सह-

कारिणी मिस हॅमलिनबाई यांचें पुणें शहरांत एक भाषण झालें. माधवराव या सभेंत हजर होते. सभा संपली व आतां लोक निघून जाणार इतक्यांत, इंदुप्रकाशाचा पुण्याचा तत्कालीन बातमीदार म्हणतो कीं, माधवराव बोलण्याकरितां उठून उभे राहिले. सभा चालू असतां त्यांचा, या संस्थेला कोणत्या रीतीनें मदत करावी, हा विचार चालला होता. सभा उठण्यापूर्वी त्यांचा विचार नक्की झाला व अगदीं शेवटच्या क्षणीं ते बोलण्याला प्रवृत्त झाले, असा इंदुप्रकाशाच्या तत्कालीन बातमीपत्रांतला रहस्यार्थ आहे. माधवराव बोलायला उभे राहिल्यावर सभा सोडून कोण जाणार? 'आतांच्या आतां या बैठकीस आपण शारदासदनाची व्यवस्थापक मंडळी निर्माण केली पाहिजे. तसें न केल्यास कर्तव्यांत चूक होईल. या उपयुक्त संस्थेविषयीं आपण उदासीन आहोंत, असा ग्रह होऊं देणें चांगलें नाहीं, अशा अभिप्रायाचें त्यांनीं ल्हानसेंच पण जोरदार भाषण केल्यावर व्यवस्थापक मंडळींत भाग घेण्याकरितां सुमारें चाळीसजणांनीं बसल्याजागीं सह्या केल्या. पुण्याच्या वजनदार पुढाऱ्यांनीं संस्थेचें व्यवस्थापकत्व याप्रमाणें पत्करल्यानंतर तिला उर्जितावस्था येऊं लागली. केसरीला जनरंजन करण्याला हा एक विषय अनायासें सांपडला. ख्रिस्ती बाईच्या हातांत हिंदू विधवांचें शिक्षण देणें योग्य नाहीं, असें संस्थेच्या टीकाकारांचें मत होतें. शिक्षकीण ख्रिस्ती असली म्हणून बिघडत नाहीं, पं. रमाबाईच्या धर्माकडे न पहातां त्यांच्या संस्थेची उपयुक्तता लक्षांत बाळगावी आणि तिचा फायदा निराश्रित हिंदू विधवांना द्यावा, असें माधवरावांचें मत होतें. दुर्दैवानें पं. रमाबाईची ख्रिस्तभक्ति अनिवार होऊन त्या सदनांतल्या हिंदू विधवांना ख्रिस्तीधर्माची दीक्षा देण्याच्या मोहास

बळी पडल्यानें सदनाची १८९३ मध्यें इतिश्री झाली व पंडिताबाई-बरोबर माधवराव, भांडारकर वगैरे मंडळीला निष्कारण निंदेचा मार सहन करण्याची पाळी आली. शारदासदनाचा निकाल लागल्यावर दुसरें सदन काढण्याची योजना माधवरावांनीं चालविली होती. त्या योजनेचें उद्देशपत्रक वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालें होतें, पण योजना शेवटास गेली नाहीं. ती योजना प्रो. कर्व्यांच्या हातून सिद्धीस जावी, असा ईश्वरी संकेत होता.

१८९०-९१ साळच्या पुण्यांतल्या दुहीचें वर्णन मागें आलें आहे. समंतिवयाचा कायदा पास झाल्यानंतर त्या शहरांत आणखी एक प्रकरण उपस्थित झालें. तें १८९२ च्या अखेरीपर्यंत पुरलें. १८९० सालच्या आक्टोबरांत ४ तारखेला पुण्याच्या 'पंचहौद मिशन' नामक एका ख्रिस्ती संस्थेंत एक समारंभ झाला. त्या समारंभाला ब्राह्मण मंडळींतले एकूण ५२ आसामी गेले होते. त्यांत माधवरावही होते. समारंभांत चहाबिस्किटांच्या सेवनाचा एक कार्यक्रम होता. ख्रिस्ती बायांनीं चहाबिस्किटें आणून पुढें ठेवल्यानंतर पुष्कळांनीं त्यांचा आस्वाद घेतला. माधवराव बिस्किटाला शिवले नाहींत व त्यांनीं चहा तोंडालादेखील लावला नाहीं. ख्रिस्ती बायांचा मान राखण्याकरितां त्यांनीं पेला हातांत घेतला व खालीं ठेवून दिला. या गोष्टीला सहा महिने लोटल्यावर गर्दभविवाहांत वरपित्याचा मान स्वीकारणारे गोपाळराव जोशी यांनीं पुणें वैभवपत्रांत सदर समारंभाची इत्थंभूत हकीकत प्रसिद्ध केली, पुढें विलायतेहून माधवरावांचे तरुण मित्र सर मोरेश्वर विश्वनाथ जोशी आले, तेव्हां त्यांना माधवरावांनी मेजवानी दिली. त्या मेजवानीचा वृत्तांत पंक्तीच्या नकाशासह वरील गृहस्थानें वृत्तपत्रांतून जाहीर केला. तरी कांहीं दिवस ब्रह्मवृन्द स्तब्ध होता.

१८९१ सालच्या शेवटीं शेवटीं ब्राम्हण्यरक्षक पुढाऱ्यांनीं पंचहौद मिशनमधील समारंभांत भाग घेणाऱ्या गृहस्थांशीं संबंध ठेवणाऱ्या भिक्षुकांच्या मागें ग्रामण्याचा ससेमिरा लावला. मागाहून आचारी पाणक्यांवर तोच प्रसंग आला. बिचारा भिक्षुकवर्ग सक्षौर प्रायश्चित्त घेऊन पावन झाला. यानंतर मिशनमध्यें चहापार्टीला हजर रहाणाऱ्या गृहस्थांच्या नात्यागोत्यांत ग्रामण्याचा शिरकाव होऊन बायकांना अपरिमित त्रास पोचूं लागला. दरम्यान शंकराचार्यांकडे फिर्याद गेली. शंकराचार्यांनीं प्रथम हें प्रकरण मनावर घेतलें नाहीं. माधवराव वगैरे मंडळी शंकराचार्यांच्या निर्णयापुढें मान वाकविण्याला अनमान करणार नाहींत, असें कळल्यावर श्रींनीं पुण्याला १८९२ च्या सुरुवातीस दोन शास्त्री फिर्याद ऐकण्याकरितां व साक्षीपुरावा घेण्याकरितां पाठवून दिलें. शंकराचार्य किंवा त्यांच्यासारखे महंत म्हणजे कःपदार्थ, असें माधवरावांना वाटत नव्हतें. तत्त्वाला बाधा पोंचत नसेल, अशा प्रकरणांत शंकराचार्यादि विशिष्ट संप्रदायचालकांना मान देण्यास हरकत नाहीं, असें माधवराव समजत होते. त्यांनीं या बाबतींत तेलंगांना लिहिलेलें एक पत्र वाचनीय आहे. त्यांनीं शंकराचार्यांबद्दल पुढील प्रमाणें लिहिलें आहे:—

The position, that reformers ought to regard all ecclesiastical authorities as their open enemies, is one which nobody in active life will venture on urging for one moment. These authorities have their uses and no great or good purpose is served by ignoring them or treating them with contempt. There are some matters in which we must stand out, but there is no reason why we should stand out on all matters simply for the fun of the thing. It is these public interests

which move me.....Even if the Swami was not prepared to help me on all lines, I should prefer to see him in a mind to realise that we had a side to be considered and to be agreeable to fair compromise.

'शंकराचार्यांसारख्या धर्माधिकारी लोकांना शत्रु मानणें व त्यांची पूर्ण उपेक्षा करणें, याला मी पोरकटपणा समजतों. त्यांच्याविषयीं तिरस्कार दाखविल्यानें किंवा त्यांची उपेक्षा केल्यानें कोणतेंच कार्य साधत नाहीं, कारण स्वामींसारख्या व्यक्तींचादेखील उपयोग आहे. शंकराचार्यांची आपणास प्रत्यक्ष मदत न झाली तरी हरकत नाहीं, पण आपली बाजू विचार करण्यासारखी आहे, व तडजोड करतां येईल, एवढें जरी स्वामींना वाटलें, तरी तेवढयावर मी समाधान मानीन' असा वरील मजकुराचा इत्यर्थ आहे.

या प्रकरणाच्या मुळाशीं एक लहानसा कट होता. विष्णु मोरेश्वर भिडे यांनीं एकदां 'लोक रिफ्रेशमेंट रूममध्यें जाऊन चहाबिस्किटें झोडतात, मग खिस्त्याच्या हातचा उघडपणें चहा पिण्यास काय हरकत आहे,' असे उद्गार काढले. गोपाळराव जोश्यांनीं या उद्गाराचा फायदा घेऊन पंचहौद मिशनमधला प्रसंग जुळवून आणला आणि मागल्या उद्गाराची भिडयांना आठवण देऊन मिशनमधल्या कपबश्यांचा खर्च त्यांजकडून उपटला. या प्रकाराचा बोभाटा झाल्यावर हा वृत्तांत माधवरावांना समजला व त्यांनीं भिडयांची सौम्य शब्दांनीं कानउघडणी केली. मिशनमधल्या निमंत्रणांत चहा पाजण्याचा हेतु आहे, हें अनेक निमंत्रितांना माहीत होतें. माधवरावांप्रमाणें अनेकांना तें माहीत नव्हतें, हेंही तितकेंच खरें आहे. ब्रह्मवृंदाच्या सभा करून शंकराचार्यांकडे फिर्याद गेली व प्रायश्चित्ताच्या वादाला तोंड लागलें.

तेव्हां फिर्यादी पक्षांतले एक वकील कै. गोविंदराव गद्रे यांना माधवरावांनीं सांगितलें कीं, योग्य सयुक्तिक प्रायश्चित्ताला आमची 'ना' नाहीं; पण ताशेमर्फे लावून प्रायश्चित्तासाठीं आमची धिंड काढायची असल्यास मात्र कोणीही तुमच्या फिर्यादीला भीक घालणार नाहीं. प्रायश्चित्ताला सादर होण्यामध्यें माधवरावांना हरकत वाटली नाहीं, याचें आणखी एक कारण आहे. त्यांनीं सुधारणांचा जो कार्यक्रम ठरविला होता, त्यांत परधर्मी लोकांशीं अन्नपानादि व्यवहार करण्याचें कलम नव्हतें. तो व्यवहार चुकीनें घडला असतां शास्त्रदर्शित प्रायश्चित घेण्याला हरकत नसावी, असा त्यांनीं विचार केला. यांत मुळांत ठरलेल्या सुधारणेच्या तत्त्वांवर हरताळ फांसली जात नाहीं, अशी त्यांची खात्री होती. शिवाय त्यांना प्रायश्चित्तामध्यें आणखी एक फायदा दिसला. याही प्रकरणांत मागल्याप्रमाणें थोडा सरकारदरबार झाला. शंकराचार्याकडे फिर्याद जाऊन चौकशीअंतीं आरोपाच्या नाशाबितीमुळें दहा असामी गळले, वादीपक्षानें आणलेले पुष्कळसे आरोप निरसन पावले आणि फक्त परधर्मी लोकांच्या हातचा चहा घेतल्याचा दोष शिल्लक उरला. त्याच्या परिहाराचें प्रायश्चित श्रीच्या वतीनें फिर्याद ऐकण्यास आलेल्या शास्त्र्यांनीं जाहीर केलें. तें अगदींच सौम्य स्वरूपाचें होतें. इतक्या अवधींत लग्नमुंजींचा मोसम येऊन बऱ्याच कुटुंबांना ग्रामण्याचा छळ असह्य भासूं लागला व प्रायश्चित्त घेऊन मोकळे व्हावें, असे सुधारक पक्षांतले लोक माधवरावांना सांगूं लागले. गरज पडेल तेव्हां व्यक्तिशः प्रायश्चित्त घ्यावें, असें माधवरावांचें मत होतें. परंतु एक दोन उदाहरणांत आपल्या आग्रहामुळें दुसऱ्याच्या कुटुंबशांतीचा विघात होत आहे, असें दिसून आल्यावर माधवरावांना, गरज नसतांही, प्रायश्चित्त घेण्याची कबूली देणें भाग पडलें. त्यांनीं खर्चे

वाढवून शास्त्री व भिक्षुक पदरीं बाळगले होते व त्यांचा इतर मित्रांच्या मंगलकार्यांतून उपयोग झाला. पण त्यामुळें कुटुंबाकुटुंबांतून बोकाळलेली द्विधाभावाची ओढाताण थांबली नाहीं. कालान्तरानें ती थांबेल व तोंपर्यंत कळ सोसावी, असें माधवराव म्हणत होते. परंतु पुष्कळांना धीर धरवेना. पुष्कळजण सामाजिक सुधारणेच्या गोटांतून जातील, असा रंग दिसला तेव्हां त्यांनीं उतावीळ होऊन चालविलेल्या प्रायश्चित्ताच्या आग्रहापुढें माधवरावांनीं मान वाकविली. वास्तविक या मित्रांनीं माधवरावांना प्रायश्चित्तविधींत ओढण्याचें कारण नव्हतें. एकजुटीनें प्रायश्चित्त घेण्याची जरूर नव्हती. पण माधवरावांनीं प्रायश्चित्त घेतल्यावांचून आपण तें घेण्यांत भूषण नाहीं, असा मानापमानाचा भ्रम पुष्कळांच्या बुद्धींत वावरत असल्यामुळें, त्यांच्या कुटुंबसौख्यांत पडलेलें विरजण दूर करण्याकरितां प्रायश्चित्तापुढें स्वतःचा बळी दिल्याखेरीज उपाय नाहीं, असें माधवरावांनीं ताडलें. प्रायश्चित्तांत कालहरणाची किंवा अपमानाची क्षौरादि भानगड नव्हतीच. ता. १५ मे रोजीं त्यांनीं लोणावळ्याहून पुण्यास जाऊन प्रायश्चित्त घेतलें. माधवरावांच्या उदात्त हेतूचा विपर्यास केला जाऊन पुढें महिनाभर अँग्लोइंडियन व देशी वृत्तपत्रांतून त्यांवर टीका सुरू झाली. त्यांना लोकप्रियतेची हांव सुटली, वार्धक्यामुळें तारुण्यांतला ताठरपणा त्यांच्यांत उरला नाहीं, त्यांचें व शंकराचार्यांचें कांहींतरी मेथकूट जमलें असावें, त्यांनीं सुधारणेच्या कार्यावर वरवंटा फिरविला, वगैरे नानाविध दुष्ट आरोपांची घाणेरडी वृष्टि त्यांच्या मस्तकावर होऊं लागली. माधवरावांनीं ताबडतोब एक खुलाशाचें पत्र बॉंबे गॅझेटकडे पाठवून घडलेला वृत्तान्त कळविला. त्यांत युरोपियन लोकांशीं अन्नोदकाचा अनियंत्रित व्यवहार (free intercourse of food and

drink ) ठेवणें, हें सुधारणेचें तत्त्व नसल्यानें त्या बाबतींत झालेल्या प्रमादाचें परिमार्जन जुन्या पद्धतीनें केल्यास हरकत नाहीं, या मुद्द्यावर जास्त भर दिला होता. परार्थसाधनाचा उदात्त हेतु पुढें ठेवून सुधारणेच्या तत्त्वावर बोळ न फिरवितां आपण विचारपूर्वक आपलें कर्तव्य बजावलें, अशी त्यांची मनोदेवता त्यांस सांगत असल्यानें त्यांच्यावर टीकेचे घाव पडत असतांही त्यांचें चित्त क्षोभलें नाहीं. त्यांच्या हेतूबद्दल श्री. रमाबाईंची गैरसमजूत झाली व दोन तीन दिवस 'माधवरावांनीं मोठी चूक केली' या कल्पनेनें त्याही 'आठरल्या' होत्या. अहर्निश सहवासांत असलेल्या माणसाची जर ही स्थिति तर माधवरावांचीं कृत्यें तिऱ्हाइतपणानें पहाणाऱ्या इतरेजनांना शब्द लावण्यांत हंशील काय ? तथापि त्यांनीं या बाबतींत पसरलेल्या गैरसमजूती दूर होण्याकरितां वसंतव्याख्यानमालेंत ५ जून १८९२ रोजीं Mental prepossessions मानसिक भ्रम या नांवाचें एक व्याख्यान दिलें. बेकननें बुद्धिभ्रमाचे चार प्रकार वर्णिले आहेत व त्यांस त्यानें Idols अशी संज्ञा दिली आहे. त्यांतल्याच कांहीं पिशाचांची (Idols) उपासना टीकाकारांनीं चालविली आहे, असें त्यांनीं प्रारंभीं सांगितलें. आपले ग्रह बिनचूक आहेत, अशी एकदां माणसाच्या मनाची समजूत झाली म्हणजे त्या ग्रहांचा चष्मा डोळ्यावर चढवून तो दुसऱ्यांच्या कृत्याकडे पाहूं लागतो. आपल्याला जें दिसतें आणि वाटतें तेंच खरें, अशी त्याची ठाम कल्पना असते. अशा पूर्वग्रहांच्या फेऱ्यांत सांपडून टीकाकारांची मति ठिकाणावर राहिलेली नाहीं, असें त्यांनीं सुचविलें. मतिभ्रंशाचे त्यांनीं दाखविलेले परिणाम अत्यंत मार्मिक आहेत. मतिभ्रंशामुळें मनुष्य सारासारज्ञतेस मुकतो व मग त्याच्या दृष्टीनें वेदांती धादांती बनतो, समाजसत्तावादा

socialist अराजक वाटतो, भांडवलवाले किंवा जमीनदार म्हणजे कवडी-चुंबक शायलॉक, असें भासतें; महानुभावीला मानभाव ही लफंगेपणा दर्शविणारी संज्ञा प्राप्त होते, सुधारक हा धर्मद्रोही नास्तिकासारखा दिसूं लागतो, बाहेरचें काळें कांतडें हें अंतरंगाच्या काळेपणाचें द्योतक ठरतें, शूद्र शब्दानें जेवढें म्हणून नीच, हीन, अमंगळ, अशुद्ध असेल तेवढयाचा बोध होऊं लागतो. मानसिक पूर्वग्रहामुळें सगळें विपरीत दिसतें. भल्याबऱ्याची पारख रहात नाहीं. मग आपल्या आवडीनावडी-इतकी चांगल्यावाईटाचा बिनचूक निकाल लावणारी दुसरी जगांत कसो-टीच नाहीं, अशी भावना माणसाच्या मनावर पगडा बसविते. प्रायश्चित्ताचा विपर्यास यामुळेंच झाला आहे, असें माधवरावांनीं सांगितलें. युरोपांतल्या धार्मिक सुधारणेची प्रथमावस्था आणि आमची आजची स्थिति याची थोडक्यांत तुलना करून माधवरावांनीं आपल्यावर आलेल्या एकंदर नऊ आरोपांना उत्तर दिलें आहे. संमतिवयाच्या वादापासून सुधारणेचे शत्रू कांहीं तरी निमित्त पहात होते. त्यांना हें पंचहौद मिशनचें प्रकरण सांपडलें व संमतिवयाचा कायदा पास झाल्यानंतरच्या चिडीमुळें त्यांनीं तें बाहेर आणलें. या प्रकरणानें सामान्य जनतेचा असा समज होऊं लागला कीं, युरोपियनांबरोबर अर्थात् परधर्मी लोकांबरोबर खाण्या-पिण्याचा संसर्ग ठेवून जात मोडणें, हाच सुधारकांचा मुख्य उद्देश आहे. हा समज होऊं दिल्यानें सगळी सुधारणा ढासळून पडण्याचा संभव आहे. म्हणून शंकराचार्यांकडे गेलेल्या फिर्यादीचा सुधारकांनीं अनादर केला नाहीं. मात्र सुधारकांनीं आपण होऊन शंकराचार्यांना कौल लावला नाहीं; हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे. शंकराचार्यांचा अधिकार मानण्यांत सुधारकांची पूर्वपरंपरा सुटलेली नाहीं. १८७० सालीं पुन-

विवाहाचा वाद त्यांच्याकडे निर्णयार्थ गेला होता; पुढें परदेशगमन करणारांना पंक्तिपावन समजण्याला हरकत नसावी, या मुद्दयाची वांटाघाट सुधारकांनीं शंकराचार्याकडे केली आहे. मग आतांच या प्रकरणांत त्यांची उपेक्षा करण्याची काय जरूर होती, असा प्रश्न माधवरावांनीं विचारला आहे. लोकप्रियतेची हांव नव्हती, अगर तारुण्यांतल्या धैर्याचाही लोप झालेला नाहीं, असें दाखवून माधवरावांनीं प्रायश्चित्ताचा हेतु आणि इतिहास निवेदन केला आहे. हा शेवटचा भाग माधवरावांच्या विद्वत्तेस व प्रसंगानें उत्पन्न होणाऱ्या विषयाचा गाभा पाहून टाकण्याच्या पद्धतीस साजेसाच आहे. टीकाकारांसंबंधीं एकही अपशब्द न वापरतां तात्त्विक आणि केवळ सत्यास धरून महत्त्वाच्या विषयाचें गंभीर विवेचन जर कोणास पहावयाचें असेल तर हें भाषण वाचण्याजोगें आहे. अविचारानें, परिणाम लक्षांत न घेतां माधवराव कोणतेंहीं कृत्य करीत नसत, असेंच यावेळीं प्रत्ययास आलें. परंतु माधवरावांना व्यक्तिशः प्रायश्चित घेण्याचें कारण काय होतें, या प्रश्नाचें उत्तर गॅझेटमधलीं पत्रें व हें भाषण यांत न मिळाल्यामुळें भाषणानंतर टीका सुरूच राहिली. आपल्या मित्रांची भीड व त्यांवर उपकार करण्याची बुद्धि, ही त्याचीं कारणें होतीं. 'बेचाळिसांतला एक' या सहीचें जें एक पत्र सुबोधपत्रिकेंत तेव्हां प्रसिद्ध झालें, त्यांत माधवरावांच्या मित्रांनीं त्यांना स्वार्थासाठीं कसें पछाडलें व अखेरीस प्रायश्चित्ताच्या फंदांत आपल्याबरोबर ओढून दूषणास पात्र केलें, याची निर्भीड हकीकत आहे. माधवरावांनीं आपल्या मित्रांच्या कमकुवत-पणाकरिता प्रायश्चित्त घेतलें, हें त्यांना विनयामुळें सांगतां येईना. त्यांच्या समकालीन पिढयांनीं त्यांस दूषण दिलें, परंतु भावी पिढया सगळ्या

वृत्तांत ध्यानांत वागवून माधवरावांच्या स्वार्थत्यागाबद्दल त्याचा उत्तरोत्तर गौरवच करतील, असा भरंवसा आहे. स्वार्थत्यागानें पुष्कळदां लोकांतली इभ्रत वाढते व त्या रूपानें स्वार्थत्यागाचा मोबदला मिळतो, पण माधवरावांच्या स्वार्थत्यागांत या मोबदल्याची मुळींच आशा नव्हती, तथापि त्यांनीं तो स्वार्थत्याग केला व आपल्या लोकोत्तर महामनस्कत्वाचा किंवा उदारचरिताचा धडा भावी पिढ्यासाठीं मागें ठेवला. यावेळीं लोकांच्या मनांत केवढी क्रांति झाली होती, याचीही अटकळ झाली. कृष्णशास्त्री चिपळूणकरांना पांचशे रुपये भूर्दंड भरून अशाच चुकीबद्दल सक्षौर प्रायश्चित्त घ्यावें लागलें होतें. यावेळीं बारा आण्यांच्या आंत प्रायश्चित उरकलें. युरोपियन धर्मसुधारणेच्या प्रथमावस्थेचा जो मुद्दा वरील व्याख्यानाच्या सुरवातीस सुचविला तोच त्यांनीं पुढें थोड्या दिवसांनीं प्रार्थनासमाजाच्या एका व्याख्यानांत 'लूथरच्या काळाचें व सध्याच्या काळाचें साम्य' या सदराखालीं विस्तृत केला.

मित्रासाठीं माधवरावांनीं प्रायश्चित्ताची मानहानि मान्य केली, कारण त्यांचें मित्रप्रेम असेंच अलौकिक होतें व पूर्वी त्याचा अनुभव आला होता. १८८५ सालीं फीमेलहायस्कूलच्या वार्षिक समारंभांत त्यांचे परममित्र शंकर पांडुरंग पंडित यांच्या बोकांडीस अनपेक्षित रीतीनें सरकारी इतराजीची घोरपड बसली. समारंभांत इंग्रजी राजगीत गाण्याचा कार्यक्रम, त्यावेळचे समारंभाचे अध्यक्ष श्री. सयाजीराव गायकवाड यांना दुसरीकडे जाण्याची घाई असल्यामुळें, आयत्यावेळीं गाळण्यांत आला. हिंदी जनतेबद्दल मनांत अढी बाळगून चढेलपणानें वागणाऱ्या लीवार्नरसाहेबांना या साध्या गोष्टींत राजद्रोह दिसला आणि त्यांनीं तत्काल पंडितांना अधिकारच्युत केलें. माधवरावांच्या मनालाही पंडिता-

प्रमाणेंच हा प्रकार झोंबला. सिमल्यास जाण्याचा पुढें लवकरच योग आल्यामुळें खुद्द व्हाइसराय लार्ड डफरिन यांजकडे प्रस्तुत बाबतींत रदबदली करण्याची कामगिरी माधवरावांनीं बजावली. सुदैवानें मुंबईचे गव्हर्नर लार्ड रे हे उदार हृदयाचे असल्यामुळें पंडितांना संकटांतून गौरवपूर्वक निर्दोष बाहेर पडण्याला विशेष अवधि लागला नाहीं. माधवरावांच्या मित्रप्रेमाचें उत्कटत्व संमतिवयाच्या वादांत मलबारींच्या प्रत्ययास आलें. ' माधवरावांची माझ्या पुष्कळ कार्याविषयीं अतिरिक्त सहानुभूति होती व बालविवाह आणि सक्तीचें वैधव्य यासंबंधीं वाद माजला तेव्हां पाठबळाचा ते एक भक्कम आधारस्तंभ आहेत अशी खात्री पटली. ' अशी मलबारींनीं ' ईस्टअँडवेस्ट ' मासिकांतल्या पूर्वनिर्दिष्ट लेखांत प्रांजळपणानें ग्वाही दिली आहे.

मित्रप्रेमाप्रमाणेंच प्रायश्चित्ताच्या वादात माधवरावांच्या स्वभावांतला दुसरा एक असामान्य गुण त्यांच्या सहवासी मंडळीला दिसून आला. माधवरावांशीं ज्यांनीं उघड वैर मांडलें होतें, त्यांच्याविषयीं माधवराव खाजगी बोलण्यांतसुद्धा कधीं एकेरीनें किंवा निंदाव्यंजक शब्दानें बोलत नव्हते, इतकेंच नव्हे तर त्यांच्या नांवाचा उल्लेख निघाल्यास बहुमानार्थी शब्दांची योजना ते करित असत व अशी त्यांच्या मनाची थोर वृत्ति पाहून सर्वांना आश्चर्य वाटे. बार्शीचे वकील रा. रा. मो. साने व कै. महाजनी यांनीं आपल्या आठवणींतून माधवरावांचा प्रस्तुत गुण पटविणाऱ्या गोष्टी दिलेल्या आहेत. कै. ग. ज. अगाशे यांनीं संमतिवयाच्या वादांतली अशीच एक गोष्ट सांगितली आहे. एकदां पुण्याचा सार्वजनिक वाचनालयांत वि. मो. भिडे व आनंदाश्रमाचे संस्थापक महादेव चिमणाजी आपटे यांचा वाद जुंपला. आपट्यांनीं

सगळे सुधारक बोलक आहेत व याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे माधवराव, असें भिडयांना बजावलें. भिडे त्यांची समजूत घालूं लागले. माधवराव पलीकडे थोडया अंतरावर होते. त्यांच्या कानावर संवादाचा हा भाग पडल्याबरोबर त्यांनीं भिडयांना सांगितलें कीं, आपटयांनीं सुधारणेच्या बाबतींत कर्तेपणा गाजविला असल्याशिवाय ते इतरांवर बोलघेवडेपणाचा आरोप करणार नाहींत, मग उगीच त्यांच्याशीं हुज्जत कशाला घालीत बसता? माधवराव मध्यें पडल्यामुळें हा संवाद आटपला. रा. साने यांनीं अशीच एक टिळक व गोखले यांच्या हमरीतुमरीची व त्यांतून प्रतिपक्षाला गौरवून माधवरावांनीं काढलेल्या मार्गाची हकीकत आपल्या आठवणींत दिली आहे.

डेक्कन कॉलेजांतल्या व्याख्यानांचा उल्लेख मागें आला आहे. १८९२ सालीं तेथील प्रोफेसर बेनसाहेब यांचें 'स्वातंत्र्य' या विषयांवर भाषण झालें. स्वातंत्र्य हा माणसाचा जन्मसिद्ध हक्क नाहीं. तो मिळवावा लागतो आणि मिळण्याला विशेष गुण असावे लागतात, असा बेनसाहेबांच्या बोलण्याचा रोख होता. माधवरावांनीं मागाहून त्यांच्या विचाराचें खडंन केलें. ते म्हणाले कीं, मनुष्यकोटींत प्राणी जन्मास आला कीं, तो स्वातंत्र्याला लायक झाला. गुणावगुणावर त्याचें स्वातंत्र्य अवलंबून ठेवणें, हें माणुसकीला शोभत नाहीं. आधल्या वर्षी टिळकांचें 'मौंजीबंधन आणि जानवें' या विषयावर सदर जागीं व्याख्यान झालें, तेव्हां माधवरावांना मागून बोलण्याला विनंती केली गेल्यामुळें ते बोलण्यास उभे राहिले. टिळकांनीं आपल्या व्याख्यानांत अंतरिक्षांतल्या नक्षत्ररचनेवरून जानव्याची कल्पना निघाली असावी व पुढें तिच्यांत फेरबदल होतां होतां हल्लींचें स्वरूप

त्यास प्राप्त झालें, असें प्रतिपादन केलें. त्यावर माधवरावांनीं उपदेश केला कीं, टिळकांचें व्याख्यान अत्यंत विद्वत्ताप्रचुर झालें आहे. धर्माचीं बाह्यचिन्हें विशेष हेतूपासून उत्पन्न होतात. त्या चिन्हांचा प्रारंभीं कांहींतरी उपयोग असतो, कालांतरानें उपयोगाचें ज्ञान लोपतें व नुसतें चिन्ह मात्र कायम रहातें. मग चिन्हालाच लोक धर्माचा प्राण समजूं लागतात. या साठीं आपण धार्मिक व्यवहाराच्या मूलार्थाचें नेहमीं संशोधन करीत असावें आणि चिन्हांत अर्थाचा किंवा उपयोगाचा राम उरला नसल्यास तीं टाकून द्यावीं, हें आपलें कर्तव्य आहे. १८९३ सालीं माधवरावांचें Acadamy of Specialists 'तज्ज्ञांचें मंडळ' या विषयावर स्वतंत्र व्याख्यान झालें. वसंतव्याख्यान-मालेचा उद्देश ज्ञानप्रसाराचा आहे. वर्षभर ज्यांनीं ज्या विषयाचा व्यासंग केला असेल, त्यांनीं आपल्या व्यासंगांचीं फळें व्याख्यानरूपानें जनतेला अर्पण करावीं, या हेतूनें वसंतव्याख्यान-मालेचा उपक्रम करण्यांत आला. कॉलेजांतल्या नव्या जुन्या विद्यार्थ्यांनीं असाच हेतु मनांत धरून आपापल्या आवडीच्या विषयाचा व्यासंग सदैव चालू ठेवावा आणि वर्षांतून एकदां आपलें ज्ञान, एकत्र जमून, इतर मंडळीच्या हवालीं करावें, याचा अर्थ तज्ज्ञांचें मंडळ काढावें असा आहे. आपल्यांत मोठाले लोक कां निपजत नाहींत, असा प्रश्न विचारण्यांत येत असतो. त्याला माधवरावांनीं असें उत्तर दिलें कीं, सुरवंटाचें फुलपांखरूं होतांना मधली जशी कोशबद्ध संक्रमणावस्था दिसते, त्यांतलीच आमची सांप्रतची अवस्था आहे. सुरवंटाची दशा संपली. फुलपांखरांचें रूप येऊन मनोहर उड्डाणें मारण्याची स्थिति येण्याला अद्यापि बराच अवकाश आहे. मधल्या अवस्थेंत निश्चलतेचा, निष्क्रियतेचा किंवा निश्चेष्टतेचा देखावा

दिसतो. अचेतनत्वाचा भास होतो. परंतु हा देखावा खरा नाहीं, हें जाणून प्रयत्न सोडूं नये, निराशेला बळी पडूं नये. असें त्यांचें उपदेशपर भाषण संपल्यावर डा. सेल्बी मुंबई इलाख्याचे एक माजी विद्याधिकारी व डेक्कन कॉलेजाचे माजी प्रोफेसर आणि प्रिंसिपाल, यांनीं माधव-रावांचा उपदेश ग्राह्य असल्याचें सांगितलें.

१८९२ सालीं पुण्यास ह्यूमसाहेबांची स्वारी आली. १८८४ व १८८५ या दोन वर्षी ते कांग्रेसच्या वाटाघाटीसाठीं पुण्यास आले होते. देशहिताचें अष्टौप्रहर चिंतन करणारा सगळ्या देशांत जर कोणी अद्वितीय पुरुष असेल तर तो माधवरावच होत, अशी साहेबमजकुरांची पूर्वीच खात्री झाली होती व ही खात्री त्यांनीं बोलून दाखविली होती. ह्यूमसाहेब कांग्रेसचे जनक समजले जातात. पण माधवरावांना ते गुरू मानीत असत. त्यांच्या सन्मानार्थ हीराबागेंत सभा झाली. नंतर सायंकाळीं उपाहाराचा बेत केला होता. या प्रसंगीं कांहीं तरुणांनीं स्वयंसेवकत्वाची कामगिरी पत्करली होती. ह्यूमसाहेब सभास्थानीं येण्यापूर्वीच माधवराव तेथें आले व इमारतीच्या वरच्या मजल्यावर जाऊन बसले होते. थोडया वेळांनीं ह्यूमसाहेब आले व माधवराव जमलेल्या मंडळींत दिसेनात म्हणून जवळच्या एका स्वयं-सेवकाला 'आमचा देव महादेव कुठें आहे?' Where is our God Mahadeo? असा सहजगत्या प्रश्न विचारला. स्वयंसेवकाला त्याचा अर्थ कळेना, यामुळें तो बुचकळ्यांत पडला व गोंधळलेल्या चेह-ऱ्यानें ह्यूमसाहेबांकडें पाहूं लागला. तेव्हां ह्यूमसाहेबांनीं म्हटलें:— 'तुला आमचा देव कोण तें ठाऊक नाहीं! आमचा देव महादेव गोविंद रानडे तुला माहीत नाहीं!!' यावेळीं सदर स्वयंसेवकास

उमज पडला व त्यानें माधवरावांचें ठिकाण दाखविलें. नंतर ह्यूमसाहेब व माधवराव यांचें बराच वेळ संभाषण झाल्यावर ते दोघेही उपाहारासाठीं खालीं आले. ही आठवण सदर स्वयंसेवकानें मासिक मनोरंजनांत १९१४ सालीं 'एक भक्त' या सहीनें दिली आहे. त्याच्या इतर आठवणीदेखील वाचनीय आहेत. माधवरावांचा पुणेंकरांना कसा आधार होता, या विषयीं प्रस्तुत आठवणींत पुष्कळ गोष्टी आहेत.

यावर्षीं माधवरावांनीं शेतकऱ्यांच्या हिताचें दुसरें एक कर्तव्य सिद्धीस नेलें. शेतकरी वर्गाच्या कर्जबाजारीपणाची चौकशी करण्यासाठीं सरकारनें कमिशन नेमलें होतें. या कमिशनपुढें माधवरावांनीं १६ मार्च रोजीं साक्ष दिली. कमिशनकरितां यांनीं आपल्या विचारांचा एक जंगी लेख तयार केला होता व त्यांतल्या कित्येक मुद्द्यांवरून कमिशनच्या सभासदांनीं त्यांस उलटसुलट प्रश्न विचारले. माधवरावांनीं त्यांस चोख व अनुभवसिद्ध उत्तरें देऊन आपल्या विचारांची यथार्थता दाखविली. शेतकऱ्यांच्या हिताकरितां झालेल्या कायद्याची कमिशनच्या रूपानें पुरवणी निघाली होती. तो कायदा रद्द करावा, हा अनिष्ट हेतु कमिशनाच्या मुळाशीं असल्यानें तो हेतु हाणून पाडण्याचा माधवरावांनीं आपल्या साक्षींत यत्न केला. पुढें कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यावर त्याच्या शिफारसीप्रमाणें शेतकऱ्यांच्या कायद्यांत दुरुस्ती करण्याचें सरकारनें ठरविलें. तेव्हांही माधवरावांनीं सार्वजनिक सभेमार्फत अर्ज पाठवून योग्य दिशेनें दुरुस्ती होण्यासाठीं खटपट केली.

१८९२ सालच्या शेवटीं माधवरावांनीं प्रार्थनासमाजांत 'आपण देवाचीं लाडकीं लेकरें आहोंत' अशा अर्थाचें अत्यंत सुरस व्याख्यान

दिलें. हिंदुस्थान हें जरठजीर्ण राष्ट्र आहे व त्याला इतर प्राचीन राष्ट्रां-प्रमाणें मृत्यु येणार, असा डे.पर नांवाच्या एका इंग्रज लेखकाच्या पुस्तकांत ध्वनि होता. त्यास अनुलक्षून माधवरावांनीं आपण अजरामर आहोंत, परमेश्वराचा वरदहस्त आपल्या शिरावर आहे, अनेक पर-चक्रें आलीं, पण संकटांनीं, परचक्रांनीं या राष्ट्राला कमकुवत केलें नाहीं, परदेशी लोकांच्या येथील राज्यकर्तृत्वामुळें या देशाचा फायदाच झाला आहे, अशा अर्थाचें हृदयस्पर्शी निरूपण केलें. तें भाषण धर्मपर व्याख्यान–संग्रहांत समाविष्ट असल्यानें त्याचा आस्वाद वाच-कांनीं मुळांतून घ्यावा. हेच विचार त्यांनीं पुढें अलाहाबादेस भरलेल्या सामाजिक परिषदेंत बोलून दाखविले.

१८९३ सालांत माधवरावांचा कार्यक्रम पुनश्च पूर्वीसारखा चालू झाला. मे महिन्यांत वक्तृत्वोत्तेजक सभेत त्यांचें अध्यक्ष या नात्यानें पुनः मननीय विचार प्रकट झाले. शिवाजी महाराजांचें चरित्र, ज्यूरीचे हक्क, एक भाषा आणि 'चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती' हा अभंग असे चार वक्तृत्वाचे विषय होते. वक्त्यांनीं पहिल्या विषयावर बोल-तांना शिवछत्रपतींचा मुख्य उद्देश धर्मसंरक्षण होता, असें सांगितलें. माधवरावांनीं आपल्या भाषणांत ही कल्पना खोडून काढली. ते म्हणाले:—

शिवाजी महाराजांनीं केवळ धर्मोन्नतीकरितां प्रयत्न केला नाहीं. धर्मसंरक्षण हाच उद्देश त्यांच्या मनांत प्रबळ होण्याचें कारण नव्हतें. दक्षिणेंत मुसल्मानांनीं धार्मिक छळ केला असल्यास तो थोडा होता. इकडील मुसल्मानी राज्यांत सगळे हिंदूच मोठमोठाले अंमलदार होते. त्यांचा मुसल्मानांवर वचक असे. ही परिस्थिति लक्षांत घेतल्यास शिवाजी महाराजांनीं धर्मसंरक्षणार्थ स्वराज्यसंपा-दन केलें, असें म्हणतां येत नाहीं. देशाभिमान व स्वातंत्र्यप्रीति या कल्पना

शिवाजीच्या मनांत बऱ्याच अंशीं वागत होत्या, व दक्षिणचें वर्चस्व उत्तरेवर म्हणजे मराठ्यांचें मुसलमानावर बसविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. धर्मसंरक्षणाचा हेतु असलाच तर थोडा असेल.

ज्यूरीच्या हक्कांचा ऊहापोह करतांना परीक्षार्थी वक्त्यांनीं निराशा प्रदर्शित केली व आपण परतंत्र असल्यानें ज्यूरीच्या हक्काचा उपभोग आपणास लाभत नाहीं, असे उद्गार त्यांच्या तोंडून निघाले. या दिवसांत ज्यूरीचा हक्क काढून घेण्याचा प्रयत्न सरकारानें केला होता, पण तो शेवटास गेला नाहीं व कालान्तरानें कांहीं हक्क शाबूत राहिले. ही गोष्ट वक्त्यांना अवगत असल्यामुळें त्यानीं राजकारणाचा खल करून सध्याच्या राज्यकर्त्यांना दूषणें लावलीं, हें योग्यच झालें. स्वातंत्र्य, पारतंत्र्य; स्वराज्य, पराज्य; यासंबंधीं लोकांच्या कल्पना किती विचित्र आहेत, हें येथें सांगण्याची आवश्यकता नाहीं. कांहीं अपवाद सोडल्यास बहुतेक सर्व लोकप्रिय वृत्तपत्रांतून त्याचें प्रदर्शन नित्य होत असतें. आपल्या तोंडून जो शब्द उच्चारला जातो, त्याचा अर्थ न समजून घेतां अथवा लक्षांत न ठेवतां बेजबाबदारपणानें सभेच्या व्यासपीठावरून बकत सुटणारे वक्ते जसे आज आहेत, तसे त्यावेळीं होते. हे दिवस म्हणजे अशा वक्त्यांचा उदयकाळ मानण्यास हरकत नाहीं. त्यांच्या वक्तृत्वानें उत्पन्न होणारे भ्रम घालविण्याकरितां माधवरावांनीं या विषयाचें विस्तारपूर्वक विवेचन केलें. तें आजच्या दिवसांतही यथार्थ असल्यानें सविस्तर नमूद करण्यास हरकत नाहीं. ते म्हणाले:—

यासंबंधीं आपला हक्क गेला, पण तो पुनः मिळण्याची खटपट करण्यांत अर्थ आहे. आपल्या उद्योगानें हक्क संपादन केला म्हणजे त्याचें दानाचें स्वरूप जाऊन खास हक्काचें स्वरूप प्राप्त होतें. सांप्रतचा हक्क अल्प आहे. पण

तात्त्विक दृष्ट्या त्याचें महत्त्व विशेष आहे. नेहमीच आपणांस यश येईल, असें नाहीं. एकदमच पुष्कळसें यश येत गेलें तर आपल्या प्रयत्नांत असावा, तसा जोर रहाणार नाहीं. कोठें उंच वाट लागेल, कोठें खोलगट जागा लागेल, कधीं पाय खांचेंत पडेल, कधीं उंच जाईल; पण असें झाल्यानें कसल्याही जमीनीवर चालण्याची पायांस शक्ति येईल व ते सख्त होतील. कधीं सखल जागा लागली किंवा कधीं उंच जागा लागली म्हणून अतिशय निराशा किंवा अतिशय उल्लास न मानतां आपला रस्ता बरोबर आहे कीं नाहीं, एवढेंच नेहेमीं धोरण लक्षांत ठेवावें. आपणाला इंग्लंडचे व दुसऱ्या देशाचे इतिहास अवगत आहेत व त्यावरून हेंच आढळेल कीं, राजा व प्रजा यांच्यांत अधिकाराच्या देवघेवीची नेहमीं झटापट झालेली आहे. ही झटापट जितकी अधिक, तितकें तेज अधिक दिसतें. आपणांस पूर्वी पंचायत पद्धत सुरू होती, हें कबूल आहे; परंतु अर्वाचीन काळच्या या कल्पनेची प्रगल्भावस्था विशेष आहे. तेव्हां पूर्वीच्या संकुचित पद्धतीशीं तुलना सर्वांशीं करणें बरोबर होणार नाहीं. या विषयाचें दुसऱ्या एका दृष्टीनें महत्त्व आहे, तेंही लक्षांत घेतलें पाहिजे. अनेक वेळा असें म्हणण्यांत येतें कीं, आपण परतंत्र स्थितींत आहोंत. अमूक तमूक देश स्वतंत्र आहेत. आपण पारतंत्र्यांत आहोंत, हें उघड दिसतेंच आहे. स्वातंत्र्य व पारतंत्र्य हे शब्द आपण उच्चारतों खरें, परंतु त्याच्या अर्थाविषयीं व्हावा तसा स्पष्ट बोध क्वचितकांस होत नाहीं. कायदे करणें, कर बसविणें, शासन करणें व कामगार नेमणें, या चार पद्धती कोणत्याही राज्यपद्धतीच्या मुख्य आहेत. या चोहोंत सर्व गोष्टींचा अंतर्भाव होतो. देश स्वतंत्र असो कीं परतंत्र असो, या गोष्टी अवश्य आहेत. एखादा देश स्वतंत्र आहे म्हणून तेथें कर देण्यास नकोत अथवा कायदे करण्यास नकोत असें कांहीं नाहीं. स्वतंत्रता व परतंत्रता यांत खरोखर जें अंतर आहे तें हें कीं, शासन करण्यापूर्वी न्याय झाला पाहिजे; कर बसविण्यापूर्वी अनुमति पाहिजे; कायदा करण्यापूर्वी अभिप्राय घेतला पाहिजे. स्वतंत्र देशांत या गोष्टी होतात व परतंत्र देशांत त्या होत नाहीत. इतकाच यांत भेद आहे. जेथें लोकांच्या म्हणण्याला मान मिळतो, तो देश स्वतंत्र. जेथें नाहीं तो परतंत्र. या दृष्टीनें विचार केल्यास स्वतंत्र देश परतंत्र दिसतात.

म्युनिसिपालिटी म्हणजे केर काढण्याची संस्था असें म्हणतात, पण केराचा मुद्दा नाहीं, कामाचें महत्त्व निराळेंच आहे.

यानंतर माधवरावांनीं हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचें स्थान देतां यईल कीं काय या विषयासंबंधीं आपले विचार सांगितले. हिंदी भाषा हीच राष्ट्रभाषा होण्यास सर्वथैव योग्य, असें वक्त्यांचें प्रतिपादन होतें. माधवरावांनीं यावर आपलें ठाम मत व्यक्त केलें नाहीं. ते म्हणाले कीं, हिंदीबरोबर इंग्रजीचाही विचार ठेवला पाहिजे, कारण येथें मुसलमानांचा प्रवेश अगर अंमल नव्हता तेथें या भाषेचा प्रसार झाला नाहीं. चित्तशुद्धीवर, तो धार्मिक विषय असल्यानें, माधवरावांचें रसाळ भाषण झालें. त्याच विषयावरील त्यांचें एक प्रार्थनासमाजांतलें प्रवचन धर्मपर व्याख्यानांत प्रसिद्ध झालेलें असल्यामुळें वाचकांनीं त्याचें अवलोकन करावें. म्हणजे या वेळच्या भाषणाचा इत्यर्थ समजेल.

या दोन तीन वर्षांत माधवरावांच्या मित्रपरिवारांत मृत्यूनें नुसता धुमाकूळ मांडला होता, असें म्हटल्यास हरकत नाहीं. १८९२ मध्यें वामन शिवराम आपटे व गोपाळ हरी देशमुख हे दोघे निवर्तले. वामन शिवराम आपट्यांच्या दुखण्यांत प्रत्यहीं माधवराव त्यांच्या घरीं दोन तीन तास घालवीत असत. मृत्युसमयीं ते जवळच बसले होते. गोपाळ हरी देशमुख हे माधवरावांच्या अगोदरच्या पिढींतले अर्थात् उतार वय होऊन वारले, पण माधवरावांचा एक वयोवृद्ध जीवश्च कंठश्च मित्र गेला. १८९३ मध्यें नूलकर आणि यशवंत मोरेश्वर केळकर यांनीं परलोकाचा रस्ता धरला. सार्वजनिक सभेंतले एक निश्चयी कार्यकर्ते, या दृष्टीनें त्यांचें नांव आणि कर्तृत्व महाराष्ट्राला परिचित आहे. केळकर हे एक बुद्धिमान् सरकारी अंमलदार होते व माधव-

रावांचा त्यांच्यावर निरतिशय लोभ होता. केळकरांच्या मृत्यूनें त्यांना अनिवार दु:ख होऊन प्रार्थनासमाजांतली उपासना चालवितांना त्यांचा कंठ दाटला. विषयांतर केल्याखेरीज बोलतां येणार नाहीं, अशी खात्री पटल्यावर माधवरावांनीं 'दु:खाचे प्रसंग आणि ईश्वरविषयक कल्पना' या विषयावर भाषण करून शोक आवरला. १८९३ च्या दुसऱ्या सहामाहींत आणखी दोघां मित्रांना काळानें इहलोकांतून ओढून नेलें. सप्टेंबरच्या सुरुवातीलाच काशिनाथ त्रिंबक तेलंग दिवंगत झाले, व त्यांच्या मागून एका पंधरवडयाच्या आंत माधवरावांचे सहाध्यायी स्नेही नारायण महादेव परमानंद यांनाही मृत्युलोक सोडावा लागला. परमानंद यांना त्यांच्या मंडळींत ऋषि, ही पदवी प्राप्त झालेली होती. परमानंद आठदहा वर्षें रोगानें बिछान्यास खिळले होते. तेलंगाची नुकतीच चाळिशी उलटली होती व मानमान्यतेच्या ऐन मध्यान्हीस हा तेजस्वी तारा कर्तबगारीच्या अस्मानांतून तुटून पडला. तेलंगासारखा उमेदीचा पुरुष कालवश झाल्यामुळें माधवरावांचें अंत:-करण किती विदीर्ण झालें असेल याची कल्पनाच करणें योग्य! आक्टोबरांत तेलंगांचें स्मारक करण्यासाठीं मुंबईच्या नागरिकांची गव्हर्नरसाहेबांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरली, तेव्हां या मृतमित्राला माधवरावांनीं जी स्तुतिबाष्पांजलि समर्पण केली, तिच्यांत चिरस्थायी तात्त्विक रस ओतप्रोत असल्यानें तिचा ताजेपणा आजवर अबाधित टिकला आहे. या सभेंत तेलंगांचा गुणानुवाद पुष्कळांनीं गाइला. परंतु माधवरावांची बोलण्याची पाळी केव्हां येते, याची श्रोतृगण चातकाप्रमाणें वाट पहात होता. गव्हर्नरसाहेबांनीं त्यांचें नांव पुकारल्यानंतर माधवरावांची भव्यगंभीर मूर्ति अतिशय संथपणानें

व्यासपीठावर आली. श्रोत्यांनीं आपला आदर टाळ्याच्या गजरांनीं व्यक्त केला. माधवराव बोलूं लागले, त्यांच्या भाषणांत उपचार कधींच नसे. तो या अतिशय खेदावह प्रसंगीं कोठून येणार? माधवरावांनीं या भाषणांत तेलंगांना सेनापतीची उपमा देऊन आपण त्यांचे अनुयायी आहोंत, असें म्हटलें. तेलंग कालभवनांत अदृश्य झाले, आपण त्याच्या दरवाजापाशीं शोकाचें स्मरण रेंगाळत ठवलें आहे, असा हृदयद्रावक उपोद्घात करून माधवरावांनीं तेलंगांच्या चरित्राचें रहस्य उलगडून श्रोत्यांसमोर मांडलें. मरणापूर्वी तेलंगांनीं आपल्या मुलीचें लहानपणीं लग्न केल्यामुळें त्यांच्यावर टीकेचे जळजळीत निखारे पांखडले जात होते. या निखाऱ्यांत खाक होऊं पहाणाऱ्या त्यांच्या चारित्र्याला माधवरावांनीं यावेळीं वांचविलें, असें म्हणावयास हरकत नाहीं. गतकाळाचे आपण कांहीं लागत नाहीं, असें म्हणणारा एक पक्ष आहे. गतकाळाला तोडून चालणार नाहीं, असें दुसरा पक्ष म्हणतो. सुधारणेच्या जीवनकलहाचा त्रास या दोन्ही पक्षांना होत नाहीं. गतकाळाचे उपकार न विसरतां भविष्यकाळाचीं सूत्रें हातांत वागविणाऱ्या मध्यस्थ पक्षाचे हाल होतात व अशा पक्षाचे तेलंग अग्रणी होते. त्यामुळें प्रमादांसारखीं भासणारीं कृत्यें त्यांच्या हातून घडलीं. याप्रमाणें तेलंगाच्या चरित्राचें मर्म निवेदन करून माधवराव युरोपियन समाजास उद्देशून म्हणाले:—

तेलंगांच्या चरित्रांत दिसणारी विसंगति आजच्या युरोपियन समाजाला न उकलणाऱ्या कोड्याप्रमाणें वाटेल. पण जर युरोपियन श्रोते लूथर-इरॅस्मसच्या काळाकडे नजर टाकतील तर त्यावेळीं त्यांच्या पूर्वजांच्या जीविताची तेलंगांच्या सारखीच ओढाताण चालल्याचें दिसेल.

नंतर तेलंगांच्या स्मारकाचें समर्थन करून माधवरावांनीं श्रोत्यांची रजा घेतली. त्यांचें भाषण हें एक आत्मसमर्थन आहे. तेलंगांचें चरित्र पुढें करून त्यांनीं स्वतःच्या वर्तनांतल्या दोषांचा परिहार केला, असा पुष्कळांचा समज झाला. दुसऱ्या दिवशीं बँबे गॅझेट पत्रानें तो समज प्रसिद्ध केला. त्यांत आणखी कांहीं कुत्सित टीका होती म्हणून माधवरावांनीं एक पत्र वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केलें आणि माधवराव आपल्या कामानिमित्त पुण्यास व तेथून सोलापूरकडे दौऱ्यावर निघून गेले. तेलंगांच्या मृत्यूनंतर त्यांची जागा दोन महिने रिकामी होती. माधवरावांनाच ही जागा द्यावी, असा मजकूर साऱ्या हिंदुस्थानाच्या पत्रांतून प्रसिद्ध केला जात होता. माधवरावांची योग्यता सरकाराला माहीत असली तरी लोकहितार्थ सर्वस्व वेंचणाऱ्या या गृहस्थावर सरकारचें प्रेम नव्हतें. त्यांचे युरोपियन अंमलदार मित्र त्यांना सरकारचें मनोगत कळवीत असत. 'तुम्ही लोकसेवा सोडून देण्याला तयार असाल तर तुम्हांला बढती मिळेल.' असे युरोपियन मित्रांचे निरोप आले म्हणजे माधवरावांना वाईट वाटे. 'लोकसेवेची आणि आपली ताटातूट' ही कल्पना देखील त्यांस असह्य होत असे. याबद्दल माधवरावांनीं एकदा कै. विष्णु मोरेश्वर महाजनी याजपाशीं पुढील प्रमाणें उद्गार काढले:—*

लिहूं नका असें मला सांगणें म्हणजे वाचूं नका—मरा—असें सांगणें आहे. तें मला कसें पत्करेल ? ज्या भावनेनें मी लिहींत आहे, ती जिवंत जीव आहे तोंपर्यंत कायम राहील. बढती न मिळाली तर न मिळो !

१८८० सालीं ठाण्याच्या सेशन जज्जाची जागा रिकामी झाली. ती भरण्याविषयीं सरकारानें हायकोर्टाचा सल्ला विचारला. हायकोर्टानें

* विविधज्ञानविस्तार वर्ष ४५, अंक १, पृ. ५६

तेलंग व रानडे अशीं दोन नांवें सुचविलीं. तेलंगांना सरकारनें जागा पत्करण्याविषयीं प्रश्न टाकला, तेव्हां त्यांनीं आपला नकार कळविला माधवराव त्यावेळीं सरकारच्या मर्जीतून उतरलेले होते, त्यांना सरकारानें वगळले व गोपाळ हरी देशमुखांना त्या जागेवर पाठविलें. तेव्हां हायकोर्टाचे चीफ जस्टिस सर मायकेल वेस्ट्रॉप यांनीं माधवरावांना तेलंगांमार्फत निरोप पाठविला कीं, 'तुमचे लेख तुमच्या बढतीआड येतात. बढती हवी तर हे उपद्व्याप नकोत. या निरोपाला माधवरावांनीं जो जबाब पाठविला तो त्यांच्या सडेतोड व रोखठोक निःस्पृहपणाचा द्योतक आहे. त्यांचा जबाब पुढीलप्रमाणें आहे :—*

मी साहेबांचा आभारी आहे. साहेबांस कळवा कीं, मी अल्पसंतुष्ट आहे. मला थोडक्यांत निर्वाह करितां येतो, पण जें सत्य दिसतें तें माझ्या देशहितार्थ मला सांगितलेंच पाहिजे.

वरील माहिती माधवरावांच्या एका शिष्याला तेलंगांच्या तोंडून कळली व त्यानें ती 'रानड्यांचा एक शिष्य' या सहीनें विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध केली आहे.

तेलंगाची जागा कोणाला मिळणार याची चौकशी न करितां माधवराव आपल्या दौऱ्यावर निघून गेल्यानंतर नोव्हेंबरच्या सुरुवातीस सरकारनें त्यांची हायकोर्टांत नेमणूक झाल्याचें जाहीर केलें. माधवराव याप्रसंगीं सोलापुरास होते. दौऱ्यांत माढें गांवीं त्यांचा मुक्काम झाला, तेव्हा तेथील सबजज्ज कै. गोविंद वासुदेव कानिटकर यांच्या आग्रहावरून त्यांनीं एक भाषण केलें. 'खेड्यांतील लोकांचीं कर्तव्यें' हा त्यांचा भाषणाचा विषय होता. शहरांतून विविध चळवळी सुरू

* विविधज्ञानविस्तार वर्ष ४५, अंक ३, पृष्ठ ९६.

आहेत, पण खेडीं अजून जागीं झालेलीं नाहींत. खेडयापाडयांपर्यंत जागृतीचें वारें गेल्याशिवाय सगळ्या देशाचें कल्याण होणार नाहीं. शरीराचे अवयव ज्याप्रमाणें परस्परावलंबी व अन्योन्य साह्यकारी असतात, त्याप्रमाणे देशाच्या सर्व अवयवांची स्थिति झाली पाहिजे, असा माधवरावांनीं जमलेल्या खेडवळांना बोध केला. भाषणाची वेळ संध्याकाळची होती. माधवराव उभे होते, त्या जागेच्या आजूबाजूस मोठमोठाले घनदाट जुनाट वृक्ष होते. यामुळें गौतमबुद्धासारखा एखादा अवतारी पुरूष तपोवनामध्यें उभा राहून भोवताली जमलेल्या ज्ञानोत्सुक शिष्यवर्गाला गंभीर आवाजानें सद्बोध करीत आहे, असें कै. कानिटकरांना तें दृश्य दिसलें. सुधारकांत प्रसिद्ध केलेल्या आठवणींत त्यांनीं या प्रसंगाचें शब्दचित्र वरच्याप्रमाणें रेखाटलें आहे. माढयाहून माधवराव सोलापुरास गेले. तेथें त्यांचीं नागरिकांनीं व्याख्यानें करविलीं. एका व्याख्यानांत अध्यक्ष या नात्यानें माधवरावांनीं अमेरिकेसंबंधीं माहिती सांगितली. दुसऱ्या व्याख्यानापूर्वी एक दोन वक्त्यांनीं 'आपले पूर्वज पराक्रमी होते, आपल्या इतिहासांत लाज बाळगण्याजोगें, वाईट वाटण्याजोगें कांहीं नाहीं' असें सांगितलें. माधवरावांचा देशाभिमान इतिहासाच्या अध्ययनानेंच उत्पन्न झालेला होता, पण त्यांत एककल्लीपणा नव्हता, म्हणून त्यांनीं आपल्या भाषणांत पूर्ववक्त्यांची विचारपद्धति खोडून काढली. ते म्हणाले:—

आपली पूर्वस्थिति चांगली होती एवढ्या गोष्टीचा अभिमान नुसता धरण्यानें काम होणार नाहीं, असा केवळ अभिमान धरून बसणें म्हणजे एखाद्या गृहस्थाजवळ जहागिरीबद्दल जुनाट सनद असावी, परंतु त्या सनदेप्रमाणें वहिवाट नसून ती दुसऱ्याचे भोगवटयास असण्यासारखाच हा प्रकार आहे.

जसा त्या गृहस्थास नुसत्या जुनाट सनदेपासून कोणत्याही न्यायाचे कोर्टांत उपयोग करून घेतां येणार नाहीं, त्याप्रमाणेंच आपण आपले पूर्वकालीन गोष्टीचा केवळ अभिमान धरण्यानें कांहीं इत्यर्थ होणार नाहीं. ज्याप्रमाणें वरील गृहस्थास वहिवाट दाखविली असतां त्या सनदेचा पूर्ण उपयोग करून घेतां येईल त्याप्रमाणेंच आपण आपल्या ठिकाणीं कांहीं करामत आहे, पराक्रम आहे, असें दाखविल्याशिवाय नुसता अभिमान बाळगण्यानें कांहीं होणार नाहीं. यावरून अभिमान नसावा असें मात्र नाहीं. तो बाळगून तदनुरूप वर्तन व करामत पाहिजे आहे... तसें जर न केलें व व्यर्थ अभिमान मात्र राखला, तर अनागोंदीच्या जमाखर्चासारखें व्हावयाचें. पराक्रमाशिवाय नुसत्या अभिमानाचा उपयोग नाहीं. अशी जर आपली स्थिति आहे तर मग आपल्या रोगाची चिकित्सा करून त्यावर औषधें व अनुपानें घेतलीं पाहिजेत; त्याचप्रमाणें मी स्वयंभू आहे, असें म्हणणें देखील सयुक्तिक नाहीं. कांहीं भाग आपणाकडे असतो व कांहीं दुसऱ्याकडे असतो. हें प्रत्येकानें लक्षांत ठेवून वागावें. हल्ली जी आपल्या देशाची स्थिति म्हातारपणा आलेल्या माणसासारखी झालेली आहे, तिचें कारण आपणच केवळ नसून आपले पूर्वजही आहेत. म्हातारपणाचें मूळ चिन्ह म्हणजे परस्वाधीनपणा. या स्थितींतून पार पडण्यास साधन कायतें हेंच कीं, नवें हिंदुस्थान करा... सभोंवती न पहातां चालणाऱ्या स्वतःसिद्ध मनुष्यापासून उपयोग होणार नाहीं. तर मग ज्यास कर्तव्य म्हणून करणें आहे, त्यानें मधून चाललें पाहिजे. पूर्वजांचें वैभव गाऊन स्वस्थ न बसता त्यांचे अनुभवांचा उपयोग सावधपणें व हुशारीनें करून घेऊन कर्तव्य करण्यास निग्रहानें, उत्साहानें व आस्थेनें आपण लागले पाहिजे. हल्लींचे अभिमानाची स्थिति अशी झाली आहे कीं, प्राचीनांत प्राचीनांचा अभिमान न बाळगतां हजार पांचशें वर्षांचे पूर्वजांचा अभिमान बाळगण्यास आपण प्रवृत्त झालों आहों; व त्यामुळें उत्साह नाहींसा झाला, एकवटपणा गेला, चोहोंचे अठरा झालों व सर्वांची फाटाफूट झाली आहे; तर असें न करतां अतिप्राचीनांप्रमाणें आचारविचारांत उदात्तपणा ठेवून पराक्रमानें, नेटानें, निग्रहानें, निश्चयानें व उत्साहानें कर्तव्य करण्यास झटावें व असें केलें असतां निराशा बाळगण्याचें कारण नाहीं.

व्याख्यान दीड तास चाललें होतें. व्याख्यानाच्यावेळीं घाम आलेल्या अंगावर वारें लागून माधवराव आजारी पडले. आजारीपणांतच त्यांना हायकोर्टाची जागा दिल्याचा हुकूम मिळाला. या बढतीप्रीत्यर्थ आनंद व्यक्त करण्याचा पहिला मान सोलापरकरांना लाभला व त्यांनीं तो आनंद माधवरावांचीं तब्बेत संभाळून यथासांग प्रदर्शित केला.

माधवराव पुण्यास आल्यानंतर त्यांचा पुणेकरांनीं अभूतपूर्व सन्मान केला. त्या सन्मानाला त्यांनीं 'महादेवोत्सव' असें नांव दिलें. जिनें माधवरावांचा गौरव केला नाहीं, अशी पुण्यास एकही संस्था नव्हती. सर्व संस्थाची जणूकाय अहमहमिका सुरू होती. एकेका दिवसांत पानसुपारीचे चार पांच समारंभ पार पडत होते. माधवरावांची प्रकृति नीट नसतांही त्यांनीं कोणत्याही संस्थेचा विरस केला नाहीं. हीराबागेंत अतिशय टोलेजंग समारंभ झाला. तेथे दीपोत्सव आणि दारूकाम करण्यांत आलें. माधवराव घरून समारंभाकरितां जात असतां मार्गांत त्यांच्यावर नागरिकांनीं जागजागीं पुष्पवृष्टि केली. कांहीं संस्थांपुढें कांहीं समारंभांतून त्यांची मार्मिक उपदेशपर भाषणें झालीं. यूनियन क्लबांतलें भाषण विशेष बहारीचें होतें. पुण्याचे एक नागरिक कै. धाकजी काशिनाथ यांच्या अध्यक्षतेखालीं या क्लबानें माधवरावांचा गौरव केला. धाकजी काशिनाथ यांच्या एका व्याधीचें उदाहरण घेऊन माधवरावांनीं क्लबाचे उपयोग सांगितले. धाकजी काशिनाथ यांना आपल्या कानांत कांहीं तरी नाद चाललेला असतो, असें वाटे. त्यांनीं पुष्कळ इलाज केले, पण गुण आला नाहीं. शेवटीं औषधोपचाराचा नाद सोडून ते समानशील मित्रांच्या बैठकींत दररोज वेळ घालवूं लागले. कांहीं दिवसांनीं हा ध्वनि बंद पडला. ही गोष्ट सांगून

माधवराव म्हणाले कीं, धाकजी काशिनाथ यांच्याप्रमाणें शारिरिक नव्हे पण मानसिक नाद प्रत्येक माणसाच्या डोक्यांत घुमत असतो. आपण स्वयंपूर्ण आहोंत, आपल्याला जगांत शिकण्यासारखें कांहीं नाहीं, या कल्पनेचा ध्वनि (Ringing noise of self-sufficiency) माणसाच्या मस्तकांत भरलेला असतो. आपण स्वयंपूर्ण नाहीं, अज्ञ आहों, दुसऱ्यापाशीं शिकण्यासारखे पुष्कळ गुण असतात, याची जाणीव करून घ्यावयाची असल्यास क्लबांत जाणें, विचारविनियम करणें, हाच एक उपाय आहे. त्याचा अवलंब करावा, असें माधवरावांच्या उपदेशाचें मनोरंजक व मार्मिक सार आहे. दुसऱ्या एका भाषणांत त्यांनीं पुणेंकरांच्या स्वभावाची बोधपूर्वक स्तुति केली.

माधवरावांचे चहाते वरिष्ठ डा. पोलन त्यांना 'पुण्याचा अनभिषिक्त राजा' अशा शब्दांनीं कधीं कधीं संबोधीत असत. त्यांनीं प्रेमभरांत बहाल केलेली ही पदवी सार्थ होती, असें पुण्यांतील उत्सवानें दाखवून दिलें. त्यांना जाल्या सन्मानाचा अतिशय कंटाळा असल्यामुळें एका रात्रीस पुणेंकरांना नकळत पुणेंशहरांतून निघून मुंबईस प्रयाण करण्याचा बेत ठरविला. पुणें स्टेशनांतून मुंबईची गाडी सुटण्यापूर्वी माधवरावांच्या बेताची त्यांच्या भक्तांनीं चाहूल लागली व ते हारतुरे, गजरे घेऊन स्टेशनावर गेले. तेथें त्यांनीं माधवरावांना निरोप देतां देतां जेवढी आदरबुद्धि व्यक्त करतां आली तेवढी केली. माधवरावांच्या गुणांचें या वढतीनें साफल्य झालें, हा आनंद पुणेंकरांनीं केवळ स्वयंस्फूर्तीनें मागल वैमनस्यांचे व विरोधाचे प्रसंग विसरून प्रदर्शित केला असला तरी या आनंदांत सारें वैषम्य धुतलें जाऊन पुण्यांतल्या सार्वजनिक आयुष्याचा प्रवाह निर्मळ स्थितींत पुढें वाहूं लागला, अशी

कल्पना चुकीची ठरेल. माधवरावांच्या पश्चात् तो जास्त गढूळ होऊन त्याला फांटे फुटले, व कृशत्व आलें. हे फांटेच मग स्वतंत्रपणानें व वेगवेगळ्या दिशांनीं वहात चालले. एकप्रकारें माधवरावांना पुण्याहून मुंबईला नेण्यांत ईश्वरानेंच त्यांचा आब राखला, असें म्हणावयास हरकत नाहीं. माधवरावांना एकट्यालाच परमेश्वरानें अकलेची व शहाणपणाची सनद दिलेली नाहीं, असा अपमानकारक सवाल, संमतिवयाच्या वादांत उदयास आलेल्या नव्या देशभक्तीच्या पंथांतल्या अग्रगण्यांनीं विचारण्यास प्रारंभ केला होता. बढतीच्या अगोदरच कांहीं दिवस माधवरावांना हायकोर्टांतल्या न्यायासनाचा लोभ सुटला आहे, असा स्वार्थपरायणतेचा आरोप त्यांच्यावर केसरीनें लादला होता. या आरोपाचें कारण काय तर हिंदूची स्वतंत्र सभा पुण्यास भरवूं नये, असें माधवरावांनीं आपलें मत सांगितलें. ज्या पुरुषानें देशसेवेखातर योग्यता असतांही वयाच्या पन्नाशीपर्यंत सरकारची नाराजी पत्करून अगोदरची बढती लथाडली, त्यांजवर स्वार्थाचा उघड आरोप व तोही केवळ सार्वजनिक बाबींतल्या मतभेदासाठीं लादला जावा आणि वर असा आरोप करणारांची लोकप्रियता वाढावी, हें सुचिन्ह खास म्हणतां येत नाहीं. ज्यानें पुण्याची महती सर्वस्वीं आपल्या कर्तबगारीनें गाजविली, त्याच्या शुद्ध शीलावर अवास्तव कुत्सित आरोपांचा आत्मप्रतिष्ठेसाठीं काळिमा चोपडण्याचा कृतघ्न यत्न व्हावा, हें दुश्चिन्ह १८९१ नंतर जास्तच भीषण रूप धारण करीत चाललें होतें, अशा वेळीं माधवरावांचें स्थलांतर घडून आलें, हा हितावह योगायोग ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

महादेवोत्सवाचें ऋण माधवरावांनीं तावडतोब फेडलें. वस्तुतः

उत्सव करणाऱ्या संस्थाचें जनन, पोषण त्यांनींच केलें होतें. परंतु या वेळीं त्यांनीं आपल्या कमाईंतले २५००० रुपये वेगळे काढून ठळक ठळक प्रेमांतल्या संस्थांना देणगीच्या रूपानें वाटलें. याचा अर्थ मात्र त्यांनीं एकदम एका रकमेनें त्या संस्थांच्या हवाली केले, असा होत नाहीं. त्यांनीं ही रक्कम दोघा ट्रस्टींच्या स्वाधीन केली व तिचें व्याज दरसाल त्या त्या संस्थाकडे पोंचतें करावें, अशी जबाबदारी ट्रस्टींवर टाकली. संस्थाचालकांविषयीं त्यांच्या मनांत अविश्वास असल्यानें त्यांनीं वरच्याप्रमाणें व्यवस्था केली, असा तर्क यावरून निघतो. पण थोडासा विचार केल्यास हा तर्क चुकीचा असल्याचें दिसून येतें. एखादी संस्था जर पुढें मागें नामशेष झाली, तर त्यांच्या बरोबर देणगीचें द्रव्य फुकट वाया गेलें, असें होऊं नये म्हणून माधवरावांनीं वरच्यासारखी आपल्या दातृत्वांत सावधगिरी ठेवली होती. ही सावधगिरी योग्य होती,असें पुढच्या संस्थालोपाच्या इतिहासावरून समजण्यास-हरकत नाहीं.सार्वजनिक सभा,त्रैमासिक,हीराबागेंतला टाउनहॉल, सध्याची पुणें नेटिव्ह जनरल लायब्ररीचा इमारत, औद्योगिक परिषद्, प्रदर्शन व संघ, रे म्युझियन, रेशमाची गिरणी, तांब्यापितळेची गिरणी, फर्ग्युसन कॉलेज, फीमेल हायस्कूल, :लवाद कोर्टें, सबजज्जांची परिषद्, पूना मर्कंटाइल बँक, प्रार्थनासमाज, वक्तृत्वोत्तेजक सभा, मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी, वसंतव्याख्यानमाला, पुणें रंगशाळा, मुंढवा येथील कागदाची गिरणी, या त्यांनीं काढलेल्या किंवा पूर्वी निघून त्यांनीं वाढविलेल्या संस्थांपैकी कांहीं संस्था आहेत. त्यांतल्या किती मेल्या व किती जगल्या आहेत, हें वरच्या नांवावरून नजर टाकल्यास देखील कळणारे असल्यामुळें त्याचें जास्त विवेचन करण्याची जरूरी नाहीं. संस्थांच्या

चालकांतील स्वार्थसाधूंचा भरणा व त्यांच्यामुळें होणारी संस्थेच्या तिजोरींतली अफरातफर, ही संस्थांच्या मृत्यूचीं कारणें ओळखून माधवरावांनीं आपल्या देणगीला संस्थांच्या मृत्यूपासून सुरक्षित दूर ठेवलें.

माधवरावांनीं या पूर्वी बहुतेक सर्व चळवळीमध्यें द्रव्यांश ओतला होता. जेवढया संस्थांच्या इमारती बांधल्या गेल्या तेवढया सगळयांच्या इमारतफंडामध्यें माधवरावांच्या देणगीचा भाग आहे. स्वतःच्या देणगीचा आंकडा अगोदर घालूनच ते प्रत्येक चळवळींत पडत असत. चळवळींत आपलें कोरडें नांव असल्यानेंही तिला इतरांची मदत मिळते म्हणून दातृत्वशून्य मोठेपणा मिरवणारांपैकी माधवराव नव्हते. त्यांचा प्रपंचपरिवार मोठा होता, अतिथीअभ्यागतांची व आश्रितांची गर्दी त्यांच्याकडे हंमेश असे, शिवाय गरीब विद्यार्थीवर्गाला जेवण, फी, पुस्तकासाठीं देणगी, या रूपानें सढळ हाताच्या दातृत्वाचा ओघ अहर्निश वहात होता. या खाजगी स्वरूपाच्या दातृत्वाप्रमाणें त्यांच्या सार्वजनिक चळवळींतल्या दातृत्वाचा प्रवाह दांडगा होता. तरी त्यांनीं पुणें सोडतांना पंचवीस हजार रुपयांचा देकार केला. महाराष्ट्रांत त्यांच्यासारखें दातृत्वाचें उदाहरण गेल्या शंभर वर्षांत दुसरें दाखवितां येणार नाहीं. याखेरीज कै. अगारयांनीं आपल्या १९०४ सालच्या व्याख्यानांत आणखी कांहीं त्यांच्या सार्वजनिक औदार्याचीं उदाहरणें दिलीं आहेत. कोल्हापुरास उत्तरेश्वराच्या देवालयासमोरचा सभामंडप त्यांनीं आपल्या खर्चानें बांधला. आळंदीस एक धर्मशाळा उभारली, पुण्याच्या संस्कृत पाठशाळेला व वेदशास्त्रोत्तेजक सभेला त्यांनीं देणग्या दिल्या. पर्वतीच्या टेकडीखालीं पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली, हीं अगारयांनीं

सांगितलेलीं उदाहरणें आहेत. पुस्तकांच्या रूपानें त्यांनीं फिरतीवर असतांना महाराष्ट्रांतल्या कितीतरी वाचनालयांना देणग्या अर्पण केल्या.

सूर्य अस्तास जातांना रात्रीं आपली तेजस्विता अग्नीमध्यें ठेवतो असा एक संस्कृत कवींचा संकेत आहे. तद्वत् सूर्यतुल्य माधवरावांनीं पुण्याहून पश्चिमदिशेकडे मुंबईस प्रयाण करतांना आपल्या कर्तृत्वाचा एक तेजस्वी किरण मागें ठेवला होता. गोपाळ कृष्ण गोखले हाच तो किरण होय. १८८४ सालीं वयाच्या अठराव्या वर्षीं बी. ए. च्या परिक्षेंत यश संपादन करून गोखले पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटींत पगारी मास्तर या नात्यानें प्रथम दाखल झाले. १८८५ सालीं रास्त्याच्या पेठेंत कुंटे व माधवराव यांची गांठ पडल्याची एक हकीकत पूर्वीं निवेदन केली आहे. तो माधवरावांच्या थोरवीचा सहृदय प्रेक्षकाचें अंतःकरण भारून टाकणारा देखावा पहाणारांत गोपाळरावजी हजर होते. १८८७ सालीं आगरकरांच्या शिफारसीवरून माधवरावांचे भक्त स्नेही कै. शिवराम हरी साठे यांच्या मध्यस्थीनें माधवरावांची व गोखल्यांची समक्ष भेट झाली. गोखल्यांचें वय तेव्हां एकवीस वर्षांचें होते. हुशारी, तरतरी, उत्साह, सांगितल्या दिशेनें काम करण्याची हौस, कळकळ, स्वीकारलेल्या कामाच्या जबाबदारीची जाणीव, वगैरे त्यांच्या अंगचे गुण माधवरावांच्या दृष्टींत भरले व त्यांनीं त्यास हाताशीं धरलें. १८९० सालीं फेब्रुवारीं १६ व्या तारखेला माधवरावांनीं कै. ग. व्यं. जोशी यांना जुन्नराहून पत्र लिहिलें, त्यांत त्यांनीं गोपाळरावजींचा पुढील-प्रमाणें गुणानुवाद नमूद केला. ते म्हणतात:—

During the last six months that he has been working with me, I have formed a very high opinion of his great

powers and his readiness to do his best under all circumstances. He is essentially an honest—intellectually as much as morally–student, and, I am sure, you will find in him a worthy collabourer.

गोपाळराव माझ्याजवळ अलीकडे सहा महिने काम करीत आहेत व या मुदतींत त्यांच्या जबर कर्तबगारीविषयीं माझें उत्तम मत झालें आहे. असेल त्या परिस्थितीमध्यें कोणत्याही प्रकारची हयगय न करतां शक्तिसर्वस्व खर्चून काम करण्याची त्यांची तयारी दिसून येते. ते एक नीतीनें व बुद्धिमत्तेनें प्रामाणिक विद्यार्थी आहेत. तुमच्या बरोबरीनें काम करण्याला ते एक योग्य गृहस्थ आहेत, असा वरील उताऱ्याचा भावार्थ आहे. माधवरावांविषयीं गोपाळरावांचा आदर निरतिशय होता. माधवरावांना एखादी गोष्ट पसंत पडली म्हणजे तिचा साऱ्या दुनियेनें धिक्कार केला तरी गोपाळरावांना त्याची फिकीर वाटत नसे. १८९७ सालीं वेल्बी कमिशनपुढें विलायतेस गोपाळरावांची साक्ष झाली. गोपाळरावांची मग जिकडे तिकडे बोलबाला गाजूं लागली, पण माधवरावांना ही साक्ष पसंत आहे कीं नाहीं, एवढीच गोपाळरावांनां काळजी होती. ती त्यांनीं इंग्लंडाहून पत्र पाठवून माधवरावांपाशीं व्यक्त केली. त्या पत्रांतला मुद्दयाचा उतारा माधवरावांनीं कै. जोशी यांस कळविला. तो उतारा असा:—

Mr. Gokhale writes to me 'if you find time to go through the statement and feel satisfied, I shall have received the only reward I care.'

'आपणास जर फुरसत सांपडून आपण माझ्या साक्षीचें कागद वाचले व त्या योगानें आपलें समाधान झालें तर मला इष्ट वाटणारें

बक्षीस माझ्या पदरीं पडलें, असें मी समजेन. अशी वरच्या उताऱ्यांत आपली भक्ति व्यक्त केली. पुण्यांतील प्लेगच्या व्यवस्थेबद्दल विलायतेस, पुण्यांतील मित्रांच्या पत्रांवर विसंबून, गोपाळरावांनीं १८९७ सालीं कांहीं विधानें केलीं. तीं खोटी ठरल्यामुळें त्यांस स्वदेशीं परत आल्यावर माफी मागावी लागली. तेव्हां माफीबद्दल गोपाळरावांविरुद्ध काहूर माजलें, उमरावतीच्या कांग्रेसमध्यें गोपाळरावांचा अपमान करून त्यांच्या माफीचा निषेध दाखवावा म्हणून कित्येकांनीं खटपट केली. परंतु माधवरावांनीं गोपाळरावांना पाठीशीं घातल्यामुळें या खटपटी व्यर्थ गेल्या. १८९८ सालच्या प्रारंभीं गोपाळरावांनीं आपल्यावर झालेल्या टीकेस सविस्तर उत्तर दिलें आहे. त्यांत आपल्या कृत्याबद्दल विलायतेच्या व येथल्या इंग्रज पुढाऱ्यांचें अनुकूल मत आहे, असें लिहून शेवटीं गोपाळराव लिहितात:—

Several of my Indian friends have been equally kind- foremost among them being the gentleman at whose feet I have now sat for these many years as a pupil.

१८९९ मध्यें गोपाळराव कायदेकौन्सिलांत निवडून आले तेव्हां हीराबागेंत १९०० च्या जानेवारीमध्यें सन्मानसमारंभ झाला. सर डॉ. भांडारकरांनीं व गंगारामभाऊ म्हस्के, यांनीं गोखल्यांची स्तुति केली. समारंभाला माधवराव हजर होते. भाषणाच्या शेवटीं गोखले म्हणाले:—

न्या. मू. रानडे यांनीं मला हाताशीं धरलें व त्यांच्या पायाशीं बसून शिकण्यांची संधी मला मिळाली, म्हणूनच आज मला ही स्थिति प्राप्त झाली आहे.

# प्रकरण चवदावें.

## न्यायमूर्तीच्या आसनावर.

माधवरावांनी ता. २३ नोव्हेंबर १८९३ या दिवशीं न्यायमूर्तीच्या उन्नत शुभासनावर आरोहण केलें. हा समारंभ पहाण्याकरितां मुंबईचे अनेक आबालवृद्ध नागरिक त्या दिवशीं हायकोर्टांत गेले होते. न्यायमूर्तीच्या कामगिरीची जोखीम त्यांस कशी पार पाडतां येईल, याविषयीं कोणालाही सांशक होण्याचें कारण नव्हतें. सबजज्जाच्या कनिष्ठ जागेवरून दिलेले ज्याचे निकाल हायकोर्टांतल्या गुणज्ञ न्यायमूर्तींना आश्चर्यानें तोंडांत बोट घालावयास लावीत होते, तो पुरुष साक्षात् न्यायमूर्ती झाल्यावर आपलें काम निष्ठेनें चोख बजावूं लागला, हें सांगणें म्हणजे पुनरुक्तीचा दोष पदरीं घेण्यासारखें आहे. तथापि इतर न्यायमूर्ति आणि माधवराव यांच्यांत प्रकृतिभेदामुळें व कर्तव्यनिष्ठेच्या न्यूनाधिक्यामुळें बराच फरक दिसून येतो. माधवरावांकडे अपीलांच्या सुनावणीचें काम आलें. खालच्या कोर्टांतल्या निकालावर एखादें अपील हायकोर्टांत गुदरलें म्हणजे तें दाखल करून घेतांना त्या संबंधाचे सगळे कागद पहाण्याचा इतर न्यायमूर्तींचा प्रघात नव्हता. माधवरावांची न्यायबुद्धि असामान्य असल्यामुळें

ते सगळे कागद नजरेखालीं घालून नंतर अपीलाच्या ग्राह्याग्राह्यतबद्दल मत देत असत. यामुळें त्यांचें काम वाढलें; पण अन्याय होऊं नये, म्हणून त्यांनीं हा ज्यादा कामाचा बोजा शिरावर घेतला. १८९३ पासून १९०० सालच्या अखेरीपर्यंत त्यांना साहजीकच शेंकडो अपीलांचे निकाल करावे लागले, पण त्यांतला एकही निकाल सांगोपांग विचार केल्याशिवाय त्यांनीं दिला नाहीं. १८९३ सालांत हिंदुमुसलमानांत दंगे झाले. दंग्यांतल्या धरपकडीचे कांहीं खटले माधवरावांसमोर आले, तेव्हां आपण हिंदू आहों, या पक्षपाती भावनेचा पगडा त्यांच्या चित्तावर नव्हता, असें सर्वांना पहावयास सांपडलें. १८९७ सालीं पुण्यास दोघा युरोपियनांचा खून होऊन जनतेच्या मानसिक वातावरणांत क्षोभ, भीति, चिंता इत्यादि विकारांच्या छाया पसरल्या, पण माधवरावांच्या अंतरंगांला हे विकार शिवले नाहींत. या खुनाच्या प्रकरणांतल्या कित्येक खटल्याचीं अपीलें त्यांच्याकडे निकालासाठीं गेलीं, त्यांचे निकाल लोकमतानुसार होतील, अशी जनतेची अटकळ होती, पण माधवरावाच्या न्यायबुद्धीचा कांटा लोकमताच्या वाऱ्यानें हेलकावे खाऊन पक्षपाताच्या बाजूस झुकण्याइतका हलका नव्हता. त्यामुळें कित्येकदां टीकेच्या झंझावातांत सांपडण्याचा त्यांजवर प्रसंग आला.

सरकारनें केलेल्या कायद्यांची अक्षरशः अंमलबजावणी करणें, हें ज़री न्यायमूर्तींचें मुख्य कर्तव्य असलें तरी कायदा करण्यांतला लोकहिताचा हेतु ध्यानांत बाळगून पुष्कळ वेळां निकाल देण्याचें आनुषंगिक कर्तव्य त्यांस करावें लागतें व मूळ कायद्याची पायमल्ली न होऊं देतां हें दुसरें कर्तव्य बजावण्यांतच उत्तम न्यायाधिशांचें खरें

कौशल्य दिसून येतें. न्यायाधिशांच्या निकालाला कायद्याइतकेंच महत्त्व प्राप्त होतें, याचें कारण हेंच होय. या दुसऱ्या कर्तव्याच्या बाबतीत माधवरावांना कमी गुण दिले जातात. त्यांनीं आपल्या जबाबदारीवर निकालांच्या रूपानें मूळच्या कायद्याचें स्वरूप पालटून टाकण्याचा अट्टाहास कधीं केला नाहीं. तसें करण्याला त्यांना फक्त एकाच कायद्यांत मुबलक सवड होती. हिंदू समाजाच्या कुटुंबव्यवहाराचें नियमन ज्या कायद्यानें होतें, त्याला पीनलकोड, क्रिमिनल प्रोसीजर कोड यासारखें बांधीव स्वरूप आलेलें नाहीं. शास्त्रवचनांच्या अनुरोधानें हिंदूच्या कुटुंबव्यवहारांतल्या भानगडींचे निकाल केले जातात. ज्या ठिकाणीं न्यायाला किंवा माणुसकीला काळीमा लागण्याचा संभव आढळेल, त्याठिकाणीं शास्त्रवचनें झुगारून निकाल करण्याची पद्धत इंग्रजी राज्यकर्त्यांनीं ठेविली आहे. माधवरावांना हिंदू कायद्यांत फिरवाफिरव करायला सवड होती, पण त्यांनीं तिचा फायदा घेऊन आपल्या सुधारणाविषयक मतांचें स्तोम माजविण्याचा मोह धरला नाहीं. हिंदू कायद्याच्या संबंधांत त्यांनीं जेवढे निकाल दिले, तेवढे त्यांच्या इतिहासज्ञ विद्वत्तेचे द्योतक आहेत. श्रुतिस्मृति, पुराणें, इतिहास व इंग्रजी न्यायाधिशांनीं वेळोवेळीं केलेले महत्त्वाचे निकाल, या सर्वांचा परामर्ष घेऊन, त्यांतील विरोधाचा परिहार करून ते आपला निकाल तयार करीत व या दृष्टीनें पाहिल्यास त्यांचे निकाल म्हणजे हिंदू समाजांतील त्या त्या प्रश्नांवरील विद्वत्ता प्रचुर निबंधच आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं.

माधवरावांच्या कामाची पद्धत कशी होती, याचीं कांहीं उदाहरणें श्री. रमाबाईंच्या 'आठवणीं'त आहेत. एकदां फांशीच्या शिक्षेतून कांहीं आरोपींना वांचविण्याकरितां एकाग्र चित्तानें कित्येक तास निकाल

लिहिण्यांत घालवून त्यांनीं आपल्या मूळच्या व्याधिग्रस्त शरीराला अधिक इजा करून घेतली, हें 'आठवणीं 'तलें उदाहरण विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. दर शनिवारीं माधवराव संदर्भ पहाण्यासाठीं गाडाभर पुस्तकें घरीं आणीत आणि त्यांतल्या ग्राह्य भागाचें अवलोकन संपल्यावर परिपक्व विचाराच्या आणि माहितीच्या तयारीनिशीं निकाल सांगण्याला बसण्याची माधवरावांची रीत होती. एकदां ते सतत नऊ तास निकालाचा मजकूर सांगत बसले होते, ही हकीकत पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांतील अर्थशास्त्राचे ग्रंथकार अध्यापक प्रो. वामन गोविंद काळे यांनीं १९१० सालीं स्टूडंट ब्रदरहूड पुढें दिलेल्या व्याख्या-नांत निवेदन केली आहे. अपील सुनावणीला निघण्यापूर्वी त्याचे सर्व कागद वाचून टाकण्याची संवय हायकोर्टांतही कायम असल्यानें त्यांच्यापुढें काम चालवितांना वकिलांची फारच धांदल उडून जाई. स्वतःच्या माहितीवरून केव्हां काय अडचणीचा प्रश्न माधवराव विचा-रतील याचा नियम नव्हता. त्यामुळें वकिलांनाही पूर्ण तयारी करावी लागे. अगोदर कागद वाचल्यानें माधवरावांचें खटल्याबद्दल सुनावणी पूर्वींच अनुकूल वा प्रतिकूल मत बनत असे, तथापि तें ठाम न समजतां त्यांत फेरफार करण्याला ते सदैव तत्पर असल्यामुळें पूर्वग्रहाचा जोर चालत नसे. माधवरावांना मोठ्यानें वाचण्याची खोड लहानपणापासून जडलेली होती. मोठ्यानें मजकूर वाचल्याशिवाय किंवा बोलल्याशिवाय त्यांना त्यांतल्या अर्थाचा योग्य उमज पडत नाहीं, असें त्यांच्यापुढें काम करणाऱ्या वकिलांच्या लक्षांत आल्यानंतर ते त्याप्रमाणें खबरदारी घेऊं लागले, असें कै. सर नारायण चंदावरकरांनीं १९०२ सालच्या स्मृतिपर व्याख्यानांत म्हटलें आहे. खुनाचे खटले समोर आले कीं,

माधवरावांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेचा प्रभाव दृष्टीस पडे. खटल्यामध्यें जितकी गुंतागुंत जास्त तितकी माधवरावांच्या बुद्धिमत्तेची मर्मग्राही शक्ति जास्त प्रकट होऊन बिनचूक निकाल लागायचा, अशी सर्व सहकारी न्यायाधीशांची खात्री पटली होती. 'आपल्याला फौजदारी खटले ऐकतांना माधवरावांची अतिशय मदत झाली' असें माधवरावांच्या मृत्यूनंतर एका युरोपियन न्यायाधीशानें कै. सर नारायणरावांना कृतज्ञतापूर्वक कळविलें. माधवरावांच्या मृत्यूचें दुःख व्यक्त करतांना बहुतेक सर्व जज्जांनीं त्यांच्या विद्वत्तेचे, परिश्रमाचे, सौजन्याचे गोडवे गाइले आहेत. अडचणीचा प्रश्न आला कीं, त्यांतून समाधानकारक सोडवणूक करणारा माधवरावांसारखा सल्लागार मिळायचा नाहीं, अशी प्रत्येकाची भावना झालेली होती. माधवरावांबरोबर काम करणारे न्यायाधीश पार्सन्स हे पेन्शन घेऊन विलायतेस गेले, तेव्हां मुंबईच्या टाइम्स पत्रामध्यें त्या विषयींच्या लेखांत 'पार्सन्स स्वतः अतिशय विद्वान्, माहितगार व अनुभवी असतांही त्यांना कायद्यांत अडणारे प्रश्न माधवराव सहज सोडवीत' असा मजकूर प्रसिद्ध झाला होता. हायकोर्टांत काम करणाऱ्या हिंदी वकिलांतल्या योग्य गृहस्थाला तेथील न्यायाधीश नेमण्याची सरकारी रीत असल्यामुळें मुंबईबाहेरच्या सामाजिक व्यवहारांचें ज्ञान प्रायः अशा न्यायाधीशांना असत नाहीं. असलेंच तर पुस्तकी असतें. माधवरावांच्या बाबतींत हें वैगुण्य नव्हतें. त्या योगानें त्यांचा सल्ला केव्हांही टाकाऊ ठरला नाहीं. हायकोर्टाचें मत घेतल्याशिवाय कोणताही कायदा अंमलांत आणावयाचा नाहीं असा सरकारी रिवाज आहे. त्यास अनुसरून एखादा कायदा विचारार्थ आला कीं, माधवरावांच्या मताची छाप पडून बहुधा

त्यांच्या सल्ल्याबरहुकूम सर्व न्यायाधीशांचें सामवायिक मत सरकारकडे पाठविलें जात असे. बांबलॉरिपोर्टर या पाक्षिकांतल्या माधवरावांवरील मृत्युलेखांत, एकदां माधवरावांचा सल्ला सरकारानें अक्षरशः अमलांत आणला, असें लिहिलें आहे.

* *

सरकारानें माधवरावांच्या योग्यतेचें चीज करण्याला उशीर लावला तरी कित्येक संस्थानिकांनीं त्यांच्या गुणांचा लाभ आपल्या राज्यकारभाराला होण्याकरितां त्यांस मोठमोठाले हुद्दे देऊं केले होते. हायकोर्टांत आल्यावर तीन वर्षांनीं म्हणजे १८९६ सालीं बडोद्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव यांनीं आपल्या राज्याची दिवाणगिरी पत्करण्याविषयीं माधवरावांना पृच्छा केली. त्या प्रसंगीं माधवरावांनीं पाठविलेला जबाब उपलब्ध आहे. तो अतिशय लांबलचक असून त्यांत संस्थानचा राज्यकारभार कसा चालवावा, याचें सविस्तर विवेचन आहे. बडोदें संस्थानांतून हें तिसरें निमंत्रण आलें होतें. दादाभाई नौरोजी दिवाण असतांना त्यांनीं प्रथम पाचारण केलें. कै. विनायक जनार्दन कीर्तने बडोद्यास होते, तेव्हां असाच दुसऱ्यांदा प्रयत्न झाला, दोन्ही प्रसंगीं माधवरावांच्या सल्लामसलतगारांनीं संस्थानांतील नोकरी पत्करूं नये, असें त्यास निक्षून मत दिलें. तिसऱ्यावेळीं त्यांनीं संस्थानी नोकरीची हांव धरण्यांत अर्थ नाहीं, असाच मित्रवर्गाचा सल्ला मिळाला. शिवाय प्रकृति वारंवार बिघडते, दिवसानुदिवस शक्ति कमी होत चालली होती, हें एक संस्थानी नोकरी टाळण्याचें बलवत्तर कारण यावेळीं प्रत्ययास आलें. बडोद्याशिवाय कोल्हापूर व इंदूर या दोन संस्थानांनीं त्यांचा गौरव करण्याचें अनुक्रमें १८८४ व १८८५ सालांत योजिलें होतें.

कोल्हापुरास त्यांना रीजंट या नात्यानें बोलावलें होतें, परंतु ते गेले नाहींत व त्यांच्याच सल्ल्यावरून आबासाहेब कागलकरांची त्या जागीं नेमणूक झाली, असें म्हणतात. इंदूरच्या निमंत्रणाचाही त्यांनीं अव्हेर केला. बडोद्याचें तिसरें निमंत्रण नाकारतांना त्यांनीं लिहिलेल्या जबाबांत निर्भीड स्पष्टोक्ति पुष्कळच आहे. तिचें निराकरण माधवरावांनीं पुढच्या शब्दांनीं केलें आहे. हे शब्द आत्मप्रत्ययाचे असल्यानें त्यांचें महत्त्व वेगळें वर्णायला नको. ते म्हणतात:—

In my relations with the British Government, I have always been known as one, who while serving in the post that he has successfully filled, has at the same time never bartered his freedom for any personal consideration.

आपलें सरकारी काम यशःपूर्वक बजावून स्वातंत्र्य कायम राखणारा, अशी ब्रिटिश सरकारांत आपली ख्याति आहे आणि मतस्वातंत्र्य कायम ठेवण्याच्या स्वभावामुळें स्पष्टोक्तीचा उपदेश केला, असें माधवरावांनीं वरच्या उताऱ्यांत म्हटलें आहे. संस्थानांत मतस्वातंत्र्यांची गळचेपी होईल, ही धास्ती त्यांच्या मसलतगारांनीं या प्रसंगीं व्यक्त केली होती. संस्थानें-मग तीं कितीही सुधारलेलीं असोत-आणि ब्रिटिश सरकार यामधलें अंतर यावरून निःसंदेह दृष्टीस पडतें. माधवरावांच्या स्वार्थत्यागाचें प्रतिबिंब या प्रकरणांत आढळतें, हें सांगण्याची गरज नाहीं. बडोदें संस्थानाचा आणि माधवरावांचा ऋणानुबंध विशेष होता. त्यांचे विद्यार्थीदशेंतले गुरु, सहाध्यायी आणि प्रोफेसरीच्या काळांतले कांहीं शिष्य या संस्थानांत फार मोठाल्या हुद्द्यावर नोकर होते. माधवरावांना निमंत्रणें पाठविण्यांत त्यांची खटपट असे. श्री. सयाजीराव राज्यकारभाराचें शिक्षण घेत असतां विनायक जनार्दन

कीर्तने यांनीं त्यांच्यासाठीं व्याख्यानमाला तयार केली. सदर व्याख्यानमालेंत माधवरावांच्या सल्लामसलतीचा भाग आहे. त्यांना सगळ्या संस्थानांची माहिती उत्तम होती, पण त्यांतल्यात्यांत बडोद्याचें ज्ञान वरील कारणामुळें विशेष होतें. पण सर टी. माधवराव, सर दिनकरराव राजवाडे यांच्याप्रमाणें संस्थानच्या मुत्सद्दीवर्गांत माधवरावांची गणना व्हावी आणि त्यांच्या कर्तबगारीच्या क्षेत्राचा संकोच व्हावा, असा योग नव्हता.

*     *     *

माधवरावांचा अवतार लोकहितार्थ झिजण्यासाठींच झाला असल्यामुळें त्यांचा सरकारी नोकरीबाहेरचा काळ लोकोपयोगी कामें करण्यांत मुंबईला ही जात होता. पुण्यास जसें चोवीस तास कामाचें रहाटगाडें चालू होतें, तसेंच तें मुंबईला सुरू झालें. वार्षिक सभारंभ, प्रार्थनासमाजांतल्या उपासना, शहरांत येणाऱ्या परस्थ विद्वानांचा, उपदेशकांचा किंवा व्याख्यात्यांचा सन्मान, हेमंत मालेसारखीं व्याख्यानसत्रें, युनिव्हर्सिटींतील कामकाजाच्या बैठकी, अशा अनेक कारणामुळें त्यांच्या बहुविध कार्याचा प्रवाह दुथडी तुडुंब भरून चालता होता. परंतु शहरांतल्या कामाच्या गर्दींत आपल्या आवडत्या सामाजिक परिषदेचा त्यांना कधींच विसर पडला नाहीं. वर्षभर सामाजिक सुधारणांच्या संस्थाची आणि चळवळीची माहिती मिळविणें, तिची वर्गवारी करणें तिच्यांतून निघणारे उत्साहवर्धक निष्कर्ष काढणें, या उलाढालीला त्यांनीं आमरण खळ पडूं दिला नाहीं. सामाजिक परिषदेंतलीं त्यांचीं व्याख्यानें एकत्र छापून प्रसिद्ध झालेलीं असल्यामुळें त्यांचा तपशील येथें सांगत बसण्याची अवश्यकता नाहीं. परंतु या अवधी-

तल्या एक दोन परिषदा अतिशय खळबळ उडवून देणाऱ्या घडल्या-मुळें व त्यांतल्या एकीबद्दल अजून गैरसमज शिल्लक असल्यामुळें त्यांची सविस्तर हकीकत सांगणें प्राप्त आहे.

कालानुक्रमानें या दोन परिषदांतली १८९५ सालची पुण्यास भरलेली परिषद् अगोदरची व जास्त महत्त्वाची आहे. १८८९ साला-पासून कांग्रेसच्या मंडपांत सामाजिक परिषद भरविण्याची परवानगी बंद करण्यांत यावी, अशी सुधारणेच्या शत्रूंनीं हाकाटी आरंभली होती, परंतु तिचा सूर फारसा ऐकूं आला नाहीं व टिकला नाहीं. १८९० सालीं पुण्याच्या शास्त्रीमंडळाच्या मताचें लोण पोचविण्याचें काम टिळकांनीं स्वीकारलें होतें, पण त्याचा उपयोग झाला नाहीं, हा वृत्तांत मागें आला आहे. १८९१ सालीं नागपुरास टिळकांनीं परिषदेंत गडबड करून पाहिली, त्यांची गडबड थंडावल्यावर आणखी एका बंगाली गृहस्थानें टिळकांच्या आक्षेपाची री ओढून पाहिली, पण त्यालाही माधवरावांकडून समर्पक उत्तरें मिळाल्यावर शंकासमाधान दर्शवीत खालीं बसावें लागलें. टिळकांचे एकंदर तीन प्रश्न होते ते असे:—१ एकंदर प्रतिनिधी किती व इतर मंडळी किती आहेत, २ प्राथमिक बैठकीचा उद्देश काय व तिच्या मार्फत पास होणारे ठराव मोठ्या सभेंत घेतले जातात कीं नाहीं, ३ या लहानशा प्राथमिक सभेला अधिकार काय आहेत. टिळकांनीं पूर्वीच्या दोन परिषदांत भाग घेतला असल्यामुळें या परिषदेंत वरील प्रश्न कां विचारावे हा एक गूढ प्रश्न आहे. केवळ सुधारकांची अडवणूक करावी, हाच एक त्या प्रश्नांचा उद्देश ठरतो. माधवरावांनीं त्यास तोंडी उत्तरें दिलीं, पण तोंडी उत्तरांनीं आपलें समाधान झालें नाहीं, असें त्यांनीं म्हटल्यामुळें माधवरावांनीं


पुन: जबाब दिला व तो अध्यक्ष श्री. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांनीं लिहून घेतला. एकंदर सहा संस्थांनीं प्रतिनिधि पाठविले, पण त्यांची, नक्की संख्या सांगतां येणार नाहीं, प्राथमिक सभेचा उद्देश सार्व-जनिक सभेचें काम सोपें करावें, हा आहे. तिच्यांत प्रतिनिधि व निवडक मंडळी यांना भाग घेतां येतो. परिषद् एकाच दिवसांत आटपावी लागते. यामुळें असें केल्याशिवाय गत्यंतर नाहीं, असें माधवरावांचें तिन्ही प्रश्नांना उत्तर आहे. यानंतर टिळकांनीं कांहीं जास्त गडबड केल्यामुळें अध्यक्षांनीं त्यांस हाकलून लावण्याची भीति दाखविली. यावर्षी रत्नागिरीहून सामाजिक सुधारणेच्या शत्रूंच्या गळ्यांत कांग्रेसच्या प्रतिनिधित्वाची माळ घालून लोकांनीं त्यांस नाग-पुरास पाठविलें, असा वृत्तांत तत्कालीन कांहीं वृत्तपत्रांतून आहे. यापूर्वी कांग्रेसच्या मानेवर सुरी फिरविण्याचा एक प्रयत्न पुराणमताभिमानी पुणेकरांनीं केला. डिसेंबरांत सुमारें २५० नागरिकांच्या सह्यांचा एक अर्ज व्हाइसरायसाहेबांकडे पुण्याहून रवाना झाला, त्यांत मुख्य दोन मागण्या होत्या. राष्ट्रीय सभा सर्व संमत नसल्यानें तिच्या मागण्या मान्य करूं नयेत व सामाजिक परिषदेच्या मागण्या सर्व लोकांच्या आहेत, असें समजूं नये, याच त्या दोन मागण्या होत. त्या प्रसंगीं एका वृत्तपत्रानें 'राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधींनीं सामाजिक परिषदेच्या मंडपांत घुसून दंगल, धांदल, गडबड उडवून द्यावी;' असा मजकूर उघड छापण्यापर्यंत आपल्या सुधारणाशत्रुत्वाची धाव बेजबाबदारपणानें जाऊं दिली. पुढें १८९५ पर्यंत सुधारणेचा गाडा अस्खलित वेगानें सुरळित चालला होता. यावर्षी पुण्याला कांग्रेस भरावयाची होती. दरसालप्रमाणें कांग्रेसच्या मंडपांत परिषद भरणार हें ठरलेलेंच होतें.

पुण्यांतल्या दुर्धरकांना मागें तीनदां निष्फळ झालेल्या प्रयत्नाचें उट्टें काढायला आतां सवड फावली. दुर्धरकांची सगळी भिस्त टिळकांच्या पुढारीपणावर अवलंबून होती. टिळकांचें मन बरेंच दिवस हेलकावे खात होतें. कांग्रेसच्या व्यवस्थेंत त्यांनीं तोंवर बऱ्याच भानगडी केल्या व जेव्हां ते आणि त्यांचा पक्ष यांची डाळ शिजण्याचा रंग दिसेना तेव्हां त्यांनीं कांग्रेसच्या अंशमात्र चिटणिशीचा राजीनामा देऊन मंडप द्यावा कीं न द्यावा या वादांत उघडपणें मंडप देऊं नये, या मताचें समर्थन चालविलें. येथून पुढें म्हणजे आक्टोवर-नोव्हेंबरांत हा वाद निकरास गेला. टिळकांच्या एका सभेंत कै. काशिनाथ परशुराम गाडगीळ यांना दहापांच माथेफिरूंनीं माराहाण केली. रात्रीच्या अंधारांत कै. प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन यांना कोणीतरी रस्त्यावर मारून घायाळ केले. आणखी एकदोघांना असाच पण थोडा मार बसला. टिळकांच्या केसरीला ही मारहाण पाहून उसऱ्या खेदभरांत चंद्रराव मोऱ्याच्या खुनाचें स्मरण झालें. चाललेला प्रकार बरा नाहीं, असें त्यानें म्हटलें, पण प्रतिपक्षानें चंद्रराव मोऱ्याच्या वधाचें स्मरण ठेवून वागावें, असा आणखी वर उपदेश केला. त्यावेळीं टिळकांच्या मराठ्याला दुसऱ्या एका ऐतिहासिक प्रसंगाची आठवण झाली. १७९५ सालीं खड्र्याची लढाई पेशव्यांच्या सैन्यानें मारली होती. त्या युद्धाला १८९५ मध्यें एक शतक पुरें होत होतें. मराठ्यानें मंडपवादाच्या आवेशांत खड्र्याच्या लढाईचें जनतेस स्मरण करून दिलें. चंद्ररावाच्या वधाच्या आणि खड्र्याच्या लढाईच्या जयजयकारानें बेहोश झालेल्या टिळकांच्या पुराणमताभिमानी सैन्यानें कोणत्या रणसाहित्याचा उपयोग केला, हें वाचकांना समजण्यास

हरकत नाहीं. गनिमी कावा, हेंच मराठेवीरांचें रणकौशल्य. या रण-कौशल्यानें ऐतिहासिक काळांत मराठ्यांच्या हातून मुसलमानी जुलमाखालीं सांपडलेल्या आर्त जनतेची मुक्तता करविली, परंतु या प्रसंगीं बालविधवा, अस्पृश्य अशा दुबळ्या आर्तांच्या सुटकेसाठीं चाललेल्या प्रयत्नावर कुऱ्हाड चालविण्याकरितां गनिमीकावा लढविला जात होता. खोट्या निराधार कंड्या, हेंच या वेळचें सुधारणेच्या शत्रूचें रणसाहित्य होतें. तेव्हां मद्रासला प्रसिद्ध होणाऱ्या इंडियन सोशल रिफार्मर पत्राच्या पुण्याच्या बातमीदारानें, टिळकांचे हस्तक जनतेच्या नांवावर गांवोगांव विकून कांग्रेसचे नियोजित अध्यक्ष सुरेंद्रनाथ बानर्जी यांजकडे पाठविण्याकरितां बनावट ठराव घेऊन फिरत होते, असें स्पष्ट लिहिलें आहे. खोट्या अफवांना हाणून पाडण्याकरितां सुधारणापरिषदेच्या चालकांनीं हजारों हस्तपत्रकें लोकांत वाटलीं. या धामधुमींत एका विरोधी गृहस्थानें सुधारणे-संबंधीं बीभत्स जाहीराती भिंतीवर लावल्यामुळें तो फौजदारी गुन्ह्याच्या सांपळ्यांत सांपडला व दंड भरून सुटला. श्रीधर विठ्ठल दाते नांवाच्या दुसऱ्या गृहस्थांनीं कांग्रेसच्या मंडपांत सामाजिक परिषद् भरल्यास आपण मंडपाला आग लावल्याशिवाय रहाणार नाहीं, अशी प्रतिज्ञा एका सभेंत जाहीर केली. असें सांगतात कीं, ही प्रतिज्ञा त्यांनीं पुढें माधवरावांसमोरही बोलून टाकली. माधवराव रागानें उसळतील, अशी त्याची अपेक्षा होती. पण माधवरावांनीं त्यांची निराशा होण्याजोगें थंडपणाचें उत्तर दिलें. आपण मंडपाला आग लावणार असल्यानें बायकामुलांना परिषदेच्यावेळीं तेथें घेऊन जाऊं नका, असा दात्यांचा सल्ला होता. त्यावर माधवराव म्हणाले कीं, याचा

आम्ही पूर्वीच विचार केला आहे. आम्ही मंडपाकडे गेल्यावर बायका मागें रहायला तयार नाहींत, इतकेंच नव्हे तर तुम्ही आग लावणार म्हणून त्या मुलांबाळांसकट परिषदेसाठीं कांग्रेसच्या मंडपांत येणार आहेत. या बाबतींत त्यांचा निश्चय झालेला आहे. तुम्हालाही यांत कांहीं वाटायला नको. कारण मांडवाच्या आगींत सांपडून तुमच्या डोळ्यांत सलणारे सुधारक अंड्यांपिल्लांसुद्धां जळून जातील. सुधारकांचें निःसंतान झाल्यानें तुमचा फायदाच आहे. मग मागें कटकट उरणार नाहीं. वृत्तपत्राच्या खास व साध्या बातमीदारांनीं पुण्यांतल्या खळबळीची बातमी साऱ्या हिंदुस्थानांत पसरविली होती, पण मद्रासला यावेळीं गर्दभवराचे बाप गोपाळराव जोशी गेल्यामुळें तेथें या वादाचा आवाज जोरानें उमटला. त्यांनीं कुंभकोण येथें जाऊन दि. ब. रघुनाथराव यांची मुलखत घेतली आणि त्यांच्याशीं झालेल्या संभाषणाचा विपर्यास पुणेकर मित्रांना कळविला. सुधारणेच्या गोटांतून रघुनाथराव बाहेर पडले, या बातमीचा शहरभर किंबहुना महाराष्ट्रांत डांगोरा पिटला गेला. माधवरावांनीं खुलासा मागविला, तेव्हां गोपाळराव जोश्यांची बातमी सपशेल खोटी, असें सर्वांना समजलें. हिंदुस्थानांतल्या कांग्रेस कमिट्या परिषदेला मंडप देण्याला नाखूष आहेत, अशी कंडी पिकली, तेव्हां तिचा बीमोड करण्यासाठीं माधवरावांनीं या कमिट्यांना पत्रें पाठविलीं आणि मतें मागविलीं. या कमिट्यांनीं दुर्धारक पुणेकरांचा चांगलाच हिरमोड केला मुंबई इलाख्यांतल्या १२ कांग्रेस कमिट्यांपैकीं ९ कमिट्यांनीं अनुकूल मत दिलें, यावरून दुसऱ्या प्रांतांचा अंदाज होण्यास हरकत नाहीं. मंडप न देण्याबद्दलच्या सर्व हरकतींचा याप्रमाणे निकाल लवल्यावर पुराणमतानिमानी हताशेच्या त्वेषानें

किंवा चेवानें हातपाय झाडीत असले तरी त्यांच्या विरोधांत जीव उरला नव्हता, तो मेल्यासारखाच होता. इतक्याउपर कांग्रेसच्या मंडपांत परिषद् भरविणें म्हणजे मृतमारणाचें पाप करणें होय, असें माधवरावांना वाटलें व त्यांनीं अखेरचा घोर लागलेल्या विरोधाला 'कांग्रेसचा मंडप नको' असें जाहीर करून शांतिसुखाचें गंगाजल पाजलें. माधवरावांच्या या उदार कृतीचा त्यांच्या मित्रांनीं, भक्तांनीं, शिष्यांनीं निषेध केला. ज्यांना वादाच्या दणक्यांत शारीरिक इजा सोसावी लागली, त्यांच्या अंगाचा माधवरावांच्या निकालानें तिळपापड झाला. पण माधवरावांनीं त्याची समजूत काढून फर्ग्यूसन कॉलेजाच्या आवारांत उभारलेल्या स्वतंत्र मंडपामध्यें परिषद् निर्विघ्नपणें पार पाडली. कदाचित् विरोधाचें भूत परिषदेंत प्रकट होईल, म्हणून कायदेशीरपणाची माधवरावांनीं खबरदारी ठेविली होती. परिषदेचे प्रतिनिधींनीं निरनिराळ्या संस्थाकडून कायदेशीर रीतीनें निवडून आले होते. त्याची संख्या ७९७ होती. कांग्रेसच्या प्रमुख प्रमुख मंडळीनीं विरोधशमनाबद्दल माधवरावांची प्रशंसा केली. सुरेंद्रनाथ बानर्जीनीं सुधारणाविरोधी पुणेंकर नादान आहेत, असें माधवरावांना पत्रद्वारें कळविलें होतें. कांग्रेसच्या व्यासपीठावरून पुनः एकदां माधवरावांचें स्तुतिस्तोत्र गाऊन सुधारणा-शत्रूंच्या डोळ्यांत अंजन घातलें. त्यांनीं परिषदेंत जातीनें भाग घेतला. पूर्वींच्या परिषदांतून कांग्रेसचे पुढारी अशाच प्रकारें भाग घेत होते. कांग्रेसचे पुढारी परिषदेला विरुद्ध आहेत, अशा अफवेचा बार टिळकांच्या पक्षानें वादाच्या झगडयांत केला, तेव्हां ह्यूमसाहेबांनीं १८९४ सालीं सामाजिकसुधारणा आवश्यक असल्याबद्दल काढलेल्या उद्गाराची सुधारणेच्या पुरस्कर्त्यांनीं त्यांस



मागील रांग:-कॅडी. बेली. फॅरन. जार्डिन.     पुढील रांग:-पार्सन्स; सर चा. सार्जंट ( चीफ. ज. ) रानडे.

आठवण दिली. कांग्रेसच्या एका पत्रकांतल्या ब्रूट फोर्स या शब्दाचा विपरीतार्थ करून 'जनतेला जनावर म्हटलें' असा चिथावणीचा कंठशोष करणारांनीच आपल्या 'मराठा' पत्रांत 'आम्ही ह्यूमच्या सर्कशींतली जनावरें नाहीं.' म्हणून ह्यूमसाहेबांच्या उद्गाराचें स्मरण देणारांना उलट जवाब दिला. मराठाकारांचा प्रतिपक्ष शब्दाशब्दांचा कीस काढून अर्थाचा अनर्थ उडविण्यांत पटाईत नसल्यानें वरील वाक्यांतल्या जनावर शब्दाचा त्यास फायदा घेतां आला नाहीं.

माधवरावांची या परिषदेंत दोन व्याख्यानें झालीं. आपल्या लोकोत्तर क्षमावृत्तीस अनुसरून त्यांनीं पुण्यांतल्या प्रतिपक्षाच्या वृत्तीवर दोष झांकणारें तात्त्विक विचारांच्या भरजरीचें पांघरूण घातलें व पुण्याची लाज राखण्याचा यत्न केला. त्यांत एक दोन उपदेशपर विचार सादर केल्यास अप्रस्तुत होणार नाहीं. एका ठिकाणीं ते म्हणतात:—

It is characteristic of our people, that where a dozen people work together one half will call the other half mad or wicked. It is general habit to misunderstand one another. People think that there is no good man among their opponents.

दुसऱ्या व्याख्यानाच्या शेवटीं ते म्हणाले:—

We have above all to learn what is to bear and forbear–to bear redicule, insults, even personal injuries at times and forbear from returning abuse for abuse. In the words of the Prophet of Nazareth, we have to take up the cross, not because it is pleasant to be persecuted, but because the pain and the injury are as nothing by the side of the principle for which they are endured.

नश्वर प्रकृतीच्या भेदानें मतवैचित्र्य उत्पन्न होत असलें तरी माणसांतलें शाश्वत ईश्वरी तत्त्व अखेरीस सर्वांना मतैक्याच्या मुक्कामावर घेऊन जाईल, असें बजावून पुढच्या मनोहर दृष्टान्तानें त्यांनीं आपल्या विश्वासाला दुजोरा दिला आहे. ते म्हणाले:—

The waters of the heavens get their colour from the soil over which they flow, but after all these colours are not the water, they may conflict with one another for a time but in the end they meet and flow in one pure stream into the great ocean, leaving the earth and the mud and the silt behind them.

या दोन्ही भाषणाच्या वेळीं श्रोत्यांची अतिशय गर्दी लोटली होती. कित्येक दुष्टबुद्धीनें गेले होते, पण माधवरावांच्या गंगाजलनिर्मल उदात्त विचारांच्या गंभीर प्रवाहांत सांपडून ते आपला दुष्टपणा विसरले व माधवरावांना धन्यवाद देत श्रोते घरोघर परत गेले. माधवरावांच्या भाषणांत वस्तुतः नांवें ठेवण्यासारखें कांहीं नव्हतें, परंतु वरच्या उताऱ्यांत जो खिस्ताचा उल्लेख आला आहे, त्याला धरून केसरींत १८९६ च्या जानेवारीमध्यें टीका आली. राजकारण निराळें आणि समाजकारण निराळें, त्यांचा एकमेकाशीं संबंध नाहीं. सामाजिक सुधारणेवर राजकीय उन्नति अवलंबून नाहीं, हें सिद्ध करण्यासाठीं आयर्लंडाचें उदाहरण केसरींत घेतलेलें आहे. तथें विधवाविवाह होतात, स्पर्शास्पर्श विचार पाळला जात नाहीं, तथापि गेल्या ७।८ शें वर्षांत आयर्लंडाला राजकीय मोक्ष लाभलेला नाहीं, असें केसरीनें लिहिलें. या टीकेला माधवरावांनीं मुंबईच्या एका व्याख्यानांत पुढें उत्तर दिलें. डा. संडरलंड या नांवाचे एक युरोपियन गृहस्थ

मुंबईला व्याख्यानें देत होते. त्यांच्या एका व्याख्यानाला माधवराव अध्यक्ष असल्यानें त्या संधीचा उपयोग त्यांनीं वरच्या आक्षेपांत अर्थ नसल्याचें दाखविण्याकडे केला. ते म्हणाले :—

You cannot be liberal by halves. You can not be liberal in Politics and conservative in Religion. The heart and the head must go together. You can not cultivate your intellect, enrich your mind enlarge the sphere of your political rights and privileges and at the same time keep your hearts closed and cramped. It is an idle dream to expect men to remain enchained and enshackled in their own superstition and social evils, while they are struggling hard to win rights and privileges from their rulers. Before long these vain dreamers will find their dreams lost.

१८९५ सालीं पुण्यास कांग्रेसच्या मंडपाबद्दल जशी दंगल उडाली तशी परिणामाच्या दृष्टीनें पुनः कोठेंहो व केव्हांही उडाली नाहीं. दरसाल नियमानें कांग्रेसबरोबर परिषदेचें काम चालू होतें. १८९७ सालीं उमरावतीला कांग्रेसची बैठक झाली, अर्थात् परिषदेचा समारंभ तेथेंच करण्यांत आला. १८९७ हें साल महाराष्ट्राच्या इतिहासांत अनेक कारणांमुळें संस्मरणीय गणलें जातें, पण ही संस्मरणीयता राजकीय स्वरूपाची असल्यानें माधवरावांना तिचा विचार करण्याची जरूर नव्हती. तथापि प्लेगचा प्रळय, मित्रांचा मृत्यु हे विषय माधवरावांना बोलण्याला होते. प्लेगनें जो भयंकर संहार चालविला, त्याचें बीज समाजाच्या अव्यवस्थित रचनेंत आहे, असें सांगून चिंतामण नारायण भट, काशिनाथपंत नातू, वामन दाजी ओक, वामन अबाजी मोडक यांच्या

मृत्यूबद्दल त्यांनीं आपल्या मनाला वाटणारी हळहळ दाखविली. या परिषदेंतलें भाषण दुसऱ्या एका बाबीमुळें प्रसिद्ध आहे. बेझंटबाई व स्वामी विवेकानंद या दोन व्यक्तींनीं अलीकडे एक दोन वर्षांत धर्माचें पुनरुज्जीवन करावें, असें मत ठसविण्याचा यत्न चालविला होता. म्हणून माधवरावांनीं पुनरुज्जीवन कीं सुधारणा, (Revival or Reform) हा प्रश्न विचारास घेतला. पुनरुज्जीवन कशाचें करणार? सतीच्या चालीचें करणार, का बालहत्येचें करणार, का बहुपत्नीकत्व अथवा बहुपतिकत्वाचें करणार, पूर्वीं अभक्ष्यभक्षणाचा प्रचार होता त्याचें करणार, लग्नाच्या आसुर पैशाचादि प्रकारांचें करणार का नियोग-पद्धतीचें करणार, कित्येक प्राचीन ऋषींनीं बायकांच्या बाबतींत जे स्वेच्छाचार केले, त्याचें पुनरुज्जीवन करणार, असा माधवरावांनीं अनेक अनीतीचीं उदाहरणें घेऊन जनतेस प्रश्न विचारला आहे. नंतर आमच्या सामाजिक अवनतीचीं पांच कारणें उजेडांत आणलीं आहेत. तीं पुढील प्रमाणें:—

Isolation, submission to outward force or power more than to the voice of inward conscience, perception of fictitious differences due to heredity and birth, passive acquiescence in evil or wrong-doing and a general indifference to secular well-being, almost bordering upon fatatism.

या पांचही कारणांचें पुढच्या भागांत विस्तारानें विवरण आहे. कर्म किंवा दैव या कल्पनेच्या तर त्यांनीं इतक्या आवेशानें चिंधड्या उडविल्या आहेत कीं, त्याबद्दल कै. गणपतराव मानकर यांनीं पत्र पाठवून पुनः एकदां माधवरावांचें मत घेतलें. आमचा समाज संचित

आणि प्रारब्ध कर्मांच्या काळजीनें पिडलेला आहे. या आयुष्यांत करावयाच्या 'क्रियमाण' कर्मांची तो चिंता वहात नाहीं. वास्तविक माणसानें आपल्या आयुष्यांतलीं क्रियमाण कर्में उत्तम रीतीनें पार पाडणें, हें त्याचें आद्य कर्तव्य आहे, असें माधवरावांनीं मानकरांस उलट कळविलें. वरील भाषणाच्या शेवटीं माधवरावांनीं सुधारकाचें कर्तव्य सांगितलें आहे, त्याचें प्रत्येकानें मनन करावें.

The Reformer has to infuse in himself the light and warmth of nature, and he can only do it by purifying and improving himself and his surroundings. He must have his village, tribe and nation recast in other and new moulds and that is the reason why Social Reform becomes our obligatory duty and not a mere pastime which might be given up at pleasure.

१८९८ सालीं मद्रासची परिषद आटोपल्यावर १८९९ च्या जानेवारी पहिल्या तारखेस माधवरावांनीं समारोपाचें जें लहानसें भाषण केलें त्यांत त्यांनीं पुनरुज्जीवन कीं सुधारणा या प्रश्नाच्या धोरणानें कित्येक सवाल श्रोत्यांपुढें टाकले आहेत. त्यांतल्या एकाच प्रश्नावरून बाकीच्या प्रश्नाचें स्वरूप कळण्याला हरकत नाहीं. तो प्रश्न असा:—

Suppose instead of saying on this day, the first day, of the new year "I shall take for myself a vow that, as far as lies in my power I shall undertake the education of my female relations," we say "I shall not undertake the education of my female relations," shall we be the better or the worse for our resolution?

सामाजिक परिषदेंतील माधवरावांचीं सगळीच भाषणें नुसतीं वाचण्यासारखीं नसून अभ्यास करण्यासारखीं आहेत. समाजाच्या

उद्धारास आवश्यक असणारें तत्त्वज्ञान त्यांत ओथंबलेलें आहे. तत्त्वज्ञानाप्रमाणेंच व्यावहारिक प्रश्नांचाही खल त्यांत भरपूर आहे. विधवाविवाह, बालविवाह निषेध, हीं व्यवहारांतलीं कर्तव्यें असलीं तरी त्या कर्तव्यांच्या सिद्धीमागें कोणती भावना अगर बुद्धि पाहिजे, या विषयींचीं माधवरावांचीं विवेचनें सामाजिक सुधारणेच्या इतिहासांत कधींही मागें पडण्याची भीति नाहीं. सुधारणेच्या अंतिम ध्येयाचीं व आदर्श सुधारकांचीं त्यांनीं जागजागीं जीं चित्रें रेखाटलीं आहेत, त्यांचें प्रत्येकानें सदैव दर्शन घ्यावें. त्यांच्या व्याख्यानवाटिकेंतलीं कांहीं निवडक वचन-पुष्पें सादर केल्यास वाचकांना खचित रुचतील. १८९१ सालीं नागपूरच्या भाषणांत ते म्हणाले:—

The thing to be reformed is their own self, heart and head and soul, their own prejudices were to be removed, their superstitions to be eradicated, their courage to be strengthened, their weaknesses to be conquered, in fact their character to be formed again so as to suit the times, so as to fit with the spirit of the age.

१८९२ सालच्या अलाहाबाद येथील व्याख्यानांत त्यांनीं सुधारणेचें ध्येय सांगितलें, तें असें:—

The change which we should all seek is thus a change from constraint to freedom, from credulity to faith, from status to contract, from authority to reason, from unorganised to organised life, from bigotry to toleration, from blind fatalism to a sense of human dignity.

१८९३ सालीं लाहोरास त्यांनीं केलेल्या भाषणांत देशाभिमानाचे स्फूर्तिदायक उद्गार काढून आपलें भाषण रंगविलें आहे. हे उद्गार

ऐकतांना ज्याचे हृदय उचंबळून आलें नाहीं, असा एकही श्रोता तेव्हां सांपडला नसता व अरसिक वाचक आजही आढळणार नाहीं. लाहोर ही पंजाबची राजधानी आणि पंजाब म्हणजे प्राचीन सप्तसिंधूंचा प्रांत किंवा आर्यावर्त, यामुळें अत्यंत प्राचीन काळांतली पूर्वजांची उज्ज्वल अवस्था त्यांच्या अंतश्चक्षूंपुढें आली व ते म्हणाले:—

I profess implicit faith in two articles of my creed. This country of ours is the true land of promise. This race of ours is the chosen race.

१८९४ सालीं मद्रासच्या भाषणांत ते म्हणतात:—

Hope, faith and charity-these are the three graces we must all cultivate, and if we keep them ever in mind and hold steadily by them we may be sure that we may still regain our lost position and become a potent factor in the world's history. The turn of life and light is in the individual. We have to purify it to feel the heat and light of truth in us;...if we suffer misery, we have earned it by our sins in the past and the present. If we purge them off, the bright rays of glory will shine in their old splendour.

१८९५ सालच्या पुण्यांतील भाषणाचा विस्तारानें मागें ऊहापोह आलेला आहे. १८९६ सालीं कलकत्त्याच्या भाषणांत ते म्हणाले:—

The end is to renovate, to purify and also to perfect the whole man by liberating his intellect, elavating his standard of duty and perfecting all his powers.

यापुढचा भाग तर जास्तच स्फुरणाचा आहे. आपण जें ध्येय गांठण्याचा यत्न करीत आहों, ते गांठल्यानंतर आपल्या देशाचा ज

भाग्योदय आणि नीतिविकास होईल, तो अध्यात्मिक स्फुरणाच्या भरांत त्यांना तेव्हांच दिसला आणि त्यांनीं त्याचें शब्दचित्र रेखाटून दाखविलें. भारतभूमीचें भाग्यैश्वर्य पाहून स्वर्गातल्या देवांनासुद्धां हेवा वाटतो व जन्म घ्यावा तर भारतभूमींत घ्यावा, असा ते ध्यास धरतात, असें वर्णन विष्णुपुराणांत व भागवतांत आहे. माधवरावांनींही आपल्या स्फुरणोद्गारांत तसेंच वर्णन केलें आहे. ते म्हणतात:—

" With the liberated manhood, with buoyant hope, with a faith that never shirks duty, with a sense of justice that deals fairly to all, with unclouded intellect and powers fully cultivated, and lastly with a love that overleaps all bound, renovated India will take her proper rank among the nations of the world, and be the masters of the situation and of her own destiny. This is the goal to be reached–this is the promised land. Happy are they who see it in distant vision, happier those who are permitted to work and clear the way on to it, happiest they who live to see it with their eyes and tread upon the holy soil once more. Famine and pestilence, oppression and sorrow, will then be myths of the past and the Gods will then again descend to the earth and associate with men as they did in times, which we now call mythical.

१८९८ सालीं मद्रासच्या भाषणांतला एक सबंध परिच्छेद माधवरावांच्या सामाजिक सिद्धान्तांनीं भरलेला आहे. त्यांतलें प्रत्येक वाक्य गहनार्थानें गजबजलेलें आढळतें. ज्या वाचकांपाशीं सर दीनशा वाच्छा यांनीं प्रस्तावना लिहिलेला व श्री. रमाबाईनीं प्रसिद्ध केलेला माधव-

रावांच्या संकीर्ण लेखसंग्रहाचा (The miscellaneous writings) ग्रंथ असेल त्यांनीं त्याचें २०८ पान पहावें. सदर परिच्छेदाच्या प्रारंभीं The work of *Reform* is really the work of *Liberation* सुधारणेचें कार्य म्हणजे नानाविध अंतर्बाह्य जुलमांतून सुटण्याचें कार्य अशी प्रस्तावना असून पुढें या कार्याचीं साधनें व व्याप्ति, सरकारचा किती उपयोग होईल व तो केव्हां करून घ्यावा, लोकांनींच हें कार्य केलें पाहिजे व तें लोकांचेंच आहे, वगैरे मुद्द्यांचें व प्रश्नांचें विवेचन केलें आहे. सरकारनें दिलेले स्वातंत्र्याचे उपरी हक्क व समाजाच्या विकासांतून अंगांगीभावानें उत्पन्न होणारे स्वातंत्र्याचे हक्क यांतला फरक त्यांनीं पुढीलप्रमाणें सांगितला आहे. ते म्हणतात:—

Liberties bestowed on us by foreigners are concessions forced on us by the force of circumstances. These are not really ours; they are possessions only and not developments.

अयोध्येच्या मुसलमानी राज्याची ऐतिहासिक राजधानी लखनौ येथें १८९९ मध्यें परिषद् भरली. यावर्षीं परिषद् भरण्याची खात्री नव्हती. समाज सुधारणेच्या स्थानिक पुढाऱ्यांची परिषद् भरविण्याचा खटपटींत निराशा झाली. परंतु माधवरावांचा आधार असल्यामुळें स्थानिक विघ्नांचा जोर चालला नाहीं. कांग्रेसच्या स्थानिक पुढाऱ्यांनीं परिषदेच्या प्रतिनिधींची व्यवस्था करण्याचें काम पत्करलें व याला कारण माधवरावांची रदबदली. माधवरावांचें आवडतें कार्य म्हणूनच कांग्रेसच्या पुढाऱ्यांनीं हा जादा बोजा आनंदानें स्वीकारला. या परिषदेच्या वेळीं माधवरावांच्या अंगचा एक आश्चर्यजनक गुण दिसून आला व तो सर दीनशा वाच्छा यांनीं १९०८

सालच्या व्याख्यानांत सांगितला आहे. माधवराव आणि त्यांचे मुंबई-कडचे कांहीं मित्र प्लेगच्या प्रांतांतून आलेले असल्यामुळें त्यांस क्वारंटाइनच्या झोंपडयांतून रहाण्याची पाळी आली. माधवरावांची प्रकृति अगोदरच नीट नव्हती आणि लखनौस तर थंडीचा कडाका पड-लेला. हवेल्यांतून शेकडयांचा शेक व लोकरीच्या वस्त्रप्रावरणांची ऊब भोगणाऱ्या माणसांना देखील ती थंडी असह्य वाटे, मग क्वारंटाइनच्या झोंपडयांत लोकांचे काय हाल चालले असतील त्याची कल्पनाच करणें उत्तम. या परिस्थितींत माधवरावांना राहूं देण्याला त्यांचे स्थानिक भक्त तयार नव्हते. त्यांनीं शहरांत त्यांच्याकरितां जागा पाहिली आणि ते त्यांस बोलावण्याला गेले. मित्रांना झोंपडयांत सोडून शहरांतल्या उत्कृष्ट निवाऱ्याच्या जागेंत जाण्याचा विचार माधवरावांना रुचला नाहीं. मित्रांनीं माधवरावांना शहरांत जाण्याला परवानगी दिली. परंतु त्यांनीं झोंपडी सोडली नाहीं. माधवरावांच्या प्रकृतिगुणांतले दैवी तेज पूर्वीं दोनदां असेंच त्यांच्या सहचारी मंडळीला पहावयास सांपडलें होतें. १८९७ सालीं माधवराव उमरावतीहून परत येत असतां पहा-टेच्या वेळीं 'जेका रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले' हा अभंग ते घोळून घोळून व अर्थाशीं तन्मय होऊन म्हणत असल्याचा देखावा कै. गोपाळ कृष्ण गोखले यांनीं अनुभविला. १८९४ सालीं मद्रासहून परत येत असतां सोलापूरच्या स्टेशनावर त्यांचें सामान एका उद्दाम व अविचारी युरोपियन अधिकाऱ्यानें आगगाडीच्या डब्यां-तून बाहेर काढलें. सदर अधिकाऱ्याला आपण कोणाची बेअदबी केली, हें कळल्यावर माफी मागून मोकळे व्हावें, असें त्यानें ठरविलें. पण माफी मागण्याची संधी त्याला माधवरावांनीं दिली नाहीं. पुण्याच्या

स्टेशनावर माफी मागण्याकरितां तो आपल्याकडे येत आहे, असें पहातांच माधवरावांनीं तोंड फिरविलें आणि उलट दिशा धरली. या अपमानाच्या प्रसंगांतून माधवरावांनीं सरस निष्कर्ष काढला. युरोपियन अंमलदारानें अपमान केला म्हणून आपण रागावतो, पण आपण स्वजनांतल्या कांहीं वर्गाशीं ब्राह्मण्याच्या तोऱ्यांत किती उर्मटपणानें व अपमानकारक रीतीनें वागतो, याचा विचार करीत नाहीं. असा त्यांनीं त्याच्या वागणुकीचा उलगडा पडण्याकरितां पृच्छा करणाऱ्या गोखल्यांना जबाब दिला. पारमार्थिक मोक्षाला जशीं नित्यानित्यवस्तुविवेक, शमदमादि संपत्ति वगैरे चतुर्विध साधनें आवश्यक आहेत तशींच ती इहलोकींच्या सामाजिक व राजकीय मोक्षालाही आवश्यक आहेत. पारमार्थिक मोक्षासाठीं जसें आत्मचिंतन करावें लागतें, तसेंच तें राजकीय अथवा सामाजिक मोक्षालाही लागतें. आत्मचिंतनाचा उद्देश बाह्योपाधींचें निरसन हा असल्यानें राष्ट्रीय आत्मचिंतनांत बाह्योपाधींचा विचार केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. माधवरावांनीं या अपमानाच्या स्थितींत आपल्या सामाजिक आत्म्याचें चिंतन केलें आणि कनिष्ठ मानल्या जाणाऱ्या वर्गाशीं आपण नीट वागलें पाहिजे, असा सिद्धांत काढला. माफी न मिळालेल्या अंमलदाराच्या मनावर माधवरावांच्या वर्तणुकीचा अत्यंत इष्ट परिणाम होऊन त्यानें विलायतेहून 'आपण सौजन्याचा धडा घेतला' असें पत्र पाठविलें.

लखनौच्या व्याख्यानांत त्यांनीं हजारवर्षांपूर्वीं आपला देश परदेशी मुशाफरांना कोणत्या स्थितींत आढळला, त्यानंतर मुसलमानी आमदानींत त्याला काय लाभ झाले व आपणास इंग्रजी राजकर्त्यांच्या ख्रिस्ती संस्कृतीपासून कोणकोणत्या गोष्टी शिकावयाच्या आहेत याचा

विस्तारानें ऊहापोह केला आहे. १७९८ सालाच्या सुमारास दक्षिण-हिंदुस्थानांत आब्रेडुबाई नांवाचा एक मिशनरी होता, त्यानें आपल्या काळांत दिसणाऱ्या दक्षिण हिंदुस्थानाचें वर्णन केलें आहे. त्या वर्णनाच्या आधारानें, शंभर वर्षामागें दक्षिण भारतवासी होते कोठें व नंतरच्या शंभर वर्षांत त्यांनीं उन्नतीची किती मजल मारली, याचें आधल्या वर्षी माधवरावांनीं मद्रासला विवेचन केलें होतें. लखनौस मुसलमानी राज्यांतल्या धार्मिक व सामाजिक प्रगतीचा इतिहास त्यांनीं निवेदन केला. या भाषणाच्या समारोपांत ते म्हणतात:—

The ills that we are suffering from are most of them, self-inflicted evils, the cure of which is to a large extent in our own hand,

* * * *

The pursuit of high ideas, mutual sympathy and co-operation, perfect tolerence, a correct understanding of the deceases from which the body-politic is suffering, and an earnest desire to apply suitable remedies, this is the work cut out for the present generation.

अकबर बादशहानें जसा आपल्या साम्राज्यांतल्या सर्वधर्मांच्या एकीरणासाठीं 'दीन–इ–इलाही' नांवाचा धर्म काढला, तसाच धर्म आपणास स्थापन करावयाचा आहे, असें माधवरावांनीं या भाषणांत आणखी म्हटलें आहे.

१९०० सालीं मे महिन्यांत साताऱ्याला प्रांतिक राजकीय परिषदेबरोबर सामाजिक परिषद् भरवून सुधारणाभक्तांनीं माधवरावांना अध्यक्षस्थान दिलें. त्यांच्या या परिषदेंतील भाषणांत प्रारंभीं राजका-

रण आणि सामाजिक सुधारणा यांची ताटातूट करतां येत नाहीं, या मुद्याचा विचार असून पुढें सुधारणेच्या वादांत निघणाऱ्या सर्व आक्षेपाचें निरसन आहे. मनुष्याच्या कर्तबगारीचे तुकडे पाडतां येत नाहीत, हें सिद्ध करण्यासाठीं गुलाबाच्या फुलाचें उदाहरण घेतलें आहे. गुलाबाच्या फुलाचें सौंदर्य आणि सुगंध हे दोन गुण जसे वेगळे करतां येत नाहींत व वेगळे करण्याचा यत्न झाल्यास फुलाचा जसा नाश होतो, तशी माणसाच्या कर्तबगारीची स्थिति आहे. कर्तबगारीचीं क्षेत्रें एकमेकांत गुंतलेलीं आहेत, त्यांचें पृथक्करण होणार नाहीं, असा माधवरावांचा सिद्धांत होता. ते आणखी म्हणाले:—

आमच्या देशांतल्या प्रत्येक खेड्यांत चावडी, देऊळ विहीर, धर्मशाळा अशीं कांहीं धार्मिक, कांहीं सामाजिक व कांहीं राजकीय स्थानें किंवा संस्था आहेत. त्यांचा उपयोग खेड्यांतल्या प्रत्येक माणसाला होतो. चावडी अमक्यासाठीं, देऊळ तमक्यासाठीं अशी उपयोगाची वर्गवारी किंवा विभागणी खेड्यांत नसते. जो देवळांत जातो, त्यालाच कालान्तरानें चावडीवर जाऊन कर भरावा लागतो अगर अपल्या गाऱ्हाण्याची वर्दी द्यावी लागते. जी स्थिति खेड्याची तीच शहराची. दुकानें, बाजार, रंगभूमि, देवालयें, शाळा, दवाखाने, लष्करी छावणी, या सर्वांशीं माणसाचा–मग तो लहान असो; स्त्री असो वा पुरुष असो, राव असो की रंक असो–संबंध येतो. या संबंधांच्या समवायानें माणसाचें जीवित पूर्ण होत असतें व त्यालाच नागरिक जीवन (city life) म्हणतात. मनुष्य–जीविताच्या गुंतागंतींतल्या प्रत्येक धाग्याकडे लक्ष द्यावें लागतें. काळ स्थलानुसार कधीं एखाद्या धाग्याचें जास्त महत्त्व असेल, कधीं कमी असेल. पण त्यांतल्या कांहीं धाग्यांची पूर्ण उपेक्षा करून कोणाही चालणार नाहीं.

या प्रमाणें उदाहरणाची फोड झाल्यावर त्यांनीं पुढील सिद्धांत श्रोत्यांच्या कानावर घातला. तो सिद्धांत असा:—

Politics is not mere petitioning and memorializing for gifts and favours. Gifts and favours are of no value unless we have deserved the concessions by our own elavation and our own struggles......whether in political or social or religious, or commercial or manufacturing or aesthetical Spheres, in literature, in science, in art, in war, in peace, it is the individul and collective man who has to develop his powers by his own exertions in conquering the difficulties in his way. If he is down for the time, he has to get up with the whole of his strength physical, moral and intellectual and you may as well suppose that he can develop one of those elements of strength and neglect the others or try to seperate the light from the heat of the sun or the beauty and fragrance from the rose,

राजकारण आणि सामाजिक सुधारणा यांत विरोध उत्पन्न केल्यास कसा आत्मनाश होईल याचें वरील विवेचन मननीय नाहीं, असें कोण म्हणेल ? धर्म सध्यां मागें पडूं द्या, सामाजिक सुधारणेकडे कानाडोळा करा, वाङ्मयाकडे पाहण्याची तूर्त गरज नाहीं, कलांचा लोप झाला तरी चालेल, व्यापाराच्या बाबतींत डोळ्यावर कांतडें ओढून घेण्यास हरकत नाहीं, असा लोकांस उपदेश करून फक्त राजकारणावर एकाग्र दृष्टि ठेवायला सांगणारा एक संप्रदाय आहे. त्याला वरील उत्तरांत चोख उत्तर आहे. श्रमविभागाचें तत्त्व कधीं कधीं या बाबतींत पुढें आणलें जात असतें. तें तत्त्व वरून दिसायला ग्राह्य आहे. पण त्या तत्त्वाचा पुरस्कार करणारांनीं सामाजिक सुधारणेशीं वैर धरलें, सुधारणेच्या मार्गांत विरोधाचे कांटे पसरले, हें ध्यानांत ठेवल्यास श्रमविभागाचा

मुद्दा हा सुधारणेच्या शत्रुत्वावरील मुलामा आहे, असें समजण्याला उशीर लागत नाहीं. याच भाषणांत माधवरावांनी सामाजिक प्रगतीचा ओघ ओसरणार अगर खुंटणार नाहीं, असा भविष्योद्गार काढला आहे. आजची परिस्थिति त्या उद्गाराची यथार्थता पटवीत असल्यानें, त्याबद्दल विस्तार न करणेंच श्रेयस्कर आहे.

१९००सालाच्या शेवटीं लाहोरास माधवरावांनी परिषद् भरली, तेव्हां तेथें वाचण्याकरितां 'वशिष्ठ आणि विश्वामित्र' या मथळ्याचा निबंध तयार केला होता. यावेळीं त्यांची प्रकृति फार बिघडली असल्यानें त्यांस तेथें जातां आलें नाहीं. या निबंधांत ब्राह्मण व क्षत्रिय जातीमध्यें कशी प्राचीन काळीं सळमिसळ चालली होती, त्याचा इतिहास आहे. त्याशिवाय वसिष्ठ-विश्वामित्राच्या झगडयांचें इतिवृत्त आणि तात्पर्य त्यांत ग्रथित केलेलें आहे. प्राचीन ऋषिमुनींची योग्यता वाखाणून माधवरावांनी आज ऋषिमुनि होण्याला लायक कोण व त्यांचें कार्य कोणतें, याविषयीं आपले विचार समारोपांत सांगितले आहेत. कै. महाजनींनीं आपल्या 'आठवणीं'त असें लिहिलें आहे कीं, हा निबंध लिहिण्याची कल्पना आपलें रामायणावरील व्याख्यान ऐकून माधवरावांना झाली असावी. १९०० सालच्या जून महिन्यांत माधवरावांना भेटण्याकरितां महाजनी त्यांच्या घरीं गेले होते तेव्हां त्यांना निबंधाची तयारी चाललेली पहावयास सांपडली. ते आपल्या आठवणींत लिहितात:—*

कै. रघुनाथ शास्त्री गोडबोले यांच्या प्राचीन इतिहासिक कोशांतील ५०।५० पृष्ठें एक एका तरुण विद्यार्थ्यास रा. सा. नीं वाटून दिलीं होतीं; आणि सांगितलें होतें कीं, वर्णसंकराचें दाखले आढळतील त्यांचें टिपण करा. हीं टिपणें

* विविधज्ञानविस्तार वर्ष ४५ अंक २ पृ. ५९

त्यावेळीं तयार होत होतीं, व प्रत्येकानें किती किती पृष्ठांचें सार काढिलें, याबद्दल विचारपूस चालली होती. रा. सा. अशा रीतीनें जमविलेल्या शाकांचा पाक लवकरच तयार करणार होते.

हा शाकपाक वरील निबंधाच्या रूपानें लाहोरास जगाच्या निदर्शनास आला आणि तेथेंच त्यांच्या परिषदेंतील कामगिरीची समाप्ति झाली. या निबंधांतल्या सारांशाचें विवरण करूं लागल्यास दुसरा ग्रंथच लिहावा लागेल. ही समग्र व्याख्यानें एकत्र उपलब्ध असल्यानें त्यांचा जिज्ञासूला आस्वाद घेण्याची अनायासें सोय आहे. सामाजिक परिषदेची भरभराट माधवरावांच्या हयातीत अतिशय झालेली होती. १८९५ सालचें पुण्यांतलें संकट निवारण झाल्यानंतर परिषदेच्या शत्रूंनाही माधवरावांच्या अजब कर्तबगारीचें कौतुक वाटूं लागलें. आणि यांत आश्चर्य तरी कसलें ? गोखल्यांनीं म्हटलें आहे कीं, सामाजिक कार्यातलें माधवरावांच्या आस्थेचें वैभव देवांनीं पहावें, असें होतें; मग माणसांची कथा काय ? माधवरावांच्या कामगिरींत भागीदार होण्याचें पुण्य संपादावें, अशा इच्छेनें कांग्रेसचे अनेक मोठमोठे पुढारी सामाजिक परिषदेच्या ठरावावर भाषणें करीत असत. १८९९ सालचा एक मासला येथें दिल्यास वाचकांची खात्री पटेल. लखनौस कांग्रेसच्या बैठकींत पडद्याआड अतिशय तंटेबखेडे झाले व अध्यक्ष कै. रोमेशचंद्र दत्त यांना फार त्रास सोसावा लागला. कांग्रेसची बैठक संपल्यावर विश्रांति मिळावी आणि करमणूक व्हावी म्हणून ते परिषदेच्या बैठकींत आले. माधवरावांनीं तेथें त्यांच्या गळ्यांत हिंदुमुसलमानांच्या एकीचा ठराव बांधला. रोमेशचंद्र दत्तांनीं त्यावर बोलतांना जे शब्द सुरवातीस उच्चारले ते माधवरावांच्या महतीचे द्योतक आहे. सर रोमेशचंद्र म्हणाले:—

I feel it an honour to take part in these proceedings, because I have complete sympathy with your aims and aspirations, and because I believe that this Social Conference is likely to do vast deal of good. I feel further honour in taking part in these proceedings because as we know, they are conducted by that honourable gentleman, Mr. Justice Ranade......We in Calcutta respect him as you in Lucknow do.

असेच आदराचे उद्गार माधवरावांच्या कारकिर्दीतले परिषदेचे अहवाल चाळल्यास पुष्कळ आढळतील. कै. वि. मो. महाजनी यांनीं आपल्या आठवणींत यासंबंधीं एक दोन गोष्टी दिल्या आहेत. त्या येथें सादर केल्यास योग्य होईल. ते म्हणतातः—*

(उमरावतीची) सामाजिक परिषद् संपल्यावर त्यांनीं उपसंहाराचें भाषण केलें; तें छापील भाषणांत दाखल नाहीं. त्यांत जेव्हां त्यांनीं असें म्हटलें कीं, 'हायकोर्टाचें काम वर्षभर एकसारखें करीत राहिल्यानें मेंदूला जें जडत्व येतें, तें नाहींसें किंवा कमी करण्याला एकच उपाय-इतर ठिकाणच्या गृहस्थांशीं संपर्क ठेवणें-अशा समजुतीनें मी दरवर्षास नाताळच्या सुट्टींत हिंदुस्थानांत निरनिराळ्या ठिकाणीं जात असतों.-जागृतिरूप विजेचा धक्का घेण्याला जात असतों,' असें म्हटल्याबरोबर सभेंत पुष्कळांच्या तोंडून असे एकदम शब्द उठले कीं, 'धक्का घेण्याला असें न म्हणतां धक्का देण्याला असें कां म्हणांना!' हे जे अचूक शब्द पूर्व विचार न करतां निघाले तेच वस्तुस्थितीचे खरे द्योतक होत. रावसाहेबांसारखा विजेचा धक्का देणारा चालक मला तरी दुसरा कोणी आढळला नाहीं.

* * * *

माधवरावांची सामाजिक परिषदेंतली कामगिरी व त्याबद्दलची विचारसरणी वाचकांना मागल्या भागांत समजली. या कामाप्रीत्यर्थ

* विविधज्ञानविस्तार वर्ष. ४५, अंक १, पृ. ५१.

त्यांना वर्षांतून बराच वेळ खर्चावा लागत असला, तरी त्यांच्या सर्वव्यापी प्रचंड बुद्धिमत्तेला त्याचा भार वाटत नव्हता. मुंबई शहरांत त्यांचे दुसरे उद्योग सारखे अविश्रांत चालू होते. सामाजिक सुधारणेइतकीच धर्मसुधारणा त्यांना प्रिय असल्यामुळें, पहिल्या कामाइतकीच महत्त्वाची कामगिरी त्यांनीं मुंबईच्या प्रार्थनासमाजांत बजावली. प्रार्थनासमाजाच्या चिटणिसाचें, उपासना चालविण्याकरितां कव्हांही बोलावणें येवो, माधवराव त्या निमंत्रणाचा अव्हेर करीत नव्हते. श्री. रमाबाईंच्या आठवणींत एकदां असेंच अगाऊ न कळवितां आयत्यावेळीं बोलावणें आल्यावरून त्यांना कसा राग आला व माधवरावांनीं त्यांची कशी समजूत काढली, याबद्दल एक गोष्ट आहे. धर्मविचाराचें माधवरावांना वेडच होतें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. धर्मविचाराचा प्रसंग त्यांना प्राणाहून प्रिय वाटे व म्हणूनच ते धर्मोपासनेची हाक आली कीं, तांतडीनें धांवून जात. १९०९ सालीं विश्वविद्यापीठाचे व्हाइस-चॅन्सेलर या नात्यानें पदवीदानसमारंभांत भाषण करीत असतांना कै. सर नारायणराव चंदावरकर यांनीं माधवरावांच्या धर्मप्रीतीविषयीं एक स्वानुभवाची गोष्ट सांगितली. ती या बाबतींत ध्यानांत ठेवण्या-सारखी आहे. सामाजिक सुधारणेचा वाद सुरू झाल्यानंतर आपल्या गृहसौख्यांत व समाजसौख्यांत माती कालविण्याचा माधवरावांचा उद्योग आहे, असें वाटल्यामुळें लोकांनीं जेव्हां त्यांची अतिशय निंदा चालविली तेव्हां माधवरावांच्या एका पारशी स्नेह्यानें म्हटलें कीं, माधवराव तुम्ही धर्माच्या सुधारणेला मूठमाती देऊन टाका. धर्माच्या सुधारणेवांचून काय अडलें आहे ? त्या खेरीज जगांत पुष्कळ कामें आहेत. त्याला जबाब देण्याकरितां माधवराव म्हणाले:—*

* Speeches and Writings of Sir Narayan G. Chandavarkar p.242

ही धर्माची भूमि आहे. चांगल्यासाठीं असो किंवा वाइटासाठीं असो; आम्हांला देवाधर्माविषयीं बोलण्याची आणि विचार करण्याची खोड लागली आहे, यांत संशय नाहीं व तिच्यापुढें आमचा इलाज चालत नाहीं. देवाधर्मा-बद्दलचे विचार आमच्या रक्तांत आहेत. त्यांना चुकविण्याकरितां आम्हीं पळून जाऊं लागलों तर ते आमचा पाठलाग करतील. आम्हांला सोडणार नाहींत.

ज्याच्या हृदयांत व हाडींमासीं धर्मबुद्धि इतकी खिळून गेली आहे, त्यांच्या तोंडून बाहेर पडणारी प्रसादवाणी किती उज्वल, मोहक आणि परिणामकारक होत असेल, याचा अंदाज कल्पनेनें करतां येईल. परंतु ज्यांनीं माधवरावांच्या जीवंत प्रासादिक धर्मोपदेशाचा साक्षात् अनुभव घेतला, अशा साक्षीदारांच्या जबान्या येथें दाखल केल्यास कल्पनेच्या अंदाजाला मदत होऊन तो भक्कम आधारावर उभा राहील. म्हणून 'आठवणीं'च्या जबान्या सादर करणेंच श्रेयस्कर ठरतें. १९०१ सालीं जानेवारी २० रोजीं माधवरावांच्या मृत्यूनंतर दुखवटयाची उपासना करतांना कै. सर नारायणराव चंदावरकर म्हणाले:—

माधवरावांनीं या व्यासपीठावरून केलेला उपदेश आपण अनेकदां ऐकला आहे. वक्तृत्व, कळकळ, करुणाप्रधान भक्तिरस, या बाबतींत त्यांची सर कोणालाच येणार नाहीं. परंतु त्या गुणांची आठवण मात्र आपण कधींही विसरणार नाहीं.

कै. गोपाळ कृष्ण गोखले यांनीं एकाच वाक्यांत माधवरावांच्या उपासनांची महती वर्णन केली आहे. ते १९०३ सालच्या स्मृतिपर व्याख्यानांत म्हणतात:—

His interest in reform was also deep and continuous, and I have never heard anything richer than some of his sermons.

कै. विष्णु मोरेश्वर महाजनी आपल्या 'आठवणीं'त लिहितात:—

त्यांचा प्रधान गुण-किंवा इतर सर्व गुणांचा मूलभूत गुण-म्हणजे परमेश्वरा-विषयीं अनन्यभक्ती हा होता. बोलतां बोलतां ते एकदां असें म्हणाले: मला खरोखरीच अशी भावना होते कीं, लांब नळीच्या एका तोंडाशीं ईश्वर बोलत आहे, व मी त्याच नळीच्या दुसऱ्या तोंडाशीं कान देऊन तें ऐकत आहें. अशी त्यांची उत्कट भावना झाली, तेव्हां त्यांचें सर्व जीवित धर्मप्रधान झालें यांत नवल नाहीं.

माधवरावांच्या मुंबईंतल्या धर्मोपासना ऐकलेले पुष्कळजण असें सांगणारे भेटतात कीं, उपासनेंतल्या उपदेशाला प्रारंभ करण्यापूर्वी डोळे मिटून ईश्वराचें ध्यान चालू असतां माधवरावांच्या डोळ्यांतून सारखा अश्रुधारांचा पूर वाहूं लागे. हृदयांत गदगदलेल्या भक्तिरसाचा स्राव अश्रुरूपानें त्यांच्या विशाल भव्य वदनश्रीवर दृग्गोचर झाला म्हणजे कट्टया नास्तिकांच्याही अंतरंगांत आस्तिक्य भावनेचा अंकूर फुटे, हा अनुभव पुष्कळांना माधवरावांच्या उपासना ऐकतांना येत होता. श्री. रमाबाईंनीं धर्मपर व्याख्यानांच्या प्रस्तावनेंत हा अनुभव प्रत्ययाच्या शब्दांनीं पुढीलप्रमाणें वर्णिला आहे. त्या म्हणतात:—

मुंबईस प्रार्थनामंदिरांत उपासना चालविण्याचे जेव्हां जेव्हां प्रसंग येत त्या त्या वेळीं एकदां त्या प्रेममय रसाळ वाणीचा ओघ सुरू झाला कीं, हृदय उचंबळून यावें, मन तल्लीन व्हावें, क्षणांत प्रापंचिक दुःखांचा विसर पडावा, आशा व आस्था यांचा हृदयांत प्रवेश व्हावा; इतकेंच नव्हे तर आपण कधीं साक्षात् स्वर्गसुखच अनुभवीत आहों असें वाटावें. हा प्रकार उपासना सुरू झाल्यापासून तो संपेपर्यंत चालत असे; एवढेंच नव्हे तर तेथून घरीं आल्यावर-सुद्धां, त्या प्रेमळ पण मनावर पूर्ण संस्कार करणाऱ्या शब्दांनीं जागृत केलेले धर्मविचार पुढें एकसारखे तासांचे तास मनांत घोळत रहात.

गंगेच्या पाण्याप्रमाणें माधवरावांची धर्मपर प्रसादवाणी पापक्षालनाला समर्थ होती, असा वरच्या सर्व अनुभवसिद्ध वर्णनाचा निष्कर्ष

निघतो. त्यांची धर्मपर व्याख्यानें अवलोकन केल्यास वाचकाला हाच अनुभव अप्रत्यक्ष रीतीनें आल्याशिवाय रहात नाहीं. त्यांत भक्तिरसाप्रमाणें ज्ञानही ठेंचून भरलेलें आहे. माधवरावांना माणसाच्या ऐहिक व्यवहाराची माहिती अतिशय असल्यामुळें नुसत्या तत्त्वज्ञानाच्या सिद्धान्ताचें त्यांनीं आपल्या धर्मपर व्याख्यानांत चर्वितचर्वण केलेलें नाहीं. माणसाचे रोजचे व्यवहार निव्वळ स्वार्थबुद्धीनें चाललेले नसतात. त्यांत परार्थ, परमार्थ यांचाही अंश असतो. पापपुण्य, स्वर्गनरक, ईश्वराचें सर्वसाक्षित्व या व अशाच इतर बाबतींतल्या कल्पना आपल्या कमीअधिक उत्कटत्वाप्रमाणें माणसाच्या व्यवहाराचें कमीअधिक प्रमाणांत नियमन करीत असतात. त्याच्या जीवनव्यापारांतली शुभाशुभता, इष्टानिष्टता किंवा नीतिअनीति याच कल्पनांच्या धोरणानें मापली व मोजली जाते. हा मुद्दा माधवरावांना अवगत असल्यामुळें त्यांनीं जीवितसाफल्यासाठीं लागणारें व्यावहारिक तत्त्वज्ञान आपल्या व्याख्यानांतून निरनिराळ्या रीतीनें मांडलें आहे. या विधानाची सत्यता पटविण्याकरितां धर्मपर व्याख्यानांतून वाटेल तेवढे उतारे देतां येतील, पण हीं व्याख्यानें संग्रहरूपानें उपलब्ध असल्यामुळें उताऱ्यांनीं जागा अडविण्याची आवश्यकता नाहीं.

१८९१ सालीं प्रार्थनासमाजाचें नांव बदलूं नये म्हणून माधवरावांनीं लिहिलेल्या एका पत्राचा उतारा मागें घतला आहे. त्यांत त्यांनीं आपल्या कार्याची परंपरा २००० वर्षांची आहे, असें म्हटल्याचें वाचकांना स्मरत असेल. माधवरावांनीं मुंबईच्या धर्मपर भाषणांतून ही परंपरा सिद्ध केली. दोन हजार वर्षांमागें जो भागवत धर्म निघाला त्याला वैष्णव सांप्रदायिकांनीं आजवर खंड पडूं दिला नाहीं. प्रार्थना

समाजाचे पुरस्कर्ते हे त्याच माळेंतले नवे मणि आहेत. ज्ञानमार्ग, योगमार्ग हे दोन अवघड मार्ग आहेत. सगळ्या दीन दुबळ्यांना हा मार्ग आक्रमण करतां येत नाहीं; त्यांच्याकरितां भक्तीचा सुगम मार्ग भगवद्भक्तांनीं शोधून काढला. तोच मार्ग जगांतल्या हीन, दीन, पंगू, दुर्बळ जीवांना उपयोगी आहे. परमेश्वराला अनन्य भावानें शरण जावें, शरणावस्थेंतच ईश्वरार्पणबुद्धीनें इहलोकींचीं प्राप्तकर्तव्यें करावीं आणि अंतीं ईश्वरांतच विलीन व्हावें, असा भागवत धर्माचा कित्ता आहे; तोच प्रार्थनासमाज गिरवीत आहे, असें माधवरावांनीं मुंबईच्या अनेक भाषणांतून स्पष्ट सांगितलें आहे. १८९६ सालीं त्यांनीं राजा राममोहनराय यांच्या चरित्रासंबंधीं दिलेल्या व्याख्यानांत हाच मुद्दा थोडक्यांत विशद रीतीनें मांडला आहे. एकनाथी भागवताच्या आधारानें मराठींत दिलेल्या नऊ व्याख्यानांत हाच विचार प्रामुख्यानें सांगितला आहे. प्रार्थनासमाज हा भागवत धर्माचीच जर एक शाखा तर त्याच्या कित्येक तत्त्वांत अधार्मिकत्वाचा किंवा परधर्मानुकरणाचा अंश कां दिसतो, असा प्रश्न माधवरावांच्या हयातींत विचारला जात होता व हें विवरण वाचतांना वाचकांच्या हृदयांत तो उपस्थित झाल्याशिवाय रहाणार नाहीं. हा प्रश्न भागवत धर्माचा इतिहास माहीत नसल्यानें उत्पन्न होत असतो. हा प्रश्न धर्मेतिहासाचें पूर्ण अज्ञान व्यक्त करतो. ऐतिहासिक काळांतल्या साधुसंतांनीं जी कामगिरी केली, तिचें गाढ अज्ञान घालविण्याकरितां माधवरावांनीं "Hindoo Protestantism" हा निबंध लिहिला. हा निबंध त्यांनीं १८९५ सालीं प्रार्थनासमाजाच्या वार्षिक समारंभांत वाचला. मराठ्यांच्या इतिहासांत 'महाराष्ट्रांतलें साधुसंत' या निबंधामध्यें या विषयाची त्यांनीं पूर्तता केली. पहिल्या निबंधांत त्यांनीं One of the

essential features of Bhagvat Dharma is its Protestant character असें म्हटलें आहे. धर्मांत भ्रमानें, दुरभिमानानें, नजरचुकीनें किंवा परंपरेनें जे निषिद्ध विधि किंवा आचार शिरलेले असतात, त्यांचा निषेध करणारा, त्यांना धर्माच्या राज्यांतून हाकलून लावणारा जो पंथ तो प्रोटेस्टंट पंथ अशी या पंथाची व्याख्या आहे. युरोपांत या पंथानें जें कार्य केलें, तेंच त्यानें हिंदुस्थानांतही केलें आहे. धर्मव्यवहाराची भाषा पूर्वी एकजात संस्कृत होती, संस्कृत भाषेचें हें बंड ऐतिहासिक काळांतल्या वैष्णवांनीं मोडलें. पूर्वी सगळ्या जातींना ईश्वराची उपासना करण्याला मुभा नव्हती, भागवतपंथानें भक्तिमार्गांत जातिभेद राहूं दिला नाहीं; सर्वांना ईश्वरासंनिध जाण्याचा रस्ता त्या पंथानें मोकळा करून दिला. उपास्य दैवतांची नानाविधता अर्थात मूर्तिपूजा ईश्वरप्राप्तीला आवश्यक नाहीं, असें त्यानें ठरविलें. दया, क्षमा, शांति वगैरे गुणांची अभिवृद्धि करून त्याच्या जोरावर चित्तशुद्धि आणि चित्तशुद्धीच्या साह्यानें आत्मोन्नति साधावी, आत्मोन्नतींतच परमेश्वरप्राप्ती आहे असा भागवत धर्मांतल्या साधुसंतांनीं सगळ्या जनतेस, तिनें चालविलेला छळ सोसून, उपदेश केला. युरोपांतल्या प्रोटेस्टंट लोकांनीं असलेंच कार्य केलें. याप्रमाणें साम्य दाखवून माधवरावांनीं आज प्रार्थनासमाजाचा पंथ तोच कित्ता गिरवीत आहे, अशी या निबंधानें खात्री पटविली आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास यांनीं महाराष्ट्रांत जी धर्मशुद्धीची कामगिरी केली, तीच नानक, चैतन्य, कबीर, यांनीं उत्तर हिंदुस्थानांत केली. या पंथाचे दक्षिण हिंदुस्थानांतले प्रतिनिधि रामानुज, मध्वाचार्य वगैरे वैष्णवाचार्य आहेत. हा इतिहास लक्षांत ठेवला म्हणजे सर्व जातींची समानता, मूर्तिपूजेचा निषेध, वगैरे प्रार्थनासमा-

ज्याच्या तत्त्वांत अधार्मिक किंवा परधर्माचें कांहीं नाहीं, हें गळीं उतरायला उशीर लागत नाहीं. या प्रोटेस्टंट पंथाच्या स्वीकाराचें फळ काय असा कोणी प्रश्न केल्यास त्यालाही माधवरावांच्या धर्मविवेचनांत उत्तर आहे. मराठेशाहीच्या उदयसामर्थ्याचें ईश्वरी अधिष्टान महाराष्ट्राच्या साधुसंतांनीं केलेल्या कामगिरींत आहे. मराठेशाहीच्या उदयाला भागवत धर्मी साधुसंतांनीं वाट करून दिली, नानकाच्या शीख पंथानें पंजाबांत राजकीय वर्चस्व स्थापन केलें, याचें मूळ नानकाच्या भागवतधर्मप्रसारांत आहे. ऐहिक अभ्युदय हें एक धर्माचें कार्य मराठ्यांच्या व शिखांच्या इतिहासांत सिद्धीस गेलेलें पहावयास सांपडतें. पण इतिहासकालीन भागवतधर्मांत कांहीं दोष राहिले. आतां फिरून ऐहिक अभ्युदय प्राप्त करून घेण्याची महत्त्वाकांक्षा असेल तर मागल्या दोषांचें निरसन केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. हें दोषनिरसनाचें किंवा धर्मसंशोधनाचें कार्य आपल्या सामर्थ्यानुसार करण्यासाठींच प्रार्थनासमाजाचा अवतार आहे, असा माधवरावांच्या Hindoo Protestantism या निबंधाचा मथितार्थ आहे.

हिंदुस्थानांतील ईश्वरवादाची तत्त्वमीमांसा (Philosophy of Indian Theism) या व्याख्यानांत त्यांनीं विशिष्टाद्वैताच्या अर्थात वैष्णवाचार्यांच्या मतानुसार ईश्वरवादाचें विवरण केलें आहे. हें व्याख्यान त्यांनीं १८९६ सालीं विल्सन कॉलेजांत दिलें. कँपबेल फ्रेझर या इंग्रज धर्मज्ञ पंडितानें Philosophy of Theism ईश्वरविषयक तत्त्वज्ञान या विषयावर विलायतेस अत्यंत विद्वत्ताप्रचुर भाषणें केलीं होतीं. त्यांतली विचाराची मांडणी पाहून माधवरावांनीं आपल्या व्याख्यानाची रचना केली. माधवरावांची धर्मविचारांत कशी चौफेर व अकुंठित गति

होती, तिच्यांत किती खोलपणा आहे, याची ओळख करून घ्याव-याची असल्यास हा निबंध प्रत्येकानें अवश्य एकवार वाचावा. त्याचें सुबोध भाषांतर धर्मपर व्याख्यानसंग्रहांत भागवतधर्ममीमांसा या नांवानें गोंवलेलें आहे. व्याख्यानाच्या वेळीं डॉ. मॅकीकन हे अध्यक्ष-स्थानीं होते. डॉ. मॅकीकन हे कुशाग्र बुद्धीचे जाडे पंडित असूनही माधवरावांच्या विवेचनांतलें अभिनवत्व पाहून तेही चकित झाले व समारोप करतांना ईश्वरविषयक मीमांसेचें हिंदी स्वरूप असें व्याख्या-नाचें नांव असलें तरी त्याचें प्रतिपादन माधवरावांनीं केलें आहे, या प्रतिपादनांत माधवरावांच्या प्रतिभेचा अंश आहे, सारांश माधवरावांच्या प्रतिभेमुळें तें प्रतिपादन मुळापेक्षां जास्त खुलून सरस व मनोहर दिसत आहे, हें श्रोत्यांनीं विसरूं नये, असें माधवरावांच्या प्रशंसेचे पण मूळच्या मीमांसेचें किंचित् हीनत्व दर्शविणारे उद्गार अध्यक्षांनीं काढले. डॉ. मॅकीकन हे पक्के ख्रिस्ती, त्यांना रुचण्याजोगा माधव-रावांच्या विवेचनांतला शेवटचा भाग नव्हता. त्यांत माधवरावांनीं हिंदूधर्म ख्रिस्तीधर्माहून श्रेष्ठ आहे, असें म्हटलें असून श्रेष्ठत्वाचीं कारणें-ही दाखविलीं आहेत. हिंदूधर्म अनादि आहे, त्याचा एकच प्रवर्तक नाहीं, ईश्वरी साक्षात्कार आणि अवतार इहलोकीं एकदांच झाला, असें या धर्माचें मत नाहीं; जीवात्मा आणि परमात्मा यांचा साक्षात् संयोग होऊं शकतो, जीवात्म्याला परमात्म्याशीं अपरोक्षत्वानें हितगुज करतां येते, असें हिंदूधर्माचें तत्त्व आहे. या गोष्टी इतर धर्मांत नसल्यामुळें ते तितक्या मानानें हीन ठरतात, असें या भाषणांत त्यांनीं ख्रिस्ती धर्मगुरूंना रोकठोक बजावलें. हिंदूधर्माचा अंतर्विकास आणि बहिःप्रसार सारखा चालू असल्यानें दुसऱ्या धर्मांतल्या प्राह्यां-

शाचा स्वीकार करून हा धर्म दिवसानुदिवस अधिकाधिक बलवत्तर होत जाईल, हा माधवरावांचा स्वधर्माच्या अजरामरत्वाबद्दलचा दृढ विश्वास याही वेळीं प्रत्ययास आला. वडाच्या पारंबीची उपमा घेऊन माधवरावांनीं एकदां ( १८८७ ) प्रार्थनासमाजाच्या अस्तित्वाचें आणि आवश्यकतेचें समर्थन केलें होतें. पुरातन भागवत संप्रदाय हा या धर्मवृक्षाचा भक्कम बुंधा, नानक, कबीर, चैतन्य, एकनाथ-तुकाराम यांनीं काढलेले पंथ हे त्या वृक्षाच्या शाखा, त्याला प्रार्थनासमाज, ब्राह्मसमाज, आर्यसमाज या नव्या शाखा फुटल्या, ऐहिक अभ्युदय हें त्यांचें फळ; इतिहासकाळांत एकदोन फांद्यांना हीं फळें आलीं, पण तीं अकालीं गळून पडलीं, असेंही माधवरावांच्यां धर्मविचाराचें निराळ्या रीतीनें वर्णन करण्याला हरकत नाहीं.

प्रार्थनासमाजांत व्याख्यानें देतांना प्रथम कित्येक वर्षेंपर्यंत माधवराव बायबलांतलीं वचनें घेऊन धर्माचें प्रवचन करीत असत. मुंबईच्या प्रवचनांतून त्यांनीं एकनाथी भागवत, तुकाराम महाराजांची गाथा, आणि उपनिषदें यांतल्या वचनांच्या आधारानें आपले विचार सांगितले आहेत. बायबलांतल्या वचनांबद्दल त्यांना हिंदू वृत्तपत्रें नांवें ठेवीत होतीं. उपनिषदांतल्या वचनांच्या निरूपणाबद्दल खिस्ती वृत्तपत्रें त्यांच्यावर टीकेचें तीक्ष्ण शरसंधान करूं लागलीं. 'धर्मानुशासन' या व्याख्यानांत त्यांनीं खिस्ती धर्माज्ञा निषेधार्थक म्हणजे 'अमूक करूं नको' असें सांगणाऱ्या असून उपनिषदांतल्या आज्ञा विधायक म्हणजे 'अमूक कर' असें सांगणाऱ्या आहेत, याविषयीं निरूपण केलें, तेव्हां त्यांच्यावर खिस्ती वृत्तपत्रें रागावलीं, पण त्यांनीं मूर्तिपूजेच्या देवळांत ( मुंबईच्या ठाकुरद्वारीं )

कांहीं भाषणें केल्यामुळें मूर्तिपूजानिषेधाच्या तत्त्वाचा माधवरावांनीं गळा दाबला, अशी त्यांच्या मताच्या वृत्तपत्रांनीं ओरड चालविली. माधवराव विठोबाचे किंवा विष्णु, कृष्ण इत्यादि मूर्तिमय देवांचे उपासक नसले तरी श्रद्धेनें कधीं कधीं पंढरपुरास व आळंदीस जात असल्याची आठवण के. ग. ज. अगाश्यांनीं सांगितली आहे. हें विसंगतीचें कोडें गोखल्यांनीं सोडविलें आहे. 'आपले विचार लोकांना समजावे, या एकाच गोष्टीचा काय तो माधवरावांना ध्यास होता; या बाबतींत त्यांना स्थळाची फारशी फिकीर वाटत नव्हती, विचार व्यक्त करण्याची संधी मिळाली म्हणजे माधवराव वाटेल तेथें जाण्याला तयार असत' असा गोखल्यांनीं वरील विसंगतीचा उलगडा केला आहे. पंढरपुरास व आळंदीस ते तीर्थभूमीच्या वातावरणाचे पवित्र संस्कार मनावर करून घेण्याकरितां जात असावेत, असा एकेश्वरनिष्ठाच्या कैफियतींत आधार आहे. माधवरावांची ईश्वरनिष्ठा किती प्रबळ होती याचें एक उदाहरण इंदूरचे चीफ जज्ज दाजीसाहेब कीर्तने यांनीं Indian Worthies नामक पुस्तकांत लिहिलेल्या माधवरावांच्या चरित्रांत आहे. माधवराव व्याख्यानाला उभे राहिले कीं, प्रथम कांहीं मिनिटें डोळे मिटून स्तब्ध रहात. कीर्तने म्हणतात कीं, डोळे मिटून स्तब्ध असतांना ते मनांतल्या मनांत प्रार्थना करीत असत व ही गोष्ट फारच थोड्या लोकांना समजली होती.

* *

* * *

मुंबईस आल्यानंतर माधवरावांनीं चालविलेल्या दोन कार्यांचा विस्तृत गोषवारा मागल्या भागांत वाचकांना सादर केला. तीं कामें नित्याच्या

व्यवसायांतली असली तरी त्यांचें स्वरूप नैमित्तिक असल्यानें नित्य-क्रमाची हकीकत सांगितल्याखेरीज त्यांच्या बहुविध कार्यांची कल्पना येणार नाहीं. पुणें सोडतांना जशी त्यांच्या सन्मानासाठीं समारंभांची गर्दी उडाली तशी गर्दी मुंबईच्या नागरिकांनीं तें मुंबईस आल्यानंतर उडविली. त्यांचा सगळा वृत्तांत सादर केल्यास तो कंटाळवाणा होईल. परंतु त्यांतल्या एका समारंभांत माधवरावांनीं आपल्या श्रोत्यांना कडू-वाटणारा उपदेश केल्यामुळें त्याची हकीकत देण्यास हरकत नाहीं. माधवराव हे ब्राह्मण जातींत जन्मास आलेले त्यामुळें मुंबईच्या ब्राह्मण-सभेनें त्यांना १८९४ च्या जानेवारींत पानसुपारी दिली. त्यावेळीं माधवरावांच्या ब्राह्मणत्वावर सन्मानार्थ बोलणाऱ्या इतर वक्त्यांचा कटाक्ष पाहून माधवरावांनीं उलट आभारप्रदर्शनाचें भाषण करतांना ब्राह्मणत्व जन्मावर अवलंबून नाहीं, गुणांवर अवलंबून आहे, असें सांगितलें. अशा प्रकारचा उपदेश करण्याला समारंभाच्या जागेंत एक प्राचीन श्लोक लावलेला होता तोच त्यांना सांपडला व त्या श्लोकांत वर्णिलेले शम, दम, तप, शुचिर्भूतपणा, इंद्रियनिग्रह, वगैरे गुण ज्याच्या अंगीं असतील त्याला ब्राह्मण म्हणावें, इतरांना ब्राह्मण म्हणणें म्हणजे ब्राह्मण शब्दाची थट्टा करण्यासारखें आहे; जन्माचा अभिमान धरूं नये, गुणांचा अभिमान धरावा आणि गुण ज्यांच्या अंगीं असतील त्यांचाच आदर करावा, त्याची जात पाहूं नये, असा त्यांनीं श्रोत्यांना बोध केला. हा बोध कित्येकांना आवडला नाहीं. त्याचें प्रत्यंतर पहा-वयाचें असल्यास नेटिव्ह ओपीनियन पत्रांत आहे.

१८८५ सालीं स्थापन झालेल्या पदवीधर मंडळापुढें माधवरावांनीं आमचे पदवीधर लवकर कां मरतात, या विषयावर व्याख्यान दिलें.

ही संस्था फेरोजशहा मेथा, तेलंग, वामन आबाजी मोडक वगैरे पुढाऱ्यांच्या खटपटीनें निर्माण झाली होती व पहिल्यापासूनच तिचें अध्यक्षस्थान माधवरावांना देण्यांत आलें होतें. माधवराव मुंबईस येण्यापूर्वी कांहीं दिवस या संस्थेचा ऱ्हास झाला होता. माधवरावांनीं तिला पुनः टवटवी आणली. आमचे पदवीधर अकालीं मरण पावतात ही गोष्ट सुमारें दहा वर्षें वृतपत्रांच्या चर्चेत होती. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे बरेच चालक अकालीं मृत्युमुखीं पडल्याचें पाहून हा प्रश्न विचारांत घेण्याला विद्वान् पुढारी प्रवृत्त झाले. प्रथम डॉ. भांडारकर यांनीं व्हाईस चँसेलर या नात्यानें आपल्या भाषणांत अकालमृत्यूचीं कारणें शोधून काढलीं. पदवीधरांच्या अपमृत्यूचें कारण आमची सामाजिक दुर्व्यवस्था, असा डॉ. भांडारकर यांचा ठाम सिद्धांत होता. माधवरावांनीं हा प्रश्न सोडविण्याचें मनांत आणून आपल्या व्याख्यानांत दारिद्य आणि पदवीच्या अभ्यासाचा दुर्धर भार अशीं दोन अपमृत्यूचीं वेगळीं कारणें ठरविलीं. यासाठीं त्यांनीं भांडारकरांप्रमाणेंच पुष्कळसे आंकडे गोळा केले, पदवीधरांच्या प्रापंचिक स्थितीची माहितो मिळविली, अनेक ठिकाणच्या पदवीधरांकडे पत्रें पाठवून त्यांचें मत विचारलें आणि नंतर आपला सिद्धांत बसविला. आपण ४०० गृहस्थांकडे पत्रें धाडलीं व त्यांपैकीं १६० जणांचीं उत्तरें आलीं, असें माधवरावांनींच आपल्या व्याख्यानांत सांगितलें आहे. माधवरावांनीं ज्यांच्याकडे पत्रें रवाना केलीं, त्यांतल्या वरील १४० जणांनीं आपापल्या शहरीं सभा भरविल्या आणि पूर्ण वादविवाद करून नंतर मतांचे कागद माधवरावांकडे पाठविले. त्या सर्वांचा मथितार्थ काढण्याचें काम माधवरावांनीं केलें. नंतर दारिद्य

आणि अभ्यासाचा भयंकर बोजा हींच अपमृत्यूचीं कारणें होत, असा सिद्धांत मांडला. या भाषणांत माधवरावांनीं ब्राह्मण विद्यार्थ्यांच्या स्थितीचें जें वर्णन दिलें आहे, तें प्रत्येकास पटेल, असेंच आहे. माधवरावांच्या भाषणासंबंधीं पुढें कांही आक्षेप भांडारकरांनीं काढले आणि हा वाद वृत्तपत्रांतून सुरू झाला. माधवराव आणि भांडारकर यांचा हा सामना अभूतपूर्व होता. दोघेही सारख्याच तोलाचे विद्वान्, दोघांनाही आपल्या जबाबदारीची सारखीच जाणीव, दोघांनाही लोकहिताची सारखीच कळकळ, आपण जे सिद्धांत बोलतो, त्यांत अव्याप्ति, अतिव्याप्ति किंवा असेच दुसरे दोष राहूं नयेत, म्हणून दोघेही सारखीच काळजी घेणारे, आणि दोघेही एकमेकाचे जिवश्चकंठश्च मित्र, यामुळें त्यांच्या सामन्याला कांहीं निराळेंच महत्त्व आलें. ज्यांना समाजसुधारणा मान्य नव्हती, अशा वृत्त पत्रकारांचा मार्ग सरळ होता. त्यांनीं माधवरावांचा पक्ष घेतला. ज्यांना समाजसुधारणा मान्य होती, त्यांनीं भांडारकरांचा कैवार घेतला, पण कित्येकांना दोघांविषयीं सारखीच पूज्यबुद्धि होती. त्यांनीं दोघांचीं मतें जनतेपुढें ठेवून तटस्थपणा अंगीकारला. भांडारकरांनीं माधवरावांच्या भाषणांत अपसिद्धांत आहेत, अशा अर्थाचा सिंहनाद करतांच माधवरावांनीं भांडारकरांच्या विरोधांत मतैक्याचा भाग फार आहे, असें दाखवून वाद जास्त माजूं दिला नाहीं.

तेलंगांच्या मृत्यूनंतर हिंदू यूनियन क्लबामार्फत सुरू झालेली हेमंतव्याख्यानमाला कोमेजली होती; पुण्याच्या वसंतव्याख्यान मालेचाच हा मुंबईचा अवतार होता. पण तेलंगासारखा मालाकार जातांच ही माला गुंफण्याचें कार्य करण्याला तितक्या आस्थेचा कोणीच गृहस्थ

पुढें आला नाहीं व ती पूर्णपणें विशीर्ण होण्याच्या पंथास लागला. माधवराव मुंबईस आल्यावर त्यांनीं या मालेचा उद्धार केला. ते मुंबईस होते तोंवर सालोसाल ही व्याख्यानमाला ताज्या फुलांनीं गुंफली जात होती, असें १८९३-१९०० या मुदतींतलीं स्थानिक वृत्तपत्रें चाळल्यास दिसून येईल. पुण्याप्रमाणेंच माधवरावांनीं मुंबईसही मालेच्या व्याख्यानास हजर रहाण्याचा परिपाठ ठेवला होता. कधीं अध्यक्षत्वाची जबाबदारी त्यांच्यावर टाकली जात असे; कधीं आभारप्रदर्शनाच्या रूपानें ते आपले विचार श्रोत्यांना निवेदन करीत असत. परंतु पुण्याच्या व्याख्यानांना ते जसे नियमानें बिनचूक हजर रहात, तसे मुंबईला हजर रहात नव्हते. शक्य असल्यास मात्र व्याख्यान चुकवीत नसत. त्यांचें वाचन, मनन, निरीक्षण निरंतर अहोरात्र चालू असल्यानें कोणत्याही विषयावर तज्ज्ञाप्रमाणें पूर्ण माहितीच्या व अनुभवाच्या जोरावर आपले भारदस्त विचार श्रोत्यांना सांगण्याला त्यांना अडचण पडत नसे. मागल्या चाळीस वर्षांच्या इतिहासांत त्यांनीं कधीं परोक्ष व कधीं प्रत्यक्ष भाग घेतलेला असल्यामुळें त्यांना अवगत नसणारी अगदीं नवी चळवळ या दिवसांत निघाली नाहीं. पूर्वी जे विचार बोलले व लिहिले गेले आणि कृतींत उतरविण्याचा प्रयत्न झाला, तेच विचार नवीं माणसें नव्या शब्दांनीं लिहीत, बोलत किंवा कृतींत वठविण्याचा यत्न करीत. यामुळें माधवरावांना आपले सल्लामसलतीच्या स्वरूपाचे विचार सांगण्याला अडचण भासत नसे. उद्योगधंदे, व्यापार, राजकारण, शिक्षण, धर्म, सामाजिक सुधारणा या बहुविध विषयांवर त्यांचे विचार पूर्वीच्या चरित्रभागांत आले असल्यानें येथें त्याची पुनः वाच्यता करण्याचें

कारण नाहीं. तथापि त्यांच्या एका व्याख्यानाचा थोडा सविस्तर उल्लेख करणें अवश्य आहे. तेलंगाच्या पुण्यतिथीच्या दिवशीं १८९५ सालीं त्यांनीं 'तेलंगांचा संप्रदाय' ( Telang School of Thought ) या नांवाचें जें व्याख्यान दिलें तें अत्यंत महत्वाचें आहे, असें म्हट-ल्यास हरकत नाहीं. या वर्षापर्यंत त्यांचे अनेक कर्ते मित्र दिवगंत झाले होते. हे सर्व मित्र 'सर्वांगीण सुधारणा झाली पाहिजे' अशा मताचे होते व त्या मताच्या प्रसारासाठीं त्यांनीं आपलें सगळें सामर्थ्य खर्ची घातलें; राजकीय, सामाजिक, धार्मिक असे कामाचे तुकडे पाडून व त्यांतलें एखादें काम करून बाकीच्यांकडे त्यांनीं कानाडोळा केला नाहीं; शरीर, बुद्धि, मन वगैरे मनुष्यत्वाच्या सर्व अंगांना उन्नता-वस्था आणली पाहिजे, त्या खेरीज माणसाला सर्वांगपूर्णत्व येणार नाहीं, असें तेलंग संप्रदायाचें मुख्य तत्त्व माधवरावांनीं सांगितलें. गत-काळचा तेलंग संप्रदायाच्या लोकांना अभिमान होता, आणि भविष्य-काळाविषयीं त्यांना आशा वाटत होती. उदासीनता किंवा उतावळे-पणा या विकाराची बाधा त्यांना कधीं झाली नाहीं. उदासीनता हें वृद्धत्वाचें लक्षण असून उतावळेपणा हें बाल्यावस्थेचें लक्षण आहे. ही दोन्ही लक्षणें ज्यांच्या ठिकाणीं दिसतात, असें पुष्कळ लोक या देशांत आहेत. थोडेसें यश मिळतांच स्वर्ग दोन बोटें उरल्याप्रमाणें शेफार-णारे आणि अपयशाची ल्हानशी झुळूक लागतांच निराशेनें खचून जाणारे लोक फार आहेत. तेलंग संप्रदाय आशावादी आहे, परंतु विद्यमान परिस्थितींतल्या अडचणींचा भार त्यांच्या मनावर असल्यानें अखेरच्या परिणामाविषयीं त्याची खात्री असली तरी दीर्घकाळ उद्योग केल्याशिवाय अखेरचा सुपरिणाम हस्तगत होणार नाहीं, याची त्याला

जाणीव आहे. पूर्वस्थितींतल्या वैभवाचा नाटकी आविर्भाव केल्यानें किंवा त्याची निष्फळ सुखस्वप्नें पहाण्यांत चूर झाल्यानें आमचें डोकें वर निघेल, असें तेलंग संप्रदाय मानीत नाहीं. या भाषणांतलें एक वाक्य पुढीलप्रमाणें आहे.

Our difficulties are not really outside us but inside us the difficulties are in us, in our inertia, in our weakness in our physical disability to sustain hard work, in our inaptitude to work long for great results by great toils.

अविरत श्रम करण्याची आस्था, चिकाटी वगैरे गुण आपल्या समाजांत नाहींत, अशी माधवरावांची अनुभवसिद्ध खात्री होती. सामाजिक परिषदेसंबंधींचा द्वेष उत्कटावस्थेस आला तेव्हां गोखल्यानीं त्याचें त्यास कारण विचारलें. माधवरावांनीं उत्तर दिलें:—'आणखी कांहीं वर्षें दम धरा, कांग्रेसच्या बाबतींत आज दिसणारा निस्सीम उत्साह पार जिरून गेल्याचें तुमच्या अनुभवास येईल.' पुढें सात आठ वर्षांनीं वरील शब्द खरे ठरले. वरच्या उताऱ्याचें रहस्य समजण्याला ही गोष्ट उपयोगी आहे.

ते पुढें म्हणतात:—

We should learn to be men, stalwart puritan men, battling for the right, not indifferent nor sanguine, trustful but not dejected. That is the change in the character which has to be accomplished.

१८९१ सालीं लाहोर येथें सामाजिक परिषदेच्या भाषणांत त्यांनीं आपल्या गतकाळाचा अभिमान बाळगणें इष्ट आहे असें म्हटलें होतें. १८९७ सालच्या भाषणांत त्यांनीं गतकाळाच्या पुनरुज्जीवनाची

कल्पना उपहासास्पद असल्याचें दाखविलें. तेव्हां ही विसंगति पाहून कित्येक वृत्तपत्रकारांनीं त्यांच्यावर टीका केली. गतकाळांतल्या कोणत्या भागाचा अभिमान धरणें योग्य आहे, याचें विवरण त्यांनीं १८९२ सालच्या सोलापूरच्या भाषणांत केलेलें वाचकांच्या लक्षांत असेल. शास्त्र, वाङ्मय, तत्त्वज्ञान यांची ज्या काळांत वाढ झाली, जेव्हां पूर्वेकडे जावा आणि उत्तरेकडे मंगोलिया या प्रदेशापर्यंत आपल्या लोकांनीं साम्राज्यविस्तार केला, त्या अतिप्राचीन काळाचा आपण अभिमान धरणें अवश्य आहे. गेल्या हजार पांचशे वर्षांच्या भूत-काळामध्यें अभिमान धरण्यासारखें कांहीं नाहीं, त्या काळानें आपणास आजच्या दुर्दशेंत आणून सोडलें आहे, असें माधवरावांचें मत होतें व तेंच त्यांनीं यावेळीं प्रतिपादन केलें. या हजार पांचशें वर्षांमध्यें प्राचीन पराक्रमाच्या व शुद्धाचरणाच्या छटा मधून मधून दिसल्या. पण त्यांचा सांप्रत निःपात झाला असून विझलेली तेजस्विता पुनः जागृत करणें आपलें कर्तव्य आहे, असें माधवराव या व्याख्यानांत म्हणाले. माधव-रावांनीं आणि त्यांचे सहकारी मित्र यांनीं बजावलेल्या कामगिरीचें तात्त्विक स्वरूप या भाषणांत आहे, एवढें सांगितल्यास त्याचें रहस्य वाचकांना समजण्याला हरकत नाहीं. कै. राजारामशास्त्री भागवत यांच्या विनंतीवरून त्यांनीं ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, यांवर दिलेलीं तीन व्याख्यानें व डीसेन्ट्रलायझेशनवर लिहिलेली लेखमाला यांचीं गणना अवान्तर कामांतच केली पाहिजे. याशिवाय त्यांचीं भाषणें पुष्कळच आहेत. १८९४ सालीं माधवरावांनीं केलेली आणखी एक कामगिरी येथें नमूद करणें अवश्य आहे. डेक्कन व्हर्न्याक्युलर सोसायटी या नांवाची मराठी ग्रंथांची अभिवृद्धि करणारी संस्था माधवरावांच्या विद्यार्थिदशेंत

होती. पुढें कांहीं काळानें तिचें नांवही ऐकूं येईनासें झालें. माधवरावांनीं १८७८ सालीं काढलेल्या मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीचें काम पांच सहा वर्षानंतर संपुष्टांत येत चाललें होतें. यामुळें माधवरावांचें लक्ष वरील जुन्या सरकारी संस्थेकडे जाऊन त्यांनीं सरकारांत पत्रव्यवहार सुरू केला. अखेरीस सरकारानें आपल्याकडे पडून राहिलेल्या ग्रंथोत्तेजनाच्या रकमेचे दीडशे रुपये व्याज माधवरावांच्या नव्या संस्थेस दरसाल देण्याची हमी घेतली. गोपाळ हरी देशमुख वारल्यानंतर त्यांच्या स्मारकाप्रीत्यर्थ उभारलेला फंड नव्या संस्थेच्या हवाली करून १८९४ सालीं ही संस्था त्यांनीं अस्तित्वांत आणली. स्वभाषाभिवृद्धीकडे माधवरावांचें कसें लक्ष होतें याची साक्ष देणारें, हें दुसरें उदाहरण आहे. युनिव्हर्सिटींत बजावलेली याच दिवसांतली कामगिरी यथाक्रम पुढें येणारच आहे.

* * *

* * *

मुंबईस आल्यावर माधवरावांनीं मराठेशाहीचा इतिहास लिहिण्याचें एक आवडतें कार्य स्वीकारलें होतें. हें कार्य तेलंगांच्या जोडीनें करावें असा त्यांचा विचार होता. त्याप्रमाणें तेलंगांनीं मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें गोळा करून त्यांतील ग्राह्यांशाचीं टिपणें आरंभलीं व या प्रयत्नाचें पहिलें फळ Gleanings from the Maratha Chronicles या मथळ्याखालीं १८९२ सालीं जनतेस अर्पण केलें. पण तें कार्य त्यांच्या हातून शेवटास गेलें नाहीं. आपल्या मित्राचें कार्य आपण पूर्ण करावें असा माधवरावांनीं नंतर निर्धार केला व जसजशी तयारी झाली तसतशी ती प्रकरणशः निबंधांच्या रूपानें लोकांपुढें

ठेवली. सह्याद्रीच्या वनसृष्टींत ज्याप्रमाणें एकाएकीं वणवे पेटतात आणि विझतात त्याप्रमाणें या पर्वतराजींत वसलेल्या मानव सृष्टीमध्यें यदृच्छेनें पराक्रमाचा वणवा एकदां पेटला आणि कांहीं काळ जळत राहून तो विझला, असें विधान मराठ्यांचे इंग्रज इतिहासकार ग्रँटडफ यांनीं केलें. मराठेशाहीच्या उदयास्ताला आगापीछा नाहीं, मराठ्यांच्या स्वराज्यामध्यें कार्यकारणभाव दिसत नाहीं, असा ग्रँटडफसाहेबाचा ठाम समज होता. तो माधवरावांनीं आपल्या इतिहासांत खोडून टाकला आहे. हिंदुस्थानाच्या इतिहासांतल्या परचक्राच्या घडामोडी परमेश्वराच्या इच्छेनें चालल्या आहेत व त्या या देशाच्या हितासाठींच झाल्या, असा बिनतोड निष्कर्ष काढणाऱ्या माधवरावांच्या बुद्धीला मराठ्यांच्या उदयास्ताची घडामोड कार्यकारणाचा नियम सोडून अस्तित्वांत आली, हें पटणें शक्यच नव्हतें. मराठ्यांचा उदय कार्यकारणाच्या सृष्टिक्रमानुसार झाला, ही गोष्ट माधवरावांनीं या लहानशा इतिहासांत सिद्ध केली आहे. माधवरावांच्या ज्ञानार्जनांत इतिहासनिष्ठा प्रबळ होती. शेतसाऱ्याचा प्रश्न असो, वतनदारीचा विषय असो, विधवाविवाहाची बाब असो, मध्यआशियांतल्या धामधुमी असोत, सकेशा विधवेनें दत्तक घ्यावा कीं न घ्यावा हा प्रश्न असो, माधवरावांसमोर कोणतीही बाब येवो आणि ती कितीही क्षुद्रक अगर महत्त्वाची असो; माधवराव तिचा विचार करायला बसले कीं, त्यांनीं इतिहासाची कांस धरलीच म्हणून समजावें. इतिहास नाहीं असा त्यांचा एकही लेख, भाषण, सांपडावयाचें नाहीं. त्यांच्या भाषणांतून इतिहास आहे, त्यांच्या लेखांतून इतिहास आहे आणि हायकोर्टाच्या निकालांतूनदेखील इतिहास आहे. ज्याठिकाणीं वास्तविक इतिहासाची आवश्यकता नाहीं, तेथें

जर ते इतिहास देतात, तर प्रत्यक्ष इतिहासच लिहिण्यासाठीं लेखणी हातांत धरल्यावर त्यांच्या बुद्धीला कसा मनसोक्त अवसर सांपडला असेल, हें सांगायला नको. त्यांतून मराठ्यांचा म्हणजे स्वपूर्वजांच्या पराक्रमाचा इतिहास त्यांनीं लिहिण्याला घेतला; यामुळें त्यांच्या हातून स्वदेशाच्या ऐतिहासिक वाङ्मयांत एक अद्वितीय भर पडली व या गोष्टीला ३० वर्षें होत आलीं तरी माधवरावांच्या इतिहासाला फिका पाडणारा दुसरा ग्रंथ निर्माण झाला नाहीं. डफ-साहेबांनीं इतिहास लिहिला, पण त्यानीं मराठ्यांच्या मोहिमाशिवाय, त्या मोहिमांतून दिसणाऱ्या त्यांच्या रणचापल्याशिवाय आणि रणचातुर्या-शिवाय दुसऱ्या कोणत्याच गुणांची माहिती दिलेली नाहीं. शिवाजीच्या उदयकाळीं मराठ्यांची स्थिति कशी होती, शिवाजीच्या उदयाला किती माणसांनीं हातभार लावला, शिवाजीचा राज्यकारभार कसा होता, त्यांत विशेष गुण कोणते होते, वगैरे गोष्टींचा मागमूसही डफसाहे-बांच्या इतिहासांत आढळत नाहीं. शिवाजीला सामान्य जनतेची मदत झाली, परंतु सामान्य जनतेच्या मनाला शिवाजीच्या महत्त्वाकांक्षेशीं समरस करून सोडणारी पूर्वतयारी महाराष्ट्राच्या साधुसंतांनीं सुमारें तीनशेंवर्षें चालविली होती. मनुष्याच्या कर्तबगारीचे विभाग पाडून त्यांचा परस्परांशीं संबंध नाहीं, असें समजणाऱ्या लोकांना साधुसंतांच्या कामगिरीचें राजकीय महत्त्व कधींच उमगलें नव्हतें व अजूनहि उमगत नाहीं. मनुष्याच्या कर्तबगारीच्या प्रवाहांत राज्यकारण, धर्म, गृहसंसार या सर्वांच्या धारा मिसळलेल्या असतात, त्यांखेरीज त्या प्रवाहाला पूर्णत्व येणार नाहीं व तो अखंड वहाणार नाहीं, अशी माधवरावांच्या मनाची खात्री असल्यामुळें त्यांनीं साधु-

संतांच्या कामगिरीचा परामर्श घेतला आणि देहू आळंदी, पैठण वगैरे ठिकाणीं समाधिस्थ होऊन राजकीय दृष्ट्या लुप्तप्राय बनलेल्या साधुसंतांच्या कामगिरीचा आपल्या इतिहासांत जीर्णोद्धार केला. श्रीसमर्थ रामदासांनीं उपयोगांत आणलेल्या 'महाराष्ट्र धर्म' या शब्दावरून साधुसंतांच्या कामगिरीकडे माधवरावांची दृष्टी वळली असावी, असा तर्क करण्याला एक आधार आहे. १८९४ सालीं लोणावळ्यास एकदां ते मित्रमंडळीसमवेत फिरायला जाण्याकरितां निघाले. घराबाहेर पडतां पडतां रामदासांनीं 'महाराष्ट्र धर्म' हा शब्द कोणत्या अर्थानें वापरला असावा, असा त्यांनीं मित्रमंडळींना प्रश्न विचारला. पुढें सुमारें दोन तास फिरणें चाललें होतें; पण माधवरावांनीं फिरतांना तोंडावाटें एकही शब्द उच्चारला नाहीं. पुनः घरांत शिरतांना त्यांनीं तोच प्रश्न मंडळींना केला. हें त्यांच्या दीर्घ चिंतनाचें व मननाचें उत्तम उदाहरण आहे. 'महाराष्ट्रांतले साधुसंत' या निबंधांच्या सुरुवातीस त्यांनीं हा प्रश्न घेऊनच पुढलें उत्तरार्थी विवरण केलें आहे. शिवाजीची राज्यघटना हा त्यांच्या इतिहासांतला अत्यंत नवीन असा भाग आहे. शिवाजी योद्धा होता, त्यानें मोगलांच्या फौजेला खडे चारले, ही त्याचा चरित्राची एक बाजू सर्वांस माहीत होती. जुन्या बखरींतूनही तिचेंच रसभरित वर्णन आहे. शिवाजी राज्यकर्ता होता, त्यानें राज्यस्थापना केली, हें देखील अस्पष्टपणें सर्वांना ठाऊक असतें, पण राज्यकर्तृत्वाचें साधन समशेर नसून शेतें, खेडीं, शहरें, व्यापार, पाटील, कुळकर्णी, सुभेदार, न्यायाधीश यांचा प्रामुख्यानें राज्यकर्तेपणाशीं संबंध असतो, याचें ज्ञान प्रत्येकाला सामान्यतः असत नाहीं. युद्धाच्या कथा रमणीय असतात, राज्यकर्तृत्वाचा तपशिलांत रमणीयता नसते.

तो विषय मेंदूला उत्तेजित करणारा नसून उलट त्यास थकवा आणणारा आहे. यामुळें तिकडे सहसा कोणाचें लक्ष जात नाहीं. माधवराव मुत्सद्दी होते. बुद्धिबळाच्या खेळाडूप्रमाणें विविध कार्याच्या पटावर वेगवेगळालीं मोहरीं सारण्याचें कौशल्य त्यांच्या कामगिरींत जितकें दिसतें, तितकें दुसऱ्या कोणत्याही पुढाऱ्याच्या कामगिरींत दिसत नाहीं. अशा प्रकारच्या करामतीला मुत्सद्देगिरी लागते. संघटना हे मुत्सद्देगिरीचें कार्य. समाजाच्या विस्कळित शून्यावस्थेंतून नियमबद्ध चिरस्थायी कार्यसृष्टि निर्माण करणारा विधाता म्हणजेच मुत्सद्दी. मराठ्याचें स्वराज्य शिवाजीनें उत्पन्न केलें, तें टिकलें याचें कारण त्याची राज्यघटना. या राज्यघटनेमुळेंच शिवाजीला, पराक्रमाची इमारत उभारतां आली. इमारतीच्या देखाव्यांत तिच्यांतल्या कारागिरीचें भान माधवरावांपर्यंत कोणालाच राहिलें नाहीं. माधवराव स्वतः कार्यधुरंधर व कुशल मुत्सद्दी असल्यामुळें त्यांनीं कारागिरीचा हिशोब अथवा नकाशा शोधून काढला. Shivaji as a Civil Ruler हें त्यांचें प्रकरण आजपर्यंत सर्वांना मार्गदर्शक झालें आहे. अलीकडे डॉ. सुरेंद्रसेन नांवाच्या एका बंगाली लेखकानें 'मराठ्यांचा राज्यकारभार' या नांवाचा जाडा ग्रंथ इंग्रजींत लिहिला आहे. त्यालाही माधवरावांखेरीज मराठ्यांच्या राज्यकारभाराची योग्य कल्पना आणून देणारा दुसरा एकही इतिहासकार आजपर्यंत झाला नाहीं, अशी आपल्या प्रस्तावनेंत विस्तृत कबूली द्यावी लागली आहे. 'जिंजी' हें त्यांच्या इतिहासाचें नववें प्रकरण असून राजारामाच्या कारकिर्दीत मराठ्यांनीं मोगली सैन्याच्या महापुरांत बुडण्याच्या पंथास लागलेलें स्वराज्य कसें तारलें, याचा वृत्तांत अत्यंत चटकदार रीतीनें वर्णन

केला आहे. या प्रकरणाच्या उपसंहाराची गोडी अशी आहे कीं, त्याचें पुनःपुन: वाचन केलें तरी वीट किंवा कंटाळा येत नाहीं. अशा रीतीनें माधवरावांनीं आपला इतिहास शाहूमहाराजांच्या कारकिर्दीपर्यंत आणून संपविला आहे. एकनाथांनीं ' ग्रंथीं राखोनिया गुह्यार्थ । मुख्यत्वें दावावा परमार्थ ॥ असा एक भावार्थरामायणाच्या बालकांडांत ग्रंथ-लेखनाचा हेतु सांगितला आहे. माधवरावांना गुह्यार्थ राखून जनतेला परमार्थ शिकवावयाचा होता; आपल्या ग्रंथाचा मुख्य हेतु त्यांनीं प्रस्तावनेच्या शेवटीं नमूद केला आहे. १६१२ मध्यें सुरतेला इंग्रजांनीं वखार घातली. १६२७ मध्यें शिवाजीमहाराज जन्मास आले. या दोन्हीं गोष्टींना प्रारंभीं कांहींच महत्त्व नव्हतें, पण पुढच्या दोनशें वर्षांत सुरतेच्या वखारींतून व शिवाजीच्या जन्मांतून ज्या घडामोडी उत्पन्न झाल्या त्यांचा परस्परांशीं व एकंदर हिंदी इतिहासाशीं अतिनिकट संबंध आहे. देशभक्तीच्या सूत्रांत गोवलेलें मराठ्यांचें सार्वभौम राज्य-मंडळ स्थापावें असा मराठ्यांचा यत्न होता, पण तो वखारवाल्यांच्या सामर्थ्यापुढें फसला. माधवराव म्हणतात:—

The attempt failed; but even the failure was itself an education in the highest virtues, and possibly intended to be a preparatory descipline to cement the union of the Indian races under British guidance.

या ग्रंथहेतूच्या सिद्धीसाठीं माधवरावांनीं मराठ्यांच्या अंगचे उदयकालीन गुण, त्यानंतरची फाटाफूट, शिवाजीचीं राज्यतत्त्वें, त्यांची व इंग्रजी राज्यनीतीची तुलना, मराठी सत्तेच्या नाशाचीं कारणें, वगैरे इतर अनेक विषयांचें प्रसंगोपात्त मार्मिक विवेचन केलें आहे. त्यांनीं पेशवाईच्या इतिहासाचीं टिपणें लिहून काढलीं होतीं. पण त्यास सुमा-

रास नवीं साधनें उपलब्ध होऊं लागल्यामुळें आणखी कांहीं दिवस जाऊं देणें माधवरावांस इष्ट वाटलें. माधवरावांच्या आयुष्याचा ग्रंथ नंतर समाप्तीस आल्यामुळें त्यांचा इतिहासलेखनाचा खटाटोप त्यांच्या-बरोबरच लयास गेला. त्यांचीं टिपणेंही त्यांच्या मागून नष्टप्राय झालीं.

हा द्वादश प्रकरणात्मक ग्रंथ मुळांत लागमन्स कंपनीच्या Epochs of Indian History नामक मालेसाठीं लिहिला जात होता. या मालेंत रोमेशचंद्र दत्त यांचें एकच 'प्राचीन भारतवर्ष' या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध झालें. मुसलमानांच्या व मराठ्यांच्या इतिहासाची जाहीरात निघाली, पण पुस्तकें बाहेर पडलीं नाहींत. माधवरावांचें पुस्तक एका देशी प्रकाशकांनीं छापून काढलें. माधवरावांचा इतिहासव्यासंग असा-मान्य होता. मराठ्यांच्या इतिहासाचीं स्वतंत्र साधनें गोळा करण्याचें काम त्यांनीं चालविलें होतें. काव्येतिहाससंग्रह मासिक निघाल्यावर त्यांनीं आपल्या जवळचीं जुनीं ऐतिहासिक बाडें संग्रहाच्या संपादकांकडे पाठवून दिलीं.* १८९१ पूर्वी त्यांचा कीर्तने व तेलंग यांच्याकडे पत्र-व्यवहार चालू असावा, असा रा. ब. काशिनाथ नारायण साने यांचा तर्क आहे. १८९१ सालीं एक दिवस माधवरावांनीं पुण्यास कै. बाळाजी प्रभाकर मोडक यांनीं बहामणी राज्याचा इतिहास लिहावा, नीळकंठ जनार्दन कीर्तने यांनीं भोसल्यांचा व शिवाजी महाराजांचा इतिहास लिहावा, रा. ब. साने यांनीं पेशव्यांचा इतिहास लिहावा, या तिघांच्या इतिहासाचे खर्डे लोणावळ्यास जाऊन तेलंगांनीं व आपण तपासावे आणि छापण्याकरितां नवा खर्डा तयार करावा, अशी योजना

* वि. ज्ञा. विस्तार. वर्ष. ४५ अंक २ का. ना. साने यांच्या आठवणी पृ. ६५-६७.

ठविली. नंतर कांहीं काळानें रा. ब. साने यांस त्यांनीं मराठ्यांच्या राज्याचे निरनिराळ्या वेळचे चार नकाशे तयार करण्याविषयीं लिहिले. १८९४ मध्यें पुनः काव्येतिहास संग्रह सुरू करण्याचा त्यांनीं बेत केला. पण वरच्यांपैकीं कोणतींच कामें झालीं नाहींत. शेवटीं त्यांनीं स्वतःच इतिहास लिहिला व पुस्तकाच्या रूपानें तो प्रसिद्ध होण्यापूर्वींच त्यांतलीं पहिलीं प्रकरणें सभांतून वाचून दाखविलीं. १८९४ सालीं पुण्याच्या वसंतव्याख्यानमालेंत पहिलीं दोन प्रकरणें वाचलीं गेलीं, त्याचवर्षी प्रस्तावना आणि तिसरें प्रकरण त्यांनीं मुंबईस हिंदू यूनियन क्लबापुढें नोव्हेंबरांत व्याख्यानरूपानें वाचलीं. १८९५ सालीं आगस्टांत Shivaji as a Civil Ruler हा निबंध रॉयल एशियाटिक सोसायटींत वाचला १८९६ मध्यें त्यांचें ' जिंजी अथवा स्वातंत्र्य युद्ध ' ( Gingi or the War of Independence ) हें प्रकरण मद्रासला सर शंकर नायर यांनीं काढलेल्या मद्रास रिव्ह्यु नांवाच्या मासिकांत छापून प्रसिद्ध झालें. ' महाराष्ट्रांतले साधुसंत ' आणि ' दक्षिण हिंदुस्थानांतले मराठे ' ही प्रकरणें सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत ' मराठयांच्या इतिहासांतलीं अलिखित प्रकरणें ' unwritten chapters of Maratha History या सदराखालीं छापण्यांत आलीं. ' दक्षिण हिंदुस्थानांतले मराठे ' हा विषय त्यांनीं १८९० सालीं वसंतव्याख्यानमालेंत बार्शीचे रा. रामचंद्र मोरेश्वर साने यांना पुढें करून लोकांच्या निदर्शनास आणला. त्याचाच विस्तार रा. ब. दत्तात्रय बळवंत पारसनीस यांनीं ' तंजावरचें राजघराणें ' या नांवानें आपल्या ' इतिहाससंग्रह ' मासिकांत अलीकडे केला. तंजावरचे मराठे व महाराष्ट्रांतले मराठे यांचे ' मराठा तितुका मेळवावा ' या न्यायानें एकीकरण करावें, असा माधवरावांचा वरील

निबंध लिहिण्यांतला उद्देश आहे. जिजीवरील प्रकरणाला माधवरावांनीं प्रथम 'स्वातंत्र्ययुद्ध' असें जोडनांव दिलें होतें, ते त्यांनीं पुस्तकांत काढून टाकलें. अखेरीस हें पुस्तक १९०० सालीं प्रसिद्ध झालें.

'मराठ्यांच्या सत्तेचा उदय' हें इतिहासाचें एकच पुस्तक माधवरावांच्या हातून लिहिलें गेलें असलें तरी या विषयाची सेवा त्यांनीं स्वतंत्र निबंधांच्या रूपानें केली आहे. 'मराठ्यांच्या आमदानींतल्या टांकसाळी व चलनी नाणीं' या विषयावर त्यांनीं १८९९ च्या फेब्रुवारी मध्यें व १९०० च्या जून मध्यें 'पेशव्यांच्या रोजनिश्यांची प्रस्तावना' असे दोन निबंध रॉयल एशियाटिक सोसायटींत वाचले. पेशव्यांचीं दप्तरें पहाण्यास मिळण्याकरितां त्यांचा १८८३-८४ पासून यत्न चालला होता. १८९० व १८९३ या दोन वर्षीं माधवरावांना व तेलंगांना दप्तरें पाहण्याची परवानगी मिळाल्याचे उल्लेख वृत्तपत्रांतून आढळतात. पुढें कै. रा. ब. वाड यांना दप्तरें चाळून व त्यांतल्या कागदांची निवड करून ते कागद प्रसिद्ध करण्याची परवानगी मिळाली. हीं दप्तरें उजेडांत आणण्याचें श्रेय माधवरावांनाच द्यावें लागतें. दप्तरांतल्या कागदांची निवड झाल्यावर ते कागद माधवरावांनीं घरीं आणविले. १८९७-९८ मध्यें त्यांनीं आपल्या फुरसतीचा वेळ हे कागद वाचण्याकडे खर्चीं घातला. शाहूमहाराजापासून तो दुसऱ्या बाजीरावापर्यंतच्या राज्यकर्त्यांच्या रोजनिश्यांचे ते कागद असल्यानें राज्यघटना, जातिवर्चस्व, जमाबंदीची व्यवस्था, सैन्य, आरमार, सार्वजनिक कामें, सामाजिक चालीरीती वगैरे अनेक गोष्टींचें तपशीलवार विवेचन या प्रस्तावनारूप निबंधांत आहे. पहिल्या निबंधांतला विषय नांवावरून समजण्याजोगा असल्यानें त्याची जास्त माहिती

देण्याची आवश्यकता नाहीं. हे दोन्ही निबंध त्यांच्या संकीर्ण लेख संग्रहांत घातलेले आहेत. डेक्कन व्हर्न्याक्युलर सोसायटीनें रोजनिशयांचीं पुस्तकें माधवरावांच्या मरणानंतर प्रसिद्ध केली, पण त्यांतील विषयाचें वर्गीकरण माधवरावांचें आहे, हें चाणाक्ष वाचकांना सांगायला नको.

माधवरावांची इतिहासांतली कामगिरी एवढयानेंच संपत नाहीं. त्यांच्या सामाजिक परिषदेंतल्या भाषणांतून इतिहासाचा भाग अतिशय आहे. वशिष्ठ आणि विश्वामित्र या निबंधांत त्यांनीं ब्राह्मण—क्षत्रियांच्या वर्णसंकराची माहिती दिलेली असून मुसलमानी राज्यांतला सामाजिक इतिहास 'एक हजार वर्षापूर्वीचें हिंदुस्थान' या लखनौच्या भाषणांत वर्णिलेला आहे. 'शंभर वर्षापूर्वीचें दक्षिण हिंदुस्थान' या मद्रासच्या व्याख्यानांत ब्राह्मणी धर्म व बुद्ध धर्म यांची माहिती असून वैद्यांच्या पुस्तकांच्या प्रस्तावनेंत स्त्रियांच्या दुःस्थितीची ऐतिहासिक माहिती गोंवलेली आहे. हिंदुस्थानांतल्या संस्कृत पोथ्यांच्या संरक्षणाकडेही यांचें लक्ष होतें, असें त्यांच्या दप्तरांतल्या कित्येक कागदांवरून दिसतें. १८७८ सालीं त्यांनीं सर्व प्रांतांतल्या संस्कृत पोथ्यांच्या संग्रहाची सरकारी माहिती गोळा केली होती व त्यांच्याच नांवावर आलेले या संबंधांतले कागद त्यांच्या दप्तरांत आहेत. The drain of Indian manuscripts या नांवाच्या निबंध सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत आहे. तो वरील माहितीचें फळ समजावयास हरकत नाहीं.

* * *

* * * *

सांप्रत बुद्धिमान् आणि कर्तबगार पदवीधरांना आपले गुण दाखविण्याला ज्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणें अनेक कार्यक्षेत्रें आहेत. पण

ज्या कार्यक्षेत्रांत पाऊल टाकलें त्यामध्यें आपल्या कर्तृत्वाचा छाप ठेवणाऱ्या माधवरावांसारख्या व्यक्ति क्वचितच आढळतात. मागच्या वृत्तान्तावरून इतिहास, अर्थशास्त्र, राजकारण, संस्थाचालकत्व या कर्तृत्वाच्या क्षेत्रामध्यें माधवरावांनीं दाखविलेल्या बिनजोड करामती-बद्दल वाचकांची खात्री पटली आहे. पण देहानें त्यांचें व्यक्तित्व इतरा-सारखेंच असलें तरी बुद्धिमत्तेनें त्यांच्या ठिकाणीं अनेक व्यक्तित्वाचा अंतर्भाव झाला होता. ते इतिहासकार होते, अर्थशास्त्रज्ञ होते, राज-कारणी मुत्सद्दी होते, पुष्कळ संस्थांचे चालक होते, कायदेपंडित होते व या प्रत्येक बाबतींत असामान्य होते म्हणून त्यांचें नांव उच्चार-तांच त्यांच्या यशःशरीराभोंवतीं पसरलेला अनेक कार्यांचा परिवार लोकांच्या अंतश्चक्षूंसमोर आल्याशिवाय रहात नाहीं. आतांपर्यंत त्यांनीं शिक्षणकार्यांत बजावलेल्या कामगिरीचा स्पष्ट उल्लेख आलेला नसला तरी तें कार्य त्यांच्या व्यापांतून सुटलें नव्हतें, हें, वाचकांच्या ध्यानांत येणें साहजिक आहे. ते स्वतः ज्ञानासक्त असल्यामुळें ज्ञान-प्रसार हीच त्यांच्या जीविताची मुख्य महत्त्वाकांक्षा होऊन बसली होती. त्यांच्या वयाच्या उमेदीचा प्रारंभ अध्यापन कार्यांत झाला. १८८५ सालीं पुनः एकदां त्यांच्याकडे डेक्कन कॉलेजांतल्या विद्यार्थ्यांना कायदा शिकविण्याचें काम आलें होतें, पण तें फार दिवस टिकलें नाहीं. सरकारच्या फडणिशी खात्याचा काटेकोरपणा त्यावेळीं आडवा आला. पगारी अध्यापकाचें काम त्यांनीं अल्पकाळ केलें असलें तरी देशहिताच्या शिक्षणाची त्यांनी स्वयमेव स्वीकारलेली कामगिरी ते जीविताच्या अंतक्षणापर्यंत करीत होते. त्यांची शिक्षणविषयांतली तज्ज्ञता सर्वविश्रुत होती. बडोद्यास १८९२ सालीं शिक्षणासंबंधीं सरकारी

रीतीनें मोठी चळवळ झाली होती व तेव्हां माधवरावांचें मत मागविण्यांत आलें. तें वाचनीय आहे. पण बडोदेंसरकारानें सगळे कागद १८९४ मध्यें प्रसिद्ध केले असल्यामुळें त्याचा सविस्तर ऊहापोह येथें करण्याची गरज नाहीं. अशा गृहस्थाच्या हातांत विद्यापिठाचीं सूत्रें आल्यावर तो स्वस्थ राहील, हें शक्यच नाहीं. माधवराव मुंबईस आल्यावर त्यांचा विद्यापिठाच्या कारभारांत फेलो, सिंडिक, डीन या अनेकविध नात्यानें प्रवेश झाला आणि ताबडतोब त्यांनीं विद्यापीठाच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर रहाण्याजोगा उद्योग आरंभला. देशी भाषांची पदवीच्या अभ्यासक्रमांत वरणी लावणें, ही त्यांच्या उद्योगांतली महत्त्वाची बाब आहे. माधवरावांच्या विद्यार्थीदशेंत देशीभाषांना संस्कृताच्या बरोबरीचा मान होता. संस्कृतऐवजी मराठी भाषा घेऊनच माधवरावांनीं परीक्षा दिल्या. माधवरावांची विद्यार्थीदशा संपण्याच्या सुमारास ऑक्सफर्डच्या विद्वानांचा शिक्षणखात्यांत वरपगडा होऊन त्यांनीं देशी भाषांचें अभ्यासक्रमांतून उच्चाटन केलें. १८६७ सालीं देशी भाषांची विद्यापीठाच्या आवारांतून हकालपट्टी झाली. त्यावेळीं देशीभाषांचा कैवार डॉ. विल्सन आणि सर रेमंड वेस्ट यांच्यासारख्या वजनदार इसमांनीं घेतला असतांही देशी भाषा हाकलून लावण्यांत आल्या. १८८० पर्यंत याविषयीं कोणी चळवळ केली नाहीं. त्यावर्षांपासून देशी भाषांचा पुनः विद्यापीठांत रिघाव होण्यासाठीं खटपट सुरू झाली. १८८१ सालीं सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत ‘ विद्यापीठ आणि देशी भाषा ’ या नांवाचा निबंध लिहून माधवरावांचे मित्र कै. ग. व्यं. जोशी यांनीं चळवळीचें शिंग फुंकलें. प्रथम जोशी आणि माधवरावांचे सहाध्यायी स्नेही कै. विठ्ठलराव पाठक

यांच्यांत या विषयीं पत्रव्यवहार सुरू होता. पाठकांनीं जोश्यांचीं पत्रें माधवरावांकडे पाठविलीं. माधवरावांना चळवळीची आवश्यकता पटली. त्यांनींच सुचविल्यावरून जोश्यांनीं आपला लेख तयार केला. त्यानंतर १८८५ सालांत पुनः चळवळ सुरू झाली. १८८८ सालीं पदवीच्या परिक्षेसाठीं बाकीच्या अभ्यासक्रमास एक स्वतंत्र निबंध लिहिण्याची आणि भाषांतर करण्याची जोड द्यावी, असा ठराव सेनेटपुढें आला. तेलंगांनीं या ठरावान्वयें योजना मुक्रर करण्याचें काम पत्करलें होतें व त्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली होती. पण हा प्रयत्न वाया गेला. पुढें १८९० सालीं वामन आबाजी मोडक यांनीं संस्कृत, फारशी वगैरे भाषांबरोबर देशी भाषेंतलें एक पुस्तक नेमावें, असा ठराव आणला, पण विरोधी बहुमतामुळें मोडकांचा ठराव फेटाळला गेला. १८९४ पर्यंत फिरून हा प्रश्न कोणी उपस्थित केला नाहीं. माधवरावांनीं तो प्रश्न हातांत घेतला आणि त्याचा इतक्या चिकाटीनें पिच्छा पुरविला कीं, अखेरीस एम्. ए. च्या परिक्षेच्या अभ्यासक्रमांत त्याचा समावेश करण्यांत आला. माधवराव आपल्या प्रयत्नाचें यश पाहण्यास जगले नाहींत. त्यांच्या मृत्यूनंतर एका पंधरवडयानें त्यांचा प्रयत्न सफळ झाल्याचें सर्वांच्या निदर्शनास आलें. १८९४ त माधवरावांनीं सिंडिकेट व फॅकल्टी, या विद्यापीठाच्या दोन उपमंडळांची अनुकूलता अगोदर संपादन केली, पण विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा बोजा पडेल व ज्यांची देशीभाषांपैकीं एकही जन्मभाषा नाहीं, त्यांच्या बाबतींत अन्याय होईल, अशा सबबीवर सेनेटनें माधवरावांचा ठराव हाणून पाडला. यावेळीं माधवरावांनीं आपल्या भाषणांत बहुतेक सर्व आक्षेप व्यर्थ असल्याचें सिद्ध केलें. देशी भाषांना उत्तेजन दिल्यास जातिभेद,

धर्मभेद, माजेल असा एक आक्षेप होता. याला 'ते माजणार नाहींत, हें एकच उत्तर आहे. विद्यार्थ्यांवर बोजा पडेल, असा दुसरा आक्षेप निघाला. संस्कृत आणि इंग्रजी भाषेंत प्रभुत्व संपादन करणाऱ्या विद्यार्थीवर्गावर आईबाप, बहिणभाऊ, बायकोमुलें यांच्या संबंधांत घरामध्यें अहोरात्र बोलाव्या लागणाऱ्या भाषेंतलें एखादें पुस्तक वाचायला किंवा दहापांच ओळींचा निबंध लिहावयाला सांगितल्यानें अभ्यासाचा बोजा पडतो, असा वाद घालणें हास्यास्पद आहे, असें माधवरावांनीं या आक्षेपावर उत्तर दिलें. देशीभाषांच्या उत्तेजनाला पारशी फेलो विरुद्ध होते. ज्या समाजांत दादाभाई, डोसाभाई फ्रामजी यांसारखे गुजराथी भाषेचे पंडित निपजले व जे घरीं गुजराथी भाषा बोलतात, त्यांनीं देशीभाषेच्या गौरवाला खो घालण्याची बुद्धि दाखवावी, हें लाजिरवाणें आहे, असें माधवराव म्हणाले. ज्याला इंग्रजी भाषा बोलतां येत नाहीं, त्याला इंग्रज म्हणतां येणार नाहीं, त्याच प्रमाणें ज्याला गुजराथी, मराठी, हिंदी, कानडी या भाषा बोलतां येत नाहींत, त्याला गुजराथी, महाराष्ट्रिय वगैरे म्हणणें अशक्य आहे. पण आमच्या पदवीधरांची अशी विचित्र स्थिति झाली आहे. त्यांना इंग्रजींत व्याख्यानें देतां येतात, पण मराठींत त्यांना व्याख्यानें देतां येत नाहींत, ही शोचनीय स्थिति आहे. ती अंशतः घालविण्याकरितां हा ठराव आणला आहे, पण त्याचा एकदां निकाल न लागल्यास हा प्रश्न पुनः पुनः आयरिश स्वराज्याच्या ( होमरूलच्या ) प्रश्नाप्रमाणें आणला जाईल व त्याचा समाधानकारक निर्णय करणें भाग पडेल, असें माधवरावांनीं याप्रसंगीं सेनेटला बजावलें. पुढें तीन वर्षांनीं वरील शब्द त्यांनीं खरे करून दाखविले.

१८९५ सालीं हिंदू प्रोटेस्टंट पंथावरील भाषणांत त्यांनीं संस्कृत विरुद्ध मराठी (classics versus Vernaculars) हें भांडण आजकालचें नसून जुनें आहे, असें सहज जातां जातां सुचवून ठेवलें. १८९८ मध्यें पुनः देशी भाषेच्या ठराव त्यांनीं आणला. या खेपेस त्यांनीं बऱ्याच सेनेटरांचें मन वळविलें. त्यांच्याकडून एक अर्ज व्हाइस चॅन्सेलर यांजकडे पाठविला. पहिल्यावेळीं त्यांनीं नेटिव्ह प्रेस रिपोर्टराच्यामार्फत सरकारास हालवून त्याच्याकडून विद्यापीठाकडे ह्या विषय चर्चेस निघण्याची व्यवस्था केली होती, असें मानण्याला आधार आहे. १८९३ मध्यें भारतमंत्र्यांनीं देशी भाषांसंबंधीं एक खलीता हिंदुस्थान सरकाराकडे रवाना करून या विषयाच्या चर्चेची भूमिका तयार केली होती, परंतु सगळ्या गोष्टींचा माधवरावांना फायदा मिळाला नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें दुसऱ्यावेळीं या प्रयत्नाला प्रारंभ झाला तेव्हां त्यांनीं मराठी भाषेच्या अभिवृद्धीविषयीं एकंदर पांच लेख लिहिले. ते रॉयल एशियाटिक सोसायटीच्या जर्नलमध्यें आणि टाइम्स ऑफ इंडिया पत्रांत प्रसिद्ध झाले. मराठी भाषेंत विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत घालण्याजोगे ग्रंथ नाहींत, असा कित्येकांनीं आक्षेप आणला होता. तो आक्षेप निराधार आहे, असें सिद्ध करण्यासाठींच हे निबंध लिहिले, असें माधवरावांनीं पांचव्या लेखाच्या शेवटीं म्हटलें आहे. गुजराथी भाषेच्या वाढीची चौकशी त्यांनीं आपल्या मित्रमंडळीमध्यें चालविली होती. मराठी भाषेवरील लेख लिहितांना त्यांनीं आपल्या विद्वान् मित्रांना पत्रें पाठवून उत्तम 'पुस्तकांची यादी' तयार केली. ती संकीर्ण लेख संग्रहांत छापलेली आहे. सर्वानुमतें मराठी भाषेंत एकंदर साठ उत्तम पुस्तकें आहेत, असें ठरलें. इतकीं पुस्तकें

असतांना या भाषेला पदवीच्या अभ्यासक्रमांत स्थान दिलें जाऊं नये, हा केवळ अन्याय आहे, असेंच या पांच निबंधावरून सिद्ध झालें. दुसऱ्यावेळीं फिरून एक कमिटी नेमण्यांत आली आणि तिच्या रिपोर्टाचा अनुकूल विचार होऊन माधवरावांच्या मृत्यूनंतर थोडयाच दिवसांनीं एम्. ए. च्या परिक्षेंत देशी भाषांचा समावेश झाला. त्यांचे उपरिनिर्दिष्ट निबंध मराठी भाषेच्या भक्तांनीं अवश्य वाचण्यासारखे आहेत. त्यांत मधून मधून ग्रंथकारांसंबंधीं, कवींसंबंधीं ज्या उपदेशपर सूचना आहेत, त्यांचें होतकरू लेखकांनीं व कवींनीं मनन करावें, अशी त्यांची श्रेष्ठ प्रतीची योग्यता आहे. माधवरावांनीं देशी भाषांच्या उद्धाराचें व भावी उन्नतीचें कार्य अतिशय चिकाटीनें शेवटास नेऊन मुंबई इलाख्यांतल्या सर्व भाषांवर उपकार करून ठेवले आहेत. त्यांच्या कार्याचा सांप्रत विस्तार चालला आहे. स्वभाषा, स्वदेश, स्वधर्म इत्यादिकांचें प्रत्येक माणसांवर जन्मतः ऋण असतें. त्यातलें स्वधर्माचें आणि स्वदेशाचें ऋण फेडण्याचें काम त्यांनीं अव्याहत चालविलेंच होतें. जन्मभाषेचें ऋण त्यांनीं वरच्याप्रमाणें आयुष्याच्या शेवटीं फेडलें.

१८९४ सालीं पदवीधर अकालीं कां मरतात या विषयावर व्याख्यान दिल्याचा उल्लेख मागें केला आहे. युनिव्हर्सिटीचा दुर्धर अभ्यासक्रम हें एक अकालमृत्यूचें कारण माधवरावांनीं त्यांत सांगितलें होतें. तें कारण नाहींसें करण्याचा उद्योग त्यांनीं १८९५ सालीं आरंभला. बी. ए. च्या अगोदर दोन परीक्षा आहेत त्या काढून एकच मधली (Intermediate) परीक्षा ठेवावी, आणि विद्यार्थ्यांला ज्या विषयांत शेकडा पंचेचाळीस गुण मिळाले असतील, त्यांची त्या विषयांत पुनः

परीक्षा घेतली जाऊं नये, असें माधवरावांनीं या वर्षी दोन ठराव आणले. हे दोन्ही ठराव तेव्हां वाया गेले, परंतु या प्रसंगीं माधवरावांनीं केलेलीं भाषणें त्यांच्या विद्वतेचीं आणि परिश्रमाचीं द्योतक आहेत. त्यांनीं हिंदुस्थानांतल्या व परदेशच्या अनेक विद्यापीठांचा वृत्तांत संपादन करून आपल्या दोन्ही ठरावांची तरफदारी केली. ज्या विषयांत विद्यार्थ्याला शेकडा ४५ गुण मिळतील, त्याला तो विषय माफ केल्यानें परीक्षेची इभ्रत जाते, असा पुष्कळांचा आग्रह होता. इतर विद्यापीठांतून अशी वहिवाट असल्याचें दाखवून माधवरावांनीं या आग्रहाचा पोकळपणा निदर्शनास आणला. बी. ए. पर्यंत तीन ऐवजी दोन परिक्षांचा प्रघात इतर विद्यापीठांतून चालू आहे, असें सांगून त्यांनीं पहिल्या ठरावाचें मंडन केलें. देशीभाषांचा अंगीकार केल्यानें विद्यार्थीवर्गावर जास्त बोजा पडेल, असें प्रतिपादन करणाऱ्या लोकांनींच हा बोजा कमी करणाऱ्या ठरावांना मान दिला नाहीं. मनुष्यस्वभाव कसा विचित्र असतो, याचा हा एक मासला आहे. या ठरावांना त्यावेळीं मान्यता मिळाली नाहीं, तरी ते सर्वस्वीं वाया गेले नाहींत. त्याचा परिणाम विद्यापीठाचा आजच्या कारभारांत दिसून येत आहे. माधवरावांच्या वरील ठरावांचें चीज करण्याचा उदारपणा त्यावेळीं विद्यापीठानें दाखविला नसला तरी त्यांची अंमलबजावणी करण्याला माधवरावांना दुसऱ्या बाबतींत सवड होती. डिस्ट्रिक्ट प्लीडरच्या परीक्षामंडळांत त्यांचा समावेश झाल्यावर त्यांनीं त्या परिक्षेंतला कडकपणा काढून टाकला, व पुष्कळजण पास होतील अशी व्यवस्था केली.

माधवरावांनीं युनिव्हर्सिटीशीं जडलेला संबंध आणखी एका गोष्टींत सफळ केला व सर्वांचा धन्यवाद घेतला. सर मंगळदास नथूभाई

यांनीं विद्यापीठाला अडीच लाखांची देणगी दिली होती. परंतु त्यांच्या चिरंजीवांनीं त्या देणगीबद्दल हरकत काढली व अखेरीस हा तंटा हायकोर्टांत गेला. हायकोर्टाचा निकाल विद्यापीठाच्या वतीनें झाला असता, त्याबद्दल शंका नव्हती, परंतु त्यापूर्वी किती वर्षे या रकमेच्या उपयोगाला विद्यापीठास मुकावें लागलें नसतें, याचा नियम नव्हता; म्हणून माधवरावांनीं सर मंगळदास नथूभाईंच्या मुलांची समजून घालण्याचें काम पत्करलें. माधवरावांनींच हें काम पत्करलें म्हणून त्याचा निकाल लवकर लागला व फिर्यादीच्या फेऱ्यांतून त्या देणगीचा आणि विद्यापीठाचा बचाव झाला, असें माधवरावांच्या मृत्यूनंतर त्यांचा गुणानुवाद गातांना तात्कालीन गव्हर्नरसाहेबांनीं आपल्या सार्वजनिक भाषणांत म्हटलें आहे. मध्यस्थीच्या शिष्टाईला थंड डोकें, मधुरवाणी, संशयातीत निःस्पृहता, खात्रीलायक वजनदारपणा, अडचणींतून मार्ग काढण्याची शक्ति, वगैरे गुण माणसाच्या अंगीं असल्याशिवाय अशा शिष्टाईचें साफल्य होत नाहीं. माधवरावांच्या अंगीं हे सर्व गुण होते. यामुळें फिर्यादीच्या गोत्यांत सांपडलेली देणगी सुटून दोन्ही पक्षांचें समाधान झालें. विद्यापीठाच्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टींत माधवरावांचा कसा उपयोग होत असे, याबद्दल त्यावेळचे एक व्हाइसचॅन्सेलर न्या. मू. कँडी यांच्या स्मारकसभेंतील भाषणांत पुरावा आहे. ते म्हणाले:—

सिंडिकेटचा अध्यक्ष या नात्यानें मला माधवरावांच्या कामाचा अनुभव नेहेमीं येत होता. एखादा बिकट प्रश्न निघाला कीं, चटकन् सर्वांची नजर माधवरावांकडे जात असे. अडचणींतून सोडविणारा त्यांच्यासारखा दुसरा कोणीच गृहस्थ नव्हता आणि आम्ही सर्वजण माधवरावांना गुरु मानीत होतों, असें म्हटल्यास माझ्यावर कोणी अतिशयोक्तीचा आरोप करणार नाहीं. विषय कसलाही असो आणि शंकित कोणीही असो; माधवरावांकडून त्याचा खुलासा

व्हायचा नाहीं, हें ठरलेलें. त्यांच्या अंगीं साधुतुल्य धिमेपणा होता व चारित्र्यांत कपट, दंभ यांचा अत्यंताभाव असल्यानें प्रत्येकजण त्यांच्याकडे आपोआप ओढला जात असे.

पुण्यास असतांना नेटिव्ह इन्स्टिटयूशन, न्यूइंग्लिश स्कूल, फर्ग्युसन कॉलेज, नूतन मराठी विद्यालय, फीमेल हायस्कूल वगैरे अनेक निम-सरकारी शिक्षणसंस्थांशीं त्यांचा साह्यकारी संबंध होता. मुंबईस आल्यानंतर त्यांचा असाच आणखी एका संस्थेशीं संबंध आला. या दिवसांत त्यांच्या डोक्यामध्यें धंदेशिक्षणाची वाढ करण्याचे विचार घोळत होते. मुंबईसरकाराचे एक तत्कालीन अंमलदार सभासद सर ऑलिव्हंट यांनीं माधवरावांच्या मृत्यूनंतर पुण्यास भरलेल्या स्मारक-सभेंत भाषण करतांना, माधवरावांची व आपली एकदांच अगदीं निवांत भेट झाली व तेव्हां येथील तरुणांना धंदेशिक्षण मिळण्यासाठीं काय व्यवस्था करतां येईल या विषयावरील त्यांचे कळकळीचे विचार ऐकायला सांपडले, असें म्हटलें होतें. मुंबईचे नवकोट नारायण जम-शेटजी टाटा यांच्या मनांत एक स्वतंत्र विद्यापीठ काढण्याचा विचार आला व त्यासाठीं आपल्या कमाईतले तीस लाख रुपये खर्चण्याला ते तयार झाले. सदर तीस लाखांच्या विनियोगाची व्यवस्था ठरविणाऱ्या सल्लागार मंडळांत माधवरावांचें नांव घातलें गेलें. दुसऱ्या पुष्कळ व्यक्ति मंडळांत होत्या, परंतु माधवरावांप्रमाणें त्यांत मन घालून काम करणारी दुसरी व्यक्ति नव्हती. जणूं काय तें आपलेंच काम अशा भाव-नेनें माधवराव त्यांत पडले. टाटांचे चिटणीस पादशा नांवाचे एक गृहस्थ होते. त्यांच्यांत माधवरावांसारखाच कामाचा हव्यास व उत्साह होता. या दोघांनीं टाटांचा विचार मूर्तावस्थेस आणण्यासाठीं अतिशय प्रयत्न चालविले. टाटांची संस्था मुंबईनजीक असावी आणि तिला मुंबई

म्युनिसिपाल्टीचा आश्रय मिळावा म्हणून कै. सर भालचंद्र भाटवडेकर यांना माहिती पुरवून माधवरावांनीं कार्पोरेशनमध्यें प्रश्न आणविला, म्युनिसिपाल्टीच्या हद्दीबाहेर जी संस्था निघणार तिला म्युनिसिपाल्टीचा आश्रय देतां येत नाहीं, असें सर फेरोजशहांचें म्हणणें पडल्यामुळें भाटवडेकरांना यश मिळालें नाहीं. टाटांच्या शास्त्रसंशोधनसंस्थेचें आजचें स्वरूप सर्वविश्रुत आहे. माधवराव आणखी कांहीं वर्षें जगते तर तिला निराळें स्वरूप प्राप्त झालें असतें, या विषयीं शंका बाळगायला नको.

* * * *

* * * *

१८९३ पर्यंत माधवरावांवर पडलेल्या मित्रांच्या चिरवियोगाच्या घाल्यांचें वर्णन पूर्वी केलें आहे. त्या वर्षानंतर पुढच्या सात वर्षांत डॉ. भांडारकराखेरीज बरोबरीचे बहुतेक सर्व मित्र कालवश झाले. १८९४ मध्यें मार्च-एप्रिलांत त्यांचे परममित्र शं. पां. पंडित व यशवंत वासुदेव आठल्ये यांना मृत्यूनें गांठलें. आठल्ये हे माधवरावांच्या शिष्यवर्गांतले एक बुद्धिमान् गृहस्थ होते. ब्राह्मणसभेनें पानसुपारी दिली, तेव्हां अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं माधवरावांचा मोठ्या भक्तीनें व श्रद्धेनें स्वागतसत्कार केला आणि नंतर दोन महिन्याच्या आंत तें एकाएकीं कृतांताच्या पचनीं पडले. पंडित आजारीपणांत माधवरावांच्याच घरीं येऊन राहिले होते. पंडित व माधवराव हे सहोदर बंधू नव्हते, पण त्यांच्यांतलें प्रेम सहोदर बांधवांनाही लाजविणारें होतें. असा जिव्हाळ्याचा मित्र आपल्या अगोदर परलोकीं गेल्याचें पाहून माधवरावांना कित्येक दिवसपर्यंत वारंवार दुःखाचे उमाळे येत

होते. पंडितांच्या मृत्यूनंतर त्यांनीं प्रार्थनासमाजांत केलेली उपासना सगळी शोकमय किंवा औदास्यपूर्ण आहे. १८९७ सालीं त्यांच्या आणखी दोन मित्रांची काळानें आहुति घेतली. त्यांतल्या एका मित्रानें माधवरावांच्या सान्निध्यांत अखेरचे दिवस घालवून परलोकीं प्रयाण केलें. वामन आबाजी मोडक हेच ते मित्र होत. माधवरावांनीं सुबोधपत्रिकेंत त्यांच्या योग्यतेविषयीं लहानसा मृत्युलेख लिहून आपला आदर व्यक्त केला. या सालांत रा. ब. चिंतामण नारायण भट हे त्यांचे दुसरे मित्र परलोकवासी झाले. रा. ब. भट हे कर्ते सुधारक होते. त्यांनीं सुधारणेला पोषक अशा अनेक संस्था काढल्या होत्या. घरंदाज प्रौढ स्त्रियांना रिकामपणीं शिक्षण देणारी आजच्या सेवासदनाच्या नमुन्याची रा. ब. भटांनीं एक संस्था पुण्यास काढली होती. त्यांनीं लग्नकार्यांतला वायफळ खर्च बंद करून तो देणगीच्या रूपानें विद्यापीठास अर्पण केला. त्यांचा स्वभाव अत्यंत करारी होता. १८९३ सालीं त्यांनीं डेक्कन कॉलेजांत दिलेलें एक Pledges या विषयावरील व्याख्यान त्यांच्या करारीपणाचें द्योतक आहे. सामाजिक सुधारणेच्या सगळ्या खटपटींत रामलक्ष्मणाच्या किंवा बाजीराव-चिमाजी-अप्पांच्या जोडीप्रमाणें माधवराव आणि भट यांची जोडी झळकत असे. भटांनीं बालविवाहाचा केवळ शाब्दिक निषेध केला नाहीं. आपल्या मुलीला मॅट्रिकपर्यंत शिक्षण देऊन तिचा प्रौढपणीं १८९५ सालीं विवाह केला. सदर लग्नापूर्वी कित्येक महिने त्यांनीं वाङ्निश्चय-विधि करून टाकला होता. असा प्रघात प्रथम नूलकरांनीं घातला. भटांनीं तो पुढें चालविला. त्यांच्या मुलीचें लग्न होण्यापूर्वी तिचा भावी सासरा निवर्तला, परंतु वरपक्षाकडील मंडळी खंबीर मनाची असल्या-

मुळें या विघ्नानें विवाहाला अडचण आली नाहीं. भट पुण्यास वारले. त्यांच्या मृत्यूची वार्ता समजल्यावर माधवराव दुःखाच्या भारानें अगदीं खचून गेले. भटांची हानि लवकर भरून निघणार नाहीं, त्यांच्या मृत्यूमुळें माझा उजवा हात गळून पडला, अशा अर्थाचे उद्गार माधवरावांच्या तोंडून बाहेर पडत असल्याचा वृत्तान्त श्री. रमाबाईंच्या 'आठवणीं'त आहे. कै. ग. व्यं. जोशी यांना लिहिलेल्या एका पत्रांत माधवराव लिहितात:—

For the last 12 years he was my helper, I might almost say my right hand.

यावर्षी त्यांचे आणखी एक बाणेदार गुजराथी मित्र जव्हेरीलाल उमियाशंकर याज्ञिक हे मरण पावले. अशा रीतीनें आपल्या कार्याचे आधारस्तंभ एकामागून एक पडत असतांना यावर्षी एका मित्राच्या नांवानें निघालेल्या मोफत वाचनालयाचा समारंभ माधवरावांनीं साजरा केला. मुंबईच्या प्रार्थनासमाजाला जोडून काढण्यांत आलेल्या भांडारकर–वाचनालयाचें उद्घाटन, हाच तो समारंभ होय. प्रस्तुत समारंभ ता. ५ डिसेंबर १८९७ या दिवशीं सकाळीं झाला. माधवरावांनीं आपल्या भाषणांत डॉ. भांडारकर यांची वाजवी स्तुति केली आहे. ते समाजाचे गुरु आहेत, असें वर्णन संपल्यावर डॉक्टर या पदवीवर कोटी लढवून माधवराव म्हणाले कीं, भांडारकर हे अध्यात्मिक जीविताला ग्रासणाऱ्या रोगांचें निरसन करणारे अत्यंत पटु चिकित्सक आहेत. माधवरावांनीं केलेल्या स्तुतीचें ऋण भांडारकरांनीं त्याच सभारंभांत आभार मानतांना फेडून टाकलें. 'प्रार्थनासमाज' ही संस्था यावच्चंद्रदिवाकरौ टिकणारी आहे. तिचा आमूलाग्र शोध करणाराला समाजमंदिराच्या पायामध्यें

माधवरावांनीं तयार केलेलीं ३९ तत्त्वें भरलेलीं आहेत, असें आढळून येईल. यावरून प्रार्थनासमाजाचा मुख्य आधार कोण हें समजायला हरकत नाहीं.' अशा आशयाचें भाषण डॉ. भांडारकरांनी केलें. हा दोन मित्रांच्या प्रेमाचा सोहळा ज्यांनीं पाहिला त्यांना खरोखरच अपूर्व सुख भोगल्याचा आनंद आणि धन्यता वाटली असेल. या समारंभाला डॉ. आत्माराम पांडुरंग हजर होते. तेही पुढें लवकरच दिवंगत झाले. डॉ. भांडारकरांना माधवरावांच्या विभूतिमत्त्वाविषयीं कशी खात्री व आदराची भावना होती याची एक गोष्ट येथें दिल्यास अस्थानीं होणार नाहीं. १८७८ सालच्या सुरुवातीस डॉ. भांडारकरांच्या पत्नी अतिशय आजारी होत्या. त्यांच्या प्रकृतीची माधवरावांनीं पत्रद्वारें विचारपूस केली व त्यांतच डॉ. भांडारकरांनीं वानप्रस्थाश्रम स्वीकारावा, असें सुचविलें. १३ फेब्रुवारी १८७८ या तारखेच्या जबाबांत भांडारकरांनीं खालील वाक्यें लिहिलीं आहेत:—

The call to assume the vows of Vanprastha comes to me from on High, from Him......Yes, it is from Him that the call comes and one indication of it is that I should have been written to on the point by persons like your good self in the best judgements and feelings of whom, the Spirit of god realises itself.

'ईश्वराचे आदेश आपल्या (माधवरावांच्या) अंतःकरणप्रवृत्तींच्या द्वारें व्यक्त होत असतात,' असें वरच्या उताऱ्यांत भांडारकरांनीं म्हटलें आहे व भांडारकरांनीं म्हटलें आहें म्हणूनच त्याला महत्त्व आहे.

मित्रांप्रमाणेंच माधवरावांनीं काढलेल्या, पोसलेल्या, वाढविलेल्या कित्येक संस्था या काळांत लयास गेल्या. पुण्यास त्यांच्या मागें दुहीचें

दमन करणारा कोणीच पुरुष न उरल्यामुळें सार्वजनिक सभा, औद्योगिक परिषद् वगैरे संस्थांची वाताहत उडाली. त्यांपैकी कांहींचा निःशेष लोप झाला व कांहीं जीवन्मृतावस्थेस पोंचून स्वयंमन्य पुढाऱ्यांच्या हेकेखोरपणाचें शोचनीय स्मरण करून देत आहेत. माधवरावांनीं तयार केलेल्या लोककार्यप्रवीण व्यक्तींची सार्वजनिक सभेंतून हकालपट्टी झाल्यावर माधवरावांनीं पुण्याला १८९६ सालीं डेक्कन सभेची स्थापना केली. सार्वजनिक सभेच्या जोडीनें पुणें शहरांत दुसरी संस्था निघाल्याचें पाहून सार्वजनिक सभा काबीज करणाऱ्या लोकांच्या उरांत कशी घडकी भरली व त्यांच्या सर्वांगाचा पित्तप्रकोपानें कसा भडका उडाला, याचें प्रत्यंतर कोणाला पहावयाचें असल्यास केसरींतला माधवरावांस अनुलक्षून लिहिला गेलेला 'हा म्हातारचळ का पोरखेळ' या मथळ्याचा अग्रलेख पहावा. या लेखांतल्या शिवराळपणामुळें माधवरावांच्या मित्रांना व भक्तांना अतोनात खेद झाला. तुकारामबोवा एकदां शेतराखण करीत असतां भयानें पांखरें उडालीं, या गोष्टीची केसरीच्या जळफळाटानें माधवरावांना आठवण झाली. सार्वजनिक सभेच्या कणसावर बसलेल्या आयतोजी पांखरांना उडवून लावल्याचा दोष घडूं नये म्हणून माधवरावांनीं डेक्कन सभेच्या स्थापनेंत भाग घेतला. सार्वजनिक सभा ज्यांना वर्ज्य झाली त्यांच्या कर्तृत्वासाठीं त्यांनीं नवी सभा उत्पन्न केली. सार्वजनिक सभा बळकावणाऱ्या मंडळींना स्वतः कांहीं करावयाचें नव्हतें व आपल्या शहरांत दुसऱ्यांनीं कांहीं करूं नये, अशी इच्छा होती. ती इच्छा डेक्कन सभेच्या स्थापनेंमुळें निष्फळ ठरली आणि म्हणूनच त्यांच्या मुखपत्राला मोठ्यानें शिवराळ आक्रंदन करावें लागलें. डेक्कन सभा स्थापण्याच्या वेळीं

माधवरावांनीं एक जाहीरनामा तयार केला. त्यांत प्रथम मॉडरेट आणि लिबरल हे शब्द आले आहेत. या शब्दांच्या व्याख्या माधवरावांनीं पुढीलप्रमाणें केल्या आहेत:—

The spirit of liberatism implies a freedom from race and creed prejudices and a steady devotion to all that seeks to do justice between man and man, giving to the rulers the loyalty that is due to the law they are bound to administer, but securing at the same time to the ruled the equality which is their right under the law. Moderation implies the condition of never vainly aspiring after the impossible or after too remote ideals, but striving each day to take the next step in the order of natural growth, by doing the work that lies nearest to the hand in a spirit of compromise and fairness. After all, political activities are chiefly of value not for the particular results achieved, but for the process of political education which is secured by exciting interest in public matters and promoting the self-respect and self-reliance of citizenship. This is no doubt a slow process, but all growth of new habits must be slow to be real.

माधवरावांचें सगळें राजकीय तत्त्वज्ञान वरील उताऱ्यांत भरलेलें आहे. त्यांच्या देखरेखीखालीं सार्वजनिक सभेचें काम वरच्या धोरणानें चाललेलें होतें. वरच्या उताऱ्याचें मनन केल्यास हिंदुस्थानांतल्या राजकारणाचा गाभाच हातीं आल्याप्रमाणें प्रत्येकास वाटेल. लोकशिक्षण हाच राजकीय चळवळीचा उद्देश असावा, पायरी पायरीनें प्रगति करावी, अशक्य किंवा अतिदूरस्थ ध्येयाच्या नादीं लागूं नये, नागरिकत्वाची उभारणी स्वाभिमान आणि स्वावलंबन या गुणांच्या योगानें होत असतें. हे गुण स्वभावांत मुरायला नव्या संवयी जडाव्या लागतात.

नव्या संवयी अंगीं बाणण्याला दीर्घ कालावधि लागतो. जातीपातीच दुरभिमान सोडणें यालाच लिबरॅलिझम म्हणतात; अशक्य अगर अतिदूरच्या ध्येयामागें न लागतां एका ठिकाणीं आपला पाय पक्का ठरल्यावर पुढें पाउल टाकण्याच्या वृत्तीला 'माडरेशन' ही संज्ञा आहे, असे वरच्या उताऱ्यांत म्हटलें आहे. लोकशिक्षणासाठींच माधवराव मोठमोठाले अर्ज तयार करीत होते; सरकारास उद्देशून लिहिलेल्या अर्जांचा वास्तविक लोकांना उपयोग आहे, असें माधवरावांनीं १८९१ सालीं, सरकार अर्जांतल्या मागण्याचा विचार करीत नाहीं म्हणून निराशेनें गोखल्यांनीं प्रश्न विचारला तेव्हां उत्तर दिलें होतें. लिबरॅलिझम आणि मॉडरेशन या दोन शब्दांच्या व्याख्या वर दिलेल्या असल्या तरी 'लिबरल' ही संज्ञा कोणत्याही पक्षाला सार्थतेनें लावून घेतां येणार नाहीं, असें माधवरावांचें मत होतें. पुण्यास १८९६ च्या जानेवारींत फ्रेंड्स लिबरल असोसिएशन नांवाची तरुणमंडळीनें एक नवी संस्था काढली होती. त्यावर्षी उन्हाळ्याची रजा संपून माधवराव महाबळेश्वराहून मुंबईस जात असतां वाटेंत पुण्यांला कांहीं दिवस थांबले होते. तेवढया मुदतींत वरील संस्थेमध्यें त्यांचें लहानसें भाषण झालें. त्यावेळीं त्यांनीं सांगितलें कीं, रोमन प्रजेचे फ्रीमेन, फ्रीडमेन आणि स्लेव्ह म्हणजे अगदीं जन्मसिद्ध स्वतंत्र नागरिक, गुलामगिरींतून मुक्त झालेले नागरिक व गुलाम असे तीन प्रकार होते. आपली आजची स्थिति मधल्या प्रकारासारखी आहे. लिबरल आणि कान्सर्वेटिव्ह असे दोन पक्ष होण्याला अजून अवकाश आहे. लिबरल होण्याचें ध्येय पुढें ठेवून या शब्दाचा उपयोग करावा पण आपण लिबरल आहोंत, असें समजणें मात्र मूर्खपणाचें ठरेल.

# अखेर.

माधवराव न्यायमूर्ति झाल्यानंतर एक दोन वर्षें त्यांची प्रकृति बरी होती, परंतु पुढें दरसाल बिघडत चालली आणि प्रत्येक दुखण्यांत होणारा शक्तिक्षय भरून निघेनासा झाला. एकवर्षींतर दुखण्यांत त्याची स्मरणशक्ति कांहीं दिवस अगदीं नाहींशी झाली होती. या विषयीं श्री. रमाबाईंच्या आठवणींत इत्थंभूत हकीकत आहे. देहाचें सामर्थ्य प्रतिवर्षी जास्त जास्त क्षीण होत असतांही त्यांच्या कामाचा पसारा मात्र कमी झालेला नव्हता. प्रकृति ढासळली म्हणजे त्यांना रजा घ्यावी लागे आणि रजेंत माथेरान, लोणावळें किंवा महाबळेश्वर या सारख्या थंड हवेच्या आरोग्यकारक स्थळीं ते जाऊन रहात, पण त्यांच्या जीवाला विश्रांति मिळत नव्हती. प्रो. वामन गोविंद काळे यांनीं आपल्या १९१० सालच्या व्याख्यानांत वरच्या सारख्या ठिकाणीं माधवराव दरदिवशीं बारा पासून चवदा तास पर्यंत काम करीत असत, असें सांगितलें आहे. त्यांच्याजवळ बसून वाचणारे व लिहिणारे विद्यार्थी कंटाळून मेटाकुटीस येत, पण माधवरावांना कंटाळ्याची बाधा कधींच झाली नाहीं. त्याचें वाचन आणि लेखन शेवटच्या क्षणापर्यंत अखंड चालू होतें. माधवरावांना दररोज सरासरी वीस पत्रें पाठवावीं लागत होतीं, असें कै. गोखल्यांनीं आपल्या १९०२ सालच्या भाषणांत म्हटलें आहे. हीं पत्रें निवळ क्षेमकुशलाचीं नसत. कै. ग. व्यं. जोशी यांना पाठविलेलीं कांहीं पत्रें निबंधासारखी लांबलचक असून त्यामध्यें निबंधाला शोभणाऱ्या विषयांचा खल विस्तृत आहे. जेवतांना समोर कारकून बसवून पत्रांतला मजकूर सांगण्याचा माधवरावांचा प्रघात होता. त्याचें यथास्थित वर्णन कै. महाजनींच्या आठवणींत आहे. या काळांत श्री.

रमाबाईंची त्यांना लेखनवाचनांत अतिशय मदत होत असे. त्यांचे सासुरवासांतल्या उमेदवारीचे दिवस संपून या काळांत सगळे गृहाधिकार त्यांना प्राप्त झाले होते. माधवरावांच्या प्रकृतीची जपणूक त्यांनी कशी चालविली होती व त्यांच्या जबाबदारीचा भाग शक्त्यनुसार त्या कशा उचलीत होत्या, त्याची त्यांच्या आठवणींतली हकीकत प्रत्येक गृहीणीनें अवश्य वाचावी. प्लेगच्या साथींत तर श्री. रमाबाईंनी आपला जीव धोक्यांत घालून कित्येक कामें केलीं. कांग्रेस, कौन्सिल, परिषद, वार्षिक समारंभ नव्या संस्थांची स्थापना, युनिव्हर्सिटीचा कारभार, हायकोर्टांतलें काम इत्यादि अनेकविध कार्यांचा व्याप माधवरावांनीं संभाळला. त्यांनीं कधीं पाठ फिरविली नाहीं. वेल्बीकमिशन, दुष्काळ कमिशन या सारखीं नवीं कामें उपस्थित झालीं कीं त्याचा लोकहिताकडे उपयोग करून घेण्यासाठीं माधवरावांचा उत्साह दुणावत असे. वेल्बीकमिशनपुढें गोखल्याची साक्ष लोकोत्तर ठरली याचें बरेंच श्रेय माधवरावांना देणें प्राप्त आहे, १८९८-९९ सालांत ह्याचें फॅमीन कमिशनकडे लक्ष लागलें होतें. याच दिवसांत पेशव्यांच्या दप्तराची चालना सुरू होती. इतिहास लेखन चालू होतें. परदेशी साखरेच्या व्यापाराबद्दल एक सार्वजनिक वाद उपस्थित झाला तेव्हां माधवरावांनीं अतिशय माहिती मिळवून 'Indian Economist' या सहीनें टाइम्समध्यें लेख लिहिले. प्रथम वाचलेल्या पुस्तकांतली माहिती अपुरी वाटल्यामुळें त्यांनीं आणखी ६० पुस्तकें मागविली आणि नंतर लेख लिहिले, ही हकीकत प्रो. काळ्यांच्या व्याख्यानांत आहे. १९०० सालच्या जून मध्यें पेशव्यांच्या रोजनिश्यांवरील निबंध वाचतांना त्याचें प्रकृतिमान तोळामासा झालें होतें व तो निबंध उभा राहून त्यांना वाचवेल की नाहीं, याबद्दल सर्वांना

काळजी पडली होती. त्यावर्षी एप्रिलांत नाशकास जाऊन त्यांनीं केतकर टाउन हॉलाचा उद्घाटनसमारंभ केला. नोव्हेंबरच्या २४ तारखेस माधवरावांनीं फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूट मध्यें दादाभाई नौरोजींच्या तसबिरीचा अनावरणसमारंभ केला. हेंच त्यांचें शेवटचें सार्वजनिक भाषण. हें भाषण ऐकण्याकरितां श्रोत्यांची अतिशय गर्दी लोटली होती. सुदैवानें माधवरावांची प्रकृति नीट नसतांही त्यांचा आवाज श्रोत्यांपैकीं प्रत्येकाला ऐकूं जाईल इतका चढला होता. माधवरावांनीं आपल्या भाषणांत राजकीय चळवळींत पितामह शोभणाऱ्या दादाभाईंचें गुणवर्णन केलें. पुन: एकदां या निमित्तानें माधवरावांनीं आपलें राजकीय ध्येय सांगितलें. ते म्हणाले:—

In the modern conditions of life, the India that is to be born will have no room for mere distinction of Race Creed, Colour. We aspire all of us to be Indians first, and Indians to the last over every other condition which has separated us so long and made a united India impossible.

नंतर ब्रिटिश राज्याच्या conquest आणि consolidation या दोन अवस्थांची माहिती देऊन Reconciliation किंवा Reconstruction या तिसऱ्या अवस्थेंत आपण आहों व त्या अवस्थेला योग्य असें कर्तव्य दादाभाई पार पाडीत आहेत, असें माधवराव म्हणाले. शेवटीं त्यांनीं—

The India of the past we can never hope to revive, but the India of the future, it is for us to shape and to fashion.

हा आपला सिद्धांत श्रोत्यांना सांगितला.

या भाषणानंतर डिसेंबर महिन्यांत माधवरावांचे डोळे लाहोरास भरणाऱ्या सामाजिक परिषदेकडे लागले होते; पण हृदयक्रियेस

जडलेला आणि दररोज रात्रीं नेमका साडेदहाच्या ठोक्यास प्रकट होऊन कांहीं वेळ प्राणांतिक अवस्था करून सोडणारा विकार बळावत चालल्यामुळें डाक्टरांनीं त्यांस लाहोरला जाण्याची परवानगी दिली नाहीं. हा विकार १९०० च्या आगस्टमध्यें जडला. मध्यंतरीं श्री. रमाबाई आजारी पडल्या तेव्हां महिना दीड महिना तो गुप्त झाला होता. दिवाळीच्या सुट्टींत माधवराव एकटेच माथेरानास गेले असतां तेथें त्याचें स्वरूप पूर्वीप्रमाणें प्रकट झालें. दादाभाईसंबंधींचें भाषण संपवितां संपवितां माधवरावांना या रोगाचा झटका दोन तीन मिनिटें सोसावा लागला. पाठीशीं असलेल्या एका खांबाला टेकून त्यांनीं झालेली स्थिति लोकांना दिसूं दिली नाहीं. त्यांना या रोगाची विशेष शंका आल्यामुळें त्यांनीं वैद्यकीचीं पुस्तकें आणवून त्याचा छडा लावला. डाक्टरांप्रमाणेंच त्यांनाही हा रोग म्हणजे मृत्यूचें पाचारण आहे, याची जाणीव झाली होती. या जाणिवेमुळें माधवरावांच्या वृत्तींत उदासीनता पसरली, त्यांनीं आपलें जेवण बत्तीस घासांवर आणून ठेवलें. बोलतांना निरवानिरवीच्या गोष्टी त्यांच्या तोंडून जास्त निघूं लागल्या. वरवर पहाणाराला माधवरावांच्या वागणुकींतला फरक दिसला नसता, पण श्री. रमाबाईनीं त्यांच्या हालचालीवर बारीक नजर ठेवून हा फरक ओळखला. फरक लक्षांत आल्यानें त्यांची वृत्ति बावरली व प्रत्यहीं भावी परिणामाच्या चिंतेमुळें त्यांच्या डोळ्यांतून टिपें गळूं लागलीं. डॉक्टर माधवरावांना विश्रांति घेण्याचा सल्ला देत होते, त्याचाच अनुवाद घरांतली मंडळी करीत होती. माधवरावांना हा सल्ला पटला नाहीं. त्यांनीं उरलेल्या दिवसांत एकही क्षण वाया जाऊं नये म्हणून दक्षता राखण्यास

आरंभ केला. डिसेंबराच्या अखेरीस जेव्हां त्यांना सामाजिक परिषदेला जाण्याची डाक्टरांनीं मनाई केली, तेव्हां त्यांच्या मनाची विलक्षण स्थिति झाली. 'आपण यंदा येऊं शकत नाहीं' अशा अर्थाची लाहोरास पाठविण्याकरितां तयार केलेली तार मित्रमंडळींना वाचून दाखवीत असतां त्यांचा कंठ दाटला आणि डोळे भरून आले. सगळी मंडळी लाहोरास निघून गेल्यावर सहा महिन्याची रजा काढून माधवराव लोणावळ्यास गेले. या दिवसांत हिंदू कायद्यास उपयोगी पडणाऱ्या धर्मशास्त्रवचनांचा संग्रह तयार करण्याचा व श्री. सी. वाय् चिंतामणी यांच्या 'सोशल रिफार्म' नामक पुस्तकाला निबंध मिळवून देण्याचा उद्योग सुरू होता. जानेवारीच्या सुरुवातीस ते पुनः मुंबईला परत आले. परिषद् निर्विघ्न पार पडल्याचें वर्तमान वाचल्यावर त्यांना आनंद झाला. रोज रात्रीं साडेदहाला काळजांत कळ येत होतीच. ता.१४ जानेवारीला त्यांच्या पायावर सूज दिसू लागली. माधवरावांनाही आपल्या पायांत जडत्व आल्याचें समजलें. ता. १६ रोजीं सकाळीं त्यांना विशेष हुशारी वाटली. रोज रात्रीं डॉक्टर येत असत, त्यांना 'आज येऊं नका' असें माधवरावांनीं त्या दिवशीं कळविलें. दिवसाचें काम आटोपल्यावर ते श्री. रमाबाईसह फिरायला गेले. घरीं परत आल्यावर त्याना त्यांचे एक मित्र जयपूरचे दिवाण कांतिचंद्र मुकर्जी मरण पावल्याची तार मिळाली. 'काम करतां करतां मरण्यांत सुख असतें' अशा अर्थाचें सुभाषित, तारेंतली बातमी वाचतांच त्यांच्या तोंडून बाहेर पडलें. जेवणापूर्वी एका भावी पुनर्विवाहाची चर्चा करण्यांत वेळ घालविला. रात्रीं माधवराव जेवणाकरितां पानावर बसले, पण त्यास अन्न गेलें नाहीं. भोजनोत्तर बहिणी-

कडून आवडतीं पद्यें गाऊन घेतल्यावर जस्टिन मॅकार्थीचा इतिहास वाचण्याकरितां घेतला. इतक्यांत रोजची कळ उठली. यावेळीं तिचें दुःख माधवरावांना सहन करवेना. ही कळ सोसण्यापेक्षां मरण पुरवलें, असा उद्गार त्यांनीं काढला. कळ थांबेना म्हणून घरानजीक रहाणाऱ्या एका डाक्टराला घाईघाईनें बोलावून आणलें. तो आला, पण ' माधवरावांचें देहवसान होत आहे, ते आतां जगणार नाहींत ' असें पाहून हताशा व्यक्त करण्यापलीकडे त्याच्या हातीं कांहींच नव्हतें. श्री. रमाबाई वेदनातिशयानें तळमळणारा माधवरावांचा देह आपल्या हातांनीं सावरीत होत्या. इतक्यांत माधवरावांना एक रक्ताची वांती झाली आणि तिनेंच, समजूं लागल्यापासून ४५।५० वर्षेपर्यंत ज्ञानार्जन—ज्ञानदानाच्या दगदगीनें थकत चाललेल्या शरीराची व माधवरावांच्या आत्म्याची कायमची ताटातूट केली. प्राणोत्क्रमण झालें तरी त्यांच्या चर्येवर सात्त्विक गुणांचें तेज शाबूत होतें.

* * *

दुसऱ्या दिवशीं ही बातमी साऱ्या हिंदुस्थानांत पसरली. सगळा देश शोकसागरांत बुडाला. माधवरावांसारखा ज्ञानरवि एकाएकीं अस्तास गेल्यामुळें जिकडे तिकडे अंधकार पसरला. मुंबईच्या सरकारी कचेऱ्या, शाळा, बाजार दुःखप्रदर्शनार्थ बंद करण्यांत आले. असा प्रकार अन्यत्रही झाला. मुंबईस माधवरावांच्या शवाचें दर्शन घण्याकरितां हजारो माणसें गोळा झालीं. सकाळीं साडेदहा वाजतां प्रेतयात्रा निघाली. माधवरावांच्या देहाचें चंदनाच्या चिताग्नींत विसर्जन करतांना स्मशानांत भाषणें झालीं आणि येथेंच माधवरावांचें चरित्र संपलें.

# परिशिष्ट.

## बी.ए. च्या व कायद्यांच्या पुस्तकांची यादी.

### I.—HISTORY

1. Lingard ( Vols. V-XIII.) 3,000 pages. 2. Froude ( Vols I-V.) 25,000 pages; Vol. VI., cursorily. 3. Hume. ( Vols. IV-VI.) 1,000 pages. 4. Mackintosh ( Vols. III, IV, VI, IX, X.) 1,500 pages. 5. Ranke's Popes ( Vols. IV-VI.) 300 pages. 6. (a) Hallam's Constitutional History ( Vols. I-III.) 1,200 pages. (b) Hallam's Middle Ages, 300 pages. 7. Clarendon's Rebellion, 300 pages, also the whole of index looked into with their reference to the text. 8. Macaulay's History, 1,200 pages. 9. Guizot's Revolution, 400 pages. Hudibras, Nigel, Kenilworth, Peveril, Maceries-Scottish Church and the Annals of England.

### II.—POLITICAL ECONOMY.

1. Mill's Political Economy ( twice clearly and once cursorily.) Mill's Essay on the Unsettled Questions. 2. Ricardo's Works—the whole of the index and its references. 3. Senior—twice thoroughly. 4. M'Culloch's Taxation. 5. Smith's Wealth of Nations. 6. Ramsay's Distribution of Wealth. 7. Whately and 8. Newman Lectures. 9. Malthus's Political Economy ( Select part.) 10. Malthus's Population, Vol. I.

### LAW.

1. Saundar's Justinian, with notes ( twice.) 2. Mackenzie on Roman Law (twice.) 3. Maine's Ancient Law ( twice.) 4. Austin's Province of Jurisprudence Defined. 5. Humphrey's Manual of the Institutes. 6. Family

Rights. 7. Broom's Commentaries (twice.) 8. Smith's Lectures on contracts (twice.) 9. Addison's Contracts (a very minute abstract of the whole book) 10. Addison's Torts, 400 pages. 11. William's Personal Property (twice.) 12. William's Real Property (twice.) 13. Smith's Manual of Equity Jurisprudence. 14. William's Executors and Administrators, 500 pages. 15. Smith's Mercantile Law. 16. Chitty's Contracts. 17. Levi's Commercial Law. 18. Blackstone's Commentaries, Stephen's edition, 4 vols. 19. Smith's Cases. Vols. I and II. (twice.) 20. White and Tudor's Equity Cases. Vols. I and II. (twice.) 21. Broom's Maxims (twice.) 22. Story on Agency. 23. Forster's Jurisprudence. 24. Indian Penal Code, Main's edition (twice.) 25. Notes on the Penal Code. 26. Second Commissioner's Report on the Penal Code. 27. Code of Civil Procedure. 21. Macpherson's Civil Procedure. 29. Code of Criminal Procedure 30, Code of Succession, Act X of 1865. 31. Sir Thomas Strange's Hindoo Law, 2 vols. (cases twice.) 32. Macnaghten's Hindoo and Mahomedan Law 33. Sadagopah Charlu's Mahomedan Law. 34. Elements of Hindoo Law, Strange (twice.) 35. Goodeve on Evidence (twice.) 36. Norton on Evidence. 37. Best on Evidence. 38. Kindersley on Evidence. 39. Manual of Evidence. 40. Vamdera's Evidence Act with Notes. 41. Will's Circumstantial Evidence. 42. Sleigh's Hand-Book on Criminal Law. 43. Morley's Digest, Vol. I. 400 pages. 44. Sir Erskine Perry's Oriental Cases. 45. Morley's Digest, Vol. III. 49. Sir John Peter Grant's Case. 47. Privy Council Reports vols. 8. 48. Moore's Indian Appeal Cases (Settlement Cases)